

पदवीधर प्रकोष्ठ आणि शिक्षक आघाडी,
भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र राज्य

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त



निबंध स्पर्धा - संकलन विशेषांक

"त्रिशताब्दीतून झळकलेली अहिल्यागाथा"

(तीनशे वर्षांनंतरही प्रेरणा देणाऱ्या कार्याचे शब्दचित्रण)

श्री. धनराज देविदास विसपुते

चेअरमन आदर्श शैक्षणिक समूह
प्रदेश संयोजक, पदवीधर प्रकोष्ठ, भाजपा महाराष्ट्र राज्य

डॉ.प्रशम कोल्हे

प्रदेश संयोजक, शिक्षक आघाडी, भारतीय जनता पार्टी,महाराष्ट्र राज्य





अंतरंग

संकलन विशेषांक

१.प्रस्तावना
- पुस्तकाची संकल्पना व उद्देश
- संपादकिय

२. प्रास्ताविक संदेश
- मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
- मा. सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य
- मा. प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री ,भाजपा , महाराष्ट्र राज्य
- मा. कार्यकारी प्रदेशाध्यक्ष भाजपा , महाराष्ट्र राज्य
- विधान परिषद सभापती मा.प्रा. राम शिंदे यांचे भाषण
- मनोगत

३.अहिल्याबाई होळकर – एक परिचय
- जीवनचरित्र
- कार्य, मूल्यं व वारसा
- त्यांच्या प्रशासकीय व सामाजिक योगदानाचा आढावा

३.निबंध स्पर्धेचा आढावा
- स्पर्धेचा उद्देश
- स्पर्धेचे नियम व स्वरूप
- सहभागी विद्याथ्यांची संख्यात्मक माहिती
- परीक्षक मंडळ व मूल्यांकन प्रक्रिया

४.प्रकाशित निबंध
- निवडक १११ निबंध
- पारितोषिक प्राप्त निबंध
- विशेष उल्लेखनीय निबंध

६. कृतज्ञता परिच्छेद / प्रशस्तिपत्र
- आभार

७. सहकार्य



पुस्तकाची संकल्पना व उद्देश

भारताच्या इतिहासात ज्या स्त्री पुरुषांनी समाजव्यवस्थेला दिशा दिली, अशा थोर विभूतींमध्ये पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे स्थान अत्युच्च आहे. त्यांच्या त्रिशताब्दी जयंतीचे औचित्य साधून पदवीधर प्रकोष्ठ आणि शिक्षक आघाडी, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचा हेतू केवळ स्पर्धात्मक नव्हता, तर विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाच्या मौल्यवान व्यक्तिमत्त्वांविषयी जागरूकता निर्माण करून, त्यांच्या विचारांचा आजच्या तरुण पिढीशी समन्वय साधण्याचा प्रामाणिक प्रयत्न होता.

या विशेष संकलनाचा उद्देश म्हणजे, राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा विविध पातळयांवर केलेला अभ्यास, चिंतन व त्यावर आधारित विचार मांडणाऱ्या स्पर्धकांच्या निबंधांना एकत्र करून ते वाचकांपुढे ठेवणे. या माध्यमातून वेगवेगळया दृष्टिकोनातून अहिल्याबाईंचे कार्य समाजासमोर मांडले जाईल. हा केवळ निबंधांचा संग्रह नसून, ही एक वैचारिक चळवळ आहे, जिच्या केंद्रस्थानी आहे स्त्रीशक्ती, नेतृत्वगुण, समाजनुरूप कार्यक्षम प्रशासन आणि भारतीय मूल्यांचा प्रचार.

या स्पर्धेमध्ये राज्यभरातील विविध स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. त्यांनी इतिहास, समाजशास्त्र, प्रशासन, संस्कृती, स्त्रीशक्ती, धर्म आणि लोकहित अशा विविध पैलूंनी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनाचा अभ्यास केला. त्यातून निर्माण झालेले हे निबंध केवळ शैक्षणिक अभ्यासाचा भाग नाहीत, तर समाजमनावर सकारात्मक परिणाम करणारे वैचारिक लेखन म्हणून पुढे येतात. त्यामुळे हे संकलन म्हणजे आपल्या युवा पिढीच्या चिंतनशक्तीची आणि इतिहासाभिमुखतेची एक झलक ठरते.

या पुस्तकाची रचना करताना स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट निबंध, विविध विभागांतील निवडक लेख, तसेच काही प्रेरणादायी आणि विचारप्रवृत्त करणाऱ्या रचनांचा समावेश केला आहे. हे संकलन वाचकांना केवळ ज्ञान देणारे नाही, तर अंतर्मुख करणारे, प्रेरणा देणारे व सामाजिक जाणीवा जागवणारे ठरणार आहे.

याशिवाय, या पुस्तकाचे आणखी एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे इतिहासाच्या पिढ्यान्पिढ्यांमध्ये असलेल्या दुराव्याला मिटवून, आधुनिक पिढीला आपल्या परंपरेशी जोडणे. राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे कार्य म्हणजे एक आदर्श शासक, एक द्रष्ट्या समाजसेविका, आणि एक विवेकपूर्ण स्त्री नेतृत्वाचा आदर्श. त्यांनी राज्यकारभारात कडक शिस्त, समाजकार्यात प्रेमभावना आणि धार्मिक सहिष्णुतेची शिकवण दिली. हे गुण आजच्या काळातही तितकेच उपयुक्त आहेत. या पुस्तकाच्या माध्यमातून हे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही करत आहोत.

या संकलनामुळे, स्पर्धक विद्यार्थ्यांना त्यांच्या लेखनासाठी प्रकट व्यासपीठ मिळते, तर वाचकांना प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचे बहुपरिमित दर्शन होते. यामुळे ही कृती केवळ एक प्रकाशन न राहता, एक वैचारिक ठेवा आणि शैक्षणिक प्रेरणास्त्रोत ठरतो.

हे संकलन तयार करताना, केवळ एक कार्यक्रम म्हणून निबंध स्पर्धा न पाहता, ती एक ऐतिहासिक विचारमंथनाची प्रक्रिया मानली आहे. या प्रक्रियेतून विद्यार्थ्यांनी केवळ ऐतिहासिक माहिती आत्मसात केली नाही, तर समाजप्रबोधन, नेतृत्वविचार आणि संस्कृतीचे भान प्राप्त केले. हे पुस्तक म्हणजे त्याच प्रक्रियेचे फलित आहे.

शेवटी, हे संकलन म्हणजे राजमाता अहिल्याबाई होळकर यांना एक साहित्यिक अभिवादन आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन नव्या पिढीला आपल्या कर्तव्याचा मार्ग दिसावा, हाच या संकलना मागचा खरा उद्देश आहे.

श्री.धनराज देविदास विसपुते
प्रदेश संयोजक ,भारतीय जनता पार्टी,महाराष्ट्र राज्य
तथा
चेअरमन ,आदर्श शैक्षणिक समूह





संपादकीय

“त्रिशताब्दी नंतरही प्रेरणास्रोत.....अहिल्याबाईंचा ठसा जपणाऱ्या लेखनसंग्रहाचे प्रकाशन”

संत, सुधारक, नीतिमान आणि द्रष्ट्या स्त्रीपुरुषांनी भारताच्या इतिहासात आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. त्यापैकी एक तेजस्वी, दैदिप्यमान आणि कालातीत व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर. त्यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र राज्याच्या पदवीधर प्रकोष्ठाने आयोजित केलेली राज्यस्तरीय निबंध स्पर्धा ही केवळ एक साहित्यिक चळवळ नव्हे, तर सामाजिक जाणीवेचा एक सशक्त आवाज होती.

या स्पर्धेला मिळालेला अभूतपूर्व ११,१३९ स्पर्धकांचा प्रतिसाद हा या विचारप्रवण उपक्रमाच्या प्रभावीतेचा आणि समाजातील तरुणाईच्या जागरूकतेचा स्पष्ट पुरावा आहे. हे केवळ आकडे नाहीत, तर महाराष्ट्राच्या विविध भागांतून, भिन्न सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक पार्श्वभूमीतून आलेल्या तरुणांनी व्यक्त केलेल्या विचारांचे प्रतिबिंब आहे. या निबंधांपैकी निवडक आणि दर्जेदार निबंधांचे संकलन करून तयार करण्यात आलेले डिजिटल पुस्तक हे या उपक्रमाचे शाश्वत रूप आहे – एक ऐतिहासिक दस्तऐवज, एक प्रेरणाग्रंथ.

या पुस्तकाचे प्रकाशन हा केवळ औपचारिक सोहळा नाही, तर एका प्रेरणादायी वारशाला नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा एक सशक्त प्रयत्न आहे. त्रिशताब्दीनंतरही राजमाता अहिल्याबाई होळकर यांची कारकीर्द आणि मूल्ये आजही तितकीच सुसंगत व आवश्यक वाटतात, हीच या ग्रंथाच्या निर्मितीमागील खरी प्रेरणा आहे.

राजमाता अहिल्याबाईंच्या जीवनातील सद्गुण, न्यायप्रियता, प्रजावत्सलता, धर्मनिरपेक्ष दृष्टी आणि महिला सक्षमीकरणाच्या दिशा त्यांनी त्या काळातच दाखवल्या होत्या. त्यांनी गंगा, नर्मदा, गोदावरीपासून काशी, अयोध्या, दक्षिणेतील मंदिरांपर्यंत जी पुनर्बांधणी व सशक्तीकरणाची कार्ये केली, त्यांची तुलना आधुनिक काळातील राष्ट्रउभारणीशी करावी लागेल.

आज जेव्हा आपण आधुनिकतेच्या झगमगाटात परंपरेपासून दुरावत चाललो आहोत, तेव्हा अशा महामातृस्वरूप स्त्रीचे स्मरण व स्मृती उजाळणे हे केवळ आदर्श पूजन नसून, सामाजिक आरसाच ठरतो.

या स्पर्धेच्या माध्यमातून युवकांना केवळ निबंधलेखनाचा मंच मिळाला नाही, तर त्यांनी राजमातांच्या जीवनमूल्यांचा विचार करून आपल्या लेखणीतून विचारांचे बीज पेरले. हे बीज भविष्यात उद्यानात फुलणारे विचारपुष्प ठरेल, याची आम्हाला खात्री आहे.

या संपादकीय संकलनाचे यश हे एका संघटनात्मक दृष्टिकोनातून घडलेले आहे. भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र राज्याने या उपक्रमाला दिलेले नेतृत्व, दृष्टी आणि पाठबळ यामुळे हा उपक्रम प्रभावी ठरला. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष मा. श्री. चंद्रशेखर जी बावनकुळे साहेब,कार्यकारी अध्यक्ष मा.श्री. रविंद्रजी चव्हाण साहेब यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य, तसेच पदवीधर प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक आणि या भव्य राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजक मा.श्री.धनराजजी विसपुते साहेबयांचे सूक्ष्म नियोजन, उत्कृष्ट कार्यनीती आणि मार्गदर्शक विचार या संपूर्ण प्रक्रियेचे अधिष्ठान ठरले.

पदवीधर प्रकोष्ठ चे सर्व पदाधिकारी,सदस्य आणि ११११३९ स्पर्धक यांनी या उपक्रमात दिलेला सक्रिय सहभाग, विश्वास आणि प्रेरणा यामुळे पदवीधर प्रकोष्ठाला एक सुसंगत दिशा प्राप्त झाली. त्यांच्या सहकार्यामुळेच हा ग्रंथ प्रकल्प केवळ एक उपक्रम न राहता, एक चळवळ बनला.



या सर्व पाठबळामागे संयोजकांची तळमळ, परिश्रम आणि संघटनकौशल्य दडलेले आहे. या निबंधांची छाननी, मूल्यमापन आणि निवड ही एक अत्यंत काटेकोर आणि प्रामाणिक प्रक्रिया होती. या प्रक्रियेने गुणवत्तेचा कसोशीने शोध घेतला आणि आज जो लेखनसंग्रह आपल्यासमोर आहे, तो म्हणजे महाराष्ट्रातील बुद्धिमान, संवेदनशील आणि विचारशील तरुणांच्या प्रतिभेचे मूर्त स्वरूप आहे.

हे पुस्तक म्हणजे विचारांचं दालन आहे. राजमातांचे कार्य म्हणजे केवळ इतिहास नव्हे, तर आजच्या व्यवस्थेसाठीही मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. त्यांच्या जीवनकथेतून आपण आत्मक्लेश, सेवा, समर्पण आणि नेतृत्व याचे खरे अर्थ शिकतो.

या डिजिटल ग्रंथाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक तरुण-तरुणीला, वाचकाला आणि विचारवंताला एक अशी संधी मिळेल, जिच्यातून ते स्वत:ला राजमातांच्या कार्याशी जोडून घेऊ शकेल. या अभिव्यक्तीमधून उभारी घेणारी नवी पिढी उद्याच्या महाराष्ट्राचे अधिक सशक्त, सुसंस्कृत आणि सजग नागरिक घडवेल.

या पुस्तकाच्या प्रकाशनानिमित्त आम्ही सर्व ज्येष्ठ नेते, मार्गदर्शक, आयोजक आणि सहभागी लेखकांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. स्पर्धकांच्या निबंधरूपी बेलपत्रांनी आणि ज्ञानरुपी जलाने शिवपिंडावर सतत अभिषेक करत राहावा असे हे डिजिटल पुस्तक झाले आहे.सर्वांनी संग्रही ठेवावे असे हे पुस्तक वाचकांना नक्कीच प्रेरणा देत राहील याची खात्री वाटते. हे केवळ प्रकाशन नसून, एका सुसंस्कृत भविष्यासाठी टाकलेले ठोस पाऊल आहे ..... पुण्यश्लोकतेच्या ठशाने पावन झालेले!!!!

डॉ.सीमा कांबळे
संपादक तथा
प्रदेश समन्वयक,पदवीधर प्रकोष्ठ , भाजपा ,महाराष्ट्र राज्य



पुण्यश्लोक
अहिल्याबाई होळकर



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

दि. ०६ जून, २०२५

शुभेच्छा

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या पदवीधर प्रकोष्ठतर्फे राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात असल्याचे समजून आनंद झाला. या निबंध स्पर्धेतील निवडक निबंधांचा समावेश असलेले डिजिटल पुस्तक प्रकाशित होत आहे, ही बाब विद्यार्थी व नवोदित लेखकांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. या स्तुत्य उपक्रमासाठी पदवीधर प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक, स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांचे हार्दिक अभिनंदन!

प्रशासकीय कार्यकौशल्य, न्यायनिष्ठा आणि धर्मपरायणना यांच्या आधारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी त्यांनी आदर्श राज्यकारभार केला. देशभरातील अनेक तीर्थक्षेत्रे, मंदिरे, घाट यांचे पुनर्निर्माण केले. समाजातील सर्व स्तरांतील लोकांसाठी पाण्याची व्यवस्था, धर्मशाळा, अन्नछत्रे व शिक्षणासाठी व्यवस्था निर्माण केली.

स्त्रीशिक्षणास प्रोत्साहन दिले. त्यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त त्यांचे कार्य आणि विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम राज्य शासन प्रभावीपणे करत आहे. भाजपच्या पदवीधर प्रकोष्टतर्फे आयोजित निबंध स्पर्धेत ११ हजारांहून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला, ही प्रशंसनीय बाब असून या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या विचारांचा जागर झाला आहे.

भाजपच्या पदवीधर प्रकोष्ठतर्फे प्रकाशित होत असलेल्या निबंध संग्रहांच्या डिजिटल पुस्तक प्रकाशनास मन:पुर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२५१५१/२२०२५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in,
वेब साईट : www.maharashtra.gov.in



पुण्यश्लोक
अहिल्याबाई होळकर



प्रा. राम शिंदे
सभापती
महाराष्ट्र विधानपरिषद
महाराष्ट्र राज्य

दिनांक : 26 AUG 2025

संदेश...

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश पदवीधर प्रकोष्ठ तर्फे शालेय आणि महाविद्यालय स्तरावर राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आणि आता या स्पर्धेतील निवडक निबंधांचे डिजिटल पुस्तक प्रकाशित होत आहे, हे कळल्यावर मला अतिशय आनंद झाला. चोंडी, ता.जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथील ३१ मे, १७२५ चा जन्म ते मृत्यु १३ ऑगस्ट, १७९५ या ७० वर्षाच्या जीवनप्रवासात पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी सन १७६६ ते जीवनाच्या अखेरपर्यंत म्हणजे २९ वर्षे माळवा प्रांत इंदौर संस्थानचा कारभार पाहिला. आपल्या कार्यकर्तृत्वाने त्यांनी या **अठराव्या शतकावर उमटविलेली मोहोर अद्यापही कायम असून** त्यांचे कार्य यापुढील अनेक पिढ्यांना लोककल्याणकारी राज्य कसे असावे, या संदर्भात प्रेरणा देत राहिल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाचे असे आहे. आक्रमकांनी तोडफोड केलेली मंदिरे, पवित्र तीर्थस्थाने यांचा जीर्णोध्दार त्यांनी केला. घाट, धर्मशाळा उभारल्या, सैन्यात महिलांची तुकडी, सती प्रथेला विरोध, एक न्यायप्रिय आणि कर्तबगार महिला शासक म्हणून त्यांचे सदैव आदराचे स्थान आपल्या मनामध्ये आहे आणि यापुढेही राहिल. **"भिलकवडी"** चा अहिल्यादेवींनी केलेला प्रयोग समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने मोठा विलक्षण आहे. बारा बलुतेदार आणि अठरा पगड जाती अशा सर्वांना त्यांनी स्वराज्य कार्यात सामावून घेतले. या निबंध स्पर्धेच्या निमित्ताने नव्या पिढीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची नव्याने ओळख झाली आणि त्यांचे विचार निबंध स्वरुपात शब्दबध्द झाले, ही निश्चितच आनंदाची बाब आहे. **स्पर्धेत एकूण ११,१३९ इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आणि आता त्यातील १११ निवडक निबंध डिजिटल पुस्तक स्वरुपात प्रकाशित करण्यात येत असल्याने त्याला महत्वपूर्ण दस्तावेजाचे स्वरुप प्राप्त झाले आहे.** सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे, बक्षिसपात्र निबंधकारांचे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांमधील लेखनकौशल्याला प्रोत्साहन देणाऱ्या कल्पक स्पर्धा आयोजकांचे मी मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन करतो. सर्वांना हार्दिक शुभेच्छा...

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पावन स्मृतीस जन्म त्रिशताब्दी निमित्त विनम्र अभिवादन...

pm शिंदे.

(प्रा. राम शिंदे)

कार्यालय : कक्ष क्र. १४२, पहिला मजला, विधान भवन, मुंबई
दूरध्वनी : ०२२-२२०२ ७३७३, २२०२ ४०८६
ई-मेल : chairman.mlc@gmail.com
निवास : मु. पो. चोंडी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर ४१३ २०५, महाराष्ट्र राज्य



पुण्यश्लोक
अहिल्याबाई होळकर



मंत्री
महसूल
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : 10/06/2025

शुभेच्छा संदेश

मान्यवर,

पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आणि त्यातून निवडक निबंधांचे डिजिटल पुस्तक प्रकाशन हा एक अत्यंत प्रशंसनीय उपक्रम आहे. या उपक्रमाद्वारे आपण राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा, त्यांच्या नारी शक्ती, न्यायप्रियता, आणि समाजसुधारणेच्या कार्याचा गौरव करीत आहात. त्याचबरोबर नव्या पिढीला त्यांच्या आदर्शांचा परिचय करून देत आहात.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे जीवन हे नारी शक्ती, आत्मबल, आणि सेवा-भाव यांचे जिवंत उदाहरण आहे. त्यांनी आपल्या पारदर्शी शासन, जनकल्याणकारी धोरणे, आणि सामाजिक समतेच्या प्रयत्नांद्वारे भारतीय इतिहासात अमरत्व प्राप्त केले आहे. या निबंध स्पर्धेमुळे तरुणांना त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा अभ्यास करण्याची संधी मिळाली, आणि डिजिटल पुस्तकाच्या प्रकाशनामुळे हे विचार व्यापक स्तरावर पोहोचतील.या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि विजेत्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. तसेच, या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र राज्य यांचे आभार मानतो. हे डिजिटल पुस्तक नव्या पिढीला प्रेरणा देणारे आणि समाजात सकारात्मक बदल घडवणारे ठरेल, याची मला खात्री आहे.

या उपक्रमाला माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा! पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या आदर्शांनी आपण सर्व प्रेरित होऊया आणि त्यांच्या विचारांना पुढे नेऊया.

चंद्रशेखर बावनकुळे
महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य



पुण्यश्लोक
अहिल्याबाई होळकर



रविंद्र चव्हाण

• कार्यकारी अध्यक्ष - भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश
प्राथमिक सदस्य नं - ७००४२१६४९५ सक्रिय सदस्य नं - ०००००४
• विधानसभा सदस्य - १४३ डोंबिवली (जि. ठाणे)

क्र.१५/२०२५

दिनांक :- १०/०६/२०२५

// शुभसंदेश //

पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पुण्यश्लोक राजामाता अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निबंध स्पर्धेला राज्यभरातून भरघोस प्रतिसाद लाभल्याने या निबंध स्पर्धेमधील निवडक निबंधांचे संकलन करुन एक डिजिटल पुस्तक तयार करण्यात येत असून ते प्रकशित होत आहे, ही ऐकून अत्यंत आनंद झाला.

या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या माध्यमातून निंबध स्पर्धेत सहभागी स्पर्धेकांना एक व्यासपीठ उपलब्ध होणार असून, हा अतिशय गौरवाचा व प्रेरणादायी प्रसंग आहे. या निमित्ताने प्रकाशित होत असलेल्या डिजिटल पुस्तक प्रकाशन सोहळयास माझ्या मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा...!

आपला,

(रविंद्र चव्हाण)

पक्ष कार्यालय : सी. डी. ओ. बॅरक नं. १, वसंतराव भागवत चौक, योगक्षेमसमोर, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२०.
दुरध्वनी : ०२२-२२०२२०५०/२२०४८६८७
मतदारसंघ कार्यालय : जाणता राजा स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान, वीर सावरकर रोड, डोंबिवली पूर्व, जि. ठाणे - ४२१ २०१.
• Web. : www.ravindrachavan.in • E-mail : ravindrachavan.mla@gmail.com







पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधून जागतिक महिला दिनी त्यांच्या अभिवादनाचा प्रस्ताव विधान परिषद सभापती मा.प्रा. राम शिंदे यांचे भाषण

शुक्रवार दिनांक ०७ मार्च, २०२५
स्थळ : विधानपरिषद सभागृह, विधान भवन, मुंबई

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे महान कार्य :
सर्वप्रथम विधानपरिषद आणि विधानसभा या दोन्ही सभागृहांतील सन्माननीय महिला सदस्यांना, तसेच सर्व माता-भगिनींना जागतिक महिला दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा. महिला सबलीकरण आणि महिला सक्षमीकरण संदर्भात आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी आणि माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस तसेच माननीय उप मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे आणि श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली विविध योजना, उपक्रम, निर्णय आपण राबवित आहोत. आज सर्व क्षेत्रात आपल्या माता- भगिनी कर्तृत्वाची गरूडभरारी घेत आहेत. त्यांनी प्रगतीचा आणखी पुढचा टप्पा गाठावा या जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला शुभकामना...
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान केवळ महाराष्ट्र पातळीवर नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाचे असे आहे. आक्रमकांनी तोडफोड केलेली मंदिरे, पवित्र तीर्थस्थाने यांचा जीर्णोध्दार त्यांनी केला. घाट, धर्मशाळा उभारल्या, एक न्यायप्रिय आणि कर्तबगार महिला शासक म्हणून त्यांचे सदैव आदराचे स्थान आपल्या मनामध्ये आहे आणि यापुढेही राहिल. अठराव्या शतकात मराठेशाहीतील इतिहासाच्या पानापानांमध्ये त्यांच्या लोककल्याणकारी राज्य संकल्पनेचे कार्य पैलू आपल्याला झळकलेले दिसतात. त्या "माळवा की महारानी" तर होत्याच परंतु त्याहीपेक्षा हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी ज्याची मुहूर्तमेढ रोवली, त्या "लोककल्याणकारी राज्य" या संकल्पनेच्या त्या आश्वासक आणि विस्तारक देखील होत्या. त्या राणी होत्या तरी पण आपण त्यांना "माता" आणि "देवी" असे का मानतो, यामध्येच त्यांच्या कार्याचे मोठेपण सामावलेले आहे.

जागतिक स्तरावर देखील इतिहासकरांनी आणि लेखकांनी त्यांच्या कार्याची नोंद घेतलेली दिसून येते. लेखक जॉन की, लॉर्ड थॉमस लॉरेन्स यांनी त्यांचे प्रशासन कौशल्य आणि न्यायप्रियतेचे कौतुक करीत त्यांना Philosofer Queen of India, just as Elezabeth (I) was in England असे संबोधत गौरव केला आहे.

लॉरेन्स यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना भारताच्या कॅथरिन द ग्रेट, एलिझाबेथ, मागरिट असे म्हटले आहे. ज्यावेळेस जगातील सर्वात महान स्त्रियांचा इतिहास लिहिला जाईल, त्यावेळेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल, असेही ते (लॉरेन्स) म्हणतात.

सुशासनाची त्यांची संकल्पना आणि "भिलकवडी" चा प्रयोग मोठा विलक्षण आहे. त्याकाळी दळणवळणाची अथवा वाहतुकीची साधने मर्यादित होती. यात्रेकरु, वाटसरु यांना जंगलातून मार्गक्रमण करत असताना भिल्लांकडून लुटले जायचे. याबाबतच्या तक्रारी त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या समस्येच्या मूळाशी जाऊन असे समाधान शोधले की, यात्रेकरु आणि वाटसरूंना सुरक्षित प्रवासाची हमीही मिळाली आणि भिल्लांना रोजगार, उपजीविकेचे साधनही मिळाले. भिल्लांना दरबारात उभे करुन, त्यांना विश्वासात घेत यात्रेकरू आणि वाटसरूंना सुरक्षा पुरवून पुढे नेण्याची जबाबदारी त्यांच्यावरच टाकण्यात आली. यासाठी यात्रेकरू, वाटसरूंकडून नाममात्र एक कवडी शुल्क आकारण्यास त्यांनी अनुमती दिली. इतिहासात "भिलकवडी" म्हणून त्याची नोंद झाली असून पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या संवेदनशील प्रशासन नैपुण्याचे आधुनिक काळात आपण ज्याला Good Governance म्हणतो त्याचे ते महत्वाचे उदाहरण आहे.





पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधून जागतिक महिला दिनी त्यांच्या अभिवादनाचा प्रस्ताव विधान परिषद सभापती मा.प्रा. राम शिंदे यांचे भाषण

६) गोरगरीबांसाठी अन्नछत्र उभारणी

७) सतीप्रथेला विरोध आणि संपत्तीमध्ये स्त्रीयांना अधिकार

८) पतीचे निधन झालेल्या महिलांना दत्तक पुत्र घेण्याबाबत पुरस्कार या उल्लेखनीय योगदानाबरोबरच

९) पर्यावरण रक्षण आणि पर्यावरण संतुलन यादृष्ठीने देखील त्यांचे कार्य महत्वाचे आहे. पशुपक्षी यांना चरण्यासाठी त्यांनी राखीव कुरणे, शेतजमीन यांची व्यवस्था केली. पीकांसह शेतजमीन ताब्यात घेऊन त्याचा उचित मोबदला शेतकऱ्यांना दिला जाई आणि याठिकाणी पशुपक्षी, गुरे यांच्या चरण्याची व्यवस्था होत असे. नदीचे पाणी प्रदुषीत होऊ नये यादृष्टीने देखील त्यांनी नियोजन केलेले दिसून येते. मुख्य प्रवाहापासून नागरी वापरासाठी पाणी मिळावे यासाठीपाण्याचा वेगळा प्रवाह काढण्यात आला. शेतकऱ्यांनी २० झाडे लावणे बंधनकारक केले तसेच विनापरवानगी झाड तोडल्यास मोठी शिक्षा केली जात होती.

१०) त्यांनी बांधलेले घाट, बारव, विहिरी, कुंड आणि मंदिरे हे आज तीनशे वर्षानंतरही सुस्थितीत आहेत. एवढी मोठी आणि सुबक कामे करताना नैसर्गिक साधन संपत्तीचा समतोल राखून वापर करण्यात यावा अशा त्यांच्या कारागीरांना स्पष्ट सूचना असायच्या. स्थापत्यकामासाठी स्थानिक खनिजे आणि दगड वापरण्यावर भर देण्यात आला. वनसंरक्षण आणि वनसंवर्धन यादृष्टीने अतिशय पुरक असे धोरण त्यांनी राबविले. रस्त्याच्या दुतर्फा, ओसाड जमिनी, डोंगर याठिकाणी मोठ्याप्रमाणात वृक्ष लागवडीला प्रोत्साहन दिले.

११) सतत मोहिमेवर असलेले मल्हारराव होळकर यांचेकडून त्यांना प्राप्त झालेले मार्गदर्शन, पत्रव्यवहार या आधारे माळवा राज्यात अद्ययावत तोफखाना आणि दारुगोळा निर्मितीसाठी त्यांनी स्वत: भेटी देऊन जागा निश्चित केली, कुशल कारागीरांची नेमणुक केली. इतकेच नव्हेतर कारागीरांना त्यांच्या कामाचा उचित मोबदला मिळेल यादृष्टीने जातीने लक्ष पुरविले. शस्त्र आणि शास्त्र अशा दोन्ही विषयांत त्या पारंगत होत्या
१२) शेतकरी आणि रयत म्हणजे आपल्या राज्याचा आत्मा होय, त्याला जपले पाहिजे, जगविले पाहिजे या संवेदनशीलतेने त्यांनी राज्यकारभार केला. दुष्काळ सदृष्य परिस्थिती असेल, काही कारणाने पीक निघाले नसेल तर शेतसारा माफ करण्याचा निर्णय त्या घेत.

१३) महेश्वर या छोट्या गावाचे रुपांतर त्यांनी अर्थ-उद्योग-व्यापार यादृष्टीने महत्वाचे ठरेल अशा राजधानी स्वरुप नगरात करुन दाखविले. धातुचे काम, कारागिरी, वस्त्रनिर्मिती-विणकरांच्या कौशल्याला प्रोत्साहन दिले. महेश्वरी साड्यांची निर्मिती, महेश्वरी रेशीम आजही प्रसिध्द आहे. सर्वच क्षेत्रातील निष्णात कारागीरांना त्यांनी महेश्वरमध्ये येऊन उद्योग, उत्पादन करण्यास प्रोत्साहन दिले.

१४) अहिल्यादेवींची न्यायप्रियता आणि न्यायदान पध्दती अनेक इतिहासकारांनी गौरविली आहे.
१५) माळवा राज्यातील धातुउद्योग आणि होळकरांची टांकसाळ याचा त्यावेळी खूप बोलबाला होता. महेश्वरच्या टांकसाळीतून इतर राज्यांची देखील चांदी घेऊन नाणी पाडली जायची. "चालू द्या होळकरी टाकी..." हा वाक्प्रचार आजही प्रचलित आहे. व्यापारी, उद्यमींना अल्प व्याजाने कर्ज दिले जायचे ज्या योगे महेश्वरमध्ये व्यापार आणि त्यायोगे आलेली समृध्दी चिरकाळ टिकून होती.





पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधून जागतिक महिला दिनी त्यांच्या अभिवादनाचा प्रस्ताव विधान परिषद सभापती मा.प्रा. राम शिंदे यांचे भाषण

१६) "आमचा पुत्र अहिल्याबाईने इतका उत्कृष्ट राज्यकारभार चालविला आहे...." असे गौरव उद्गार त्यांचे सासरे मल्हारराव होळकर आणि पत्नी गौतमाबाई यांनी काढले आहेत. अहिल्यादेवींचे पती खंडेराव यांना वीरमरण आले त्यांना सासू-सासरे यांनी सती जाण्यापासून रोखले. त्यांनी राजवस्त्र आणि अलंकार यांचा त्याग करुन आजन्म पांढरीशुभ्र वस्त्रे वापरली. न्यायदानासाठी देखील त्या पांढऱ्याशुभ्र गादीवर त्याच रंगाच्या घोंगडीचे आसन करुन बसत असत. "तुझा जन्म या प्रजेसाठी आहे. तू या प्रजेची माता हो. या रयतेचे, गोरगरिबांचे प्रपंच सुखाचे कर..." ही पितृतुल्य सासरे मल्हारराव होळकर यांची आज्ञा त्यांनी आजन्म पाळली. ब्रिटिश इतिहासकार जॉन की त्यांच्या कार्याचा गौरव करताना म्हणतात, "Ahilyabai's reign stands as a golden age of benevolence and wisdom. She was a rare combination of strength and humility, and her legacy has shaped Indian governance for centuries to come."

१७) त्यांची वैयक्तिक ग्रंथ संपदा खूप मोठी होती. त्यात वेद,उपनिषदे, भगवतगीता, तत्वज्ञान, पुराणे, रामायण, महाभारत यांचा समावेश होता. त्यांनी साहित्य टिकले तर संस्कृती टिकते, या जाणीवेने दुर्मीळ ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती तयार करुन घेतल्या. अनंत फंदी, मोरोपंत यांना लेखन कार्यासाठी प्रोत्साहन दिले.

१८) महेश्वर येथील त्यांच्या राजवाड्यावर त्यांनी केलेली प्रतिज्ञा लिहिलेली आहे. ही प्रतिज्ञा म्हणजे एका महाराणीने लोककल्याणकारी राज्याचा जनतेच्या पुढ्यात मांडलेला अठराव्या शतकातील वचननामाच आहे, ज्याची पूर्तता त्यांनी आपल्या पुढील कारकीर्दीत कसोशीने केली. ती प्रतिज्ञा आपण सर्व लोकप्रतिनिधींनी देखिल वाचली पाहिजे, आत्मसात केली पाहिजे.

- माझे कार्य प्रजेला सुखी करणे आहे.
- माझ्या प्रत्येक कृतीला मी स्वत: जबाबदार आहे.
- सत्तेच्या अधिकारामुळे मी येथे जे काही काम करीत आहे त्या प्रत्येक कृत्याचा जाब मला परमेश्वरापुढे देणे आहे.
- परमेश्वराने ज्या ज्या जबाबदाऱ्या माझ्यावर सोपविल्या आहेत त्या मला पार पाडायच्या आहेत.

सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे अतुलनीय कार्य करुनही आपला नामोल्लेख न करता पूर्णत्वास गेलेल्या प्रत्येक वास्तुवर, कामावर "श्री शंकर आज्ञेवरून" अशी मोहोर उमटविण्यात येत असे.

स्त्रीला संपत्तीमध्ये अधिकार देणे, पतीचा मृत्यू झाला असेल आणि अपत्य नसेल तर स्त्रीला मूल दत्तक घेण्याचा अधिकार अहिल्याबाईंनी प्राप्त करुन दिला. सतीप्रथेला विरोध केला. समाजातील स्त्री ही अबला नसून सबला आहे यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्या राणी होत्या तरी पण आपण त्यांना "माता" किंवा "देवी" असे का मानतो, यामध्येच त्यांच्या कार्याचे मोठेपण सामावले आहे. मातृत्व, नेतृत्व, कर्तृत्व आणि दातृत्व अशा चारही कसोटयांवर माता अहिल्यादेवींचे कार्य असामान्य असून पुढील अनेक पिढयांना ते प्रेरणा देत राहिल.





पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षाचे औचित्य साधून जागतिक महिला दिनी त्यांच्या अभिवादनाचा प्रस्ताव विधान परिषद सभापती मा.प्रा. राम शिंदे यांचे भाषण

१९) आपल्या राज्यातील अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथे ३१ मे, १७२५ रोजी त्यांचा जन्म झाला. आपल्या सर्वांसाठी ही अत्यंत अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे. ईश्वराबद्दलची निष्ठा आणि सामाजिक समतेचा संस्कार बालपणी त्यांच्यावर आई-वडिलांनी म्हणजे चौंडीगावचे पाटील शिवभक्त माणकोजी आणि सुशीलाबाई यांनी बिंबविला. प्रज्ञावंत आणि मूलत:च धैर्यवान असलेल्या अहिल्याबाई शिंदे आठव्या वर्षी सौभाग्यवती आहिल्यादेवी खंडेराव होळकर बनल्या. पराक्रमी सासरे मल्हारराव होळकर यांनी त्यांच्यातील गुणांना प्रोत्साहन दिले. पती खंडेराव होळकर यांना वीरमरण आले. मल्हाररावांनी त्यांना सती जाण्यापासून परावृत्त केले. त्यानंतरचे त्यांचे जीवनकार्य म्हणजे प्रजाहित, महाराणी असूनही वैराग्यभाव, इंग्रजांचा धोका वेळीच ओळखणारी दूरदृष्टीच्या मुत्सद्दी राज्यकर्त्या, महिलांची सैन्यतुकडी निर्माण करणारी महान योध्दा, न्यायप्रिय शासक अशा अनेक गुणवैशिष्ट्यांचा प्रेरक इतिहास आहे.

२०) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा शासनकाळ म्हणजे शांतता, सुव्यवस्था आणि सुरक्षितता यांचे युग होते.

२१) शेतकरी हा राज्याचा आधारस्तंभ असतो हे त्यांच्या विचारांचे सूत्र होते. त्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांना आधारभूत होतील असे कायदे केले. शेतकऱ्यांना आपल्या शेतीतील उत्पादन त्यांच्या सोईप्रमाणे कुठेही विकण्याची मुभा होती.

२२) जानेवारी 1761 मध्ये अहमदशहा अब्दाली बरोबर झालेला पानीपतचा भीषण रणसंग्राम मराठ्यांच्या इतिहासाला वेगळे वळण देऊन गेला. पानीपतावरुन येणाऱ्या प्रतिकूल बातम्या अहिल्यादेवींवर विजेसारख्या कोसळत असतांनाही त्या डगमगल्या नाहीत. पानीपत युध्दाच्या कठीण काळात वेगवेगळ्या स्वरुपात त्यांनी मदतकार्य सुरुच ठेवले. सैनिकांसाठी अखंड अन्नछत्र आणि आरोग्य सेवा त्यांनी पुरविली.

२२) गुजरातमध्ये ज्या पध्दतीने Statue of Unity उभारण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे जन्मस्थान असलेल्या चौंडी येथे Statue of Women Empowerment उभारण्यात यावा आणि त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचे माहिती येणाऱ्या पिढ्यांना व्हावी यादृष्टीने संग्रहालय बनविण्यात यावे. माननीय मुख्यमंत्री महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात येणार आहे. चौंडी येथील त्यांचे जन्मस्थान याला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा प्राप्त व्हावा आणि यासर्व ठिकाणाचा विकास व्हावा यादृष्टीने देखील आपण प्रयत्न करीत आहोत.

२४) भारत हे राष्ट्र म्हणून 1947 ला अस्तित्वात आले असे मानणाऱ्या आणि लिहिणाऱ्या मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी 18 व्या शतकात जागवलेला राष्ट्रधर्म आणि आसेतुहिमाचल मंदिरांचा केलेला जीर्णोध्दार याचा पुन्हा एकदा अभ्यास करावा. "एक भारत श्रेष्ठ भारत" संकल्पनेची बीजे त्यांच्या या असामान्य कार्यात आपल्याला दिसून येतील.

२५) अत्यंत धर्मपरायण आणि शिवभक्त असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी श्रावण महिन्यात शिवस्तोत्र, भजन-कीर्तनाचे स्वर कानी पडत असतांना 13 ऑगस्ट, 1795 रोजी देह ठेवला. सर्वांच्या "गंगाजळनिर्मळ मातुश्री साहेब" परलोकीच्या प्रवासी निघुन गेल्या. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्माचे त्रिशताब्दी वर्ष आपण साजरे करीत आहोत. त्यांचे कार्य आपल्याला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करीत राहिल. त्यांच्या माहेरच्या वंशातील मी एक घटक असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यकर्तृत्वाने इतिहासाच्या पानांवर लोककल्याणकारी राज्य संकल्पना म्हणजे काय, ते, सुवर्ण अक्षरांनी नोंदविलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना विनम्र अभिवादन.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !





मनोगत

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करून त्यांच्या तेजस्वी, न्यायप्रिय व लोककल्याणकारी कार्याचा सन्मान करण्याचा आणि नव्या पिढीला त्यांच्या कार्याची प्रेरणा देण्याचा एक अत्यंत स्तुत्य उपक्रम पदवीधर प्रकोष्ठ, भाजपा,महाराष्ट्र राज्य यांचे वतीने आम्ही यशस्वीरित्या पार पाडला. या उपक्रमाला राज्यभरातून लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद एकूण ११,१३९ नावनोंदणी हीच या स्पर्धेच्या यशाची साक्ष आहे.

या संपूर्ण उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आणि त्यामागील प्रेरणेसाठी आम्ही भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र राज्याचे मन:पूर्वक आभार मानतो. पक्षाच्या सामाजिक बांधिलकीचे आणि सांस्कृतिक मूल्यांचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे विशेष आभार त्यांच्या नेतृत्वामुळेच राज्यातील ऐतिहासिक व संस्कृतिक वारशाला नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न अधिक व्यापक व प्रभावी ठरला.

प्रदेशाध्यक्ष मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांचेही मन:पूर्वक आभार त्यांनी या संकल्पनेला प्रारंभापासूनच सकारात्मक दृष्टी दिली. तसेच, कार्यकारी अध्यक्ष मा. श्री.रविंद्रजी चव्हाण साहेब यांनी दिलेले सततचे मार्गदर्शन आणि पाठबळ यामुळे संपूर्ण संघटनेला एकजूट ठेवून काम करणे शक्य झाले.

आमदार मा.श्री.निरंजनजी डावखरे, आमदार मा.श्री.प्रशांतजी ठाकूर,आमदार मा.श्री.विक्रांतजी पाटील, महामंत्री मा.श्री.विजयजी चौधरी, माझे पदवीधर प्रकोष्ठचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य यांनी देखील या उपक्रमाला खंबीर पाठबळ दिले. त्यांचे मार्गदर्शन आणि विश्वास आम्हाला प्रोत्साहन देणारे ठरले. त्यांच्या सक्रिय सहकार्यामुळेच हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबवता आला. या सर्वांच्या विश्वासानेच आम्ही सर्व निबंधांचे संकलन करून एक वैचारिकदृष्ट्या समृद्ध असे डिजिटल पुस्तक तयार करत आहोत. हे पुस्तक केवळ लेखनाचाच संग्रह नसून, राज्यातील युवकांच्या वैचारिक प्रगल्भतेचा आणि राजमाता अहिल्याबाईंच्या प्रेरणेचा एक दस्तऐवज आहे.

या उपक्रमाचे यश हे संयोजकांच्या अथक परिश्रमाचे फलित आहे. त्यांनी अत्यंत शिस्तबद्ध, कल्पक व चिकाटीने हे कार्य पार पाडले. संयोजकांचे यासाठी विशेष अभिनंदन व आभार.

हा गौरवाचा आणि प्रेरणादायी प्रसंग साजरा करताना आम्ही सर्व संबंधितां प्रती आमची कृतज्ञता व्यक्त करतो. राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे विचार आणि आदर्श पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी भारतीय जनता पक्ष आणि पदवीधर प्रकोष्ठ सदैव कटिबद्ध राहील, याचा आम्हाला विश्वास आहे.

श्री.धनराज विसपुते
प्रदेश संयोजक, पदवीधर प्रकोष्ठ,
भारतीय जनता पार्टी,महाराष्ट्र राज्य

३.अहिल्याबाई होळकर – एक परिचय



- जीवनचरित्र
- कार्य, मूल्यं व वारसा
- त्यांच्या प्रशासकीय व सामाजिक योगदानाचा आढावा

अहिल्याबाई होळकर – एक परिचय

स्त्रीशक्तीच्या तेजस्वी इतिहासातील पुण्यगाथा

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे-राण्यांनी आपल्या पराक्रमाचे, शौर्याचे आणि प्रशासन कौशल्याचे अमिट ठसे उमटवले. परंतु त्या सगळ्यांत एक आगळं, वेगळं, दिव्य व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर. एका छोट्या खेड्यात जन्म घेऊन राज्यकारभाराच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचून त्यांनी ज्या प्रकारे प्रजेच्या कल्याणासाठी जीवन समर्पित केले, त्या त्यांच्या कार्याचा आदर्श आजही अढळ आहे.

जीवनचरित्र – लाघवीपणातून तेजाचा उदय

अहिल्याबाई यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव मांकोजी शिंदे. एक सधन पण साधे शेतकरी कुटुंब. जन्मतः लाभलेल्या सौम्य स्वभावात बुध्दीमत्ता, सात्त्विकता व संस्कारांचे तेज विलक्षण होते. त्या काळात स्त्रियांचे शिक्षण फारच दुर्मिळ होते, पण अहिल्याबाई वाचता लिहिता याव्यात म्हणून वडिलांनी विशेष प्रयत्न केले.

त्यांच्या जीवनाला निर्णायक वळण मिळाले तेव्हा, जेव्हा इंदूरच्या प्रसिद्ध सरदार मल्हारराव होळकरांनी त्या चौंडी येथे भेट दिली. एका विहिरीवर पाण्याच्या रांगेत उभ्या असलेल्या अहिल्याबाईंच्या चेहऱ्यावरचे तेज, सौजन्य आणि शिस्त पाहून ते मंत्रमुग्ध झाले. त्यांनी आपल्या पुत्र खांडेराव होळकरासाठी तिची वधू म्हणून निवड केली. परंतु आयुष्याचे पुढील पर्व कठोर होते. खांडेराव युद्धात धारातीर्थी पडले. त्यानंतर काही वर्षांत मल्हारारावांचाही मृत्यू झाला. प्रजेवर संकट ओढवले होते, परंतु अहिल्याबाईंपुढे शोकाश्रूंना थारा नव्हता. त्यांनी वैधव्याच्या वेदनांना बाजूला ठेवत शासनाची सूत्रे आपल्या हाती घेतली. १७६७ मध्ये त्यांनी मालवा प्रांताच्या गादीवर बसून शासनाचा एक सुवर्ण अध्याय लिहिला.

कार्य, मूल्यं आणि वारसा – भक्ती, कर्तव्य आणि करुणेचा संगम

अहिल्याबाई होळकरांचे जीवन म्हणजे कर्तव्यपरायणता, सजगता आणि आध्यात्मिकता यांचा त्रिवेणी संगम होता. त्यांनी राज्यकारभाराला केवळ अधिकारांची वस्तू मानली नाही, तर तो एक धर्म मानून प्रजेसाठी ऋषितुल्य सेवा केली. त्यांचे कार्य सर्वसमावेशक होते धार्मिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकासाला त्यांनी प्राधान्य दिले. त्यांनी संपूर्ण भारतभर देवस्थानांचे जीर्णोद्धार केले, काशी विश्वनाथ, सोमनाथ, मथुरा, द्वारका, रामेश्वरम, बद्रीनाथ, गया आदी ठिकाणी मंदिरांचे बांधकाम व पुर्ननिर्माण केले. अनेक तीर्थक्षेत्रांवर धर्मशाळा, पाणीविहिरी, अन्नछत्रे सुरू केली.पण त्यांचे वारस मात्र केवळ बांधकामपुरते मर्यादित नाही. त्यांनी नीतिशील, प्रजाहितकारी, उदारमतवादी राज्यकारभार दिला. स्त्रियांसाठी विधवाविवाहाला प्रोत्साहन दिले, बालविवाहावर आळा घालण्याचा प्रयत्न केला. विधवा व निराधार महिलांसाठी आश्रयगृहे स्थापन केली. हे कार्य आजच्या काळातसुद्धा समाजसुधारणेचे उत्तम उदाहरण ठरेल.त्यांनी युद्ध आणि प्रशासन दोन्हीमध्ये कुशलतेचे दर्शन घडवले. राणी असूनही त्यांनी आपल्या सैन्याची घडण युद्धशास्त्राप्रमाणे केली होती. त्या धर्मपरायण होत्या पण कर्मनिष्ठ, दयाळू होत्या पण न्यायप्रिय. प्रजेच्या तक्रारींसाठी त्यांनी दररोज वेळ राखून ठेवला होता आणि त्यांनी कोणताही निर्णय न घेता तक्रारकर्त्याचे म्हणणे संपूर्ण ऐकून न्याय दिला जात असे.

प्रशासकीय व सामाजिक योगदान – एक आदर्श राज्यकर्ती



राजमाता अहिल्याबाईंचे प्रशासन हे आधुनिक युगातील आदर्श व्यवस्थापनाचा मूर्तिमंत नमुना आहे. त्यांनी करपद्धती पारदर्शक, व्यापारी धोरण उदार, आणि कृषिकेंद्रित अर्थव्यवस्था राबवली. त्यांनी गावे पुन्हा पुनर्स्थापित केली, पाणीपुरवठ्याची व्यवस्था सुधारली, आणि गावपातळीवर निर्णयक्षम प्रशासन यंत्रणा तयार केली. त्यांच्या कारकीर्दीत प्रजेच्या हितासाठी लोकशाही मूल्यांचा अवलंब केला गेला. त्यांनी "राजा हा प्रजेचा सेवक असतो" हे विचारधैर्याने साकारले. त्यांच्या कारभारात सामाजिक समतेला विशेष महत्त्व होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र तसेच विविध धर्मीय लोकांना समान संधी व सन्मान लाभला. त्यामुळे अहिल्याबाईंच्या राज्यात संघर्ष नव्हता, सौहार्द होता.

त्यांनी "धर्म हे राजकारणाचं अधिष्ठान नसून, नैतिकतेचं अधिष्ठान आहे" हे सिद्ध केले. त्यामुळे त्या काळातील इतर राजवटींपेक्षा अहिल्याबाईंची कारकीर्द अधिक विवेकशील आणि शांततापूर्ण ठरली.

समारोप

अहिल्याबाई होळकर यांचे जीवन म्हणजे एक तेजस्वी स्त्रीपुरुषार्थाची गाथा आहे. त्यांनी पुरोगामी विचार, पारदर्शक प्रशासन, धार्मिक सहिष्णुता, आणि सामाजिक समतेचा आदर्श पुढे ठेवला. आज, त्यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त आयोजित या निबंध स्पर्धेच्या निमित्ताने, त्यांचा विचारसंपन्न व प्रेरणादायी वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे.

अहिल्याबाई होळकर हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नव्हते, त्या एक विचारधारा होत्या – जिची आवश्यकता आजच्या काळात अधिक भासते. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उभे केलेले हे विचारमंच म्हणजे त्यांच्याच कार्याच्या विस्तारित छायेतून उमललेले एक साहित्यिक व वैचारिक पुष्पगुच्छ आहे.



निबंध स्पर्धेचा आढावा

निबंध स्पर्धेची माहिती :

भारताच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि प्रशासनिक इतिहासात आपला अढळ ठसा उमटवणाऱ्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे जीवनकार्य आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या त्रिशतकीय जयंतीनिमित्त, त्यांच्या विचारांची उजळणी व्हावी, नव्या पिढीला त्यांच्या कर्तृत्वाची ओळख व्हावी आणि त्यांच्या आदर्श नेतृत्वाचे चिंतन घडावे, या उद्देशाने भारतीय जनता पार्टी – महाराष्ट्र राज्याच्या पदवीधर प्रकोष्ठाच्या वतीने एक राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धेची उद्दिष्टे:

१.अहिल्याबाईंच्या कार्याचे अभ्यासपूर्ण आणि वैचारिक विश्लेषण करणे.

२.विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती आणि लेखनकौशल्य वाढवणे.

३.राजमातांचे सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे.

स्पर्धेची प्रमुख वैशिष्ट्ये :

१. राज्यातील सर्व शाळा,विद्यालय आणि महाविद्यालयीन पदवीधर विद्यार्थ्यांना सहभागाची संधी

२. मराठी,हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये लेखनाची मुभा

३. उत्कृष्ट निबंधांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि पारितोषिके

४. निवडक निबंधांचे प्रकाशन

५. सर्व सहभागींना सहभागीत्व प्रमाणपत्र

६. सर्व वयोगटांना संधी

नियम व अटी:

१.निबंध वयोगटानुसार दिलेल्या शब्दांमध्ये मर्यादित असावा

२.स्वतंत्र व मौलिक लेखन आवश्यक

३.दिलेल्या मुदतीपूर्वी निबंध सादर करणे अनिवार्य

४.स्पर्धकाचे नाव, महाविद्यालय, संपर्क यांचे संपूर्ण तपशील आवश्यक

ही निबंध स्पर्धा म्हणजे केवळ लेखनाची संधी नसून, पुण्यश्लोक अहिल्याबाईंच्या जीवनमूल्यांचा वारसा पुढील पिढीकडे सुपूर्त करण्याचा एक सांस्कृतिक उपक्रम आहे. त्यांच्या त्रिशतकीय जयंतीनिमित्त हा एक वैचारिक अभिवादन समजून या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टी – महाराष्ट्र राज्य, पदवीधर प्रकोष्ठ यांच्या वतीने करण्यात आले.

महत्त्वाच्या तारखा

१. दि.२५ मे ते ३० मे २०२५ - नाव नोंदणी आणि दिलेल्या लिंक वर निबंध स्पर्धेचे पीडीएफ पाठविणे.

२. दि. ०५ जून २०२५ पदवीधर प्रकोष्टाच्या वेबसाईटवर निकाल जाहीर

३. पारितोषिक वितरणाची तारीख विजेत्यांना कळविण्यात येईल आणि सहभागीना ३० जून २०२५ च्या आत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील.

जिल्हानिहाय मिळालेला प्रतिसाद



Sr. No.	DISTRICT	No. of Registration
1	मुंबई शहर	46
2	मुंबई उपनगर	13
3	ठाणे	141
4	पालघर	1332
5	रायगड	3963
6	रत्नागिरी	310
7	सिंधुदुर्ग	12
8	पुणे	174
9	सातारा	94
10	सांगली	71
11	कोल्हापूर	95
12	सोलापूर	3325
13	नाशिक	175
14	अहमदनगर	516
15	धुळे	81
16	नंदुरबार	67
17	जळगाव	125
18	छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)	95
19	बीड	43
20	जालना	34
21	धाराशिव (उस्मानाबाद)	39
22	लातूर	52
23	हिंगोली	78
24	नांदेड	8
25	परभणी	26
26	अमरावती	26
27	अकोला	75
28	वाशीम	17
29	बुलढाणा	18
30	यवतमाळ	12
31	नागपूर	10
32	वर्धा	22
33	भंडारा	10
34	गोंदिया	6
35	चंद्रपूर	22
36	गडचिरोली	6
Total		11139

निबंध स्पर्धेचा निकाल



पदवीधर प्रकोष्ठ आणि शिक्षक आघाडी ,भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचा निकाल

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र

वयोगट १ : ८ ते १२ वर्षे (प्राथमिक गट)

अ.न	स्पर्धकाचे नाव	निबंधाचा विषय	क्रमांक
१.	कु.भोळे सेहल भानुदास	पुण्यश्लोक अहिल्याबाई -आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व	प्रथम
२.	कु.मोरखंडे वेदांत नवनाथ	पुण्यश्लोक अहिल्याबाई -आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व	द्वितीय
३.	कु.माने दुर्गा श्रीगणेश	पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर	तृतीय
४.	कु.खिलारे सार्थक नितीन	अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य	उत्तेजनार्थ
५.	कु.आरेकर हित पराग	अहिल्याबाई होळकर- एक दूरदृष्टीची प्रशासक	उत्तेजनार्थ

वयोगट २ : १३ ते १६ वर्षे (माध्यमिक गट)

अ.न	स्पर्धकाचे नाव	निबंधाचा विषय	क्रमांक
१.	कु.झिरपे ज्ञानेश्वरी महारुद्र	अहिल्याबाई होळकर-एक आदर्श शासिका आणि जनतेची माय	प्रथम
२.	कु.शेंडे ऋतुजा सुधाकर	अहिल्याबाईचं जीवनचरित्र:त्याग,पराक्रम आणि लोककल्याण	द्वितीय
३.	कु.पोवार सोहम सतीश	अहिल्याबाईंचे मंदीर बांधकाम आणि धार्मिक कार्य	तृतीय
४.	कु.विखारे स्वरा मिलिंद	राजमाता अहिल्याबाई स्त्री शक्तीचा जाज्वल इतिहास	उत्तेजनार्थ
५.	कु.वेदपाठक प्रेम मनोहर	अहिल्याबाई होळकर-एक आदर्श शासिका	उत्तेजनार्थ

निबंध स्पर्धेचा निकाल



वयोगट ३ : १७ ते २१ वर्षे (उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन गट)

अ.न.	स्पर्धकाचे नाव	निबंधाचा विषय	क्रमांक
१.	कु.पाटील करण	राजमाता अहिल्याबाई स्त्री शक्तीचा जाज्वल इतिहास	प्रथम
२.	कु.फाले सानिया सदाशिव	अहिल्याबाई होळकर-एक आदर्श शासिका आणि जनतेची माय	द्वितीय
३.	कु.गायकवाड स्नेहल बाळासाहेब	राजमाता अहिल्याबाई स्त्री शक्तीचा जाज्वल इतिहास	तृतीय
४.	कु.करपे वैष्णवी विकास	पुण्यश्लोक अहिल्याबाई -आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व	उत्तेजनार्थ
५.	कु.काणे स्वरूप मिलिंद	अहिल्याबाईंचे मंदीर बांधकाम आणि धार्मिक कार्य	उत्तेजनार्थ

वयोगट ४. २१ वर्षापुढील

अ.न.	स्पर्धकाचे नाव	निबंधाचा विषय	क्रमांक
१.	श्री.साबळे अमोल लक्ष्मण	अहिल्या बाईचं जीवनचरित्र:त्याग,पराक्रम आणि लोककल्याण	प्रथम
२.	श्री.भोयर रोशन सुरेश	अहिल्याबाई होळकर- भारताच्या इतिहासातील तेजस्वी अध्याय	द्वितीय
३.	श्रीम .सावंत नीता नितीन	पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर-एक आदर्श स्त्री शासिका	तृतीय
४.	श्रीम.शहा पायल यश	पुण्यश्लोक अहिल्याबाई -आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व	उत्तेजनार्थ
५.	श्री.पाटील प्रशांत रमेश	अहिल्या बाईचं जीवनचरित्र:त्याग,पराक्रम आणि लोककल्याण	उत्तेजनार्थ

निबंध स्पर्धेचा निकाल



अ. क्र.	स्पर्धकाचे नाव	निबंध विषयाचे नाव
	गट क्रमांक 4	
1.	श्री. अमोल लक्ष्मण साबळे -	अहिल्याबाईंचे जीवन :चरित्रÊ त्याग पराक्रम आणि लोककल्याण.
2.	श्री. रोशन सुरेश भोयर -	अहिल्याबाई होळकर भारताच्या इतिहासातील तेजस्वी अध्याय.
3.	श्रीमती नीता नितीन सावंत -	पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर : एक आदर्श स्त्री- शासिका.
4.	श्री. प्रशांत रमेश पाटील -	अहिल्याबाईंचे जीवन : चरित्रÊ त्यागÊ पराक्रम आणि लोककल्याण.
5.	श्रीमती पायल यश शहा -	पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.
	गट क्रमांक 3	
6.	श्री. पाटील करण -	राजमाता अहिल्याबाई स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.
7.	श्रीमती फाले सानिया सदाशिव -	अहिल्याबाई होळकर -एक आदर्श शासिका आणि जनतेची माय.
8.	श्री.गायकवाड स्नेहल बाळासाहेब -	राजमाता अहिल्याबाई स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.
9.	श्रीमती करपे वैष्णवी विकास -	पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.
10.	श्री. काणे स्वरूप मिलिंद -	अहिल्याबाईंचे मंदिर बांधकाम आणि धार्मिक कार्य.
	गट क्रमांक 2	
11.	श्रीमती झिरपे ज्ञानेश्वरी महारुद्र -	अहिल्याबाई होळकर -एक आदर्श शासिका आणि जनतेची माय.
12.	श्रीमती शेंडे ऋतुजा सुधाकर -	अहिल्याबाई यांचे जीवनचरित्र :त्यागÊ पराक्रम आणि लोककल्याण.
13.	श्री. पोवार सोहम सतीश -	अहिल्याबाई होळकर यांचे मंदिर बांधकाम आणि धार्मिक कार्य.
14.	श्रीमती विखारे स्वरा मिलिंद -	राजमाता अहिल्याबाई स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.
15.	श्री. वेदपाठक प्रेम मनोहर-	पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर एक आदर्श स्त्री शासिका.
	गट क्रमांक 1	
16.	कु.भोळे सेहल भानुदास -	आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.
17.	कु. मोरखंडे वेदांत नवनाथ -	आधुनिक भारतासाठीप्रेरणादायी नेतृत्व.
18.	कु.माने देशमुख दुर्गा श्रीगणेश -	अहिल्याबाई होळकर जयंती.
19.	कु. खिलारे सार्थक नितीन -	अहिल्याबाई होळकर यांचे समाज सुधारणेतील कार्य.
20.	कु. अरेकर हित पराग -	अहिल्याबाई होळकर एक दूरदृष्टीचे प्रशासक.

निवडक १११ निबंध



गट क्रमांक 4

21. सौ. मुंजाळ अमिता दौलत - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर एक आदर्श स्त्री शासिका.
22. सौ. केळकर प्रीती राजेश -पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर एक आदर्श स्त्री शासिका.
23. सौ. मोरे जयश्री स्वप्निल - राजमाता अहिल्याबाई होळकर - स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.
24. सौ. कनकी नर्मदा नरेश - अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारण्याचे कार्य.
25. श्री. गोवरे आकाश दिलीप - अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य.
26. श्रीमती अल्हाट भारती एकनाथ - पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठीप्रेरणादायी नेतृत्व.
27. श्री. शेवाळे योगेश नथू - अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य.
28. श्रीमती शेळके साक्षी संजय - पुण्यश्लोक अहिल्याबाई :आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.
29. श्रीमती शिंदे रोशनी सुनील - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर : एक आदर्श स्त्री शासिका.
30. श्री.पाटकर हेमंत मोतीराम - अहिल्याबाई होळकर : एक आदर्श स्त्री शासिका.
31. श्रीमती जांभळे पूजा अक्षय - अहिल्याबाई होळकर : एक आदर्श शासिका आणि जनतेची माय.
32. श्रीमती अहिरराव वर्षा आबासाहेब - अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य.
33. श्रीमती गोगावले प्रिया जनार्दन - अहिल्याबाईच्या कार्यातून घडलेली स्त्री शक्तीची प्रेरणा.
34. सौ. तोडणकर राखी योगेश - राजमाता अहिल्याबाई : स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.
35. श्री. मढवी राम सुधाकर - राजमाता अहिल्याबाई : स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.
36. डॉ. भातखंडे केतकी विश्वजीत - पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर : एक आदर्श स्त्री शासिका.
37. कु. गिरीगोसावी रेश्मा मधुकर - पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठीप्रेरणादायी नेतृत्व.
38. श्री. पाटील निखिल अरुण - राजमाता अहिल्याबाई : स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.
39. श्रीमती बच्चा साईसुधा मल्लिकार्जुन - अहिल्याबाईंचं जीवनचरित्र : त्यागÊ पराक्रम आणि लोककल्याण.
40. सौ. बिज्जरगी सीमा राजेश - पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.
41. सौ. जोशी शुभांगी सारंग - लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचे जीवनÊ कार्य व विचार.
42. श्री.भातमारे तुषार तुकाराम - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे समाज सुधारणेतील कार्य.
43. श्री. पारखे विक्रम केरू - अहिल्याबाई होळकर यांचे कार्य.
44. श्री. चव्हाण बाळासाहेबरघुनाथ - अहिल्याबाई होळकर: न्यायÊ भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम.
45. सौ. लोंढे रोहिणी बाळासाहेब - अहिल्याबाई होळकर यांचे समाज सुधारणेतील कार्य.

निवडक १११ निबंध



45. सौ. लोंढे रोहिणी बाळासाहेब - अहिल्याबाई होळकर यांचे समाज सुधारणेतील कार्य.
46. कु. देवकुटे मधुरा योगेश - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर एक आदर्श शासिका.
47. सौ. बाजारे निता जितेंद्र - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका.
48. श्री. डांगे राम दिलीप - अहिल्याबाई होळकर यांचे समाज सुधारणेतील कार्य.
49. सौ. नेवसे रेश्मा कृष्णाथ - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका.
50. सौ. बोऱ्हाडे सुरेखा अशोक - अहिल्याबाईंच जीवन चरित्र : त्यागÊ पराक्रम आणि लोककल्याण.
51. श्री. लष्करे गौरव राजेंद्र - पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठीप्रेरणादायी नेतृत्व.

गट क्रमांक 3

52. कु. कुलकर्णी ज्ञानदा योगेश - अहिल्याबाई होळकर : न्यायÊ भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम.
53. कु. गायकवाड ऋतुजा अरविंद - अहिल्याबाईंच जीवन चरित्र : त्यागÊ पराक्रम आणि लोककल्याण.
54. कु. गोलाण करण कमलाकर - अहिल्याबाई होळकर: स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.
55. कु. कटके पायल देवानंद - अहिल्याबाई होळकर यांचे समाज सुधारणेतील कार्य.
56. कु. चित्ते दिक्षा भरत - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर एक आदर्श स्त्री शासिका.
57. कु. भडगे शितल भाऊसाहेब - अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य.
58. कु. पांडे तनिष्का दिपक - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर एक आदर्श स्त्री शासिका.
59. कु. शिंदे प्रगती गणेश - अहिल्याबाई होळकर यांचे स्थापत्य क्षेत्रातील सौंदर्यदृष्टी आणि कलात्मकता.
60. कु. पाटील सिद्धी रणजीत - लोकमाता अहिल्याबाई होळकर.
61. कु. साबळे सानिका शिरीष - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका.
62. कु. खाडे कांचन सुरेश - अहिल्याबाई होळकर जीवनÊ कार्यÊ विचार आणि आजची प्रस्तुतता.
63. कु. चिखले रेणुका शिवदास - पुण्यश्लोक अहिल्याबाई आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.
64. कु. ढोकणे देवकी भाऊसाहेब - अहिल्याबाई होळकर भारताच्या इतिहासातील तेजस्वी अध्याय.
65. कु. पल्लाळ ऋतुजा सुरेश - पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.
66. कु. राऊत सानिया गणेश - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर एक आदर्श स्त्री शासिका..

निवडक १११ निबंध



67. कु. महाजन भावेश सोमनाथ - पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.
68. कु. बाबरे कुणाल अनिल - अहिल्याबाई होळकर : एक आदर्श शासिका आणि जनतेची माय.
69. कु. महम्मद कैफ अहमद मकानदार - अहिल्याबाईंच्या कार्यातूनघडलेली स्त्री शक्तीची प्रेरणा.
70. कु. डोळझाके मनीषा कुंडलिक - अहिल्याबाईंच जीवन चरित्र : त्यागÊ पराक्रम आणि लोककल्याण.
71. कु. राऊत सिद्धी शांतीलाल - अहिल्याबाई होळकर : न्यायÊ भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम.
72. कु. सोनार अभिषेक सुरेंद्र - अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य.
73. कु. टर्ले चंचल सुभाष - अहिल्याबाई होळकर : न्यायÊ भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम.
74. कु. किजबिले पूर्वा पांडुरंग - पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठीप्रेरणादायी नेतृत्व.
75. कु. जाधव श्रेया शशिकांत - अहिल्याबाई होळकर- भारताच्या इतिहासातील तेजस्वी अध्याय.
76. कु. राऊत समृद्धी संतोष - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर -एक आदर्श स्त्री शासिका.

    गट क्रमांक 2

77. कु. राजमाने शर्विल नितीन - अहिल्याबाईंचे जीवन चरित्र Êत्यागÊ पराक्रम आणि लोककल्याण.
78. कु. सुरवसे अनन्या अमोल - अहिल्याबाई होळकर.
79. कु. सातपुते रचित दिपक - अहिल्याबाई होळकर आधुनिक भारतासाठीप्रेरणादायी नेतृत्व.
80. कु. फराक्टे स्वरा संदिप - अहिल्याबाई होळकर एक आदर्श शासिका आणि जनतेची माय.
81. कु. देवकते आराध्या मिलिंद - पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर.
82. कु. चव्हाण कृष्णा सागर - अहिल्याबाईंचे जीवनचरित्र.
83. कु. फाळे श्रीतेज सदाशिव - अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य.
84. कु. खोत प्रताप समाधान - राजमाता अहिल्याबाई होळकर म्हणजे आदर्श स्त्री शक्तीचा अखंड इतिहास.
85. कु. घोडके सम्यक नितीन - राणी अहिल्याबाई होळकर.
86. कु. कदम अदिती गुणाजी - अहिल्याबाई होळकर.
87. कु. अलदर स्वरा सुनिल - अहिल्याबाई होळकर.

निवडक १११ निबंध



88. कु. किणी हंसिता संदेश - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर: एक आदर्श स्त्री-शासिका.

89. कु. वांगस्कर सुजित बन्सलिंग - अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य.

90. कु. सिंग हनी त्रिवेंद्र - अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य.

91. कु. कांकरिया देशना हितेशजी - अहिल्याबाई होळकर न्यायÊ भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम.
गट क्रमांक 1

92. कु. गायगोले साची दिनेश - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर एक आदर्श स्त्री-शासिका.

93. कु. मसाल सुरज युवराज - अहिल्याबाई होळकर समाज सुधारणाचे कार्य.

94. कु. धायदार प्रथमेश किशोर कुमार - अहिल्यादेवींचे योगदान.

95. कु. गायकवाड मृण्मयी महेश्वर – **Fearles & Dignifide Ahilyabai.**

96. कु. इंगळे ऋतिका सचिन - अहिल्याबाई होळकर.

97. कु. ओव्हल प्रज्ञन जगन्नाथ - अहिल्याबाई होळकर जीवनचरित्र त्यागÊ पराक्रम आणि लोककल्याण.

98. कु. सुतार समृद्धी सचिन - अहिल्याबाईंचं जीवनचरित्र त्यागÊ पराक्रम आणि लोककल्याण.

99. कु. पवार प्रगती अशोक - अहिल्याबाई होळकर यांचे समाज सुधारणेतील कार्य.

100. कु. जाधव स्वरा सुरेश - राजमाता अहिल्याबाई - स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.

101. कु. मांढरे भाग्यश्रीखंडेराव - अहिल्याबाईंच जीवनचरित्र : त्यागÊपराक्रम आणि लोककल्याण.

102.कु. राठोड अनन्या अंकुश - अहिल्याबाई होळकर : - न्यायÊ भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम.

103.कु. निंबाळकर उत्कर्ष शंकर - अहिल्याबाई होळकर :– न्यायÊभक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम.

104. कु. पांडे हर्षिता गिरीष - स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.

105.कु. रिढे भक्ती सचिन - अहिल्याबाई होळकर एक आदर्श स्त्री शासिका.

106.कु. साखळकर अस्मि अविनाश - अहिल्याबाई होळकर एक आदर्श स्त्री शासिका.

107.कु. जोलापुरे प्राजक्ता विरेंद्र - अहिल्याबाई होळकर यांची जीवनगाथा.

108.कु. सपकाळ प्राची संपत - अहिल्याबाईंचे जीवनचरित्र.

109.कु. बळवंते सृष्टी दत्तात्रय - अहिल्याबाई होळकर : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.

110.कु. अगावणे महालक्ष्मी प्रदिप - अहिल्याईंचे जीवनचरित्र.

111. कु. मामडगे वेदिका बालाजी - अहिल्याबाई होळकर- भारताच्या इतिहासातील तेजस्वी अध्याय.



पुण्यश्लोक अहिल्याबाई
आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व

नाव - सेहल भानुदास भोके
इयत्ता - ६ वी
शाळा - न्यू इरा इंग्लिश स्कूल
निबंधाचा विषय - पुण्यश्लोक अहिल्याबाई
आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व

घाट . मंदिरे विहिरी बांधल्या,
समान तिला रंक नि राव ।
लोकांसाठी देह झिजवी,
अहिल्याबाई होळकर तिचे नाव !!

माझ्या निबंधाला सुरुवात करण्याआधी माझ्या कडून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना आणि त्यांनी 28 वर्षापेक्षा जास्त केलेल्या प्रजाहितदक्ष कारभाराला प्रथमतः शतशः नमन करतो आणि अहिल्याबाई होळकर जयंतीच्या सर्वांना मनापासून खूप खूप सुभेच्छा देतो.

अहिल्याबाई या अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण आणि कार्यक्षम राज्यकर्त्या होत्या. त्यांचा जन्म ३१ मे 1725 रोजी अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव माणकोजी शिंदे तर आईचे नाव सुशिलाबाई असे होते. ज्या काळात महिलांना घराबाहेर पडण्याची देखील परवानगी नव्हती. त्या काळात अहिल्याबाईंच्या वडिलांनी शिक्षणाची संधी निर्माण करून दिली.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या १८ व्या शतकातील एक महान नेत्या होत्या. ज्यांनी आपल्या शासनकाळात सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले. त्यांनी आपल्या नेतृत्वाने आधुनिक भारतासाठी एक प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले.

अहिल्याबाई होळकर यांच्या नेतृत्वाचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची न्यायप्रियता आणि



वागले. त्यांनी आपल्या राज्यात अनेक मंदिरे, घाट आणि सार्वजनिक सुविधा निर्माण केल्या.

अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा आणखी एक महत्वाचा पैलू म्हणजे त्यांचे सांस्कृतिक योगदान. त्यांनी आपल्या राज्यात कला, साहित्य आणि संगीत यांना प्रोत्साहन दिले. त्यांनी अनेक कवी आणि साहित्यिकांना आश्रय दिला आणि त्यांच्या कार्याला प्रोत्साहन दिले.

अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन आणि कार्यातून आपल्याला अनेक महत्वाचे धडे मिळतात. त्यांनी आधुनिक भारतातील तरुण पिढीला त्यांच्या नेतृत्वाने दाखवून दिले की एक महिला देखील सक्षम आणि प्रभावी नेता बनू शकते. त्यांनी आपल्या कार्याने दाखवून दिले की नेतृत्व म्हणजे केवळ अधिकार नसून, जबाबदारी आणि कर्तव्य देखील आहे.

आजच्या काळात अहिल्याबाई होळकर यांचे नेतृत्व एक प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांनी आपल्या शासन काळात अनेक आव्हानांचा सामना केला. आणि त्यावर मात केली. त्यांनी आपल्या राज्याच्या विकासासाठी आणि लोकांच्या कल्याणासाठी अथक परिश्रम केले म्हणून लिहावेसे वाटते की,

कल्याणकारी कामे करुनि,
ख्यात ती कुशल प्रशासिका !
मान उंचावली स्त्रियांची,
खऱ्या अर्थाने ती लोकनायिका !!

अहिल्याबाई होळकर यांच्या स्मृतीत आपण आपल्या जीवनात त्यांचे आदर्श आणि मूल्ये आत्मसात करण्याचा प्रयत्न करू शकतो. आणि हा प्रयत्न सर्वांनी केलाच पाहिजे. त्यांच्या जीवन आणि कार्याचा अभ्यास करून आपण आपल्या समाजाच्या तसेच देशाच्या विकासासाठी



त्यांच्या प्रेरणेने आपण आपल्या देशाच्या विकासात योगदान देऊ शकतो. आणि एक सशक्त आणि समृध्द भारत घडवू शकतो.

अहिल्याबाई होळकर यांचे जिवन खऱ्या अर्थाने धैर्य, साहस त्याग आणि कर्तव्य-पालन यासाठी एक प्रेरक उदाहरण आहे.

जात धर्म विसरून दाखवला,
मानवसेवेचा मार्ग नवा !
अहिल्या देवी आपल्या कार्याचा
निरंतर तेवत राहिल दिवा !!

शेवटी एवढेच लिहावेसे वाटते.

घडविले जे जे आपण,
करावे त्याचे रक्षण !
जाणेदार पणे उत्तर देणाऱ्या,
अहिल्याबाईंना शिवार वंदन !!

धन्यवाद . . . .



पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व

"पाकळ्यांच गळण म्हणजे फुलांच मरण असतं,
मरेपर्यंत सुगंध देणं असं त्यांच आयुष्य असतं,
असं आयुष्य जगणं म्हणजे खरंच अप्रूप सोनं असतं"

आणि असं आयुष्य जगलेल्या ज्यांच नाव आपल्या ओळखीमधे आलं की "यत्र नार्यस्तु पूजन्ते, रमन्ते तत्र देवता" याची प्रचिती येते.

अशा आदर्श राहणी, धर्मप्रती समर्पण, प्रशासकीय कुशलता, दूरदृष्टी आणि उज्ज्वल चारित्र्याच्या महान आदर्श पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशतकी जयंती वर्षानिमित्त आयोजित निबंध स्पर्धा.

खरच

"इतिहास हा माणसाच्या कर्तृत्वाने घडतो,
जो इतिहास घडवतो तो इतिहास विसरत नाही,
आणि जो इतिहास विसरतो तो इतिहास घडवत नाही,"

हिमालयाची उंची ज्यांच्या कर्तृत्वात आली, राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती ज्यांच्या नसानसात भिनली

अशा अहिल्याबाई होळकर यांच्या आयुष्याची पानं वाचत असताना आपल्या ओळखीमधे असा राहतो जीवनप्रवासातील धगधगता संघर्ष. इ.स 1725 ते 1795 हा त्यांचा कालखंड. ह्या कालखंडात त्यांनी ज्या प्रकारे जीवन जगले ते आमच्यासाठी आदर्श ठरले.

त्यांचे बालपण गेले ते चौंडी ता.जामखेड जि. अहिल्यानगर येथे आणि कर्मभूमी म्हणून ज्याची इतिहासात नोंद झाली ते मध्यप्रदेशातील इंदोरचे होळकर घराणे.

मल्हारराव होळकरांच्या त्या सूनबाई तर खंडेराव होळकरांच्या त्या अर्धांगिणी होत्या. वडील माणकोजी शिंदे व आई सुशिलाबाई शिंदे यांनी आपल्या मुलीला उत्तम संस्कार दिले. घोड्यावर बसणे असेल, शस्त्र चालवाचे शिक्षण असेल, त्या काळी मुलींना शिक्षण नाकारले जायचे, तरीही त्या शिकल्या.

Shot on OnePlus
NSM



मित्रहो,

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर ओळखल्या जातात त्या आपल्या महान कार्यामुळेच ना? होय, अगदी खरंय, अहिल्याबाईंनी रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. अनेक नद्यांवर पूल बांधले, कृषीक्षेत्राचा विकास केला, अन्नदाता सुखी राव या प्रमाणे कृषीद्योग आखले, धर्मशाळा बांधल्या, पाण्याशिवाय शेती होऊ शकत नाही म्हणून विहिरी, तलाव बांधले, नदीवर बांध बांधले, शेतकऱ्यांना जोडधंदा करता यावा म्हणून अनेकांना गायी दिल्या.

नवरा मेल्यावर नवऱ्याच्या चितेवर स्त्रीला जिवंत जाळणे म्हणजे सतीप्रथा याला त्यांनी विरोध केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे 1829 ला राजा राममोहन राय या समाजसुधारकाच्या पुढाकाराने सतीप्रथा कायदा करण्यात आला.

इंग्रजी लेखक एके ठिकाणी असे म्हणतो,
'रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट,
इंग्लंडची राणी इलिझा बेथ,
डेन्मार्कची राणी मार्गारेट,'
या महान होत्या पण ज्यावेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्यावेळेस अहिल्याबाईंचे नाव सर्वप्रथम लिहिण्यात येईल. ही त्यांच्या निस्वार्थ कामाची पावती म्हणता येईल म्हणून त्या आज आमच्यासाठी आदर्श आहेत.

पण हल्लीचा जर विचार केला तर,
'कोण कुठला पुष्पा चंदन तस्करी करतो.
त्याने दाखविलेला अविर्भाव तरुणाईला वेड लावतो'
आमच्या तरुणाईने अनुकरण कोणाचे करावे याचे भान ठेवले पाहिजे. आमचे आदर्श भगतसिंग, राजगुरु, फुले-शाहू-आंबेडकर, अहिल्याबाई होळकर हेच असले पाहिजे.



भला लिहावसं वाटतय....
'हो तू जिजाऊ त्या शिवबाची
लोक तुला राष्ट्रमाता म्हणतील'.

'हो तू सावित्रीबाई त्या ज्योतिबाची
लोक तुला ज्ञानज्योती म्हणतील'.

'हो तू अहिल्याबाई त्या प्रजेची
लोक तुला पुण्यश्लोक म्हणतील, राजमाता
म्हणतील.

वेदांत लवनाथ मोरखंडे
वर्ग - ७वा
शाळा. लालबहादूर शास्त्री
माध्यमिक विद्यालय
उदगीर जि. लातूर
मो.न - ७०३४६०४३९५.

Shot on OnePlus
NSM



Sunday

Pg - 1

DATE 25/5/25

Name : Durga Shriganesh Mane-deshmukh.
School : Lotus English School
Subject : Essay on Ahilyabai Holkar Jayanti.
Div : A , Std : 6th

* Punyashlok Ahilyabai Holkar *

Ahilyabai Holkar Jayanti is celebrated every year on May 31st to commemorate the birth anniversary of one of the most respected and capable women rulers in Indian history — Maharani Ahilyabai Holkar. She was born in the village of Chondi, in Ahmednagar district of Maharashtra, in 1725, from a very young age, Ahilyabai showed signs of wisdom, devotion, and courage that would later make her one of the greatest leaders of her time.

Ahilyabai was not into a royal family. She came from a humble background, but destiny had great plans for her. She was married to Khanderao Holkar, the son of Malharrao Holkar, the founder of the Holkar dynasty in Indore. Unfortunately, her husband died in battle, and later her father-in-law too passed away. Despite the loss and sorrow, Ahilya-bai took on the responsibility of ruling the kingdom.

During her reign, Ahilyabai Holkar proved to be a wise, just, and benevolent ruler. She broke many stereotypes of her time, especially those related to women in leadership. She is known for her excellent administrative skills, deep sense of justice, and her commitment to the welfare of her people



DATE / /

She held daily court sessions where she listened to people's problems and resolved them fairly. Her reign was marked by peace, prosperity, and cultural development.

One of her most remarkable contributions was the construction and renovation of temples, ghats, dharmshalas, tanks, and wells throughout India. She was deeply religious and had immense respect for all faiths. She rebuilt many important temples that were destroyed during earlier invasions, including the famous Kashi Vishwanath Temple in Varanasi. She also undertook the reconstruction of temples in places like Somnath, Ayodhya, Mathura, and Rameshwaram. Her devotion to religion was never about blind faith, but about uplifting the culture and traditions of India.

Every year, on her birth anniversary, her legacy is celebrated through programs in schools, public gatherings, speeches, essay competitions, and cultural events. People recall her work, her strength, and her devotion. Statues of Ahilyabai Holkar are found in many cities, especially in Indore, where she ruled, and her contribution is remembered with great respect



सार्थक नितीन खिलारे
लोटस इंग्लिश स्कूल पंढरपूर
इयत्ता - चौथी
विषय - मराठी
दिनांक - 25/5/2025

अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य !!

ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तृत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, गोरगरिबांना विषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट चालरीती रूढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कृतशिल कार्य करणाऱ्या "लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म 31 मे 1725 रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला.

संपूर्ण भारतात विहीरी, तलाव, कुंट, घाट, रस्ते बांधले, मजूर, विणकर, कलावंत साहित्यिक अशा गुणी लोकांच्या विकासाठी जमीन, पैसा, घर इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या. आजही महेश्वरी साड्या, पैठणी, शालू, प्रसिद्ध आहेत.



सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण करणे. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणासे या बहादूर सोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला.

अहिल्याबाई हुश्या समाजसुधारक होत्या. त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला तो म्हणजे मानवताधर्म. प्रजेवर जास्त कराचा बोजा न लादता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोग सुद्धा लोककल्याणा साठी केला.

अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या. त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन....!



दि. २८/५/२५

नाव :- हित प्रभाग आरेकर इयत्ता : पुवी

* अहिल्याबाई होळकर : एक दूरदृष्टीची प्रशासक

भारताच्या इतिहासात अनेक महान व्यक्तीमत्वे होऊन गेली, ज्यांनी आपल्या कार्यांनी आणि विचारांनी समाजाला नवी दिशा दिली. अशाच एका तेजस्वी स्त्री म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर. १७ व्या शतकात, जेव्हा स्त्रियांच्या सार्वजनिक जीवनातील सहभाग मर्यादित होता, तेव्हा अहिल्याबाईंना आपल्या दूरदृष्टीने आणि कुशल प्रशासकीय कौशल्याने एक आदर्श राज्य स्थापन केले. अहिल्याबाई होळकर यांचा जन्म १७२५ मध्ये महाराष्ट्रातील जामखेड येथील चोंडी गावात झाला. त्यांचे बालपण सामान्य असले तरी, त्यांना लहानपणापासून धाडस आणि विवेकबुद्धीचे धडे मिळाले. मल्हारराव होळकर, जे इंदूरचे शासक होते.

त्यांनी अहिल्याबाईंचे असामान्य गुण ओळखून त्यांना आपल्या सुनेच्या रूपात निवडले. दुर्दैवाने, त्यांचे पती खंडेराव होळकर आणि नंतर त्यांचे पुत्र मालेराव होळकर यांचे निधन झाल्यानंतर, अहिल्याबाईंना राज्याची धुरा सांभाळावी लागली. या कठीण काळातही त्यांनी धैर्य सोडले नाही आणि मोठ्या आत्मविश्वासाने राज्याची सूत्रे हाती घेतली. त्यांनी न्यायव्यवस्थेला अधिक सक्षम बनवले. गोरगरीब आणि सामान्य जनतेला सहज न्याय मिळेल यासाठी त्यांनी विशेष लक्ष दिले. शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक पावले उचलली. शेतीत सुधारणा करण्यासाठी त्यांनी जलव्यवस्थापनावर भर दिला, विहिरी आणि तलाव बांधले. व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी सुरक्षित व्यापारी मार्ग तयार केले.

अहिल्याबाई होळकर यांनी भारताच्या कानाकोपऱ्यात अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि अन्नछत्रे बांधली. काशी विश्वेश्वर, सोमनाथ, गया, द्वारका, बद्रीनाथ, जगन्नाथ पुरी अशा अनेक तीर्थक्षेत्रांमध्ये त्यांनी जीर्णोद्धार आणि बांधकाम केले. त्यांच्या या कार्यामुळे भारतीय संस्कृती आणि धर्म यांचा सन्मान वाढला. त्यांनी लोककल्याणासाठी आपले जीवन समर्पित केले.

अहिल्याबाई होळकर यांचे जीवन आणि कार्य हे आजही आपल्याला खूप काही शिकवून. त्यांची दूरदृष्टी, निष्ठावान कार्यपद्धती, न्यायप्रियता आणि लोककल्याणाची भावना आधुनिक भारतासाठी एक प्रेरणा आहे.

वयोगट २ : १३ ते १६ वर्षे
(माध्यमिक गट)



नाव - झिरपे ज्ञानेश्वरी महारुद्र

शाळा - आबासाहेब काकडे विद्यालय, शेवगाव

तालुका - शेवगाव, जिल्हा - अहिल्यानगर

वयोगट - 13 ते 16 वर्षे (माध्यमिक गट)

मोबाईल नंबर - 9370186626 | 7709873505

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर





विषय - अहिल्याबाई होळकर - एक आदर्श शासिका आणि जनतेची माय

भारतीय इतिहास म्हणजे पराक्रम, त्याग आणि सेवा यांचा संगम. अनेक वीरांनी तलवारीच्या बळावर साम्राज्ये उभारली, तर काहींनी न्याय, दया, आणि धर्मनिष्ठेच्या समाजाला दिशा दिली. अशाच तेजस्वी व सर्वोच्च स्थान मिळवणाऱ्या राजमाता अहिल्याबाई होळकर या एकमेव अशा स्त्री होत्या, ज्यांनी सत्तेच्या सिंहासनावर बसूनही "सेवेचं स्मरण" जपल.

मातीतून फुलणाऱ्या चाफ्याच्या फुलासारखी अहिल्यादेवी होळकर यांची जीवनगाथा आहे. साधी, स्वच्छ. परंतु सुगंधाने संपूर्ण विश्व व्यापणारी. त्या केवळ एक राणी नव्हत्या, तर त्या दिव्य विचारांची दीपज्योत होत्या, ज्यांनी अंधारलेल्या काळातही लोकांसाठी प्रकाश दिला. लोकमाता अहिल्याबाई होळकर हे नाव घेताच आपल्या डोळ्यासमोर एक निस्वार्थ, न्यायप्रिय आणि प्रजाप्रिय स्त्री राज्यकर्तीचा तेजस्वी चेहरा उभा राहतो. एका सामान्य कुटुंबात जन्म घेऊनही त्यांनी आपल्या बुद्धी, धैर्य आणि दानशूरतेच्या जोरावर इतिहासात अढळ स्थान मिळवले. अहिल्याबाई होळकर या आधुनिक भारतीय इतिहासातील एक आगळे व्यक्तिमत्व आहेत. अहिल्याबाई शूर, लढवय्या, चांगल्या राजनीतितज्ञ आणि न्यायवृत्तीच्या होत्या. अन्यायाची त्यांना चीड होती. त्यांनी धर्माचरण आणि राजकारणाची सुयोग्य सांगड घातली. कर्तव्यनिष्ठा, धर्मनिरपेक्षता तसेच त्या केवळ राजमाता न राहता लोकमाता ठरल्या.

अहिल्याबाई यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चौंडी या गावात झाला. बालवयातच त्यांचा विवाह, मल्हारराव होळकर यांचे पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी झाला. परंतु दुर्दैवाने खंडेराव आणि नंतर मल्हारराव यांचे निधन झाले. अशा कठीण परिस्थितीत अहिल्याबाईंनी इंदूरचे राज्य समर्थपणे संभाळले. त्यांनी इ.स. १७६७ ते १७९५ या कालावधीत इंदूर आणि आसपासच्या प्रदेशांचा अत्यंत कुशलतेने कारभार केला. त्यांनी न्यायव्यवस्थेला



प्राधान्य दिले. शेतकऱ्यांचे जीवन सुधारले आणि प्रजेवर मातेसारखे प्रेम केले. अहिल्याबाईंनी अनेक मंदिरे, घाट, विहिरी, धर्मशाळा बांधल्या. काशी, गया, द्वारका, रामेश्वरम इ. धार्मिक स्थळांमध्ये त्यांचे योगदान मोठे आहे.

अहिल्यामाता म्हणजे न्यायदेवतेचे मूर्तिमंत उदाहरण होत्या. आपल्या नेहमीच्या जीवनामध्ये सदासर्वकाळ धर्मशील आणि प्रेमळ असणाऱ्या अहिल्यामाता न्याय देतेवेळेस मात्र कठोर बनत असत. त्या अत्यंत न्याय-प्रिय आणि न्यायनिपुण होत्या. नि:पक्षपातीपणा त्यांच्या नसानसांत भिनलेला होता. न्यायदानाच्या वेळी त्या कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता समोरच्या व्यक्तीला योग्य तोच न्याय देत. कायद्यापुढे सर्व समानच आहेत आणि जो कायद्याचे उल्लंघन करतो तो शिक्षेस पात्र होतो, असे त्यांचे प्रांजळ मत होते. अहिल्यामाता स्वत: न्यायप्रिय असल्यामुळे त्यांना अन्यायाची फार चीड होती. केव्हाही आणि कोणावरही होत असलेला कोणत्याही प्रकारचा अन्याय त्यांना कदापिही सहन होत नसे. जर एखादा अधिकारी वा इतर कोणी प्रजेवर अन्याय करत असेल, तर त्याला अहिल्या-मातेच्या क्रोधापासून वाचवणे म्हणजे अशक्य बाब होती.

वेळप्रसंगी अहिल्यामाता न्यायासनावर विराजमान होऊन वादी आणि प्रतिवादी दोहोंचेदेखील म्हणणे ऐकून घेत आणि त्यावर विचार करून योग्य असा न्याय देत. त्यांनी दिलेल्या न्यायामुळे वादी आणि प्रतिवादी या दोघांनाही समाधान वाटत असे. अहिल्यामातेच्या अशा नि:पक्षपाती प्रकारच्या न्यायामुळे जनतेच्या मनामध्ये त्यांच्याबद्दल प्रेम आणि श्रद्धा वाढतच गेली. अहिल्यामातेने दिलेला न्याय हा राजदर-बारातील न्याय नसून तो परमेश्वराने दिलेला न्याय आहे आणि तो अमान्य करणे म्हणजे पाप आहे असे लोक समजत असे. त्यांनी शासनात भ्रष्टाचार व अन्यायाला थारा दिला नाही. त्यांनी प्रजेची बाजू घेतली आणि राजसत्तेला सेवा समजली. राजमाता अहिल्याबाई होळकर या केवळ शासक नव्हत्या, तर त्या एक आदर्श माता, धर्मप्रेमी स्त्री आणि न्यायप्रिय राणी होत्या. त्यांचा इतिहास हा भारतीय स्त्रीशक्तीचा दीपस्तंभ आहे.

एका छोट्याशा गावात, साध्या कुटुंबात जन्मलेली ही कन्या पुढे अख्ख्या इंदूरच्या सिंहासनावर विराजमान होईल, हे कोणालाही वाटले



करुणा होती, ती स्त्री इतिहासाचा मार्ग बदलण्याची ताकद ठेवते, हे अहिल्यादेवींनी दाखवून दिले. अहिल्यादेवींचे जीवन म्हणजे त्यागाचा झरा, सेवेचा समुद्र आणि न्यायाचा गगन। एकीकडे त्यांनी रणांगणात धैर्य दाखवले, तर दुसरीकडे त्यांनी हजारो लोकांसाठी अन्न, पाणी, शिक्षण आणि निवारा उपलब्ध करून दिला.


अत्यंत सामान्य परिस्थितीत जन्मास येऊन एका विशाल व वैभवशाली राज्याच्या प्रमुख सत्ताधारी बनूनदेखील अहिल्यामातेने स्थैर्याला कधीही कमी लेखले नाही. त्यांच्या विशाल अंत:करणात प्रजेबद्दल असणारा आदरभाव आणि ममतेची जपणूक करून त्या सर्वांच्या लोकमाता बनल्या. 'प्रजा हेच दैवत' आणि प्रजेचे काम करणे हेच आपले आद्यकर्तव्य आहे, यावर त्यांची निष्ठा होती. अहिल्यामाता विशाल आणि संपन्न होऊनही राज्याच्या राज्यकर्त्या होत्या. त्यांची जीवनचर्या म्हणजे उत्कृष्ट प्रकारच्या सत्कार्यांनी भरून गेलेले आदर्श जीवन होते. त्यामुळे त्या उत्तम शासनकर्त्या बनल्या होत्या. 'राजा हा प्रजेसाठी असतो, प्रजा राजासाठी नव्हे.' अशी त्यांची मनोधारणा होती. त्यामुळे राजाने प्रजेसाठी त्याचे संपूर्ण जीवन अर्पण करून प्रजेच्या सुखसोयी व संरक्षणाकडे लक्ष पुरवून त्याच्यामध्ये आदर्श जीवनाची बीजे रुजवली पाहिजेत असे त्यांचे प्रांजळ मत होते. या दृष्टीने राजाचे जीवन हे आदर्श जीवन असायला पाहिजे. कारण 'यथा राजा, तथा प्रजा' असते. राजाने आपल्या सर्वाधिकाराचा उपयोग सत्कार्यासाठी करावा. राजाने प्रजारक्षक बनावे, प्रजाभक्षक असू नये. आपल्या राज्यामध्ये कोणीही दु:खी राहू नये अशी त्यांची अपेक्षा होती. त्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी दानधर्म देणे सुरू केले. अन्नछत्रे व सदावर्ते उघडली.

अहिल्यामाता प्रजेला त्यांच्या लेकराप्रमाणे वागवत असत. वेळच्यावेळी त्यांच्या अडीअडचणी समजावून घेऊन सोडवण्याचा प्रयत्न करत, त्यामुळे पूर्ण राज्यातील जनता सुखी, समाधानी, सुरक्षित आणि आनंदी होती. प्रजेला चोर, लुटारू, दरोडेखोर यांची भीती नव्हती. कारण अहिल्यामातेने चोर, दरोडेखोरांच्या जीवनातील पापी कृत्यांना मुकासकट उखडून त्यांच्या जागी आदर्श जीवनाची बीजे रुजवून त्यांना सन्मार्गी लावले होते. त्याच बरोबर त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करून त्यांच्याही अहिल्यामाता



मातोश्री बनल्या होत्या.

अहिल्यामाता सदासर्वकाळ प्रजेच्या हिताचाच विचार करत असत. त्यांनी प्रजेवर जाचक आणि अन्यायकारक असणारे नियम रद्द करून त्या ठिकाणी प्रजेच्या हिताचे कायदे व नियम अमलात आणले व त्यातून प्रजाहित साधले. अहिल्यामातेच्या राज्यामध्ये राजा आणि प्रजा यांचा संबंध माता आणि पुत्राचा होता. अहिल्यामाता प्रजेला स्वत:च्या मुलाप्रमाणे समजून त्यांच्या सुखासमाधानासाठी अहोरात्र परिश्रम करीत. त्याचप्रमाणे प्रजेचे प्रश्न अत्यंत मायेने सोडवण्याचा प्रयत्न करीत. प्रजेच्या प्रश्नांची सोडवणूक करत असताना कसल्याही प्रकारचा भेदभाव वा पक्षपात त्या करत नसत. अत्यंत जबाबदारीने योग्य तोच न्याय त्या सर्वांना देत असत. प्रजेला कसल्याही प्रकारची बंधने त्यांनी लादलेली नव्हती. प्रत्येकाला सर्व प्रकारचे स्वातंत्र्य होते. त्यामुळे संपूर्ण प्रजा आनंदी होती आणि अहिल्यामातेचे मन:पूर्वक आभार मानत होती.



अहिल्याबाईंचं जीवनचरित्र : त्याग, पराक्रम आणि लोककल्याण

ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तृत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो. असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो. अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर. सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, गोरगरिबांना विषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट चाली-रीती रुढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे 1725 रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील मानकोजी व सुशीलबाई शिंदे यांच्या पोटी झाला.

"त्यागाला ही लाज वाटावी
इतका महान त्याग,
तुझ्या त्यागाने जागा झाला
आम्हां लेकुरांचा स्वाभिमान"

मानकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतील असून देखील ते विद्वान व दूरदर्शी गृहस्थ होते. अठराव्या शतकामध्ये आजच्या सारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना देखील त्यांनी अहिल्येची शिक्षणाची घरची व्यवस्था केली. अहिल्या मातेचे अहिल्या मातेचे जीवन घडविण्यात त्यांचा फार मोठा मोलाचा वाटा आहे. अवघ्या आठ वर्षाची असतानाच

• अल्पसंख्यांक व S.C. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची सोय. • सुसज्ज कार्यशाळा व तज्ञ निदेशक वर्ग...



होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांचा बारा वर्षांचा एकुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहिल्याचा विवाह २० मे 1733 रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला.

लग्नानंतर लगेच आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांची माने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी देयील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबारची मोडी मराठी लिहिणे, वाचणे, गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या. तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धनीचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे, न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्येची सामाजिक व राजकीय बुद्धी परिपक्व झाली.

इ.स. 1754 मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याचा शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रुढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारुन त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असूनही सती जाणे तहकूब करण्यात अहिल्याबाईनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करुन अहिल्याबाईने प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म, रुढी, परंपरा यापलीकडे कर्तव्य महत्त्वाचे मानून स्वतेला कल्याणकारी राज्य दिले गेले.



मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर २१ वर्षे अत्यंत यशस्वीपणे यमा कल्याणकारी योजना कार्य अमू शकतात आणि त्या कुशा राबवल्या जाव्यात हे त्यांनी दाखवून दिले. सासरा मल्हारारावांच्या मृत्यू २० मे १७६६, मुलगा मालेरावांचा मृत्यू २७ मार्च १७६७ मध्ये झाला. अशी एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईंनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्त्वाप्रमाणे राज्य केले.

पेशवा रघुनाथराव याला होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा लोभ सुटला. त्याने पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेऊन इंदोर वरचढाई केली. हे वृत्त तेजस्विनी अहिल्याबाईला कळताच यचून न जाता त्यांनी रघुनाथरावांना यलिता पाठविला त्या म्हणतात, आपण माझे राज्य हिरावून घेण्याचे कुपट रचून आलात आमच्याकुडील फितूरास गाठले. मला दुबळी समजलात की युळी ? दुःखात बुडालेल्यास अधिक बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतू ? आता आपली गाठ रणांगणात पडेल ! माझ्या-बरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल मी हरेल तर कीर्ती करुन जाईल.

पण आपण हारलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. मी अबला आहे असे समजू नका. मी यांद्यावर भाले घेऊन समोर उभे राहिले तर पेशव्यांना भारी पडेल. वेळ पडली तर हत्तीच्या पायी सायलीशी बांधून तुमचे स्वागत न केले तर होळकरांच्या सुनेचे नाव लावणार नाही. मुत्सद्दी अहिल्या म्हणजे तळपती समशेर आणि लखलखती वीज होती. त्यांनी आपलं आयुष्य लोक-कल्याणासाठी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न



घालता संपूर्ण भारतात कार्य केलेले आहे. संपूर्ण भारतात अनेक विहिरी, तलाव, कुंड, घाट बांधले आहेत. रस्ते, पूल निर्माण केले आहेत. जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते व ते काम लोकमाता अहिल्याबाईंनी केले. उद्योगधंद्यांना व त्याच्या विकासाला प्राधान्य दिले.

सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे, मशिदी, दर्गे व विहार बांधली. तर काही मंदीरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. मजुरांना काम मिळाले व सर्व जाती धर्मांचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेयोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशंवत फणसे या बहादुर सोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाई हया समाजसुधारक होत्या. त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरेचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केली नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवताधर्म. प्रजेवर जास्त करांचा बोज न लादता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादित करुन खाजगी उत्पादनाचा उपयोग सुध्दा लोककल्याणासाठी केला. अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या.

त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन...!

नाव :- ऋतुजा सुधाकर शेंडे
शाळेचे नाव :- न्यू इंग्लिश स्कूल माळवणी
वय :- 16
ईमेल आयडी :- shubhamshende174200?@gmail.com
मोबाईल नंबर :- 8766514841



• पुण्यश्लोक अहिल्याबाई •
होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त
• राज्यस्तरीय भव्य •
• निबंध स्पर्धा •

नाव :- सोहम संतोष पोवार
वय :- १५
रा. :- हुपरी
तालुका :- हातकणंगले
जिल्हा :- कोल्हापूर
मोबाईल नंबर :- 9850481509
पिनकोड :- ४१६२०३
विषय :- अहिल्याबाईंचे मंदिर बांधकाम
आणि
धार्मिक कार्य.....
गट क्रं. :- २ = १३ ते १६ वर्ष (माध्यमिक गट)
आयोजक :- पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय
जनता पार्टी महाराष्ट्र राज्य

अहिल्याबाईंचे बांधकाम मंदिर आणि धार्मिक कार्य

मनात बाळगुनी स्वप्न मराठी सत्तेचे,
बांधुनी तोरण हजारो गड किल्ले, मंदिरांचे,
घडविले जिने नव्या हिंदोस्तानाला,
एकच होती ती राणी अहिल्यादेवी होळकर.....

अहिल्यादेवींनी संपूर्ण देशभरात मंदीरे, घाट, विहिरी, धर्मशाळा, पुल, रस्ते व कुंड उभारली. तसेच अनेक ठिकाणी मंदिरांचे जिर्णोद्धारही केले. केलेल्या मंदीरांची काळजी घेतली. राष्ट्रएकात्मतेचा धागा विणण्यासाठी अहिल्यादेवींच्या बांधकाम कार्याची एक अनोखी बाब म्हणजे, त्यांनी ही केवळ आपल्या माळवा राज्यापुरती मर्यादित ठेवली नाही. त्यांच्या कार्याचा विस्तार संपुर्ण भारतभर पसरलेला होता. उत्तर भारतातील बद्रीनाथ, केदारनाथ, काशी, अयोध्या, गयेसारख्या स्थळांपासून ते दक्षिणेतील रामेश्वरम आणि तमिळनाडूतील गंगाकुंडपर्यंत, पश्चिमेतील सोमनाथ व द्वारकापासून पुर्वेतील पुरी, गंगोत्री आणि बंगालपर्यंत त्यांनी शेकडो ठिकाणी मंदिरे, घाट, धर्मशाळा अन्नछत्रे उभी केली. या कार्यातून त्यांनी विविध प्रांतातील, भाषांतील, जाती धर्मांतील जनतेला एका समान सांस्कृतिक सूत्रात गुंफले. त्या काळात तीर्थयात्रा ही केवळ धार्मिक नव्हती, तर ती सामाजिक आणि सांस्कृतिक संवादाचे माध्यम होती. त्या संवादास स्थैर्य, सोय आणि परंपरेचे अधिष्ठान त्यांनी दिले. त्यामुळे त्यांच्या बांधकामांनी भारतीय अखंड वैविध्यपुर्ण भौगोलिक एकात्मतेच्या आध्यात्मिक धाग्याने जोडला गेला.



अहिल्यादेवी होळकर या लोककल्याणकारी शासक होत्या. त्यांनी जनतेला केंद्रस्थानी ठेवून राज्यकारभार केला. त्यांच्या कार्याची व्याप्ती ही त्यांच्या मालवा प्रदेशापुरती नव्हती. कुंभार, या जनतेच्या सांगण्यावरून संपूर्ण जगभ्रमंती होती. आजही त्यांच्या दूरदृष्टीचे आणि लोकसेवेच्या उत्कटतेचे साक्षीदार आहेत. त्यांच्या कामांमध्ये हिंदू धर्माबाबत अतीव निष्ठा, सामाजिक समरसता, आर्थिक न्याय, आणि पर्यावरणपूरक विचार आणि सार्वजनिक हित या मुल्यांचे स्पष्ट प्रतिबिंब दिसून येते. अहिल्यादेवींनी केलेले बांधकाम हे फक्त दगड-मातीचे नव्हते, तर ती जनतेसाठी उभी केलेली एक जिवंत सेवाभावाची परंपरा होती. अहिल्यादेवी संपूर्ण देशभ्रमंती मंदिरे, घाट, विहिरी, धर्मशाळा, पुल, रस्ते व कुंड उभारली. तसेच अनेक ठिकाणी मंदिरांचे जीर्णोद्धार केले, हे त्यांचे धार्मिक कार्य होते. हे धार्मिक कार्य समाज-कार्याशी जोडलेले होते. आजूबाजूला घडणाऱ्या महत्वाच्या घटनांकडे लक्ष ठेवून त्यांनी त्यातून धडा घेतला जसे पानिपत युद्धावेळी सैन्य पाणी-पाणी करत मरण पावले, हे लक्षात घेऊन त्यांनी ठिकठिकाणी विहिरी बांधल्या.

मुसलमानांच्या आक्रमणामध्ये हिंदू मंदिरे तोडली जात. त्यामुळे लोकांमध्ये भितीचे वातावरण असे. आपल्या प्रजेमध्ये चांगला संदेश जावा, याउद्देशाने त्यांनी काही मंदिरे बांधली तर काहींचा जीर्णोद्धार केला. विविध नद्यांवर सुंदर घाट बांधले. त्यांचे हे कार्य श्रद्धा आणि सेवा यांचा सुंदर संगमच म्हणावा लागेल. अहिल्यादेवी होळकर यांनी मध्य भारत व महाराष्ट्र मल्हारेश्वर, उज्जैन, भिमाशंकर, नाशिक, कोल्हापूर, परळी वैजनाथ, ओझर, औंढा नागनाथ, त्र्यंबकेश्वर, सप्त-शृंगी, पैठण, पंढरपुर, शिरपुर, शिंगणापुर, चिखलदरा, मिरी, संगमनेर, शिर्डी, बिड, मुशावळ, जेजुरी, शिरपूर, रावेर, पल्ली, वेरूळ या मंदिरांचा जिर्णोद्धार केला. त्याबरोबर त्यांनी पश्चिम भारतामध्ये सोमनाथ, द्वारका, नाथद्वारा ही मंदिरे बांधली. दक्षिण भारतात रामेश्वर, श्रीशैलम आलमपूर ही सुद्धा मंदिरे बांधली आणि पुर्व भारतात जगन्नाथपुरी, भुषणपुर, अमरकंटक, बेलुर, बाणपुर, देवगुरडिया, रांपुरा, ओंकारेश्वर, चोंडी या मंदिरांचा संपूर्ण जिर्णोद्धार केला. तर काही स्वतः मंदिरे बांधली



भोजाय अश्वं सं मृजन्त्याशुं भोजायास्ते कन्या शुम्भमाना ॥
भोजस्येदं पुष्करिणीव वेश्म परिष्कृंत देवमानेव चित्रम् ॥३॥

ऋग्वेदात हा उल्लेख येतो. अहिल्याबाईंनी त्याचा आदर्श घेऊन जलकुंभ बांधले. अहिल्यादेवी होळकर यांच्या लोकहितकारी कार्यामध्ये विहिरी, तलाव, कुंडे आणि पाणपोया यांचा अत्यंत महत्वाचा वाटा होता. त्या केवळ धार्मिक श्रद्धास्थळे उभारण्याच्या राणी नव्हत्या, तर त्यांनी पिण्याच्या पाण्याची आणि जलस्रोतांची सोय करून सामान्य जनतेसाठी जिवनावश्यक गरजा पुर्ण करण्याचे अत्यंत महत्वाचे काम केले. त्यांनी महेश्वर, नाशिक, नंदुरबार, पत्की, पंढरपूर, वेरूळ त्र्यंबकेश्वर अशा अनेक ठिकाणी विहिरी बांधल्या आणि जुन्या विहिरी साफ करून पुन्हा कार्यान्वित केल्या. नंदुरबार भागात त्यांनी १५ ते १६ विहिरी बांधल्या होत्या. जेव्हा तिथे पिण्याच्या पाण्याची मोठी अडचण होती, जि विहिर अहिल्याबाई होळकर यांनी नंदुरबार मध्ये बांधली त्याचप्रमाणे पंढरपुर येथे यात्रेकरूंकरिता "पेशवा बारव" नावाची विहिर उभारण्यात आली होती, जिचा उपयोग शेकडो लोकांनी एकत्र केला. पाणपोया हे त्यांचे आणखी एक सामाजिक कार्याचे वैशिष्ट्य होते. यात्रेकरू, भाविक, गरजू लोक यांना पिण्याचे शुद्ध पाणी सहज उपलब्ध व्हावे यासाठी त्यांनी मंदीरे, घाट, धर्मशाळा आणि रस्त्यांजवळ पाणपोया उभारल्या. त्यांच्या पाणपोया केवळ विशिष्ट स्तरातील लोकांसाठी बंद्दल्या, तर त्या समाजाच्या प्रत्येक स्तरासाठी खुल्या आणि निशुल्क होत्या. त्यामुळे त्या काळात महिलांना, वृद्धांना, शेतकऱ्यांना आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला. या सर्व कामांमागे त्यांची पर्यावरणपुरक विचारधारा, जलसंधारणाचा जाण, आणि सर्वसामान्यांसाठीची तळमळ ही मुलभुत प्रेरणा होती. त्यामुळे विहिरी आणि पाणपोया केवळ बांधकाम नव्हते, तर त्या जनतेच्या जगण्याशी जोडलेल्या सुविधांचे सजीव प्रतीक होते. अहिल्यादेवी होळकर यांच्या मंदीर बांधकाम कार्याचा आढावा घेतल्यास हे स्पष्ट होते की, त्या केवळ एका राज्याच्या किंवा काळाच्या सीमा ओलांडून संपुर्ण भारतीय



संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचे वाहक ठरल्या. मंदिरे, घाट, धर्मशाळा, विहीरी, पाणपोया, रस्ते, पुल यांसारखी त्यांनी उभारलेली बांधकामे ही केवळ श्रद्धेची किंवा धर्म निष्ठेची प्रतीके नव्हती, तर त्या होत्या जनतेच्या जिवनमानात परिवर्तन घडून आणणाऱ्या रचनात्मक कृती. त्यांच्या प्रत्येक कृतीमागे लोकहिताची भावना, सामाजिक समरसतेची जाणीव आणि भविष्याचा विचार होता. त्यांनी उभ्या केलेल्या वास्तु या आजही केवळ पुरातत्वीय वारसा म्हणून नव्हे, तर लोकसेवेचे जिवंत स्मारक म्हणून उभ्या आहेत. त्यांच्या कार्यातून "धर्म हीच सेवा असावी" ही भारतीय परंपरेतील उदात्त कल्पना वास्तवात उतरलेली दिसते. त्या एक दूरदृष्टी असलेल्या, प्रशासक, समर्पित समाजसेविका, राष्ट्रभाव जपणाऱ्या लोकमाता आहेत.

आजच्या काळातही प्रशासन, लोकसेवा आणि सार्वजनिक रचना या क्षेत्रात अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य प्रेरणादायी ठरते. त्यांच्या कार्याचा आदर्श आणि धर्मसंवर्धन हीच त्यांच्या कामाची खरी पावती आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श ठेवून भारताला आजही एक आदर्श आणि समतोल समाज व्यवस्थेची प्रेरणा मिळू शकते.

मधुर होती निती वाणी,
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी राजवितया
जिने दिशा - दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला असंच सिमा नाही.
सुखात नांदली आमची जनता,
कारण!
उत्तम शासन, तत्वज्ञानी राणी
होती आमची...
अहिल्या राजमाता.....



नाव :- स्वरा मिलिंद विखारे
शाळा :- युनायटेड इंग्लिश स्कूल,
चिपळूण
इयत्ता :- १० वी
पत्ता :- १०३, अमिना अपार्टमेंट,
पेठमाप, इंडियनजिमसमोर
ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र आयोजित

राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त

भव्य राज्यस्तरीय निबंधस्पर्धा

विषय :- "राजमाता अहिल्याबाई - स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास"



राजमाता अहिल्याबाई - स्त्री शक्तीचा ज्वाज्वल्य इतिहास

परीक्षा संपल्या आणि वाचनाची आवड स्थिर बसू देईना. म्हणून वाचनालयात जाऊन सगळी पुस्तकं चाळली. विविध पुस्तके चाळता-चाळता लेखिका सुजाता सोनावणे यांचे "मराठ्यांच्या इतिहासातील अहिल्याबाई होळकरांचे योगदान" हे पुस्तक हाती घेतले. वाचनाची आवड असल्यामुळे तिथेच बसून पुस्तक वाचू लागले. राजमाता अहिल्याबाई होळकर, यांचे कार्य, धर्मबद्दल प्रेम, समाजाप्रती जिव्हाळा मनाला मोहून गेला. त्यानंतर मात्र त्यांच्या जीवनाविषयी जाणून घेण्यासाठी त्यांची विविधांगी रूपे जाणण्याचा प्रयत्न केला.

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी (मल्हारपीठ) या खेड्यात झाला. वडील माणकोजी शिंदे व आई सुशिलाबाई शिंदे कुटुंबात जन्मलेल्या अहिल्याबाई मूळता/खूप हुशार होत्या. त्यांचे वडील हे त्या गावचे पाटील होते. त्याकाळी स्त्रियांनी शिक्षण घेण्याची पद्धत नव्हती, तरीही तिच्या वडिलांनी तिला लिहायला व वाचायला शिकवले. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते त्या काळात त्यांच्या वडिलांमुळे अहिल्याबाई शिक्षण घेऊन साक्षर बनल्या

खरं पाहता, मल्हारराव होळकर हे पुण्याला जात असताना चौंडी या गावी आराम करण्यासाठी थांबले होते. जेव्हा एका मंदिरात लहानग्या अहिल्याबाईंना त्यांनी पाहिले, त्यावेळी त्यांचे बोलणे, वागणे याकडे मल्हाररावांचे बारकाईने लक्ष होते. वयाच्या केवळ आठव्या वर्षी असलेला अहिल्याबाईंचा समजूतदारपणा पाहून मल्हारराव‌नी त्याचवेळी त्यांना आपली सून करण्याचे निश्चित केले. लहान अहिल्यामध्ये असणाऱ्या गरिबांविषयी प्रेम, जिव्हाळा, कळवळा यांनी मल्हार-रावांचे मन जिंकले

आपला मुलगा खंडेराव यांच्याबरोबर अहिल्याबाईचे लग्न लावावे असा प्रस्ताव मल्हाररावांनी माणकोजी शिंदे यांच्यासमोर मांडला. अखेर खंडेराव होळकर यांच्यासी अहिल्याबाईंचा विवाह झाला. त्यांना दोन मुले झाली. मुलाचे नाव मालेराव तर मुलीचे नाव मुक्ताबाई. त्यानंतर इ.स. १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत अहिल्याबाईंचे पती खंडेराव होळकर धारातीर्थी पडले. परंतु अहिल्याबाईंचे सासरे मल्हारराव यांनी त्यांना सती जाऊ दिले नाही. उलट अहिल्याबाईंचे कर्तृत्वगुण त्यांनी लहानपणीच पाहिले होते, त्यामुळे त्यांनी अहिल्याबाईंना युद्धनीती शिकवून कर्तृत्वक्षम बनण्यासाठी मदत केली.

मल्हारराव होळकर यांनी माळव्यातील राज्यकारभार योग्य पद्धतीने चालवत असतानाच काही बारा वर्षानंतर मल्हारराव यांचा मृत्यू झाला. तेव्हा मालेराव होळकर यांनी माळव्याची सूत्रे आपल्या हातात घेतली. परंतु काही वर्षातच मालेरावचाही मृत्यू झाला. अहिल्याबाईंना आपला सुपुत्र मालेराव याचे अचानक झालेले निधन हे खूपच दुःखदायक झाले. परंतु त्यांनी न डगमगता माळव्याची प्रशासकीय जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली. पोटचा मुलगा गेला हे दुःख खूपच मोठे होते. परंतु विस्कटलेल्या समाजाची घडी व्यवस्थितरित्या बसवण्यासाठी त्यांनी माळव्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली होती.

वास्तविक पाहता, सासरे मल्हारराव व पती खंडेराव यांच्या निधनानंतर स्वतःला मोठ्या दुःखातून सावरले, तोवरच आपल्या मुलाच्या अचानक जाण्याने अहिल्याबाईंना अतिव दुःख झाले होते. त्यामुळे माळवा प्रांताची जबाबदारी पेशव्याने द्यावी असे त्यांना वाटत होते. अहिल्याबाईंनी पेशव्यांना तशी विनंती देखील केली होती. परंतु यास अनेक मंडळींचा विरोध होता. अखेर रयतेच्या इच्छेनुसार अहिल्याबाईंनी माळव्याची सूत्रे आपल्या हातात ठेवण्याचे निश्चित केले. राजमाता अहिल्या राणी साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची इच्छा सर्व



माळवा प्रांत सैन्याच्या मनात घर करुन होती. अहिल्याबाईंचे कर्तृत्व हे त्यांचे सासरे मल्हारराव ओळखूनच होते. त्याचबरोबर सर्व जनता त्यांचे कर्तृत्व, नेतृत्व जवळून अनुभवत होते. जनतेचा अहिल्याबाईंच्या राजकारभार चालवण्याच्या पद्धतीवर प्रचंड विश्वास होता. त्यामुळे अहिल्याबाई सर्व जनतेमध्ये लोकप्रिय झाल्या व माळवा प्रांतात त्यांना राजमाता म्हणून संबोधले जाऊ लागले.

अहिल्याबाईंनी आपल्या कारकिर्दित अनेक सामाजिक कार्य पार पाडली. गरीब श्रीमंत भेदभाव न ठेवता सर्वांना समानतेने योग्य न्याय व आवश्यक सुविधा त्यांनी पुरवल्या. गरीबांना कोणत्याही गोष्टीची कमतरता येऊ नये यासाठी त्या दिवस-रात्र झटल्या. अन्नधान्य, सोयीसुविधा, आरोग्यविषयक व शैक्षणिक दृष्ट्या आपल्या माळवा प्रांताला सुखात ठेवण्यासाठी त्यांनी दिवस-रात्र एक केले. या काळात त्यांनी मल्हारावांचे दत्तक पुत्र तुकोजी होळकर यांना आपल्या सैन्याचे सेनापती पद बहाल केले. अहिल्याबाईंनी केवळ माळवा प्रांतांत्च नव्हे तर सर्व देशभर सामाजिक कार्यांचे वेगळा ठसा उमटवला होता. आजही एक कुशल राज्यकर्त्या म्हणून त्यांचा नामोल्लेख केला जातो.

अहिल्याबाईंनी अनेक मंदिरे व धर्मशाळा बांधल्या. अहिल्याबाईंच्या कारकिर्दित अनेक खेड्यापाड्यात मंदिरांचे जिर्णोद्धार झाले. नदिवरील बंधारे, प्रत्येक गावोगावी सुशोभीकरण, गडकिल्ल्यांची निगा, पाणीपुरवठ्याची सोय, रस्ते अशा अनेक गोष्टी अहिल्याबाईंनी आपल्या कारकिर्दित पूर्ण केल्या. रयतेसाठी न्यायदानाचा दरबार भरवून अहिल्याबाईंनी अनेकांचे प्रश्न, अडचणी सोडवून न्यायदानाचे महान कार्य केले. एवढेच काय तर तुकोजी होळकर यांच्या मुलाने रयतेला त्रास दिला म्हणून आलेल्या तक्रारीवरुन अहिल्याबाईंनी त्याला सुध्दा तुरुंगात टाकले होते. लाखांचा पोशिंदा शेतकरी सुखी राहावा म्हणून अहिल्याबाईंनी अनेक कर माफ



केले. शेतकऱ्यांना गाई, गुरे, शेतीसाठी आवश्यक साहित्य पुरवण्याचे काम अहिल्याबाईंनी केले. अनेक प्रकारचे जाणकार, कलाकार, गायक, कीर्तनकार, आयुर्वेदाचार्य, विद्वान पंडितांना अहिल्याबाईंनी आसरा दिला होता. सर्वांना सन्मानाने वागवले जायचे. अहिल्याबाई धार्मिक होत्या. तसेच त्या शैक्षणिक विचारवंत देखील होत्या. त्यांनी संस्कृत शाळा देखील स्थापन केल्या होत्या.

अनेक संकटांना तोंड देत एका महिलेने एक उत्कृष्ट राज्यकर्ती, पुण्यश्लोक, तत्वज्ञानी महाराणी, दयाळू राजमाता म्हणून नावलौकीक मिळवला होता. अशा पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना माझे कोटी कोटी प्रणाम.
शेवटी म्हणावेसे वाटते -

"स्वातंत्र्य रक्षिण्या अपुले,
ही वीर रणरागिनी झाली।
ही गोरगरिबांची माय माऊली,
शोर अहिल्या जन्मा आली।"

धन्यवाद



माझे नाव : वेदपाठक प्रेम मनोहर

शाळेचे नाव : हनुमान विद्यालय भुपती
ता. पंढरपूर जि. सोलापूर

इयत्ता : ८ वी

विषय : पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर -
एक आदर्श स्त्री शासिका

मोबाईल नंबर : 9970412085

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे जीवन हे स्त्री शक्तीचे, न्यायप्रियतेचे आणि लोककल्याणाचे प्रतीक आहे. १७८१ ते १७९५ या काळात त्यांनी मालवा प्रदेशातील इंदौर हे संस्थान कुशलतेने आणि प्रजाहितीच्या दृष्टीने चालवले. त्यांच्या नेतृत्वामुळे त्यांना 'पुण्यश्लोक' हा सन्मान प्राप्त झाला, ज्याचा अर्थ 'पुण्याने भरलेली राणी' असा आहे. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ चौंडी गावात पती खंडेराव होळकर यांच्या अकाली मृत्युनंतर, अहिल्याबाईंनी सती जाण्याचा विचार केला होता. मात्र, त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांनी त्यांनी प्रजेसाठी राज्यकारभार चालवण्याची विनंती केली. त्यांच्या या आग्रहामुळे अहिल्याबाईंनी सती जाण्याचा निर्णय बदलला आणि प्रजेसाठी आपले जीवन समर्पित केले.

अहिल्याबाईंनी राज्यकारभारात न्यायप्रियतेला प्राधान्य दिले. त्यांच्या दरबारात प्रजेच्या सर्व स्तरांतील लोक न्याय मागण्यासाठी येत. त्यांनी शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण केले, महिलांना संपत्तीमध्ये समान अधिकार दिले आणि विधवा महिलांसाठी विशेष योजना राबवल्या.

अहिल्याबाईंनी विविध धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार केला आणि नवीन मंदिरे, घाट, धर्मशाळा, कुंड, बागा इत्यादी बांधल्या. त्यांनी काशीतील विश्वनाथ मंदिर, सोमनाथ मंदिर, द्वारका अयोध्या, रामेश्वर, महाकालेश्वर उज्जैन, नाशिक, पंढरपूर, गोकर्ण, उज्जैन इत्यादी ठिकाणी धार्मिक कार्ये केली.

अहिल्याबाईंनी आपल्या कर्तृत्वाने हे सिद्ध केले की स्त्रिया केवळ घरकामापुरत्या मर्यादित नाहीत. त्यांनी राजकारभार, युद्ध, न्याय धर्म आणि समाजकारण या सर्व क्षेत्रांमध्ये आपली छाप सोडली. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना "स्त्री शक्तीचे प्रतीक" मानले जाते.

आजच्या काळातही अहिल्याबाई होळकर यांचे नेतृत्व, त्याग, न्यायप्रियता आणि लोककल्याण हे मूल्य आपल्याला प्रेरणा



देतात. यांच्या जीवनातून हे शिकता येते की, योग्य नेतृत्व, त्याग, व्यावहारिकता आणि नैतिक मूल्ये यांचा संगमच खरा विकास घडवून आणतो.

अहिल्याबाई होळकर यांचे जीवन हे त्याग, पराक्रम आणि लोककल्याण यांचा उत्कृष्ट संगम होते. त्या केवळ एक महान शासिका नव्हत्या, तर एक उदात्त विचारांची समाजसेविका, धार्मिक श्रद्धा असलेल्या, पण सर्वधर्मसमभाव जपणाऱ्या तेजस्विनी महिला होत्या.

पती खंडेराव यांचा मृत्यु पानिपतच्या युद्धात झाला, त्यावेळी अहिल्याबाईंनी सती जाण्याचा निश्चय केला होता. मल्हारबांनी त्यांना सती होण्यापासून परावृत्त केले. मल्हारबांच्या मृत्युनंतर त्यांनी विधवापनाचे कठोर जीवन स्वीकारले. राजसत्ता सांभाळून त्यांनी स्वतःसाठी कोणतेही वैभव न मागता, स्वतःला जनसेवेसाठी वाहून घेतले.


१७६७ मध्ये होळकर राज्याच्या गादीवर बसल्या. राज्यकारभार कुशलतेने सांभाळला, युद्ध, न्याय, महसूल आणि प्रशासन या सर्व बाबतीत निर्णयक्षम. सैनिक प्रशिक्षण, न्यायव्यवस्था, कृषी सुधारणा आणि व्यापाराला चालना यामध्ये त्यांचा मोठा सहभाग होता. त्या काळातील राजे आणि सरकार पुरुषप्रधान होते, पण अहिल्याबाई यांनी आपल्या कर्तृत्वाने आपल्या मागे टाकले.

देशभर मंदिरे, घाट, धर्मशाळा, तलाव आणि पाणवठे बांधले. काशी, गया, रामेश्वर, सोमनाथ, द्वारका, हरिद्वार, बद्रीनाथ, जगन्नाथपुरी, अयोध्या या पवित्र स्थळी त्यांनी कामे केली. त्यांच्या नावावर काशीचा विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार केला गेला. विधवांच्या पुनर्विवाहाला समाजात मान्यता मिळावी त्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

तरुण वयातच आपल्या व्यक्तीगत जीवनातील बाजूला ठेवून, त्यांना प्रजेसाठी आईसारखी भूमिका भूमिका निभावली. अहिल्याबाईंनी न्यायनिष्ठ शासनप्रणाली सुधारली. प्रजेचे प्रश्न ऐकण्यासाठी त्या रोज सभा भरवत. भ्रष्टाचाराला अजिबात पाठबंद करत, शिस्तबद्ध आणि पारदर्शक प्रशासन दिले. सैन्य, महसूल, शेती, पाणीपुरवठा, व्यापार या सर्व क्षेत्रात त्यांनी सुधारणा घडवून आणल्या.

त्यांच्या कार्यातून दिसून येते की, त्या केवळी एक धर्मनिष्ठ राणी नव्हता, तर सर्वधर्मसमभाव मानणाऱ्या उदारमतवादी होत्या. त्या स्त्रियांनी आणि आणि शिक्षणाही न्याय देत असे -हे त्यांचा न्यायाची स्त्रीवादी दृष्टीकोनात डोकावत असते.

त्या काळी स्त्रियांना शिक्षण, सत्ता, निर्णयक्षमता मिळत नसे, तेव्हा अहिल्याबाईंनी हे सर्व करून दाखवले. त्यांनी कोणत्याही पुरुषाला सावलीसारखी न राहता स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. त्यांच्या कार्यामुळे त्यास्त्रीशक्तीकरणाचे पहिले उदाहरण मानल्या जातात. आजही



④

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे शासन हे न्याय, भक्ती आणि प्रशासन त्यांच्या या कार्यामुळे त्यांना भारतीय इतिहासातील एक महान शासिका म्हणून ओळखले जाते.
अहिल्याबाई होळकर यांचा मृत्यु १३ ऑगस्ट १७९५ आलमपूर याठिकाणी त्यांचे निधन झाले.

वयोगट ३ : १७ ते २१ वर्षे
(उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन गट)







"सत्कर्मांच्या दिव्य फुलांनी देह सजविला ज्यांनी,
सुंदर त्यांची अमरयात्रा कधी न सरे मरणांनी"

बाईच्या जातीनं चार भिंतींच्या आत राहून चूल आणि मूलंच बघावं, कशाला समाजाच्या पुढं अब्रूचा पंचनामा करावा? 'दिसभर पोरबाळं सांभाळायची आणि तिन्हीसांज होताच दार पुढं करून चार भिंतीत दडून रहायचं, बाईनं तिच्या मर्यादेत रहावं.' हे घरच्या पुरुषाचं मत. आयुष्यभर चूलमूल बघायचं आणि पुरुषाच्या जातीच्या शरिराची भूक भागवायची इथंपर्यंतच आहे का 'स्त्री'च अस्तित्व? कुठतरी याच प्रश्नाचं प्रतिउत्तर तयार होत होत आणि महाराष्ट्राच्या दिव्य भूमीवर १७२५ साली एक दिव्य ज्योत प्रज्वलित झाली. याच भव्य दिव्य ज्योतीचा प्रकाश अवघ्या स्त्री शक्तिचा तेजस्वी, अजरामर असा जाज्वल्य इतिहास ठरला. तीच प्राणज्योत म्हणजे जनतेची माय, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना माझा सर्वप्रथम मानाचा मुजरा!



महाराष्ट्राच्या इतिहासातील एक अजरामर स्त्री शक्तीची गाथा रचणारी ही जनतेची माय केवळ एक स्त्री म्हणून नाहीतर वासराला ठेच लागता जशी गायीला कळ येते तशी ही मायमाऊली ३१ मे १७२५ रोजी भारतातील माणकोजी शिंदे आणि सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी चौंडी (मल्हारपीठ) इथे जन्म घेतला. आईवडिलांच्या मायेत वाढत अहिल्याबाईच बालपण घडू लागल. स्त्री जन्माची कठोर व्यथा आणि त्यात 'स्त्री-शिक्षण' हा संदर्भच नव्हता पण लेकीचा जन्म चूल आणि मूल सांभाळण्या इतपत मर्यादित नाही हे ओळखून अहिल्याबाईच्या वडिलांनी स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसताना ही त्यांनी अहिल्याबाई यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले.

लहानपणापासुनच अहिल्याबाई ह्या भक्तीमार्गात होत्या, त्यांची महादेवावरती नितांत श्रद्धा होती. रितीनियमाने महादेवाच्या मंदिरात शांततेचं प्रतिक जपत महादेवाच्या भक्तीत असणाऱ्या अहिल्यादेवी वयाच्या ६ व्या वर्षी एक दिवस महादेवाच्या मंदिरात सेवेत असताना मल्हारराव होळकर यांनी त्यांना पाहिले आणि मनात विचार घेतला की यांना आपल्या घरची सून बनवावी आणि आपला मुलगा खंडेराव होळकर यांच्याशी लग्न लावून आणले. अहिल्याबाई यांनी मल्हारराव होळकर यांची सून त्यांनी आपले आधिपत्य चालवले. आपल्या संसारात मग्न असणाऱ्या अहिल्यादेवीच्या नशीबात काय वेगळाच भोग लिहला होता, लग्न झालेल्या बाईच्या आयुष्यात नवऱ्याच अस्तित्व बळकट राहण फार गरजेचं असत. स्त्रीच आयुष्य म्हणावं तितक सोप नाही याच ओघात झुरता इ.स. १७५४ च्या सुमारास अहिल्याबाईचे कुंकू पुसले गेले. याच काळात 'सति जाणे' ही रूढी परंपरा आजून ही अस्तित्वात होती. पुरूषानंतर स्त्री चा ही शेवट होत होता, स्त्री संपली की माग असणाऱ्या पोरबाळांना अनाथासारख आयुष्य जगावं लागायचं. अहिल्याबाईच कुंकू पुसल तस त्यांनी येणाऱ्या परिस्थिती सोबत लढा दिला पण पतिच्या मृत्यूनंतर मल्हारराव होळकर यांनी अहिल्याबाईंना सति जावू दिले नाही. त्यानंतर १२ वर्षांच्या अवधीनंतर मल्हारराव ही मृत्यू पावले. त्यानंतर राज्यकारभार चालवायचा कोण हा मोठा प्रश्न पडला. बाईच्या जन्माला नवऱ्यानंतर काय हाल भोगावं लागतं हे त्या स्त्री इतपत कोणीच समजू शकत नाही अशीच निराधार असणाऱ्या

vivo Y56



या अहिल्यादेवींनी मराठा साम्राजाचा माळवा प्रांताचा राज्यकारभार सांभाळू लागल्या. एका स्त्री च आयुष्य उंबरठ्यापर्यंत न राहता ते वेळ पडता रणभूमीपर्यंत पाहिजे अस मत व्यक्त करत त्या स्वतः युद्धामध्ये एक सैन्य म्हणून लढत होत्या. सासरे मल्हारराव यांनी अहिल्याबाईंचा साम्राजाप्रति ओघ पाहता त्यांचा भरपूर विश्वास होता त्यांच्यावरती कारण अहिल्याबाईंनी आपल्या सासऱ्यांचे नाव आणि एक उत्तम शासिका ठरल्या. अहिल्याबाईंच्या कर्तृत्वाची गाथा गावी तितकी थोडीच वाटते.

या प्रवाहादरम्याण अहिल्याबाईंनी जसे मल्हाररावांनी सति जावू दिले नाही तसे त्यांनी त्यांच्या कारकीर्दीत यावरती अंमल केला आणि स्त्री शक्तीचे बीज रोवले त्यांनी 'सति जाणे' म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा आणि चारित्र्याची छेडछान असा विचार करता त्यांनी लढा दिला खरच एका स्त्री अहिल्याबाई नवजीवन संजिवनी ठरल्या. अहिल्याबाई यांनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधूता आणि समता या तत्वाप्रमाणे राज्य केले म्हणूनच त्यांना 'तत्वज्ञानाची राणी' म्हणून ओळखले जावू लागले. आपल्या कारकीर्दीत त्यांनी अनेक लोककल्याण युक्त कामे केली, गोरगरिबांना माथेचा पदर दिला आणि अशी ही जनतेची माय ठरली. स्त्री शक्तीचा न्याय करता मुलींचे आंतरजातीय लग्न करून देऊन स्त्री ला बळकट तर केलेच पण जातीभेद ही नसावा ही मोलाची शिकवण दिली.

शेवटी एवढंच सांगेन की, ज्याप्रमाणे शिवाजी महाराज आपल्या सामर्थ्यवान राज्यशैली साठी ओळखले जातात त्याप्रमाणेच एक स्त्री शक्तीचे प्रतिक म्हणून अहिल्याबाई यांनी राज्यकारभार पाहुन एक महिला राजकर्ती म्हणून मोलाची कामगिरी पार पाडली. स्त्री जन्माची ही कहानी कुठेतरी लोप पावण्याच्या दिशेस आली आणि जे अहिल्याबाईंनी आयुष्यभर कोसळलेल्या संकटांनी त्यांचा अंत पाहिला शेवटी १३ ऑगस्ट १७९५ रोजी या राजमातेने मृत्यूला जवळ केले. स्त्री शक्तीची भव्यदिव्य प्राणज्योत कायमची मावळली पण आयुष्यभराच्या प्रवासातून हे मात्र सांगुन गेली की स्त्री म्हणून गुलामी करण्यापेक्षा लढा आणि स्वतःचे साम्राज्य निर्माण करा. स्वाभिमानी व्हा. स्त्री म्हणून जुलाम सहन करू नका.

vivo Y56 5G



DATE: / /

खरचं अशी स्त्री शक्ती ज्योत आपल्या जीवणप्रवासातुन खूप काही शिकवून गेली पुण्यश्लोक असणाऱ्या राजमाता जाता-जाता स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास रचुन गेली.

हे माथमाऊली तुला माझा साष्टांग नमस्कार !

Name : Karan Patil
: Shiradwad, Ichalkaranji Kolhapur
7972812155



"अहिल्याबाई होळकर - एक आदर्श शासिका आणि जनतेची माय"

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं जीवन म्हणजे कर्तृत्व, करुणा आणि कणखर नेतृत्व यांचं उत्तम उदाहरण होय. त्या केवळ एक शासिका नव्हत्या तर एका संपूर्ण राज्याच्या आई होत्या. जनतेसाठी समर्पित, धर्मरायणतेचा आदर्श आणि महिला सक्षमीकरणाची मूर्ती होय.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतातील, माळव्याच्या 'तत्वज्ञानी महाराणी' म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलवली व मल्हारराव होळकरांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेले होते. त्या आधाराने अहिल्याबाईंनी इ.स. १७६६ ते इ.स. १७९५, म्हणजे त्यांच्या मृत्युपर्यंत माळव्यावर राज्य केले होते.

होळकर यांचा जन्म ३१ मे इ.स. १७२५ रोजी महाराष्ट्र अहिल्यानगर जिल्हातील जामखेड तालुक्यातील चोंडी (मल्हारपीठ) खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले होते. मल्हारराव होळकर पुण्यास जाताना चोंडीस थांबले होते. आख्यायिकेनुसार, ८ वर्षाच्या अहिल्यादेवींना, मल्हाररावांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला, स्वतःचा मुलगा खंडेराव याची वधू म्हणून आणले.

मल्हारराव होळकरांच्या त्या सून होत. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्युनंतर सासरे मल्हारररावांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. १२ वर्षानंतर, मल्हारराव होळकर हेही मृत्यु पावले. त्यामंतर अहिल्याबाई मराठा सामराज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. त्या लढाईत अहिल्यादेवी स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.



इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांना भारताच्या "कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारेट" असे म्हणले आहे. शेडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी व एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने म्हणले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांच्या इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढंच नाही तर त्यानी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखले प्रसिद्ध हिंदू मंदिरांचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांनी सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने उध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेची कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती.

इ.स. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाईदरम्याने लिहिलेल्या एका पत्रावरुनं मल्हाररावांना अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होतो हे दिसून येते.

"चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा. तेथे तुम्ही ४-५ दिवस मुक्काम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांचे शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा... कूच करतांना, मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा."

पूर्वीच शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्युनंतर, अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी काम अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास मालवात अनेकांचा विरोध होता. पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. अहिल्यादेवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार



धनुष्य आणि बाणांचे भाते वेगत असत, असे म्हणतात.

पेशव्यांनी परवानगी दिल्यावर ज्या माणसाने तिला विरोध केला होता त्यास चाकरीत घेऊन, तुकोजी-राव होळकर (मल्हारराव यांचा दत्तक पुत्र) यास सैन्याचा मुख्य करून, अहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयत्न केला. अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही, इंदूर या खेड्याचा विकास करून त्याचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे, ही अहिल्यादेवींनी केलेले फार मोठे काम आहे. त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले, हिंदू मंदिरांमध्ये कायमस्वरूपी पूजा सुरू रहावी म्हणून अनेक दाने दिली. माळव्याबाहेरही त्यांनी मंदिरे, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या.

मल्हाररावांच्या मृत्युनंतर इंदोर वरून संस्थानाची राजधानी महेश्वर या ठिकाणी आणून कारागीर, मजूर, विणकर, कलावंत, साहित्यिक अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, पैसा, घर इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या. आजही महेश्वरी साड्या, पैठणी, धोतर प्रसिद्ध आहेत. राज्यात पशुपक्षी यांना चरण्यासाठी त्यांनी कुरणे राखली.

सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे, मशिदी, दर्गे व विहार बांधली. तर काही मंदीरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. मजुरांना काम मिळाले व सर्व जाती धर्मांचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुरासोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाई ह्या समाजसुधारक होत्या. त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरेचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला तो म्हणजे 'मानवताधर्म.' प्रजेवर जास्त करांचा बोझा न लावता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोग सुद्धा लोककल्याणासाठी केला. अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या. त्यांच्या जन कार्याचा सन्मान आजही केला जातो.



अहिल्याबाई होळकर या माळवा राज्याच्या होळकर घराण्याच्या शासिका होत्या. त्यांनी आपल्या राज्य कारभारात सामाजिक घटनांना न्याय दिला. त्यात धनगर समाजासाठीही त्यांनी अनेक महत्वपूर्ण कामे केली. अहिल्याबाई यांनी धनगर समाजाला न्याय मिळवून दिला. त्यांनी त्यांचावर होणारे अन्याय कमी केले. त्यांनी धनगर समाजातील मुला-मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. त्यांचासाठी शाळा आणि वसतिगृहे बांधली. त्यांनी धनगर समाजातील लोकांना पारंपरिक व्यवसायात मदत केली. त्यांना नवीन रोजगार मिळतील यासाठी प्रयत्न केले. त्यांनी धनगर समाजाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केला. त्यांनी त्यांच्या व्यवसायाला प्रोत्साहन दिलं आणि त्यांना नवीन संधी उपलब्ध करून दिल्या. त्यांनी धनगर समाजातील रूढीवादी विचारसरणीला विरोध केला. त्यांनी समाजाला आधुनिक विचारसरणी स्वीकारण्यास प्रोत्साहित केले. अहिल्याबाईंनी धनगर समाजासाठी अनेक परोपकारी निर्णय घेतले. कामे केली. त्यांनी त्यांच्यासाठी दवाखाने, पाणी व्यवस्था आणि इतर सुविधा निर्माण केले.

अहिल्याबाईंनी जनतेच्या कल्याणासाठी अनेक उपक्रम राबवले, ज्यामुळे त्यांना 'जनतेची माय' असे म्हटले जाते. त्यांनी आजही लोकांच्या मनात एक आदर्श शासक म्हणून स्थान राखले तसेच त्या एक प्रेरणास्थान आहेत.

'मधुर होती जिची वाणी,
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी...
गाजवल्या जिने दिशा दाही;
तिच्या अतुंग कार्याला
खरच सीमा नाही.'

अहिल्याबाईंनी अनेक किल्ले, रस्ते, विहिरी आणि विश्रामगृहे बांधण्यासाठी मदत केली. त्यांनी महेश्वर आपली राजधानी बनवली आणि अनेक कारागीर, कलाकार आणि शिल्पकारांना रोजगार उपलब्ध करून दिला. त्यांनी धार्मिक स्मारकांचे संरक्षण केले, अगदी त्यांच्या अधिपत्याबाहेरील प्रदेशांमध्येही, आणि मुघल सम्राट औरंगजेबच्या आदेशाने पाडलेले काशी विश्वनाथ मंदिर आणि औरंगाबादजवळील घृष्णेश्वर मंदिर पुनर्बांधणीत मदत केली. त्यांनी महेश्वरमध्ये



एक कापड उद्योग स्थापन केला असे म्हटले जाते, ज्यातून आजही विणल्या जाणाऱ्या माहेश्वरी साड्या जन्माला आल्या.

अहिल्याबाईंच्या मृत्युनंतर, तुकोजीराव होळकर यांनी गादीवर बसवले, ज्यांनी दोन वर्षांनी त्यांचा मुलगा जसवंतराव यांच्या मर्जीने गादी सोडली. १८०४ मध्ये ब्रिटीशांकडून पराभव होईपर्यंत आणि त्यानंतर ब्रिटीशांशी शांतता होईपर्यंत जसवंतराव हे स्वतंत्र शहालेले शेवटचे होळकर शासक होते.

"शब्या असंख्या आल्या या जगात,
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्व जिचा आहे या मराठी हृदयाला
एकच ती महाराणी
राजमाता अहिल्याबाई ..."

+++

नाव - सानिया सदाशिव फाले
वयोगट - ०४ - १७ ते २१ वर्ष
वय - १८
शहर - सिंधुदुर्ग ४१६६१२
पत्ता - मु. पो. कट्टा ता. देवगड.
जि. सिंधुदुर्ग - ४१६६१२

निबंधाचा विषय -
'अहिल्याबाई होळकर - एक आदर्श शासिका आणि जनतेची माय'

दिनांक - 26-05-2025





नाव : गायकवाड स्नेहल बाळासाहेब
कॉलेजचे नाव : सांगोला महाविद्यालय, सांगोला
विद्यापीठ : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ



इतिहासातील कर्तबगार स्त्रियांपैकी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या एक होत. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रात अहमदनगर जिल्ह्यात जामखेड तालुक्यातील चौंडी नावाच्या एका छोट्या खेड्यात झाला. राजमाता अहिल्यादेवी होळकर, ज्यांना अहिल्याबाई होळकर म्हणूनही ओळखले जाते, या एक महान महिला शासक आणि सामाजिक सुधारक होत्या.

ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर. सर्व-धर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री, पुरुष समानता, गोरगरिबांना विषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट चालीरीती रूढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म हा धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला.

माणकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतील असून देखील ते विद्वान व दूरदर्शी गृहस्थ होते. अठराव्या शतकामध्ये आजच्या सारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना देखील त्यांनी अहिल्येला शिक्षणाची घरीच व्यवस्था केली. अहिल्या मानचे जीवन घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. अवघ्या आठ वर्षाची असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांचा तीन वर्षाचा एकुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव



यांच्याशी अहिल्याचा विवाह २० मे १७३३ रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला. लग्नानंतर लगेच आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांचे मने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हारराव यांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहिणे, वाचणे, गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या. तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे, न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्येची सामाजिक व राजकीय बुद्धी परिपक्व झाली.

इ.स. १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याचा शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहित असूनही सती जाणे नाकबूल करण्यात अहिल्याबाईंनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून अहिल्याबाईने प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म, रूढी, परंपरा यापेक्षा कर्तव्य महत्त्वाचे मानून स्वतःला कल्याणकारी राज्य दिले.

मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर २९ वर्षे अत्यंत यशस्वीपणे त्यांच्या कल्याणकारी योजना काय असू शकतात आणि त्या कशा राबवल्या



जाव्यात हे त्यांनी दाखवून दिले. सासरा मल्हारराव यांचा मृत्यू २० मे १७६६, मुलगा मालेराव यांचा मृत्यू २७ मार्च १७६७ मध्ये झाला. अशी एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईंनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्त्वाप्रमाणे राज्य केले.

पेशवा रघुनाथराव याचा होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा लोभ सुटला. त्याने पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेऊन इंदोर वर चढाई केली. हे वृत तेजस्विनी अहिल्याबाईला कळताच खचून न जाता त्यांनी रघुनाथरावांना खलिता पाठविला त्या म्हणतात, "आपण माझे राज्य हिरावून घेण्याचे कपट रचून आलात आमच्याकडील फितूरास गाठले. मला दुबळी समजलात की खुळी? दुःखात बुडालेल्यास आधिक बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतू? आता आपली गाठ रणांगणात पडेल! माझ्याबरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल मी हरले तर कीर्ती करून जाईल. पण आपण हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. मी अबला आहे असे समजू नका. मी खांद्यावर माळ घेऊन समोर उभे राहिले तर पेशव्यांना भारी पडेल. वेळ पडली तर हत्तीच्या पायी साखळीशी बांधून तुमचे स्वागत न केले तर होळकराच्या सुनेचे नाव लावणार नाही."

मुत्सद्दी अहिल्या म्हणजे तळपती समशेर



आणि लक्ष लक्षांती वीज होती. त्यांनी आपल्या आयुष्य लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न घालता संपूर्ण भारतात कार्य केलेले आहे. संपूर्ण भारतात अनेक विहरी, तलाव, कुंड, घाट बांधले आहेत. रस्ते, पूल निर्माण केले आहेत. जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत सार्वजनिक बांधकाम विभागा-मार्फत केले जाते ते काम अहिल्याबाईंनी केले. उद्योगधंद्यांना व त्याच्या विकासाला प्राधान्य दिले.

मल्हारराव्यांच्या मृत्यूनंतर इंदोर वरून संस्थानची राजधानी महेश्वर या ठिकाणी आणून कारागीर, मजुर, विणकर, कलावंत, साहित्यिक अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, पैसा, घर इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या आजही महेश्वरी साड्या, पैठणी, होतर प्रसिद्ध आहेत. राज्यात पशुपक्षी यांना चरण्यासाठी त्यांनी कुरणे राखली.

मुंग्यांना साखर, माश्यांना कणकेचा गोळा, उन्हाळ्यात वाटसरूंना पिण्यासाठी पाणपोया, हिवाळ्यात गरजूंना गरम कपडे यांची सोय केली. आपल्या राज्यात सुक्ष्म जीवही उपाशी राहू नयेत यासाठी दक्षता घेतली. दिव्यांग, अनाथ व असहाय्य लोकांचे पुनर्वसन केले.

गोरगरिबांसाठी अन्नछत्रे व सदावर्ते चालविली. वस्त्रांचे वाटप केले. प्रवाशांसाठी मार्गावर अरण्यमय प्रदेशातही आंबराई, बगीचे, वृक्षारोपण विश्रांतीसाठी ओटे व धर्मशाळा बांधल्या. घाट बांधतांना केवळ तज्ञांनी मत विचारात न घेता प्रत्यक्ष त्या भागातील स्त्रियांना बोलून घाटाच्या पायऱ्या कशा हव्यात, कपडे धुताना बाळ कुठे



ठेवायला सोयीस्कर पडेल, कपडे बदलताना खोल्या कुठे असाव्यात? इतक्या बारीक तपशिलासह घोट बांधून घेतले.

सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे, माशेदी, दर्गे व विहीर बांधली. तर काही मंदीरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. मजुरांना काम मिळाले व सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्याच्या यशवंत फणसे या बहादुर सोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाई ह्या समाजसुधारक होत्या. त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवता धर्म. प्रजेवर जास्त करांचा बोजा न लादता राज्याचा कोष समृद्ध केला.

इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांना भारताच्या "कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गरिट" असे म्हणले आहे. शोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरिन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गरिट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने म्हणले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक क्षेत्र अखंड



प्रसिद्ध हिंदू मंदिरांचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

इ. स. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाईदरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हाररावांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते. "चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा. तेथे तुम्ही २-५ दिवस मुकाम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांचे शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा..... कूच करतांना मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा". पूर्वीच शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलांच्या मृत्यूनंतर, अहिल्यादेवींनी स्वतःच राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. अहिल्यादेवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत, असे म्हणतात.

पेशव्यांनी परवानगी दिल्यावर, ज्या माणसाने तिला विरोध केला होता त्यास चाकरीत घेऊन, तुकोजीराव होळकर यास सैन्याचा मुख्य करून, अहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक



धेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वतः प्रयोजित करून, शेतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. अहिल्यादेवी होळकरांच्या स्मृतीस आशिर्वादन म्हणून, सन १९९३ मध्ये, इंदुरातील नागरिकांनी त्याच्या नावाने एक पुरस्कार सुरू केला. तो, दरवर्षी, जनसेवेचे विशेष काम करणाऱ्यास दिला जातो.

अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ, इंदूर येथील विश्वविद्यालयास त्यांचे नाव दिले आहे. तसेच त्यांचे नावाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे एक विद्यापीठ सोलापूरला आहे.

ज्या प्रमाणे अहिल्यादेवी लोककल्याण आणि समाज सुधारना करीत त्याच प्रेमाने लोकांमध्ये समानता अनन्यात्व काम करीत अहिल्यादेवींनी आपल्या सेनामध्ये पुरुषाना संधी देत त्याच प्रमाने महिला नाही संधी मिळत आणि म्हणुनच अहिल्यादेवींनी सेनामध्ये महिलाची ही एक मोठी तुकडी खास सामावून होतली आणि म्हणुनच अहिल्यादेवीना समानन्याय करणाच्या न्यायदेवता म्हणुन ओळखले जाते.

महेश्वर येथे संस्कृत पाठशाळा सुरू केली. अन्नछत्रे घातली. अनेक ठिकाणी मंदिरे बांधली. गुजरातेतील सोरटी सोमनाथाच्या मंदिराचा जिर्णोद्धार केला. असे पुण्यसंचयाचे काम अहिल्यादेवी करीत होत्या. तशातच त्यांचा नातू तेराव्या वर्षी मरण पावला. काही दिवसातच जावई लढाईत कामी आला आणि मुलगीही सती गेली. आयुष्यभर कोसळलेल्या संकटांनी त्यांचा अंत पाहिला होता. त्यांची प्रकृती बिघडत गेली आणि



अखेर १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांनी शांतपणे मृत्यूला जवळ केले.

स्वतःचा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोग मुख्य लोककल्याणासाठी केला. अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने राजमाता व राष्ट्रमाता झाल्या. त्यांच्या कार्याला व विचारांना विनम्र अभिवादन....!



वैष्णवी विकास करपे.
3rd BALLB [ILS Law college, Pune]

पुण्यश्लोक अहिल्याबाई :

आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.

भारतीय संस्कृतीत "नेतृत्व" या संकल्पनेला केवळ अधिकारप्राप्त व्यक्ती म्हणून न पाहता, मूल्यनिष्ठ, जनतेच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या मार्गदर्शक व्यक्ती म्हणून मान्यता मिळते. या दृष्टीने पाहता, अठराव्या शतकातील 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर' यांचे व्यक्तिमत्व एक आदर्श उदाहरण ठरते. त्या केवळ एक प्रभावी राजकर्त्या नव्हत्या, तर एक द्रष्ट्या सुधारक, स्त्री-शक्तीचा उज्ज्वल प्रतीक आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या नेतृत्वाचे उत्तम प्रतिरूप होत्या.

अहिल्याबाईंच्या काळात स्त्रियांना समाजात स्थान नव्हते. अशा वेळेस त्यांनी सार्वजनिक व्यवहारात सहभाग घेतला, प्रशासन चालवले, जनकल्याणासाठी निर्णय घेतले आणि धार्मिक सहिष्णुतेला आदर्श घालून दिला. आज भारत वेगाने प्रगती करत आहे, मात्र सामाजिक समता, स्त्री-सक्षमीकरण आणि नैतिक प्रशासनाच्या बाबतीत अजूनही आदर्श शोधला जातो. अशावेळी अहिल्याबाईंचे जीवन आणि कार्य आधुनिक भारताला प्रेरणा देणारे ठरते.

अहिल्याबाईंचा जन्म इ.स. १७२५ मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी गावात झाला. शूद्र जातीतील असूनही त्यांच्या बुद्धिमत्ता आणि कार्यतत्परतेमुळे त्यांना लौकिक मिळाला. मल्हारराव होळकर यांनी त्याच्या बुद्धिमत्ता, कार्यकुशलता आणि चिकाटीमुळे त्यांना सून म्हणून



स्वीकारले. पती खंडेराव आणि सासरे मल्हारराव यांच्या निधनानंतर अहिल्याबाईंवर राज्यकारभाराची जबाबदारी आली. त्या काळी विधवा स्त्रीकडे सत्ता येणे दुर्मीळ होते, पण त्यांनी ती जबाबदारी समर्थपणे पार पाडली. इ.स. १७६७ ते १७९५ या कालखंडात सुमारे २८ वर्षे त्यांनी मालवा राज्याचा कारभार केला. अहिल्याबाईंनी अनेक मंदिरे, धर्मशाळा, विहिरी, पाणवठे आणि शिक्षणसंस्था उभारून जनतेच्या गरजा ओळखून काम केले. त्यांनी केवळ मालवा राज्याचाच नव्हे तर संपूर्ण भारतभर लोककल्याणकारी कार्य केले.

अहिल्याबाईंच्या निर्णयक्षमतेमुळे, न्यायप्रियतेमुळे आणि जनहितासाठी घेतलेल्या भूमिका यामुळे इतिहासकार त्यांना 'भारताची आदर्श राणी' असे म्हणतात. त्यांचे जीवन हे आधुनिक भारतासाठी नेतृत्व आणि सेवा यांचे प्रेरणास्रोत आहे.

अहिल्याबाईंचे नेतृत्व हे तात्कालिक नव्हे, तर दूरदृष्टीपूर्ण, मूल्यनिष्ठ आणि तत्वप्रिय होते. त्यांनी धर्म, जाती, लिंगभेद न करता सर्वांच्या कल्याणासाठी निर्णय घेतले. त्यांच्या निर्णयात धैर्य, करुणा, संयम व नीतिमत्तेचा समतोल होता. न्यायव्यवस्थेत त्यांनी पारदर्शकता आणली, सामान्य जनतेच्या तक्रारी स्वतः ऐकून निर्णय दिले. 'प्रजाच राजा' हे तत्त्व त्यांनी आचरणात आणले. अर्थकारणात त्यांनी अन्नसाठवण, जलसिंचन योजना आणि सुसंगत करप्रणाली यावर भर दिला. त्यांच्या निर्णयप्रक्रियेत वास्तवाची जाण आणि मानवतेची जाणीव होती. विशेषतः महिलांसाठी त्यांनी सामाजिक सुधारणांचे कार्य केले. त्या काळात विधवांवर अन्याय होत असतानाही, अहिल्याबाईंनी त्यांना आधार दिला, धर्मशाळा उभारल्या आणि पुनर्विवाहालाही प्रोत्साहन दिले.

त्यांचे नेतृत्व समाजातील सर्व स्तरांमध्ये समतेची भावना रुजवणारे होते. त्यांनी केवळ कारभार



नव्हे, तर समाजरचना सुधारण्याचे कार्य केले. त्यांच्या कार्यामुळे त्या एक आदर्श नेत्या ठरतात - ज्या नेतृत्वामधून सामाजिक न्याय, सहिष्णुता आणि परिवर्तनशीलता यांचे दर्शन घडते.

अहिल्याबाईंची प्रशासनशैली आजच्या लोकशाही साठी आदर्श ठरू शकते. त्यांनी 'धर्मराज्य' आणि 'जनतेचे राज्य' यांचा समतोल साधला. न्यायनिवाडा त्वरित व पारदर्शक होता; त्या स्वतः न्यायासनावर बसून जनतेच्या तक्रारी ऐकायच्या. त्यांचे प्रशासन सर्वसमावेशक होते. त्यांनी कोणतीही जात-पात वा धर्मभेद न ठेवता सर्वांसाठी सुविधा निर्माण केल्या. वाराणसी, रामेश्वरम्, द्वारका, गंगोत्री, अयोध्या यांसारख्या धार्मिक स्थळांच्या पुनर्बांधणीसाठीही त्यांनी योगदान दिले. महिलांना त्यांनी दरबारात स्थान दिले, त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेतले व त्यांचा सन्मान आणि सुरक्षा अबाधित राखली. त्यांचे नेतृत्व केवळ यशस्वी नव्हते, तर दूरदृष्टीपूर्ण आणि लोककल्याणकारी होते. त्यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीला 'visionary leadership' असे मानले जाते.

अठराव्या शतकात जेव्हा स्त्रियांना शिक्षण म्हणजे पाप मानले जात होते, तेव्हा अहिल्याबाईंनी मुलींसाठी शाळा स्थापन केल्या, शिक्षणासाठी गुरू ठेवले. त्यांनी स्त्रियांनाही आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे यासाठी शिक्षणासोबतच व्यावसायिक शिक्षण, हस्तकला, विणकाम यासारख्या कौशल्यांवर भर दिला. स्त्रियांच्या हितासाठी त्यांनी विशेष योजना राबवल्या. त्या केवळ राणी नसून एक 'समाजमाते'च्या भूमिकेत होत्या. विधवा महिलांसाठी त्यांनी आश्रयगृहे सुरू केली. त्या काळात विधवांच्या पुनर्विवाहास विरोध असतानाही त्यांनी पुनर्विवाहास संमती व प्रोत्साहन दिले.

या कृतीमुळे त्यांच्या स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. त्या काळात हे क्रांतिकारक होते. त्यांच्या या प्रयत्नांमुळे पुढील काळात महात्मा फुले, सावित्रीबाई फुले



आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या समाजसुधारकांना प्रेरणा मिळाली.

अहिल्याबाईंनी स्त्री सक्षमीकरणाची बीजं रोवली. पुढे त्याचं बीजांची फळं म्हणून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. आणि एक शिक्षिका म्हणून इतिहास घडवला. त्यांनी सामाजिक बहिष्कार पत्करूनही शिक्षणाच्या दिव्याने अंधार दूर करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांनी विधवाविवाह, जातीनिर्मूलन आणि स्त्री-पुरुष समानता यासाठी लढा दिला. त्यांचे कार्य हे अहिल्याबाईंच्या विचारांची पुढची पायरी होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख साधन होते. त्यांनी स्त्रियांना घटनेत समता, शिक्षणाचा अधिकार, आणि संपत्तीवरील अधिकार दिला. अहिल्याबाई, फुले दांपत्य, आणि आंबेडकर हे एकाच विचारधारेच्या साखळीतले महत्त्वाचे दुवे होते - समाजसुधारणेचे, स्त्रीसन्मानाचे, आणि सशक्त भारताच्या निर्मितीचे.

अहिल्याबाई, फुले दांपत्य तसेच आंबेडकर यांनी लावलेली स्त्री शिक्षणाची मशाल आज व्यापक स्वरूपात दिसते. भारतीय संविधानामुळे मुलींसाठी शिक्षणाचा हक्क आहे आणि अनेक योजनांमुळे शैक्षणिक संधी वाढल्या आहेत. मुली आज डॉक्टर, इंजिनिअर, वैज्ञानिक, प्रशासकीय अधिकारी, उद्योजक बनत आहेत. 'बेटी बचाओ - बेटी पढाओ', कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० यांसारख्या उपक्रमांनी मुलींच्या शिक्षणात सुधारणा केली आहे. ग्रामीण भागातही आता मुली शिक्षण घेऊ लागल्या आहेत.

तथापि अजूनही काही गंभीर आव्हाने आहेत: जसे की, लैंगिक भेदभाव, बालविवाह व शिक्षणात



अडचणी, इत्यादी. अशा वेळी आपल्याला पुन्हा अहिल्याबाईंच्या विचारांकडे पाहावे लागते- केवळ शिक्षण देणे नव्हे, तर स्त्रियांना स्वाभिमानी, सुरक्षित व आत्मनिर्भर बनवणे हे खरे ध्येय आहे.

आजच्या भारतात महिलांनी केवळ घर आणि शिक्षण क्षेत्रात नव्हे तर राष्ट्ररक्षणातही भरीव योगदान दिले आहे. भारतीय सशस्त्र दलात महिलांची उपस्थिती वाढत असून त्यांचे धाडस आणि सेवा हे अभिमानास्पद आहे. 'ऑपरेशन सिंदूर (२०२५) हे भारताच्या इतिहासातील महत्त्वाचे लष्करी अभियान होते. या मोहिमेत लढाऊ वैमानिक, डॉक्टर, गुप्तचर अधिकारी, संप्रेषण अधिकारी म्हणून महिलांनी महत्त्वाचा सहभाग नोंदवला आहे.

'ऑपरेशन सिंदूर' मधील महिलांच्या कामगिरीची उदाहरणे जसे की, 'कर्नल सोफिया कुरेशी' या भारतीय लष्कराच्या पहिल्या महिला अधिकारी ज्यांनी 'एक्सरसाइज फोर्स १८' कार्यक्रमाचे नेतृत्व केले. तसेच 'विंग कमांडर व्योमिका सिंग' यांनी २५०० पेक्षा जास्त उड्डाण तास पूर्ण केलेले, सोबतच जम्मू-काश्मीर आणि दुर्गम भागांमध्ये काम केल्याचा अनुभव आहे. नौदलात लेफ्टनंट 'शुभांगी स्वरूप' या पहिल्या महिला पायलट ठरल्या आहेत. 'स्क्वाड्रन लीडर अवनी चतुर्वेदी' या भारतातील पहिल्या लढाऊ महिला वैमानिक आहेत, तसेच त्यांनी 'मिग - २१ बायसन जेट एकटीने उडवले. अशी एक ना अनेक उदाहरणे महिलांच्या कर्तबगारीची देता येतील. सीमा सुरक्षा दलात आणि NDRF मध्येही महिला जवानांची उपस्थिती लक्षणीय आहे.

अहिल्याबाईंच्या धैर्य, निर्णयक्षम नेतृत्व आणि कार्यक्षमतेचा वारसा या महिलांमध्ये दिसतो. त्या आजच्या "सशस्त्र भारतमाते'च्या रूपात आहेत.

अहिल्याबाईंचे कार्य केवळ प्रशासकीय व धार्मिक पर्यंतच मर्यादित नव्हते, तर सामाजिक समतेच्या मूल



मूल्यांवर आधारित होते. त्यांनी जातिभेद, धर्मभेद, स्त्री - पुरुष असमानता दूर करण्यासाठी काम केले. त्यांच्या न्यायालयात सर्व जातीच्या व्यक्तींना समान न्याय मिळत असे. त्यांनी मंदिर प्रवेश कोणत्याही जातीला नाकारला नाही. याच विचारांचे विस्तार पुढे फुलताना दिसते - जे फुले, आंबेडकर, गांधीजी यांनी पुढे नेले.

आजही जाती - धर्म - लिंगाच्या नावाने भेदभाव, अत्याचार होतो. अशा वेळी अहिल्याबाईंचा 'सर्वसमावेशक नेतृत्व' हा मार्गच आपल्या समाजाच्या पुनर्बांधणीसाठी मार्गदर्शक ठरतो. त्यांचे विचार म्हणजे केवळ इतिहास नव्हे, तर आजच्या भारतासाठी कृतीचा मार्ग आहे.

आजचा भारत वेगाने आधुनिकतकडे वाटचाल करत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण, डिजिटल युग अशा अनेक प्रगतीच्या वाटा उघडल्या आहेत. मात्र या प्रगतीसोबतच सामाजिक विषमता, स्त्री अत्याचार, लाचखोरी, अन्याय, जातीयता, धार्मिक विद्वेष यांसारख्या समस्या अजूनही आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्याबाईंच्या जीवनमूल्यांकडे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांचे नेतृत्व म्हणजे लोकशाही मूल्यांचे मूल रूप होते - पारदर्शकता, न्याय, सेवा, करुणा आणि समता.

आज लोकप्रतिनिधींमध्ये जिथे व्यक्तिगत स्वार्थ, पक्षीय राजकारण, आणि विभाजनाची प्रवृत्ती दिसते, तिथे अहिल्याबाईंचे तत्वप्रिय, सज्ञान व सेवाभावी नेतृत्व एक आदर्श ठरते. त्यांनी धर्म आणि विकास यांचा समन्वय साधला - धार्मिक कट्टरतेपासून दूर राहून त्यांनी सर्व धर्मांचा आदर केला आणि सार्वजनिक कल्याणासाठी काम केले. आजही आपण धार्मिक ध्रुवीकरणाच्या विळख्यात अडकतो, तेव्हा त्यांचे विचार आपल्याला सामाजिक ऐक्याची आठवण करून देतात. स्त्रीसशक्तीकरण ही केवल योजना न राहता, ती एक सामाजिक चळवळ ठरावी,



आजही आधुनिक भारतातील समावेशक नेतृत्व, महिला सक्षमीकरण, नैतिक प्रशासन या सर्व घटकांमध्ये सुसंगतपणे जुळते.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर हे नाव म्हणजे केवळ इतिहासातील एक तेजस्वी अध्याय नाही, तर ते भारतीय नेतृत्वाचा कालातीत आदर्श आहे. त्यांचे जीवन, कार्य, तत्त्वे आणि दूरदृष्टी ही आधुनिक भारतासाठी एक प्रकारची 'चेतना' आहे. त्या एक आदर्श प्रशासक होत्या, न्यायप्रिय बेत्या होत्या, स्त्री शक्तीचे मूर्तिमंत रूप होत्या आणि समाजसुधारणेच्या लढ्यात अग्रणी होत्या. त्यांच्या नेतृत्वशैलीत करुणा, कणखरपणा आणि विवेक यांचा विलक्षण समन्वय होता.

त्यांच्या कार्यातूनच पुढे फुले दांपत्य, आंबेडकर आणि अनेक समाजसुधारकांची प्रेरणा निर्माण झाली. त्यांनी ज्या गोष्टी अठराव्या शतकात शक्य केल्या, त्या आजही आधुनिक भारतासाठी उदाहरण ठरतात. आज, जेव्हा महिला पायलट आकाशात लढाऊ विमान उडवतात, जेव्हा मुली शिक्षणात शिखर गाठतात, जेव्हा महिलांचा सामाजिक सहभाग वाढतो - तेव्हा त्या प्रत्येक यशात अहिल्याबाईंच्या कार्याची प्रतिबिंबे दिसतात. त्यांच्या जीवनातील मूल्ये - समता, न्याय, शिक्षण, सेवा आणि धर्मनिरपेक्षता हीच आधुनिक भारताची खरी गरज आहे. अहिल्याबाई होळकर - नेत्या नव्हे, तर एक विचार, एक प्रेरणा!

भक्तीची ती मूर्ती होती, न्यायाचा तो प्रकाश,
हातात धर्म, हृदयात कर्म, ठाम होता विश्वास।
पडलेल्याला आधार देई, अंधारात दीप लावी,
पुण्यश्लोक ती माता - अहिल्याबाई।

संदर्भ

1 'अहिल्याबाई होळकर : एक तेजस्वी जीवनगाथा - या. द. फडके
2 अहिल्याबाई होळकर : जीवनगाथा - महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक



Page No.:

निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

३ महात्मा फुले यांचे ग्रंथ - तृतीय रत्ने, गुलामगिरी

४ NCERT च्या इतिहास व समाजशास्त्राच्या पुस्तकांतून स्त्रीशिक्षण व समाजसुधारणेवरील माहिती.

५ भारतीय प्रसारमाध्यमांमधून घेतलेली उदाहरणे - द हिंदू, PIB, The Indian Express

६ भारत सरकारचे शैक्षणिक धोरण दस्तावेज - National Education Policy (NEP) 2020



अहिल्याबाईंचे मंदिर बांधकाम आणि धार्मिक कार्य

संस्कृत भाषेत एक सुप्रसिद्ध सुभाषित आहे →

'उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।
न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः॥'

अर्थात केवल मनोरथाने कार्यपूर्ती होत नाही तर त्यासाठी खडतर प्रयत्न आवश्यक असतात कारण झोपलेल्या सिंहाकडे हरीण स्वतःहून चालून येत नाही त्यासाठी सिंहालाच प्रयत्न करावे लागतात. अगदी या उक्तीप्रमाणे पुण्याने आरलेले आणि पवित्रतेने सजलेले लोककल्याणाचे कार्य पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी अविरत प्रयत्नांनी पूर्ण केले.

भारतवर्षात असे थोडकेच मात्र त्याहून कैकपटीने प्रभावी शासक होऊन गेले त्यातीलच एक नाव म्हणजे 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर' होय. अहिल्याबाई होळकरांनी समाज, देश, व्यवस्था या तिघांची सांगड घालून अभूतपूर्व कार्य केले. राज्याच्या सत्तेची सूत्रे हाती असूनही अहोरात्र लोककल्याणाचा विचार त्यांनी केला, आणि त्यामुळेच त्यांच्या दूरदृष्टीने आपल्याला आजच्या 21 व्या शतकात पुरातन मंदिरे, देवालये व बांधकाम पाहायला मिळते. जन्माने मराठी असणाऱ्या अहिल्याबाईंचा खंडेराव होळकरांबरोबर विवाह झाला होता. मात्र इ.स.१७५४ मध्ये खंडेरावांचे निधन झाले आणि अहिल्याबाईंना अकाली वैधव्य आले. त्यानंतर दहाच इ.स.१७६६ मध्ये त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. शिवाय त्यांची मुलगी व सुनांसह १८ स्त्रिया सती गेल्या. यानंतर सर्व जबाबदारी अहिल्याबाईंकडे आली. आपल्या कार्यकालात अनेक सत्कृत्ये करुन या महान तपस्विनीने 'पुण्यश्लोक' उपाधि मिळवली.

भगवद्गीतेतील उक्तीप्रमाणे धर्मो रक्षति रक्षितः म्हणजेच धर्माचे रक्षण करण्याऱ्याचे धर्म रक्षण करतो. याप्रमाणे अहिल्याबाईंनी तत्कालीन समाजाचा विचार करुन समाजपयोगी कार्ये केली.

जेव्हा आपण पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नाव ऐकतो तेव्हा आपल्या डोळ्यासमोर त्यांच्या दोन प्रतिमा येतात एक म्हणजे घोड्यावर स्वार असण्याची आणि दुसरी म्हणजे डोक्यावर पदर घेऊन हातात कृष्ण रंगाची शिवपिंडी दिसते. त्या जशा शूर पराक्रमी होत्या तशा त्या धर्मनिष्ठ होत्या.



Page No.
Date

अहिल्याबाईंनी त्यांच्या कारकीर्दीत अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. आनंद काकन येथील विश्वेश्वर मंदिर, काशी येथील मंदिर, गया येथील विष्णू मंदिर तसेच सोमनाथ येथील महादेवाच्या मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला. यात महाराष्ट्रातील मराठवाडा भागातील परली वैजनाथ आणी वेरुळ मधील घृष्णेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला. शिवाय नाशिक मधील त्र्यंबकेश्वर मंदिरा जवळ दगडी बांधकामाचे एक तलाव असून २ लहान मंदिरे आहेत.

याशिवाय राजस्थानातील पुष्कर ठिकाणी अहिल्याबाईंनी एक मंदिर व एका धर्मशालेचे बांधकाम केले होते. वृंदावनात त्यांनी अन्नछत्र सुरु केले होते शिवाय लाल दगडाच्या बांधकामाची ५७ पायऱ्या असणाऱ्या विहिरीचे बांधकाम अहिल्याबाईंच्या इच्छेनुसार झाले. सोनभद्र नदीच्या काठावर अहिल्याबाईंनी खंडेराव मार्तंडाचे देवळ बांधले आहे. याशिवाय हरिद्वार येथील गंगा नदीच्या काठावर दगडी बांधकामाचे उंच स्थान बांधले ज्यात लोक पिंडदान करतात. त्याचप्रमाणे, काशी या पुण्यनगरीतील मणिकर्णिका घाट व अन्य ४ महत्त्वाच्या घाटांचे बांधकाम अहिल्याबाईंच्या काळात पार पडले. काशीमधीलच अस्सी घाटावर विश्वनाथाचे मंदिर आहे आणि याच मंदिराच्या सभोवताली जगमोहन व दण्ड-पाणीश्वर यांची देखील आखीव रेखीव मंदिरे आहेत. या सर्व मंदिराचे बांधकाम अहिल्याबाईंनी केले. भारतातील चार धामांमधील महत्त्वाचे असणारे बद्रीनाथ या ठिकाणी देखील यात्रेकरुंकरीता दगडी वास्तूंचे बांधकाम केलेले आहे.

शिवाय मंदाकिनी व सरस्वती नद्यांच्या संगमावर असणारे पवित्र क्षेत्र केदारनाथ याठिकाणी अहिल्याबाईंनी धर्मशालांचे बांधकाम केल्याची नोंद आढळते. तसेच देवप्रयाग व गंगोत्री याठिकाणी देखील येणाऱ्या यात्रेकरुंकरीता अहिल्याबाईंनी व्यवस्था केल्याची नोंद आढळते. मुख्यत्वे म्हणजे विश्वनाथ, केदारनाथ आणी भैरव व अन्नपूर्णाचे मंदिर आणी ५ धर्मशालांची उभारणी अहिल्याबाईंनी केली. लोलार्क या ठिकाणी अहिल्याबाई होळकर व पूर्वबिहार प्रांताचा राजा यांनी संयुक्तपणे ५ फूट वर्तुळाकार व ४० पायऱ्यांची विहिर बांधली आहे. याशिवाय अहिल्याबाईंनी स्वखर्चातून आलमपूर, उज्जैन, ऋषिकेश, काशी, कुरुक्षेत्र, गंगोत्री, जेजुरी, नाशिक, पंढरपूर, चौंडी इ. ठिकाणी नेत्रदीपक मंदिराची उभारणी केली. अहिल्याबाईंनी केवळ मंदिरांची उभारणी व जीर्णोद्धार केला नाही तर मुघल व परकीय राजवटीत खिळखिळा झालेल्या हिंदू धर्माचा पाया त्यांनी अधिक प्रभावीपणे भक्कम केला.

अहिल्याबाई होळकररावांचे निधन झाल्यावर माहेश्वरात कामसरुपी



वास्तव्याला आल्या. आपल्या ३० वर्षांच्या कालात अहिल्याबाईंनी यात्रेकरुंसाठी धर्मशाळा, विहिरी, तलाव, मंदिरे यासारख्या जनसमुदायाला उपयोगी अशा गोष्टींची व्यवस्था उभारली. त्यामुळेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी केलेले कार्य शब्दात बांधणे कठीण होते. यातीलच एक म्हणजे मुलपेश्वर ठिकाण. याठिकाणी त्यांनी महादेवाचे विशाल मंदिर बांधले आहे. प्रवाशांसाठी अन्नछत्राची देखील त्यांनी व्यवस्था केलेली होती. वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे आजच्या २१ व्या शतकात देखील याठिकाणी येणाऱ्या यात्रेकरुला एक घोंगडी, एक तांब्या दिला जातो. मंडलेश्वर याठिकाणी एक घाटाचे व मंदिराचे बांधकाम त्यांनी केले. नीलकंठ महादेव गोमुखी या ठिकाणी एका शिवालयाचे व गोमुखाचे बांधकाम त्यांनी केले आहे. तसेच मध्यप्रदेशातील ओंकारेश्वर या पवित्र तीर्थक्षेत्री त्यांनी एक विहिर व मंदिराचे बांधकाम केलेले आढळते. मध्यप्रदेशातील हडिया ठिकाणाजवळून नर्मदा नदी वाहते. नदीच्या पलीकडे सिद्धनाथाचे विशाल मंदिर आहे. याठिकाणी अहिल्याबाईंनी अन्नछत्र व धर्मशाळा बांधली. याठिकाणच्या अन्नछत्रातून दररोज २०० पेक्षा अधिक भाविक भोजन करायचे. अहिल्याबाईंनी त्यांच्या जन्मस्थानावर म्हणजेच पूर्वाश्रमीचे अहमदनगर जातचे अहिल्यानगरमधील चौंडी गावात एका घाटाचे बांधकाम व शिवालयाचे बांधकाम केलेले होते. आता हे शिवालय अहिल्येश्वर नावाने ओळखले जाते. आजही आजच्या घडीला देखील मंदिराच्या खर्च होळकर घराण्याकडून वार्षिक स्वरुपात दिला जातो.

एकंदरीत पाहता पुण्यश्लोक अहिल्याबाईंनी ज्या कालात देवस्थाने, धर्मशाळा, अन्नछत्रे व अन्य बांधकामे केली त्या कालात वास्तूक व दळणवळणाच्या सोयी नगण्य होत्या. सुविधाही नव्हती. अशा कालात देखील मोठमोठे अवजड शिला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेऊन आखीव रेखीव साचेबद्ध बांधकाम अहिल्याबाईंनी केले. हे पाहून अभिमानास्पद वाटणारे आहे. दरम्यान शाहीर अनंत फंदी जेव्हा माहेश्वरला आलेले होते तेव्हा त्यांनी माहेश्वराच्या वैभवाचे वर्णन करणारा पोवाडा त्यांनी रचला होता. त्या पोवाड्यात पुण्यश्लोक अहिल्याबाईंनी बांधलेल्या घाटांचे वर्णन आले आहे.

नर्मदा तर निर्झर घाट।
बहुत अफार पायऱ्या दाट।
चिरेबंदी वर मुक्तीची शिवालये।
कैलास साम्यता नाना परीची॥
रचली रामकृष्ण मंदिरे। बहुत सुंदरे बांधली घरे॥



Page No.
Date

अहिल्याबाई धर्मपरायण होत्या. खुशालीराम नावाचे एक संस्कृत कवी होते. त्यांनी 'अहिल्या - कामधेनु' नावाच्या ग्रंथात ते लिहितात की,

तस्यैसा कुलदक्षिणी कुलपतेमल्लारिरावस्य वे।
धर्मिष्ठार्यकरी स्नुषा शुभमती स्तुतयात्वहल्याभिया॥
खण्डोराव वधू: सती प्रियंगुणा यत्पारलोके हितं
नित्यं वैष्णव सद्व्रतं गुणावती पूर्व यथा कुर्वती ॥

अर्थात, मल्हारावांची सून ही विचारशील, धर्मात्मा आहे आणि ती अहिल्याबाई (राणी) खंडेरावांची धर्मपत्नी होती. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर खूप गुणवान होत्या लोककल्याणाकरीता व धार्मिक कार्यात त्या सतत व्यग्र असायच्या.

धार्मिक कार्यात देखील त्या सतत आघाडीवर असायच्या. त्यांच्या दानशीलतेबाबत कवि खुशालीराम लिहितात -

कुरुक्षेत्रतीर्थे तुलादानमेवं ।
सुवर्णात्मशोप्यादिकं बारं बारं ॥
अहिल्या पिसा संसदढो दानशीला।
धरा देवताभ्यो गुणज्ञानशीला ॥

अर्थात, कुरुक्षेत्रात अनेकदा अहिल्याबाईनी सोने, चांदीचे तुलादान केले. गुण-ज्ञान व शील संपन्न, दानशीला अहिल्याबाई यांनी ब्राह्मणांना देखील पुष्कळ दान केले. शिवाय त्या अन्नदान करुन आश्रयाला आलेल्या लोकांच्या इच्छा देखील पूर्ण करत असत. आजही देशभरातील बारा ज्योतिर्लिंगे व इतर मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम अहिल्याबाईंनी केले. आणि याचा जेव्हा उल्लेख येतो तेव्हा असे आढळून येते की, त्यांनी बांधलेल्या बहुतांश मंदिरात मराठी पुजारी दिसतात. महत्त्वाची बाब म्हणजे काशी विश्वनाथ व सोमनाथ या दोन्ही मंदिराच्या निर्माणावेळी तिथे मुस्लीम राज्य कर्त्यांचे शासन होते. मात्र अहिल्याबाईंच्या मुत्सद्देगिरीमुळे कधीच जीर्णोद्धाराला अडथळा आला नाही. टिपू सुलतानने देखील त्याच्या राज्यात धर्मकार्ये अहिल्याबाईना करु दिली. म्हणून त्यांना तत्कालीन महाराणी ही उपाधि दिली.

अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्वदूर पसरली होती. सर्वांना समान न्याय देणे हा त्यांचा मूळ उद्देश होता. म्हणूनच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजी होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला, म्हणून त्याला तुरुंगात डांबले होते. तर अशा न्यायधर्म प्रिय त्या होत्या.

आपल्या धार्मिक जीवनात असताना त्यांनी आपल्या प्रजेला पूर्णपणे धार्मिक स्वातंत्र्य दिले होते. त्यांनी कधीच स्वधर्म इतरांवर थोपला नाही व लोकांच्या



कोणत्याच धार्मिक ट्रस्टीवर त्यांनी धार्मिक कर लावला नाही. म्हणूनच अहिल्याबाईंच्या कार्यकालात साधू, संत, फकीर, मौलवी या राज्याश्रय मिळाला होता.

पुण्यश्लोक अहिल्याबाईंनी धर्मस्थळांवर पूजा-अर्चना व अन्य व्यवस्था केली होती. दानधर्मासाठी त्या वैयक्तिक संपत्तीचा वापर करत तर जनकल्याणासाठी सरकारी संपत्तीचा वापर करत असत. काशीमध्ये अहिल्याबाई यांनी ब्रह्मपुरी नावाची वस्तीची उभारणी केली होती. ही वस्ती विशाल आश्रमाप्रमाणे होती कारण याठिकाणी देशभरातून धर्मशास्त्राचे विद्वान व ब्राह्मण राहत असत. याठिकाणी एकत्रित राहून विद्वान लोक शास्त्र, वेद, पुराणे यांचे अध्ययन करत. या ठिकाणचा सर्व खर्च अहिल्याबाईंनी केला होता. इतकेच नाही तर त्यांनी स्वत: धर्मग्रंथांची हस्तलिखिते तयार केली होती. त्यांच्या या धार्मिक कार्याबाबत प्रसिद्ध इतिहासकार श्री चिंतामणी विनायक वैद्य हे लिहितात की, त्या धर्माच्या बाबतीत इतक्या उदारवादी होत्या की त्यांनी प्रत्येक क्षेत्रात धर्म व नीतिच्या जोरावर कार्य केले. शिवाय त्यांचे दानधर्म इतके महान होते की त्याची तुलना होऊ शकत नाही.

ब्रिटिश इतिहासकार सर जॉन माल्कम लिहितात की, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर धर्मपरायण होत्या. त्या त्यांच्या इतिहासाने प्रभावित होत्या व त्याचा उपयोग त्या जनकल्याणासाठी करत असत. शिवाय त्यांनी गंगा नदीचे उगमस्थान असणाऱ्या गंगोत्रीतून गंगाजल पाठवण्याची व्यवस्था केली होती त्यांची ही स्तुती आदि शंकराचार्यांच्या राष्ट्रीय एकतेला नवे रुप दिले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी स्वतःचे जीवन लोककल्याण, धर्मनिष्ठेपायी खर्ची केले.

अहिल्याबाईंचे स्थापत्यशास्त्र व धार्मिक जीवन एक चिंतनाचा, संशोधनाचा विषय आहे. कारण आजच्या काळात त्याचा कॅमपरीने-नगरे कशी असावीत? व्यवस्था कशी ठेवावी? या प्रश्नांची उकल करण्यासाठी निश्चितपणे होऊ शकतो.

अहिल्याबाईंची ओरवी गाताना कवि मोरोपंत लिहितात

देवी अहिल्याबाई । झालीस जगत्त्रयात तू धन्या ।
न न्याय-धर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या ॥

अर्थात, हे देवी अहिल्याबाई, तुम्ही तिन्ही लोकांत धन्य आहात. धर्म व न्यायपराय राजा संप्रति आपल्यासमान दुसरी कोणतीही स्त्री नाही.

या सर्व घटकांतून एक सिद्ध होते की, अहिल्यावाईंनी केलेले कार्य धार्मिक, सामाजिक, राजकीय यावरोवरच त्यांनी राज्याचे हित लक्षात घेऊन निसर्ग संरक्षणासाठी व जलव्यवस्थापनासाठी केलेली धारांची निर्मिती आजच्या काळात प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरणारी आहे.



Page No.
Date

शेवटी शाहिर अनंत फंदी यांच्या काव्य प्रतिमेतून जन्माला आलेला पोवाडा त्यातील ओळी सांगतो :-

सती धन्य धन्य कलियुगी अहिल्याबाई, गेली कीर्ती करुनिया ।
भूमंडलाचे ठायी, महाराज अहिल्याबाई पुण्य प्राणी, सम्पूर्ण स्त्रियांमधी श्रेष्ठ रत्नखाणी ॥

धन्यवाद !

- नाव - स्वरुप मिलिंद काणे
- पत्ता - मु. रविंद्रनगर पो. पोमेंडी बुद्रुक कारवांचीवाडी कुवारबांव रत्नागिरी ४१५६३९
- क्रमांक - ८२१०५४०९८



पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र राज्य
आयोजित राज्यस्तरीय भव्य निबंधस्पर्धा
स्पर्धकाचे नाव- श्री. अमोल लक्ष्मण साबळे गट- खुला
पत्ता- मु. शिळवंडी, पो. कोहणे, ता. अकोले
जि. अहिल्यानगर पीन- 422610
मो. नं. 7798543706



भारतीय इतिहासात अनेक थोर स्त्रिया झाल्या, ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने एक आदर्श निर्माण केला. अहिल्याबाई होळकर यांचे नाव त्यात अग्रगण्य आहे. त्या एक कुशल प्रशासक, दूरदर्शी नेत्या आणि पराक्रमी राजमाता होत्या. म्हणून मला म्हणावसं वाटत..

पायड...पायड काय असतो..?
तो... तळल्यावर कळतो.
लाकूड... लाकूड काय असते..?
ते... जळल्यावर कळते.
पीठ... पीठ काय असते..?
ते... मळल्यावर कळते.
आणि त्याग.. पराक्रम काय असतो..?
तो.. अहिल्याबाईंच्या कार्यातूनच कळतो.

मांजीराव शिंदे यांच्या घराण्यात एक ज्योत पेटली. तीच ज्योत पुढे क्रांतीज्योत झाली. तीच क्रांतीज्योत म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर होय. अहिल्याबाई होळकर यांचा जन्म महाराष्ट्रातील अहिल्या-नगर जिल्ह्यातील चौंडी या गावात झाला. ते म्हणतात ना मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या ओळीप्रमाणे लहानपणापासूनच अहिल्याबाई अत्यंत बुद्धीमान, धार्मिक आणि परोपकारी स्वभावाच्या होत्या. मराठ्यांचे पराक्रमी सेनानी मल्हारराव होळकर स्वारीवर असताना एकदा अहिल्याबाई त्यांच्या नजरेत आल्या. मल्हाररावांनी अहिल्याबाईंच्या अंगचे गुण पारखून त्यांना आपल्या सुनबाई करून घ्यायचे त्यांच्या मनात आले. त्यानुसार त्यांनी त्यांचे पुत्र खंडेराव यांच्याशी अहिल्याबाई यांचा विवाह लावून दिला. कुंभेरीच्या वेढ्यात तोफेचा गोळा लागून अहिल्याबाईंचे पती खंडेराव ठार झाले. अहिल्याबाईंना हे समजताच त्यांच्या मनावर मोठा आघात झाला. आपल्या पतीच्या मागे राहून जीवन जगण्यात काहीच अर्थ नाही असा विचार करणाऱ्या अहिल्या-बाईंनी सती जाण्याचा निर्णय घेतला. अधीच मुलगा गेल्याच्या दुःखात असलेल्या मल्हाररावांना अहिल्याबाईंचा हा पवित्रा समजताच त्यांचे मन सुन्न झाले पण तरीही स्वतःला सावरून मोठ्या कष्टी मनाने सती जाण्याचा हट्ट धरून बसलेल्या अहिल्याबाईंना त्यांच्या निर्णया-पासून परावृत्त करण्याचा प्रयत्न मल्हारराव करू लागले. आणि त्यांना यशही आले.

अहिल्याबाईंना शिक्षणाचे बाळकडू मिळालेच होते. मल्हाररावांनी अहिल्याबाईंना लष्करी आणि मुलकी कारभाराचे कामकाज शिकवले. अहिल्याबाई सुद्धा या कामकाजात पारंगत होत होत्या. अहिल्याबाईंची एकंदर काम करण्याची पद्धत पाहून अहिल्याबाई मुलकी आणि लष्करी



कारभार यशस्वीपणे सांभाळू शकतील असा विश्वास मल्हारराव‌ांना होता. अहिल्याबाईंनी मल्हारराव‌ांचा हा विश्वास सार्थही करून दाखविला. मल्हारराव सतत स्वाऱ्यांवर असायचे, त्यावेळी त्यांना रसद पुरविण्याचे काम, नवीन सैन्यभरती करणे, मुलकी कारभार यशस्वीपणे हाताळून अहिल्याबाईंनी त्यांची कर्तबगारी सिद्ध केली. अहिल्याबाईंवर पूर्व माळव्यातील दोन जिल्ह्यांमधील कारभाराची घडी नीट बसवण्याचे काम मल्हारराव‌ांनी सोपविले होते आणि अहिल्याबाईंनी हे काम चोखपणे पार पाडले. पती खंडेराव गेल्याचे दुःख अजूनही अहिल्याबाईंच्या मनामधून गेले नव्हते, तोच काळाने त्यांच्यावर दुसरा आघात केला. होळकरांच्या घरात आल्यायासून वडीलांप्रमाणे माया करणारे आणि मोठा आधार असणारे मल्हारराव काळाने अहिल्याबाईंपासून हिरावून नेले हे हे दुःख कमी होते की काय म्हणून पुढच्या काहीच वर्षात अहिल्याबाईंच्या लाडका मुलगा मालेराव यांनाही काळाने हिरावून नेले. हा दुःखाचा डोंगरच अहिल्याबाईंवर कोसळला. तरी त्या डगमगल्या नाहीत. म्हणून मला म्हणावसं वाटतं...

अस्सल लाकूड, मक्कम गाठ
ताठर कणा, टणक पाठ
वारा खात, गारा खात
बाभूळझाड उभेच आहे

हि जुन्या अभ्यासक्रमातील कविता मला आठवली या ओळी खूप काही सांगून जातात. कितीही संकटे, दुःख, निराशा आली तरी न डगमगता आयुष्य संघर्ष पुढे चालूच ठेवला पाहिजे तसा संघर्ष राजमाता अहिल्याबाईंनी पुढे चालूच ठेवला. अशा दुःखी आणि कठीण परिस्थितीत इंदोरहून कारभार पाहणे अहिल्याबाईंना कठीण जात होते. म्हणून त्यांनी त्यांची राजधानी महेश्वर येथे हलवली आता मात्र दुःख बाजूला सारून त्यांचे सर्व लक्ष मुलकी कारभारावर आणि मुख्य म्हणजे माळव्यातील होळकरांचा प्रदेश सुखी आणि समृद्ध कसा होईल, याकडे लक्ष केंद्रीत केले. उत्तर आणि दक्षिण भारतात त्यावेळी सतत लढाया सुरू होत्या पण जोपर्यंत माळव्याचा कारभार अहिल्याबाई पाहत होत्या तोपर्यंत होळकरांच्या राज्यावर कोणत्याही शत्रूंनी हल्ला केल्याचा विचार केला नाही यावरून अहिल्याबाईंच्या चोख कारभाराची कल्पना येते.

अहिल्याबाईंची न्याय व्यवस्था चोख होती, न्याय नियम आणि शिक्षा कठोर होती याचे उदाहरण म्हणजे.. एक दिवस त्यांचा मुलगा मालोजीराव त्याचा रथ घेऊन इंदोरला फिरायला निघाले होते रथ वाऱ्याच्या वेगाने चालला होता रस्त्यावरून याचवेळेस अशी एक घटना घडली. एक गाय आपल्या वासराला घेऊन रस्त्यायलीकडे



चालली होती अशात मालोजीरावांचा रथ आला. मालोजीरावांनी रथ थांबवलाच नाही वासराच्या अंगावरून रथ गेला आणि वासराचा मृत्यू झाला. त्यावेळेस अहिल्याबाईचा रथ पाठीमागून येत होता. त्यांनी हे बघितलं की वासरू मेलेलं, गाय शेजारी तिच्या डोळ्यातून पाणी घळघळा येते होत आणि गाय त्या वासराभोवती वेढे घालत होती. त्यांनी आजूबाजूच्या लोकांना विचारलं कोणी मारलं वासराला? त्यावेळेस तेथील लोकांनी सांगितलं तुमच्याच मुलाचा रथ त्या वासराच्या पोटावरून गेला. हे ऐकल्यानंतर अहिल्याबाईंना खूप राग आला. अहिल्याबाई घरी आल्या आणि घरी आल्यानंतर त्यांनी मालोजीरावांच्या पत्नीला बोलावून घेतलं आणि विचारलं की जर एका मुलाला आईच्या समोरच मारलं तर त्याला काय शिक्षा असावी? त्यावेळी पत्नीने सांगितले, " ज्या मुलाला मारलय तीच शिक्षा मारणाऱ्यास व्हावी." एवढा कठोर निर्णय पत्नीने सांगितला दुसऱ्याच दिवशी अहिल्याबाईंनी राज्याची न्यायव्यवस्था बघून योग्य निर्णय त्यांनी घेतला. यावरून त्यांची न्यायव्यवस्था कशी व लोक-कल्याणकारी होती हे दिसून येते.

गोरगरिबांसाठीचं त्यांच कार्यही खूप मोठं आहे. इंदौरमध्ये भरपूर मंदिरे त्यांनी बांधली. गरीब जनतेला धर्मशाळा बांधून दिल्या. मुख्य तिर्थस्थानी घाट बांधले. गुजरात, द्वारका, काशी, विश्वेश्वर, वाराणसी, गंगाघाटाजवळ धर्मशाळा बांधल्या. ज्यावेळेला मुस्लिम आक्रमानांनी हिंदूची मंदीर उद्ध्वस्थ केली होती. ती सर्व मंदीर अहिल्याबाईंनी बांधले त्यांचा जिर्णोद्धार केला. शंकराचं सोमनाथ मंदीर देखील त्यांनी बांधल आहे यातून त्यांची गरिबांविषयी तळमळ व लोककल्याणकारी वृत्ती दिसून येते.

पुढे काय घडलं? पुढे अशी परिस्थिती निर्माण झाली त्यांच्याच राजधानीच्या नजदीक काही राजे होते त्यांना असे वाटले की अहिल्याबाई स्त्री आहेत. त्यांचं राज्य आता कुमकुवत झालय, सासरे गेले, मुलगा गेला त्यामुळ कुमकुवत झालयं राज्य, त्यांच्यावर आपण आक्रमण करूया त्यांच्यावर आक्रमण करण्याचा विचार त्यावेळी काही पेशव्यांच्या सरदारांनी केला. ही बातमी अहिल्याबाईंच्या कानावर आली. तुकोजी होळकरांनी बातमी सांगितली की पेशवे आपल्यावर आक्रमण करत आहेत. त्यावेळेला अहिल्याबाईंनी फार हुशार यचित्रा घेतला. अहिल्याबाई फार पराक्रमी होत्या. आमच्या देवी हत्तीवर बसून तिरंदाज चालवत होत्या. तिरंबाजीमध्ये नेमबाज होत्या. त्यावेळी त्यांनी महिलांची खूप मोठी फौज उभी केली होती. अहिल्याबाईंनी तुकोजीरावांना पेशव्यांना एक पत्र पाठविण्यास सांगितले. पत्रात लिहिले होते, " पेशवे तुम्ही लढायला



कधीपण या आम्ही तयार आहोत पण आमची फौज ही पहिली महिलांची आहे आणि महिलांच्या फौजे बरोबर तुम्हाला लढायला लागेल. विचार करा जर महिलांच्या फौजेने तुम्हाला जर हारवलं तर तुमची काय अवस्था होईल. पेशव्यांना सांगितले की तुमचे नाव इतिहासात काय होईल. हे पत्र वाचल्यानंतर पेशवे घाबरले व पेशव्यांनी पत्राला उत्तर दिले की आम्ही तुमच्यावर आक्रमण करण्यास आलोच नाही. आम्ही तर तुमचे सांत्वन करण्यास आलो आहे. इतक्या हुशारीने ही लढाई अहिल्याबाईनी जिंकली.

अहिल्याबाईचे हे सर्व कार्याची दखल घेऊन राज्य शासनाने अहमदनगर जिल्ह्याचे अहिल्यानगर हे नामकरण केले.

आदर्श घ्यावा गुलाबाचा
काट्यातूनही उमलण्याचा
आदर्श घ्यावा कमळाचा
चिखलातूनही उमलण्याचा
आदर्श घ्यावा दिवाकरांचा
आकाशात उंच भरारी घेण्याचा
अन आदर्श घ्यावा अहिल्याबाईंचा
शून्यातूनही विश्व निर्माण करण्याचा...

अशा नारी शक्तीला माझा सलाम..!



॥ श्री ॥

"पदवीधर प्रकोष्ठ व शिक्षक आघाडी,
भारतीय जनता पार्टी
महाराष्ट्र राज्य,"
द्वारा आयोजित,

राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर
यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त

"भव्य राज्यस्तरीय निबंध स्पर्धा"
२०२५.

- स्पर्धकाचे नाव:- रोशन सुरेश भोयर.
- पत्ता :- मु.पो. लखमापुर
  ता. कोरपना
  जि. चंद्रपुर - 442908
- जन्मतारिख :- २३/०८/२००१
- संपर्क :- ८४५९३९६१७१ / ८८०५९६६८५०
- वयोगट :- २१ वर्षापुढील - ④

- निबंध विषय:- अहिल्याबाई होळकर: भारताच्या इतिहासातील तेजस्वी अध्याय.



०२

• पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर. •

"निर्विकल्प जगताची जगत जननी नारी तु ।
पुण्यश्लोक देवी अहिल्या स्त्री साक्षात्कारी तु ॥"

भारतभुमीचा इतिहास हा बहुअंगाने वैविध्यपुर्ण आहे. यांत दिग्विजयी अशा राजा-महाराजांच्या, साधु-संतांच्या वारसा वैशिष्ट्यपुर्ण आहे. ही कथा आहे अशाच एका लोककल्याणकारी, राजमाता, महान विरांगणा, अलौकीक व्यक्तीत्वाची आणि ती म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची.

यंदा त्यांचा त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होतो आहे. याच पावन पर्वावर त्यांचा कार्यकर्तृत्वाचा, जाज्वल्य पराक्रमाचा अध्याय आपण उलगडणार आहोत.

सर्वप्रथम त्यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त त्रिवार अभिवादन करतो व हा माझा शब्दशिल्प निबंध सादर समर्पित करतो.

१८व्या शतकांत भारतातील अधिक स्त्रियांच्या जीवनात सती-प्रथा, बालविवाह, अन्याय-अत्याचार यांसारखा काळोख पसरला होता. समाजातील प्रचलित जाचक रुढी-परंपरांनी समाज विस्थापित झाला होता. अश्याच परिस्थितीत समाजाला दायित्व बहाल करणाऱ्या विरांगणा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी इतिहासात अजरामर आहेत.

हि गाथा आहे, एका अश्याच महाराष्ट्राच्या माथ्यावर उदय पावलेल्या चनगर महाराणीची, ममत्वाने परिपुर्ण लोककल्याणकारी राजमातेची; आणि याच गौरवगाथेचा आरंभ होतो महाराष्ट्रातील एका छोट्याश्या चौंडी या गावापासुन.



03

महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या खेडे गावात माणकोजी शिंदे व सुशिलाबाई शिंदे यांच्या पोटी त्यांचा अलौकिक जन्म झाला. बालवयापासुनच चाणाक्ष, शुर असणाऱ्या अहिल्यादेवींचे बालपण रूढ झाले. वयाच्या आठव्या वर्षी त्यांना माळव्याचे राजे मल्हाररावांनी मंदीरात बघीतले. व त्यांच्या व्यक्तीत्वाच्या प्रभावाने त्यांनी त्यांचा मुलगा खंडेराव यांच्याशी त्यांचा विवाह संपन्न झाला.

माळवा प्रांताच्या अधिपतीच्या त्या सुनबाई होत्या. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे इ.स. १७५४ मध्ये कुंभेरच्या लढाईत धारातिर्थी पडले. आणि अहिल्यादेवींच्या आयुष्यात अंधार पडण्यास सुरुवात झाली. त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांनी त्यांच्या मुलाच्या निधनापश्चात त्यांना सती जाऊ दिले नाही. मल्हाररावांनी गोर-गरीब जनतेसाठी अहिल्यादेवींनर सुरक्षित तर ठेवले खरे. परंतु; नियतीने खंडेरावांच्या मृत्युच्या १२ वर्षानंतर मल्हाररावांचे निधन झाले.

मल्हारराव होळकरांच्या निधनानंतर देवी अहिल्या एकट्या पडल्या. अशातच त्यांनी मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताची सुत्रे हाती घेतली व इतिहासात नवा विक्रम रचला.

देवी अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यकर्तृत्वाच्या सन्मानार्थ इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवींना 'भारताच्या कॅथरीन दग्रेट, एलिझाबेथ, मार्गारेट' असे संबोधले.

अहिल्यादेवी होळकर या न्यायदानासाठी विशेष प्रसिद्ध होत्या. त्यांनी इतिहास नवा घडवत असतांना अनेकाविध घटकांना न्याय प्रदान केलेला होता.



०४

अहिल्याबाईंनी आपल्या सर्वस्वी शासन कार्यात अनेक सुधारणा केल्या. सुधारणांच्या बाबतीत त्यांची कीर्ती अनुपमेय आहे. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, व्यावसायिक आणि सर्वात महत्वाचे धार्मिक क्षेत्रात त्यांची कार्यप्रणाली विशेष सरस होती. त्यांनी अनेक मंदीरांचा जिर्णोद्धार केला. नदीघाट बांधले. आपली राजधानी महेश्वर व इंदुर या शहरांना परिपुर्ण आणि सर्वोत्तम बनवले. अश्यारितीने त्या अनेकांच्या आश्रयदात्या बनल्या.

अहिल्याबाई होळकर या स्वत: स्त्री असुन आपल्या मराठा साम्राज्यातील माळवा प्रांतातील अनेक स्त्रीयांच्या समस्यांना समजुन त्या समस्येचे निराकरण केले. त्यांनी सामाजिक प्रथा असलेल्या सर्वात अमानवी प्रथेला सतीप्रथा म्हणुन प्रचलीत असणाऱ्या प्रथेस विरोध केला.

"रयत, जनता जनार्धन"

यांतत्वावरच त्या लोककल्याणकारी कामे करत राहिल्या. स्त्रीशक्ती संघटीत करुन त्या लढाईस प्रवृत्त करणाऱ्या देवी अहिल्याबाई एकमेव महाराणी होत्या. म्हणुनच रयतेच्या मनावर आणि इतिहासाच्या पानावर देवी अजरामर आहेत.

शेती व शेतकऱ्यांचा उद्धार त्यांनी आपल्या शासन काळात केला. त्यांची गुणग्राहकता व चातुर्यबुद्धी सक्षम होती म्हणुनच अंधश्रद्धा निवारण, न्याय व विकास यांचा मेळ साधण्यात त्या सपशेल यशस्वी ठरल्या.

विस्तृत विचारशक्ती; कार्यप्रती प्रेरणा यांसर्वांगिण गुणवैशिष्ट्यांमुळे अहिल्याबाई आजही स्त्रीशक्तीसाठी प्रेरणा ठरतात.



०५

अदम्य साहस, इच्छाशक्ती व शौर्याच्या जोरावर त्यांनी मावळ प्रांत भक्कम केल्यानंतर अहिल्यादेवी अतिशय कुशल शासन कर्त्या बनल्या. त्यांचा विस्तृत सखोल दृष्टीकोन न्यायप्रिय व कल्याणकारी होता. अहिल्यादेवींच्या आयुष्यात सर्वात मोठे दुःख म्हणजे त्यांची मुलगी मुक्ताबाई हिचे पती यशवंतरावांच्या मृत्युनंतर तीने सती जाणे होय.

मुक्ताबाई सती गेल्यानंतर त्यांच्यावर दुःखाचा उंगर कोसळला. व समस्त रयतेला पोरकं करत, स्वतः पुण्यश्लोक होऊन ती माऊली वयाच्या ७० व्या वर्षी अनंतात विलीन झाली.

लोककल्याणकारी देवी अहिल्याबाईंचा जाज्वल्य पराक्रमाच्या इतिहासातुन न्यायप्रिय व सक्षम प्रशासन दिसुन येते. समस्त स्त्री जातीसाठी प्रेरणा, त्याग व समर्पण बहाल करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाईंना विनम्र अभिवादन....

अशा सर्वगुणाने परिपुर्ण असणाऱ्या प्रजेच्या माऊली महाराष्ट्रात जन्माला येऊन महाराष्ट्राची माती पावन करणं म्हणजे पुण्यवैभवचं...

बलशाली सुसंघटीत अशा राज्याची योग्य ती काळजी घेणे, पतीच्या अकाली निधनाने खचुन न जाता परिस्थितीवर मात करणे, अहिल्या देवी सांगुन जाते.

अशा महान तेजस्वी अध्यायाचा अंत १३ ऑगस्ट १७९५ रोजी झाला. परंतु धनगराची राणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आजतागायत जिवंत आहे. प्रत्येक मराठ्यांच्या हृदयात व इतिहासाच्या सुवर्ण पानांत....

शब्दाक्षरे :- रोशन सुरेश भोयर.



पदवीधर प्रकोष्ठ व शिक्षक आघाडी
भारतीय जनता पार्टी-महाराष्ट्र राज्य आयोजित
राज्यस्तरीय निबंध स्पर्धा- मे 2025
वयोगट क्र.- ४ (२१ वर्षापुढील)

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर- एक आदर्श स्त्री शासिका

स्पर्धकाचे नाव: श्रीम. निता नितीन सावंत
उपशिक्षिका
जि.प.पू. प्राथमिक शाळा शिरशिंगे नं.-१
ता.-सावंतवाडी जि.-सिंधुदुर्ग
मो.नं.- ९४०३०८४७०४



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर
यांच्या 300 व्या जयंती निमित्त
पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पार्टी
आयोजित
राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धा मे 2025
वयोगट क्र.४ - 21 वर्षापुढील

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका

• स्पर्धकाचे नाव - श्रीम. नीता नितीन सावंत
उपशिक्षिका
जि.प.पू.प्रा.शाळा शिरशिंगे नं.१
ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग
पीन कोड ४१६५३१
मो. ९४०३०८४७०४
ईमेल nitasawantswd@gmail.com



"महाराष्ट्र भूमी पवित्र भूमी
पावन भूमी ही वीरांची
साफाट शौर्य गाजविले ज्यांनी
अशा महान रणरागिणींची"

खरोखरच आपली महाराष्ट्र भूमी ही शौर्यशाली परंपरा लाभलेली वीरभूमी आहे. इथल्या मातीचा कण अन् कण पराक्रमाच्या कथा आणि शौर्याच्या गाथांचा साक्षीदार आहे. हा प्रेरणादायी इतिहास महाराष्ट्रासाठी सदैव वंदनीय आहे. महाराष्ट्रभूमीसाठी जणू प्रेरणेचा अखंड झरा आहे. शौर्याचा हा अमूल्य ठेवा समृद्ध अन् सशक्त महाराष्ट्रासाठी जणू तेजोमय ऊर्जास्त्रोत आहे. या पराक्रमी वीरांच्या बरोबरीने शौर्यवान-धैर्यशील वीरांगणांनी इतिहासामध्ये स्वतःच्या कार्यकर्तृत्वाची एक विशेष मोहर उमटविली आहे.

महाराष्ट्रभूमीतील या कर्तबगार स्त्रियांनी, या महान स्त्री राज्यकर्त्यांनी अखंड भारतभूमीला अभिमान वाटावा असे कर्तृत्व गाजविले आहे. आज शेकडो वर्षांनंतरही त्यांच्या कर्तृत्वाची तलवार तळपते आहे. शासन कसे चालवावे अन् राज्य कसे चालवावे याचा आदर्श निर्माण केला आहे भारतभूमीच्या वेलीवरील ही सुगंधी फुले आहेत. या फुलांच्या कर्तृत्वाचा सुगंध आजही दरवळतो आहे. या शृंखलेतील एक पवित्र नाव म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई!

राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जन्मोत्सवाची त्रिशताब्दी साजरी होताना त्यांच्या चरणी आपण विनम्रपणे नतमस्तक होतो. धर्म, करुणा आणि कर्तृत्वाचे प्रतिक असलेल्या राजमाता अहिल्याबाई होळकर म्हणजे दिव्यतेची प्रचिती होय. शेकडो वर्षांपूर्वी एक आदर्श प्रशासन कसे असावे याचा अनुकरणीय आदर्श अवघ्या जगतासमोर ठेवला. या कर्तृत्ववान राजमातांनी केलेले अतुल्य कार्य दिव्यत्वाची प्रचिती देणारे आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर हया एक महान शासिका होत्या.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचा जन्म ३१मे १७२५ साली अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला. ही तेजस्वी महाराष्ट्र कन्या एक महान शासिका म्हणून पुढे संपूर्ण जगतामध्ये ओळखली गेली. एक महान शासिका म्हणून वंदनीय ठरली भारताच्या इतिहासात बळाच्या जोरावर अनेक युद्धे जिंकली गेली. परंतु बुद्धिच्या जोरावर शत्रूला मात देण्याचे कार्य अहिल्यादेवींनी केले आहे. तन, मन आणि धन अर्पून त्यांनी राष्ट्रसेवा केली. पंडित नेहरूंनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथामध्ये लिहून ठेवले आहे की अहिल्यादेवी होळकर या तत्वाशील आणि आदर्श राज्यकर्त्या होत्या.

मराठ्यांच्या इतिहासातील उज्वल स्त्रीरत्न म्हणजे अहिल्यादेवी होळकर असा मराठी संस्कृतीच्या कोशात उल्लेख आहे. लोककल्याणकारी, लोकमाता, लोकसेविका अशी एक ना अनेक बिरुदावले या महान शासिकेला देता येतील. वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह खंडेरावांशी झाला. पतीच्या मृत्यूपश्चात खचून न जाता यांनी उत्तम शासन चालविले. प्रजा हीच आपली संपत्ती आहे असे मानून त्यांनी संपूर्ण राज्याचे पालकत्व स्विकारले. त्यांना रामराज्य निर्माण करायचे होते त्यासाठी त्यांनी आपली सारी दुःखे बाजूला ठेवून रयतेच्या सुखासाठी जीवन वाहिले.

"प्रजाहित साधूनी केला
न्याय निष्ठ, आदर्श राज्यकारभार
रयतेचा उद्धार करताना
झिजल्या चंदनासम अपार"

परकीय आक्रमणाला अहिल्याबाईंनी निकराचा लढा दिला. आपल्या कारकिर्दीत प्रजाहीत कारभार केला. त्यांनी शेकडो मंदिरांचा जीर्णोद्धार केला. अनेक मंदिरे, नदी, घाट, तलाव, अन्नछत्रे, धर्मशाळा यांची उभारणी केली. विशेषत: डोंगर प्रदेशामध्ये तसेच इतर भागामध्ये जनतेला त्रास देणाऱ्या चोर-लुटारूंचा बंदोबस्त केला. शेकडो वर्षांपूर्वी आव्हानात्मक परिस्थितीमध्ये अहिल्याबाईंनी आदर्शवत राज्यकारभार केला.



दरोडेखोरांना चोरी करण्यापासून, दरोडे घालण्यापासून परावृत्त करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर एक समाजसुधारकत्व होत्या. या दरोडेखोरांना त्यांनी पोटापाण्याचा व्यवसाय उपलब्ध करून दिला. हाताला काम दिले. या भिल्ल आणि दरोडेखोरांना जकातनाक्यावर जकात वसुल करण्याचे काम नेमून दिले. या भिल्लातीलच यशवंतला त्यांनी आपली मुलगी दिली. ही कृती त्या काळात निश्चितच क्रांतिकारक होती. भिल्लांचे पुर्नवसन असो वा स्वतःच्या मुलीचा केलेला विवाह असो पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या आधुनिक विचारसरणीच्या तसेच मानवतावादी विचारसरणीच्या शासिका हे अगदी प्रकर्षाने अधोरेखित होते.

सात/बाराचा ७/१२ चा उतारा आपणा सर्वांनाच माहीत आहे. या उताऱ्याचा आरंभ अहिल्यादेवींच्या काळातच झाला. त्यांनी सरकारी खर्चाने प्रत्येक गरीबाच्या दारात फळझाडे लावली. त्यातील सात झाडे त्या गरीबाची आणि पाच झाडे सरकारची असे निश्चित केली. झाडाची जोपासना गरीबानेच करायची. सात झाडांचे उत्पन्न त्या गरीबाचे तर पाच झाडांचे उत्पन्न सरकारचे असा नियम होता. यासाठी स्वतंत्र विभाग तयार केला. दफ्तराची निर्मिती केली. या नोंदणीला ७/१२ असे म्हटले जावू लागले. ही अहिल्याबाईंची देणगी होय

अहिल्यादेवी होळकरांनी सामाजिक बांधिलकी व धार्मिक कार्य यांची सुरेख सांगड घातली. भगवान शंकराच्या निस्सिम भक्त असणाऱ्या अहिल्यादेवींनी अवघ्या भारतात मंदिरांची उभारणी तसेच दुरुस्ती केली. या कामामध्ये दक्षिणेकडील साधने उपलब्ध नव्हती अशा वेळी त्यांच्या धर्मपरायणतेला प्रांताची मर्यादा नव्हती. परकीय आक्रमणात उद्ध्वस्त तीर्थक्षेत्रांचा जिर्णोद्धार त्यांनी केला. मंदिरे, घाट, तलाव अन्नछत्र, धर्मशाळा उत्तम स्थापत्यशैलीत निर्माण केल्या.

"अहिल्यादेवी होळकरांकडे होती दूरदृष्टी
किती वर्णावी त्यांच्या कार्याची महती"



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या केवळ भारतात्च नाही तर संपूर्ण जगात महान कार्याची मोहोर उमटवणाऱ्या महान शासिका होत्या. ब्रिटिश पार्लमेंटने अहिल्यादेवींचा गौरव अठराव्या शतकातील भारतातील सर्वश्रेष्ठ प्रशासिका असा केला आहे. प्रख्यात इंग्रजी कवयित्री जोना बेली यांनी अहिल्यादेवींवर उत्कृष्ट काव्य लिहिले आहे. ज्या काळात स्त्रियांना चूल आणि मूल या बंधनात जखडून ठेवले होते. त्या काळात त्यांनी स्त्रियांची स्वतंत्र सैनिकी फलटण काढली. समान व न्यायाच्या तत्वावर राज्य चालविले.

"एका हाती शिवलिंग, एका हाती तलवार
केला बलवान शत्रूंवरी प्रहार
दीन-दुबळ्यांना देवूनी आधार
अवघ्या जनतेचा केला उद्धार"

देश विदेशातील राजे रजवाडे यांनी ही अहिल्यादेवींचा सदैव आदरच केला. जगभरातील स्त्री राज्यकर्त्यांचा तुलनात्मक अभ्यास करणाऱ्या ब्रिटिश लेखक लॉरेन्स यांनी इंग्लंडची राणी एलिझाबेथ, रशियाची महाराणी कॅथरीना द ग्रेट, डेन्मार्कची महाराणी महाराणी मार्गारिट यांच्यापेक्षाही अहिल्यादेवी होळकर सर्वश्रेष्ठ राज्यकर्त्या होत्या असा उल्लेख केला आहे. 'माझे कार्य प्रजेला सुखी करण्याचे आहे' अशी धारणा होती. अशी प्रतिज्ञा ज्यांनी केली त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे कार्य अजरामर आहे.

भारताची महान संस्कृती व सुशासनाचा एक नवीन मापदंड अहिल्यादेवींनी निर्माण केला. असामान्य कर्तृत्व गाजविले. सगळ्या पशुपक्ष्यांच्या आहाराची सुविधाही त्यांनी केली. त्यांच्या काळात साहित्य, कला, संगीताला राजाश्रय मिळाला. कारागिर, मूर्तिकार विणकरांना, सन्मान व वेतन दिले जाई. महेश्वरची माहेश्वरी साडी आजही सुप्रसिद्ध आहे. इथला विणकर व्यवसाय अहिल्यादेवींमुळेच बहरला. शिस्तबद्ध कवायती फौज करून त्यांनी इंग्रजांना शह दिला.



होळकरांचे राज्य हे एक संपन्न राज्य होते. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना खाजगी जंगली कोश होता. या संपत्ती कोषातूनच विविध लोककल्याणकारी कामे केली. अनेक प्रकारच्या कौटुंबिक संकटांना सामोरे जात असतानाही स्वतःचे दुःख मनात लपवून ठेवत त्यांनी राज्याचा कारभार केला. कर्तव्यात तसूभरही कसर केली नाही. कर्ती पुरुष हयात नसतानाही राज्याची जबाबदारी समर्थपणे सांभाळणाऱ्या स्त्री शक्तीचे, स्त्री सामर्थ्याचे हे सर्वोत्तम उदाहरण आहे.

राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे सतरावे जीवनचरित्र म्हणजे जणू धगधगता अंगारच आहे. दीन-दुबळ्यांची आई म्हणजे अहिल्यादेवी होय. अहिल्यादेवींची राष्ट्रनिष्ठा पाहूनच त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांनी राज्यकारभाराची सूत्रे अहिल्यादेवींच्या हाती दिली होती. अनेक बलशाली शत्रू समोर असताना अहिल्यादेवींनी धैर्याने तोंड दिले. त्याचबरोबर जनतेच्या कल्याणासाठी स्वतःचा वाहून दिले संपत्तीचा. तसूभरही मोह नसणारी ही रणरागिणी होती. त्याचबरोबर पर्यावरणाच्या संवर्धनासाठी अनेक योजना राबवित्या.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी जनतेच्या कल्याणासाठी अथक प्रयत्न केले. सर्वच क्षेत्रात भरीव कामगिरी केली. जो काळ पुरुष शासकांसाठी आव्हानात्मक होता. त्या काळात अहिल्यादेवींनी केलेले कार्यकर्तृत्व अचंबित करणारे आहे. त्यांनी केलेले कार्य हे जणू ईश्वरी कार्यच होते. असे म्हटल्यास वावगे ठरू नये. एक सुखी, संपन्न लोकराज्य घडविण्यासाठी त्यांनी अतुलनीय कार्य केले. अशा या आदर्श शासिका म्हणजे धर्म, करुणा आणि कर्तृत्वाच्या प्रतिक आहेत. अहिल्याबाई म्हणजे दिव्यतेची आणि नेतृत्वाची जिवंत मूर्ती! त्यांच्या कर्तृत्वाचा नाद अखंड गुंजत राहणारा आहे.

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
दुष्ट प्रवृत्तींच्या होत्या नाशक
प्रजाहिताचे अतुल्य कार्य करत
बनल्या जगतातील महान शासक"



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर हया एक मुलसंदी शासिका होत्या, त्यांच्या प्रत्येक हेतूमागील अंतिम हेतू हा जनतेचे हित साधणे आणि राज्याचे सामर्थ्य वाढविणे हाच असे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी हया एक धुरंधर शासनकर्त्या होत्या. अहिल्यादेवींच्या राज्यात न्यायनिष्ठतेला अनन्यसाधारण महत्त्व होते. त्यांच्या न्यायदानाच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत. आजही आजच्या परिस्थितीतही मार्गदर्शक आहेत. आदर्श न्यायदान कसे असावे हे अहिल्यादेवींनी केलेल्या अनेक न्यायदानांच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. एका राज्याच्या प्रमुखाने कसे न्यायदान करावे याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर होय.

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या राज्यातील प्रत्येक घटकाचा उपयोग राज्याच्या प्रगतीसाठी कसा करून घेता येईल, याचा सदैव विचार केला. ज्यामुळे राज्याचे सामर्थ्य निश्चितपणे वाढत गेले राज्यात शांतता, समता आणि सुबत्ता वाढीस लागली. आपल्या राज्यातील भिल्लांच्या सामर्थ्याचाही त्यांनी असाच सुयोग्य वापर केला.

भिल्ल चोरी करून हरोडे घालून जनतेला त्रास देत असत. अशा वेळी अहिल्यादेवी आणि या भिल्लांचा म्होरक्या 'गणपत' यांची चर्चा झाली. गणपत म्हणाला, "कि आम्हांला आमच्या चरितार्थ चालविण्यासाठी या कृती कराव्या लागतात." अशा वेळी अहिल्यादेवींनी भिल्ल कर लावला. भिल्लांची दहशत असणाऱ्या भागातून जाणाऱ्या वाटसरांवर हा कर लावला गेला. या करातील ७५% भाग भिल्लांना तर २५% भाग राजकोषात जमा होई. तसेच भिल्लांच्या सर्व शक्तीचा उपयोग राज्यासाठी होईल असेही निश्चित केले. पुढे अहिल्यादेवींनी या भिल्लांची भिल्ल पलटण बनविली.

"संरक्षण दिधले भिल्ल बांधवाला
त्यातून निर्मिले भिल्ल पलटणीला"



शिल्प बांधतांना शंकराला देव त्यांना तारणार राजमाता अहिल्यादेवींनी राज्याभिषेक करून दिलता. त्यांनी शासनाचे बल वाढविण्यासाठी शिल्पांच्या सामर्थ्याचा विनियोग करून दिलता. राज्य कसे करावे हे पुण्यश्लोक अहिल्यादेवींकडूनच शिकावे याचे हे ज्वलंत उदाहरण सांगता येईल. शिल्पांना योग्य न्याय मिळाला, त्यांना चरितार्थ चालविण्याचे साधन तर प्राप्त झालेच त्याचबरोबर त्यांच्या शूरतेचा, बळाचा सुयोग्य तारणार राज्यासाठी करता आला. एवढी दूरदृष्टी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांसारख्या आदर्श स्त्री शासिकेकडेच असू शकते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर म्हणजे भारतीय मातृशक्तीचे एक सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे. अहिल्यादेवी आज केवळ महाराष्ट्रात नाहीत तर संपूर्ण भारतभरामध्ये वंदनीय आहेत. ज्या माळवा प्रांतामध्ये त्यांनी राज्य चालविले त्या माळवा प्रांतामध्ये त्यांचा उल्लेख 'मातोश्री' असा अत्यंत आदराने केला जातो. सर्वांच्या मनामध्ये, हृदयामध्ये या महाराणीने अत्यंत जिव्हाळ्याचे, आदराचे स्थान मिळविले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या समस्त भारतीय महिलांच्या मान, सन्मान व अभिमानाच्या प्रतिक आहेत.

"अहिल्यादेवींचे कार्यकर्तृत्व होते महान
समकालिन शासकांनीही दिला त्यांना सन्मान"

अहिल्यादेवींनी त्यांच्या समकालीन शासकांवर मनोराज्य गाजविले होते. सर्व राजे-महाराजे त्यांना सन्मान देत असत. हैदराबादच्या निजामाने 'आप हमारी बडी आपा है' असे अहिल्यादेवींना सांगितले होते. शत्रू राजासत्ता त्यांना मानत असत. पेशव्यांना त्यांना पत्र लिहिले की मी दोघीला आपल्या घरात घेणार नाही आणि घराच्या बाहेरही देवणार नाही.' असा करारी बाणा अहिल्यादेवींचे वेगळेपण जपतो. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर म्हणजे भारताच्या वैभवशाली इतिहासातील सुवर्णपानच होय.



राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे महान कार्य गतेंत प्रेरणादायी आहे. महाराष्ट्र सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या सन्मानार्थ अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलून 'अहिल्यानगर' असे ठेवले आहे. खरं तर हा त्या नगराचा - जिल्ह्याचा सन्मान आहे. धन्य ही महाराष्ट्रभूमी जिथे पुण्यश्लोक अहिल्यादेवींसारखे महान स्त्रीरत्न जन्माला आले. ज्या स्त्रीरत्नाने आपली जननी आन् जन्मभूमीचे नाव उज्वल केले. या महाराष्ट्रभूमीचे ऋण फेडले.

या महाराष्ट्रभूमीत राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या रूपाने स्त्री शक्तीला जणू अमरत्वच प्राप्त झाले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर म्हणजे या महाराष्ट्रभूमीचा जणू मानबिंदूच आहे. राजनितिमध्ये त्या पारंगत होत्याच पण त्याचबरोबर एक अत्यंत कनवाळू राजमाता होत्या. न्यायदान करताना स्वकिय, परकिय असा भेदभाव त्यांनी कधीच केला नाही. निःपक्षपातीपणे न्यायदान केले. सुशासन निर्माण करण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न अन् साहसात्मक प्रसंग व घटनांचा सामना केला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे महान चरित्र, सुशासनाची कार्यपद्धती जाणून घेणे ही आजच्या काळाची गरज आहे. अहिल्यादेवींची जीवनतत्वे जर का आपण समजून घेतली, आत्मसात केली आणि त्याप्रमाणे कृती केली तरच हा महाराष्ट्र घडेल. खऱ्या अर्थाने विकसित होईल. सक्षम भारत घडवता येईल. व्यक्तिसन्मानातूनच राष्ट्रसन्मान वृद्धिंगत होईल, सुशासनाची एक सर्वोत्तम परिभाषा घडविणाऱ्या अहिल्याबाई विश्ववंदनीय आहेत. एक आदर्श स्त्री शासिका आहेत.

"सुशासनाला दिशा दिली ज्यांनी
एक नवीन दिशा
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
एक आदर्श स्त्री शासिका"



Page:

भाजपा शिक्षक आघाडी व पदवीधर प्रकोष्ठ महाराष्ट्र प्रदेश

यांच्या संयुक्त विद्यमाने

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त

भव्य निबंध स्पर्धा

वयोगट ४ : २१ वर्षापुढील

निबंधाचा विषय :⇒ अहिल्याबाईंचे जीवनचरित्र: त्याग, पराक्रम आणि लोककल्याण

सहभाग :⇒ श्री. प्रशांत रमेश पाटील
प्लॉट क्र. ३८ औदुंबर कॉलनी,
दोंडाईचा
ता. शिंदखेडा जि. धुळे 425408
मो. क्र. 7020433812
9420834039



Page :

अहिल्याबाईंचे जीवनचरित्र : त्याग, पराक्रम आणि लोककल्याण

ज्या मनगटात बळ, बुध्दी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तृत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो. असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो. अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर. सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता, उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री-पुरुष समानता, गोरगरिबांविषयी कळवळा, हुंडा पध्दतीचे उच्चाटन, अनिष्ट चालीरीती रुढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारणांचे कृतिशील कार्य हाती घेणाऱ्या व पुर्णत्वास नेणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म दि. ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा खेडेगाव धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला.

माणकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतील असूनदेखील ते विद्वान व दूरदर्शी गृहस्थ होते. अठराव्या शतकामध्ये आजसारख्या शिक्षणाची विविध साधने उपलब्ध नसतानादेखील त्यांनी अहिल्येच्या शिक्षणाची घरीच व्यवस्था केली. अहिल्यामातेचे जीवन घडविण्यात त्यांचा फार मोलाचा वाटा होता. अवघ्या आठ वर्षांची असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांचा बारा वर्षांचा एकुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहिल्याचा विवाह २० मे १७३३ रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला.

लग्नानंतर लगेच आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांची मने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहिणे, वाचणे, गणित इत्यादी महत्वाच्या गोष्टी शिकवल्या, तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युध्दाचे



व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे, न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्येची सामाजिक व राजकीय बुध्दी परिपक्व झाली.

इ.स. १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याचा शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असूनही सती जाणे तहकूब करण्यात अहिल्याबाईंनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु आपण जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा लोककल्याणकारी विचार करून अहिल्याबाईंनी प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म, रूढी, परंपरा यापलीकडे जगण्याचा निर्णय घेतला. रयतेला कल्याणकारी राज्य दिले.

मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर २९ वर्षे अत्यंत यशस्वीपणे स्व-या कल्याणकारी योजना काय असू शकतात. त्या कशा राबवल्या जाव्यात या त्यांनी दाखवून दिल्या. सासरा मल्हारराव यांचा मृत्यू २० मे १७६६, मुलगा मालेराव यांचा मृत्यू २७ मार्च १७६७ मध्ये झाला. अशी एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईंनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्वाप्रमाणे राज्य केले.

पेशवा रघुनाथराव याला होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा लोभ सुटला. त्याने पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेऊन इंदोरवर चढाई केली. हे वृत्त अहिल्याबाईंना कळताच खचून न जाता त्यांनी रघुनाथरावांना खलिता पाठविला त्या म्हणतात "आपण माझे राज्य हिरावून घेण्याचे कपट रचून आलात आमच्याकडील फितूरास गाठले. मला दुबळी समजलात की खुली ६ दुःखात बुडालेल्यास अधिक



बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतू! आता आपली गाठ रणांगणात पडेल! माझ्याबरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल मी हरले तर कीर्ती करून जाईल. पण आपण हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. मी अबला आहे असे समजू नका. मी खांदयावर भाले घेऊन समोर उभे राहिले तर पेशव्यांना माशी पडेल. वेळ पडली तर हत्तीच्या पायी साखळीही बांधून तुमचे स्वागत न केले तर होळकरांच्या सुनेचे नाव लावणार नाही."

अशा मुत्सद्दी अहिल्या म्हणजे लढवैय्या समशेर आणि लखलखती वीज होती. त्यांनी आपलं आयुष्य लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न घालता संपूर्ण भारतात कार्य केलेले आहे. संपूर्ण भारतात अनेक विहिरी, तलाव, कुंड, घाट बांधले आहेत. रस्ते, पूल निर्माण केले आहेत. जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते ते काम लोकमाता अहिल्याबाईंनी केले. उद्योगधंद्यांना व त्याच्या विकासाला प्राधान्य दिले.

मल्हारराव यांच्या मृत्यूनंतर इंदोर वरून संस्थानाची राजधानी महेश्वर येथे आणून कारागीर, मजूर, विणकर, कलावंत, साहित्यिक अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, पैसा, घर इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या. आजही महेश्वरी साड्या, पैठणी, धोतर प्रसिद्ध आहेत. राज्यात पशुपक्षी यांना चरण्यासाठी त्यांनी कुरणे राखवली. मुंग्यांना साखर, माशांना कणकेचा गोळा, उन्हाळ्यात वाटसरूंना पाणी पिण्यासाठी पाणपोया, हिवाळ्यात गरजूंना गरम कपडे यांची सोय केली. आपल्या राज्यात सूक्ष्म जीवही उपाशी राहू नयेत यासाठी दक्षता घेतली. दिव्यांग, अनाथ व असहाय्य लोकांचे पुनर्वसन केले. गोरगरिबांसाठी अन्नछत्रे चालविली. वस्त्रांचे वाटप केले. प्रवाशांसाठी मार्गावर अरण्यमय प्रदेशातही आंबराई, वृक्षारोपण, बगीचे, विश्रांतीसाठी ओटे व धर्मशाळा बांधल्या.



Page:

घाट बांधताना केवळ तज्ञांची मते विचारात न घेता प्रत्यक्ष त्या भागातील स्त्रियांना बोलून घाटाच्या पाय-या कशा असाव्यात, कपडे धुताना बाळ कुठे ठेवायला सोयीस्कर पडेल, कपडे बदलताना खोल्या कुठे असाव्यात इ. इतक्या बारीक तपशिलासह घाट बांधून दिले.

सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे, मशिदी, दर्गे व विहार बांधली. तर काही मंदीरांचा जिर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. मजुरांना काम मिळाले व सर्व जाती, धर्मचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाई ह्या समाजसुधारक होत्या. त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवता-धर्म. प्रजेवर जास्त करांचा बोजा न लादता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोगसुद्धा लोककल्याणासाठी केला. अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या.

१८९९ मध्ये जोआना बेली याने लिहिलेली इंग्रजी कविता मराठी भाषांतरातील....

"तीस वर्षांपासून तिचे शांतीचे राज्य,
आशीर्वाद देणारी जमीन वाढली;
आणि प्रत्येक जिभेने तिला आशीर्वादित केले,
कठोर आणि सभ्य, वृद्ध आणि तरुण द्वारा.
होय, अगदी त्यांच्या आईच्या पायाशीच मुले
अशा घरगुती यमक पुन्हा पुन्हा करायला शिकवले जातात
"नंतरच्या दिवसांत ब्रह्मांकडून आले,
आमच्या भूमीवर राज्य करण्यासाठी, एक खानदानी बाई,
दयाळू तिचे हृदय होते आणि तिची ख्याती चमकत होती,
आणि अहिल्या हे तिचे सन्माननीय नाव होते."



Page:

शहाणपणा, चांगुलपणा आणि सद्गुण यांचे उत्कृष्ट उदाहरण देणारी महान मराठा महिला. अहिल्याबाई ही स्त्री सार्वभौमांपैकी आहेत. निश्चितपणे कोणतीही स्त्री आणि कोणताही शासक हा अहिल्याबाई होळकरांसारखा नाही.

अशा लोकमाता, राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन....!

संकलन
श्री. प्रशांत रमेश पाटील
7020433812



नाव - पायल यश शहा
वयोगट - ४ : २१ वर्षापुढील
पत्ता - गुरु गणेश कॉम्प्लेक्स, वसंत टॉकीज रोड, माळीवाडा, अहिल्यानगर, ४१४००१
संपर्क - ९२७०११२२२३

विषय : पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.

"इतिहासाने पानोपानी जिची गाईली गाथा।
होळकरांची तेजस्वी ती पुण्यश्लोक अहिल्या माता!!

भारतातील कर्तबगार स्त्रियांपैकी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या एक होत. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी नावाच्या छोट्याश्या खेड्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव माणकोजी शिंदे आणि आईचे नाव सुशीला शिंदे. माणकोजी हे खूप अभ्यासू होते, म्हणूनच त्यांनी अहिल्याबाईंना नेहमीच पुढे जाण्याची ताकद, प्रोत्साहन दिले. त्यावेळी महिलांना शिक्षण दिले जात नव्हते, पण, माणकोजींनी आपल्या मुलींना शिक्षण दिले. त्या बालपणीच घरात वाढल्या. त्या दयाळू होत्या.

वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांच्या बारा वर्षांच्या एकुलत्या एक शूरवीर मुलाशी म्हणजे खंडेराव यांच्याशी अहिल्याबाईंचा विवाह २० मे १७३३ रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला. पुढे त्यांना दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी



देखील पुरूषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहिणे, वाचणे, गणित इ. गोष्टी शिकवल्या. तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे, न्यायनिवाडा करणे इ. प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्याबाईंची सामाजिक व राजकीय बुद्धी परिपक्व झाली.

इ.स. १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याचा शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे असे असूनही त्यांनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून त्यांनी प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला. धर्म, रूढी, परंपरा यापलीकडे कर्तव्य महत्त्वाचे मानून रयतेला कल्याणकारी राज्य दिले.

मल्हारबांचा मृत्यू २० मे १७६६ मध्ये झाला. एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईंनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्वाप्रमाणे राज्य केले. अहिल्याबाईंना आज लोक देवीचा अवतार मानतात. त्यावेळी त्यांनी भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांवर मंदिरे बांधली, तिथे जाण्यासाठी रस्ते बांधले, विहिरी आणि पायऱ्या बांधल्या. याच कारणामुळे काही टिकाकारांनी त्यांना अंधश्रद्धाळूही म्हटले आहे. त्यांनी माळव्याला शांतता आणि



समृद्धी दिली. त्यांनी समाजातील वाईट रूढी व परंपरा नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. बालविवाह आणि सतीप्रथा यांसारख्या रूढींविरुद्ध आवाज उठवला. त्यामुळे लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले. त्यांचे हे कार्य आजही प्रेरणा देत आहे.

"त्यागनाही बाज वाटावी शतका महान त्याग,
तुझ्या त्यागाने जागा झाला आम्हा लेकरांचा स्वाभिमान."

शत्रुला रणांगणात पराभूत करायच्या आधी मनात पराभूत करायच हे मानसशास्त्र अहिल्यादेवींना माहित होतं. न्यायासनावर बसून त्या सर्व प्रकरणे स्वतः एकत आणि निवाडा देत असत. त्यांनी राज्य कारभार आणि सामाजिक कार्यामध्ये एक आदर्श निर्माण केला. महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व ओळखले आणि त्यासाठी प्रयत्न केले, तसेच मागासलेल्या घटकांना मदत केली. त्या कला आणि संस्कृतीच्या महान संरक्षक होत्या. त्यांनी संगीतकार, कलाकार आणि विद्वानांना पाठिंबा दिला, अशा प्रकारे एक चैतन्यशील सांस्कृतिक वातावरण निर्माण केले.

अहिल्याबाईंच्या काळात महेश्वर हे त्यांच्या राजधानी च शहर आणि होळकर घराण्याचं सांस्कृतिक केंद्र बनलं. त्यांनी हिंदू-मुस्लिम एकतेचं उदाहरण आपल्या शासनातून दिलं. त्या केवळ एक शासिका नव्हत्या, तर एक धर्मनिष्ठ आणि समाजसेविका देखील होत्या. त्या नेहमी गरीब, शेतकरी आणि विधवांच्या मदतीसाठी तत्पर असत. त्यांनी अनेक प्रमुख धार्मिक स्थळांच्या विकासासाठी आणि पुनर्स्थापनेसाठी योगदान दिलं. काशी विश्वनाथ मंदिर, सोमनाथ मंदिर, अनेक घाटांचं पुनरुज्जीवन करण्यात त्यांचा मोठा मोलाचा



वाटा आहे.

माळवा प्रदेशातील त्यांच्या जलव्यवस्थेच्या कामामुळे दुष्काळ आणि पाण्याचा अभाव दूर झाला. त्या आपल्या कामात पूर्णपणे समर्पित होत्या आणि त्यांच्यावर आत्मविश्वास होता. त्यांनी आपल्या नेतृत्वाखाली होळकर राज्य प्रगतीपथावर नेले. स्वतःच्या खाजगी मालमत्तेतून त्या लोककल्याणकारी सुविधा देत. शुकेलेल्या लोकांसाठी अन्न छत्र सुरु केले. लोकांच्या सोईसाठी पत्र व्यवहारासाठी टपाल व्यवस्था, शेतकऱ्यांसाठी वी भरण्याची व दुष्काळ निवारण व्यवस्था, व्यापाऱ्यांसाठी सुविधा, कामगारांसाठी उद्योग धंदे, स्त्री-पुरुष भेदभाव मिटवण्यासाठी महिलांना समानतेचे हक्क, स्त्रीयांना सैनिकी शिक्षण देण्याची व्यवस्था, वाचन कक्ष, ग्रंथालयाची व्यवस्था केली. स्त्रिला दत्तक घेण्याचे व संपत्ती सांभाळण्याचे अधिकार दिले. त्या काळात मुस्लिम राजे देखील अहिल्याबाईंचा सल्ला घेत होते, त्यांचा सन्मान करत होते. रशौस्च्या महाराणीने संपूर्ण भारतात त्या सुविधा देवून भारतातील मराठी साम्राज्याची सम्राज्ञी अहिल्याबाई बनल्या. त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन!

अहिल्याबाई त्या आधुनिक भारतासाठी एक प्रेरणादायी नेतृत्व आहेत. त्यांच्या आदर्शांचं आणि कार्याचं स्मरण करून आपण आपल्या समाजात न्याय, समानता आणि लोककल्याणाच्या मूल्यांची जोपासना केली पाहिजे. देशाचं कल्याण करण्याचा संकल्प आपण आज करुयात. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊयात. त्या प्रेरणादायी गोतेचे स्वप्न आपण पूर्ण करुयात...

"अहिल्याबाई होलकर एक विचार नहीं, अपितु एक विचारधारा हैं।
नमन है देवी स्वरूपा को,
भारत का कण-कण, जिनका गाता जयकारा है...।"



अहिल्याबाईचं जीवनचरित्र
त्याग, पराक्रम आणि लोककल्याण

"राण्या असंख्य झाल्या या जगात,
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्व जिचा आहे या मराठी हृदयाला,
एकच ती महाराणी राजमाता आहिल्याबाई"

ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तृत्वार लोकाभिमुख राजा बनु शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो आशा लोकमाता आहिल्याबाई होळकर. सर्वधर्मसमभाव अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, गोरगरिबांच्याविषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट चालीरीती रुढी परंपरांचा बिमोड, मुलं दत्तक तारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता आहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी आहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशिलाबाई शिंदेयांच्या पोटी झाला.

माणकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतील असुन देखील ते विद्वान व दुरदर्शी गृहस्थ होते. अठराव्या शतकामध्ये आजच्यासारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना देखील त्यांनी आहिल्येला शिक्षणाची घरीच व्यवस्था केली. आहिल्या मातेचे जीवन घडवण्यात त्यांचा फार मोलाचा वाटा होता. अवघ्या आठ



वर्षाची असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांचा बारा वर्षाचा एकुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहिल्याचा विवाह 20 मे 1733 रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला.

लग्नानंतर आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांचे मने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दुरदृष्टी ठेवुन मल्हाररावांनी पुरुषप्रदान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहणे, वाचणे, गणित इ. गोष्टी शिकवल्या तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे, न्यायनिवाडा करणे इ. प्रशिक्षण दिले परिणामी अहिल्येची सामाजीक व राजकीय बुद्धी परिपक्व झाली. इ.स. 1754 मध्ये कुम्भरेच्या लढाईत अहिल्याचा शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या 29 व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रुढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारुन त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहित असुनही सती जाणे नाकारुन अद्वितिय मनोधैर्य दाखविले. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे, परंतू जगलो तर लाखो प्रजा जनांना सुख देता येईल असा विचार करुन अहिल्याबाईने प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म, रुढी, परंपरा यापेक्षाकडे कर्तव्य महत्वाचे मानुन स्वतेला कल्याणकारी योजना काय असु शकतात आणि त्या कशा राबवल्या जाव्यात हे त्यांनी दाखवून दिले. सासरे मल्हारराव व पती खंडेराव या दोघांचा एका पाठीमागुन एक मृत्यु झाले

असतानाचे दुःख अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता आहिल्याबाईंनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्त्वाप्रमाणे राज्य केले.

पेशवा रघुनाथराव राघा होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा भोग्म सुटला. त्याने पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेऊन इंदौरवर चढाई केली. हे वृत्त तेजस्विनी आहिल्या बाईला कळताच खचुन न जाता त्यांनी रघुनाथरावांना खलिता पाठविला.

त्या म्हणतात, आपण माझे राज्य हिशवुन घेण्याचे कपट रचुन आलात आमच्याकडील फितुरास गाठले. मला दुबळी समजलात की खुनी? दुःखात बुडालेल्यास अधिक बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतु? आता आपली गाठ रणांगणात पडेल! माझ्याबरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल मी हरले तर किर्ती करुन जाईल. पण आपण हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. मी अबला आहे असे समजु नका. मी खांद्यावर भाले घेऊन समोर उभे राहिले तर पेशव्यांना भारी पडेल. वेळ पडली तर हत्तीच्या पायी साखळीशी बांधुन तुमचे स्वागत न केले तर होळकरांच्या सुनेचे नाव लावणार नाही."

मुत्सद्दी आहिल्या म्हणजे तळपती समशेर आणि चमचमती वीज होती. त्यांनी आपल्या आयुष्य लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न घालता संपुर्ण भारतात कार्य केले आहे. संपुर्ण भारतात अनेक विहरी, तलाव, कुंड, घाट बांधले आहित. रस्ते, पुल निर्माण केले आहित, जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते ते काम लोकमाता



आहिल्याबाईने केले. उद्योगधंद्यात व त्याच्या विकासाला प्राधान्य दिले. इंदौर तरुन संस्थानाची राजधानी महेश्वर या ठिकाणी आणुन कारागीर, मजुर, विणकर, कलावंत, साहित्यिक अशी गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, पैसा, घर इ. सोयी उपलब्ध करुन दिल्या. आजही महेश्वरी साड्या, पैठणी, धोतर प्रसिद्ध आहेत. राज्यात पशुपक्षी, पाळीव जनावरे यांना चरणासाठी त्यांनी कुरणे राखली. मुक्यांना साखर, माश्यांना कणकेचा गोळा, उन्हाळ्यात वाटसरुंना पिण्यासाठी पाणपोया, हिवाळ्यात गरजूंना गरम कपडे यांची सोय केली. आपल्या राज्यात सुक्ष्म जीवही उपाशी राहु नये यासाठी दक्षता घेतली. दिव्यांग, अनाथ व असहाय्य लोकांचे पुनर्वसन केले. गोरगरिबांसाठी, अन्नछत्रे व सदावर्ते चालवली. वस्त्रांची वाटप केले प्रवाशांसाठी मार्गावर अभयरण्य प्रदेशात आंबराई, बगीचे, वृक्षारोपण, विश्रांतीसाठी ओटे व धर्मशाळा बांधल्या. नदीवर घाट बांधताना प्रत्यक्ष त्या भागातील स्त्रियांना बोलावून घाटाच्या पायऱ्या कशा हव्यात इतक्या बारीक गोष्टींचा विचार करुन घाट बांधुन घेतले

सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे, विहार बांधली. तरकाही मंदिरांचा आणि काशी विश्वेश्वर मंदिराचाही जीर्णोद्धार केला. रस्ते व दळणवणासाठी सोयीमुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. मजुरांना काम मिळाले व सर्व जाती धर्माचे लोक एकमेकांजवळ येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे यासोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. आहिल्याबाई हया समाजसुधारक होत्या. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवताधर्म. प्रजेवर जास्त करांचा बोजा न लावता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतः चा खर्च



मर्यादित करून त्याचा उपयोग सुद्धा लोककल्याणा साठी केला. अशी एक विद्यारक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या. या वर्षी आहिल्याबाई होळकरयांची ३००वी जयंती संपूर्ण भारतात साजरी केली जाते आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन .....!

"धर्म, करुणा आणि कर्तृत्वाचे प्रतीक म्हणजे
राजमाता आहिल्याबाई होळकर!"

नाव- शर्विल नितिन राजमाने.
शाळेचे नाव- श्री.सेवागिरी विद्यालय पुसेगाव.
इयत्ता- ६ वी
वयोगट- ८ ते १२ वर्षे (प्राथमिक गट)
मोबाईल नंबर- ९९०९१९२९९
ई-मेल- nitinsrajmane@gmail.com



नाव - अनन्या अमोल सुरवसे
इयत्ता - तिसरी
शाळेचे नाव - ब्रम्हचैतन्य इंग्लिश मिडियम स्कुल
स्कुल तांदुळवाडी
पत्ता - मु.पो. तांदुळवाडी, ता. माळशिरस
जि. सोलापुर



अहिल्याबाई होळकर

मधुर होती जिची वाणी,
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी....
शाश्वत्या जिने दिशा दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला
खरंच सीमा नाही.

अहिल्याबाई होळकर एक अतिशय दानशुर कर्तृत्ववान धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती होत्या. यांचा जन्म 31 मे 1725 रोजी अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावी झाल्या. त्यांच्या वडिलांचे नाव माणकोजी शिंदे तर आईचे नाव सुशीलाबाई असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. त्याकाळी स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसताना ही त्यांच्या वडीलांनी त्यांना लिहण्या-वाचण्यास शिकवले होते.

त्यांच्या विवाह वयाच्या 8 व्या वर्षी माळवा प्रांताचे सुभेदार मल्हारराव यांचा पुत्र खंडेराव यांच्याशी झाला. पुढे काही वर्षांत त्यांचे पति, मुलगा आणि वडिलांप्रमाणे असणारे सासरे यांचा मृत्यू झाला आणि अहिल्याबाईकडे राज्यकारभाराची जबाबदारी आली.

त्यांनी 28 वर्षे राज्यकारभार अतिशय सुंदर व कुशलपणे चालवला. शत्रु देखील त्यांच्याबद्दल आदर बाळगत असेल. त्यांनी आपल्या शासनकाळात आपल्या साम्राज्याचा विस्तार केला, लोककल्याणकारी कामे केली. त्यांनी अनेक महिला विरोधी प्रथांचा विरोध केला. अहिल्याबाईंनी अनेक धार्मिक स्थळांचे निर्माण कार्य पूर्ण केले व अनेक किल्ले, विश्रामगृहे, विहिरी आणि रस्त्यांची निर्मिती केली.



Page No.
Date

देवतांची प्रतिष्ठापणा तसेच धर्मशाळा बांधणे, अन्नछत्रे चालविणे या लोकोपयोगी अहिल्याबाई आपल्या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी आपल्या असामान्य कर्तृत्वाने रयतेची मने जिंकली, महिलांची स्वतंत्र प्रशिक्षित सेना उभी केली, कारागिरांना, मुर्तिकारांना व कलाकारांना सन्मान दिला, शेतकऱ्यांना गाई देऊन मोठ्या प्रमाणात "गो" पालन घडवून आणले.

अशा प्रजाहितकारिणी, शिवयोगिनी देवी अहिल्या यांचा मृत्यू 13 ऑगस्ट 1795 रोजी झाला.

आहेस तू आमची
पुण्यश्लोक राजमाता
इतिहासातील महिली
महिला राज्यकर्ती!



नाव - रचित दिपक सातपुते
वय - ८ वर्ष
वर्ग - ३री
शाळा - डी. डी. विसपुते
गांव / शहर - देवद / पनवेल.

निबंधाचा विषय - पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर - आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व

आधुनिक भारताच्या इतिहासातील एक प्रेरणादायी व महत्वपुर्ण व्यक्तिमत्व आणि राज्यकारभारातील 'लोकमाता' आणी 'न्यायदेवता' अशी ज्यांची ओळख होते. अशा 'राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर' यांचा जन्म ३१ मे इ. स. १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी (मन्हारपीठ) येथे झाला. अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले. एवढ्यच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक क्षेत्रात आखल, प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला.

अहिल्याबाई होळकर या राजघराण्यातील राणी होत्या. त्यांनी १८ व्या शतकात माळवा प्रांतावर राज्य केले. त्यांच्या राज्यकारभारात त्यांनी प्रजेचे कल्याण, सामाजिक न्याय, प्रगतीशील सुधारणा यांवर भर दिला. त्यांनी सैन्याचे नेतृत्व केले. अहिल्याबाईंनी विधवा उत्पीडन आणि जातीगत भेदभाव यासारख्या सामाजिक समस्यांविरुद्ध आवाज उठवला. त्यांनी मंदिरे, घाट, विहिरी आणि शैक्षणिक संस्था बांधल्या. ज्यामुळे लोकांच्या जीवनात सुधारणा झाली.

अहिल्याबईना पुण्यश्लोक का म्हणातात्तर पुण्यश्लोक हा असा शासक आहे जो लोकाना सर्व प्रकारच्या वंचितापासुन मुक्त करतो. त्यांनी आपल्या कार्यक्षमतेने आणि नेतृत्वाने केवळ होळकर संस्थानाचेच नव्हे, तर संपुर्ण देशाचे मार्गदर्शन केले. २० मे १७९५ रोजी आलमपूर येथे त्यांचे निधन झाले. अशा या लोकमातेला, न्यायदेवतेला, राजमातेला कोटी कोटी प्रणाम....



Page No.
Date

नाव :- स्वरा संदीप फराक्टे
शाळेचे नाव :- केंद्रशाला दिंडेवाही.
इयत्ता :- ७वी

अहिल्याबाई होळकर एक-आदर्श शासिका आणि जनतेची माय

ज्या मनगटात बल, बुध्दी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर. सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, गोरगरिबांच्या विषयी कळवळा, हुंडा पध्दतीचे उच्चाटन, अनिष्ट चालीरीती रूढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला.

सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे, मशिदी, दर्गे व विहार बांधली. तर काही मंदीरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. मजुरांना काम मिळाले व सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुर सोबत स्वत:च्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाई हया समाजसुधारक होत्या. त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे माणवता धर्म. अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन..!

Sulekha



25/05/30 18:49

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

मराठ्यांच्या इतिहासामध्ये अनेक पराक्रमी सरदार होऊन गेले. पण स्त्री व्यामधील अहिल्याबाई होळकर यांचे नाव आजही अनेकांच्या तोंडावर आहे. अहिल्याबाईंना 'पुण्यश्लोक' असेही म्हणतात. कारण त्यांनी केलेले सामाजिक कार्य आजही अनेकांसाठी आदर्शवंत असेच ठरले आहे.

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. त्याकाळी स्त्री शिक्षण फारसे प्रचलित नसताना ही त्यांच्या वडीलांनी त्यांना लिहिण्या-वाचण्यास शिकवले होते.

अहिल्याबाई होळकर यांचा विवाह बाजीराव पेशवे यांचे एक सरदार मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव यांच्याशी झाला. मल्हारराव होळकर हे मावळा प्रांताचे जहागीरदार होते. अहिल्याबाई होळकर यांचे पती खंडेराव होळकर इ.स. १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर अहिल्याबाई होळकर यांचे सासरे मल्हारराव होळकर यांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही.

मल्हारराव होळकर यांचा १२ वर्षानंतर म्हणजेच २० मे १७६६ रोजी आलमपूर येथे एका मोहिमेतर असताना त्यांना मृत्यूने गाठले. सासरे मल्हारराव होळकर यांच्या मृत्यूनंतर मराठा साम्राज्याच्या मावळा प्रांताचा कारभार अहिल्याबाई होळकर बघू लागल्या त्यांच्या पश्चात अहिल्याबाईंनी आलमपूरचे नाव बदलून मल्हारनगर केले आणि तेथे त्यांची छत्री उभी केली. अति दक्षतेने अहिल्याबाई होळकर यांनी २८ वर्षे राज्यकारभार चालविला शत्रू देखील त्यांच्याबद्दल आदर बाळगत असत. मंदिरांची पुनर्बांधणी, जीर्णोद्धार, देवतांची प्रतिष्ठापणा तसेच घाट-रस्ते, धर्मशाळा बांधणे, अन्नछत्रे चालविणे यालोकोपयोगी कामांमुळे संपूर्ण भारतभर अहिल्याबाईंचे नाव अजरामर झाले आहे. एकदा चोंडी गावात थोरले बाजीराव पेशवे यांच्या सैन्याचा तळ पडला होता. सीना नदीच्या काठी असलेल्या एका देवालयात दर्शनासाठी म्हणून छोटी अहिल्या आपल्या आईबरोबर गेल्या होत्या. तेथे नदीच्या वाळूत खेळतांना अहिल्येने वाळूचे एक शिवलिंग बनविले. तेवढ्यात सैन्य दलातील एकाचा घोडा उधळला उधळलेला घोडा आपल्याच दिशेने येत असल्याचे पाहून अहिल्याबरोबरच्या मैत्रिणी घाबरून पळून गेल्या.



मात्र अहिल्या मुळीच डगमगली नाही. तीने आपण तयार केलेल्या शिवलिंगावर पालथे पडून शिवलिंगाचे रक्षण केले.

तेवढ्यात पाठीमागून आलेल्या श्रीमंतांनी शोध्याशा जबरेच्या आवाजात अहिल्येला म्हटले की; पोरी तुला घोड्याने तुडवले असते तर? त्यावर अहिल्याबाई आपले डोळे श्रीमंतावर रोखत म्हणाली की; हे शिवलिंग मी घडविले आहे व आपण जे घडविले आहे त्याचे प्राणपणाने रक्षण करावे असे शोरली माणसे सांगतात. मी तेच केले आहे तिचे बाणेदार उत्तर ऐकून श्रीमंत तर खूश झालेच परंतु त्यांच्याबरोबर असलेले सरदार मल्हारराव होळकर यांनी छोट्या महिल्येला आपली सून करून घेतली. अहिल्याबाईंनी देखील मल्हाररावांचा निर्णय सार्थ ठरविला. व होळकर घराण्याची कीर्ती सर्वदूर पसरवीली. अहिल्याबाई होळकर या आचरणाने अत्यंत पवित्र स्वभावाने स्वाभिमानी, दक्ष व धर्मकारणात सर्वस्व दानी होत्या. अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्या स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्त्या होत्या. त्यांनी आपल्या असामान्य कर्तृत्वाने जनतेचीच मने जिंकली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्याबाई यांचे निधन झाले.

धन्यवाद ...

नाव:आराध्या मिलिंद देवकते
शाळेचे नाव: जि.प.शाळा नं.१ कुपटोली
इयत्ता: ५ वी
वय:११ वर्षे
जिल्हा:सांगली
तालुका:कवठे महांकाळ
मो.नं:9766771537



नाव - चव्हाण कृष्णा सागर
इयत्ता - ५ वी
शाळेचे नाव - सविता रमेश फिरोदीया प्रशाला
विषय - अहिल्यावाईचे जीवनचरित्र [त्याग , पराक्रम ,लोककल्याण]
वय - ११
फोन नं - ९०१०८८३९३३
गट - प्राथमिक गट
पत्ता - इंदिरानगर नगर दौंड रोड केडगाव अ नगर



* अहिल्याबाईंचे जीवनचरित्र *
* [त्याग, पराक्रम, लोककल्याण] *

मधुर होती जिची वाणी
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी...
गाजवल्या जिने दिशा दाही
तिच्या अत्तुंग कार्याला
खरच सीमानाही

अहिल्याबाई होळकर एक अतिशय दानशूर कर्तृत्ववान धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती होत्या. यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्यातील चौंडी या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव माणकोजी शिंदे तर आईचे नाव सुशिलाबाई असे होते. त्या विवाह वयाच्या ८ व्या वर्षी माळवा प्रांताचे सुभेदार मल्हारराव होळकरांच्या पुत्र खंडेराव यांच्याशी झाला. पुढे काही वर्षांत त्यांचे पति, तरुण मुलगा आणि वडिलांप्रमाणे असणारे सासरे यांच्या तीघांचा मृत्यू झाला आणि अहिल्यांकडे राज्यकारभाराची जबाबदारी आली त्यांनी २८ वर्षे पेक्षा ही अधिक काल राज्यकारभार अतिशय सुंदर व कुशलपणे चालवला. आपल्या कालात त्यांनी अनेक्या युद्धात प्रभावशाली रणनिति आखत सैन्याचे कुशल नेतृत्व केले. अहिल्याबाईंनी अनेक धार्मिक स्थळांचे निर्माणकार्य पूर्ण केले व अनेक किल्ले, विश्रामगृहे, विहिरी आणि रस्त्यांची निर्मिती केली. भगवान शंकराची नित्यपुजा केल्याशिवाय पाण्याचा शेंबदी न घेण्याला अहिल्याबाई न्यायदानाचे काम करताना आपल्या हातात शिवलिंग घेऊनच न्यायदान करायच्या. अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात अमरझाले. त्याला त्यांची धर्मपरायण आणि उदारवृत्ती कारणीभूत ठरली. बाई काय राज्य कारभार करणार ही दरबारी मंडळीची अटकळ त्यांनी भपटोल खोटी ठरविली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांच्या जुना दिवाण गंगाधार यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता.

होता तीचा वशरा
साम्राज्या ही पन्नास
गरिबांची होती ती आय
जशी दुधावरची साय ।



शघोबादादांशी त्यांनी अहिल्याबाई विरुद्ध संधान बांधले आणि इंदूर बळकावण्यासाठी त्यांनी सोत्साहित केले. अहिल्याबाईंना हे कळले तेव्हा त्या युद्धास्तव तयार असल्याचे त्यांनी शेघोबादादास कळविले. शेघोबांना ते अडचणीचे झाले. हरलो तर बाईकडून हरलो आणि जिंकलो तरी बाईशी युद्ध करण्यात कोणती मोठी मर्दुमकी शेवटी शेघोबांना माघार घ्यावी लागेल. त्यांना उत्तम पहुपचार अहिल्याबाईंनी इंदुशज केला. अशा रितीने बाईच्या बौद्धिकात आणखीच भर पडली.

आहिल्याबाई एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. करपद्धती सौम्य केली; मात्र शेतकऱ्याकडून साग घेणे चालू ठेवले. पाटिल - कुलकर्ण्यांच्या वतन हक्कांचे संरक्षण करून गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. त्यावेळी होणार सुलजावून भिल्ल व गोंड आदिवासी प्रवाशांना उपद्रव देत आणि त्यांच्याकडून भीलकवडी नावाचा कर वसूल करीत.

निर्माण केला होता तिने सातबारा,
माफ केला साऱ्या शेतकऱ्यांचा बोतसारा.

आहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा व वुर्मिळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्मा, मुहुर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्मा इत्यादी ग्रंथाच्या हस्तालिखित प्रती होत्या. विद्वानांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मानसन्मान दिला जाई. मोरोपंत व शाहिर अनंत फंदी यांचा अहिल्याबाईंनी आदर सत्कार करून अनंत फंदीस सल्लाही दिला आणि तमाम शिरीपासून परावृत्त केले.

अखेरच्या दिवसांत दुःख आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांचे दोन भाऊ वारले. मुलीचा मुलगा नाथोबा ऐन तारुण्यात गेला (१७९०) तुकोजी होळकरांची सून आनंदीबाईचे हेहवसान झाले.

कर्तृगबार स्त्री तू चालविला माळव्यांचा कारभार,
तुझ्या अफाट वानधर्मानि झाला देवतांचा उद्धार पुण्यश्लोक
तुझ्यापुढे माझे नतमस्तक होती,
धर्मनिरपेक्ष नमन तुझ चरणी... हे अहिल्याआई



त्यानंतर जावई यशवंतराव फणसे अचानक गेले आणि मुक्ताबाई सती गेली. अशा विकट परिस्थितीत शिंद्यांचा सरदार गोपाळराव त्याने १७९२ मध्ये होळकरांच्या फौजेवर हल्ला केला. तेव्हा तरुणासही लाजवील अशा तडफदारीने त्यांनी शिंद्यांचा पराभव केला. त्यांच्या राज्यात सुबत्ता संपन्नता व शांती होती. त्या अजातशत्रु होत्या ; पण राज्यावर गुदरलेल्या संकटांना त्यांनी योग्य उत्तर दिले.

"पुण्या असंख्य झाल्या या जगात,
पण पुण्य श्लोक कोणीही नाही,
गर्व जीचा आहे या मराठी हृदयाला,
एकच ती महाराणी अहिल्यादेवी
होळकर झाली."

॥ धन्यवाद ॥



"अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य..."

ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर. सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, गोरगरिबांना विषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट चालीरीती रूढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला.

माणकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतील असून देखील ते विद्वान व दूरदृष्टी गृहस्थ होते. अठराव्या शतकामध्ये आजच्या सारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना देखील त्यांनी अहिल्येला शिक्षणाची घरीच व्यवस्था केली. अहिल्या मातेचे जीवन घडविण्यात त्यांना फार मोलाचा वाटा होता. अवघ्या आठ वर्षांची असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांचा बारा वर्षांचा एकुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहिल्याचा विवाह २० मे १७३३ रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला.

लग्नानंतर लगेच आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांची मने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबारची भोडी मराठी लिहिणे, वाचणे, गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या. तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्येची सामाजिक व राजकीय बुद्धी परिपक्व झाली.

मल्हाररावांच्या मृत्यूनंतर इंदोर वरून संस्थानची राजधानी महेश्वर या ठिकाणी आणून कारागीर, मजूर,



विणकर, कलावंत, साहित्यिक अशा गुणी [illegible]
विकासासाठी जमीन, पैसा, घर इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या. आजही महेश्वर साडया, पैठणी, धोतर प्रसिद्ध आहेत. राज्यात पशुपक्षी यांना चरण्यासाठी त्यांनी कुरणे राखली.

मुंग्यांना साखर, माश्यांना कणकेचा गोळा, उन्हाळ्यात वाटसरूंना पिण्यासाठी पाणपोया, हिवाळ्यात गरजूंना गरम कपडे यांची सोय केली. आपल्या राज्यात सूक्ष्म जीवही उपाशी राहू नयेत यासाठी दक्षता घेतली. दिव्यांग, अनाथ व असहाय्य लोकांचे पुनर्वसन केले. गोरगरिबांसाठी अन्नछत्रे व सदावर्ते चालविली. वस्त्रांचे वाटप केले. प्रवाशांसाठी मार्गावर अरण्यमय प्रदेशांतही आंबराई, बगीचे, वृक्षारोपण विश्रांतीसाठी ओटे व धर्मशाळा बांधल्या. घाट बांधताना केवळ तज्ञांची मत विचारात न घेता प्रत्यक्ष त्या भागातील स्त्रियांना बोलून घाटाच्या पायऱ्या कशा हव्यात, कपडे धुताना बाळ कुठे ठेवायला सोयीस्कर पडेल, कपडे बदलताना खोल्या कुठे असाव्यात? इतक्या बारीक तपशिलासह घाट बांधून घेतले.

" राण्या असंख्या झाल्या या जगात,
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्व जिचा आहे या मराठी हृदयाला
एकच ती महाराणी
राजमाता अहिल्याबाई... "

नाव - श्रीतेज सदाशिव फाले
वयोगट - 09 -
वय - 10 - 8 ते 12 वर्ष
शहर - सिंधुदुर्ग - 416612
पत्ता - मु. पो. कट्टा ता. देवगड
जि. सिंधुदुर्ग - 416612
निबंधाचा विषय - अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य.

दिनांक - 27-05-2025



Name :- Pratap Samadhan khot
School name :- Lotus English School
Subject :- Rajmata Ahilyabai Holkar Glorious History of women power
Class :- Std 4th Date :- 25 May 2025

Rajmata Ahilyabai Holkar Glorious History of women power

India is a land of brave warrior and nobk' rulers and among them Rajmata Ahilya bai Holkar hald a spetial place. She is remembers as one of the greatest and just queens in India History. she was shining example of women power (stree shakti) courage and wisdom.

Ahilyabai Holkar was born on 31st May 1725 in the village of chondi in Maha-shtra From ayoung age she showed the intelligence, kindness and bravery. she married khanderao Holkar, the son of Malharrao Holkar a noble in the marath Empire. After the tragic death of her husband and son. Ahilyabai bravely took charge of the administration of Malwa kingdom.

A ruler, she was known For her people. She build roads, wells, temple, dharamshalas (resting places)



For travelers Ahilyabai is espacially Famous For reconstructing the kashi vishwanath in Temple in varanasi & renovating many other holy places like, somnath, Dwarka, Gaya.

Ahilyabai Holkars life is an ispiring story of Strength courage good governance she is perfect example of how a women can manage both family and king with equal sucess. she is loving rembered as Rajmatha Ahilyabai, the mother of the people.

Her legacy teaches us the women power can shine brightly and guide generation Her life is truly a glorious chapter in the history of India".



Name :- Samyak Nitin Ghodke
Std :- 7th
School Name :- mateshree kamalbai vispute English medium school, Kuwarbaw. Ratnagiri.

* Rani Ahilyabai Holkar: The triveni sangam of Justice, devotion and Administration. *

Ahilyabai Holkar one of the India's most revered queen, left an indelible mark on Indian history. Ahilyabai Holkar was born on 31 may 1725 in the village of chondi in the Ahmednagar district in maharashtra. Her father mankoji Rao shinde, was the patil of village. on that time girls didn't go to school. But, Ahilyabai's father tought her to read and write.

Ahilyabai's life took a dramatic turn when she was spotted by malhar Rao holkar the commander of peshwa Bajirao, while she was feeding the poor and hungry people at a time. And he decided to marry his son, khanderao holkar to her. They married and she became the part of the holkar's family.



Ahilyabai's life was very challengeable. After few years the khanderao was killed in battle in 1754. so she decided to perform sati, a practice where a widow sacrificing herself by burning on her husband's dead body. However, her father in-law, malhar Rao Holkar stop him form taking this extreme step.

After malhar Rao's death, in 1766. Ahilyabai's son, male Rao, became the ruler but unfortunately died within eight months. The peshwa Allow Ahilyabai to rule the holkar lands herself, and she went on to become one of the most beloved and respected rulers of her time.

Rani Ahilyabai's Administration was marked by justice, mercy, and compassion. She sat daily in open durbar listening to her people's complaints or problems and giving out Justice without any parlity. Her policies promoted peace, prosperity and stabilty and her capital maheshwar became a hub of musical and artistic pursuits.

Rani Ahilyabai's devotion to her faith and people was evident in her numerous charitable endeavors. she built hundreads of temples, dharmashalas and well, throughout India including the famous Kashi



vishwanath temple in varanasi. Her generosity extended beyond her kingdom, with annual donations to various places of Hindu pilgrimage. Looking to she's work the famous poet 'mankank vishnoi' write a poem on it. "This poem captures the essence of Ahilyabai Holkar's remarkable leadership and legacy":

"A model woman, queen Ahilyabai
An embodiement of Justice always
devoted to her people's welfare.
The story of her bravery is an
indelible part of India's glory."

Her legacy extends beyond her kingdom's borders. Ahilyabai's influence on Indian culture, architeature and art continues to inspire generations. The maheshwari saree, known for it's distinctive patterns and vibrant colours, remains on enduring testament to her cultural patronage. Her approach to governance was rooted in compassion and wisdom, qualities that earned her the love, respect of her people.

As queen, she fearlessly fought agnist notorious Thugs, leading her army into battle and earning a lendary reputation for her wartime exploitis. one of Ahilyabai's most significant achievements



was her commitment to justice.

Rani Ahilyabai's reign is often cited as an example of benevolent and effective governance. Her polices were progressive for the time, particularly in areas such as women's right and education. As we reflect on Ahilyabai Holkar's life and achievement, we are reminded of the enduring impact of her legacy, which continues to shine brightly guiding us towards a brighter future.

The great fighter Rani Ahilyabai Holkar was died on 13 August 1795 at the age of 70. Ahilyabai holkar's remarkable journey, marked by her unwavering commitment to justice, devotion and administration, continues to inspire and motivate people to strive for excellence and make a positive impact on society.

"Countless tributes to this remarkable queen, Rani Ahilyabai Holkar."



नाव - आदिती गुणाजी कदम
शालेचे नाव - जि. प. प्रा शाळा नेपतगाव.
इयत्ता - सहावी
वय - १२

॥ अहिल्याबाई होळकर ॥

ज्या व्यक्तीच्या मनगटात सामर्थ्य, बुद्धिमत्ता आणि कुशलता आहे, तोच स्वतःच्या कर्तृत्वाने प्रजेच्या हृदयात स्थान मिळवुन लोकप्रिय आणि प्रजाहितदक्ष राजा बनू शकतो. असा प्रेरणादायी संदेश देणाऱ्या आणि भारताच्या इतिहासात स्वर्णाक्षरांनी नाव कोरणाऱ्या अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या कार्याने समाजाला नवी दिशा दिली.

सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यतेचे निर्मूलन सामाजिक एकता स्त्री-पुरुष समानता, गरीब-दुबळ्यांबिषयी करुणा, हुंडा प्रथेचे उच्चाटन अनिष्ट रूढी-परंपरांचा नाश मुल दत्तक घेण्याचा वारसा आणि प्रजेच्या कल्याणासाठी सतत तळमळ यासारख्या अनेक समाजसुधारणांचे क्रांतिकारी कार्य त्यांनी केले. अहिल्याबाईचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्हातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा गावात धनगर समाजातिल माणकोजी शिंदे आणि सुशीलबाई यांच्या पोटी झाला.

"मधुर होती जिची वाणी, अशी जन्मली
तत्वज्ञानी, गाजवल्या जिने दिशा
दाही, तिच्या उत्तुंग कार्याला खरंच
सीमा नाही



माणकोजी शिंदे हे सामान्य आर्थिक परिस्थितीचे असले तरी अत्यंत विद्वान, दूरदृष्टीचे आणि प्रगल्भ विचारांचे गृहस्थ होते. अठराव्या शतकात, जेव्हा शिक्षणाची साधने अत्यंत मर्यादित होती, तेव्हा त्यांनी आपल्या मुलीला, अहिल्येला, घरीच शिक्षणाची व्यवस्था करून दिली. त्यांनी तिच्या बौद्धिक आणि नैतिक विकासावर विशेष लक्ष दिले, ज्यामुळे अहिल्याबाईंच्या जीवनाला एक भक्कम पाया मिळाला.

त्यांच्या या प्रयत्नांचा अहिल्याबाईंच्या व्यक्तीमत्वाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा होता. अवघ्या आठव्या वर्षी, 20 मे 1733 रोजी, पुण्यातील शनिवारवाड्यावर होळकर यांचा एकुलता होता. घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकर यांचा एकुलता एक शूरवीर मुलगा बाराव्या वर्षी असलेला खंडेराव, याच्याशी अहिल्याबाईंचा विवाह संपन्न झाला.

विवाहानंतर अहिल्याबाईंनी आपल्या चतुर, संयमी आणि शांत स्वभावाने होळकर कुटुंबातील प्रत्येकाचे मन जिंकले. त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई ही दोन अपत्ये झाली. मल्हारराव होळकर यांनी दूरदृष्टी ठेवून, त्या काळातील पुरुषप्रधान संस्कृतीच्या मर्यादांना झुगारून, आपल्या सुनेचे शिक्षण आणि प्रशिक्षण यावर विशेष लक्ष दिले. त्यांनी अहिल्याबाईंना मोडी लिपीत मराठी लिहणे:



Ahilyadevi Holkar: A Beautiful Blend Of Justice, Devotion & Good Governance


Ahilyadevi Holkar was a great queen of the Malwa region in India. From childhood, she was wise, kind, and thoughtful. Even after the death of her husband and father-in-law, she bravely took charge of the kingdom.

Ahilyadevi was very fair and just. She would sit in court every day, listen to people's problems, and give fair decisions. She always helped the poor, farmers, and women.

She was deeply devoted to God. She built many temples, water tanks, and resting places for travelers. She also helped rebuild important holy places like Kashi, Gaya, Somnath, and Dwarka.

As a ruler, she lowered taxes, improved roads and water supply, and encouraged trade. Because of her, the kingdom became rich, peaceful, and strong. Ahilyadevi believed in development and welfare. She lowered taxes so that people could live peacefully. She built roads, improved the water supply. Under her rule, trade and agriculture flourished. Her capital, Maheshwar, became a center of culture, architecture, and prosperity.

She was a visionary and a people's queen. She never craved power or luxury, but saw ruling as a responsibility towards her people.



Every today, Ahilyadevi Holkar is remembered as an ideal ruler, a great mother, a wise administrator, and a deeply religious soul. Statues, roads, and awards have been named in her honor. The Indian government even issued a stamp to pay tribute to her legacy.

Her life teaches us that true greatness lies not in birth or wealth, but in character, service, and leadership.

"Power was never her aim; Service was her Mission."

Name:-Swara Sunil Aldar

Number of age group - 1

Location:- trimurti vandan D-wing 304 room no. Nr green valley devad-vichumbe new-panvel



विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव : हंसिता संदेश किणी

इयत्ता : ४ थी अ

शाळेचे नाव : श्री. स. कु. कदम विद्यालय पालघर



विषय :- पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर (३१ मे, १७२५-१३ ऑगस्ट, १७९५, राज्यकालावधी इ.स. १७६७-इ.स. १७९५) या भारतातील, मालव्याच्या तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली. मल्हारराव यांनी त्यांना प्रशासकीय व युद्धाच्या कामात प्रशिक्षण केलेले होते. त्या आधारानं अहिल्याबाईंनी इ.स. १७६७ ते इ.स. १७९५, मृत्युपर्यंत मालव्यावर राज्य केले होते.

होळकर यांचा जन्म ३१ मे इ.स. १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी (मल्हारपीठ) येथे झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्याचे शिक्षण दिले होते. मल्हारराव होळकर मुख्याला जाताना चौंडीस थांबले होते. आख्यायिकेनुसार, ८ वर्षाच्या अहिल्यादेवींना मल्हाररावांनी पाहिले. देवळात बाहेर खेळणाऱ्या मुलींशी आपुलकीने त्यांनी चर्चा केली, स्वतःचा मुलगा खंडेराव यांची ओळख करून दिली.

मल्हारराव होळकरांचा हा मुलगा होता. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे इ.स. १७५४ साली कुंभेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर काही मल्हाररावांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. १२ वर्षांनंतर, मल्हारराव होळकर हेही मृत्यू पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा

FOR EDUCATIONAL USE



कारभार बघू लागल्या. त्या लढाईत अहिल्यादेवी स्वत: रणांगणी हजर राहिल्या. मुद्दे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी शासनकाळात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले. एवढेच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक दृष्ट्या आघाडीवर असलेल्या हिंदू मंदिरांचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले या. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांना प्रामुख्याने समावेश आहे. अहिल्याबाईंना प्रजेस न्याय्यतत्त्वाने असे काम करण्याची आवड होती.

FOR EDUCATIONAL USE



Vedha
Zero to Zenith...

Date : _____ Page : _____
Topic : _____

पुण्यश्लोक
अहिल्याबाई
होळकर
यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त
राज्यस्तरीय भव्य
निबंध स्पर्धा

आयोजक : पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता
पार्टी महाराष्ट्र राज्य

नाव : सुजित बसलिंग लांडगरकर

शाळा : श्री केशवराज माध्यमीक विद्यालय
लातूर

विषय : अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील
कार्य

वर्ग : ८ वी

मो. नं. : 9881397830 / 9604484833



Vedha
Zero to Zenith...

Date : _____ Page : _____
Topic : _____

अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य

महाराष्ट्रातील चौंडी, तालुका जामखेड, जिल्हा नगर हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान। याच गावात ३१ मे १७२५ या दिवशी अहिल्यादेवी यांचा जन्म झाला. पुढे सुभेदार मल्हारराव होळकर यांचे पुत्र यांच्याशी वयाच्या ८ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला. अहिल्याबाई बालपणापासूनच चाणाक्ष, तल्लख आणि कुशाग्र बुद्धीच्या होत्या।

खंडेराव राज्यकारभाराकडे अजिबात लक्ष देत नव्हते; पण अहिल्याबाईंनी कधीही गाऱ्हाणे न करता सासरे मल्हारराव यांनी सोपवून दिलेल्या कामात लक्ष घातले कुशाग्र बुद्धीची देणगी लाभलेल्या सूनबाई अहिल्याबाई यांच्यावर सासरे मल्हारराव होळकर यांचा मोठा विश्वास होता. पुष्कळ महत्त्वाचा पत्रव्यवहार ते अहिल्याबाई यांच्यावर सोपवत होते. अहिल्याबाईंना वयाच्या २८ व्या वर्षी वेदोळ्याला सामोरे जावे लागले. कुंभेरीच्या लढाईत ~~[illegible]~~ पती खंडेराव मरण पावले. त्या वेळी सासरे मल्हारराव अहिल्याबाईंना म्हणाले, "माझा खंडूजी गेला म्हणून काय झाले? तुझ्या रूपाने माझा खंडूजी अजून जिवंत आहे. तू सती जाऊ नकोस" अहिल्याबाईंनी ते ऐकले आणि मल्हाररावांनी



Vedha
Zero to Zenith...

Date : _____ Page : _____
Topic : _____

अहिल्याबाईंच्या हाती सत्तेची सूत्रे दिली.

मल्हारराव होळकर यांचे वर्ष १७६६ मध्ये निधन झाले. त्यानंतर अहिल्याबाईंवर मोठे उत्तरदायित्व आले. अहिल्याबाई यांचे पुत्र मालेराव यांना जरी सुभेदारची वस्त्रे मिळाली होती, तरी ती सांभाळण्याचे त्यांच्यात धाडस नव्हते. लवकरच त्यांचेही देहावसान झाले. अहिल्याबाई तेव्हा खऱ्याअर्थाने राज्यकर्त्या झाल्या. पुढील ३० वर्षे त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सेवेच्या सहकार्याने अतिशय कुशल रित्या चालवला. राज्याच्या तिजोरीत भर घालत त्यांनी प्रजाहिताकडे जातीनिशी पूर्वक लक्ष दिले. अहिल्याबाईंचा मूळ स्वभाव सौम्य असला तरी राज्यकारभारात त्या तत्वनिष्ठ आणि कठोर होत्या. हे त्यांनी मनकुपसिंह सारख्या कुविख्यात डाकूला फाशी देऊन दाखवून दिले.

अहिल्याबाई यांनी पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. करपद्धती सौम्य केली; मात्र शेतकऱ्याकडून कर घेणे चालू ठेवले. गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. त्या वेळी डोंगर मुलखातून भिल्ल आणि गोंड आदिवासी हे प्रवाशांना उपद्रव देत असत. त्याच्याकडून "भिलवाडी" नावाचा कर वसूल करत. तेव्हा अहिल्याबाईंनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांचा कर घेण्याचा अधिकार मान्य केला.



Vedha
Zero to Zenith...

Date : _____ Page : _____
Topic : _____

त्यांच्याकडून पडिक भूमीची लागवड करून घेतली, तसेच त्यांना विशिष्ट सीमा नेमून दिली आणि भूमी कसर पट्ट्याने देण्याची पद्धत चालू केली.

अहिल्याबाई यांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी राज्याची राजधानी इंदूरहून नर्मदा नदीच्या तीरी महेश्वर या ठिकाणी हालवली. वर्ष १७७२ मध्ये त्यांनी अनेक वास्तू बांधल्या. नदीला घाट बांधले. मंदिरांचा जीर्णोद्धार केला. अहिल्याबाईंनी वस्त्रोद्योगास चालना दिली. कोष्टी लोकांची वसाहत स्थापन केली आणि उत्तम हातमागाची सगळे (उंची वस्त्रे) बनतील, अशी पेठ कायम केली.

अहिल्याबाईंनी अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, जेजुरी, पंढरपूर, ऋषिकेश, गया, उदयपूर आणि चौंडी येथे मंदिरे बांधली. यासह सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर मल्लिकार्जुन, औंढा नागनाथ, काशी विश्वेश्वर, विष्णुपद, महाकालेश्वर, आदी मंदिरांचा जीर्णोद्धार केला. वाराणसी प्रयाग, पुणताबे, चौंडी, नाशिक, जाब, त्र्यंबकेश्वर येथे नदीला विस्तीर्ण घाट बांधले आणि गोकर्ण महाबलेश्वर, उज्जैन, रामेश्वर, भीमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उघडली. यात्रेच्या ठिकाणी घाट, बाग, मंदिरे, कुंड, धर्मशाळा बांधून यात्रेकरूंची सोय केली.



Name - Honey Trivendra Singh
Age - 12
Grendex - Female
Class - 6th C.B.S.E
School name - Shri ~~Bhupsheb~~ Bapusaheb D.D. Vispute Primary English school

City - Panvel
Contact No. - 7021725065 / 6395140668
Email ID - Kushwahtrivenkumar@gmail.com
Preferred language for competition - English
Topic selected - Ahilyabai Holkar's works in Social Reform



DATE:

Ahilyabai Holkar's Work in Social Reform

Ahilyabai Holkar, the 18th-century queen of Malwa, was a pioneering figure in social reform. Her work had a profound impact on the social fabric of her kingdom. She promoted women's empowerment, education, and social welfare. Ahilyabai worked tirelessly to eradicate social evils like sati and female infanticide.

The queen's social reform initiatives were multifaceted. She built schools, hospitals, and public utilities, improving the quality of life for her subjects. Ahilyabai also supported farmers, traders, and artisans, promoting economic growth and social stability. Her emphasis on justice and equality earned her widespread respect.

Ahilyabai's legacy continues to inspire social reformers and leaders today. Her work serves as a testament to the power of effective governance and social responsibility. The queen's commitment to social reform was ahead of her time, showcasing her progressive thinking and compassion.

Ahilyabai's story teaches us valuable lessons about the importance of social welfare, education, and women's empowerment. Her work reminds us that even small actions can make a significant difference in people's lives. As we reflect on her legacy, we are inspired to work towards creating a more just and equitable society.

By promoting social reform, Ahilyabai Holkar left a lasting impact on her kingdom and its people. Her story continues to motivate us to strive for a better future, where everyone has access to education, healthcare, and equal opportunities.

FOR EDUCATIONAL USE

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

"पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र राज्य, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या 300 व्या जयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा."

- निबंध स्पर्धा :-
- निबंध स्पर्धेच्या स्पर्धकांचे नाव :- कु. देशना हितेशजी कांकरिया. (वय :- 7 वर्षे)
  नाथ व्हॅली स्कुल,
  छत्रपती संभाजीनगर.
  मो.न. :- 9403537744.
  8149966001 -
- निबंध स्पर्धेचा विषय :-

'अहिल्याबाई होळकर :- न्याय, शक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम'.

अभिमान वाटावा स्त्री जातीला, जाणीव म्हणुन जन्म घेतला. आम्हा मुलींना कर्तृत्ववान अहिल्याबाईचा वारसा लाभला आहे. मराठ्यांच्या इतिहासामध्ये अनेक पराक्रमी सरदार होऊन गेले, पण त्यामधील अहिल्याबाई होळकर यांचे नाव आजही अनेकांच्या तोंडावर आहे. अहिल्याबाईंना 'पुण्यश्लोक' असेही म्हणतात. कारण त्यांनी न्याय, शक्ती आणि प्रशासनामध्ये केलेले सामाजिक कार्य आजही अनेकांसाठी आदर्शवंत ठरले आहे. अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले. एवढंच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणुन औद्योगिक क्षेत्र आखले. प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला. म्हेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळ्यांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे, बांधकाम केले. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैद्यनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

वेरावळ येथील सोमनाथाचे हाजनीच्या महंमदाने उध्वस्त केलेले देऊळ बघुन अहिल्यादेवींनी शेजारीच मुक शंकराचे मुक देऊळ बांधले. सोमनाथाला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईना प्रजेच्या [illegible] आवड होती. पूर्वीच



द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य आहिल्या-बाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. आहिल्यादेवी, सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत. पेशव्यांनी परवानगी दिल्यावर ज्या माणसाने त्यांना विरोध केला होता, त्यास चाकरीत घेऊन तुकोजीराव होळकर (मल्हारराव यांचा दत्तक पुत्र) यांस सैन्याचा मुख्य करून, आहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. अहिल्यादेवींनी पडदाप्रथा कधीच पाळली नाही. त्या शेवट जनतेचा दरबार भरवीत असत. त्यांचे ऐकून होत न्यायनिवाडा करीत असत.

अशी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती. नंतरही इंदूर या खेड्याचा विकास करून त्यांचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे हे आहिल्यादेवींनी केलेले फार मोठे काम होते. त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले. हिंदू धर्मामध्ये कायमस्वरूपी पूजा सुरू राहावी म्हणून अनेक दाने दिली. माळव्याबाहेरही त्यांनी मंदिरे, घाट, विहीरी, तलाव, धर्मशाळा, बांधल्या. आहिल्यादेवींनी रयतेच्या कल्याणासाठी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. आहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. ज्याप्रमाणे आहिल्यादेवी लोककल्याण आणि समाजसुधारणा करीत असत त्याचप्रमाणे लोकांमध्ये समानता, आनंदाचे काम करीत आहिल्यादेवींनी आपल्या सैन्यामध्ये पुरुषांना संधी देत त्याचप्रमाणे महिलांनाही संधी मिळत असत आणि म्हणूनच आहिल्यादेवींनी सैन्यामध्ये महिलांचीही एक मोठी तुकडी खास समावून घेतली. आणि म्हणूनच आहिल्यादेवींना समान न्याय करणाऱ्या 'न्यायदेवता' म्हणून आहिल्यादेवींना ओळखले जात. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता.

'यत्र नार्यस्तु पुज्यन्ते, रमन्ते तत्र देवता,...' म्हणजे 'जिथे नारीचा सन्मान केला जातो, तेथे देवी देवतांचा वास असतो.' या मतांच्या आहिल्यादेवी स्त्री जातीचा अभिमान आहे. त्यांना आम्हा सर्वांचा मानाचा मुजरा!

"जात-धर्म विसरून दाखवला,
मानव सेवेचा मार्ग नवा...
आहिल्याबाई होळकर आपल्या कार्याचा,
निरंतर तेवत शहिल दिवा..."



"सद्गुरु होती जिची वाणी
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी,
ज्ञानप्रवल्या जिने दिशा दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला,
खरेच सीमा नाही..."

भगवान शंकराची नित्यपूजा केल्या-शिवाय पाण्याचा शेंबही न घेणाऱ्या अहिल्याबाई न्यायदानाचा काम करतांना आपल्या हातात शिवलिंग घेऊनच न्यायदान करायच्या. अशा प्रज्ञावंतकारिणी देवी, शिवयोगिनी देवी अहिल्याबाई होळकर न्याय-भक्ती-प्रशासनाच्या त्रिवेणी संगमच आहे। अशा अहिल्यादेवी या मातीच्या कणाकणांत जन्मों हिचं परमेश्वरचरणी प्रार्थना!

— धन्यवाद!



- नाव - साची दिनेश गायगोले
- वर्ग - 10 वा [ख]
- शाळा - न्यू इंग्लिश हायस्कूल, वर्धा
- संपर्क क्र. - 7058500686
- ईमेल आयडी - sunitagajole0989@gmail.com
- वय - 14 वर्ष
- शहर /गाव - वर्धा, पिपरी (मेघे), ता.जि. वर्धा.
- निबंधाचा विषय - पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर
  - एक आदर्श स्त्री शासिका.



पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका

'राणी तर असंख्य झाल्या पण,
पुण्यश्लोक कोणीही नाही.
गर्व आहे या मराठी मातीला जिचा
ती म्हणजे, राजमाता अहिल्यादेवी.'

माळव्याच्या भूमीवर जन्मलेल्या अहिल्याबाई होळकर घराण्याच्या गाभाऱ्यातून उगम पावलेल्या एक तेजस्वी प्रकाशकिरणाप्रमाणे होत्या. त्यांच्या प्रत्येक कृतीत, निर्णयात आणि राज्यकारभारात तत्त्वज्ञानाचं प्रतिबिंब दिसतं. म्हणूनच त्यांना 'तत्त्वज्ञानी राणी' म्हटले जाते. त्याचं कारणही तेवढंच समर्पक आहे.

'काय वर्णावी माझ्या राजमातेची थोरवी
की जिचे शब्दही अपुरे पडतील.'

स्त्री शिक्षणाला अपराध मानलं जात असताना, माणकोजी शिंदेंनी आपल्या मुलीला अक्षरओळख करून देत तिच्या भविष्याचं पहिलं पान उलगडून टाकलं - हेच खरं बालकडू तिला वडिलांकडून मिळालं. त्यांच्या जडणघडणीत त्यांच्या आईचा मोलाचा वाटा होता. धार्मिक शिक्षणाचा वारसा आईकडून त्यांना मिळाला. म्हणजे त्यांची जडणघडण योग्यरितीने बालपणापासूनच सुरू झाली. त्याला पूर्ण राजबुत्ती मिळाली ते म्हणजे, त्यांचे सासरे मल्हारराव होळकर.

आपला मुलगा खंडेराव यांच्यातील कमकुवतता मल्हाररावांना अगदी स्पष्टपणे जाणवायच्या म्हणूनच त्यांनी सुरुवातीपासूनच सुनेवर प्रशासनाची जबाबदारी द्यायला सुरुवात केली. प्रत्येकवेळी अहिल्याबाईंनी ती जबाबदारी इतक्या कुशलतेने पार पाडली की त्यांची बुद्धिमत्ता, कौशल्य व चातुर्य सर्वसमक्ष दिसायचे.

Teacher's Signature



१७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत मल्हारराव होळकरांनी आपल्या पुत्राला गमावले, मात्र त्यांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. बारा वर्षांनी मल्हाररावांचेही निधन झाले आणि त्यानंतर अहिल्याबाईंनी माळवा प्रांताचा कारभार बघितला. या लढाईत त्या स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. त्यांच्या दूरदृष्टीचे उदाहरण म्हणजे, भारतात बांधलेली अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट तसेच रोजगार-निर्मितीकरिता आखलेले औद्योगिक धोरण. जिथे त्यांनी नर्मदातीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली. त्या गावांना सुंदर बनवले. त्यांच्या नेतृत्वात अनेक गावांचे रूप पालटले आणि महेश्वर सांस्कृतिक व धार्मिक दृष्टीने समृद्ध बनले.

एकीकडे स्त्रीच्या राज्यकारभारावर टीका होत असतानाच, दुसरीकडे सैनिक त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. सैनिकी कवायतीदरम्यान हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यांत चार धनुष्य-बाणांचे भाते सज्ज ठेवले जात. तुकोजीराव होळकर यांच्यासारख्या विरोधकांनाही त्यांनी चातुर्याने चाकरीत घेतले आणि त्यांना सैन्य-प्रमुख नेमले. माळव्याच्या दिशेने त्यांनी दिमाखात प्रयाण केले. त्यांनी कधीच पडदा प्रथा पाळली नाही. इंदूर शहराचा त्यांनी अमूलाग्र विकास केला – रयतेचे सुंदर, समृद्ध शहरात रूपांतर केले. माळव्यात त्यांनी रस्त्यांचे जाळे उभे केले, उत्सवांचे आयोजन केले, मंदिरांना दान दिले, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या.

राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी रोजगारनिर्मिती हे त्यांचं प्रमुख ध्येय होतं. त्यासाठी त्यांनी भव्य वास्तुशिल्प व बांधकामांची कामं हाती घेतली, ज्यामुळे केवळ उद्योगधंद्यांना चालना मिळाली नाही तर, आपल्या समृद्ध कला आणि संस्कृतीचा वारसाही जपला. समाजात समानतेचा आदर्श प्रस्थापित करण्यासाठी महिलांना सैन्यात समाविष्ट करून स्त्रीशक्तीचा गौरव केला. म्हणूनच त्यांना 'न्यायदेवता' म्हणून ओळखले जाते.

सावकार, व्यापारी, शेतकरी हे आर्थिकदृष्ट्या सुदृढ होताना पाहून त्या आनंदित होत; मात्र, त्यांनी कधीही त्याच्यावर आपला अधिकार



अभ्यासाचे नाणपूर दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता.

त्यांच्या काळात, विधवांना पतीची मिळकत मिळत असे. विधवा सुलाला दत्तक घेऊ शकत असे, दत्तक विधानाचा कार्यक्रम स्वतः रीतभर पार पाडून एक आदर्श जगाच्यासमोर ठेवला. महेश्वर येथील अहिल्याबाईंची राजधानी ही जणू काव्य, संगीत, कला व उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंतफंदी यांना व संस्कृत विद्वान आणि खुशालीराम यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला. कारागिरांना, मूर्तिकारांना व कलाकारांना त्यांच्या राजधानीत सन्मान व वेतन मिळत असे. त्यांनी महेश्वर शहरात एका कपड्याच्या गिरणीचीसुद्धा उभारणी केली होती.

शेतकरी हा देशाचा कणा हे ओळखून त्यांना जाचक करातून मुक्त केले. शेतकऱ्यांकडून सोप्या प्रमाणात गोपालन घडवून आणले. अनेक विषयांचे विद्वान, शास्त्री, पंडित, व्याकरणकार, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम यांनाही त्या बोलावून त्यांना त्या राजाश्रय देत असत. ग्रंथाची हस्तलिखिते तयार करून विद्वान विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली. शाळा काढून विद्याप्रसाराचे काम केले. अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ, इंदूर येथील विश्वविद्यालयास त्यांचे नाव दिले आहे. तसेच त्यांच्या नावाचे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे एक विद्यापीठ सोलापूरात आहे.

सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने १८२९ साली राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट चाल कायद्याने बंद करण्यात आली. यावरून अहिल्याबाईंच्या दूरदृष्टीची प्रचीती आपणास येते. त्याकाळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेचे, चोर, दरोडेखोर व मिळून लूटमार करीत असत. ते अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात भरती करून पालीव पशु व पक्षी, गायी, म्हशी आणि शेतजमिनी दिल्या व त्यांचे जीवन परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले. त्यामुळे त्यांचा ऊरमत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले

Teacher's Signature:



निर्वाहाचा प्रश्न मिटला. त्यांनी भिल्ल लोकांना भिलकवाडी वर 'कर' आकारण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रास देणाऱ्या या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा निर्माण केला. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्याबाई यांना भारताच्या 'कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारेट' असे म्हटले आहे. आयुष्यात कोसळलेल्या संकटांनी त्यांचा अंत पाहिला होता. त्यांची प्रकृती बिघडत गेली आणि अखेर १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांनी शांतपणे आणि धीराने मृत्यूला सामोरे जात आपले जीवनकार्य संपन्न केले.

अहिल्याबाई होळकर या केवळ पराक्रमी शासिका नव्हत्या, तर त्या धर्मनिष्ठ, दयाळू आणि दूरदृष्टी असलेल्या समाजसेविका होत्या. राज्यकारभार सांभाळताना त्यांनी जनतेच्या गरजा ओळखून अनेक लोककल्याणकारी योजना राबवल्या. गरीब, शेतकरी, विधवा आणि उपेक्षितांच्या सद्गतीसाठी त्या सदैव सजग आणि तत्पर असत. त्यांच्या काळात मराठा साम्राज्याला संघटनेचे बळ आणि प्रगतीच्या नव्या मार्गावर चालणे शक्य झाले. अहिल्याबाईंचं नेतृत्व, त्याग आणि सेवाभाव आजही भारतीय समाजासाठी प्रेरणास्थान ठरते.

"भुकेल्या पोटी घास देऊनी तृप्त
केले तहानलेल्या जीवा, जात धर्म विसरून
दाखवला मानवसेवेचा मार्ग नवा,
अहिल्यादेवी होळकर आपल्या कार्याचा
निरंतर तेवत राहील दिवा...!"

अहिल्या होळकर समाज सुधारणाचे कार्य

भारतातील कर्तबगार स्त्रियांपैकी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या एक होत्या. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रात अहमदनगर जिल्ह्यात जामखेड तालुक्यातील चौंडी नावाच्या एका छोट्या खेड्यात झाला. माणकोजी शिंदे हे त्यांचे वडील. ते त्या गावाचे पाटील होते. त्याकाळात स्त्रीशिक्षणाचा विचार ही कोणाच्या मनी येत नसे. असे असताना माणकोजी शिंदे यांनी छोट्या अहिल्यास घरीच वाचन लेखन शिकवले. त्यानंतर आठ वर्षांच्या असताना त्यांचा विवाह पेशवे बाजीराव पेशवे यांचे सरदार मल्हारराव होळकर यांच्याशी झाला. इ.स १७५४ कुम्हेरच्या लढाईत खंडेराव धारातीर्थी पडले. ऐन तरुणपणी त्यांच्यावर पती विरहाचा मोठा आघात झाला.

त्या सती जाणार होत्या मात्र त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाऊ दिले नाही. २० मे १७६६ रोजी मल्हारराव होळकर एका मोहिमेवर असताना त्यांचे देखील देहावसान झाले. शेवटी कारभाराची सर्व जबाबदारी अहिल्याबाई यांच्या खांद्यावर आली. त्या स्वतः दरबारात आणि जहागिरीच्या कामात लक्ष घालू लागल्या. त्या बुद्धिमान व चोकर असल्याने अतिशय दक्षपणे राज्यकारभार पाहू लागल्या.

अहिल्याबाई आध्यात्मिक व सात्विक वृत्तीच्या होत्या. त्या भगवान महादेवाची आराधना करत असत, त्यांनी प्रजे साठी धर्मशाळा, तलाव, विहिर बांधल्या. विधवा स्त्रियांना दत्तक घेण्याचा अधिकार दिला. त्या रसिक कलाप्रेमी आणि प्रेमळ होत्या. अहिल्याबाई होळकर या आचरणाने अत्यंत पवित्र स्वभावाने स्वाभीमानी दक्ष व दानी



होत्या. त्या योग्य न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी आपल्या राजकौशल्याने नागरिकांची मने मिकली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्याबाईचा स्वर्गवास झाला. मात्र त्यांची कीर्ती अजरामर झाली.

अहिल्याबाईनी न्याय व्यवस्था सुधारण्यासाठी खूप प्रयत्न केले. त्यांनी लोकांच्या तक्रारी व्यवस्थित ऐकल्या आणि योग्य निर्णय घेतले. त्यांनी हिंदू मंदिरांचे जीर्णोद्धार केले आणि अनेक ठिकाणी धार्मिक स्थळे बांधली. त्यांनी लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी औद्योगिक धोरणे आखली आणि लोकांना मदत केली. त्यांनी शिक्षणाला प्रोत्साहन दिले आणि लोकांना दान मिळवण्यासाठी मदत केली. अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या कार्यामुळे समाजात एक नवीन दिशा दिली. त्यांचे कार्य आजही लोकांना प्रेरणा देत आहे. त्या एक आदर्श राज्य-कर्ती आणि सामाजिक सुधारक म्हणून ओळखल्या जातात. अहिल्याबाई होळकर एक प्रसिद्ध सामाजिक सुधारक होत्या त्यांनी माळवा प्रांतात अनेक सुधारणा केल्या. तिने लष्करी मोहिमांची जबाबदारी घेतली विधवांच्या पुनर्विवाहाला पाठिंबा देऊन त्यांच्या हक्कांसाठी वकिली केली आणि संपूर्ण भारतात पवित्र स्थळे बांधण्यात आणि जतन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी धर्म आणि नीतीमत्तेच्या तत्त्वांवर आधारित राज्य केले, निष्पक्ष आणि जलद न्यायावर लक्ष केंद्रित केले. अहिल्याबाई होळकर यांनी ९ मंदिरे बांधली. अहिल्याबाई होळकर त्यांनी केलेल्या कार्यामुळे भारत देश आणि विशेषत मध्य प्रदेशाला एक नवीन दिशा मिळाली. त्यांनी आरोग्य सुविधांवर भर दिला, ज्यामुळे सामान्य जनतेचे जीवनमान सुधारले. अहिल्याबाई होळकर त्यांनी गरीब आणि गरजू लोकांना मदत केली. ज्यामुळे समाजात समानता वाढली त्यांनी महिलांच्या हक्कासाठी आवाज उठवला आणि त्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले.

अहिल्याबाई होळकर यांचे निधन महेश्वर येथे १३ ऑगस्ट १७९५ रोजी झाले. अहिल्याबाई होळकर यांचे वृद्धापकाळात

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

निधन झाले. अहिल्याबाई होळकर यांनी जवळपास २८ वर्षे राज्यकारभार सांभाळला. त्यांच्या कार्यमुळे त्यांचे नाव "अहिल्याबाई होळकर" हे केवळ एक शासक म्हणून नाही तर एक आदर्श स्त्री शासक म्हणुन ओळखले जाते.

मधुर होती जिची वाणी,
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी राजवल्या
जिने दिशा. दाही
तिच्या उत्तुंग कार्याला खरच सीमा नाही.
सुखात नांदली आमची जनता,
कारण उत्तम शासन, तत्वज्ञानी राणी
होती अहिल्या राजमाता ....

Name- Subaj Yuvaj Masal
Class - 9th B





DATE : / /

नाव - चि. प्रथमेश किशोरकुमार धायदार.
इयत्ता - दहावी तुकडी - अ माध्यम - मराठी
शाळेचे नाव - काकासाहेब माने हायस्कुल, रुकडी
ता. हातकणंगले
जि. कोल्हापुर
पिन कोड क्र - ४१६११८.
निबंध विषयाचे नाव :-

अहिल्यादेवींचे योगदान.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव घेताच, डोळ्यासमोर सर्वप्रथम उभे राहतात, ते त्यांनी नदीकाठी उभारलेले देखणे घाट. केवळ घाटच नाही तर, असंख्य मंदिरे, किल्ले, राजवाडे, तलाव, विहिरी बारवांच्या निर्मितीहुनही अहिल्यादेवींची सौंदर्यदृष्टी प्रतीत होते. तेव्हा या लेखनातुन आहिल्यादेवींच्या स्थापत्यक्षेत्रातील एकुणच योगदानाविषयी आणि त्यांच्या मागील कलात्मक व पर्यावरण पुरक दृष्टिकोनाचा आढावा घेतला आहे.

मध्ययुगीन कालखंडामध्ये भारताच्या इतिहासामध्ये ज्या महान स्त्रीया होऊन गेल्या, त्यांच्यामध्ये आहिल्यादेवी होळकरांचे नाव अद्वितीय. जन्माने मराठी असणाऱ्या या कन्यारत्नाने आपल्या धार्मिक व सामाजिक, राजकिय क्षेत्रात कर्तुत्वाने भारतभर मोठी किर्ती नावलैकिक मिळविले. इ.स. 1754 मध्ये खंडेराव होळकराचा मृत्यु झाला. व पुण्यश्लोक आहिल्यादेवींना अकाली वैधव्य आले. पुढे इ.स 1766 मध्ये सासरे मल्हारराव होळकर यांचे ही निधन झाले. त्यामुळे राज्यकारभाराची सर्व जबाबदारी आहिल्यादेवी होळकर यांच्यावर आली. त्याबरोबर त्यांच्या घरातील त्यांची मुलगी, सुनांसह 18 स्त्रिया सती गेल्या. अशा बिकट परिस्थीतीत मोठ्या अचाट धैर्याने सर्व राज्यकारभाराचे रक्षण तर केलेच, परंतु मल्हारराव होळकरांचा लौकिक कायम राहिला. त्यांनी राज्याची घडी विस्कटू दिली नाही, तर होळकरशाहीचे वैभव कायम राहिले. व अनेक सत्कृत्ये करुन 'पुण्यश्लोक' होण्याचा मान या 'महासाध्वी' स्त्री ने मिळवला.



अहिल्यादेवी होळकरांनी केलेल्या सत्कृतींची यादी फार मोठी आहे. अहिल्यादेवी शिवभक्त होत्या, त्यांनी देशभर खुप मंदिरांचा जिर्णोद्धार केला. उदा., आनंद काकन येथील विश्वेश्वराच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला, गया येथील विष्णु मंदिर, काशी येथील काशी-विश्वेश्वराच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला, सोमनाथ येथील महादेवाच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला, तर
मराठवाड्यातील परळी वैजनाथ व वेरुळ येथील घृष्णेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार केला. याशीवाय भारतामध्ये अनेक ठिकाणी स्वखर्चातुन मंदिराची उभारणी केली. त्यामध्ये आलमपुर, उज्जैन, ऋषिकेश, काशी, कुरुक्षेत्र, गंगोत्री, जेजुरी नाशिक, धुपेंदरपुर, चौंडी इत्यादी ठिकाणी मंदिरे बांधली. याव्यतिरिक्त अनेक ठिकाणी मंदिरे बांधली. यामध्ये सर्वात वैशिष्ट्यपुर्ण कार्य म्हणजे अहिल्यादेवी होळकरांनी फक्त मंदिराचा जिर्णोद्धार केला. व उभारणीच केली नाही, तर त्यांनी पुनःश्च हिंदु धर्म रक्षणाचा भक्कम पाया उभारण्याचा आरंभ केलेला दिसतो. त्यामुळेच त्यांना 'हिंदु धर्म-रक्षक' देखील म्हटले जाते. अहिल्यादेवी होळकरांनी जलसंधारण क्षेत्रामध्ये संपुर्ण भारतामध्ये जे कार्य केले, त्याच्या तोडीचे कार्य मन्य ~~कोण~~ कोणत्याही व्यक्तीने आणि राजकर्त्याने केले नाही.

जनकल्याण, धर्मपरायणता व स्त्रीविषयी वाटणारी अनुकंपा, मुक्या प्राण्यांविषयी असणारी कळकळ यामधुन त्यांनी भारतभर दुर्गम ठिकाणी नद्यांवर घाट बांधले. नर्मदा ही प्राचीन काळापासुन प्रवाहित असणारी नदी ही केवळ नदी नाही तर, भारताचा अविरत संस्कृतीचाही प्रवाह आहे. नर्मदा नदिच्या काठावर राजमाता अहिल्यादेवींनी आपला राजकारभार केला. अहिल्यादेवी यांचे स्थापत्यशास्त्रात अनेक प्रयोग झाले. किल्ल्याचे गोमुखी प्रवेशद्वार, बुरुजांचे बांधकाम व सामरिकदृष्ट्या केलेली किल्ल्यांची रचना. पुढे पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी यांनी निर्माण केलेल्या महेश्वर, किल्ले, राजवाडे आणि घाटांच्या स्थापत्यात आपल्याला एक सौंदर्यदृष्टी आणि कलात्मकता दिसुन येते. म्हणुनच पुरानन महेश्वरसारख्या क्षेत्रातचे पावित्र्य जसे आपल्याला जानवते, तसे अहिल्यादेवींनी ~~त्यांच्या~~ त्यांच्या काळात निर्माण



झालेल्या वास्तुकला मोहुन टाकतात. अहिल्याराणी होळकर या मराठेशाहीतील एक देदीप्यमान नंदादीपच! उत्तरेत राहुन अखंड हिंदुस्थानात त्यांनी राष्ट्रकार्य निर्माण केले - राजकारण - समाजकारण यांसोबत मध्य प्रदेशात पाहिले, तर आजही जागो-जागी अहिल्यादेवींच्या दक्ष राज्यकारभाराच्या खुणा ठळक दिसतात.

वेरूळ येथील अहिल्यादेवींनी उभारलेली बारवेची गणना भारतातील उत्तम बारव स्थापत्यात केली जाते. शिवाय निकट बद्रिनारायण, रावेर, वृंदावन इत्यादी ठिकाणी मंदिरासोबत बारवांची निर्मिती केली. केदारनाथ येथील एक धर्मशाळा व पाण्याचे कुंड बांधले, जे जमिनीपासुन 300 फुट उंच आहे. त्यांनी आपल्या व्यक्तीगत संपत्तीतुन तसेच लोकांना आवाहन करुन ही निर्मिती केली. त्र्यंबकेश्वर येथे सुंदर अशी दोन देवालयांची निर्मिती करुन भाविकांसाठी व जलसंवर्धनासाठी दोन तलाव बांधले हे दोन्ही तलाव दगडाने बनविले आहेत. अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या जलव्यवस्थापन पद्धतींपैकी 90% विहिरी, बारव, तलाव आजही वापरत आहेत. अहिल्यादेवींनी आपल्या 30 वर्षीय कालखंडामध्ये त्यागाशी, कर्माशी सांगड घालुन जीवन व्यतीत करत प्रजेच्या हिताकडे लक्ष देऊन भारतामध्ये धर्मशाळा व अनेक ठिकाणी अन्नछत्रे चालविली. प्रजेची सेवा केली. मुक्या प्राण्यांवर त्यांचे विशेष प्रेम होते. म्हणुन प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्यासाठी सोय केली. एवढी त्यांची लोकप्रियता होती.

राज्या असंख्य झाल्या या जगात,
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्व निचा आहे या मराठी हृदयाला,
एकच ती महाराणी अहिल्या
होळकरचं आली!....

अहिल्यादेवी होळकरांच्या
300 व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!



Name: Mrunmayi Maheshwar Gaikwad
School: Lotus English School
Class: 9th A

* Fearless and Dignified Ahilyabai *

On the occasion of the 300th Birth Aniversary of Rajmata Punyashlok Ahilyabai Holkar ... We first sault her.

While the honorable Peshwa Bajirao 1 and his loyal commander Malharrao Holkar were travelling from the north towards Pune. they halted at a small village named Chondi. situated on banks of the Sina river in the present day Jamkhed Taluka of Ahilyanagar district. Both stayed on the banks of Sina river in Chondi with their troups and set up camp.

One day eight-years old girl had come to the temple near the riverbank along with her mother and other women for darshan. Walking confidently with her companions, the little girl came to the riversbank, made a shivling out of the sand and began to worship it. Peshwa Bajirao observed her actions keenly. The was deeply inspressed by how earnestly the little girl created and worship the Shivling.

Just then, a horse from the army camp broke loose and started running wildly along the riversbank. People nearly fled in fear for their lives.



classmate
Date
Page

However, the little girl did not move an inch from where she was. Instead, sensing the horse approaching the shivling, she lay over the shivling to protect it. Seeing the peshwa Bajirao, felt concerned and approached the girl, saying, "Why didn't you move, when the horse was charging? Don't you care about your life?

To this the young girl replied with fearlessness and dignity, "I created this shivling. Great people say that what one creates, one must protect with their life. I did just that. Did I do anything wrong? Deeply moved by her reply, Peshwa Bajirao called his commander Malharrao Holkar and narrated the brave incident, suggesting that this girl be taken as a daughter in law. This little girl was none other than Ahilyabai Mankoji Shinde, later known as Ahilyabai Holkar.

Ahilyabai was born on 31st May 1725 to the couple Mankoji Shinde and Sushilabai in the village of Chondi. Recognizing her virtues, Malharrao Holkar arranged her marriage with his son Khanderao. From her childhood, Ahilyabai was known for her fearless and dignified nature.

Ahilyabai was married to Khanderao in a grand ceremony. At a very young age, Ahilyabai became the daughter-in-law of the Holkar family. Her mother-in-law, Gautamabai loved her deeply and also taught her how to manage household. Recognizing Ahilyabai's nature and potential, her father-in-law Malharrao Holkar began to educate her.



Being part of nobel warrior family, Ahilyabai naturally received training in governance and welfare, warfare as well. Highly intelligent, mature and courageous. Ahilyabai quickly mastered all her learning and began assisting her father-in-law in the affairs of state.

Throughout her life, Ahilyabai faced many hardships and personal losses, seval of her close family members pased away and she had to bear repeated emotional shocks. Yet she never abandoned her vow of public service. Her mother-in-law passed away early in 1754, during the Battle of kumbheri. Her husband Khanderao was killed. Eleven of his other wives performed sati with him. In 1765, her pillar of strength, Malharrao Holkar also pased away and three of his wives performed sati with him. Just a year later, in 1766, her son Malegaon died and two of his young wives also performed sati. In 1790, her grandson Dhondida [son of her daughter Muktabai] died and again two young wives performed sati. The very next year, in 1791, her son-in-law Yashwantrao Phanse passed away and her daughter Muktabai commited sati along with him.

In total, 25 of her close relatives passed away. Despite constantly being sourrounded by grief, Ahilyabai never let her personal sorrow overshadow her dedication to the welfare and protection of her people. She remained resilient, strong-willed and deeply commited to the public good.



classmate
Date
Page

Administrative : She was known for her administrative and military prowess, including leading armies into battle and appointing Tukojirao Holkar as her chief of Army.

Construction : Ahilyabai oversaw numerous construction projects, including forts, temples, wells and roads. She particularly known for rebuilding important Hindu pilgrimage site, such as Kashi Vishwanath Temple.

Justice and Social reform: She was known for her commitment to justice and her care for her people and she is also associated with social reformers and women's empowerment.

Promotion of Education : She was also known for her commitmet to education and social reforms, contributing to the advancement of women.

She ruled from 1767 to 1795. and is recoagizied as one of the most visionary female rulers of India. She was died in Indore on 13 August 1795.

So, Salute to this great warrier.



नाव :- कृतिका सचिन डंगळे
वर्ग :- ४ था गो. क्र. ३
शाळेचे नाव :- जिल्हा परिषद माध्यमिक प्रशाला, खाडवा
विषय :- अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य

* अहिल्याबाई होळकर निबंध *

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ मध्ये महाराष्ट्रातील चौंडी या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव माणकोजी शिंदे तर आईचे नाव सुशीलाबाई होते. ज्या काळात महिलांना घराबाहेर पडण्याची देखील परवानगी नव्हती त्या काळात अहिल्याबाईंच्या वडीलांनी त्यांना शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली. अहिल्याबाई एक कर्तृत्ववान, बुद्धिमान राजकर्ती होत्या.

अहिल्याबाई एक उत्तम शासक तर होत्याच सोबतच त्या धार्मिक वृत्तीच्या देखील होत्या. त्या समान न्यायदानावर विश्वास ठेवायच्या. अहिल्याबाई एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राजकर्ती होत्या. त्यांचे साहस आणि व्यक्तिमत्व पाहून मोठे-मोठे राजे सुद्धा आश्चर्यचकीत होत असत. त्यांनी आपल्या शासनकाळात आपल्या साम्राज्याचा विस्तार केला, लोककल्याणाची कामे केली. अहिल्याबाई महिलांच्या सशक्तीकरणासाठी नेहमी प्रयत्नशील असत. त्यांनी अनेक महिलांविरोधी प्रथांचा विरोध केला. स्त्रियांच्या हक्कासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांच्या मनात दया, करूणा, प्रेम व गरजूंना मदत करण्याची



भावना होती. त्यांनी शेती व शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी अनेक कार्य केले. त्यांनी अनेक किल्ले, मंदिरे तसेच धर्मशाळा बांधल्या.

अत्यंत न्यायप्रिय असलेल्या अहिल्याबाईच्या प्राणांची ज्योत वयाच्या ७० व्या वर्षी मावळली. अशा या शासनकर्तीस मानवंदना म्हणून इंदूरच्या विमानतळाचे नाव "देवी अहिल्याबाई असे ठेवण्यात आले आहे.

अहिल्याबाई होळकरचे त्यांचे वडिल गावाचे पाटील होते. त्याकाळी स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसताना ही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहण्या-वाचण्यास शिकवले होते.

त्यांच्या विवाह वयाच्या १४ व्या वर्षी माळवा प्रांताचे सुभेदार मल्हारराव यांचा पुत्र खंडेराव यांच्याशी झाला. पुढे काही वर्षात त्यांचे पति, मुलगा आणि वडिलाप्रमाणे असणारे सासरे याचा मृत्यु झाला आणि अहिल्याबाईकडे राज्यकारभाराची जबाबदारी आली.

त्यांनी २८ वर्षे राज्यकार्यभार अतिशय सुंदर व कुशलपणे चालवला. शत्रू देखील त्यांच्याबद्दल आदर बाळगत असत. त्यांनी आपल्या शासन-काळात आपल्या साम्राज्याचा विस्तार केला, लोककल्याणकारी कामे केली. त्यांनी अनेक महिला विरोधी प्रथांचा विरोध केला. अहिल्याबाईंनी अनेक धार्मिक स्थळांचे निर्माण-कार्य पूर्ण केले व अनेक किल्ले, विश्रामगृहे, विहिरी आणि रस्त्यांची निर्मिती केली.



देवतांची प्रतिष्ठापणा तसेच धर्मशाळा बॉधणे, सन्नछत्रे चालविणे या लोकोपयोगी कामामूळे संपूर्ण भारतात अहिल्याबाईंचे नाव अजरामर झाले आहे.

भगवान शंकराची नित्यपूजा केल्याशिवाय पाण्याचा थेंबही न घेणाऱ्या अहिल्याबाई आपल्या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी आपल्या असामान्य कर्तृत्वाने रयतेची मने जिंकली, महिलांची स्वतंत्र प्रशिक्षित सेना उभी केली, कारागिरांना, मुर्तिकारांना व कलाकारांना सन्मान दिला, शेतकऱ्यांना गाई देऊन मोठ्या प्रमाणात 'गो' पालन घडवून आणले.

राणि अहिल्याबाई होळकर या भारतीय इतिहासातील एक महान, न्यायप्रिय आणि आदर्श स्त्री शासिका होत्या.

अहिल्याबाई होळकर (1725-1795) एक महान राणि आणि समाजसुधारक होत्या. त्यांनी सामाजिक न्याय, समानता आणि विकासासाठी महत्त्वपुर्ण कार्य केले विशेषतः महिलांच्या हक्कांसाठी, गरीब आणि गरजू लोकांसाठी, आणि धार्मिक स्थळांच्या विकासासाठी त्यांचे योगदान खुप मोठे होते.

मधुर होती जिची वाणी,
अशी जन्मली तत्वज्ञानी राणि...
गाजवल्या जिने दिशा दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला
खरच सीमा नाही.



School - Lotus English School
Name - Pradnyan Jagannath Ovhal
Class - 10
Div - B
Roll no. - 24

Topic

अहिल्याबाईंचं जीवनचरित्र : त्याग, पराक्रम आणि लोककल्याण

मायेची सावली तू
त्यागाची मूर्ती तू
कारूण्याची मूर्ती तू
दातृत्वाचे उत्तुंग आकाश तू
अन्याया निवारण्यास
अहिल्यामाता
मैदानी रणरागिणी झालीस तू

अखंड भारताला प्रेरणा देणाऱ्या माता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ मध्ये महाराष्ट्रातील चौंडी या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव सुशीलाबाई आणि वडीलांचे नाव माणकोजी शिंदे असे होते. ज्या काळात महिलांना घराबाहेर पडण्याची देखील परवानगी नव्हती त्या काळात अहिल्याबाईंच्या वडीलांनी त्यांना शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली.



अहिल्याबाई एक कर्तृत्ववान, बुद्धिमान, राजकर्ती होत्या. मल्हारराव होळकर पुण्यास जाताना चौंडीस थांबले होते. ८ वर्षाच्या अहिल्यादेवींना मल्हाररावांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला, स्वतःच्या मुलगा खंडेराव याची पत्नी म्हणून आणले.

मल्हारराव होळकरांच्या त्या सून होत. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे इ.स. १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर सासरे मल्हारराव होळकर यांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. १२ वर्षानंतर सासरे मल्हारराव होळकर हेही मृत्यू पावले. मल्हारराव होळकर यांच्या मृत्यूने तर त्यांच्यावर आभाळच कोसळले. आधी पती खंडेराव होळकर आणि नंतर सासरे मल्हारराव होळकर यांच्या जाण्याने त्या कोसळून गेल्या. स्वराज्याच्या कामी आपल्या घरातील दोन कर्ती माणसेदेऊन खूप मोठा त्याग केला. म्हणूनच त्या थोर त्यागमूर्ती ठरतात.

हे सारे दुःख विसरून त्यांनी मराठा साम्राज्याच्या मालवा प्रांताचा कारभार सुरू केला. लढाई मध्ये त्या स्वतः सैन्याचे नेतृत्व करायच्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली. अहिल्याबाईंनी अनेक लढाया केल्या आणि त्या लढाया आपल्या पराक्रमाने जिंकल्या. त्या शूर रणरागिणी होत्या.

इंग्रजी लेखक. लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांना भारताच्या "कॅथरीन द ग्रेट, इलिझाबेथ मार्गारेट" असे म्हणले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट,




PAGE NO. :

इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने म्हणले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढचं नाही तर त्यानी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखले. प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळाच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बांधून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईना प्रजेस कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती.


थोर माता अहिल्याबाईचे कार्य आणि कर्तृत्व खूप व्यापक आहे लोककल्याणाचे आहे. त्या कार्याला आपल्या शब्दांच्या सीमेत बंदिस्त करता येत नाही. त्यांचे कार्य आम्हाला आणि पुढील पिढ्यांला जीवनभर मार्गदर्शक राहिल. शेवटी एवढेच म्हणेन की



PAGE NO. :

थोर तुमचे उपकार माता अहिल्याबाई
तुमचे कर्ज कधीन फिटणार चंद्र सूर्य
असेपर्यंत तुमचे नाव कधीन मिटणार
माता अहिल्या माईच्या जयंती निमित त्यांच्या
पवित्र स्मृतीस आणि कार्यास कोटी कोटी वंदन.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर



Student Name :- Samruddhi Sachin Sutar.
School Name :- Shree Samarth School and Jr. Collage
T. Shetphal.
Std :- 10th.
Sub :- Ahilyabai Jivancharitrya
Writing language :- Marathi
MO. NO :- 8788118076.
Address :- Pandharpur, Sangola main road Khardi.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर



* अहिल्याबाईंचे जीवनचरित्र... *
त्याग, पराक्रम आणि लोककल्याण.

"त्यागालाही लाज वाटावी इतका महान त्याग,
झाला तुझा जागा झाला आम्हां लेकरांचा स्वाभिमान."

सुवर्ण इतिहासातील उत्कृष्ट राजकर्त्या राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी मराठी वतनदार माणकोजी शिंदे व आई सुशिलाबाई यांच्या घरी झाला. १७३३ साली अहिल्यादेवींचा विवाह खंडेराव होळकर यांच्याशी झाला.

अहिल्यादेवींनी सत्याचा मंत्र वापरून। विकासाचे तंत्र हिंदुस्थानच्या मातीत रुजवले. खंडेराव यांना १७५४ मध्ये कुंभेर च्या युद्धात वीरमरण आले. जगात सर्वात जास्त कौटुंबिक समस्या आल्यावरही २८ वर्ष सर्वोत्कृष्ट राज्य करून अहिल्यादेवींनी स्वतःचे नाव इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरले. अहिल्यादेवींच्या सन्मानार्थ भारत सरकारने २५ ऑगस्ट १९९८ रोजी टपाल तिकीट जारी केले. एकदा राघोबा पेशवा ३० हजारांची फौज घेऊन आला. तेव्हा अहिल्यादेवींनी राघोबा दादाला पत्र लिहले. कि आपण जर माझ्या कडून हरलात तर एका स्त्री कडून हरलात, अशी बदनामी होईल. म्हणून विचार करा, भेट रणांगणात असे म्हटले. तेव्हा राघोबांनी माघार घेतली. शत्रुला रणांगणात पराभूत करायचे हे 'मानसशास्त्र' अहिल्यादेवींना माहित होत.

अहिल्यादेवींच्या न्यायपणाबद्दल सर्वत्र ख्याती आहे. त्यांना अन्यायाचा तिटकारा होता, त्यांना राज्यात अनेक ठिकाणी न्यायालये स्थापन करून त्यावर योग्य न्यायमूर्तींच्या नेमणुका केल्या. ज्या लोकांचे या न्यायालयामुळे समाधान होत नसेल ते लोक अहिल्यादेवींकडे येत. न्यायासनावर बसून या सर्व प्रकरणे स्वतः ऐकत आणि निवाडा देत असत.



शिंदे आणि होळकर यांच्यात एका जमिनीच्या तुकड्यावरून वाद होता. या वादाच्या प्रसंगी निर्णय लावण्यात यावा म्हणून शिंदे यांनी पंच म्हणून अहिल्यादेवींची नेमणूक केली. वास्तविक पाहता यावेळी एका पक्षाची फिर्यादी खुद्द अहिल्यादेवी होत्या. अहिल्यादेवींनी या भूभागाचा निर्णय लावला कि हा प्रदेश 'गोचर' भूमी म्हणून देण्यात यावा आणि हि व्यवस्था दोन्ही पक्षांनी मान्य केली. ही अवस्था मध्यप्रदेश राज्यनिर्मिती पर्यंत चालू होती. सिरोज मध्ये खेमदास मध्ये नावाचा श्रीमंत व्यापारी राहत होता. तो निपुत्रिक वारला. संपत्तीला वारसा ही नाही. अधिकाऱ्याने व्यापाऱ्याच्या विधवा पत्नीला धमक्या दिल्या. तेव्हा एका वृद्धाने त्या विधवा महिलेला अहिल्यादेवींना जाऊन सांग असे सांगितले. हे ऐकताच अहिल्यादेवींचा संतापाला पारावार उरला नाही. अधिकाऱ्याला पदच्युत केले, आणि विधवेला दत्तक घेण्याची संमती दिली. अशी होती पुण्यश्लोक अहिल्या देवींची न्यायव्यवस्था.

"इतिहासाने पानोपानी लिची गाईली गाथा।
होळकरांची तेजस्वी ती पुण्यश्लोक अहिल्या माता!!"

अहिल्यादेवी एक उत्कृष्ट राजकर्त्या आणि आदर्श प्रशासक होत्या. त्यावेळेचे 'व्हाईसरॉय लॉर्ड एलनबरो' यांनी एका पत्रात म्हटले की, "अहिल्यादेवी एक सर्वश्रेष्ठ आणि आदर्श राजकर्त्या आहेत." एवढेच नव्हे तर 'सेन्ट्रल इंडियाचा गव्हर्नर सर जॉन मालकम' याने ग्रंथ लिहला होता त्यात तो म्हणतो "A memoir of central India including malwa." "A life of Ahilyabai forms too proud on echo in history house of Holkars to be slightly passed over". म्हणजेच होळकरांच्या घराण्याचा प्रतिध्वनी म्हणून अहिल्याबाईंचे जिवन अतिशय अभिमानास्पद



"के. विष्णुशास्त्री चिपळूणकर" यांनी अहिल्यादेवींच्या चरित्रात परस्पर विरोधी म्हणून म्हणता येतील असे सर्व गुण होते, एक स्त्री असूनही छानछोकीने राहणे त्यांना कधी अनादर राग केला नाही. इतकेच नके तर त्यांच्या वर कृपाच केली भर तारूण्यात वैधव्य आले... असतानाही त्यांनी पतिव्रताचे पूर्णपणे पालन केले. आणि आजूनही के). विनोबाजी भावे म्हणतात, इतके कौटुंबिक संकटे असूनही २९ वर्ष राज्य आदर्श केले व आणखी हे सुद्धा म्हणतात,

"आम्ही जिथे-जिथे गेलो तिथे अन्य प्रांतियांकडून आम्ही अहिल्यादेवीची स्तुतीच ऐकली शस्त्रबलाने दुनिया जिंकणारे अनेक आहेत, परंतु प्रेमाने धर्मशक्तीने, भारतातील सर्व प्रांताना जिंकणारी अहिल्यादेवी ही एकमेव होय।"

वीर खंडेरायांच्या मृत्युनंतर अहिल्यादेवींनी सती जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा मल्हाररावांनी व गौतमीबाईंनी त्यांना सती जाण्यास नकार दिला. मल्हारराव म्हणाले "पोरी तु आम्हाला सोडून जाऊ नकोस नाहीतर आम्ही अनाथ होऊ जीव द्यायचा असेल तर प्रजेसाठी दे प्रजेची आई हो" तेव्हा अहिल्यादेवींनी शपथ घेतली. माझ्या निष्ठेची शपथ आजपासून सारे अलंकार, रंग, मी या चितेत टाकते. फक्त पांढरे शुभ्र वस्त्र नेसेन. आणि फक्त प्रजेसाठी जगेन. मल्हार-रावांच्या मृत्युवेळी अहिल्यादेवींच्या खाजगी कोशात पंधरा कोटी रूपयांच्या आसपास पैसे होते. त्या खाजगी कोशातुन अहिल्यादेवींनी अनेक कामे केली. अहिल्यादेवींना मंदीरे, धर्मशाळा, अन्नछत्र, घाट इ. बांधले ते पाहून मोरोपंतांनी त्यांच्यासाठी एक कविता लिहली,

"मी हरिभक्ता देवि अहिल्ये वर धरा भुवा।
पुण्या तुज साधु म्हणे ख्याता तुजसम न बागतभूवा॥
देवि अहिल्याबाई सालीस जगतयात तू धन्या।
न न्याय धर्मनिरता अन्या कलिमाजी ऐकली कन्या॥

अहिल्यादेवींनी हुंडाबंदी, विधवा मूल दत्तक घेण्याचा अधिकार असे अनेक समाज सुधारणा केल्या.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर



नाव - प्रगती अशोक पवार
इयत्ता - 9th
पत्ता - हिरापुर रोड, रूद्र हनुमान मंदिर, चाळीसगाव
मोबाईल नं. - 9765810009

* विषय *

• पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समाजसुधारणेतील कार्य

अहिल्याबाई होळकर, मराठा साम्राज्याच्या इतिहासातील एक अद्वितीय आणि आदर्श शासिका म्हणुन ओळखल्या जातात. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी केवळ आपल्या राज्याच्या विकासासाठीच नव्हे, तर संपुर्ण समाज्याचा कल्याण्यासाठी कार्य केले. अहिल्याबाईंची पुण्यतिथी जी 13 ऑगस्टला साजरी केली जाते, हे त्यांचं स्मरण करण्याचं आणि त्यांच्या आदर्श जीवनातुन प्रेरणा घेण्याचं महत्त्वाचं दिवस आहे.

प्रारंभिक जीवन

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म 31 मे 1725 रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चोंडी या गावात झाला. त्यांच्या वडिलांचं नाव मनकोजी शिंदे होतं. अहिल्याबाईंचं बालपण एक साधं आणि सात्वीक होतं. परंतु त्यांच्या-तील ध्येय, धैर्य, निर्णयक्षमता आणि दयाळुपणाची झलक लहानपणापासुनच दिसुन येत होती.



शासिका म्हणुन कार्यकाल

१७५४ साली, अहिल्याबाई होळकरांनी मालवा प्रदेशाच्या शासिकेची सुत्रं आपल्या हातात घेतली. त्यावेळी त्यांच्यावर आपल्या पती खंडेराव होळकर यांचं निधन झाल्यानंतर राज्याची जबाबदारी आली होती. त्यांनी आपल्या राज्यकारभारात आदर्श राज्यव्यवस्था निर्माण केली, ज्यामध्ये न्याय, समानता, आणि लोककल्याण यांना प्राधान्य दिलं.

अहिल्याबाईंच्या राज्यात त्यांनी अनेक सार्वजनिक बांधकामं केली. त्यांनी मंदिरं, घाट, धरणं, आणि धर्मशाळांचं बांधकाम केलं. त्यांच्या काळात महेश्वर हे त्यांच्या राजधानीचं शहर आणि होळकर घराण्याचं सांस्कृतिक केंद्र बनलं. अहिल्याबाई होळकरांनी त्यांच्या राज्यातील धार्मिक सहिष्णुता आणि सामाजिक न्यायाचं पालन केलं. त्यांनी हिंदु-मुस्लिम एकतेचं उदाहरण आपल्या शासनातुन दिलं

समाजसेवा आणि धर्मनिष्ठा

अहिल्याबाई होळकर या केवळ शासिका नव्हत्या, तर त्या एक धर्मनिष्ठ आणि समाज-सेविका देखील होत्या. त्यांनी आपल्या राज्यातील जनतेच्या गरजांकडे लक्ष दिलं आणि त्यांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबवल्या. त्या नेहमी गरीब, शेतकरी, आणि विधवांच्या मदतीसाठी तत्पर असत. त्यांनी भारतासाठी अनेक प्रमुख धार्मिक स्थळांच्या विकासासाठी आणि पुनर्स्थापनेसाठी योगदान दिलं. काशी विश्वनाथ मंदिर, सोमनाथ मंदिर, आणि अनेक घाटांचं पुनरुज्जीवन करण्यात अहिल्याबाई होळकर यांचा मोलाचा वाटा आहे.



अहिल्याबाई होळकर यांच्या शासनकाळात मराठा साम्राज्याच्या एकत्रितपणांच आणि प्रगतीचं दर्शन घडतं. त्यांच्या नेतृत्वाचं आणि त्यागाचं महत्त्व आजही भारतीय समाजात कायम आहे. त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने, त्यांच्या आदर्शांचं आणि कार्याचं स्मरण करून आपण आपल्या समाजात न्याय, समानता, आणि लोककल्याणाच्या मुल्यांची जोपासना केली पाहिजे.

अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनात आणि कार्यात एक अद्वितीय धैर्य, आदर्श नेतृत्व, आणि नि:स्वार्थ समाजसेवा दिसून येते. त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आपन त्यांचे आदर्शांचा अगीकर करून समाजाचं आणि देशांच कल्याण करण्याचा संकल्प केला पाहिजे. अहिल्याबाई होळकर यांच्या स्मृतींना आदरांजली वाहताना आपण त्यांच्या जीवनातुन प्रेरणा घेतली पाहिजे.

इ. स. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाईदरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हारबांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसुन येते.

चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा. तेथे तुम्ही ४-५ दिवस मुकाम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य ठेवु शकता व त्यांचे शस्त्रां साठी योग्य तजवीज करा..... कुच करतांना, मार्गावर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा.

पुर्वीच शासक म्हणुन नरबेच झाल्यामुळे, मल्हारराव व मुलांच्या मृत्युनंतर, अहिल्या - देवींनी स्वत: लाच राज्यकारभार पाहु देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्या - बाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते.



अहिल्याद्देवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत, असे म्हणतात.

पेशव्यांनी परवानगी दिल्यावर, ज्या माणसाने तिचा विरोध केला होता त्यास चाकरीत घेऊन, तुकोजीराव होळकर (मल्हारराव यांचा दत्तक पुत्र) यास सैन्याचा मुख्य करून, अहिल्याद्देवी होळकरांनी पुर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. अहिल्याद्देवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत. व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही, सुंदर या खेड्याचा विकास करून त्याचे सुंदर मोठ्या शहरात रुपांतर करणे, हे अहिल्याद्देवींनी केलेले फार मोठे काम आहे. त्यांनी माळव्यात रस्ते, व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले, हिंदु मंदिरांच्या कायमस्वरूपी पुजा सुरू रहावी म्हणुन अनेक दाने दिली. माळव्याबाहेरही त्यांनी मंदिरे, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या

भारतीय संस्कृती कोशात अहिल्याद्देवी होळकरांनी केलेल्या बांधकामांची यादी आहे. - काशी, गया, सोमनाथ, अयोध्या, मथुरा, हरीद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार रामेश्वर व जगन्नाथपुरी वैगेरे, अहिल्याद्देवीस, सावकार, व्यापारी, शेतकरी इत्यादी आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघुन आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे जाणवु दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडुन नियमांतरगत मिळालेल्या धनापासुन चालविला होता. असे दिसते.



अहिल्यादेवींनी जनतेच्या / रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळवत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने मूल घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मजुरीस नकार दिला. तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तक-विधानाचा कार्यक्रम स्वत: प्रायोजित करून, रीतसर कपडे व दागिण्यांचा आहेर दिला. अहिल्यादेवी होळकरांच्या स्मृतीस अभिवादन म्हणुन, सन १९९६ मध्ये, इंदुरातील नागरीकांनी त्यांच्या नावाने एक पुरस्कार सुरू केला. तो, दरवर्षी जनसेवेस विशेष काम करणाऱ्यास दिला जातो. भारताच्या पंतप्रधानांनी पहिल्या वर्षी तो पुरस्कार नानाजी देशमुखांना दिला.

अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ, इंदुर येथील विश्वविद्यालयास त्यांचे नाव दिले आहे. तसेच त्यांच्या नावाचे पुण्यश्लोक अहिल्या-देवी होळकर सोलापुर विद्यापीठ हे एक विद्यापीठ सोलापुरला आहे.

भिल्ल व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमधील वाद अहिल्यादेवी सोडवु शकल्या नाहित तरीही, त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरूपयोगी जमीन दिली आणि त्यांना, त्या क्षेत्रातुन जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर' घेण्याचा अधिकार दिला. यासाठी रायगांण सुभ्यावर नवापुर या ठिकाणी ठिंगळे भिल्ल सरदार यांना अधिकार दिले त्यामुळे भिल्ल जमाती होळकरांच्या सैन्यात आले व त्यांनी सुरतेवर वचक बसवला. याही बाबतीत, (मांम्स लेखक) 'माल्कम' यांच्यानुसार, अहिल्यादेवींनी त्यांच्या सवयींवर लक्ष ठेवले.



महेश्वर येथील अहिल्यादेवींची राजधानी ही जणु काव्य, संगीत, कला, उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंतफंदी यांना व संस्कृत विद्वान खुशालीराम यांना अहिल्याबाईंनी आश्रम दिला. कारागिरांना, मुर्तिकारांना, व कलाकारांना त्यांच्या राजधानीत सन्मान व चैतन्य मिळत असे. त्यांनी महेश्वर शहरात एक कपड्याची गिरणीपण सुरु केली.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील भारतीय, इंग्रजी व अमेरिकन इतिहासकार हे मान्य करतात की, अहिल्यादेवी होळकरांस मालवा व महाराष्ट्रात, त्या काळी व आताही, संताचा सन्मान दिला जातो. इतिहासाच्या कोणीही अभ्यासकास ते मत खोडुन काढण्याजोगे आजवर काहीही सापडलेले नाही. राजकारणातील बारकावे व तत्व व्यवहारीक नीती नियम व सुत्रे आपल्या देशाची राजकीय, सामाजिक, भौगोलिक स्थिती, रणांगणा-वरील आखाडे व अडचणी आणि बारकावे समजुन घेतले. मल्हारराव यांच्या गैरहजेरीत सर्व कारभार करण्यात त्या पारंगत झाल्या.

ज्या काळी दळणवळणाची साधने फारच कमी होती किंवा म्हटले तर नव्हती अशी परिस्थिती होती अशा खडतर काळात त्यांनी भारतातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी व राज्यात मंदिरे, धर्मशाळा, तलाव, विहिरी, पाणपोई, घाट अशी अनेक समाज उपयोगी कामे केली. आज ही वास्तुशिल्पे व त्यांनी उभारलेली स्थापत्य कला मातोश्रींच्या भव्य कार्याची साक्ष देत उभी आहेत. वास्तुशिल्पे व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासुन संस्कृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोरगरीब जनते-च्या हातास काम मिळवुन दिले. त्यांच्या काम-गिरीच्या हा दुहेरी बाणा निश्चितच अभिमानास्पद आहे.



सेन्या तुकडी

ज्या प्रमाणे अहिल्यादेवी लोककल्याण आणि समाज सुधारणा करीत त्याच प्रमाने लोकांमध्ये समानता अनन्याच काम करीत अहिल्यादेवींनी आपल्या सेन्यामध्ये पुरुषांना संधी देत त्याच प्रमाणे महिलांनाही संधी मिळत आणि म्हणुनच अहिल्यादेवींनी सेन्यामध्ये महिलांचीही एक मोठी तुकडी खास सामावुन घेतली आणि म्हणुनच अहिल्यादेवींना समान न्याय करनाऱ्या न्यायदेवता म्हणुन ओळखले जाते.

शेती व शेतकरी उद्धाराची कार्य

शेतकरी सुखी तर जग सुखी या संकल्पनेनुन शेतकऱ्यांच्या जाचक करानुन मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहीरी बांधल्या. शेतकऱ्यांना गोपालनाचे महत्त्व पटवुन प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवुन आणले.

गुणग्राहता

मातोश्रीची लोककल्याणाची किर्ती ख्याती ऐकुन अनेक विद्वान लोक त्यांची भेट घेण्यास येत असत आणि नंतर त्या ठिकाणी राहत असत. अनेक विषयाचे विद्वान, शास्त्री, पंडीत, व्याकरणकार, किर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम यानाही त्या मुद्दाम बोलावुन घेऊन त्यांना त्या राजाश्रय देत असत. महेश्वर नगरीत वास्तव करीत होते म्हणुनच महेश्वर नगरी त्याकाळी संस्कृती विद्वान व धर्माचे माहेरघर म्हणुन नावारूपाला आली होती.



ग्रंथ संपदा निर्मिती छापखाने नसल्याने त्याकाळी धर्माचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याकरीता हस्तलिखिते यावर अवलंबुन राहावे लागत होते. हस्तलिखिते लिहिणारे मोठ्या प्रमाणात रकमेची मागणी करत असत. ज्याप्रमाणे हिरा व रत्ने पारखणा जवाहिऱ्याप्रमाणे त्या विद्वेची महत्त्व जाणत असल्याने त्याच्या मागणीप्रमाणे रक्कम देऊन ग्रंथाची हस्तलिखिते तयार करून विद्वान विद्यार्थांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली. शाळा काढुन विद्याप्रसाराचे काम केले

अंधश्रद्धा निवारण

या काळात सती जाण्याची मोठी रूढी व परंपरा होती. सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप असा समज समाजात रूढ होता. रामायण आणि महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाही असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्रा-चा आधार नाही हे प्रजेला पटवुन दिले. कालांतराने १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांचा प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट चाल कायद्याने बंद करण्यात आली यावरून अहिल्याबाई होळकर यांच्या दुरदृष्टेची प्रचीती आपणास येते.

न्यायप्रियता

अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दुर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजी होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणुन त्याला तुरूंगात डांबले.



राजमाता अहिल्याबाई - स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास

Rajmata Ahilyabai - The Vibrant History Of Women's Power

Ahilyabai Holkar 31 May 1725 - 13 August 1795. also spelled Ahalya Bai, was the Rajmata and later the ruling queen of Indore within the Maratha Empire. She established Maheshwar (in Madhya Pradesh) as the seat of the Holkar Dynasty. A beloved figure of indian history she is renowned for good governance, social welfare, and humanitarian work along with religious, educational and cultural advancements. She contributed to the growth of Indian architecture through the commission of various temples, Ghats, and Dharmshalas. Ahilyabai's Matha or charitable endowements, spread across India. Remembered as a Sadhvi or holy women

After the deaths of her husband Khanderao Holkar father-in-law Malhar Rao Holkar, and son Male Rao Holkar, Ahilyabai undertook the affairs of the Holkar dynasty. She defended indore against invasions and



and personally led armies into battle, with her brother-in-law Tukoji Rao Holkar serving as her military commader.

Ahilyabai was born into a Marathi Hindu family to Mankoji Shinde and Sushila Shide in Maharashtra in the village of Chandi, now Ahmednagar district. Her father was a descendant of a respected Dhangar (Gadaria) family. Mankoji Shinde served as the Patil of the village. Ahilyabai had five brothers and was first educated at home.

Ahilyabai rose to prominence when Malhar Rao Holkar, a commander in the army of Maratha Peshwa Baji Rao I and ruler of Malwa, stopped in Chandi on his way to Pune and saw her at a temple service Impressed by the child's piety and character, Malhar advised his son, Khandojee, to marry her. They were wed in 1733 when he was nine or ten and she was seven or eight. They had a son, Maloji Holkar, in 1745 and a daughter, Muktabai Holkar in 1748

By the time of Ahilyabai's marriage, her father-in-law Malhar Rao Holkar had already risen from a childhood of shepherding to ruling as Subahdar over a



territory comprising thirsty parganas yielding high revenues. From 1748, Malhar Rao's power in Malwa allowed him to play kingmaker in northern and central India by 1750, he was the de facto ruler of the Maratha Confederacy. He regularly received grants, including monetary tributes lands, and noble titles, from the Peshwa government in recognition of his service to the empire. His land lay north of the Narmada on both sides of Sahyadri. In 1751, he successfully mediated a major land agreement between the Peshwa and Mughal emperor Ahmad Shah Bahadur and by 1753, he was considered indispensable.

Starting in 1754, Malhar Rao kept Ahilya Bai actively involved in diplomacy debates, matters of the kingdom's finances, and other problems of both the Mughal Empire and the Peshwa. Throughout her married life, she was brought up by her mother-in-law, Gautama Bai Holkar, who is credited for teaching Ahilyabai to have proper values. She trained her in administration, accounts and politics and 1759, gave Ahilya her khasgi or land grant.

Ahilyabai's trust from her father-in-law and her military expertise are both demonstrated by a 1765 letter he wrote her during an invasion of Punjab by a Durrani Empire-Rohilla dynasty coalition led by Emperor Ahmad Shah



Durrani. Malhar Rao who was fighting in Delbi, Commanded her to take heavy artillery on a military expendition to Gwalior and attack the fort at Gohad
Ahilbayai's attack was succesful

Holkar family was known for avoiding using public cash to meet their personal and family expenses. They possessed their personal funds, which they had accumulated through their private property. Ahilyabai inherited peronal funds estimated at sixteen crores rupees at the time. Ahilyabai donated money from her personal resources to charity. The charities of the Devi Ahilyabai in her terriotory as well as throughout the Bharata Kanda are too well known. A well-documented account of the expenditure can be found in the "Devasthan classification list 1923 by the Holkar government". The Holkar goverment appointed a "Devastaban officer" who travelled far and wide and collected information on the spot

Here we see the various charites of Devi Ahilyabai extending throughout the length and breadth of Bharatakhanda. In the book HOLKAR STATE HISTORY Vol II Life and Life's-Work of Devi Shree Ahilyabai (1725-1795 A.D) page 42 there are worship expenses Various temples Ghats and rest houses



built during her time exhibit Indian architecture and the various features of different schools. They became so many training grounds for young Indian architecture. Not only in her territory but thoughout the whole of India. The aspects of Devi Ahilyabai charity reveal and resuscitation of Thirthas and Kshetras

Ahilyabai died on 13 August 1795 at age 70, She was succeeded by her commander-in-cheif and brother-in law, Tukoji Bao Holkar, who abdicated the throne in 1797 in favor of his son Kashi Bao Holkar



"For thirty years her region of peace
The land in blessing did increase;
And she was blessed by every tongue,
By stern and gentle, old and young.
Yea, even the children at their mother's
feet,
Are taught such homely rhyming to repeat.
In latter days from Brahma came,
To rule our land, a noble Dame,
Kind was her heart and bright her fame,
And Ahilya was her honored name"

— Joanna Baillie, English Poem
(1849)

Swara Suresh Jadhav (10th)

Jayawant Public School, Pune

Add:- Flat no:- 317 building no B8 3rd Floor
Vardhaman township Sasane nagar
hadapsar PUNE - 411028 / Maharashtra
INDIA

Mobile No:- 8975750509

निबंधलेखन स्पर्धा

नाव :- भाग्यश्री खंडेराव मांढरे.
इयत्ता :- ९वी
शाळेचे नाव :- ऑलीमपस स्कूल फॉर एक्सलन्स, भांडगाव
फोन नं :- ९७६६३२२३४८
पत्ता :- मु.पो गलांडवाडी. ता- दौंड. जि- पुणे.



29 05 25 ①

अहिल्याबाईंचं जीवनचरित्र :

त्याग, पराक्रम आणि लोककल्याण

या पृथ्वीतलावर अनेक राजे-महाराजे होऊन गेले; परंतु अहिल्याबाई, ज्यांना एका देवीची उपमा आहे, जी एक पराक्रमी राणी म्हणजे पुण्य श्लोक अहिल्याबाई होळकर म्हणून ओळखतात अहिल्याबाई होळकरांचा जन्म ३१ मे १७२५ साली अहमदनगर, जामखेड मध्ये झाला. त्यांचे शिक्षण त्यांच्या आईकडून झाले. त्यांच्या वडीलांचे नाव माणकोजी शिंदे होते. मराठ्यांचे पराक्रमी सेनानी मल्हारराव होळकर स्वारीवर असताना, अहिल्याबाई त्यांच्या नजरेत आल्या. मल्हाररावांनी अहिल्याबाईंच्या अंगचे गुण पारखून त्यांना आपली सून करून घ्यायचे त्यांच्या मनात आले. त्यानुसार त्यांनी आपल्या पुत्राचे लग्न अहिल्याबाईंशी लावले. त्यांचे पुत्र खंडेराव कुंभेरीच्या वेढ्यात ~~नेम~~ तोफेचा गोळा लागून ठार झाले. अहिल्याबाईना हे समजताच त्यांच्या मनावर मोठा आघात झाला. त्यांना असे वाटू लागले की, आता हे जीवन जगण्यात काहीच अर्थ नाही. असा विचार करून त्यांनी 'सती' जाण्याचा निर्णय घेतला.

अद्दीच मुलगा गेल्याच्या दुःखात जेव्हा मल्हाररावांना अहिल्याबाईचा हा निर्णय समजताच त्यांचे मन सुन्न झाले. पण स्वतःचं दुःख सावरत मल्हाररावांनी अहिल्याबाईना त्यांच्या निर्णयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न ते करू लागले. त्यात त्यांना यश ही आले.

अहिल्याबाईंना शिक्षणाचे 'बाळकडू' मिळालेच होते. मल्हार-रावांनी त्यांना लष्करी आणि मुलकी कारभाराचे कामकाज शिकवले. अहिल्याबाई सुद्धा या कामकाजात पारंगत होत होत्या. लष्करी व मुलकी कारभार अहिल्याबाई यशस्वीपणे पार पाडतील असा विश्वास मल्हाररावांना होता. अहिल्याबाईंनी हा विश्वास तुटू नाही दिला व यशस्वीपणे काम पार पाडले.

FOR EDUCATIONAL USE

अहिल्याबाईनी त्यांची कर्तबगारी सिद्ध केली. मल्हार-रावांनी पूर्व-माळव्यातील जिल्ह्यांतील घडी नीट बसवण्याचे काम अहिल्याबाईवर सोपवले. अहिल्याबाईंनी हे काम चोख पणे पार पाडले होते. त्या त्यांच्या पतीचे जाण्याचे दुःख विसरू शकल्या नव्हत्या. तोच काळाने त्यांच्यावर पुसरा आघात केला. दि. २० मे १७६६ रोजी मल्हारराव्यांचे निधन झाली. अशा दुःखी प्रसंगी पुण्च्या काहीच वर्षात त्यांचा मुलगा मालेराव थांनाही काळाने हिरवले.

या दुःखी प्रसंगी त्यांना कारभार पाहण कठिण जात होत. उत्तर व दक्षिण भारतात त्यावेळी सतत लढाया सुरू होत्या. इंदोरची राजगादी मालेरावांच्या मृत्यूनंतर पुन्हा एकदा स्वामी-हिन होते. स्वामीहिन राज्य बळकवण्याची चांगली संधी पाहून खूप शत्रू कटकारस्थान करायला सुरूवात करतात. इंदोरचे मंत्री थांना पेशव्यांचे काका राघोबादादा पत्र लिहून माळव्याची सत्ता ताब्यात घेण्याचे आमंत्रण देतात. या कारस्थानाची माहिती मिळताच अहिल्याबाई सर्व सूत्र आपल्या हातात घेतात. त्यांनंतर त्या स्वतः माळव्याची उत्तराधीकारी असल्या-ची घोषणा करतात. इकडे राघोबादादा आपले सर्व सैन्य घेऊन उत्तरेच्या दिशेने येऊ लागलात. क्षिप्रा नदीच्या काठी पोहचताच त्यांना अहिल्याबाईचे पत्र मिळते. त्या पत्रात त्या म्हणतात, " तुम्ही माझ्याशी युद्ध करायला आलात, तुम्ही मला एक अबला नारी समजण्याची चूक करू नका. मी स्वतः तलवार घेऊन युद्धभूमीवर तुमचा सामना करेल. जर या युद्धात माझी हार झाली तर जग मला बिलकुलही हसणार नाही ; पण जर तुमची हार झाली तुम्ही एका नारी सोबत हरलात म्हणून जगासोबत व संपूर्ण लोकांसमोर तुम्ही हस्याला पात्र ठरल." हे पत्र वाचताच राघोबादादा क्षणभर शांत होतात, व लगेच अति लज्जित होऊन राघोबादादा विदुवान अहिल्याबाईंची भेट घेतात.

FOR EDUCATIONAL USE



अशा प्रकारे अहिल्याबाईंनी आपल्या बुद्धी चातुर्याचा वापर करून माळव्यावर आलेल्या संकटाला दूर पळवून लावतात. या घटनेनंतर राजकिय स्थान व प्रजेच्या मनातील स्थान खूप बळकट होते. सगळे अहिल्याबाईंच्या हुशारीचे कौतुक - प्रशंसा करीत होते.

"राण्या असंख्य असतील झाल्या
या जगात,
पण पुण्य श्लोक कोणीही नाही,
गर्व जिचा आहे या मराठी हृदयाला,
एकच ती महाराणी."

असे म्हणत लोक अहिल्याबाईंचा जयघोष करू लागले.

अहिल्याबाईंनी आपल्या जीवनात अनेक त्याग केले. त्यांनी आपले वैयक्तिक सुख सोडून समाजाचे कल्याण आणि राज्य व्यवस्थापणासाठी आपले जीवन समर्पित केले. त्यांनी आपले जीवन मुल्यांकार, उपभोग आणि सामाजिक रूढी त्यागल्या. त्यांनी जनतेला मदत करण्यासाठी आपले राज्य व्यवस्थापन सुधारले. त्यांनी इंदोर मध्ये व अनेक ठिकाणी धार्मिक वास्तू बांधल्या. अहिल्याबाईंनी केलेल्या या त्यागांमुळे त्यांना "पुण्यश्लोक अहिल्याबाई" म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या जीवनातील त्याग आणि कार्यामुळे लोक आजही त्यांना प्रेरणा देतात. अहिल्याबाईंनी लोकांना रोजगार मिळावा म्हणून त्यांनी औद्योगिक क्षेत्र धोरण आखलं. महेश्वर व इंदोर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदाता होत्या.

सोळा वेळेला उद्ध्वस्त केलेल्या सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार केला, शिवलिंगाची प्रतिष्ठापना केली. तसेच काशी मधील विश्वनाथाचे मंदिर पुन्हा उभारले. केदारनाथ मध्ये त्यांनी अनेक धर्मशाला, कुंड बांधले. अहिल्याबाई दानी होत्या. त्या अनेक अन्नछत्र चालवत होत्या.

FOR EDUCATIONAL USE



प्रजेच्या सुखासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी अहिल्याबाई अखंड करत राहिल्या. फक्त पेशवेच नाहीच तर हैद्राबादचा निजाम, टिपू सुलतान हे देखील अहिल्या-बाईचा सन्मान करत. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या केवळ राणी नव्हत्या, तर त्या एक कुशल राजकर्ती, धर्मनिष्ठ महिला आणि समाजासाठी एक आदर्श होत्या. त्यांच्या पराक्रमांनी आणि कार्यांनी, त्यांनी भारतीय इतिहासात एक विशेष स्थान निर्माण केले आहे.

धैर्य, शौर्य, चातुर्य, वात्सल्य, माधुर्य, भक्ती आणि विरक्ती अशा सप्तरंगी गुणांनी युक्त असे त्यांचे जीवन हे कर्तृत्वाचा आदर्श दाखवणारे आहे.

होळकरांची सुन होती बहुगुणी,
शिदणाची ओढ होती लहानपणी,
गरज ओळखूनी सुखावले सर्वजनी,
अशी जाहली दूरदृष्टी एक मर्दानी!!

धन्यवाद!

FOR EDUCATIONAL USE



NAME - Ananya Ankush Rathod.

DATE OF BIRTH - 16/03/2010

SCHOOL NAME - Vivekanand High School Sanpada.

RES. APRESS - Himgiri society, B-13/01, First floor, sector-3, Sanpada, Navi mumbai-400705.

MOB. NO. - 9768169889

AGE GROUP 2 - Secondary age group.



AHILYABAI HOLKAR: A CONFLUENCE OF JUSTICE, DEVOTION AND ADMINISTRATION

(अहिल्याबाई होळकर: न्याय, भक्ति आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम)

(वयोगट 12-13 ते 16 वर्ष माध्यमिक वयोगट)

"A woman, gentle or strong,
When troubles come,
Shows true justice,
And leads us all along"

Indian history has witnessed a few exceptional woman whose lives combined spiritual devotion administrative brilliance, and unwavering justice. One such iconic personality was Rajmata Ahilyabai Holkar. She was not only a powerful queen but also a compassionate ruler, a pious devotee, and an exemplary administrator. She always believed that justice should be equal for everyone – rich or poor, family or stranger.

"In Ahilyabai's court,
every voice mattered,
and every wrong was heard."

One famous story is about her own son, Malerao. While riding his horse, he accidentally killed a calf. When Ahilyabai heard about it, she ordered that her son be punished the same way by being crushed under a chariot. People begged her to forgive him, but she said that justice must be the same for all. This shows her strong sense of fairness. Ahilyabai also placed a bell in



her palace. Anyone who faced injustice could ring the bell, and she would come out to listen and give justice.

She treated all people equally and did not allow her officers to trouble the public. When she heard that tax officers in Shegaon were being unfair, she scolded them. She also never allowed corruption. Once, a scholar suggested charging fees for legal cases, but Ahilyabai refused, saying it was like taking a bribe. She always put her people first and ruled with honesty and care. Her life teaches us that true justice means doing what is right, no matter how hard it is.

"Her love for God, so deep and pure,
Faith shone bright, forever sure."

Ahilyabai Holkar was a great devotee of Lord Shiva. She had strong faith in the Kashi Vishwanath temple. The temple had been destroyed many times by the Mughals. Between 1777 and 1780, Ahilyabai rebuilt temple with her own money. People say that Lord Shiva appeared in her dream told her to rebuilt it. This showed her deep religious faith and her love for Indian culture.

Ahilyabai also worked to develop many other holy places in India. She built temples, dharamshalas, and ghats in places like badrinath, Kedarnath, Dwarka, Rameshwaram, Gaya, Prayag, and ghats and Jagannath Puri. She wanted to make travel easier for pilgrims and help them worship comfortably. She worshipped Lord Shiva every day and made decisions based on religious values. Even as a queen, she followed



her daily prayers and believed Mahadev's blessings protected her kingdom.

Ahilyabai also respected saints and scholars. She invited them to her court and learned from their wisdom. She believed their presence brought peace and goodness to her land. For Ahilyabai, helping her people was the highest form of worship. She believed that by keeping her people happy, she could please God. Her life was a beautiful mix of religion, kindness, and good leadership.

"She led with good sense,
Made her people strong,
Justice was her defense,
Where she belonged."

Ahilyabai Holkar was an amazing leader. She had a clear vision for good governance. Her policies focused on making life better for her people and bringing wealth to the kingdom, which is why she's remembered so fondly.

One time, a farmer's entire grain stock was stolen, threatening his family. Instead of harsh searches, Ahilyabai ordered villagers to leave small grain piles outside their homes and allowed anonymous returns. Soon, the farmer's grain was recovered, showing her cleverness and care for her people.

She also dealt with a notorious bandit by offering him a unique chance. Insted of executing him, she listned to his story and offered him and his men the job of protecting the very roads they once terrorized. The bandit, touched by her trust, accepted,



becoming a loyal guardian and showing Ahilyabai's belief in second chances.

When a remote village suffered from severe water shortages, Ahilyabai ordered the construction of a long canal to bring water directly to them from a distant source. This large scale project not only solved their immediate problem but also allowed the village to flourish for generations, demonstrating her long-term vision and dedication to public welfare.

Ahilyabai Holkar was a truly amazing ruler, not just because she was fair, but also because she was an excellent manager of her kingdom. She had ideas about how to govern well, always aiming for things to run smoothly and fairly for everyone. Her main goals were to make her people's lives better and help her kingdom become rich. That's why she's remembered so well even today.

Ahilyabai Holkar's life teaches us that true leadership balances justice, devotion, and practical skills. She showed that a ruler can be fair to everyone, have strong faith that guides good choices, and still be an excellent manager. Her rule brought peace and growth because she cared for her people, listened to their problems, and focused on building a strong, just society.



त्याग, पराक्रम आणि लोककल्याण

अहिल्याबाई होळकर हे मराठा साम्राज्याच्या इतिहासातील एक अत्यंत तेजस्वी आणि प्रेरणादायी व्यक्तीमत्व आहे. त्या केवळ एक कुशल प्रशासक नव्हत्या, तर एक आदर्श स्त्री, धर्मनिष्ठ, दयाळू आणि त्याग मूर्ती होत्या आपल्या संपूर्ण जीवनात त्यांनी वैयक्तीक सुखाचा त्याग करून, प्रजेच्या कल्याणासाठी आणि समाजसेवेच्या कार्यासाठी स्वतःला झोकून दिले.

"राज्या असंख्य झाल्या
या जगात,
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्व जिचा आहे या मराठी हृदयाला,
एकच ती महाराणी
अहिल्यादेवी होळकर झाली."

अहिल्याबाईंचा जन्म इ.स. 1725 साली महाराष्ट्रातील चोंडी गावात झाला. एक सामान्य कुटुंबात जन्मलेल्या अहिल्याबाईचे आयुष्य एका निर्णायक वळणावर आले जेव्हा मल्हारराव होळकरांनी त्यांना आपल्या सूनबाई म्हणून स्वीकारले त्यांच्या पती खांडेराव होळकर यांचा मृत्यू युद्धभूमीवर झाला. त्यावेळी अहिल्याबाईचे वय केवळ 29 वर्षांचे होते. पतीच्या निधनानंतर त्यांनी सती जाण्याचा निर्णय घेतला होता मात्र, मल्हारराव होळकरांनी त्यांना समजावले आणि समाजसेवेसाठी जगण्याचे व्रत दिले. त्यांनी वैधव्य स्वीकारून आयुष्यभर एकटयाने राज्यकारभार सांभाळला. पती, मुलगा आणि सासऱ्यांचा मृत्यू होऊनही त्यांनी हार मानली नाही आणि स्वतःच्या दुखाला बाजुला ठेवून जनतेचे दुःख आपले मानले.

अहिल्याबाईंनी इ.स. 1767 पासून होळकरांच्या राज्याची सुत्रे आपल्या हाती घेतली. त्यांनी अत्यंत न्यायप्रीय लोकाभिमूख प्रशासन दिले. त्यांनी शेतकऱ्यांची कर माफ केली, गरिबांना मदत केली आणि आपल्या प्रजेचा आदर केला. त्यांनी अनेक सामाजिक सुधारणा केल्या. त्यांनी अनेक धर्मस्थळांचे जीर्णोद्धार केले काशी विश्वनाथ मंदिर, सोमनाथ मंदिर, रामेश्वर, गया, बद्रीनाथ, द्वारका अशा अनेक ठिकाणी त्यांनी मंदिराची दुरुस्ती किंवा बांधणी केली. यासाठी त्यांनी स्वतःच्या संपत्तीचा वापर केला आणि यश-प्रशंसेपेक्षा कार्यावर भर दिला.



अहिल्याबाईंच्या कारकिर्दीत धार्मिक सहिष्णुता सर्वधर्मसमभाव याचे उत्तम उदाहरण पहायला मिळते. त्यांनी केवळ हिंदू मंदिरांची नव्हे तर मुस्लीम दरग्यांचीही देखभाल केली. त्यांच्या दानधर्मामध्ये कोणताही बदलाव नव्हता. त्या रोज पहाटे उठून प्रार्थना करत, दरबारात बसत आणि नंतर जनतेच्या समस्या ऐकून उपाय करत. अहिल्याबाई होळकर यांचा त्याग हा केवळ त्यांच्या कुटुंबापुरता सीमित नव्हता, तर संपूर्ण समाज, धर्म आणि मानवतेसाठी होता. त्यांनी आयुष्यभर कोणताही व्यक्तिगत लाभ न घेता फक्त जनतेसाठी काम केले. अशा या महान स्त्रीच्या जीवनातून आपल्याला निःस्वार्थी सेवा, कर्तव्यनिष्ठा आणि त्याग यांचे सर्वोत्तम उदाहरण मिळते.

अहिल्याबाई होळकर या केवळ एक आदर्श स्त्री किंवा विधवा नव्हत्या, तर त्या एक पराक्रमी, शासिका, दूरदर्शी प्रशासक आणि जनतेच्या हक्कांसाठी लढणाऱ्या एक योद्धा होत्या. मल्हारराव होळकर यांच्या मृत्यु नंतर इ.स. 1767 मध्ये अहिल्याबाईंनी होळकर राज्याची सूत्रे हाती घेतली. त्यांनी आपल्या कुशल नेतृत्वाने राज्यात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली. त्यांनी आपल्या सरदारांमार्फत शत्रूचा पराभव करून राज्याचे संरक्षण केले. अहिल्याबाईंनी शेतकऱ्यांसाठी कर सवलती दिल्या, बाजारपेठ उभारल्या, विहीरी व तलाव बांधले. त्यांनी न्यायदानात पारदर्शकता राखली आणि भ्रष्टाचारास थारा दिला नाही. त्यांचा प्रशासन तलवारीपेक्षा अधिक बुद्धी, दूरदृष्टी आणि सेवाभावाने प्रेरित होत्या या खऱ्या अर्थाने राजमाता होत्या.

अहिल्याबाईंनी शेतकऱ्यांना कमी कर लावले, नैसर्गिक आपत्तीत यांची मदत केली. दरीद्री, वंचित वर्गासाठी धान्य वितरणाची व्यवस्था केली. त्यांनी विहीरी, आणि तलाव व पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण केली. विधवा महिलांसाठी त्या आश्रयदात्री ठरल्या. त्यांनी अनेक विधवांना संरक्षण आणि आधार दिला. त्यांच्या दरबारात स्त्रियांनाही सन्मानाने स्थान होते, जो त्या काळात दुर्मिळ होता. त्यांनी शिक्षण, स्वच्छता आणि आरोग्यावर भर दिला.

"कल्याणकारी कामे करुनी
ख्यात ती कुशल प्रशासिका,
मान उंचावली स्त्रियांची,
खऱ्या अर्थाने ती लोकनायिका"



त्यांनी धार्मिक स्थळांवर प्रवास करणाऱ्यांसाठी धर्मशाळा, पाणीटंचाई साठी पाणवठे बांधले. अहिल्याबाई दररोज जनतेच्या तक्रारी ऐकून न्याय देत. त्या अत्यंत न्यायनिष्ठ व नितिमान होत्या. त्यांनी भ्रष्टाचारास थारा दिला नाही. सिंचन, रस्ते, घाट, बाजारपेठ यांचा विकास करून राज्याची आर्थिक भरभराट केली. अहिल्याबाई होळकर यांचे जीवन म्हणजे लोककल्याणाच्या भूतीचे उदाहरण आहे. त्यांच्या प्रत्येक निर्णयामध्ये प्रजेचे हित केंद्रस्थानी होते. त्यांच्या कार्यामुळे आजही राजमाता अहिल्यादेवी या नावाने आदराने स्मरल्या जातात. त्यांच्या लोकाभिमुख कार्यपद्धतीतून आजच्या समाजसेवकांनी आणि प्रशासकांनी प्रेरणा घ्यावी अशी आहे.

"जात धर्म विसरून दाखवला,
मानव सेवेचा मार्ग नवा.
अहिल्याबाई होळकर आपल्या कार्याचा,
निरंतर तेवत राहिल दिवा"

धन्यवाद!

स्पर्धकाचे नाव - कु. उत्कर्ष शंकर निंबाळकर (इ. 7वी)

वयोगट - 13 ते 16 वर्षे

शाळेचे नाव - जिल्हा परिषद केंद्र शाळा, नाटोली
ता. शिराळा, जि. सांगली

निबंधाचे नाव - अहिल्याबाई होळकर यांचे जीवन चरित्र
त्याग, पराक्रम आणि लोककल्याण



॥ श्री ॥

"राण्या असंख्य झाल्या
या जगात,
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्व जिचा आहे या मराठी हृदयाला,
एकच ती महाराणी
अहिल्यादेवी होळकर झाली."

जेव्हा जेव्हा समाजामध्ये अन्याय, अत्याचार, अधर्म वाढतो तेव्हा तेव्हा त्याला संपवणारी शक्ती या जगात जन्म घेते. आणि तेच झालं ३१ मे १७२५ रोजी माणकोजी शिंदे आणि सुशीलाबाई यांच्या पोटी धनगर कुटुंबामध्ये एक कन्या जन्माला आली. या कन्येच्या तेजाने साक्षात सूर्यही लाजला. या कन्येचे नाव 'अहिल्या' असे ठेवण्यात आले.

ही तीच महिला जिने सत्तेचा मंत्र वापरून विकासाचा तंत्र या हिंदुस्थानच्या मातीत रुजविलं, ही तीच अहिल्या जिने 'चुल आणि मुल' समाजव्यवस्थेला झुगारून देऊन एका हातामध्ये शस्त्र आणि दुसऱ्या हातामध्ये शास्त्र घेऊन तब्बल २९ वर्षे आदर्श राज्यकारभार केला. अहिल्याबाईंना लहानपणापासुन्च तलवार चालविणे, भाला फेकणे, युद्ध लढणे या गोष्टींचे प्रशिक्षण आणि शिक्षण दिले जात होते. हीच होती त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाची सुरुवात .....

वयाच्या आठव्या वर्षी शुर, पराक्रमी सरदार मल्हारराव होळकरांचे पुत्र खंडेरावांशी त्यांचा विवाह झाला. मल्हाररावांच्या आशिर्वादाने आणि मार्गदर्शनाने अहिल्याबाईंची वाटचाल सुरू झाली.

अहिल्याबाईंच्या जीवनात जर सर्वात जास्त योगदान कुणाचं असेल तर त्यांचे सासरे मल्हारराव, कारण मल्हारराव म्हणजे सामर्थ्य, मल्हारराव म्हणजे पराक्रम, मल्हारराव म्हणजे विश्वास, मल्हारराव अहिल्याबाई यांच्या पाठीवर आयुष्यभर पडत असलेली कौतुकाची थाप. मल्हाररावांनी आपल्या आठ वर्षाच्या सुनेला शिकवल युद्ध कस लढायच, युद्ध रणांगणामध्ये सुरू होते, तोफांचे भयानक आवाज होतात तेव्हा त्या निधड्या छातीने कस सामोरे जावं.



"मधुर होती जिची वाणी,
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी...
गाजवल्या जिने दिशा दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला
खरच सीमा नाही.

अहिल्याबाईंचे पती खंडेराव हे देखील एक पराक्रमी योद्धा होते. १७५४ मध्ये कुंबेराच्या लढाईत त्यांना वीरमरण आले. नवरा मेल्यानंतर स्त्रीला सती जायची प्रथा त्या काळी होती परंतु मल्हारराव्याच्या सांगण्यावरून अहिल्याबाई सती गेल्या नाहीत. पण सती जाण्याची जी अनिष्ट परंपरा होती ती ही अहिल्याबाईनी लयाडण्याचे काम केले.

होळकरांनी हे राज्य कुणाची गुलामगिरी करून मिळवले नाही तर तलवारीच्या पातीवर आणि मनगटाच्या जोरावर होळकरांच्या वंशजांनी हे राज्य उभे केले. अलापर्यंत सर्वात जास्त संकट कोणत्या राज्यकर्त्यावर आले असतील तर ते 'अहिल्याबाई होळकरांवर.' अहिल्यादेवीच्या हयातीतच नवरा, मुलगा, सासरा, जावई याचे निधन झाल. राज्यकारभार पाहण्यासाठी कुणी पुरुषच उरला नाही. अशा वेळी एकट्या अहिल्या देवींनी राज्य करण्याचा निर्णय घेतला याच संधीचा फायदा घेत राघोबा पेशवे आपली ५०,००० ची फौज घेऊन अहिल्यादेवींच्या राज्यावर चालुन आला परंतु अहिल्यादेवींची दुरदृष्टी बघा ना, त्यांनी आपल्या राज्यातील महिलांना तलवार चालविणे आणि इतर युद्धकला शिकविल्या आणि संपूर्ण भारतात महिलांची पहिली फौज तयार करणाऱ्या अहिल्याबाई होळकरच होत्या. परंतु फक्त तलवार हातात घेऊन चालत नाही तर सोबत बुद्धीकौशल्यही लागत म्हणूनच त्यांनी राघोबा पेशव्यांना पत्र लिहिले, 'मी एकटी आहे अबला आहे असे समजू नकोस. जेव्हा तलवार खांद्यावर घेऊन उभी राहील ना, तेव्हा प्रचंड जड जाईल तुम्हाला आपली भेट लवकरच रणांगणात होईल. परंतु मी हरले तर मला कुणी नाव परंतु तुम्ही हरलात तर जगा तुम्हास नाव ठेवेल की तुम्ही एका महिलेकडून हरलात.'



राघोबा पेशव्यांनी माघार पत्करली. शत्रुला रणात पराभूत करण्यामाघी मनात पराभूत करायच असत कारण मनात पराभूत झालेला शत्रु रणात उभा राहुच शकत नाही. हे मानसशास्त्र त्याना अवगत होते.

" त्यागालाही लाज वाटावी
इतका महान त्याग तुझा
तुझ्या त्यागाने जागा झाला
आम्हा लेकराचा अभिमान."

हा इतिहास होता स्त्री शक्तीच्या जाज्वल्याचा. हा इतिहास होता महान अहिल्यादेवी होळकराचा. आणि हेच तेजस्वी रत्न १७९५ मध्ये अनंतात विलीन झाले.

नाव -: हर्षिता शिरीष पांडे.
वयोगट २ -: १३ ते १६ वर्षे (माध्यमिक गट)
शाळेचे नाव -: लाल बहादुर शास्त्री - माध्यमिक विद्यालय, उदगीर.
मो. नं. -: 8087565203
विषय -: राजमाता अहिल्यादेवी - स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.



नाव :- भक्ती सचिन रिठे
वर्ग :- ४ वा मो न :- 9320047327
शाळेचे नाव :- श्री सकलेचा विद्यालय वाशिम
दि :- 29/05/2025

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका

"मधुर होती ज्यांची वाणी,
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी...
गाजवल्या तिने दिशा-दाही,
तिच्या उच्चुंग कार्याला सरच कधीच नाही...
मुखात गाईली 'आमची जीजाता',
कारण उत्तम शासक, तत्वज्ञानी राणी होती
अहिल्या राजमाता..."

एक अतिशय दानशूर, कर्तृत्वान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव सगळ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी गेले आहे. त्यांचा जन्म चौंडी या छोट्याशा गावात माणकोजी व सुशीलाबाई शिंदे या दांपत्यापोटी झाला. हजार समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईचे सगळ्र बघायचं आल्या तर्वी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी, खंडेरावाशी आले. खंडेरावाच्या आईचे नाव गौतमीबाई होते. कुशाग्र बुद्धीची देणगी त्यामुळेच्या या सुनबाईवर सासऱ्यांचा मोठा विश्वास होता आणि खूप महत्वाचा पत्रव्यवहार ते अहिल्याबाईंवरच सोपवीत असत. खंडेरावापासून त्यांना दोन अपत्ये झाली. मालेराव हा मुलगा आणि मुक्ताबाई ही कन्या. अहिल्याबाईना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जाणार होत्या पण सासरे म्हणाले, प्रजाहितासाठी तरी तुम्ही सती जाऊ नये. हे राज्य सांभाळायचे आहे."



अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात अमर झाले त्याचा त्यांची धर्मपरायण आणि उदारमती कारणीभूत ठरली. बाई कारभार करणार - ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी सपशेल खोटी ठरविली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांचा जुना दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता. राघोबादादांशी त्यांनी अहिल्याबाईविरुद्ध संधान बांधले आणि इंदूर बळकावण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले.

अहिल्याबाईंना हे कळले तेव्हा त्या युद्धास तयार असल्याचे त्यांनी राघोबादादास कळविले. राघोबांना ते अडचणीचे झाले. हरलो तर बदनामी झालीच आणि जिंकलो तरी बाईशी युद्ध करण्यास कोणती मोठी सबब की शेवटी राघोबांना माघार घ्यावी लागली त्यांचा अहंम पाडणाऱ्या अहिल्याबाईंनी इंदुरला केल्या अशा रीतीने बाईच्या लौकिकात आणखीच भर पडली. अहिल्याबाईच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय घटना त्यांचा लौकिक वाढविणारी आहे. आपली कन्या मुक्ताबाई हिचे स्वयंवर घोषित स्वयंवर घोषित करताना त्यांनी जाहीर केले की, जो कोणी चोर, लुटारू, दरोडेखोर यांचा राज्यात बंदोबस्त करील, त्या शूर व्यक्तीशी मुक्ताबाईचा विवाह लावला जाईल. त्यावेळी जातपात बाधीतली जाणार नाही. हा अलौकिक विचार जाहीर करण्या त्या बाबतच्या नाहीत, तर त्यांनी कृतीही तशीच केली. यशवंतराव फणसे या गुणी, शूर तरुणाशी त्यांनी मुक्ताचा विवाह करून दिला.

अहिल्याबाई एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. पुर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. करपद्धती सोप्या केली; मात्र शेतकऱ्यांकडून सारा हेणे चालू ठेवले. पाटील - कुलकर्ण्यांच्या वतन हक्कांचे संरक्षण करून गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. त्यावेळी डोंगर कुत्र्यांकडून वित्त व गोड अदिवासी मावळ्यांना उपद्रव देत आणि त्यांच्याकडून शीतकवडी नावाचा कर वसूल करीत. तेव्हा बाईंनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांचा कर देण्याचा हक्क मान्य केला. त्याच्याकडून पडिक जमिनींची लागवड करून होतकरी. शिवाय त्यांना विशिष्ट मुदत देऊन दिली जमीन - कसर पट्ट्याने देण्याची पद्धत केली.



Page No.:
Date:
shape

त्या विरेलढे बांधून दिल्या. अन्हाकयात राज्यातून प्रवास करणाऱ्यासाठी पाणपोया, धर्मशाळा, पांथशाळा, आश्रयशाळा बांधल्या जनावरांसाठी डोह्या बांधून घेतल्या. पशुपक्ष्यांसाठी रुग्णोपचारांची व्यवस्था केली. सर्पदंशावर त्वरीतपणे उपचार व्हावेत म्हणून हकीम-वैद्य नेमले. स्त्रियांना सुरक्षित स्नानासाठी, कपडे बदलण्यासाठी बंदिस्त ओवऱ्या बांधल्या. मुंग्यांना साखर आणि जलचरांना कणकेच्या गोळ्या खाऊ घालण्यापर्यंत त्यांची दानधर्मी वृत्ती होती. गोरगरीबांना अन्नवस्त्रांचे दान करीत, कपडे वाटत, थंडीच्या दिवसात शेकोट्या वाटल्या जात. बाईंनी प्रमुख तीर्थक्षेत्री विशेषत: अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, हृषिकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंडी येथे मंदिरे बांधली. शिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढानागनाथ, काशी विश्वेश्वर, विष्णुपाद, महाकालेश्वर अशी मंदिरांचा जीर्णोद्धार केला.

अवेरच्या दिवसांत त्यांना दुःख आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांचे दोन भाऊ वारले. मुलीच्या मुलाला नाथ्याला घेऊन वाड्यात गेला. (१७९०), तुकोजी होळकरांची सून आनंदीबाईचे देहावसान झाले. त्यानंतर जवाई राघवतराव फणसे अचानक गेले आणी मुक्ताबाई सती गेली.


Date:
shape.
जात - धर्म विसरून दाखवलय ,
ममता सेतीचा मार्ग वला ...
अहिल्याबाई होळकर आपल्या कार्याचा ,
निरंतर



नाव :- कु. अस्मि अविनाश साखळकर.
वय :- १४ वर्ष

* पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - *
एक आदर्श स्त्री शासिका...

इ. स. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाई-दरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हारराव यांचा अहिल्याबाईच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते.

पूर्वीच शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्यूनंतर, अहिल्यादेवींनी स्वतःचं राज्यकारभार पाहून देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते.

अहिल्यादेवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत, असे म्हणतात.

पेशव्यांनी परवानगी दिल्यावर, ज्या माणसाने तिला विरोध केला होता, त्यास चाकरीत घेऊन, तुकोजीराव होळकर (मल्हाररावांचा दत्तक पुत्र) यास सैन्याचा मुख्य करून, अहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यात प्रयाण केले.

अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही, त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही, इंदूर या खेड्याचा विकास करून त्याचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे, हे अहिल्यादेवींनी केलेले फार मोठे काम होते.

अहिल्यादेवींनी जनतेच्या / रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विद्वानांना प्रतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यास मदत केली. अहिल्यादेवीच्या राज्यात कोणीही विद्वान मुलाला दत्तक देऊ शकत असे एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक होण्याच्या मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तकविधानाच्या कार्यक्रम स्वत: आयोजित करून, रोख सर कपडे व दागिन्यांचा जाहीर दिला.

भिल्ल व गोंड या राज्याच्या सिमेवर असलेल्या जमातींमधील वाद अहिल्यादेवी सोडवू शकल्या नाहीत. तरीही त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरुपयोगी जमीन दिली आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा कर घेण्याचा अधिकार दिला. यासाठी राघोगंज सुभ्यावर नवापुर या ठिकाणी ठिंगळे भिल्ल सरदार यांना अधिकार दिले त्यामुळे भिल्ल जमाती होळकरांच्या सैन्यात आले व त्यांनी सुरते वर वचक बसवला.

ज्या काळी दळणवळणाची साधने फारच कमी होती किंवा म्हटले तर नव्हती अशी परिस्थिती होती. अशा खडतर काळात त्यांनी भारतातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी व राज्यात मंदिरे, धर्मशाळा, तलाव, तिहिरी, पाणपोई, घाट अशी अनेक समाज उपयोगी कामे केली.

वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संस्कृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोर-गरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दि त्यांच्या कामगिरीचा हा दुहेरी बाणा निश्चितच अभिमानास्पद आहे.

ज्या प्रमाणे अहिल्यादेवी लोककल्याण आणि समाज सुधारना करीत त्याच प्रमाणे लोकांमध्ये समानता आणण्याच काम करीत अहिल्यादेवींनी आपल्या सैन्यामध्ये पुरुषांना संधी देत त्याच प्रमाणे महिलांनाही संधी मिळत आणि म्हणूनच

अहिल्यादेवींनी सैन्यामध्ये महिलांचीही एक मोठी तुकडी खास सामावून घेतली आणि म्हणूनच अहिल्यादेवी यांना समान न्याय करणाऱ्या 'न्यायदेवता' म्हणून ओळखल्ल जात.

'शेतकरी सुखी तर जग सुखी' या संकल्पनेतून शेतकऱ्यांना जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहिरी बांधल्या. शेतकऱ्यांना गोपालचे महत्त्व पटवून प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवून आणले.

या काळात सती जाण्याची मोठी रूढी व परंपरा होती. सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप असा समज समाजात रूढ होता. 'रामायण' आणि 'महाभारत' यामध्ये अनेक युवत्या होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाहीत असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले.

त्या काळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेची चोर, दरोडेखोर व भिल्ल लुटमार करीत असत. अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशु व पक्षी, गायी, म्हशी आणि शेत जमीनी दिल्या व त्यांचे मत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला.

भिल्ल लोकांना भिलकवाडी कर घेण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रस्त करणाऱ्या या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा निर्माण केला.

अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार म्हणून त्याला तुरुंगात डांबले. त्यांनी महेश्वर येथे संस्कृत पाठशाळा सुरू केली. अन्नछत्रे घातली. अनेक



ठिकाणी मंदिरे बांधली. गुजरात येथील सोरटी सोमनाथ. च्या मंदिराचा जिर्णोद्धार केला इत्यादी पुण्यसंचयाचे कामे अहिल्याबाई करत होत्या.

अशाप्रकारे 'पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर' यांनी अत्यंत उत्कृष्ट प्रकारे राज्यकारभार पाहून रयतेला सुखी केले. त्यामुळे अहिल्याबाई होळकर या एक अत्यंत उत्कृष्ट अशा स्त्री शासिका होत्या. त्या या आत्ताच्या काळातील मुलींसाठी एक आदर्श व्यक्तिमत्व होत्या. अशा या महान आदर्श स्त्री रत्नालेच 'पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर' यांना माझा कोटी कोटी प्रणाम।



Biography of Ahilyabai : Sacrifice, valor and public welfare

Ahilyabai Holkar was a remarkable queen of the Malwa kingdom in Maratha Empire, born on May 31, 1725 in chondi Maharashtra. Her life was marked by personal tragedies, including the deaths of her husband, Khanderao Holkar in 1754, her father-in-law Malhar Rao Holkar in 1766, and her son Male Rao Holkar in 1767. Despite these challenges, she emerged as a capable and compassionate ruler, earning the respected admiration of her people. She implemed policies that promoted social welfare, infrastructure development and education. She is remembered as an intelligent, sharp thinking and spontaneous ruler.

After her husband's death, she chose not to remarry and instead dedicated herself to governance and public welfare. She faced the death of her son and father-in-law, which could have been devasting. Despite facing opposition and challenges, she persevered and maintained stability in her kingdom.

She personally led armies into battles, showcasing her bravery and strategic thinking, she protected her kingdom from external threats and maintained stability ensuring the safety and prosperity of her people. She implemented policies and reforms often taking bold decisions to promote the welfare of her subject. She prioritized her responsibilities as a ruler and protected her kingdom. She faced challenges and opposition with determination and resilience. She upheld justice and fairness, ensuring her people were treated equitably.

She built roads, bridges, temples, ghats and public buildings improving connectivity and facilitating trade. She constructed wells, tanks and water rescurvairs ensuring access to clean water for her people. She supported education and healthcare initiatives, recognizing their importance for social development. She provided for the welfare of social development.



She provided for the welfare of widows, orphans and the poor, demonstrating her compassion and empathy. Kashi Vishwanath Temple and Maheshwar these are welfare projects. Ahilyabai's legacy serves as a model for effective governance and public welfare, inspiring future generations. She implemented policies promoting social welfare, infrastructure development and education. She personally led armies into battle and appointed Tukoji Rao Holkar as her military commander. She supported art, literature, and music and built numerous public works projects. She established a textile industry in Maheshwar, famous for its Maheshwari sarees. She established hospitals, rest houses and free food distribution centers for the needy, prioritizing public health.

Her sacrifices were driven by her commitment to her people and her kingdom. She prioritized their demonstraing remarkable courage and resilience. Ahilyabai valor serves as an inspiration demonstrating the impact of strong leadership and courageous decision making. Her public welfare initiveshad a lasting impact on her kingdom, earning her the respect and admiration of her people. Ahilyabai Holkar passed away on August 13, 1795 leaving behind a legacy of enlightened leadership and compassionate governance. Her life and achievements continue to inspire people today.

Thank you !!!



Name - Prajkta Virendra Jolapure

Class - 10th

Age - 16

Mobile - 7588840090 / 8237371008

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर



नाव - प्राची संपत सपकाळ
वय - १८ वर्षे
लिंग - स्त्री
शिक्षण - १२ वी पास
कॉलेजचे नाव - राजा रघुनाथराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, भोर
गाव - वरवडी - पाले
संपर्क क्रमांक - 8261991627
ई-मेल आयडी - prachisapkal152007@gmail.com
स्पर्धेसाठी भाषा - मराठी
निवडलेला विषय - अहिल्याबाईंचे जीवनचरित्र.
माहितीचा स्त्रोत - सोशल मिडिया.



अहिल्याबाईंचं जीवनचरित्र : त्याग, पराक्रम आणि लोककल्याण

भारतीय इतिहासात अनेक शोर स्त्रिया होऊन गेल्या आहेत, ज्यांनी आपल्या कार्यांनी, धैर्याने व दूरदृष्टीने समाजाला नवा मार्ग दाखवला. अशाच स्त्रियांमध्ये अहिल्याबाई होळकर यांचे नाव अत्यंत सन्मानाने घेतले जाते. त्या केवळ एका साम्राज्याच्या राणी नव्हत्या, तर त्या एक आदर्श प्रशासक, लोककल्याणकारी नेत्या आणि समर्पित धर्मप्रेमीही होत्या. अहिल्याबाईंचे जीवन म्हणजे त्याग, पराक्रम आणि लोकसेवेचे प्रतीक आहे.

अहिल्याबाईंचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यातील चौंडी या छोट्याशा गावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव मानकोजी शिंदे होते. त्या महान असल्यापासूनच शांत, संयमी आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्या काळात मुलींना शिक्षण दिले जात नव्हते, परंतु त्यांच्या वडिलांनी त्यांना वाचन, लेखन व धार्मिक ग्रंथांचे ज्ञान दिले. त्यांचे जीवन एका मोठ्या वळणावर आले, जेव्हा मल्हारराव होळकर, इंदूरचे सरदार, यांनी त्यांना त्यांच्या मुलगा खंडेराव होळकर याच्याशी विवाह करण्यासाठी निवडले. या विवाहामुळे अहिल्याबाई होळकर घराण्यातील सून बनल्या.

अहिल्याबाईंच्या वैयक्तिक जीवनात दुःखाची रांग होती. १७५४ मध्ये पती खंडेराव युद्धात वीरमरण पावले, आणि नंतर १७६६ मध्ये त्यांचा एकुलता एक मुलगा मालेरावही मरण पावला. हे सगळे दुःख त्यांनी अत्यंत धैर्याने पेलले. विधवा होऊनही त्यांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला नाही, तर लोकसेवेचा मार्ग निवडला. त्यांनी समाजाला एक संदेश दिला की दुःखातही कार्य करत राहणं हेच खरं जीवन आहे.



पती आणि मुलाच्या मृत्यूनंतर मल्हाररावांनी त्यांच्या कार्यक्षमतेवर विश्वास ठेवून त्यांना राज्यकारभारात उतरवले. मल्हाररावांच्या मृत्यूनंतर १७६७ मध्ये अहिल्याबाई होळकर स्वत: राज्यकारभार सांभाळू लागल्या. त्यांनी न्याय, अर्थव्यवस्था, संरक्षण आणि प्रशासन या सर्व बाबतीत कुशलतेचे दर्शन घडवले. त्यांनी एक सशक्त सैन्य उभे केले आणि आपले राज्य सुरक्षित ठेवले. आपत्तीच्या वेळी गरजूंना मदत केली. शेतकऱ्यांसाठी कर कमी केले, आणि व्यापार, शेती यांना चालना दिली. त्यांनी आपल्या राज्यात शांतता प्रस्थापित केली आणि प्रजा सुखी केली.

अहिल्याबाईंची खरी ओळख त्यांच्यामुळे घडलेल्या लोककल्याणकारी कार्यांमुळे झाली. त्यांनी केवळ इंदूर व माळवा प्रदेशातच नव्हे तर संपूर्ण भारतभर अनेक धर्मशाळा, अन्नछत्रे, विहिरी, तलाव आणि मंदिरे बांधली. त्यांनी काशीतील काशी विश्वनाथ मंदिर, अयोध्येतील राममंदिर, सोमनाथ, रामेश्वर, बद्रीनाथ, द्वारका अशा अनेक धर्मशाळा, अन्नछत्रे, पवित्र स्थळांवर मंदिरे उभारली. त्यांच्या कार्याचा विस्तार भारताच्या कोपऱ्या-कोपऱ्यापर्यंत पोहचला होता. त्यांच्या राजवटीत स्त्रियांसाठीही विशेष योजना होत्या. विधवांसाठी संरक्षण, शिक्षणासाठी प्रोत्साहन आणि स्त्री सन्मानाच्या नियमांचे पालन करण्यात येत होते.

अहिल्याबाई अत्यंत साध्वी, विनम्र व धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. त्यांनी इंदूरमध्ये महेश्वर ही आपली राजधानी केली. तिथे त्यांनी न्यायालय, मंदिर, वसाहती आणि सार्वजनिक उपयोगाच्या अनेक सुविधा उभारल्या. त्या दररोज प्रजेशी संवाद साधत आणि न्याय देत. न्यायाच्या बाबतीत त्या अत्यंत कठोर होत्या, पण त्यातही करुणा असायची.



अहिल्याबाई होळकर यांचे निधन १३ ऑगस्ट १७९५ रोजी झाले. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांचा लौकिक कायम राहिला. आजही त्यांना 'राजमाता', 'लोकमाता' म्हणून ओळखले जाते. त्यांच्या नावाने आजही भारतातील अनेक ठिकाणी रस्ते, स्मारके आणि शिक्षणसंस्था आहेत.

अहिल्याबाई होळकर यांचे जीवन हे भारतीय स्त्रीशक्तीचा उत्कृष्ट नमुना आहे. त्यांचा त्याग, पराक्रम आणि लोककल्याणाची भावना आजही प्रत्येकाला प्रेरणा देते. त्यांनी दाखवलेला आदर्श मार्ग समाजसेवा, धर्मनिष्ठा व उत्तम नेतृत्व यांचा आदर्श संगम आहे. त्यांचे जीवन सांगते की संकटे आली तरी आपण थांबू नये, तर त्या संकटांवर मात करून समाजासाठी कार्यरत राहावे.

अहिल्याबाईंचे जीवन म्हणजे एक अमर गाथा - स्त्रीशक्तीची, सेवा आणि नेतृत्वाची!



नाव :- गेळवंते सृष्टी दत्तात्रय
शाळा :- कौशल्या विद्यामंदिर पाटेगाव
इयत्ता :- 10 वी
विषय :- पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व....
मो.नं :- 9657144480

मनगटात ताकत तयांच्या
तलवारीत आग होती।
इंग्रजांनाही दाद न देण्याची
जिद्दच त्यांची न्यारी होती,
राणी असूनही वेगळी
जिची छाप होती,
अशी राणी अहिल्याबाई होती।

अहिल्याबाई होळकर या एक महान भारतीय शासिका आणि सामाजिक सुधारिका होत्या. त्यांचे राज्यकारभार आणि सामाजिक कार्य आजही लोकांना प्रेरणा देत आहेत. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी आणि सामाजिक विकासासाठी महत्त्व-पूर्ण योगदान दिले. आधुनिक भारतासाठी त्यांचे नेतृत्व प्रेरणादायी आहे. त्यांनी आपले राज्य महेश्वर येथे नर्मदा नदीच्या काठी स्थापन केले. त्यांनी आपल्या राज्य कारभारात न्याय, समानता, आणि शांतता यांसारख्या मूल्यांवर भर दिला.

अहिल्याबाई होळकर यांचे नेतृत्व आजही लोकांना प्रेरणा देत आहे. त्यांनी लोकांना सामाजिक सुधारणांसाठी प्रेरित केले. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी अनेक धार्मिक स्थळांची निर्मिती केली. ज्यात मंदिरांचा समावेश होतो. त्यांनी लोकांना पाणी आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. त्यांनी सार्वजनिक कामांवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी लोकांना रोजगार मिळवण्यासाठी उद्योगांना प्रोत्साहन दिले. त्यांनी शेती आणि व्यापार यांमध्ये सुधारणा केल्या



अहिल्याबाई होळकर यांचा जन्म 1703 मध्ये महेश्वर येथे झाला. त्यांच्या आईचे नाव साहिबबाई आणि वडिल यांचे नाव होळकर होते. त्यांच्या बालपणातील शिक्षणामुळे त्यांना चांगले ज्ञान प्राप्त झाले. आणि त्यांनी अनेक भाषा आणि कला शिकल्या. त्यांच्या राज्यकारभारात त्यांनी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी लोकांना शिक्षण, आरोग्य, आणि आर्थिक विकासासाठी प्रेरित केले. त्यांनी आपल्या राज्याला एक सुंदर आणि विकसित राज्य बनवले. त्यांचे नाव इतिहासात नेहमीच आदराने घेतले जाईल.

होळकरांची सुन
होती बहुगुणी !
शिक्षणाची ओढ
होती लहानपणी !!
गरज ओळखूनी
सुखावले सर्व जनी !
अशी जाहली दूरदृष्टी
एक मर्दानी !!

अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या जीवनकालात अनेक सामाजिक आणि राजकीय सुधारणा केल्या. त्यांचे कार्य आजही लोकांना प्रेरणा देत आहे. होळकर घराण्याच्या दूरदर्शी राणी अहिल्याबाई होळकर, प्रबुद्ध नेतृत्व आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाचे एक चिरस्थायी प्रतीक आहेत. ज्ञान आणि करुणेने राज्य करत, त्यांनी आपले राज्य समृद्ध, न्याय आणि स्थापत्य वैभवाच्या केंद्रात रूपांतरित केले. धर्मावरील त्यांची अढळ भक्ती, प्रशासकीय बुद्धिमत्तेसह, शक्ती आणि परोपकाराचे संतुलन साधणाऱ्या शासनाचा पाया रचला. खरे नेतृत्व हे अधिकार किंवा संसाधनांबद्दल नसते; ते प्रेरणा देणारा आणि सक्षम करणारा वारसा निर्माण करण्याबद्दल असते. इतिहास अशा नेत्यांनी भरलेला आहे. ज्यांनी त्यांच्या दृष्टिकोनातून आणि मूल्यांद्वारे प्रतिष्ठित वारसा घडवला...



डोक्यावरचा पदर,
ढळला नाही ज्यांच्या,
शहिल्या पती निधनानंतर
खंबीर ज्या,
डोळ्यात दिसे
सात्विकतेचा भाव त्यांच्या,
धन्य अहिल्याबाई
होळकर त्या,

पुण्यश्लोक अहिल्याबाईंचे अतुलनीय योगदान मंदिरांचे पुनरूज्जीवन करणे, समुदायांना सक्षम करणे आणि सांस्कृतिक अभिमान वाढवणे हे केवळ भक्तीचे कार्य नव्हते; ते नेतृत्वाचे धाडसी उद्घोषणा होते. त्यांनी केवळ संरचनांची पुनर्बांधणी केली नाही; त्यांनी एका संस्कृतीची ओळख पुन्हा निर्माण केली. मूल्यांमध्ये रुजलेले नेतृत्व दडपशाहीला आव्हान देऊ शकते, कथांना आकार देऊ शकते आणि पिढ्यांना इतिहासात त्यांचे योग्य स्थान परत मिळवण्यासाठी प्रेरित करू शकते. याची त्यांची वारसा एक स्पष्ट आठवण करून देते.

प्रामाणिकपणा: स्वतःच्या मूल्यांशी खरे राहणे, दृष्टी: दीर्घकालीन परिणाम घडवणे, नवचिकत आव्हानांना संधींमध्ये रूपांतरित करणे. सक्षमीकरण: इतरांना वाढवण्यात आणि भरभराट करण्यास सक्षम करणे.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नेतृत्व हे या घटकांचे एक उत्तम मिश्रण होते, ज्यामुळे भारताच्या सर्वात दूरदर्शी आणि सहानुभूतीशील शासकांपैकी एक म्हणून त्यांचा वारसा मजबूत झाला. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी आव्हानात्मक परिस्थितीत सत्ता हाती घेतली. १८ व्या शतकात नेतृत्वाच्या भूमिकेत महिलांना सामाजिक विरोध असूनही, त्यांनी होळकर राज्याची सूत्रे हाती घेतली. त्यांच्या कारकिर्दीत कर्तव्याची खोल भावना, न्यायाप्रती अढळ वचनबद्धता आणि परिवर्तनकारी प्रशासन होते.



Name : Mahalaxmi Pradeep Nagawane
Class : 9th

M T W T F S S
Page No.:
Date:
YOUVA

Biography of Ahilyabai Holkar : Sacrifice, Valor and Public Welfare

Ahilyabai Holkar is a feminist figure who devoted her life to defeating patrichal aggression and establishing women's rights at a time when women were confined to the four walls of their houses. Ahilyabai was the hereditary noble Queen of the Maratha Empire, who created history by establishing an ideal leadership for her kingdom during her three decade region over Malwa.

Ahilyabai was born in the village of chondi in Ahmednagar in Maharashtra. Her father Mankoji Shinde was the patil of the village. That was the time when women did not go to shool, but Ahilya's father taught her to read and write. Her appearance on the historical scene was somewhat of fluke. On his way to Pune, Malhar Rao Holkar stopped in chaundi and saw an eight-year-old Ahilyabai at temple helping the hungry and impoverished. He decided to ask the young lady for her hand in marriage for his son. At the infant age of eight, she married Khanderao Holkar in 1733.

Khanderao, her husband, was killed at the battle of kumber in 1754, leaving her widow at the tender age of 29. When Ahilyabai was set to do Sati, her father-in-law, Malhar Rao Holkar had been her most close supporter he forbade her from doing so. However, when Ahilyabai's father-in-law died in 1766, barely 12 years after his son Khanderao died, her empire fell apart like a pack of cards



Imagine a lady who lost her spouse in battle and then lost her only supporter after a few years. A large numbers of emperors where preparing for battle. Internal enemies were also present. There was a lot of hostility when she stepped forth, but she wasn't scared.

While some in the kingdom objected to her ascension to the throne, her army of Holkars stood by her side and backed their queen's leadership. Only a year into her reign, the courageous Holkar queen was seen defending her realm - fighting off attackers and nail to prevent Malwa from being stolen. She led armies into war, armed with swords and weapons. Subhedar Tukojirao was her military confidante, and she selected him as the head of the military.

She built temples at Srinagar, Haridwar, kedarnath, Badrinath, Rishikesh, Prayaga, Varanasi, Naimisharanya, Puri, Rameshwaram, Somnath, Nasik, Omkareshwar, Mahabaleshwar, Pune, Indore, Srisailam, Udipi, Gokarna, Khatmandu etc. She built hundreds of temple

From Badrinath, Dwarka, Omkareshwar to Puri, Graya, Rameshwaram, every holy pilgrimage place in india had a contribution, in one way or another, from Ahilyabai Holkar.

Ahilyabai's rule was characterized by just and wise governance. She established courts, held daily public audiences to address citizens grievances, and ensured equitable administration of justice. She championed womens education, widow ~~re~~marriage, and worked towards the eradication of social evils like sati and untouchability.

Ahilyabai's Contributions to Malwa's development earned her the title of "The Philosopher Queen". Her legacy continues to inspire, and her reign is remembered as period of Peace, Prosperity, and progress.

वयोगट 13-16

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

नाव :- वेदिका बालाजी मामडगे.
पत्ता :- नवीन रेणापूर नाका, लातूर.
शाळेचे नाव :- रेनिसन्स इंटरनॅशनल सी.बी.एस.ई स्कूल, लातूर.
संपर्क क्रमांक :- 7588635331
email-ID :- mamdagevedika@gmail.com

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या
जयंती निमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धा.

वयोगट :- ~~१८~~ १३ ते १६ वर्षे (माध्यमिक गट)
स्पर्धेचा विषय :- १३. अहिल्याबाई होळकर भारताच्या इतिहासातील
तेजस्वी अध्याय.

"राण्या असंख्य साल्या या जगात,
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्व जिचा आहे या मराठी हृदयाला,
एकच ती महाराणी अहिल्यादेवी
होळकरचं साली !! "

ज्या मनगटात बळ, बुध्दी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तृत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर. सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, गोरगरिबांन विषयी कळवळा, हुंडा पध्दतीचे उच्चाटन, अनिष्ठ चालीरीती रूढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या खेड्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी



झाला.

माणकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतील असून देखील ते विद्वान व दूरदर्शी गृहस्थ होते. अठराव्या शतकामध्ये आजच्या सारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना देखील त्यांनी अहिल्याला शिक्षणाची घरीच व्यवस्था केली. अवघ्या आठ वर्षाची असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांचा बारा वर्षाचा एकुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहिल्याचा विवाह २० मे १७३३ रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला. लग्नानंतर लगेच आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांची मने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबारची मोडी मराठी लिहिणे, वाचणे, गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या. तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युध्याचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्याची सामाजिक व राजकिय बुध्दी ही परिपक्व झाली.

इ.स. १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याचा शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे. नंतरचे २९ वर्षे अत्यंत यशस्वीपणे त्यांच्या कल्याणकारी योजना काय असू शकतात आणि त्या कशा राबवल्या जाव्यात हे त्यांनी दाखवून दिले. त्यांच्या सासऱ्याची व मुलाची मृत्यू १७६६-६७ मध्ये झाली. अशी एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईंनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्वाप्रमाणे राज्य केले.

त्यांनी आपल्या आयुष्यात लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न घालता संपूर्ण भारतात कार्य केलेले आहे. संपूर्ण भारतात अनेक विहीरी, तलाव, कुंड, घाट, बांधले आहेत. रस्ते, पूल निर्माण केले आहेत. उद्योगधंद्यांना व



त्याच्या विकसाला प्राधान्य दिले. कारागीर, मजूर, विणकर, कलावंत, साहित्यिक अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, पैसा, घर इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या. राज्यात पशुपक्षी यांना चरण्यासाठी त्यांनी कुरणे राखली. मुंग्यांना साखर, माश्यांना कणकेचा गोळा, उन्हाळ्यात वाटसरूंना पिण्यासाठी पाणपेया, हिवाळ्यात गरजूंना गरम कपडे यांची सोय केली. आपल्या राज्यात सूक्ष्म जीवही उपाशी राहू ~~नयेत~~ नयेत यासाठी दक्षता घेतली.

सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे, मशिदी, दर्गे व विहार बांधली. तर काही मंदीरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. मजुरांना काम मिळाले व सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. अहिल्याबाई ह्या समाजसुधारक होत्या. त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवताधर्म. अशी एक ना अनेक विधायक कामे ~~करून~~ संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या. त्यांच्या जयंती निमित्त त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन...!

धन्यवाद!!



अहिल्यादेवी होळकर – न्याय, भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम

भारतीय इतिहासात काही थोर व्यक्तिमत्त्वे अशी होऊन गेली, ज्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित नाही, तर पुढच्या अनेक पिढ्यांसाठी तो प्रेरणादायी आहे. अशाच महान स्त्री शासकांपैकी एक म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर. त्यांच्या जीवनात न्याय, भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम होता. त्यांचे संपूर्ण जीवन हे एक आदर्श राज्यकर्त्याच्या गुणांचा जिवंत अनुभव होता. जीवनात सर्व गोष्टी आपणास मिळाव्या त्यासाठी सामान्य मानव झटत असतो, परंतु जे जगातील सर्वांना सर्व व समान गोष्टी मिळाव्यात त्या साठी झटतात तेच असामान्य व महान व्यक्ति ठरतात त्या पैकीच एक अहिल्यादेवी होत्या.

अहिल्याबाई होळकर त्या एक न्यायप्रिय शासिका होत्या. अहिल्यादेवी दररोज स्वतः न्यायसभा भरवत व जनतेच्या तक्रारी स्वतः समजून घेत. त्यांच्या दृष्टीने प्रत्येक माणूस त्यांना महत्त्वाचा होता, मग तो कोणत्याही जातीचा असो वा धर्माचा असो. मागील काळात स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविषयी त्या अतिशय सजग होत्या. एखाद्या स्त्रीवर अन्याय झाला तर त्या फक्त शासक म्हणून नव्हे, तर आईच्या मायेने त्या प्रकरणात लक्ष घालत आणि दोषींना कठोर शिक्षा करत. त्यांच्या राज्यात लोक म्हणत, "राजमाता आहे, म्हणून न्याय आहे." या शब्दांतून त्यांच्या न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास दिसून येतो. त्यांनी न्यायाला केवळ शासकीय कर्तव्य न मानता, धर्म आणि माणुसकीचा एक अविभाज्य भाग मानले. न्याय हा केवळ कायदा, कलमे, कारवाई यांच्याशीच संलग्न नसून विश्वास, कठोरता व समानता यांच्याशीही तो आधारलेला आहे, हे अहिल्यादेवी होळकर



यांनी त्यांच्या न्याय व्यवस्थेतून पटवून दिले.

अहिल्याबाई होळकर यांचे जीवन म्हणजे श्रद्धेच्या गंगेचे पवित्र प्रवाह होते. त्यांचे चरित्र आणि भक्ति पुण्य व पावन होते या कारणानेच त्यांच्या नावाआधी "पुण्यश्लोक" जोडले जाते. खरी भक्ती असणारा मनुष्य सर्वात देव पाहतो व सर्वांशी देवत्वाच्या भावनेने राहतो आणि असा मनुष्य जेव्हा एक शासक बनतो तेव्हा तो प्रजेसाठी असाधारण असे कार्य करू शकतो, हे अहिल्या-देवींनी सर्वांना लक्षात आणून दिले. सत्ता, वैभव, दुःख आणि जबाबदाऱ्या या सर्वांमध्येही त्यांनी भक्तीचा दीप सतत तेवत ठेवला. त्यांनी देशभरात हजारो मंदिरे, घाट, तीर्थस्थळे बांधली व जीर्णोद्धारित केली. तसेच, विशेषत: काशी विश्वनाथ मंदिराचे पुनरुज्जीवन हा त्यांचा महत्त्वपूर्ण कार्यभाग होता. त्या भक्तीला केवळ वैयक्तिक मर्यादांपुरते मर्यादित ठेवत नव्हत्या, तर ती सामाजिक कार्याशी जोडून घेत होत्या. त्यांनी "धर्म हा समाजसेवेचा मार्ग आहे" हे आपल्या कृतीतून दाखवून दिलं. त्यांच्या भक्तीत केवळ पूजाअर्चा नव्हती, तर सेवा, करुणा आणि लोकल्याण होते. त्या शंकरांच्या भक्त होत्या व त्यांचं संपूर्ण आयुष्य हेच एक लोक-कार्याच्या माध्यमातून घडलेली भक्ती होती.

अहिल्याबाईंच्या कारकीर्दीत प्रशासन हे केवळ सत्तेचे साधन नव्हते, तर जनतेच्या हितासाठी वाहिलेली सेवा होती. पती आणि सासऱ्यांच्या निधनानंतर त्यांनी संकटांना संधी मानून इंदूरच्या गादीची जबाबदारी स्वीकारली. अनेकांनी त्यांचा विरोध केला, पण त्यांच्या कार्यक्षमतेमुळे त्या इंदूर संस्थानच्या प्रमुख बनल्या आणि पुढे ३० वर्षे अत्यंत यशस्वीपणे त्यांनी राज्यकारभार केला. त्यांचे प्रशासन जनतेच्या सुख-दुःखाशी जोडलेले होते. त्यांनी शेती, सिंचन, व्यापार यांसारख्या प्रत्येक निर्णयात्मक क्षेत्रांत सुधारणा



केल्या. महेश्वर येथून चालणाऱ्या त्यांच्या प्रशासनात पारदर्शकता व कार्यतत्परता होती. परंतु, याहीपेक्षा मोठं म्हणजे त्यांच्या प्रत्येक निर्णयामध्ये माणुसकीची झलक असायची, जी एका उत्तम माणूस व प्रशासक यांची जोड दर्शवित होती. केवळ राजमहालात बसून किंवा शासन चालवणाऱ्या त्या नव्हत्या तर त्या लोकांच्या अडचणीत स्वत: मदतीला धावणाऱ्या मातेसमान शासिका होत्या, त्या मुळेच त्यांना 'राजमाता' असे देखील संबोधिले जाते. त्यांच्या राज्यात प्रशासन म्हणजे कर्तव्य, करुणा आणि न्याय व भक्ती यांचा संगम होता.

राज्य करणं ही फक्त सत्ता नसते, तर ती सेवा असते हे अहिल्याबाई होळकर यांनी सिद्ध केले. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य जनतेच्या कल्याणासाठी समर्पित केले. त्यांच्या जीवनात जो न्याय, भक्ती आणि प्रशासनाचा त्रिवेणी संगम होता, तो आजच्या नेतृत्वाने अंगीकारणे हीच खरी त्यांच्या कार्याला श्रद्धांजली ठरेल. भारतात स्त्रीशक्तीची जी प्रतिमा उभी राहिली आहे, तिचे मूळ अहिल्याबाईसारख्या तेजस्वी स्त्रीमध्येच आहे. अहिल्याबाई होळकर यांचे जीवन हे न्यायच्या दृढतेचे, भक्तीच्या शुद्धतेचं आणि प्रशासनाच्या कर्तव्यनिष्ठतेचे उत्तुंग प्रतीक आहे. त्यांच्या कार्याने भारताच्या इतिहासात एक सुवर्णपान लिहिले गेले. त्यांच्या जीवनातील त्रिवेणी संगम आजही प्रत्येक शासकासाठी आणि नागरिकासाठी प्रेरणादायी असा आहे.

नाव :- ज्ञानदा योगेश कुलकर्णी
वय :- २१
संपर्क क्र :- 9022212665
विषय :- अहिल्याबाई होळकर : न्याय, भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम



पूर्ण नाव :- कु. ऋतुजा अरविंद गायकवाड
वय :- 21 वर्षे
कॉलेजचे नाव :- श्री. डी. डी. विसपुते
स्कुल ऑफ नर्सिंग
पत्ता :- मातोश्री कमलाबाई विसपुते
माहिम्या वस्तीगृह - नवीन पनवेल
संपर्क क्रमांक :- 7798570047

विषय :- अहिल्याबाईंचं जीवनचरित्र - त्याग, पराक्रम आणि लोककल्याण

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर



अहिल्याबाई होळकर या महाराष्ट्रातील आणि भारताच्या इतिहासात अजरामर झालेलं एक तेजस्वी व्यक्तिमत्व आहे. त्यांचं जीवन म्हणजे त्याग, पराक्रम आणि लोककल्याण यांचं उत्तम उदाहरण आहे. एका सामान्य शेतकरी कुटुंबातून येऊन त्यांनी मालव्यातील होळकर साम्राज्याचा कारभार अत्यंत कुशलतेने चालवला आणि संपूर्ण भारतभर धर्म, न्याय आणि विकासाचं एक आदर्श उदाहरण उभं केलं.

सुरुवातीचे जीवन :-

अहिल्याबाईंचा जन्म इ.स. १७२५ मध्ये महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे एक देशस्थ ब्राम्हण होते. त्या काळात स्त्रियांना शिक्षण मिळणं दुर्मिळ होतं, परंतु अहिल्याबाईंना वाचन, लेखन, धर्मशिक्षण यांची मुभा दिली. लहानपणापासूनच त्यांच्यात आत्मविश्वास, विचारसंपन्नता आणि करुणा होती.

सौभाग्य आणि शोक :-

मालवा प्रांताचे शासक मल्हारराव हे चौंडी गावातून जात असताना अहिल्याबाईंचा सामर्थ्य व चातुर्य पाहून प्रभावित झाले. त्यांनी आपल्या पुत्र खंडेरावाशी त्यांचा विवाह लावला. मात्र काही वर्षांतच खंडेराव यांचा मृत्यू झाला. त्यानंतर मल्हाररावांचा मृत्यू झाला आणि अहिल्याबाई एकट्या राहिल्या. त्या काळात एक विधवा स्त्रीचा सार्वजनिक जीवनात प्रवेश करणे समाजाला मान्य नव्हते. पण त्यांनी या रूढींना छेद दिला.



राजकारणातील प्रवेश आणि पराक्रम

पती व सासऱ्याच्या मृत्युनंतर अहिल्याबाईंना माळवा राज्याची जबाबदारी स्वतःवर घेतली. त्यांनी इ.स. १७६७ मध्ये राजकारभार स्वीकारला. सुरुवातीला अनेकांनी त्यांच्या कारभाराला विरोध केला, पण त्यांनी धैर्याने, कणखर नेतृत्वाने आणि न्यायाने राज्यकारभार केला. त्यांचा दरबार हा न्यायप्रिय, पारदर्शक व शिस्तबद्ध होता. त्यांनी सैन्यदलातही बदल केले. त्यांनी स्वतःही युद्धशास्त्र आत्मसात केलं होतं. वेळप्रसंगी रणांगणात उतरण्याची त्यांची तयारी होती. परंतु त्यांनी युद्धापेक्षा शांतता व विकासाला अधिक महत्व दिलं.

न्यायप्रिय आणि धर्मनिष्ठ शासन :-

अहिल्याबाई न्यायप्रेमी होत्या. त्यांनी स्त्रीयांना अधिकार दिले. विधवा स्त्रीयांचा सन्मान केला. दलित, गरिब, शोषित यांच्यासाठी त्यांनी न्यायसंस्था बळकट केली. धर्माचा अंधानुकरण न करता, त्यांनी धर्माचा खरा अर्थ समाजाला दाखवला = तो म्हणजे सेवा, सहिष्णुता आणि समता.

मृत्यू आणि वारसा

अहिल्याबाईंचं निधन इ.स. १७९५ मध्ये इंदूर येथे झालं. त्यांच्या मृत्युनंतरही त्यांची प्रतिमा एक आदर्श शासक, न्यायनिष्ठ राणी आणि लोकोपकारी नेतृत्व म्हणून टिकून आहे. आजही इंदूर येथील 'राजवाडा' आणि 'अहिल्येश्वर मंदिर' हे त्यांच्या कार्याची साक्ष देतात. भारत सरकारने त्यांच्या कार्याची आठवण ठेवून अनेक टिकाही त्यांच्या नावाने स्मारके, विद्यापीठं, रस्ते आणि पुरस्कार सुरू केले आहेत.



नाव - करण कमलाकर गोलाग

मोबाइल नंबर - ~~७०१~~ ७०३-८९४ २७१७

पत्ता :- नवीन पनवेल ता. पनवेल
जि. रायगड

वयोगट :- वयोगट ३ :- १७ ते २१ वय

विषय - अहिल्याबाई होळकर :- स्त्री शक्तीचा ज्वलंत इतिहास

'अहिल्याबाई होळकर' : स्त्री शक्तीचा ज्वलंत इतिहास

अहिल्याबाई होळकर या महान भारतीय राज्यकर्ती होत्या, ज्यांनी स्त्रियांच्या इतिहासात एक महत्वपूर्ण स्थान मिळवले आहे. त्या आपल्या दूरदृष्टी प्रशासकीय कौशल्यासाठी आणि न्यायप्रियतेसाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी स्वतःच्या राज्य कारभारात अनेक सुधारणा केल्या ज्यामुळे त्यांच्या राज्य प्रजेला खूप दिलासा मिळाला.

अहिल्याबाई होळकर यांनी सामाजिक कार्यांमध्येही खूप योगदान दिले त्यांनी महिला शिक्षणासाठी प्रयत्न केले आणि गरीब व गरजू लोकांना मदत केली त्यांनी अनेक मंदिर आणि जलव्यवस्थापन कामे केली. अहिल्याबाई होळकर या केवळ एका राजाकर्ती म्हणून प्रसिद्ध नाहीत, तर त्या एक उत्कृष्ट प्रशासक सामाजिक सुधारक आणि न्यायप्रिय व्यक्ती म्हणूनही ओळखल्या जातात.



अहिल्याबाई होळकर यांचा जीवनप्रवास हा स्त्रीशक्तीचा एक तेजस्वी आणि प्रेरणादायी इतिहास आहे. त्या केवळ एक आदर्श राणी नव्हत्या, तर न्यायप्रिय, प्रजावत्सल, धर्मनिष्ठ, आणि अत्यंत कौशल्यपूर्ण प्रशासनिक कौशल्य असलेल्या स्त्री होत्या. त्यांचा संपूर्ण जीवनपट हा आजच्या स्त्रियांसाठी धैर्य कणखरपणा आणि नेतृत्वगुण यांचा आदर्श ठरतो.

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५, महाराष्ट्रमधील चौंडी गावामध्ये झाला, व त्यांचे पती खंडेराव होळकर आणि त्यांचे सासरे मल्हारराव होळकर, त्यांचा मृत्यु हा १३ ऑगस्ट १७९५ मध्ये झाला.

अहिल्याबाईच्या पतीचा मृत्यु आणि नंतर सासऱ्यांचा मृत्यु झाल्यानंतर त्यांनी संपूर्ण होळकर साम्राज्याचा कारभार आपल्या खांद्यावर घेतला. त्यांनी युद्धाच्या रणभूमीत उभ्राहत आपला राज्याचे रक्षण केले. अहिल्याबाई न्यायदानात अतिशय निष्पक्ष आणि कठोर होत्या. त्यांनी भ्रष्टाचाराला थारा दीला नाही आणि सामान्य जनतेच्या समस्या स्वतः पाहून घेतल्या. त्यांनी काशी, गया, अयोध्या, मथुरा, हरिद्वार, रामेश्वरम, सोमनाथ यांसारख्या अनेक धार्मिक स्थळांवर घाट मंदिरे, धर्मशाळा आणि पाण्याचा सोय केली. आजही धर्मशाळा आणि पाण्याचा सोय केली. आजहा काशीच्या घाटकांवर त्याच्या नावाच्या शाळा आहेत.

त्या काळात विधवा स्त्रीने राज्य चालवणे दुर्मिळ होते, पण अहिल्याबाईंनी ते न केवळ लीलया पेलले, तर सर्वसमावेशक आदर्श शासक म्हणून आपले स्थान निर्माण केले. अहिल्याबाईंची होळकर यांचे जीवन हे एक प्रेरणादायी महाकाव्य आहे. त्यांचं कार्य आणि नेतृत्व आजही स्त्रियांसाठी एक प्रकाशस्तंभ आहे. स्त्री म्हणजे केवळ सौंदर्य नाही, तर शौर्य, निर्णयक्षमता आणि नेतृत्वही, असू शकते हे त्यांना संपूर्ण जगाला दाखवून दिलं.



इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांना भारताच्या "कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारेट असे म्हणले आहे. शोउकयात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी कथरीन यांच्याशी सकारात्मक केली आहे. त्याने म्हणले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुन्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, रोवल्य नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक क्षेत्रा आखल प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. ज्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. त्या आधारने अहिल्याबाईंनी इ. स. १७६६ ते इ. स. १७९५ म्हणजे त्यांच्या मृत्युपर्यंत माळव्यावर राज्य केले होते.



• नाव :- पायल देवानंद कटके
• इयत्ता :- S.Y.B.Pharm
• College Name :- Shri. D.D. Vispute College of Pharmacy & Research Centre
• मो नं :- 7208481508 email :- payalkatke21@gmail.com

अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य

अहिल्याबाई होळकर या समाजसुधारणेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या शेर महिला होत्या. त्यांनी धार्मिक सामनिक आणि आर्थिक क्षेत्रात अनेक सुधारणा केल्या, ज्यामुळे समाजात सकारात्मक बदल झाले. त्यांचे हे कार्य आजही प्रेरणा देणारे आहे.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर (३१ मे, १७२५ - १३ ऑगस्ट, १७९५, राज्यकालावधी इ. स. १७६७ - इ.स. १७९५) या मालव्याच्या 'तत्वज्ञानी महाराणी' म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली आपली राजधानी हलविली. मल्हारराव्यांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेल होते. त्या आधाराने अहिल्याबाईंनी इ.स. १७६७ ते इ.स. १७९५, म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत मालव्यावर राज्य केले होते.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारत - भरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढंच नाही तर त्यानी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक क्षेत्रण आखल प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंनी समाजास कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती.

एक सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे कार्य आजही समाजसुधारणेच्या दृष्टिकोनातून अत्यंत प्रेरणादायी मानले जाते.

समाजसुधारणेतील कार्य :

1. स्त्रीशिक्षण आणि स्त्रीसन्मानाचा पुरस्कार :-

अहिल्याबाई होळकर यांनी स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळा - वे यासाठी प्रयत्न केले. त्यांनी स्त्रियांना शिक्षण देण्याचे महत्त्व ओळखले आणि त्यांच्या कल्याणासाठी काम केले. त्या काळात



विधवांना केवळ दुःखी आयुष्य जगावे लागायचे, परंतु अहिल्याबाईंनी अशा महिलांसाठी आश्रय आणि सन्मानाने जगण्याची संधी निर्माण केली.

2. धार्मिक सहिष्णुता आणि मंदिर बांधकाम :-
त्यांनी भारतभर अनेक ठिकाणी मंदिरे, घाट, धर्मशाळा बांधल्या. काशी, गया, सोमनाथ, द्वारका, रामेश्वर यांसारख्या तीर्थक्षेत्रांत त्यांनी विकासकामे केली. केवळ हिंदू धर्मस्थळांचाच नव्हे तर मुस्लम समाजासाठीसुद्धा त्यांनी मदतीचा हात पुढे केला.

3. शेती आणि पाण्याच्या सुविधा :-
अहिल्याबाईंनी आपल्या राज्यात कृषी विकासावर भर दिला. शेतकऱ्यांसाठी पाण्याच्या सुविधा, विहिरी, तलाव आणि बंधाऱ्यांची निर्मिती करून त्यांनी शेतीला चालना दिली. त्यामुळे जनतेचे जीवनमान सुधारले.

4. न्यायप्रिय आणि लोककल्याणकारी राज्यकारभार :-
अहिल्याबाई अत्यंत न्यायप्रिय आणि लोकाभिमुख शासक होत्या त्यांनी प्रजेच्या अडचणी समजून घेऊन त्यावर त्वरित उपाय केले त्यांचा दरबार नेहमी सर्वसामान्य लोकांसाठी खुला असायचा.

5. धार्मिक रूढींचा विरोध :-
त्या काळात विधवांविषयी असलेल्या अन्यायकारक प्रथा, बालविवाह इत्यादींना त्यांनी विरोध केला. त्यांनी विरोध केला. त्यांनी स्त्रियांना त्यांच्या पायावर उभे राहण्याची प्रेरणा दिली.

अहिल्याबाई होळकर या केवळ एक आदर्श शासक नव्हत्या, तर त्या एक समाजसुधारकही होत्या. त्यांनी धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात केलेल्या सुधारणा आजही प्रेरणास्त्रोत ठरतात. त्यांच्या कार्यामुळे त्यांचे नाव इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे

दुःखामध्ये होळण्यातून धीर आणू नका,
संकुचित जगण्याला सार मानू नका,
जिवनाला कधी भार मानू नका,
अहिल्यादेवीची शपथ कधी हि
हार मानू नका,
मुखीच्या संगतील राहाल
तर माती व्हाल
अहिल्यादेवीच्या विचारांनी जगाला
तर पुण्यश्लोक व्हाल



अहिल्याबाई यांनी पूर्वीच्या कायद्यांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार काही सुधारणा केल्या. कर पद्धती सौम्य केली; मात्र शेतकऱ्यांकडून साठ (कर) घेणे चालू ठेवले. गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. त्या वेळी डोंगर मुलखातून भिल्ल आणि गोंड आदिवासी हे रयतांना उपद्रव देत अन् त्यांच्याकडून 'भिलवडी' नावाचा कर वसूल करत. तेव्हा अहिल्याबाईनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांचा कर घेण्याचा अधिकार मान्य केला. त्यांच्याकडून पडिक भूमीची लागवड करून घेतली तसेच त्यांना विशिष्ट सीमी नेमून दिली आणि भूमी कशर पट्ट्याने देण्याची पद्धत चालू केली.

अहिल्याबाई यांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी राज्याची राजधानी इंदूरहून नर्मदा नदीच्या तीरी महेश्वर याठिकाणी हालवली. वर्ष १७७२ मध्ये त्यांनी अनेक वास्तू बांधल्या. नदीला घाट बांधले. मंदिरांचा जीर्णोद्धार केला. अहिल्याबाईनी वस्त्रोद्योगास चालना दिली. कोष्टी लोकांची वसाहत स्थापना केली आणि उत्तम हातमागाची साडी बनतील अशी पेठ वसवली

अहिल्याबाईनी अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, जेजुरी, पंढरपूर ऋषिकेश, गया, उदयपूर आणि चौंडी येथे मंदिरे बांधली. यासह सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन औंढा नागनाथ, काशी विश्वेश्वर, विष्णुपद, महाकालेश्वर आदी मंदिराचा जीर्णोद्धार केला. वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चौंडी, नाशिक, जांब, त्र्यंबकेश्वर येथे नदीला विस्तीर्ण घाट बांधले आणि गोकर्ण महाबलेश्वर, उज्जैन रामेश्वर भीमाशंकर आदि ठिकाणी अन्नछत्रे चालली.


अहिल्याबाईनी ग्रंथसंग्रह मोठा आणि दुर्मिळ होता. त्यात निर्णय-सिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मधुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणि वाल्मीकी माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या

अहिल्याबाई होळकर या केवळ एका राज्यकर्त्या नव्हत्या, तर त्या एक समाजसुधारक आणि लोककल्याणकारी होत्या. त्यांनी आणल्या कार्यांनी समाजात सकारात्मक बदल घडवले.

* * *


पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर
यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त
निबंध स्पर्धा....
नाव - दिक्षा भरत चित्ते.
इयत्ता - १२ वी 'अ'
कॉलेजचे नाव - डी. आर ज्युनिअर कॉलेज नंदूरबार.
फोन नं - 8378955058
विषय - पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर
एक आदर्श स्त्री शासिका
REDMI A2
28/05/2025 15:18

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर



* निबंध *

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर
एक आदर्श स्त्री शासिका

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर हे नाव घेताच एक करूणामयी, न्यायप्रिय आणि दूरदृष्टी असलेली आदर्श स्त्री शासिका डोळ्यासमोर उभी राहते. महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण भारतासाठी त्या एक प्रेरणास्थान आहेत. त्या केवळ एक उत्तम राज्यकर्त्या नव्हत्या, तर एक दानशूर, धर्मपरायण आणि जनतेच्या कल्याणासाठी अहोरात्र झटणाऱ्या मातृसुलभ राणी होत्या.

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म इ.स. १७२५ साली आजच्या महाराष्ट्रातल्या अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावात झाला. अतिशय सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मूनही त्यांनी आपल्या कार्याने इतिहासात अजरामर स्थान मिळवले. मालवाच्या होळकर घराण्याच्या खंडेराव होळकरांशी त्यांचा विवाह झाला. मात्र, दुर्दैवाने अल्पवयातच त्यांचे पती व नंतर सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. या धक्क्यानंतरही त्यांनी हार मानली नाही.

१७६७ साली त्या इंदूरच्या गादीवर बसल्या ~~एक विधवा असूनही त्या इंदूरच्या गादीवर बसल्या~~. एक विधवा असूनही त्या काळात राज्यकारभार स्वीकारणे हे अतिशय धाडसाचे पाऊस होते. अहिल्याबाईंनी न्यायनिष्ठ आणि प्रजाहितदक्ष राज्यकारभार केला. त्यांनी प्रजेच्या दुःख दैन्याची जाणीव ठेवून अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. त्यांच्या काळ सुवर्णयुग मानला जातो. त्यांनी इंदूरला एक समृद्ध सांस्कृतिक व धार्मिक केंद्र बनवले.



काशी, गंगोत्री, रामेश्वर, सोमनाथ अशा अनेक तीर्थक्षेत्र मंदिरे, घाट आणि आणि धर्मशाळा बांधल्या. त्यांनी आपल्या वैयक्तिक संपत्तीचा वापर जनकल्याणासाठी केला. त्यांचा न्याय एवढा कठोर आणि निःपक्ष होता की सामान्य जनतेला त्यांच्यावर अपार विश्वास होता. त्यांनी स्त्रीयांच्या हक्कांबाबत जागरूकता निर्माण केली. आणि अनेकांना आधार दिला. अहिल्याबाई होळकर म्हणजे एक नारीशक्तीचं मूर्तिमंत उदाहरण आहे. स्त्री असूनही त्या काळात त्यांनी जे नेतृत्व केले ते आजच्या काळातही प्रेरणादायी आहे. त्या स्त्रियांसाठी आधार आणि आत्मविश्वासाचे प्रतीक होत्या. अहिल्याबाईंनी स्त्रीयांसाठी खूप मोठं योगदान दिले आहे.

१. विधवांसाठी मदत -
त्या काळात विधवा महिलांना समाजात तुच्छ मानले जाई. अहिल्याबाईंनी विधवांसाठी सन्मानाने जगण्याची संधी दिली. त्यांनी पुनर्विवाहास मान्यता दिली, जे त्या काळात फार धाडसी पाऊल होते.

२. स्त्रीशिक्षणाचा आग्रह -
त्या काळात स्त्रीशिक्षण दुर्लक्षित होते. अहिल्याबाईंनी शिक्षणाला महत्त्व दिले आणि स्त्रियाही शिकाव्यात असे मानले.

३. आर्थिक मदत व रोजगारनिर्मिती -
गरजू स्त्रियांना आर्थिक मदत केली आणि त्यांना रोजगार उपलब्ध करून दिला. अनेक ठिकाणी चरखा, विणकाम



यासारख्या उद्योगांना प्रोत्साहन दिले.

४. धार्मिक आणी सामाजिक सन्मान - त्यांनी स्त्रियांना मंदिरांमध्ये पूजा करण्याचा अधिकार दिला. त्या स्वत: धार्मिक स्त्री होत्या आणी अनेक धार्मिक स्थळांच्या पुनर्बांधणीमध्ये सहभाग घेतला, तेथे स्त्रियांनाही प्रवेश व पूजेस परवानगी दवावी. असा सामाजिक सन्मान स्त्रीयांना मिळाला.

५. न्यायप्रिय आणी समतेचा विचार - त्या एक न्यायप्रिय शासिका होत्या. स्त्री-पुरूष समानतेचा मुल्यांना प्रोत्साहन दिले. त्याच्या दरबारात स्त्रियांनाही न्याय मिळायचा, जे त्या काळात दुर्मिळ होते.

निष्कर्ष :-
अहिल्याबाई होळकर यांचे स्त्रियांसाठी योगदान केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित नव्हते, तर आजही त्यांचे कार्य प्रेरणादायक आहे. त्यांनी दाखवलेल्या सर्व मार्ग हा आधुनिक स्त्री सक्षमीकरणाच्या विचारांच्या मुळाशी आहे. अहिल्याबाई होळकर या केवळ एक उत्तम शासिका नव्हत्या, तर त्या एक संवेदनशील, दुरदृष्टी असलेल्या समाजसुधारक होत्या. त्याच्या कार्यातून स्त्रियांना एक सन्मान स्थान प्राप्त झाले. आणी त्या समाजात अधिक आत्मनिर्भर बनल्या. आजच्या युगातही स्त्रियांना त्यांच्या कामगिरी बद्दल अभिमान आहे.



६. गर्भवती व मातांसाठी सोयी -
अहिल्याबाईंनी स्त्रियांसाठी पारंपारीक कौशल्यांवर आधारित काम उपलब्ध करून दिली - उदा... सूत कताई, वस्त्रनिर्मिती हस्तकला त्याच बरोबर अहिल्याबाईंनी प्रसूतीसाठी वसतिगृहांची स्थापना केली. त्या काळी ही फार मोठी सामाजिक सुधारणात्मक गोष्ट होती. स्त्रियांना सुरक्षितता व आरोग्याच्या दृष्टीने मदत मिळू लागली.

७. स्त्री शिक्षणाची बीजे -
जरी त्या काळात औपचारिक स्त्री शिक्षण सामान्य नसे, तरी अहिल्याबाईंनी स्त्रियांना धार्मिक, नैतिक आणि व्यावहारीक ज्ञान देण्यावर भर दिला. त्यांनी गुरूजनांच्या माध्यमातून स्त्रियांना शिकण्याची संधी दिली.

प्रेरणादायी व्यक्तिमत्व -

अहिल्याबाई स्वतः अत्यंत साध्या व संतप्रवृत्तीच्या होत्या त्यांनी लोकनेतीचा आदर्श प्रस्थापित केला.
त्यांच्या राजवटीमध्ये स्त्रियांना सामाजिक, धार्मिक आणी आर्थिक स्वातंत्र्याचे पहिले दर्शन झाले.
अहिल्याबाईंनी अनेक स्त्रीयांसाठी योगदान दिले आहे. त्यामध्ये सती प्रथा, बालविवाह आणि इतर अन्यायकारक सामाजिक प्रथांपासून स्त्रियांचे रक्षण हेही त्यांच्या कार्यातील एक भाग होता. त्यांनी प्रत्यक्ष सती प्रथा बंद केली नसली तरी तिच्याविरुद्ध विरोधात समाजप्रबोधन केले.



अहिल्याबाई होळकर यांनी केलेली स्त्रीसक्षमीकरणाचे कार्य आजच्या मुक्त युगातही अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालल्यास आपण एक न्याय्य, समाजवादी आणि सशक्त समाज घडवू शकतो. अहिल्याबाई होळकर यांची गाथा खूप महान आहे. ती सर्वांना ज्ञात व्हावी. त्यांचे कार्य, त्याग, आजच्या युगातही आठवण ठेवले गेले आहे.

म्हणूनच, महाराष्ट्रातील अहमदनगर शहर ज्या शहरात त्यांचा जन्म झाला, त्यांचे नाव बदलण्यात आले. हे शहर अहमद निजामशाह याने इ.स १४९६ मध्ये वसविलेले होते. पण आता त्याचे नाव बदलून अहिल्यानगर ठेवण्यात आले. खरच अश्या व्यक्तीमत्वासाठी गावाचे नाव बदलले त्यांचे कार्य, त्याग, कामगिरी, त्यांच्या शौर्यगाथा किती महान आहे. मला खूप अभिमान वाटतो की मनाला खूप बरे वाटते. व अहिल्यांबाई होळकर सतत त्यांच्या कामगिरी पुढच्या पिढ्यांनाही माहीती असाव्यात हा बदलण खूप गरजेचा होता.

मला खूप अभिमान वाटतो की, इतक्या पराक्रमी, दानशूर, प्रेरणादायी स्त्री आमच्या राज्याला माझ्या भारत देशाला लाभल्या.

"दीन दुबळ्यांची बनुनी आई।
उर्जा त्यांची जागृत ठेवी
ती जनतेची माता अहिल्यादेवी ॥
लोकहिताचे शासन चालविले।
जन उद्धाराचे कार्य केले ॥"

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर



"
मधुर होती तिची वाणी,
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी....
गाजवली जिने दिशा दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला
खरंच सीमा नाही.....!
"

"
राण्या असंख्य झाल्या
या जगात
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्व जिचा आहे या मराठी
हृदयाला,
एकच ती महाराणी
"

त्यांचे जनतेप्रती प्रेम, त्यांचे कर्तव्य, त्यांची दूरदृष्टी हे सर्व गुण त्यांना "पुण्यश्लोक" या उपाधीस पूर्णपणे पात्र ठरवतात. अशा या महान राणीला मनः पूर्वक वंदन !

जय हिंद, जय महाराष्ट्र !



निबंध स्पर्धा

नाव :- शितल भाऊसाहेब भडगे
शाळेचे नाव :- म. ज्यो फुले विद्यालय पिशोर.
विषय :- अहिल्याबाई होळकर यांचे समाज सुधारनेतील कार्य
भाषा :- मराठी
इयत्ता :- १२ वी विज्ञान

विषय :-
अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारनेतील कार्य

"अहिल्या माझी होती राजमाता
सर्वश्रेष्ठ अशी न्यायदाता
उभे केले होळकरांचे साम्राज्य
एकट्या मर्दानिने सांभाळले राज्य".

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२४ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हातील जामखेड तालुक्यातील चौंडी या खेड्यात झाला. त्यांचे वडिल माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. त्या काळी स्त्री - शिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहण्यास, वाचण्यास शिकवले होते.

"नाव ज्यांचे अहिल्या
इतिहासात ज्या गाजल्या
शुर अशी होती ती राणी।
न्यायासाठी लढली ती
मर्दानी".



अहिल्याबाई खंडेराव होळकर मराठा साम्राज्याचा ध्वज होता. त्यांनी डिसेंबर ११ इ. स. वी. १७६७ ते ऑगस्ट १३ इ. स. वी १७९५ पर्यंत त्यांचा अधिकार होता. तसेच त्यांचा राज्य अभिषेक डिसेंबर ११ इ. स. १७६७ राज्य कारभार सांभळला. तसेच या माईना राजमाता ही पदवी संपादन केलेली होती.

"प्रजेचे फायम रक्षण केले
ना स्वत:च्या मुलाला भक्षिले
दिले महत्व न्यायाला
दुर लोटले अन्यायाला."

अहिल्याबाईनी प्रजेचे रक्षाण केले. बाजीराव पेशव्यांचे एक सरदार मल्हारराव होळकर हे माळवा प्रातांचे जहागिरदार होते. मल्हारराव होळकर यांचा १२ वर्षानंतर म्हणजेच २० मे १७६६ रोजी आलमपुर येथे एका मोहिमेवर असतांना त्यांना मृत्यूने गाठले.

सासरे मल्हारराव होळकर यांच्या मृत्यूनंतर मराठा साम्राज्याच्या मावळा प्रातांचा कारभार अहिल्याबाई होळकर बघू लागल्या. त्यांच्या पश्चात अहिल्याबाईनी आलमपूरचे नाव बदलून मल्हारनगर ठेवले. आणि तेथे त्यांची प्रथा उभी केली. अहिल्याबाई होळकर यांनी २८ वर्षे राज्यकारभार चालविला. अहिल्याबाई एक उत्तम शासक तर होत्याच सोबतच त्या धार्मिक वृत्तीच्या देखील होत्या.



त्या समान न्यायदानावर विश्वास ठेवायच्या.

"होळकरांची सुन होती बहुगुणी।
शिक्षणाची ओढ होती लहानपणी,
गरज ओळखुनी सुखावले
सर्वजनी अशी जाहली
दुरदृष्टी एक मर्दानी"।

एका इंग्रजी लेखकाने अहिल्यादेवी होळकर यांना भारताच्या "कॅथरीन द ग्रेट एलिझाबेथ, मागरिट" म्हटले आहे. माळव्याच्या जहागीरदार असलेल्या होळकर घराण्याच्या 'तत्वज्ञानी राणी' म्हणून ओळखायला जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलवली. मल्हाररावांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या काळात पारंगत केलेले होते. त्या आधाराने अहिल्याबाईंनी इ.स. १७६६ ते इ.स. १७९५ म्हणजे त्यांच्या मृत्यूनंतर माळव्यावर राज्य केले. अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. अहिल्याबाईंनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवित असे. जरी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही, इंदूर या खेड्याचा विकास करुन त्याचे सुंदर मोठ्या शहरात रुपांतर करणे, हे अहिल्याबाईंनी केलेले फार मोठे काम होते.



त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले, हिंदू मंदिरामध्ये कायमस्वरूपी पूजा सुरू रहावी म्हणून अनेक दाने दिली. माळव्या बाहेरही त्यांनी मंदिरे, घाट, विहीरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली.

सुखात नांदली आमची जनता।
कारण उत्तम शासक तत्वज्ञानी
राणी होती अहिल्या राजमाता।

मधुर होती जिची वाणी
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी.....
गाजवल्या जिने दिशा दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला खरंच
सीमा नाही.

इंदूर विद्यापीठास अहिल्याबाई होळकर असे नाव दिलेले आहे. "अहिल्याबाई एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. अहिल्यादेवी होळकरांना जीवन काळात तर सन्मान मिळालाच पण मृत्यूनंतरही लोकांनी त्यांना संताचा दर्जा दिला. त्यांनी गरिबांचा शेतसारा माफ केला. त्यांच्या कन्येने तिचा पती, यशवंतराव फणसे यांच्या मृत्यूनंतर सती जाणे हे अहिल्याबाईंच्या आयुष्यातले शेवटचे सर्वात मोठे दुःख होते.



"घाट मंदिरे विहिरी बांधल्या,
समान तिला रंक नि राव,
लोकांसाठी देह झिजवी, अहिल्या
होळकर तिचे नाव".

अहिल्याबाईंच्या सन्मान व स्मृती प्रीत्यर्थ भारत सरकारने ऑगस्ट २५ इ.स. १९९६ या दिवशी डाक तिकीट जारी केले. या अशा शासनकर्तीस मानवंदना म्हणून इंदूरच्या विमानतळाचे नाव "देवी अहिल्याबाई विमानतळ" असे ठेवण्यात आले. इंदूर विद्यापीठास "देवी अहिल्या विद्यालय" असे नाव देण्यात आले. अत्यंत न्यायप्रिय असलेल्या अहिल्याबाईंच्या प्राणाची ज्योत वयाच्या ७० व्या वर्षी मावळली.

"राणी असंख्य झाल्या या
जगात,
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्व जिचा आहे या मराठी
हृदयाला एकच ती महाराणी
अहिल्यादेवी हो झाली.....!

दु:खामध्ये डोळ्यातून धार
आणू नका,
संकुचित जगण्याला सार मानू नका,
जिवनाला कधी भार मानू नका,
अहिल्यादेवीची शपथ कधीही हार मानू
नका, मुर्खांच्या संगतीला राहाल
तर माती व्हाल,
अहिल्यादेवींच्या विचारांनी जगाल
पुण्यश्लोक व्हाल.



नाव :- त्रिवेणी दिपक पोउ
वर्ग :- B.com (F.Y) प्रथम वर्ष
महाविद्यालय :- रा.भ अटल महाविद्यालय
जिल्हा :- बीउ
तालुका :- गेवराई
पत्ता :- सरस्वती कॉलनी नं :- 1

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर या भारतीय इतिहासातील एक महान कर्तृत्वान आणि दुरच्या स्त्री शासिका होत्या. ज्या मालवाच्या होळकर घराण्याच्या राणी होत्या ज्या मालवाच्या होळकर घराण्याच्या ज्या राणी होत्या आणि त्यांचा कार्यकाल अठराव्या शतकात होता.

जीवन आणि कार्य :- जन्म ३१ मे 1725 जामखेड, अहमदनगर जिल्हा महाराष्ट्र

विवाह :- मल्हारराव होळकर यांच्याशी.

एक अत्यंत आदर्श व प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणजे पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर. त्यांनी केवळ एका राज्याचा कारभार योग्यपणे सांभाळला नाही तर धर्म, न्याय, सामाजिक बांधिलकी आणि लोककल्याण या सर्व तत्वांत आदर्श घालून दिला.

अहिल्याबाईंच्या वैयक्तिक जीवनात अनेक दुःखद प्रसंग आले. 1754 मध्ये त्यांच्या पतीचा मृत्यु झाला.

त्यानंतर 1766 मध्ये पुत्र खंडेराव याचाही मृत्यु झाला. शेवटी 1767 मध्ये सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. अशा परिस्थितीत राज्य आस्थिर होण्याची शक्यता होती. की काही सरदार व पुरुष शासकांनी स्त्री शासकाची कल्पनाही नाकारली होती. परंतु अहिल्याबाईनी आत्मविश्वासाने आणि प्रजाजनांच्या पाठिंब्यावर राजकारभार हाती घेतला.

शासन कौशल्य आणि आदर्श नेतृत्व अहिल्याबाई होळकर यांचे शासन (1761-1795) म्हणजे आदर्श राज्यकारभाराचे उदा... आहे त्या इंदुरच्या गादीवर बसल्या पण त्यांनी कधीही राजकीय सत्ता आपल्या वैभवासाठी वापरली नाही. शासन म्हणजे प्रजेची सेवा, अशी त्यांची धारणा होती.

1. न्यायप्रिय व निष्पक्ष कारभार अहिल्याबाई दररोज दरबारात बसुन स्वतः न्यायनिवाडा दररोज दरबारात बसून स्वतः न्यायनिवाडा करत असत त्यांनी गरिबांना मोफत न्याय मिळवुन दिला. भ्रष्ट आणि भ्रष्टाचार, अन्याय अत्याचार यांना अजिबात वाव दिला नाही.

2. सामाजिक सुधारणांच्या पाया त्या विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहाला समर्थन देणाऱ्या पहिल्या शासकांपैकी एक होत्या.

3. स्त्रियांच्या शिक्षणावर भर देत असत.



३. आर्थिक समृद्धी आणि व्यापारी अहिल्याबाईनी इंदुर आणि आसपासच्या भागात व्यापार वाढवण्यासाठी बाजारपेठा आणि सुरक्षित रस्त्यांची निर्मिती केली

४. धार्मिक आणि सांस्कृतिक योगदान अहिल्याबाई होळकर यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे भारतभरात धार्मिक स्थळांचे पुनरुद्धार त्यांनी अनेक मंदिरे बांधली, घाट तयार केले आणि तिर्थक्षेत्रांचे जीर्णोद्धार केले.

अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यातून आपल्याला नेतृत्व सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण मिळते. खाली त्यांचे कार्य विविध उदाहरणांद्वारे स्पष्ट केले आहे.

१ न्यायप्रिय शासिका - न्यायदानाचे उदाहरण

उदाहरण :- अहिल्याबाई दररोज स्वतः दरबारात बसून प्रजेच्या तक्रारी ऐकत आणि त्यावर त्वरित, निर्णय देत.

एका वेळेस एक गरीब शेतकऱ्याची जमीन एका मोठ्या सरदाराने बळकावली होती. अहिल्याबाईनी त्या सरदाराला दरबारात बोलावून विचारणा केली आणि सत्य समजल्यावर त्या शेतकऱ्याला जमीन परत दिली व सरदारावर दंड ठोठावला.

स्पष्टीकरण :- हे उदाहरण दाखवते की अहिल्याबाईंना सामान्य माणसाचाही न्याय निनकाच महत्वाचा वाटे, आणि त्या कोणत्याही गरीब - धनी किंवा पदाचा भेद न करता न्याय करत असत.



२. धार्मिक कार्य - मंदिर बांधणीचे उदा.: काशीतील काशी विश्वनाथ मंदिर हे मराठा साम्राज्याच्या काळात सुरक्षित होते. अहिल्याबाईंनी स्वतःच्या खर्चाने त्या मंदिराचा पुनरुद्धार केला. मंदिराचा पुनरुद्धार केला. तसेच द्वारका, रामेश्वर, उज्जैन, सोमनाथ, गंगाघाट इ. ठिकाणी मंदिर, घाट आणि धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांच्या धार्मिक कार्यात केवळ आस्था नव्हती, तर यात्रेकरूंच्या सुविधांसाठी भौतिक विकासाचाही विचार होता. त्या लोककल्याणासाठी धर्माचे साधन म्हणून उपयोग करत होत्या.

३. शिक्षण आणि महिलांचा विकास - स्त्रियांसाठी उदाहरण - अहिल्याबाईंनी स्त्रियांसाठी धर्मशाळांमध्ये वाचन - लेखनाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्या स्त्री-शिक्षणाच्या गरजेवर भर देत असत. त्यांनी स्त्रियांना शिक्षण, आत्मनिर्भरता आणि सामाजिक सन्मान मिळावा यासाठी प्रयत्न केले. आजच्या महिला सशक्तीकरणाच्या संकल्पनेसाठी हे आदर्श उदाहरण ठरते.

• नेतृत्वासाठी - त्यांनी प्रशासन सुधारण्यापर्यंत झेपावले.

• सामाजिक हस्तक्षेपासाठी - त्यांनी स्त्रियांना समानता आणि सन्मान दिला.

• धर्मासाठी - त्यांनी देशभर तीर्थक्षेत्रांचे पुनरुज्जीवन केले.

• प्रजेचे आणि प्रजेच्या हितासाठी - त्यांनी न्याय, सबलता आणि सेवाभाव जपला.



उत्तरार्ध आणि स्मृती अहिल्याबाईंनी 28 वर्ष उत्तम प्रकारे राज्यकारभार केला.
13 ऑगस्ट 1795 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्युनंतर देखील त्यांची कीर्ती आणि कार्य आजवर लोकांच्या मनात जिवंत आहे.

महाराष्ट्र शासनाने त्यांना "पुण्यश्लोक" ही मानाची उपाधी दिली.
इंदुर विमानतळाला त्यांचे नाव - "देवी अहिल्याबाई होळकर विमानतळ" देण्यात आले.
अनेक विद्यापीठे, रस्ते, संस्था त्यांच्या नावाने ओळखली जातात.

त्यांचे जीवन म्हणजे आजच्या काळातही प्रत्येक नेता आणि नागरिकासाठी एक प्रेरणादायी आदर्श आहे.



नाव :- प्रगती गणेश शिंदे
इयत्ता :- १०वी
दिनांक :- २१/५/२०२५

PAGE NO.: 1

"अहिल्याबाई होळकर यांचे स्थापत्य क्षेत्रातील सौंदर्यदृष्टी आणि कलात्मकता"

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची नाव घेताच डोळ्यांसमोर सर्वप्रथम उभे राहतात, ते त्यांनी नदी-काठी उभारलेले देखणे घाट. केवळ घाट नाही तर असंख्य मंदिरे, किल्ले, राजवाडे, तलाव, विहिरी, बारवांच्या निर्मितीतुनही अहिल्याबाईची सौंदर्यदृष्टी प्रतीत होते तेव्हा या लेखातुन अहिल्याबाईच्या स्थापत्यक्षेत्रातील एकूणच योगदानाविषयी आणि त्यांच्या त्यामागील कलात्मक व पर्यावरणपूरक दृष्टिकोनाचा आढावा घेतला आहे.

मध्ययुगीन कालखंडामध्ये भारताच्या इतिहासामध्ये ज्या महान स्त्रिया होऊन गेल्या, त्यांच्यामध्ये अहिल्यादेवी होळकरांचे स्थान अद्वितीय. जन्माने मराठी असणाऱ्या या कन्यारत्नाने आपल्या धार्मिक व सामाजिक, राजकीय कर्तुवाने भारतभर मोठी कीर्ती नावलौकिक मिळविले. इ.स. 1754 मध्ये खंडेराव होळकराचा मृत्यू झाला व पुण्यश्लोक अहिल्यादेवींना अकाली वैधव्य आले. पुढे इ.स. 1766 मध्ये सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाल्याने राज्यकारभाराची सर्व जबाबदारी अहिल्यादेवी होळकर यांच्यावर आली त्याचबरोबर त्यांच्या घरातील त्यांची मुलगी मुनासह 18 स्त्रिया सती गेल्या अशा विकट परिस्थितीत मोठ्या अचाट धैर्याने सर्व राज्यकारभाराचे रक्षण तर केलेच, परंतु मल्हारराव होळकरांचा लौकिक कायम राखला. त्यांनी राज्याची घडी विस्कटू दिली नाही, तर होळकरशाहीचे वैभव कायम राखले व अनेक सत्कृत्ये करून 'पुण्यश्लोक' होण्याचा मान या 'मल्हारसाध्वी' स्त्रीने मिळविला

अहिल्याबाई होळकरांनी केलेल्या सत्कृत्यांची यादी फार मोठी आहे. अहिल्याबाई शिवभक्त होत्या, त्यांनी



PAGE NO. 2

देशभर खुप मंदिरांचा जीर्णोद्धार केला. उदा. आनंद काकज येथील विश्वेश्वराच्या मंदिराच्या जीर्णोद्धार केला, काशी येथील काशी-विश्वेश्वरांच्या मंदिराच्या जीर्णोद्धार केला, गया येथील विष्णू मंदिर, सोमनाथ येथील महादेवाच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला. याशिवाय भारतामध्ये अनेक ठिकाणी स्वखर्चातून मंदिराची उभारणी केली. त्यामध्ये आलामपुर, उज्जैन, ऋषिकेश, काशी, कुरुक्षेत्र, गंगोत्री, जेजुरी, नाशिक, पंढरपुर, चौंडी इत्यादी ठिकाणी मंदिराची उभारणी केली. याव्यतिरिक्तही अनेक ठिकाणी मंदिरे बांधली. यामध्ये सर्वात वैशिष्ट्यपुर्ण कार्य म्हणजे अहिल्यादेवी होळकरांनी फक्त मंदिरांच्या जीर्णोद्धार व उभारणीच केली नाही, तर त्यांनी पुनःश्च हिंदू धर्म रक्षणाचा भक्कम पाया उभारण्याचा आरंभ केलेला दिसतो. त्यामुळेच त्यांना "हिंदू धर्मरक्षक" देखील म्हटले जाते. अहिल्यादेवी होळकरांनी जलसंधारण क्षेत्रामध्ये संपुर्ण भारतामध्ये जे कार्य अन्य कोणत्याही व्यक्तीने किंवा राज्यकर्त्यांनी केले नाही.

जनकल्याण, धर्मपरायणता व स्त्रीविषयी वाटणारी अनुकंपा, मुक्या प्राण्यांविषयी असणारी कळकळ यामधुन त्यांनी भारतभर दुर्गम ठिकाणी नद्यावर घाट बांधले. नर्मदा ही प्राचीन कालापासून प्रवाहित असणारी नदी ही केवळ नदी नाही, तर भारताच्या अविरत संस्कृतीचही प्रवाह आहे. नर्मदा नदीच्या किनाऱ्यावर लोकमाता अहिल्यादेवी यांचे स्थापत्यशास्त्रात बहुमोल योगदान आहे. हिंदवी स्वराज्यात स्थापत्यशास्त्रात अनेक प्रयोग झाले. किल्ल्याचे गोमुखी प्रवेशद्वार, बुरूजांचे बांधकाम आणी सामरिकदृष्ट्या केलेली किल्ल्यांची रचना, पुढे पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी निर्माण केलेल्या मंदिरे, किल्ले, राजवाडे आणि घाटांच्या स्थापत्यात आपल्याला एक सौंदर्यदृष्टी आणि कलात्मकता दिसून येते. म्हणूनच पुरातन महेश्वरसारख्या क्षेत्राचे पावित्र्य जसे आपल्याला जाणवते,



तसे अहिल्यादेवींच्या काळात निर्माण झालेल्या वास्तुकला मोहून टाकतात. अहिल्याराणी होळकर या मराठेशाही-तील एक देदीप्यमान नंदादीपच। उत्तरेत राहून अखंड हिंदुस्थानात त्यांनी राष्ट्रकार्य निर्माण केले. राजकारण - समाजकारण यांसोबत मध्य प्रदेशात आजही पहिले, तर जागोजागी अहिल्यादेवींच्या दक्ष राज्यकारभाराच्या खुणा ठळक दिसतात. शाहीर अनंत फंदी यांनी महेश्वरला भेट दिली होती. महेश्वरच्या वैभवाचे वर्णन करणारा पोवाडा त्यांनी रचला होता. त्या पोवाड्यात अहिल्यादेवी यांनी बांधलेल्या घाटांचे वर्णन आले आहे.

नर्मदा तर निकट घाट।,
बहुत अफाट पायऱ्या दाट।
चिरेबंदी वार मुक्तीची शिवालये।
केलास साम्यता नाना परीची॥
रचली रामकृष्ण मंदिरे।
बहुत सुंदरे बांधली घरे॥

स्वामी पांडे यांनी 'अहिल्या स्मारिका' या ऐतिहासिक मासिकात 'अहिल्यादेवींद्वारा निर्मित घाट' या लेखात घाटांचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. महेश्वर येथील घाटांत जी एकता व एकसंधता आहे, ती मजबूती आणि स्थापत्यशास्त्राच्यादृष्टीने महत्त्वाचे आहे. येथील घाटांची संस्था संख्या 28 आहे. मुख्य घाट आकाराने मोठा आहे त्याची एका बाजूला नर्मदेचा वेगवान प्रवाह आहे. त्याची एका बाजूला लांबी 121 फूट, तर रुंदी 150 फूट आहे. त्याला अडविण्याचे काम हा घाट करतो. महेश्वर येथील घाटाबद्दल समसेवक गर्ग यांनी 'अहिल्या स्मारिका वर्ष 1979' यामध्ये 'अहिल्या की नगर महिपती घाट स्थापत्य' या संशोधन लेखात महेश्वरच्या घाटाचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे. महेश्वर येथे एकूण 18 घाट आहेत प्रयाग या ठिकाणी बांधण्यात आलेला घाट अत्यंत विशाल आहे, तर ऑक्टोबर 1785 मध्ये मनिकर्णिका



घाट बांधल्याची नोंद सापडते. पूरनियंत्रण, भूस्खलन त्यांनी देशभरात शेकडो घाट बांधले ज्योतिर्लिंगाच्या मंदिरांची दुरूस्ती करून त्या ठिकाणी कुंडांची तथा बारवांची निर्मिती केली. परळी वैजनाथ मंदिर आणि वेरूळच्या घृष्णेश्वरजवळ उभारलेले बारव आणि व त्यांचा सौंदर्यविषयक दृष्टिकोन स्पष्ट करण्यास पुरेसे आहेत.

अनन्यसाधारण असल्याचे दिसते. भारतीय सामाजातील प्रत्येक श्रद्धाळू व्यक्ती ही जलाची पूजा करत असते आणि सूर्याला अर्घ्य देत असते. 'हे तुझेच आहे. त्याचा तू विकास करून ते आम्हास परत दे, आम्ही ते तुझ्या विकासासाठी वापरू' अशा प्रकारची सुरूवात अगदी आरंभापासून म्हणजे ऋग्वेदकाळापासून झाल्याचे त्यामधील अनेक सुक्तांवरून स्पष्ट होते. जनमानसांत पाण्यासाठी असलेले भावनिक नाते आनादी कालापासून लौकिक परंपरा आज आपणास पाहावयास मिळत नसली, तरी ऋग्वेदातील सूक्ते ही त्या कालातील समाजमनाची प्रतिक्रिया असल्याने जलाशी संबंधित ऋग्वेदातील काही सूक्ते, त्यामध्ये 'वायुसूक्त', 'गोसूक्त', 'कृषीसूक्त', 'जयदेवतासुक्त', 'पुर्जन्यसूक्त', 'मंडूकसूक्त' आणि 'नदीसुक्त' यांचा समावेश होता.

पावसाचे पाणी जमिनीत मुरावे याकरिता पेविंग ब्लॉक कसे बसवावे स्त्यांची निर्मिती कशी कशी करावी. अन्य बांधकामे कशी करावी यांची जंत्रीच त्यांनी केलेल्या कार्यातून स्पष्ट होते. आजच्या सर्व स्थापत्य अभियंत्यांनी याचा अभ्यास करून कार्य केले तर भारताची विश्वगुरू होण्याची प्रक्रिया अधिक तीव्र होईल.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना विनम्र अभिवादन.



नाव :- सिद्धी रणजीत पाटील

लोकमाता अहिल्याबाई होळकर

"राण्या असंख्य झाल्या
या जगात,
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्व जिचा आहे या मराठी हृदयाला,
फक्त ती महाराणी
अहिल्यादेवी होळकर झाली."

नमस्कार मित्रांनो, सर्वांना अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्त खुप-खुप शुभेच्छा.

त्यागालाही लाज वाटली
इतका महान त्याग तुझा
तुझ्या त्यागाने जागा झाला
अवघा महाराष्ट्र सारा...

ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तृत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक ऐक्यता, स्त्री-पुरुष समानता, गोरगरिबांना त्यांच्या विषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट चालीरिती रुढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला. माणकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतील असून देखील ते विद्वान व दूरदर्शी गृहस्थ होते. अठराव्या शतकामध्ये आजच्या सारख्या शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना ते देखील त्यांनी अहिल्येला शिक्षणाची घरीच व्यवस्था केली.



अहिल्यामातेचे जीवन घडविण्यात त्यांचा फार मोलाचा वाटा होता. अवघ्या आठ वर्षाची असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हारराव होळकरांचा बारा वर्षाचा कुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहिल्याचा विवाह 20 मे 1733 रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला.

लग्नानंतर लगेच आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांची मने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हार-रावांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहणे, वाचणे, गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या. तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारनाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे, न्यायानिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्येची सामाजिक व राजकीय बुद्धी परिपक्व झाली.

इ.स. 1754 मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याचा शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या 29 व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शितोडे हे माहिती असूनही सती जाणे तहकूब करण्यात अहिल्याबाईनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल. असा विचार करून अहिल्याबाईनी प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म, रूढी, परंपरा यापेक्षा कर्तव्य महत्त्वाचे मानून रयतेला कल्याणकारी राज्य दिले.

मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर २१ वर्षे अत्यंत यशस्वीपणे खऱ्या कल्याणकारी योजना काय असू शकतात आणि त्या कशा राबवल्या जाव्यात हे त्यांनी दाखवून दिले सासरा मल्हाररावांचा मृत्यू २० मे १७६. मुलगा मालेरावाचा मृत्यू २७ मार्च १७६७ मध्ये झाला अशी एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुखाचा विचार न करता अहिल्याबाईनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्त्वाप्रमाणे राज्य केले

पेशावर रघूनाथराव याला होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा लोभ सुटला. त्याने पेशवाईत होळकराचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेऊन इंदोर वर चढाई केली हे वृत्त तेजास्विनी अहिल्याबाईला कळताच खचून न जाता त्यांनी रघुनाथरावांना खलिता पाठविला त्या म्हणतात," आपण माझे राज्य हिरावून घेण्याने कपट रचून आलात आमच्याकडील फितूरास गाठले. मला दुबळी समजलात की खुळी? दुःखात बुडालेल्यास आणिक बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतू? आता आपली गाठ रणांगणात पडेल! माझ्याबरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल मी हरले तर किर्ती करून जाईल पण आपण हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. मी अबला आहे असे समजू नका. मी खाल्मावर आले घेऊन समोर उभी राहिले तर पेशव्यांना भारी पडेल. वेळ पडली तर हत्तीच्या पायी साखळीशी बांधून तुमचे स्वागत केले नाही तर होळकराच्या सुनेचे नाव लावणार नाही." मुत्सद्दी अहिल्या म्हणजे तळपती समशेर आणि लखलखती वीज होती. त्यांनी आपल्या आयुष्य लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न घालता संपूर्ण भारतात कार्य

केलेले आहे संपूर्ण भारतात अनेक विहीरी, तलाव, कुंड, घाट बांधले आहेत. रस्ते, पूल निर्माण केले आहेत. जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे केले जाते. ते काम लोकमाता अहिल्याबाईंनी केले उद्योगधंद्यांना व त्याच्या विकासाला प्राधान्य दिले.

मल्हारराव्यांच्या मृत्यूनंतर इंदोर वरून संस्थानची राजधानी महेश्वर या ठिकाणी आणून कारागीर, मजूर, विणकर, कलावंत, साहित्यिक अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, पैसा, घर इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या. आजही महेश्वरी साड्या, पैठणी, धोतर प्रसिद्ध आहेत. राज्यात पशुपक्षी यांना चरण्यासाठी त्यांनी कुरणे राखली.

मुंग्यांना साखर, माश्यांना कणकेचा गोळा, उन्हाळ्यात वाटसरूंना पिण्यासाठी पाणपोया, हिवाळ्यात गरजूंना गरम कपडे यांची सोय केली. आपल्या राज्यात सूक्ष्म जीवही उपाशी राहू नयेत. यासाठी दक्षता घेतली. दिव्यांग, अनाथ व असहाय्य लोकांचे पुनर्वसन केले गोरगरिबांसाठी अन्नछत्रे व सदावर्ते चालविली. वस्त्रांचे वाटप केले. प्रवाशांसाठी मार्गावर अरण्यमय प्रदेशातही आंबराई, बगीचे, वृक्षारोपण, विश्रांतीसाठी ओटे व धर्मशाळा बांधल्या. घाट बांधताना केवळ तज्ञांची मत विचारात न घेता प्रत्यक्ष त्या भागातील स्त्रियांना बोलून घाटाच्या पायऱ्या कशा हव्यात, कपडे धुताना बाळ कुठे ठेवायला सोयीस्कर पडेल, कपडे बदलताना खोल्या कुठे असाव्यात? इतक्या बारीक तपशिलासह घाट बांधून घेतले.

सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे, मशिदी, दर्गे व विहार बांधली तर काही मंदिरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. मजुरांना काम मिळाले व सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा



बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुर सोबत स्वतःच्या मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला अहिल्याबाई ह्या समाजसुधारक होत्या. त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही त्यांनी फक्त धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवधर्म प्रजेवर जास्त करांचा बोजा न लादता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोग सुद्धा लोक-कल्याणासाठी केला. अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या. त्यांच्या जयंती-निमित्त त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन .....!



नाव :- सानिका शिशिष साबळे.
इयत्ता :- BSc.CS - S.Y
विषय :- पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका
फोन नंबर :- 9881202583 / 7020050308

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका...

भारतीय इतिहासातील महान स्त्री शासिकां-मध्ये पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे नाव अत्यंत सन्मानाने घेतले जाते. त्यांनी केवळ एक निपुण शासिका म्हणून नव्हे, तर एक आदर्श स्त्री, धर्मप्रेमी, जनकल्याणकारी राणी आणि राजमाता म्हणून आपला ठसा उमटवला. अठराव्या शतकात स्त्रियांना राजकारणात फारसं स्थान नसतानाही अहिल्याबाईंनी राज्याचा कारभार यशस्वीपणे सांभाळत एक आदर्श सत्ताधीशाचं उदाहरण निर्माण केले.



Rajdhani
DATE / /

अहिल्याबाईचा जन्म इसवी सन १७२५ मध्ये महाराष्ट्रातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे एक सामान्य देशस्थ ब्राम्हण होते. त्यांनी आपल्या कन्येला धार्मिक संस्कार व मर्यादित शिक्षण दिले. त्या काळात स्त्रियांच्या शिक्षणाची संधी फारशी नव्हती, परंतु अहिल्याबाई वाचन, लेखन, रामायण, महाभारत यांसारख्या ग्रंथांचे ज्ञान घेत होत्या. त्यांच्यातील सौम्यता, श्रद्धा, कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभाव लहानपणापासूनच दिसत होता.

नमन करा रे वीरजनांनो, नमन करा त्या तेजाला,
होळकर घराण्याची राणी, मान द्या त्या मातेला...
चोंडी गावात जन्म घेतला, साधी मुलगी होती ती,
कर्तृत्वाच्या जोरावर झाली, भारतमातेसम महान ती...

ना सिंहासनाची हाव तिला, ना सोन्याचा मोह तिचा,
जनतेच्या सुखासाठी वाहिलं, जीवन तिचं सारा...
खांडेराव गेले युद्धात, दुःख तीने पचवलं,
मल्हाररावांच वचन पाळून, स्वराज्य पुन्हा फुलवलं...

गंगाघाटापासून काशीत, रामेश्वरापर्यंत गाथा,
मंदिर बांधली तीने, भक्तीस मिळाली छाया...
प्रेम दिलं तिने जनतेला, न्यायाचं राज्य तिने केलं,
होळकरांच नाव सुवर्णात, तेजस्वी रेखाटून ठेवलं...

स्त्रियांच तीने मान वाढवलं, सतीप्रथा थांबवली,
विधवांना दिलं आधार, नवजीवन फुलवलं...
शेतकरी हसला, प्रजेचा जीव वाचला,
दुष्काळात अन्नवाटपाने, आईपण उरला...



Rajdhani
DATE / /

इंदूरचे सुभेदार मल्हारराव होळकर हे एक दूरदृष्टीचे आणि धर्मशील शासक होते. त्यांनी अहिल्याबाईंच्या गुणांची दखल घेऊन त्यांचा विवाह आपला पुत्र खांडेराव होळकर यांच्याशी लावला. यामुळे अहिल्याबाई होळकर घराण्यात दाखल झाल्या. सासऱ्यांच्या सानिध्यात त्यांना राज्यकारभार, प्रशासन, न्यायनिवाडा आणि सैन्य यांचे प्रशिक्षण मिळाले. त्यांच्या सासऱ्यांनी त्यांच्यावर मोठा विश्वास ठेवला.

पण नियतीने त्यांच्यावर कठीण प्रसंग ओढवले. इसवी सन १७५४ मध्ये पती खांडेराव यांचा मृत्यू झाला, त्यानंतर इसवी सन १७६६ मध्ये सासरे मल्हारराव यांचेही निधन झाले. त्यावेळी होळकर घराण्याचे वारस सुभेदार मालेराव होते, पण त्यांच्या अकाली निधनानंतर राज्य अराजकतेच्या मार्गावर होते, तेव्हा अहिल्याबाईंनी धैर्याने पुढे येत राज्याचा भार स्वतःच्या खांद्यावर घेतला.

न्याय, सेवा, संस्कृती यांचा संगम झाला,
अहिल्याबाईंच्या तेजाने राज्य उजळला...
स्त्रीशक्तीची गाथा त्यांनी जगाला सांगितली,
इतिहासात त्यांचा अजरामर ठसा उमटला...

राज्याचा कारभार हाती घेतल्यावर अहिल्याबाईंनी अनेक सुधारणा केल्या, त्यांनी न्याय, समाजकल्याण, धार्मिक कार्य आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांत महत्त्वपूर्ण कार्य केले, त्या सकाळी लवकर उठून धार्मिक पूजा करून दरबारात न्यायनिवाडा करत. अहिल्याबाईंनी प्रशासनात पारदर्शकता ठेवली आणि जनतेच्या समस्या ऐकून त्यावर त्वरित उपाययोजना केल्या -

१. सामाजिक सुधारणा :—
त्यांनी स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरला. स्त्रियांच्या पुनर्विवाहास पाठिंबा दिला. सतीप्रथेला



Rajdhani
DATE / /

विरोध केला. गरीब व विधवा महिलांसाठी आश्रम उभारले.

2. धार्मिक कार्य :—

अहिल्याबाईनी संपूर्ण भारतभर मंदिरे बांधली आणि जीर्णोद्धार केला. त्यांनी काशी विश्वेश्वर, सोमनाथ, रामेश्वर, बद्रीनाथ, द्वारका, गंगाघाट, अयोध्या आदी धार्मिक स्थळांवर दान दिले आणि घाट, धर्मशाळा बांधल्या.

3. आर्थिक धोरण :—

शेतकऱ्यांसाठी कर कमी केले. दुष्काळात अन्नधान्य वाटपाची योग केली. व्यापार, शेती आणि हस्तकला यांना चालना दिली.

4. रक्षण व न्यायव्यवस्था :—

त्यांचा दरबार न्यायासाठी प्रसिद्ध होता, चोरी, भ्रष्टाचार यावर कठोर शिक्षा होत असे. त्यांनी सैन्यदलही मजबूत ठेवले.

अहिल्याबाई अत्यंत संयमी, नम्र आणि श्रद्धावान होत्या, त्या नेहमी साधे वस्त्र परिधान करत. त्यांचा जीवनशैली संन्याशीप्रमाणे नव्हे तर जनसेवकाप्रमाणे होती. त्यांनी केवळ इंदूर नव्हे तर संपूर्ण भारतात आपल्या कार्याचा ठसा उमटवला. त्या केवळ शासिका नव्हत्या तर एक "जननियोजिका" होत्या — जननेसाठी कार्य करणाऱ्या राजमाता...

अहिल्याबाईना "पुण्यश्लोक" हा किताब त्यांच्या पुण्यकर्मामुळे मिळाला. त्यांच्या कार्याची दखल भारतात अनेक ठिकाणी घेतली गेली. त्यांच्या नावाने स्मारके उभी करण्यात आली, रस्ते व शिक्षणसंस्था स्थापन झाल्या, आजही त्यांच्या नावाने पुरस्कार दिले जातात.

इसवी सन १७९५ मध्ये ७० व्या वर्षी अहिल्याबाईचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांचे नाव जनतेच्या हृदयात अढळ राहिले. इंदूरचं स्वातंत्र्य, धर्मनिष्ठा आणि न्यायप्रियता त्यांनी अनेक दशकांपर्यंत टिकवून ठेवली.



Rajdhani
DATE / /

मी अहिल्या बोलतेय...
चौंडीच्या मातीचा गंध अजूनही माझ्या अंगणात दरवळतोय,
त्या लहानशा गावात जन्मली, पण मन मात्र सीमांच्या पलीकडे होतं...

मी होळकर घरात आले,
तेव्हा राजगादीपेक्षा मला पतीच्या हातातलं प्रेम जास्त प्रिय होतं,
आणि युद्धात त्याच्या निधनानंतर,
मी आभाळासारखी कोसळले नाही... उभी राहिले.

होय,
मी विधवा होते, पण दुर्बल नाही...
मी सन्नेत होते, पण अभिमानी नाही...
मी न्यायात होते, पण कठोर नाही...
मी देवमोळी होते, पण अंधश्रद्धाळू नाही...

मी फक्त राणी नव्हते,
मी आई होते त्या मातृभूमीची,
माझ्या प्रत्येक निर्णयामागे, हजारो लेकरांचं भविष्य होतं...

मी रामेश्वरापर्यंत घाट उभे राहिले,
पण मनाचा घाट अधिक खोल होता –
जिथे मी दुःख विसरून, इतरांसाठी पाण्याचा ओघ चालू ठेवला...

लोक म्हणतात,
"तीने मंदिरे बांधली."



Rajdhani
DATE / /

हो, पण मी माणुसकीचं देवालय बांधलं–
जिथे जाती, पंथ, लिंग काही विचारलं जात नसे...

माझं राज्य छोटं होतं,
पण माझं स्वप्न मात्र अखंड भारतासाठी होतं–
धर्म, शिस्त, सेवा आणि न्याय या चौथऱ्यावर उभं केलेलं स्वराज्य...

आज जर मी जिवंत असते,
तर सांगितलं असतं –
"राजकारण सत्तेसाठी नाही, सेवेसाठी असावं."
आणि
"स्त्री म्हणजे सौंदर्य नव्हे, ती म्हणजे शक्तीचं मूर्तिमंत रूप!"

मी अहिल्या बोलतेय...
शांतपणे, पण ठामपणे.
कारण माझं जीवन म्हणजे शब्द नव्हे,
तर कृतींचा एक पोवाडा आहे–
जो काळाच्या पलिकडेही साजरा होतो...

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर या एक महान स्त्री शासिका होत्या ज्यांनी धर्म, न्याय, समाजसेवा आणि प्रशासन यांचा उत्कृष्ट संगम साधला. त्यांच्या जीवनातून प्रत्येक विद्यार्थ्याने, स्त्रीने आणि राजकारणात असणाऱ्या व्यक्तींनी शिकण्यासारखं आहे. भारतातील प्रत्येक स्त्रीसाठी त्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत.

अहिल्याबाई होळकर यांचा इतिहासात एक वेगळाच ठसा आहे. त्या फक्त एक शासिका नव्हत्या,



Rajdhani
DATE / /

तर एक आदर्श आई, मार्गदर्शक आणि समाजसुधारक होत्या. त्यांच्या कार्यातून आपण स्त्रीशक्तीची खरी व्याख्या समजून घेऊ शकतो. अहिल्याबाईंचा आदर्श आजही प्रत्येक स्त्री आणि पुरुषासाठी प्रेरणादायक आहे. त्या एक आदर्श स्त्री शासिका म्हणून सदैव स्मरणात राहतील.

अशा या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या केवळ एक शासिका नव्हत्या, तर त्या होत्या एक माऊली, एक समाजसेविका आणि स्त्रीशक्तीचा जिवंत प्रतीक. त्यांच्या कार्यामुळे त्यांनी एक आदर्श राज्यकारभार केला, जो आजही प्रशासनासाठी आदर्श ठरतो. त्यांचे जीवन म्हणजे कर्तव्यनिष्ठा, त्याग आणि सेवा यांचे त्रिवेणी संगम होता.

आजच्या काळातही जर आपण त्यांच्या विचारांना आणि कार्याला अनुसरून आपले जीवन घडवले, तर खरेच आपण त्या "पुण्यश्लोक" उपाधीला न्याय देऊ शकतो.

स्त्रीशक्तीचा आदर्श म्हणून त्यांचे नाव इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. विधवा असूनही त्यांनी संपूर्ण राज्य अतिशय कुशलतेने चालवले, जनतेसाठी मंदिरे, घाट, धर्मशाळा उभारल्या आणि सामाजिक समता जोपासली.

आज आपण डिजिटल युगात वावरतो, पण आजही जर समाजाला आणि प्रशासनाला कोणता आदर्श घ्यायचा असेल, तर तो आहे राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा!


न्याय, करुणा, सेवा यांची साक्षात मूर्ती,
अहिल्याबाई होळकर – तेजस्वी कीर्ती...
महाराष्ट्राचं गौरव, स्त्रीशक्तीचं रूप,
आदर्श नेतृत्वाचं अढळ अनुपम स्वरूप...

त्यांच्या स्मृतीस कोटी कोटी प्रणाम !!!



Rajdhani
DATE / /

"अहिल्याबाई म्हणजे नेतृत्व, मातृत्व आणि कर्तृत्व यांची त्रिसूत्री !!!"



"पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर
यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन!"



नाव :- कांचन सुरेश खाडे

इयत्ता :- १२ वी (विज्ञान)

महाविद्यालय :- S.B. Junior College, Jalna

पत्ता :- द्वारका नगर, जुना जालना

मो.नं :- 9270359480



निबंध

विषय : अहिल्याबाई होळकर जीवन, कार्य, विचार आणि आजची प्रस्तुतता

एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. अहिल्याबाई होळकर या महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्वपूर्ण आणि प्रेरणादायक व्यक्तिमत्व आहेत. त्या होळकर घराण्याच्या माळव्याच्या राणी होत्या. त्यांचा जन्म 31 मे 1725 रोजी झाला. त्यांचे जन्मस्थान चौंडी, (मल्हारपीठ) अहमदनगर जिल्हा, महाराष्ट्र हे आहे. त्यांच्या आईचे नाव सुशिलाबाई शिंदे आणि वडीलांचे नाव माणकोजी शिंदे होते. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी म्हणजेच खंडेराव होळकर यांच्याशी झाले.

खंडेराव यांच्या आईचे नाव गौतमीबाई होते. खंडेराव हे व्यसनी, छंदीफंदी होते. पण अहिल्याबाईंनी याबाबतीत तक्रार न करता सासऱ्यांनी नेमून दिलेल्या कामात लक्ष घातले. कुशाग्र बुद्धीची देणगी लाभलेल्या या सुनबाईवर सासऱ्यांचा मोठा विश्वास होता आणि खूप महत्वाचा पत्रव्यवहार अहिल्याबाईंवरच सोपवत असत. खंडेरावांपासून त्यांना दोन अपत्ये झाली. मालेराव हा मुलगा आणि मुक्ताबाई ही कन्या. अहिल्याबाईंना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले. त्या वेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या



पण त्यांचे सासरे म्हणाले, " प्रजाहितासाठी तुम्ही सती जाऊ नये हे राज्य सांभाळायचे आहे.

आपल्या सासऱ्यांच्या इच्छेचा अहिल्याबाई होळकर यांनी मान राखला आणि सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. मल्हारराव ज्या वेळी मोहिमेवर असत तेव्हा स्वतः अहिल्याबाई राज्याचा बंदोबस्त चोख राखीत असत. मल्हाररावांच्या सल्ल्यानुसार वागत असत. मल्हारराव होळकरांना पेशव्यांनी इंदूर संस्थानाची जहागिरी दिली होती. दौलतीचा कारभार मोठा होता. पण 1766 मध्ये त्यांचे निधन झाले आणि अहिल्याबाईवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. त्यांचा पुत्र मालेराव यांना जरी सुभेदारीची वस्त्रे मिळाली तरी ती सांभाळण्याची त्यांच्यात कुवत नव्हती. लवकरच त्यांचे देहावसान झाले. आता खऱ्या अर्थाने अहिल्याबाई राज्यकर्ती झाल्या. पुढील 28 वर्षे त्यांनी राज्य कारभाराचा गाडा सेन्याच्या सहकार्याने अतिशय कुशल पणे चालविला. तिजोरित भर घालून त्यांनी प्रजाहिताकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले.

अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात अमर झाले. त्याला त्यांची धर्मपरायण आणि उदार वृत्ती कारणीभूत ठरली. बाई काय राज्यकारभार करणार ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी सपशेल खोटी ठरविली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांचा जुना दिवान गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता. राघोबादादांशी त्यांनी अहिल्याबाई विरुद्ध संधान बांधले आणि इंदूर बळकवण्यासाठी त्यांना प्रोत्साहीत केले. अहिल्याबाईंना हे कळले तेव्हा त्या युद्धास तयार असल्याचे त्यांनी राघोबादादास कळविले. राघोबांना हे अडचणीचे झाले.



हरला तर बाईकडून आणि जिंकला तरी बाईशी युद्ध करण्यात कोणती मोठी मर्दुमकी. शेवटी त्यांना माघार घ्यावी लागली. त्यांचा उत्तम पाहुणचार अहिल्याबाईनी इंदूरात केला. अशा रीतीने बाईच्या लौकिकात आणखी भर पडली.

अहिल्याबाईच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय घटना त्यांचा लौकिक वाढविणारी आहे. आपली कन्या मुक्ताबाईचे स्वयंवर घोषित करताना त्यांनी जाहीर केले की जो कोणी चोर, लुटारू, दरोडेखोर यांच्या राज्यात बंदोबस्त करील त्या वर व्यक्तीशी मुक्ताबाईचा विवाह लावला जाईल त्यावेळी जात-पात बघितली जाणार नाही. हा विचार जाहीर करून त्या थांबल्या नाहीत तर त्यांनी कृती ही तशीच केली यशवंतराव फणसे या गुणी, वर तरुणाशी त्यांनी मुक्ताचा विवाह करून दिला.

अहिल्याबाई एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. पूर्वीच्या कायदयांमध्ये त्यांनी परिस्थितीनुसार बरी सुधारणा केल्या. करपद्धती सौम्य केली मात्र शेतकऱ्यांकडून सारा घेणे चालू ठेवले. पाटील, कुलकरण्यांच्या हक्कांचे वतन हक्कांचे संरक्षण करून गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. त्यावेळी डोंगर भूपखातून भिल्ल व गोंड आदिवासी प्रजांना उपद्रव देत आणि त्यांच्याकडून भीलकुवडी नावाचा कर वसूल करीत. तेव्हा बाईनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांचा कर घेण्याचा हक्क मान्य केला. त्यांच्याकडून पडीत जमिनीची लागवड करून घेतली. शिवाय त्यांना विशिष्ट हद्द नेमून दिली. जमीन कशा पद्धतीने देण्याची पद्धत सुरू केली.



राजधानी इंदूरहून नर्मदातीरी महेश्वरला हलविली (1770). तिथे अनेक वास्तू बांधल्या. राजवाड्यात प्रशस्त देवघर होते. नदीला घाट बांधले. मंदिरांचा जीर्णोद्धार केला व पूर्वजांच्या स्मरणार्थ छत्र्या बांधल्या महेश्वर हे विणकरांचे मध्यवर्ती केंद्र होते. बाईंनी वस्त्र उद्योगास उत्तेजन दिले. कोष्यांची वसाहत स्थापन केली. आणि उत्तम हातमागाची सणंगे तयार होतील अशी पेट कायम केली. त्यांचा मूळ स्वभाव सौम्य असला तरी राज्यकारभारात त्यांनी मनकपसिंगसारख्या कुविख्यात डाकुला फाशी दिली. होळकरांच्या टांकसाळीतील नाण्यांवर बिल्वपत्र शिवलिंग यांचे छाप असत.

त्यांच्या धर्मपरायणतेला प्रांत मर्यादा नव्हती. त्यामुळे त्यांचे नाव आसेतू हिमाचल घेतले जाते. त्यांनी अन्नछत्रे उघडली. राज्यातून प्रवास करणाऱ्यांसाठी पाणपोया, धर्मशाळा, पांथशाळा, आश्रम शाळा बांधल्या. जनावरांसाठी डोव्या बांधून घेतल्या. पशुपक्ष्यांसाठी रुग्णोपचारांची व्यवस्था केली. सर्पदंशावर त्वरीत उपचार व्हावेत म्हणून हकीम - वैद्य नेमले. स्त्रियांना सुरक्षित स्नानासाठी, कपडे बदलण्यासाठी बंदिस्त ओवऱ्या (स्नानगृह) ठेवल्या. मुंग्यांना साखर आणि जलचरांना कणकेच्या गोळ्या खाऊ घालण्यापर्यंत त्यांचा दानधर्म सहज होता. गोरगरिबांना सणासुदीला त्या अन्नदान करीत, कपडे वाटत. थंडीच्या दिवसात घोंगड्या वाटल्या जात.

बाईंनी प्रमुख तीर्थक्षेत्र विशेषतः अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, हृषिकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंढी येथे मंदिरे बांधली. याशिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढा नागनाथ, काशीविश्वेश्वर, विष्णुपाद आदी



मंदिरांचा जीर्णोद्धार केला. वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चौंढी, नाशिक, जांब (इंदूर), त्र्यंबकेश्वर येथे नदीला घाट बांधली आणि गोकर्ण महाबळेश्वर, उज्जयिनी, रामेश्वर, भीमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उघडली. सत्पुरुषांच्या धामेश्वर ठिकाणी घाट, मंदिरे, कुंडे, धर्मशाळा बांधून यात्रिकांची सोय केली. शिवाय त्यांनी जेजुरी येथे मल्हारी गौतमेश्वराची छत्री, इंदूरला मालेराव व गौतमी बाई यांच्या छत्र्या आणि महेश्वरला मुक्ताबाई यांच्या स्मरणार्थ नाजूक कारागिरी केलेले मंदिर बांधले व कुंभेरी जवळ खंडेराव यांच्या स्मरणार्थ छत्री बांधली.

अहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मिळ होता. त्यात निर्णयसिंधु, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. विद्वानांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मानसन्मान दिला जाई. मोरोपंत व शाहीर अनंत फंदी यांचा अहिल्याबाईंनी आदरसत्कार करून अनंत फंदीस सत्काही दिला. आणि तमासगिरी पासून परावृत्त केले. अखेरच्या दिवसात त्यांना दुःख आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांचे दोन मुलगे वारले. मुलीचा मुलाचा मुलगा नाथाबा ऐन तरुण्यात गेला (1790). तुकोजी होळकरांची सून आनंदीबाई यांचे देहावसान झाले. त्यानंतर जावई यशवंतराव फणसे अचानक गेले आणि मुक्ताबाई सती गेली.

अशा बिकट परिस्थितीत शिंदयांचा सरदार गोपाळराव याने 1790 मध्ये होळकरांच्या फौजेवर हल्ला केला तेव्हा तरुणांसही लाजवेल अशा तडफदारीने त्यांनी शिंदयांचा पराभव केला. त्यांच्या राज्यात सुबत्ता, संपन्नता व शांती होती. त्या अजातशत्रू होत्या. पण राज्यावर वेळोवेळच्या संकटांना त्यांनी चोख उत्तर



दिले. मध्यम उंचीची, सावळ्या वर्णाची, डोईवर पदर घेतलेली ही स्त्री कर्तृत्व आणि विचार या दोन्ही दृष्टींनी केवढ्या उंचीची होती, हे त्यांच आयुष्यच सांगते.

महेश्वर येथे वृद्धापकाळाने 13 ऑगस्ट 1795 रोजी त्यांचे निधन झाले.

अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याची आणि विचारांची प्रस्वतता आजही जाणवते. त्यांच्या कार्यमुळे आजच्या समाजात महिला सशक्तिकरण, सामाजिक भलाई आणि लोककल्याण यावर भर दिला जातो. त्यांच्या कार्यमुळे आणि विचारांमुळे त्या आजही लोकांच्या स्मरणात आहेत. त्यांच्या कार्यमुळे समाजात सकारात्मक बदल झाले आहेत आणि आजही ते प्रेरणा देत आहेत.

दुःखामध्ये डोळ्यातून धार आणू नका,
संकुचित जगण्याला सार मानू नका,
जिवनाला कधी भार मानू नका,
अहिल्यादेवीची शपथ कधीही हार मानू नका
मुर्खाच्या संगतीला शहाण तर माती व्हाल.
अहिल्यादेवीच्या विचारांनी जगला तर
पुण्यश्लोक व्हाल.



नाव :- रेणुका शिवदास चिखले
वर्ग :- 9 वी
वय :- 15
शाला :- जि. आर. काबरा उच्च माध्यमिक
शाळा चांदुर बाजार जि. अमरावती

पत्ता :- मु. पो. आल्टोली ता. मोर्शी
जि. अमरावती
पिन कोड :- 444905
मो. नं. 8329324197
ई.मेल :- Pranavchikhale092@gmail.com



विषय :- पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व

"सध्या साऱ्या वेषामधुन, तेज झळकत गेलेलं,
सन्मान, सेवा, त्याग यांच, जीवन घडवत नेलेलं।
अहंकार नाही, केवळ प्रजा - हाच धर्म खरा,
अहिल्याबाईंच्या मार्गावर चालणं असो ध्येय आपलं सदा।"

आपण इतिहासाच्या ~~पुस्तक~~ पुस्तकात अनेक राजा-राणींच्या कथा वाचतो. काहीजण युद्धात पराक्रम गाजवतात, काहींच्या नावाने मंदिरे, पुतळे उभे राहतात. पण काही थोडेच असे असतात, ज्यांचं कार्य काळाच्या पलीकडे जाऊन आजही लोकांसाठी आदर्श ठरतं. अशाच एक महान स्त्री म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर. त्यांच्या आयुष्याकडे पाहिलं, की वाटतं - खरंच, नेतृत्व म्हणजे केवळ गादीवर बसणं नाही तर जनतेच्या सुख दुःखाशी एकरूप होणं असतं.

अहिल्याबाईंचा जन्म ३१ मे १७२५ रोजी चौंडी (अहमदनगर, महाराष्ट्र) येथे झाला. त्या फार श्रीमंत घरात जन्मलेल्या नव्हत्या. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे पाटील होते. लहानपणीच त्यांचं वाचनात, धर्मात व चांगल्या विचारात खुप लक्ष होतं ~~नेलच्या~~ तेव्हाच्या काळात मुलींना फारसे शिक्षण दिलं जात नसे, पण त्यांच्या वडिलांनी त्यांना शिकवलं, घडवलं. लहान वयातच अहिल्याबाईंच लग्न मल्हारराव होळकर यांचे पुत्र खांडेराव होळकर यांच्याशी झालं. त्यानंतर त्यांच्या आयुष्यात अनेक संकट आली - पतीचं युद्धात निधन, नंतर सासऱ्यांचं निधन. एक विधवा स्त्री म्हणुन समाजाकडुन नकारात्मक दृष्टीकोनाला ~~समोरं~~ सामोरं जाणं सोप नव्हतं. पण त्या डगमगल्या नाहीत. त्या अधिक खंबीर झाल्या.

नेतृत्वाची खरी सुरुवात - जेव्हा वेगळे म्हणत होते



की "राका स्त्रीला राज्य चालवता येणार नाही", तेव्हा अहिल्याबाईंनी दाखवुन दिलं की, योग्य विचार, प्रामाणिकता आणि सेवाभाव असेल, तर कुणीही प्रभावी नेता होऊ शकतो. दुसऱ्या गादीवर त्या बसल्या पण केवळ नावा पुरत्या नव्हे. त्यांनी संपुर्ण राज्य चालवलं - न्याय, प्रशासन, सामाजिक कल्याण, आणि अर्थ-व्यवस्था - प्रत्येक बाबतीत त्यांनी सर्वोत्तम कार्य केलं.

न्यायप्रिय आणि दयाळू नेतृत्व - अहिल्या बाई न्यायप्रिय होत्या. त्यांचं दरबार सर्वांसाठी खुलं असायचं. गरिबांनी, शेतकऱ्यांनी, सामान्य स्त्रिया-पुरुषांनी येऊन थेट समोर आपली कैफियत मांडु शकायची. त्या प्रत्येक प्रकरणाचं समाधानकारक उत्तर देत आणि जे चुकीचं असेल त्याला शिक्षा करायच्या. त्यांनी कधीही भेदभाव केला नाही - जाती, धर्म, लिंग या सर्व गोष्टींवर त्यांनी माणुसकीला प्राधान्य दिलं आज जिथे आपण 'समावेशक समाज' किंवा 'इन्क्लुसिव्ह लीडरशिप' म्हणतो, तसं त्यांनी २५० वर्षांपुर्वी करुन दाखवलं होतं.

लोक कल्याणासाठी सेवा :- अहिल्याबाई होळकर यांनी त्यांच्या कारकीर्दीत जेवढं बांधकाम केलं तेवढं कदाचित कुणीही केलं नसेल. त्यांनी शेकडो मंदिरं, धर्मशाळा, घाट, विहिरी, तलाव बांधले. देशभरातील तीर्थक्षेत्रांचं पुनरुज्जीवन त्यांनी केलं - काशी, अयोध्या, गंगाघाट, रामेश्वर इत्यादी. पण केवळ धर्मापुरतेच हे कार्य मर्यादित नव्हते. त्यांनी रस्ते, पुल, जलसाठे, कृषी व्यवस्थेसाठी काम केलं. शेतकऱ्यांना मदत केली. आजच्या भाषेत सांगायचं, तर त्या इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट ओरिएंटेड लीडर होत्या.

अहिल्याबाई आणि स्त्रीशक्ती - मी राका १५ वर्षाची मुलगी आहे जेव्हा मी अहिल्याबाईंची गोष्ट वाचले, तेव्हा मला असं वाटलं की खरं रोल मॉडेल कोण आहे तर त्या स्त्रिया. त्या काळात जेव्हा विधवांना अस्पृश्यांसारख वागवलं जायचं, तेव्हा त्यांना राज्यकारभार

सांभाळून दाखवला. आज आपल्याला महिला सशक्तीकरण, स्त्रियांच्या हक्कांसाठी लढा हे शब्द खुप ऐकायला मिळतात. पण अहिल्याबाईंनी हे सर्व प्रत्यक्ष कृतीतून करून दाखवलं होतं. त्यांनी अनेक स्त्रियांना मदत केली, विशेषत: विधवांना आणि गरीब महिलांना जगण्यासाठी साधनं दिली.

आधुनिक भारतासाठी आदर्श - आज भारतात अनेक संकटं आहेत - भ्रष्टाचार, असमानता, बेरोजगारी, सामाजिक भेदभाव. यासाठी आपल्याला ज्या प्रकारचं नेतृत्व हवं आहे, ते अहिल्याबाईंच्या नेतृत्वासारखं असावं - पारदर्शक, संवेदनशील, प्रजाहितैषी. त्यांचं नेतृत्व लोकशाही नव्हतं, पण त्यांचा कारभार लोकाभिमुख होता. त्यांनी कधीही स्वत:चा फायदा पाहिला नाही. त्यांच्या निर्णयांमध्ये केवळ प्रजेचा विचार होता. अशा नेत्यांकडून आपण खुप काही शिकू शकतो - सेवा म्हणजे नेतृत्व, नम्रता म्हणजे ताकद, आणि कर्तव्य म्हणजे धर्म.

नेतृत्वाची मुल्यं - आजच्या विद्यार्थ्यांसाठी - आज मी एक विद्यार्थिनी आहे. उद्या कुणी डॉक्टर, इंजिनीयर, शिक्षक, नेता, समाजसेवक होईल. पण आपण सगळे एक जबाबदार नागरिक होणार आहोत. अहिल्याबाईंच्या आयुष्यातुन मला काय शिकायला मिळालं?

- सेवा भावना - जे काही शिकतो, ते समाजासाठी वापरायला हवं
- समानता - सर्वांना समान हक्क, प्रेम, सन्मान मिळायला हवा
- न्याय आणि प्रामाणिक पणा - चुकीचं चुकीच ~~असणं~~ आहे आणि बरोबर बरोबर असं ठामपणे म्हणण्याची हिम्मत ठेवावी.
- कर्मनिष्ठा - कोणतंही काम असो, ते पुर्ण समर्पणाने करावं

त्यांचं जीवन आजच्या भारतासाठी नेतृत्व, सेवा आणि त्याग यांची प्रेरणा आहे. आपण सर्वांनी त्यांचं अनुसरण करुन समाजासाठी काहीतरी चांगलं काम



केल पाहिजे.
राका कवितेमध्ये असे म्हटले आहे की,
"आधुनिक भारत आज शोधतो वाट,
तुझ्या आदर्शांनी भरतो आत्मघाट।
नेतृत्व म्हणजे सत्तेचा गर्व नव्हे,
तर जनतेच्या सुखासाठी अखंड व्रत असावे।"

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचं जीवन म्हणजे राक ज्वलंत दिपस्तंभ आहे. त्या राक प्रेरणादायी नेत्या होत्या ज्यांनी सत्ताहदे हर सेवा निवडली. त्यांच्या जीवनातुन आपल्याला खुप काही शिकायला मिळते. त्याग, धैर्य, सेवा आणी समतेची मुल्य. मी देवाला पार्थना करते की माझ्या भारतातली राक राक स्त्री जागी व्हावी व अहिल्याबाईन सारखं नेतृत्व करावं
जय हिंद जय भारत.

धन्यवाद....!



अहिल्याबाई होळकर भारताच्या इतिहासातील तेजस्वी अध्याय

"In latter days from Brahma came,
To rule our land, a noble dame,
Kind was her heart and bright
her fame, Ahilya was her honoured name."

१८४९ साली प्रसिद्ध कवयित्री जोआन्ना बेली यांनी अहिल्याबाई विषयी लिहिलेल्या या ओळी!

कुठलीही व्यक्ती ही विशिष्ट ध्येय, उद्दिष्ट, हेतू व दृष्टीकोन घेवून जन्माला येत नाही. तर, हे सर्व घडते ते कर्तृत्वाने, आकाशाला गवसणी घालण्याची क्षमता, उच्च ध्येयवाद, उत्तुंग आदर्श व प्रचंड कार्यक्षमता स्वतः मध्ये निर्माण करून, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जी माणसं आपलं संपूर्ण आयुष्य लोककार्याला समर्पित करतात अशाच व्यक्तींचा इतिहास नोंद घेतो. आणि त्यापैकीच एक महणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर. पुराणात गौतम ऋषींच्या पत्नी असणाऱ्या अहिल्या आमच्या घराघरा पर्यंत पोहचलील. पण या जगाच्या पाठीवरती तब्बल २८ वर्षे राज्य करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मात्र आम्हाला समजत नाही. पुराणातील अहिल्येला ऋषींनी शाप दिला. आणि त्यांचा दगड झाला. प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने त्यांच्या आयुष्याचा उद्धार झाला की नाही; मला माहित नाही. पण अहिल्यादेवी होळकर यांच्या पदस्पर्शाने तुम्हा-आम्हांसहित सगळ्या देवांचा उद्धार झाला हे मात्र आपल्याला विसरून चालणार नाही. कारण अहिल्याबाई होळकर या भारताच्या इतिहासातील एक तेजस्वी अध्याय आहे. जो आपण सर्वांनी जाणून घेवून, त्यांच्या कार्याचा व विचारांचा वारसा फक्त जपून ठेवूनच नव्हे तर सर्वसामान्यांपर्यंत पोहचवणे आज खऱ्या अर्थाने काळाची गरज आहे. अहिल्याबाईंचा जीवन प्रवास हा थक्क करणारा आहे. जेव्हा त्यांच्या या जीवनाचा एक-एक अध्याय आपण वाचतो, तेव्हा आपण भारावून गेल्याशिवाय राहणार नाही. या निबंधाच्या माध्यमातून अहिल्याबाईंचा जीवन प्रवास उलगडण्याचा हा छोटासा प्रयत्न



अहिल्याबाईंचा जन्म ३१ ऑगस्ट १७२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या गावी झाला. माणकोजी शिंदे-पाटील यांची ही मुलगी लहानपणापासूनच धाडसी होती. राज्यकर्त्यांना आवश्यक असणारे सर्व गुण त्यांच्याजवळ होते. एकदा चोंडीत बाजीराव पेशवे यांच्या सैन्याचा तळ पडला होता. सोनेकाठी असलेल्या एका देवालयात दर्शनासाठी म्हणून छोटी अहिल्या आईबरोबर गेली होती. खेळताना अहिल्यांनी शिवलिंग बनवले, तेवढ्यात सैन्यदलातील एकाचा घोडा उधळला. उधळलेला घोडा आपल्याच दिशेने येत असल्याचे पाहून अहिल्यांकडच्या मैत्रिणी पळून गेल्या. मात्र, अहिल्याबाई डगमगल्या नाहीत. त्यांनी शिवलिंगावर पालथे पडून त्याचे रक्षण केले. श्रीमंतांनी अहिल्यांना म्हटलं, पोरी तुला घोड्याने तुडवले असते तर? त्यावर अहिल्याबाई आपले डोळे श्रीमंतांवर रोखत म्हणाल्या, हे शिवलिंग मी घडवले आहे. आपण जे घडवले आहे त्याचे प्राणप्रणाने रक्षण करावे, असे बोरली माणसे सांगतात. मी तेच केले. त्यांचे बाणेदार उत्तर ऐकून श्रीमंत खूश झाले. त्यांच्याबरोबर असलेले सरदार मल्हारराव होळकर यांनी छोट्या अहिल्येला आपली सून करून घेण्याचे ठरवले. मल्हाररावांनी त्यांना सून करून घेतली आणि अहिल्याबाईंनी देखील मल्हाररावांचा निर्णय सार्थ ठरवला व होळकर घराण्याची कीर्ती सर्वदूर पोहोचवली.

देशाच्या स्वातंत्र्य संग्रामापासून ते घराबाहेर पडण्याच्या स्वातंत्र्यापर्यंत महिलांनी सतत संघर्ष केला आहे आणि आजही त्यांच्या संघर्षाची लढाई चालूच आहे. पण ज्या काळात स्त्री ही फक्त रूढी-परंपरेच्या बंधनात अडकलेली होती; त्या काळात ५ ते २८-२९ वर्षांची विधवा स्त्री स्वतः राज्यकारभार आपल्या हातात घेऊन अत्यंत चोख पद्धतीने प्रजेचे हीत साधणारे राज्यकारभार करते, तेव्हा त्या स्वतःच महिला सबलीकरणाचे प्रतिक वाटतात. त्यांचे हे कार्य त्यांच्या राज्यांतील इतर महिलांसाठी प्रेरणादायी ठरलेच, पण आजच्या सर्व



स्त्रियांसाठी ते तितकेच स्फूर्तीदायक आहे. ज्यावेळेस अहिल्याबाईच्या पतीच म्हणजे खंडेरावांच निधन झालं त्यावेळेस त्या सती जायला निघाल्या. त्याकाळात सती जाणे ही एक परंपराच होती. लोकांनाही वाटत होते की अहिल्याबाईनी सती जावं पण त्या सती गेल्या नाही. त्यांचे सासरे मल्हाररावांनी त्यांना सती जाण्यापासून रोखले. कारण, सती जाणं काय असायचं की, जर स्त्री सती गेली तर ती पुण्यवान स्त्री समजली जायची. सती गेलेल्या स्त्रीला स्वर्ग मिळायचा. तिच्या ४२ पिढ्यांचा उद्धार व्हायचा. तेव्हा अहिल्याबाईनी सुद्धा विचार केला की, आपण सती जाऊन आपल्याला स्वर्ग मिळण्यापेक्षा आपण आपल्या राज्यातच स्वर्ग का निर्माण करू नये? आणि अहिल्याबाईनी आपल्या राज्यकारभारातून हे सर्वांना दाखवून दिले. राजाने प्रजासेवा हीच देवपूजा मानावी या उदात्त विचारांनी त्यांनी राज्य केलं. त्यांच्या राज्यकारभारात याचे प्रतिबिंब ठायी ठायी दिसत.

सती प्रथा बंद करण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. अहिल्याबाईनी आपल्या होळकर राजवटीत दत्तक वारसा मंजूर करून लोकांच्या संसारात सुखाची लाट निर्माण केली. आपल्या राज्यातील लोकांना जाती किंवा धर्माच्या नावाखाली अस्पृश्यता पाळण्यावर बंदी घातली आणि सर्वांना समान शिक्षण दिली. अहिल्याबाईनी जंगलतोडी, कुऱ्हाडबंदी आणली. प्रत्येक घरातील माणसाच्या नावावर पाच झाडे असे गणित देऊन झाडे लावून घेतली जे झाडे लावत नाहीत त्यांच्याकडून दंड वसूल करण्याचा आदेश काढला. आपल्या मुलीचा आंतरजातीय विवाह करून स्वतःच्या घरापासून सुधारणेला सुरुवात केली. अहिल्यादेवींनी हुंडा विरोधी कायदा करून हुंडा देणाऱ्या, घेणाऱ्या व मध्यस्थी करण्यावर दंड ठोठावला. परराज्यांशी सलोख्याचे संबंध रहावे म्हणून त्यांनी पंधरा राज्यांत आपले वकील नेमले होते. इतर राज्यांतील नऊ वकील होळकर राज्याच्या दरबारात होते.



Date

अहिल्याबाईंनी निर्माण केलेल्या प्रशासन व्यवस्थेत प्रजेची उन्नती व विकास, सामाजिक शांतता, सुव्यवस्था समता व ममत्व, न्याय, स्वातंत्र्य या मूलभूत मानवी मुल्यांचा प्रत्यक्ष आस्वाद त्या काळात जनता घेत होती.

अहिल्याबाईंनी देशभर केलेली निर्माण कार्ये आजही प्रेरक आहेत. खरे तर शेकडो राज्यकर्त्यांत वाटल्या गेलेल्या भारत देशाला त्यांनी मंदिरे, घाट, रस्ते, धर्मशाळा आणि बारवांच्या माध्यमातून जोडण्याचे अचाट कार्य केले. आपल्या संस्थानाच्या बाहेर पाहण्याची तत्कालीन राज्यकर्त्यांची प्रवृत्ती नसतानाही अहिल्याबाईंनी केवळ आपल्या होळकर राज्याचा विचार न करता सोमनाथ ते केदारनाथ आणि दक्षिणेत पार रामेश्वरम् पर्यंतच्या प्रदेशात आपली निर्माण कार्ये केली. त्याबद्दल त्यांचा आजही सन्मान केला जातो, व त्यांना त्यासाठी 'राष्ट्रमाता' असेही म्हटले जाते. अहिल्याबाईंनी रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला. तेव्हा अहिल्या बाईंनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वतः प्रायोजित करून रितसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. भिल्ल व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमधील वाद अहिल्या देवींनी सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरुपयोगी जमीन दिली. आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर' घेण्याचा अधिकार दिला.

महेश्वर येथील अहिल्याबाईंच्या राजधानीत जणू काव्य, संगीत कला व उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंतफंदी यांना व संस्कृत विद्वान खुशालीराम यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला. कारागीर, मूर्तिकार व कलाकारांना त्यांच्या राजधानीत सन्मान व वेतन मिळत असे



अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचा, कार्याचा वसा आणि वारसा आपण असाच तेवत ठेवू! शेवटी इवढेच म्हणेन -

" जे हात उत्सुकलेले दगडांच्या
वर्षावाला,
रोखा ते, लावा या देशाच्या
प्रगतीच्या कार्याला."

नाव - ढोकणे देवकी भाऊसाहेब
पत्ता - रा. गोपाळपूर, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
मो. नं - 9325697733



raisoni EDUCATION

नाव :- पल्लव तेहतुना सुरेश
फो. नं :- 7972522415
इयत्ता :- १२ वी
वय :- ~~१९~~ १९ वर्षे
पिकाण :- करंजगाव, ता. निफाड, जि. नाशिक

* निबंधाचा विषय :-
पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.

राजमाता, राष्ट्रमाता
पुण्यश्लोक
अहिल्याबाई होळकर
जयंती निमित्त ...

raisoni EDUCATION

नाव :- पल्लवी मेहतुजा सुरेश
इयत्ता :- १३ वी
विषय :- पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.

" पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक
भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व. "

" भुकेल्या पोटी घास देऊनी तृप्त
केले तहानलेल्या जीवा, जात धर्म विसरून
दाखवला मानवसेवेचा मार्ग नवा,
अहिल्यादेवी होळकर आपल्या कार्याचा
निरंतर तेवत शहील दिवा ....! "

भारतीय इतिहासातील स्त्रीशक्तीचा एक तेजस्वी प्रकाश म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर. त्या केवळ एक सक्षम प्रशासक नव्हत्या, तर एक दूरदृष्टी असलेली समाजसुधारक, धार्मिक सहिष्णुता जपणारी नेत्या आणि स्त्रीशक्तीचे प्रतीक होत्या.
आधुनिक भारताला ज्या मूल्यांची गरज आहे - न्याय, सेवा, पारदर्शकता, लोकाभिमुखता - ती सगळी मूल्यं अहिल्याबाईंनी सत्तरव्या शतकातच आपल्या कारभारातून साकारली होती.
भारताच्या इतिहासात जेव्हा आदर्श नेतृत्वाची चर्चा होते, तेव्हा फक्त तलवार धारण करणाऱ्या, युद्धात शौर्य गाजवणाऱ्या राजांनी नव्हे, तर समाजासाठी तळमळ असणाऱ्या आणि सेवेची भूमिका स्वीकारलेल्या शासकांनीही आपली स्वतंत्र श्रेणी निर्माण केली आहे. यात मानाचा वरचा क्रमांक आणि इतिहासाच्या



raisoni EDUCATION

पानांमध्ये सुवर्णाक्षरांनी नोंद झालेल्या एका महान स्त्रीने "नेतृत्व" या संकल्पनेला एक नवा परिपाठ दिला - ती म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर.

अहिल्याबाईंचा जन्म ३१ मे १७२५ रोजी चौंडी (अहमदनगर, महाराष्ट्र) येथे झाला. एका सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या या कन्येचा जीवनप्रवास हा प्रेरणादायी आहे. लहान वयातच त्यांचा विवाह मालवाच्या होळकर घराण्याच्या खंडेराव यांच्याशी झाला. पती आणि सासऱ्यांच्या निधनानंतर त्यांनी जे नेतृत्व स्वीकारलं, ते केवळ सत्ता टिकवण्यापुरतं मर्यादित नव्हतं, तर समाजाचे पुनरुत्थान, सेवा, आणि कल्याण यासाठी समर्पित होतं.

अहिल्याबाईंचं नेतृत्व हे त्या काळाच्या तुलनेत विलक्षण होतं. त्यांनी मालवा प्रांतात एक सशक्त, पारदर्शक आणि न्यायाधिष्ठित प्रशासन उभं केलं. त्यांच्या कारभारात महिलांवर होणाऱ्या अन्यायाला आळा बसला, शेतकऱ्यांसाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात आले, आणि करप्रणाली अधिक सुसंघटित केली गेली. सर्वसामान्य जनतेसाठी त्यांचा दरबार सदैव खुला होता - आजच्या "लोकशाही प्रशासन" संकल्पनेचं मूर्त रूपच जणू!

अहिल्याबाईंच्या कार्यकर्तृत्वात धर्मनिरपेक्षतेचं एक उत्तम उदाहरण पाहायला मिळतं. त्यांनी भारतभर विविध धार्मिक स्थळांचं पुनरुत्थान केलं - काशी विश्वनाथ मंदिर, रामेश्वरम, सोमनाथ, द्वारका यासारख्या पवित्र स्थळांचा सामावेश त्यात आहे. हे करत असताना त्यांनी कोणत्याही धार्मिक भेदभावाला प्रोत्साहन दिलं नाही. मुस्लिम आणि इतर धर्मीय बांधवांनाही त्यांच्या सत्ताकाळात सन्मान मिळाला.



raisoni EDUCATION

हे सर्व त्या ~~अ~~ काव्यातील राजकारणाच्या पार्श्वभूमीवर बघितलं, तर त्यांच्या दृष्टिकोनात किती व्यापकता आणि समतोल होता, हे स्पष्ट ~~अ~~ जाणवतं.

आजच्या काळात आपण "लोकशाही" या संकल्पनेबद्दल बोलतो. पण १७ व्या - १८ व्या शतकात अहिल्याबाईंचा दरबार हा खऱ्याअर्थाने जनतेसाठी खुला होता. त्यांनी 'जनसुनवाई' सुरू केली होती - जिथे सामान्य माणूसही थेट राणीसमोर आपली व्यथा मांडू शकत होता. त्यांनी फक्त निर्णय घेतले नाहीत, तर त्यामागे न्याय, करुणा आणि दूरदृष्टी होती.

आज "विकास" म्हटलं की आपण फक्त इमारती, रस्ते किंवा धोरणं बघतो. पण अहिल्याबाईंचा विकास म्हणजे समाजाचा सर्वांगीण विकास म्हणजे समाजाचा सर्वांगीण विकास. त्यांनी शाळा, धर्मशाळा, पाणवठे, घाट, रस्ते बांधले - हे करताना कोणताही धार्मिक, जातीय किंवा वर्गभेद केला नाही. त्यांच्या दृष्टीने "राजा हा सेवकच असतो", आणि हे तत्व त्यांनी आचरणात उतरवलं.

"उरी बाळगुनी स्वप्न मराठी सत्तेचे,
बांधुनी तोरण हजारो गड किल्ले, मंदिरांचे,
घडविले जिने नव्या हिंदोस्तानाला,
एकच होती ती राणी अहिल्यादेवी होळकर."

घडविले जे ने आपण करावे त्याचे रक्षण
बाणेदारपणे उत्तर देणाऱ्या अहिल्याबाईंना
शिवार वंदन.



raisoni
EDUCATION

आजच्या भारतात नेतृत्व हे अनेकदा सत्ताकेंद्रित, घोषणांच्या आणि प्रचाराच्या गोंधळात भरकटलेलं आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्याबाईंचे नेतृत्व मात्र मूल्याधारित वाटतं – जिथे लोकसेवा, न्याय, सहिष्णुता आणि पारदर्शकता यांना सर्वोच्च प्राधान्य होतं. त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी, शिक्षण प्रसारासाठी आणि समाजसुधारणेसाठी उचललेले पावलं आज आजच्या काळातही अत्यंत समर्पक वाटतात.

त्यांच्या जीवनातून आपण काही मूलभूत धडे घेऊ शकतो:

- नेतृत्व म्हणजे सत्ता नव्हे, सेवा असते.
- धर्म, जात, लिंग यापलीकडे पाहणं हेच खरं सच्चं राष्ट्रनेतृत्व.
- आपली संस्कृती आणि परंपरा जपत आधुनिक दृष्टिकोन स्वीकारणं ही खरी प्रगती.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचं जीवन म्हणजे केवळ ऐतिहासिक गौरवगाथा नाही, तर आजच्या तरुण पिढीसाठी एक प्रेरणादायी "लीडरशिप मॉडेल" आहे. त्यांनी दाखवलेला मूल्याधारित, मानवतावादी आणि सर्वसमावेशक नेतृत्वाचा मार्ग हा भारताच्या भविष्य घडवण्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

आज भारताला अशाच नेतृत्वाची गरज आहे – जे आत्मप्रशंसेत नव्हे, तर आत्मनिवेदनात विश्वास ठेवतं.

पुण्यश्लोक अहिल्याबाईंच्या पावलावर पाऊल टाकणारे नेतृत्व घडवणं, हीच त्यांना खरी मानवंदना ठरेल.



पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - मुक आदर्श स्त्री शासिका

राणी म्हणून सिंहासन आलं,
पण आईसारखं राज्य केलं।
प्रत्येक अश्रूला त्यांनी आपल्या
मायेने अंगणात आणलं॥

इतिहासात अशा अनेक व्यक्ती आढळतात, ज्या केवळ फक्त त्याच्यांच कालापुरत्या नाही तर अनेक पिढ्यांसाठीही मुक उत्तम उदाहरण बनून राहतात. अशाच व्यक्तिमत्वांपैकी मुक म्हणजे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर. त्या मुक प्रखर राजकीय नेत्या, समाजसुधारक आणि आदर्श स्त्रीशक्ती शासिका होत्या, ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राचाच नव्हे तर संपूर्ण देशाचा गौरव वाढविला.

अहिल्यादेवी यांचा जन्म ३१ मे १७२५ साली मुका सामान्य कुटुंबात झाला, पण त्यांच्या दृढनिश्चय आणि उच्च विचारांनी त्यांनी सर्वसामान्यांपासून आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या वडिलांचे नाव माणकोजी शिंदे होते, जे चौंडी (मल्हारपीठ), तालुका - जामखेड गावचे पाटील होते. जरी त्या काळात स्त्रीशिक्षण फार प्रचलित नव्हते, तरी त्यांच्या वडिलांनी त्यांना वाचनलेखन शिकवले. मुकदा पुण्याला जाताना मल्हारराव होळकर यांनी मुका मंदिरात अहिल्याबाईंना पाहिले आणि त्यांच्या बुद्धिमत्तेला आणि व्यक्तिमत्वाला पाहून आपल्या मुलासाठी त्यांचा हात मागितला व नंतर लग्न लावून दिले. परंतु काहीच वर्षांत अहिल्याबाईंचे पती खंडेराव होळकर यांचे निधन १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत झाले. त्यावेळी सती जाण्याचा निर्णय घेत असताना मल्हाररावांनी अहिल्याबाईंना थांबवले. नवऱ्याच्या मृत्यूनंतर त्यांनी



राज्याच्या शासनाचा भार स्वीकारला, जेव्हा त्या काळी स्त्रिया अशा जबाबदाऱ्या पाडण्यास प्रोत्साहित देखील केल्या जात नव्हत्या. मात्र अहिल्यादेवींनी या समाजाच्या पूर्वग्रहांना तोंड दिले आणि न्याय, प्रशासन आणि समाजकल्याण या क्षेत्रात अभूतपूर्व कार्य केले.

त्यांच्या नेतृत्वात होळकर राज्याने अनेक सुधारणा पाहिल्या. त्यांनी तुकोजीराव होळकर यांना त्यांचा सेनापती म्हणून नेमले. त्यांनी जलसंधारण, धार्मिक स्थळांचे संवर्धन, रस्ते बांधणी, शिक्षणाची तरतूद आणि गरीबांची सेवा या सर्वांवर भर दिला. त्यांचा विश्वास होता की शासनाचा मुख्य हेतू म्हणजे प्रजेला, सुखी, सुरक्षित आणि शिक्षित करणे. त्यांनी प्रत्येक नागरिकाला न्याय मिळावा यासाठी कठोर परंतू न्याय प्रशासन राबवले. त्यांनी कधीच पडदा प्रथा पाळली नाही. दररोज दरबार भरवून लोकांची गाऱ्हाणी ऐकणे हे त्यांचे नियमित काम होते. अहिल्यादेवींचे राज्यकारभार नर्मदातीरावरील महेश्वर येथून चालत असे, पण त्यांनी इंदूर या छोट्या गावाचे रूपांतर एका भव्य शहरात केले. रस्ते, किल्ले, मंदिरे, घाट, विहिरी; धर्मशाळा आणि तलावांची निर्मिती त्यांनी केली. मालव्यातच नव्हे तर काशी, द्वारका, अयोध्या, रामेश्वर यांसारख्या तीर्थक्षेत्रांमध्ये त्यांनी धार्मिक आणि उत्तम असे सामाजिक प्रकल्प राबवले. त्यांनी अर्थव्यवस्थेला बळकटी देत व्यापार, शेती आणि उद्योगाला प्रोत्साहन दिले. शेतकरी, व्यापारी व सावकार यांच्यावर त्यांनी कधीच अन्याय केला नाही. राज्याचे उत्पन्न प्रजाजनांच्या समृद्धीवर आधारित होते. सामाजिक सुधारणांमध्येही त्यांचे योगदान लक्षणीय होते. त्यांनी विधवांना त्यांच्या पतीची संपत्ती मिळवून दिली, तसेच विधवा महिलांना दत्तक मुलं घेण्याचा हक्क दिला. मुकदा मंत्र्याने लाच घेतल्यामुळे मुख्यादया विधवेची दत्तक प्रक्रिया अडवली



गेली, तेव्हा अहिल्याबाईनी स्वत: ती प्रक्रिया पार पाडून समाजाला एक संदेश दिला.

अहिल्यादेवींनी पुरुषांप्रमाणे महिलांनाही सैन्यदलात संधी दिली. विशेष महिला तुकडी स्थापन करून त्यांनी स्त्रियांच्या क्षमतेवर विश्वास ठेवला आणि समानतेचा आदर्श उभा केला. त्यामुळे त्यांना न्यायदेवता म्हणूनही ओळखले जाते. 'शेतकरी सुखी तर देश सुखी' या विचारातून शेतकऱ्यांवरील कर कमी केले. तलाव, विहिरी, गोपालनास प्रोत्साहन करून शेतीला पूरक साधनांचा विकास केला. तसेच अहिल्यादेवींनी महेश्वर नगरीत विद्वानांना आश्रय दिला. शाळा सुरु करून विद्याप्रसार घडवून आणला. सतीप्रथेविरुद्ध उदाहरणे देत समाजाला जागृत केले. धार्मिक ग्रंथांतील दाखले देत सती प्रथेला शास्त्रीय आधार नसल्याचे पटवून दिले, जे कालांतराने सामाजिक सुधारणा घडविण्याचा मूलाधार ठरले. लूटारूना दहशतीने नव्हे, तर संधीने बदलले. त्यांना शेतीसाठी जमीन, जनावरे दिली आणि समाजपयोगी जीवन जगण्यास प्रवृत्त केले. समान न्याय हेच तिचे ध्येय. आपल्या संस्थानातील कुणीही अन्याय करत असेल, तर त्याच्यावर कारवाई करण्यात त्या मागे हटत नसत- अगदी सुभेदाराच्या मुलालाही तुरुंगात टाकले.

त्यांच्या ह्या कार्याची महिमा अखंड जगात पसरत आहे याचे उत्तम उदाहरण म्हणजे इंग्रजी इतिहासकार लॉरेन्स यांनी अहिल्यादेवींची तुलना रशियाची कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ आणि डेन्मार्कची मार्गरिट यांच्यांशी केली आहे. त्यांच्या मते, इतिहासातील महान स्त्री नेत्यांमध्ये अहिल्याबाईंचे स्थान अग्रभागी आहे. असेच अहिल्याबाई न्यायप्रिय होत्या. त्यांची ख्याती "प्रजेच्या तक्रारी ऐकणाऱ्या राणी" अशी होती. त्यांनी आपला दरबार रोज भरवला आणि लोकांच्या समस्या



घेऊन त्यावर उपाय केले. फक्त धार्मिकच नव्हे, तर औद्योगिक क्षेत्रातही त्यांनी भर घातली. लोकांना रोजगार मिळावा यासाठी महेश्वर व इंदूर या गावांचा विकास केला. महेश्वर येथे त्यांनी हातमाग व वस्त्रोद्योगाला चालना देणारी प्रणाली निर्माण केली. महेश्वरी साड्यांचा प्रारंभ याच काळात झाला. महेश्वर ही राजधानी केवळ प्रशासनिक केंद्र नव्हते, तर ती संगीत, कला, साहित्य, आणि उद्योगधंद्यांचेही केंद्र होती. महिला सशक्तीकरणाला त्यांनी वाचन, शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबनाच्या माध्यमातून मोठी दिशा दिली. स्त्रियांसाठी शाळा उभारल्या आणि त्यांना समाजात समान हक्क मिळवून दिले. त्या काळात स्त्रियांचा स्थान उंचावण्याचे काम त्यांनी धडपडून केले, ज्याचा प्रभाव आजही जाणवतो.

अहिल्यादेवींच्या कार्याचा वारसा महाराष्ट्रासाठी केवळ ऐतिहासिक नाही तर सामाजिकदृष्ट्या फार महत्त्वाचा आहे. त्यांनी दाखवले की स्त्री केवळ घरची पालनहार नाही, तर समाजातील बदलांची सूत्रधार देखील असू शकते.

राज्याला नवी ओळख दिली, स्त्रीशक्तीचा फुलविला प्रकाश॥
अहिल्यादेवींच्या तेजाने महाराष्ट्राने झळकवला नवा इतिहास॥

अशा या महान स्त्रीचे जीवन आणि कार्य आजच्या काळात सुद्धा स्त्रिया आणि समाजासाठी प्रेरणादायक आहे. त्यांचा मार्ग प्रत्येकासाठी मार्गदर्शक ठरतो. अहिल्यादेवींच्या जीवनाने आणि कार्यने आपल्याला हे शिकवले की खरी नेतृत्वशक्ती ही केवळ पदवी आणि अधिकार नसून, समाजासाठी समर्पित सेवेत असते. त्यांनी न्याय, धर्म आणि समाजकल्याण यांना सर्वोच्च स्थान दिले. त्यांच्या प्रत्येक कृतीत प्रजेला सुख, समृद्धी आणि सन्मान मिळावा



याची काळजी घेतली. त्यांचा आदर्श आजही स्त्रियांना प्रेरणा देतो, कारण त्यांनी दाखवले की स्त्रीशक्तीची ताकद समाजाच्या बदलासाठी किती प्रभावी ठरू शकते. त्यामुळे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहासात आणि आपल्या हृदयात कायमचा ठसा राहील, जो प्रत्येक पिढीला नव्या उमेदीनं, नवनवीन स्वप्नांसाठी प्रोत्साहित करतो.

नाव : कु. सानिया गणेश राऊत
वयोगट : १७ ते २१ वर्षे
मो. नं : ९४०३८०४९२४



नाव : भावेश सोमनाथ महाजन
पत्ता: रा. कनगाव, ता. भडगाव जि. जळगाव.
निबंधाचा विषय : पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व

मोबाईल नं - 7821862574 / 7030628420
इयत्ता : 13 वी.

भारताचा इतिहास अनेक शूर नेते, समाजसुधारक आणि शासक झाले आहेत, ज्यांनी आपल्या कार्यातून समाजाला नवी दिशा दिली. यामध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्या केवळ एक राजमाता नव्हत्या, तर आदर्श शासक, धर्मप्रेमी, समाजसेविका होत्या. त्यांनी 18 व्या शतकात ज्या तत्त्वांनी आणि कार्यपद्धतीने राज्यकारभार केला आणि ते आजही भारतासाठी प्रेरणादायी ठरते.

अहिल्याबाईंचे जीवन आणि नेतृत्वाची सुरुवात:

अहिल्याबाईंचा जन्म 31 मे 1725 रोजी महाराष्ट्रातील चौंडी गावात झाला. त्या सामान्य कुटुंबात जन्मलेल्या असूनही, त्यांच्या अंगी असलेल्या गुणांमुळेच मल्हारराव होळकरांनी त्यांना आपल्या सुन म्हणून स्वीकारले. अहिल्याबाईंचे पती खंडेराव आणि नंतर मल्हारराव यांच्या निधनानंतर राज्यकारभार त्यांच्यावर आला. समाजात महिलांना नेतृत्वाची संधी मिळत नसतानाही, त्यांनी अतिशय कुशलतेने राज्य चालविले.



त्यांनी १७६७ ते १७९५ या कालखंडात सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. या काळात त्यांनी महेश्वरला राजधानी बनवून प्रशासन, न्याय, धर्म, कला आणि उद्योग यामध्ये उल्लेखनीय कार्य केले.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनातील काही प्रेरणादायी उदाहरणे :

१. न्यायप्रियता आणि प्रशासन :
अहिल्याबाई होळकर न्यायप्रिय शासक म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी जनतेच्या तक्रारी ऐकण्यासाठी दररोज दरबार भरवला आणि त्वरित न्याय दिला.

२. सामाजिक सुधारणा :
अहिल्याबाईंनी विधवा स्त्रियांसाठी दत्तक घेण्याचा अधिकार आणि वारसाहक्क सुनिश्चित केला.

अहिल्याबाई यांनी विविध धर्मांच्या पूजास्थळांचे पुनर्निर्माण केले, ज्यात काशी विश्वनाथ मंदिर, सोमनाथ मंदिर आणि अयोध्येतील राम मंदिर यांचा समावेश आहे. त्यांच्या कार्यामुळे धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श निर्माण झाला.

अहिल्याबाई यांनी आपल्या राज्यात प्रभावी प्रशासन राबवले. त्यांनी रस्ते, पाण्याच्या सुविधा, धर्मशाळा आणि शिक्षण संस्थांची उभारणी केली. त्यांचे प्रशासन लोकाभिमुख होते आणि जनतेच्या कल्याणासाठी अनेक योजना राबवल्या.

आधुनिक भारतासाठी प्रेरणा :
स्त्री सक्षमीकरणाचे प्रतीक म्हणजेच अहिल्याबाई यांचे जीवन स्त्री सक्षमीकरणाचे मूर्तिमंत



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर माळवा प्रांताच्या (सध्याचा मध्य प्रदेश) शासक होत्या. मात्र त्यांची दृष्टी संपूर्ण भारताचा कवेत घेणारी होती. अहिल्या-देवी या भारतीय ऐक्याच्या प्रतीक होत्या आणि आहेत. अहिल्याबाई त्यांच्याशी संबंधित अनेक ठिकाणी भारतभर पसरलेली आहेत. ही ठिकाणे प्रामुख्याने धार्मिक स्वरूपाची आहेत.

अहिल्याबाईंच्या विचारांचा प्रभाव आजही दिसून येतो. त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यांच्या कार्यक्रमाचा प्रभाव स्मार्ट सिटी मिशन, उज्वला योजना आणि मिशन शक्ती यांसारख्या आधुनिक योजनांमध्ये दिसून येतो.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त पदवीधर प्रकोष्ठ, महाराष्ट्र यांच्या गटा कडून राज्यस्तरीय निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. त्यांनी हा खूप छान उपक्रम राबविला आहे. ज्यामुळे मुलांना आधीचा इतिहास माहिती होईल.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्याचा अभ्यास करताना, त्यांच्या नेतृत्व-गुणांचा प्रभाव आजच्या आधुनिक भारतातही स्पष्टपणे दिसून येतो. अहिल्याबाईंचे राज्यकारभार धर्म, न्याय, आणि लोककल्याण या तत्त्वांवर आधारित होता. त्यांनी सार्वजनिक सेवा आणि नैतिक प्रशासनाच्या माध्यमातूनच सत्तेचा उपयोग जनतेच्या हितासाठी केला.

आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी आदर्श त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे आजच्या भारतात महिला सशक्तीकरण, नैतिक प्रशासन आणि सांस्कृतिक

उदाहरण आहे. त्यांनी पुरुषप्रधान समाजात आपल्या नेतृत्वाची छाप सोडली आणि स्त्रियांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून दिली.

धर्मनिरपेक्षता आणि सहिष्णुता म्हणजेच त्यांच्या कार्यातून धार्मिक सहिष्णुतेचा संदेश मिळतो. आजच्या नेतृत्वाची भारतात, जिथे विविध धर्मांचे लोक एकत्र राहतात, अहिल्याबाई यांचे आदर्श अत्यंत महत्त्वाचे आहेत.

त्यांनी राबवलेले प्रशासन लोकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार केले होते. आजच्या काळात, जिथे प्रशासन आणि जनतेत दरी निर्माण होत आहे, अहिल्याबाई यांचे लोकाभिमुख प्रशासन आदर्श ठरते.

अहिल्याबाई होळकर यांनी जलव्यवस्थापन, वनसंवर्धन, शाश्वत शेती, निसर्गपूरक स्थापत्यशास्त्राद्वारे पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कार्यातून आधुनिक काळातील पर्यावरण संरक्षण आणि टिकाऊ विकास यांसाठी प्रेरणा मिळते.

अहिल्याबाई होळकर यांच्या काळातील किल्ले.

१. किल्ले महेश्वर.
२. इंदोरचा राजवाडा.
३. चांदवडचा रंगमहाल.
४. वाफगाव - यशवंतराजे होळकर यांचे जन्मस्थळ.

अहिल्याबाई होळकर यांच्या नावामागे 'पुण्यश्लोक' अशी उपाधी लावली जाते. 'पुण्यश्लोक' या विशेषनामाचे उच्चारण करताच फक्त आणि फक्त अहिल्याबाईंचेच स्मरण होते. या नावात सात्विकता, आध्यात्मिकता, मंगल्य आणि पवित्र्याचा भाव आहे.



अभिमान यांसारख्या मुल्यांना चालना मिळाली आहे.

निष्कर्ष:

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे जीवन आणि कार्य हे आधुनिक भारतासाठी एक प्रेरणास्रोत आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांमधून आपण मुल्याधारित, समावेशक आणि दूरदृष्टीपूर्ण प्रशासनाचे धडे घेऊ शकतो. त्यांच्या कार्याचा आदर्श आजच्या समाजातही लागू करून आपण एक न्याय सशक्त आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध भारत घडवू शकतो

पती गेल्यावर न डगमगली, दुःखातही
निर्धारि उभा,.....
हाती घेतलं राज्य, न्यायाचा केला दीप
उजळा।.....
प्रजा होती परिवार तिचा, मंदिरांची घडवली
शृंखला,.....
सेवेसोबत धर्मकार्याने वाढवली संस्कृतीची
कला।.....



विद्यार्थ्यचे नाव : चि. बाबरे कुणाल अनिल

स्पर्धा गट : १७ ते २९ वर्षे (उ.मा व म गट)

महाविद्यालयाचे नाव : जनसंज्ञापन अधिविभाग,
सामाजिक शास्त्रे संकुल,
पु.अ.हो सोलापूर विद्यापिठ, सोलापूर

वर्ग : B.VOC - JMC I ST

विषय : अहिल्याबाई होळकर - एक आदर्श शासिका आणि जनतेची माय

निबंधाचे संदर्भ :
१) पुस्तके -
अ) रणरागिणी अहिल्यादेवी - उज्ज्वलकुमार मोने
ब) गौरवगाथा लोकमातेची - डॉ. देविदास पोटे

२) विशेष व्याख्यान व राष्ट्रिय चर्चासत्र
अ) दुवा सोलापूर विद्यापिठ नाम विस्तार दिन
ब) व्याख्याते - देविदास पोटे

३) ऑनलाईन स्त्रोत -
अ) विकिपिडिया



" जिथे अहिल्या, तिथे प्रकाश
शौर्य, दान, करुणेचा सुवास "

इतिहासात असे काही तेजस्वी व्यक्तिमत्त्व असतात, ज्यांचे जीवन केवळ एका कालखंडापुरते सीमित न राहता पिढ्यान् पिढ्या प्रेरणादायी ठरते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन असेच होते. त्याग, न्याय, शौर्य आणि परोपकाराची त्या 'अभिव्यक्ती' होत्या. त्या केवळ इंदूरच्या राणी नव्हत्या, तर भारतातील स्त्रीशक्तीचे सर्वोच्च प्रतिक होत्या.

संघर्षातून घडलेली एक आदर्श राजमाता म्हणून अहिल्यादेवींकडे पाहिले जाते. ३१ मे १७२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी गावात जन्मलेल्या अहिल्याबाईंना लहानपणा-पासूनच कष्ट, प्रामाणिकपणा आणि साधेपणा शिकवला गेला. त्यांचे वडिल हे माणकोजी शिंदे गावचे पाटील होते. स्त्रीशिक्षण प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी लिहण्यावाचण्यास शिकवले होते. एका शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या या कन्येची दूरदृष्टी थेट मल्हारराव होळकरांनी ओळखली. त्यांनी त्यांच्या पुत्राशी म्हणजेच खंडेराव होळकरांशी विवाह करून दिला. आणि अहिल्यादेवी इंदूरच्या राजघराण्यात दाखल झाल्या.

त्यांचे वैवाहिक जीवन सुखकर असतानाच त्यांचे पती इ.स. १७५४ रोजी कुम्हेरच्या लढाईत धारातिर्थी पडले. या आघाता ने त्यांचे जीवन बदलून गेले. त्या काळातील परंपरेनुसार एका विधवेला दुय्यम स्थान दिले जात असत, पण अहिल्यादेवींनी या संकुचित विचारांना छेद दिला. त्यांनी शोकावरून संपूर्ण इंदूरच्या विकासासाठी आपले जीवन समर्पित केले. १२ वर्षांनंतर म्हणजेच १७६६ मध्ये सासरे मल्हारराव होळकर यांचे निधन झाले. तेव्हा अहिल्याबाईंना त्यांचे राज्य पाचोळ्यासारखे विखुरत होताना दिसले. पुढच्या काही दिवसातच त्यांनी आपल्या मुलाल मालेराव होळकर ला गादीवर बसवले पण पुढच्या वर्षात त्यांचे निधन झाले. हा काळ असा होता की इंदूरच्या गादीवर कोणी नव्हते. पती, नवरा, सासरा त्यांनी गमावला. शत्रू लोभीने राज्य



टक लावून होते. ही परिस्थिती ओळखून गादीचा लगाम स्वत:च्या हाती घेतला. अहिल्यादेवींनी इंदूरच्या राज्यकर्त्या म्हणून शपथ घेतली.

"गादीवर बसल्या अहिल्या माता
न्याय-सत्ता, करूणेची व्यापक गाथा"

गादीवर बसता क्षणी त्यांनी त्यांचे जीवन हे जनतेसाठी अर्पण केले. इंदूरच्या प्रशासनात त्यांनी पारदर्शकता आणली, शेतकऱ्यांना संरक्षण दिले, व्यापारासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले. त्यांचे न्याय-निवाड्चे तत्व स्पष्ट केले. कोणत्याही जाती-धर्माचा, उच्च-नीचतेचा भेदभाव न करता सर्वांना समान न्याय! त्याकाळी स्त्रियांना न्यून समजले जात असतानाही अहिल्याबाईंनी आपल्या धैर्याने आणि कुशाग्र बुध्दीने इंदूरला सुव्यवस्थेचे प्रतिक बनवले. अहिल्याबाई फक्त न्यायप्रिय शासक नव्हत्या, तर त्या एक पराक्रमी योद्धा देखील होत्या. त्यांनी मुगल आणि इंग्रजांसारख्या शत्रूंना चोखळक प्रतिउत्तर देखील दिले. पुरूषांच्या तोडीस तोड युध्द कौशल्य दाखवत त्यांनी आपल्या सैन्याचे नेतृत्व केले. त्यांची रणनीती ही युध्दापेक्षा शांतितला प्राधान्य देणारी होती, पण गरज पडल्यास त्या रणांगणात उतरायलाही मागेपुढे पाहत नव्हत्या.

"जागृत ठेवला वसा धर्म-संस्कृतीचा
दिव्य संकल्प केला त्यांनी पुनरुत्थानाचा"

अहिल्यादेवींनी काशीच्या विश्वनाथ मंदिराचा पुनरुद्धार केला. औरंगजेबाने उद्ध्वस्त केलेली मंदिरे नव्याने बांधली, ज्यामुळे भारतीय संस्कृतीचे गौरव पुन:स्थापित झाले. सोमनाथ, बद्रीनाथ, रामेश्वरम्, अयोध्या, मथुरा यांसारख्या पवित्र स्थळांवरही त्यांनी विविध सामाजिक प्रकल्प शबवले. भारतीय संस्कृती कोशानुसार, त्या त्यांच्या राजवटीत केवल इंदूर मध्येच नव्हे तर देशभरात अनेक विकास कामे केली. धरणे, घाट, तलाव बांधून आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या कारकिर्दीत कला व संस्कृतीचा



देखील जोरदार विकास झाला. अनेक धार्मिक स्थळे सजवली. लोकांनी त्यांना 'संत'ही देखील पदवी दिली. विविध सामाजिक प्रकल्पात त्यांनी दान केले. त्यांच्या दानशुरतेमुळे त्यांना 'दात्यांची राणी' असेही म्हणत.

" अहिल्यादेवींचे कार्य जनकल्याणासाठी
त्यांचे आयुष्य अर्पण केले रयतेसाठी "

अहिल्यादेवींनी स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी प्रयत्न केले. त्यांनी विधवा पुनर्विवाहास पाठिंबा दिला, समाजासाठी, शेतकऱ्यांसाठी कामे करून शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवले. गोरगरीबांसाठी अन्नछत्रे उभारली. अनेक धर्मशाळा बांधल्या. त्यांचा प्रजेसोबत असणारा स्नेह हा अनोखा होता. त्यांनी आपल्या दरबारात नेहमीच गरीब, पिडित संकटात सापडलेल्या व्यक्तींची मदत केली. अहिल्याबाई लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी दरशेज जाहिर सभा घ्यायच्या असा इतिहासाच्या पानांवर उल्लेख आहे. त्यांच्या न्यायालयात कोणीही विनातक्रार परत जात नसे. त्यांच्याकडे जनता ही समानतेची मूर्ती म्हणून बघत असत.

" मृत्यू जरी आला, इतिहास बोलतो
अहिल्येचा वारसा आजही तेजाळतो "

निजाम आणि पेशव्यांमध्ये खर्डाच्या लढाईत त्यांनी होळकरांची कुमक पेशव्यांच्या सैन्यात पाठवली. ही लढाई पेशव्यांनी जिंकल्यानंतर महेश्वरमध्ये विजय साजरा झाला. त्यानंतर काही महिन्यातच १३ ऑगस्ट १७९५ या दिवशी वयाच्या सत्तराव्या वर्षी लोकनेत्या, कुशल प्रशासक आणि मुत्सद्दी अहिल्यादेवींचं निधन झालं. त्यांचा वारसा आजही अमर आहे. त्यांच्या न्याय-प्रियतेचा आणि परोपकाराचा प्रकाश आजही मार्गदर्शक ठरतो. त्यांच्या दयाळूपणाचा आणि न्यायबुद्धीचा प्रकाश इतका होता की इंदूरच्या जनतेने त्यांच्या मृत्यूनंतर इंदूरची गादी रिकामी



ठेवली. त्यांच्या आठवणीत दरशेज न्यायनिवाड्याचे सोंग केले जात त्यांचे कर्तुत्व आजही स्त्रीशक्तीचे मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यांच्या धाडसाने, न्यायाने आणि परोपकारीने त्या कायमच भारतीय समाजाच्या हृदयात जिवंत राहतील. न्यायनिष्ठा, कर्तव्यदक्षता, समाजसेवा आणि निर्भय नेतृत्व म्हणजेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर.'

"आजही तिच्या कार्याचा झंकार
गुंजतो इतिहासाच्या अंगणात फार,
रयतेच्या सुखासाठी तन-मन वाहिलं
इतिहासाच्या पानावर अमर नाव शोभलं"



निबंध

Date

नाव :- महमदकैफ अहमद मकानदार

शाळेचे नांव :- सतोष भीमराव पाटील महाविद्यालय, मद्रुप

इयत्ता :- बी.ए. 2nd

मोबईल नंबर :- 8237948380

निबंधाचे नाव :- अहिल्याबाईच्या कार्यातून घडलेली स्त्रीशक्तीची प्रेरणा

भारतीय इतिहासात अनेक स्त्रियांनी आपल्या धैर्य, बुद्धिमत्ता, सहानुभूती आणि नेतृत्व-गुणांद्वारे एक अनमोल ठसा उमटवला आहे. या तेजस्वी स्त्रियांची एक म्हणजे अहिल्याबाई होळकर. अहिल्याबाईचे जीवन आणि कार्य हे स्त्रीशक्तीचा एक सर्वोत्तम उदाहरण आहे. त्या केवळ एक कर्तव्यदक्ष राणी नव्हत्या, तर एक कुशल प्रशासक, समाजसेविका, धार्मिकतेचा आदर्श आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे एका स्त्रीसाठी सन्मानाचे प्रतीक होत्या. त्यांच्या कार्यातून आजच्या युगातील स्त्रियांसाठीही प्रेरणादायी अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.

* अहिल्याबाईचा परिचय :-

अहिल्याबाई होळकरांचा जन्म इ.स. 1725 मध्ये महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी गावात झाला. त्या साधन मराठा कुळात जन्मल्या. त्यांच्या वडिलांचे नाव माकोजी शिंदे होते. लहानपणापासूनच त्यांना धार्मिक व सांस्कृतिक शिक्षण मिळाले.



अहिल्याबाईंचे लग्न मल्हारराव होळकरांचे पुत्र खांडेराव यांच्याशी झाले. खूप लवकरच त्यांना विधवा व्हावे लागले, परंतु त्यांच्या सासऱ्याने, मल्हाररावांनी त्यांच्या गुणामुळे त्यांना प्रशासकीय कार्यात सहभागी करून घेतले.

* राजकारणातले नेतृत्व :-

मल्हारराव आणि नंतर खांडेराव यांच्या मृत्यूनंतर अहिल्याबाई होळकरांनी राज्याची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली. १७६५ मध्ये त्यांनी वयाच्या २१ व्या वर्षी पूर्ण होळकर राज्याचे प्रशासन चालवायला सुरुवात केली. त्यांचे प्रशासन कुशलतेचे उदाहरण होते. त्यांनी शेती, व्यापार, वाणिज्य, न्यायव्यवस्था, शिक्षण आणि सामाजिक न्याय यावर विशेष भर दिला. अहिल्याबाई राजकारणात न केवळ टिकल्या नाहीत, तर एक आदर्श राणी म्हणून ओळखल्या गेल्या.

अनेक पुरुषप्रधान व्यवस्थेत देखील त्यांनी आपल्या निर्णय क्षमतेने, नीतिमत्तेने व दूरदृष्टीने आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटवला. ही गोष्ट स्त्रीशक्तीचा एक जागर आहे. — की स्त्री केवळ घरापुरती मर्यादित नसून ती समाज आणि राज्यदेखील चालवू शकते.

* धार्मिक आणि सामाजिक कार्य :-

अहिल्याबाईंच्या कार्याचा मोठा भाग म्हणजे त्यांची धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकी. त्यांनी संपूर्ण भारतभर अनेक मंदिरे बांधली, घाटांची निर्मिती केली, धर्मशाळा उभारल्या आणि यात्रेकरूंसाठी सोयी उपलब्ध करून दिल्या. वाराणसीचा विश्वेश्वर मंदिर, सोमनाथ मंदिर,



गंगाघाट इत्यादी ठिकाणी त्यांचे कार्य आजही स्मरणात आहे.

या कार्यात्मक प्रेरणा मिळते की स्त्री ही केवळ घरची देवी नाही, तर ती समाजाचीही मार्गदर्शक असू शकते. त्यांनी मंदिर उभारणीसारख्या कामांतून धार्मिकतेसह समाजसेवा केली. ही प्रेरणा आजच्या महिलांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे – का धर्म व समाज राकण जोडून चालवणारी शक्ती स्त्रीकडे असते.

* स्त्रीशक्तीचा जागर :-

अहिल्याबाईंच्या जीवनातून स्त्रीशक्तीचे अनेक पैलू समोर येतात. त्यांनी राका विधवा स्त्रीनेही समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान मिळवू शकते. हे सिद्ध केले. त्यांनी युद्धसुद्धा उत्तम पद्धतीने हाताळले. त्यांनी केवळ परंपरा जपल्या नाहीत, तर नव्या युगाला साजेशी धोरणे राबवली.

त्यांचे नेतृत्व, त्यांची कणखरता, न्यायाची भावना, आणि सर्वांवर राकसमान दृष्टिकोन हे स्त्रीशक्तीचे मूर्तिमंत रूप आहे. त्यांनी जिथे स्त्रियांना मान दिला, तिथे दुर्बलांना आश्रय दिला, आणि योद्ध्यांना सन्मान दिला.

* आजच्या स्त्रीसाठी प्रेरणा :-

आजही अनेक क्षेत्रांमध्ये स्त्रियांना दुय्यम वागणूक मिळते. परंतु अहिल्याबाईंच्या जीवनाकडे पाहिले, तर हे स्पष्ट होते की शिक्षण, आत्मविश्वास, धैर्य आणि दृढनिश्चय यांच्या जोरावर स्त्री कोणतीही आव्हाने पार करू शकते.

आजच्या काळात महिलांनी नेतृत्व करणे, समाजासाठी काम करणे, अन्यायविरुद्ध लढा



Date

देणे - ही संकल्पना अहिल्याबाईंच्या जीवनातून घेता येते. आजच्या मुलींनी आणि महिलांनी अहिल्याबाई होळकरांचे चरित्र वाचून त्यांच्यासारखे धैर्य, सेवा, नेतृत्व आणि विवेक अंगी बाणवले पाहिजे.



Date .....
Page .....

"हातामध्ये होवुनिया पिंड
शत्रुची काढली तिन चिंड
इंजासारखी चालवली तलवार
प्रजेसाठी सदली ती फार
न्यायाच होता तिचा थाट
बांधले तिने हजारोन हात."

"ज्या मनगटात बळ बुद्धी आणि चातुर्य
आहे तोच, स्वकर्तृत्वावर
लोकाभिमुख राजा बनु
शकतो."

(पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर)

***

नाव: मनिषा फुंडलिक डोळझाके
विषय: अहिल्याबाईंचे जीवनचरित्र: त्याग, पराक्रम आणि लोककल्याण.
मो.न: 7499488227
पत्ता: रा. मढा ; ता. मंढा. जि: जालना
वय: २० वर्ष



या कन्येच्या तेजाने साक्षात सूर्यही लाजला अशा या कन्येचे नाव 'अहिल्या' असे ठेवण्यात आले.

ही तीच अहिल्या जिने सत्तेचा मंत्र वापरून या हिंदुस्थानच्या मातीत रावबला. ही तीच अहिल्या जिने 'चुल आणि मुल' झुगारून देऊ नका, असे सांगितले. ही तीच अहिल्या जिने एका हातामध्ये शास्त्र आणि दुसऱ्या हातामध्ये शास्त्र घेवुन तब्बल २८ वर्ष राज्यकारभार केला.

खऱ्या अर्थाने जर आपण आपल्या मातेकडुन जर काही प्रेरणा घेऊ शकलो नाही तर आपल्या जगण्याला तो अर्थच काय? महापुरूषांचे अन् महामातांचे बलिदान हे आपण सर्वांसाठीच असत, आपण सर्वांनी स्वातंत्र्याचा श्वास घ्यावा म्हणुन असत; कारण इतिहासाच्या पानामध्ये जर डोकावुन पाहीलं तर त्यांचा प्रत्येक श्वास समाजासाठी अर्पन झालाय. काय तो इतिहास..... काय ती शौर्यगाथा! अहिल्यामाय कडुन जर काही प्रेरणा घ्यायच म्हटलं तर फक्त वर्तमानाच्या पानामध्ये राहुन कधी चालत नाही; कारण खऱ्या अर्थाने एक परिपुर्ण व्यासपीठ अन् एक परिपुर्ण विचारपीठ जर कोणी असेल तर ते म्हणजे राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आहेत

"दानशुर कर्तृत्वान नारीशक्ती अहिल्या....
मराठा साम्राज्याची कार्यक्षम राजकर्ती अहिल्या....
कुशाग्र तेज, पुंज करारी, बुद्धीमान अहिल्या
सती न जाता राज्य चालवणारी अहिल्या....
शौर्यवान उदार लोककल्याणकारी लोकमाता अहिल्या..."



अहिल्यामाय च जिवण म्हणे काय आहे ? आहिल्यामायच जीवन म्हणे दिनदलित गरिबांची आई म्हणे अहिल्यामाय ! हरवलेल्या , पिसलेल्यांची दाई म्हणे अहिल्यामाय ! भवलवत्या लेखणीची धार म्हणे अहिल्यामाय ! वतनशंच्या कानाखालचा जाळ म्हणे अहिल्यामाय ! षळकांत दिघ्नाकारून हिंदुस्थानच्या मातीला अस्मिता आकार देणारी अहिल्यामाय ! इंदुरच्या मातीमधुन स्व-च्या अर्थाने हिंदुस्थानच्या मातीला मुर्तरूप देणारी वाघीण म्हणजे अहिल्यामाय !

अहिल्या मायच चरित्र म्हणजे इतिहासाचा सुवर्णकाळ, अन त्याच त्यापलीकडेच..... स्व-च्या अर्थाने जर कालखंड पाहीला तर इ.स १२०० चा कालखंड

" योग याग विधी ।
येणे नोव्हे सिद्धी ।
वायाची उपाधी । दंभधर्म ॥ "

हे स्पष्ट उद्गार काढत महावैष्णव माऊली ज्ञानोबारायांनी सत्यमय ज्ञानाचा मार्ग दाखवला तर ,

" धर्मचि पालन करणे ।
पाखंड खंडण ।
हेचि आम्हा करणे काम ।
बिज वाढवावे नाम ॥ "

हे स्पष्ट उद्गार काढत जगद्गुरू तुकोबारायांनी ही भक्तीची अखंड वंश परंपरा समाजाच्या कल्याणास ठी , वाड्या , वस्त्या पर्यंत सप्ताहाच्या रूपाने



नेवुन. पोहोचवली. खऱ्या अर्थाने अध्यात्माच्या विचाराचा हाल्सनीय हिंदुस्थानच्या मातीत खुला झाला. प्रत्येकाच्या अंतकरणामध्ये संस्काराचे बीज बाहु लागले; पण पाहता पाहता यमराची तोळझाड अन् पुन्हा एकदा ही माती बैचेनित होऊ लागली संस्काराचा ओलावा ही कुठ तरी मातीत जाऊ लागला, याचवेळी सजिव सजीवच नाही तर निर्जीव दगडांनीही अदिलशाही मान्य केली. दुःख यातना याशिवाय महाराष्ट्राच्या मातीला काहीच उरल नव्हत.. अख्खा महाराष्ट्र या अंधकारमय वातावरणात शोधत होता तो उद्याचा सुवर्णतारा! उद्याचा सुवर्णप्रकाश!

अन् तशीच फडाडून.... वीज चमकली अन् माणोजीच्या रुपाने पुन्हा एकदा सृष्टीला नवचैतन्य मिळाल. माणोजीच्या पोटी जन्मलेल्या शहाजीराजांनी पुण्यावरती भगवा फडकवला; पण आदिलशाहांनी पुण्याची रांखरांगोळी केली. अन् दिवस भेल्या गेलेल्या जिजाऊना, ~~माँ~~ शिवनेरीच्या कुशीत ठेवुन अदिलशाहाच्या मुशीत गेले. अन् महाराष्ट्र पुन्हा एकदा अदिलशाही कालोख्या अंधकारात अंधकारला गेला. यातनांचा डोंगर माँ साहेब जिजाऊच्या मनी दाटला. माँ साहेब जिजाऊ शयतेचे हाल पाहु लागल्या. "अरे, या सर्वसामान्य जनतेला वाली कुणीच नाही का? या सृष्टीच्या मातीमध्ये स्वातंत्र्याचा मुहुर्तमेढ उभा राहणारच नाही का? अस स्वतःशीच बोलु लागल्या. अन् मग माँ साहेब जिजाऊ शिवनेरीच्या कुशीत नतमस्तक झाल्या अन् मुखातुन बोल उमटले,



"हे अंबिके चंडिके
वरदान दे, वरदान दे
उन्मत्तहीसिंहासनें चिरंफाड,
अन् मज पुत्र दे!"

फाल्गुन - महिना, शिशिर - ऋतु, हस्त - नक्षत्र, पृथ्वी चे वैभव व्यक्त करणारे आठही ग्रह अनुकूल असताना, ~~१७~~ १९ फेब्रुवारी रोजी बाल राजे जन्मा ला आले. पाहता पाहता स्वराज्याचे अग्निकुंड पेटून उठले पण ३ एप्रिल १६८० रोजी शिवरायांचे निधन झाले अन् खऱ्या अर्थाने स्वराज्याची मुहूर्तमेढ शंभुराजांनी आपल्या खांद्यावर घेतली पण काही दिवसांनी शंभुराजांचेही निधन झाले. अन् पुन्हा एकदा स्वराज्य पेशव्यांच्या दावनीला बांधले गेले. पुन्हा एकदा सृष्टीच्या पाठीवर अंधकार दाटला. आता पुन्हा एकदा अंधकारमय झालेल्या दगामधुन स्वातंत्र्याचा पाऊस बरसणार च नाही का? स्वातंत्र्याचे अग्निकुंड पेटणार च नाही का? पुन्हा एकदा सजिव झालेल्या दगडांनी निर्जिव रूप धारण केले, अन् पुन्हा एकदा स्वातंत्र्याचा अग्निकुंडासाठी आता कुणीतरी आहुती देईल का? या आहुतीमधुन उद्याचे स्वराज्य पुन्हा एकदा उभ राहील का? हा विचार प्रत्येका च्या अंतकरणामध्ये रुजला. अन् पाहता पाहता विजयात रूपांतर झाले. अन् ती वीस अशी कडाडली की निष्ठ - बुरुजात नोंद झाली ती म्हणजे अहिल्या देवी होळकर!

पुन्हा एकदा निष्ठावंत मावळे त्या काळखंडामध्ये, त्यासाठी निष्ठावंत मावळे समोर नजर फेकावी



भागेल. समोर नजर फेकावी भागेल. अंधकारमय दिसणारा हाच अंधकार, या अंधकाराच्या पलीकडे मात्र शितल छाया शोधावी लागेल, त्या चंद्रमेच्या पलीकडच्या त्या शितल छायेमधुन पुन्हा एकदा पाहता पाहता नजर रोखावी लागेल. ज्याप्रमाणे भगवान श्रीकृष्णाने दिली होती दिव्य दृष्टी अर्जुनाला आपल विश्वरूप दर्शन, पाहण्यासाठी त्याप्रमाणे भुतकाळाच्या मातीमध्ये इतिहासाची दिव्यदृष्टी घेवुन निघाव लागेल. पाहता पाहता १६०० चा कालखंड गेला. १६०० चा कालखंड सुरु झाला. आणखी पुढे जाण्याचा प्रयत्न केला मिनमिनणार दिवा मात्र इतिहासाच्या पानामध्ये काहीतरी दाखवु लागला, त्याचवेळी इतिहासाची पान डोळ्यासमोर आली त्याचप्रमाणेत्यापानामध्ये नजर रोखली गेली. मिनमिनत्या दिव्याच्या प्रकाशामध्ये एक सोनेरी पान उभ राहील, कालखंड डोळ्यासमोर आला... कोणता.....? १७२५ चा कालखंड. म्हणजेच पुण्यश्लोक अहिल्या माय चा कालखंड.

"रणरागिनी तु पुण्यश्लोकी,
जपलास वारसा शिवरायांचा,
उतरुनी रणांगणी दाखवलीस
शत्रुस ताकद तुझ्या निश्चयाचा
न्यायदानाची पुरस्कर्ती तु,
राग तुला अन्यायाचा,
अहिल्या देवी तु
अभिमान आम्हाला तुझ्या शौर्याचा!"

३१ मे १७२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये



जामखेड, लाभुक्यातील चोंडी या पुण्य पावन गावामध्ये माणकोजी शिंदे आणि सुशिलाबाई च्या पोटी अहिल्यामाय चा जन्म झाला, अन् या सृष्टीवर एका विश्वकन्येचा उदय झाला. माझ्या सुशिलामाई च्या मांडीवरती ज्ञाना - विचाराचा परिपाक अंतकरणामध्ये अहिल्यामाय रुजू लागल्या पाहता पाहता माणकोजी शिंदे नावाच्या विद्यापीठा मध्ये अहिल्यामायच शिक्षण सुरू झाल. आता अहिल्यामाय चालण - बोलण शिकल्या, पळण - खेळण शिकल्या, ना - ना कला, ना - ना गुण, ना - ना विद्या, यामध्ये अत्यंत बालवयामध्ये अहिल्यामाय तेजतरतरीत झाल्या. पाहता पाहता ज्ञानाच कार्यक्षेत्र अवगाह होत गेल. बुद्धीच्या कार्यक्षेत्राला जोड मिळत होती त्याच वेळी माणकोजी शिंदे नावाच्या विद्यापीठामध्ये राज्यशास्त्र, अर्थशास्त्र नीतीशास्त्र अन् सगळयात महत्त्वाच म्हणजे आत्म शास्त्र. या शास्त्रांनी अहिल्या परिपुर्ण होत गेल्या

आतापर्यंत पुरुषांची मत्सेदरी पाहिली होती पण पहिल्यादा माँ जिजाऊ नंतर या महाराष्ट्राला राष्ट्रमाता, राजमाता मिळाल्या त्या म्हणजे अहिल्यादेवी होळकर आहेत.

"साक्ष होऊन गेले राजे श्लोक,
पण नाही कोणी पुण्यश्लोक,
अहो, होती ती राजाची राणी,
तरी पण झाली राजयोगिणी,
नाव जिंच होत अहिल्याबाई
होती ती साऱ्या
भारताची आई"



पाहता पाहता या छोट्याशा अहिल्यामाईच्या जिवणामध्ये ना-ना प्रकारचे दुःख ही होतेच पण या पलीकडे जाऊन मानकोजी शिंदे आणि सुशिलाबाईनी आपल्या लेकीला परिपुर्ण जिवणाची परिपुर्ण व्याख्या समजुन सांगितली. पाहता पाहता अहिल्या माय आठ वर्षाच्या झाल्या. याच वेळी अवघ्या आठ वर्षाच्या अहिल्यामाय घोड्यावरून आपल्या शेताकडे जात असताना दुपारची वेळी होती. सुर्य आग ओकत होता. वाहणाऱ्या वाऱ्या मध्येही घामाच्या धारणामध्ये येणारा प्रत्येक वाटसरू भिजुन जात होता. त्याच वेळी दोन वाटसरू अहिल्या मायच्या नजरेस पडले. वाटसरू नी समोर पाहिल. छोटीशी एक लेक दिसत होती. दोन्ही वाटसरू समोर आले. अहिल्यामाय समोर उभे ठाकले; अन सांगितल "बाळा, दुपारची वेळ आहे, उन्हानीपण तीव्रता धारण केलेली आहे, पाण्यानी जिव कासाविस झालाय ग, थोडस पाणी मिळेल का?" येवढे शब्द आठ वर्षाच्या अहिल्यामाय नी ऐकले अन् म्हणाल्या, " बाबा चला ना, तुम्हांला पानी हवय ना? अन् त्यावेळी अहिल्यामाईनी त्या दोन वाटसरूना सोबत घेतले अन् विहिरीकडे निघाल्या पण जश्या विहिरीच्या जवळ गेल्या, अन् दोन्ही वाटसरू कडे पाहिल अन् म्हणाल्या, " बाबा, अहो, तहान्हेलेल्यांना पानी पाजण्याअगोदर दोन घास खाऊ घालणे हा आमचा धर्म आहे अन् मी याच धर्माची जाणीव अंतकरणामध्ये ठेवुन अहिल्यामाय नी नारबादादाला हाक दिली," नारबादादा ओ नारबादादा " नारबादादा धावतच आले अन म्हणाले, " काय

ताईसाहेब ? "अहो, दोन वात्सरू आमेत त्यांच्या जेवणाची व्यवस्था करायला हवी". नारबादादा घावत गेले अन् पिंठल भाकरीची दोन ताटल्या समोरठेवल्या, अन् दोन्ही वात्सरू जेवु लागले. अवघ्या आठ वर्षाच्या अहिल्याबाई संस्कारपाहुन दोन्ही वात्सरू आवाक झाले. ते दोन्ही वात्सरू होते एक म्हणजे बाजीराव पेशवे अन् दुसरे म्हणजेच मल्हारराव होळकर. बाजीराव पेशवे आणि मल्हार राव होळकर या दोघांनी आठ वर्षाच्या अहिल्या मायची कर्तव्य, ज्ञानाची परिपक्वता आणि संस्काराच वलय पाहिल. आणि बाजीरावानी मल्हाररावांकडे पाहिल अन सांगितल, "पाहताय ना ? आपल्या खंडेरावासाठी दुसरी हिरकणी या सारखी शोधुन पण सापडणार नाही. विचारून तर बघा त्यांच्या वडिलाना ही जेर खऱ्या अर्थाने आपल्या घरापर्यंत आली तर ही लेक आपल्या घराच नाव भौकीक वाढवल्या शिवाय राहणार नाही." शब्द ऐकले अन् मल्हारराव उत्तरले, "मी बऱ्याचवेळा पासुन हाच विचार करतोय". त्याच वेळी त्याचदिवशी मल्हारराव होळकरानी माणकोजी शिंदे कडे आपला मुलगा खंडेरावांच्या लग्नासाठी मागणी घातली, अन् पाहता पाहता माणकोजी शिंदेनी समंती दर्शविली. अन् २० मे १७३३ ला अवघ्या आठ वर्षाच्या असलाना माणकोजी शिंदेची कन्या अहिल्यामाय आणि मल्हारररावांचे पुत्र खंडेराव यांचा विवाहसोहळा पार पडला. पाहता पाहता खंडेरावाच्या प्रेमळ सहवासामध्ये अन् मल्हारराव आणि गौतमीबाईच्या सहवासामध्ये अहिल्यामायचा संसार सुखात सुरू झाला. पाहता पाहता त्या ठिकाणी मल्हाररावाना अहिल्यामायच्या ~~सुखाचा~~ ज्ञानाचा फायदा होऊ लागला



अहिल्यामाय आता राजकारणामध्ये आणि समाजकार्या मध्ये मल्हाररांवाच्या युद्धनितीमध्ये आधार देवु लागल्या. मल्हाररावाच्या डोक्यात विचार होता जर राज्य घडवायच असेल तर फक्त प्रदेशाच्या सीमा माहित असुन उपयोग नाही तर संबधी राज्याच्या सीमा माहित असायला हव्या म्हणुन मल्हारराव युद्धावरुन आले व आपली पत्नी म्हणजे गौतमीआईला अन् अहिल्यामायला संबध राज्यामध्ये पाठवत होते. यामुळे अवघ्या १० वर्षाच्या असताना अहिल्यामायला देशाच्या सीमानसीमा माहित होत्या. आजही हस्तलिखित सापडतात. ज्या वेळी पेशंव्याना काशी यात्रेला जायच होत. त्यावेळेस इंदुरपासुन महेश्वरीचा जो रास्ता आहे. काशी अन महेश्वर जो मार्ग आहे. त्यामार्गावरती नद्या, नाल्या आणि मुक्कामाची व्यवस्था या सगळ्या बाबत वयाच्या १० वर्षी अहिल्यामायनी नकाशा बनवुन पेशव्याना दिला अन् त्या नकाशाच्या बळावरती पेशवे तिथपर्यंत पोहोचले. फक्त बुद्धी ज्ञानाच कार्यक्षेत्रच नाही तर आपल्या संसारीक जिवनामध्येही अहिल्यामाय नी भक्कम अशी साथ दिली. पण नियतीचे संकेत मात्र वेगळेच होते. २० जानेवारी ~~१७~~ १७४५ ला कुम्हेरच्या लढ्याच नेतृत्व पद खंडेरावांच्या हाती आल. अन् कुम्हेर चा लढा सुरु झाला. दहा दिवस, गेले, विस दिवस गेले, चाळीस दिवस गेले, ~~साठ~~ बघता बघता दोन महिने झाले; पण खंडेराव हाती का येत नाही, अशी भावना जाटांच्या मनात निर्माण होऊ लागली. जाटांनी खंडेरावांची कमजोरी शोधुन काढली अन् ती ~~क~~खंडेरावांची कमजोरी होती रयत. जाटाच्या सैन्य प्रमुखाने आदेश दिला सामान्य रयतेला पिडायच

सुटला. युद्धही सुरूच होत, खंडेराव झुंज देतच होते, बघता बघता अचानक वेगाने एक गोळा सु-सु करत आला अन् मल्हारबाच्या अंगावर धाडकन आदळला. खंडेरावाच्या देहाची चाळण झाली होती. हे चित्र पाहिलं अहिल्यामाईंनी. अहिल्यामाय समोर आल्या, निस्तेज बघतच राहिल्या आपला सौभाग्याचा लेणा आपल्यासमोर मृत्युशाही अवस्थेत पडलेला आहे. अहिल्यामाय समोर आल्या. मल्हारबांचं डोकं आपल्यामांडीवर घेतलं, अन एक मोठ्याने किंचाळी फोडली; पण त्याचा आवाज खंडेरावांच्या कानापर्यंत पोहचेपर्यंत खंडेराव मात्र स्वर्गाच्या दिशेने रवाना झाले. बघता बघता अहिल्यामाय शांतपणे उठल्या, बाजुला गेल्या, अन् सफेद वस्त्र परिधान झाल्या अन् पेटलेल्या चिते वरती सती जाण्यासाठी आता अहिल्यामायच एक-एक पाऊल पुढे भागल. मल्हारबानी पेटलेल्या चिते कडे जस पाहिल तसच सफेद वस्त्र परिधान केले-ल्या अहिल्यामाय च पेटलेल्या चितेकडे एक एक पाऊल पडताना दिसल. मल्हारराव ओघळणाऱ्या अश्रुंना पुसत मल्हारबा उत्तरले, "लेकरा, कुठे चालली स गं?" अहिल्यामाईंनी शांतपणे सांगितल, "मामाजी माझ्या कर्तव्यापासून मला रोखू नका. मला जायल हव." मल्हारबांनी विचारल, "लेकरा, ज्यांनी मला खांदा द्यायचा त्यालाच खांदा द्यायची वेळ माझ्यावर आलीय गं! माझ लेकरू गेल अन् आता तू माझी लेकही गेलीस तर मी जगाव कुणासाठी? कशासाठी? अरे मी 'दिल्लीचे तख्त राखतो मराठा माझा!' हे मी पेशव्यांना सांगत



होतो अन् जर तस जमत नसेल तर मी माझ स्वतःच राज्य उभा करेन अस ठामपणे मी सागत होतो. याच एकमेव कारण म्हणजे माझी लेकर माझ्या सोबत होती. पण लेकरा माझा लेक तर गेला आता जर लेक ही गेली तर जगण्याला काय अर्थ राहिला? अहिल्यामाय पुन्हा एकदा म्हणाल्या, "माझ्या कर्तव्यापासुन मला रोखू नका," अन पुन्हा चितेकडे एक-एक पाऊल टाकू लागल्या. तसाच मल्हारांवाचा आवाज आला "अहिल्या अगं ये अहिल्या, मला दिलेला शब्द असाच टाकुन माघारी जाणार? मला काही गुरु दक्षिणा देणार की नाही? गुरु मानलेस ना मला?" एवढे शब्द ऐकले अन् अहिल्या शांत झाल्या अन् मागे वळुन पाहु लागल्या, अन् म्हणाल्या "हो मामाजी देणार ना गुरुदक्षिणा. गुरुदक्षिणा दिल्याशिवाय मी पुढच पाऊल टाकणार नाही." अन मल्हारराव म्हणाले "अहिल्या, तु सती जाऊ नये हिच माझी गुरुदक्षिणा." अहिल्यामायचा नाविलाज झाला अन् अहिल्यामायनी समोर पेटलेल्या चितेवर हात ठेवला अन् म्हणाला, "माझ्या कुंकवाच्या धन्याची शपथ घेऊन याठिकाणी मी प्रण करते की अहिल्याच शेवटचा श्वास आता समाज कल्याणासाठी असेल. ही अहिल्या आजपर्यंत आपल्या प्रतिनिष्ठेसेवद्दल प्रसिद्ध होती. आतापर्यंत एक अहिल्या होऊन गेली ती म्हणजे ~~गौतमऋषींची~~ गौतमऋषींची पत्नी जिच्या पावित्र्याबद्दल सृष्टीच्या पाठीवरती इतिहासाच्या प्रत्येक पानावर ओळखल जात अन् दुसरी या सृष्टीच्या पाठीवर अहिल्या होवुन गेल्या, ज्यांनी स्वःच्या अथीने यासमाजा साठी संअख्ख आयुष्य समर्पित



केला." खंडेरावांच्या चितेवरती वचन होतसे गेले
अन् खऱ्या अर्थाने त्या दिवसापासुन अहिल्या
माय च जिवन बदलल. वीर अहिल्यामाता
सृष्टीच्या पाठीवरती समाजकल्याणाचा वसा
घेऊन पुढ आली.

"छत्रपतींचा वारसा जपुन तु,
परत गेलीस त्यागले विचार,
तुझ्या संघर्ष लढाई मध्ये दिसला
नाही कधीच जाती धर्माचा
प्रचार!
तु झगडलीस गोर गरीबांसाठी
अन् केला अन्यायाचा प्रचार
भाखो पिढ्या उलटुन जातील पण
फिटणार नाही कधी अहिल्या तुझे
उपकार!"

पुढे १२ वर्षानंतर मल्हारांचाच ही निधन
झाल. मराठा समाजाच्या मालवा प्रांताचा
कारभार अहिल्यामाय बघु लागल्या. पुढे लढाईत
अहिल्यामाय स्वतः सैन्याच नेतृत्व करत होत्या.
नंतर त्यांनी 'तुकोजीराव होळकर' यांना सेनापती
म्हणुन नेमल.

"महान तत्वज्ञानी न्यायप्रिय
आणि शासनकर्ती,
लोकांची महाराणी
धर्म निष्ठ कर्तृत्वाची
सम्राज्ञी."



अहिल्यामाय एक चांगल्या योग्य शासक आणि संघटक पण होत्या. भारतामधील इंदुरला सुमारे ३० वर्ष त्यांचा राज्यकाळ होता. हा जो काळ आहे तो म्हणजे एका स्वप्नासारखाच होता. अहिल्यामाय च्या राज्यकाळात जनतेची चांगलीच भरभराट झाली कारण त्यांच्या काळात कायद्याचे राज्य होते. अहिल्यामायना जिवंतकाळात सन्मान तर मिळालाच पण त्यांच्या मृत्यनंतरही लोकांनी त्यांना संताचा दर्जा दिला.

"झळकारती दाही दिशा,
करती जयघोष जिया,
गुंजुम, जबरदस्ती, आणि ~~अन्यायाला~~
अन्यायाला फोडली वाचा,
सर्व धर्म समभाव जिथे सुखांत
नांदत होती सारी जनता,
अशी कर्तव्यनिष्ठ कर्मयोगिनी
अहिल्या देवी राजमाता."

जसे शिवाजी महाराज हे पुरुषांमधले उत्तम राजे होते, तसेच अहिल्यामाय ह्या स्त्रीयांमधील उत्तम राज्यकर्त्या होत्या. अहिल्यामायींनी त्यांच्या असामान्य कर्तृत्वामुळे रयतेचे मन जिंकले. अनेक अच्च धुरीण आणि माळव्यासमोर त्यांचा एक दिव्य अवतार होता. त्या आजतागायतच्या सर्वांत शुद्ध उदाहरण देण्याजोगी शासक होत्या. अलीकडच्या काळामध्ये अहिल्यामायींना 'तत्वज्ञानी राणी' असे म्हणतात / ओळखतात. अहिल्यामाय उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभर अनेक हिंदु मंदिरे आणि नदिघाट



बांधले. एवढ्या नाही लोकांना रोजगार मिळावा म्हणुन औद्योगिक क्षेत्रण आखले. प्रसिद्ध हिंदु मंदिरांचा त्यांनी जीर्णोद्धार केला. महेश्वर आणि इंदुर या गावांना चांगले बनवले. त्या वर्षाच देवळांच्या आश्रयदात्या झाल्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत काशी, द्वारका, उज्जैन आणि नाशिक, वैजनाथ पुरली यांचा समावेश आहे. वेरावल महीम सोमनाथचे गझनीच्या महामंदाने ध्वस्त केलेले देऊळ बघुन अहिल्यामायींनी शेजारीच एक शंकराचे देऊळ बांधले अहिल्यामायेला प्रजेच्या कल्याणासाठी काम करण्याची आवड होती.

" रस्ते अन् नागोजागी महारस्तेही बांधले,
मुंबीचे आंतरजातीय भग्न
भावले.
बोजा कमी केला रयतेवरील कराचा
अन् शोध लावला तिने सातबाराचा
मुंग्याला साखर अन् माशांना दिला कणकेचा
गोळा
नदीघाट, मंदिरे आणि बांधल्या
धर्मशाला."

अहिल्यामाय होळकर ह्या एक खरोखरीच विस्तृत राजकीय दृश्यपटलाच्या एक सुक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या. सन १७८२ मध्ये पेशव्यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी ब्रिटिशांबरोबर हातमिळवणी करण्याबाबत एक ताकिद दिली होती. त्यांना फुटीरतावादी हे अस्वभास फुटीरतेच्या जोरे असल्याचे त्यांनी नोंदले आहे." वाघासारखे इतर प्राणी हे शक्ती वा युक्तीने मारले जाऊ शकतात.



परंतु अस्वल मारणे हे फारच कठीण असते. सरळ त्याच्या चेहऱ्यावर वार केल्यासच ते मरते. एकदा त्याच्या मजबुत पकडीत ते सापडल्यावर ते त्याच्या शिकारीस, गुदगुल्या करून ठार मारते असाच इंग्रजा चा मार्ग बघता त्याच्यावर मात करणे कठीण आहे.

अहिल्यामायंना त्यांच्या प्रजेचा उत्कर्ष आपत असे. तसेच ती प्रजा राजा हिसकावुन घेईल म्हणुन आपली संपत्ती उघड करण्यास बाबरत नाही, हे बघणे आवडत असे. दुरदुरपर्यंत रस्तेच्या कडेला. दाट छायादार वृक्ष लावण्यात आले. विहीरी केल्या होत्या, पथिकांसाठी विश्रांतीग्रहे. गरीब, घर नसलेले व अनाथ या सर्वांना त्यांच्या जरुरीनुसार, सर्व मिळत होते. बहुत काळापासुन, भिल्ल लोक पहाडातुन सामानाची ने - आण करत असताना लुटमार करत होते. अहिल्यामायंनी त्यापासुन भिल्ल लोकांना मुक्ती मिळवुन न दिली व प्रामाणिक पणे शेती करण्याची संधी त्यांना दिली. सर्व समाजाला अहिल्यामाय आवडत असत. सर्व समान अहिल्यामायच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करत असे. बघता बघता त्यांच्या कन्येचा पती यांच निधन झाल अन् त्यांच्या मृत्यु नंतर त्याच्या कन्येने सती जाणे हे अहिल्यामायच्या आयुष्यातल सर्वात मोठे दुःख होते. अन् पुढे काही दिवसानी वयाच्या ७० व्या वर्षी १३ ऑगस्ट १७९५ ला अहिल्यादेवी होळकरांची प्राणज्योत मावळली

"उदार समाजाचा करणे हाच
तिचा एक ध्यास
जिवन पाहीले सुखी समृद्ध
करण्यास समाजास



प्रत्येक घरात लक्ष्मी नांदत
होती सुखी ठेवले
राज्यास
जात, पात, समान, भाषा
देश, विदेश जिथे
गुण गाती
दानधर्म समान न्याय म्हणुन
त्याना लोक देवी म्हणती."

१९९०-९२ मध्ये हिंदुमुस्लिमाची एक सर्वात मोठी दंगल झाली होती. देशा मध्ये दोनधर्मामध्ये प्रचंड मोठा वाद निर्माण झाला होता. हिंदु-मुस्लिमांकडे बघत नव्हते, मुस्लिम हिंदुकडे बघत नव्हते. धार्मिक कटुता या दोन धर्मामध्ये आली होती. अन् इंदुर अन् महेश्वरीची परिस्थिती काय आहे हे बघण्यासाठी एन.डी टिव्हीच्या तत्कालीन रिपोर्टर तसविन सिंग नावाची महिला आहे. रिपोर्टर महिला त्यावेळी इंदुर-महेश्वरीमध्ये दंगल घडल्याच्या नंतर त्या मुस्लीमांच्या वस्त्यामध्ये जाऊन विचारायला लागल्या, ज्या वेळेस हिंदु मुस्लिमांची दंगल झाली होती त्या वेळी या इंदुर आणि महेश्वर ची परिस्थिती काय होती, हे पाच स्थानंतर ते ७५ वर्षाचे आजोबा तिथे उभे होते, ते सांगायला लागले की सगळ्या देशामध्ये विचित्र परिस्थिती पण इंदुर आणि महेश्वरच्या मुसलमानांनी मोठ्या सख्खा भावा प्रमाणे एकमेकांशी नांदत होता. हिंदु मुस्लिमांच्या सणामध्ये येत होते, मुस्लिम हिंदुच्या सणामध्ये येत होते, अनु धार्मिक सलोखा कायम होता आम्ही आनंदाने एकत्र राहत होतो. ते एन.डी



दि. ची च्या पत्रकाराला आश्चर्य वाटलं असं कुस काय घडु शकत. सगळ्या देशाची वेगळी परिस्थिती अन् इंदुर महेश्वर ची वेगळी का? तर त्यावेळेस त्या 69 वर्षाच्या आजोबांनी उत्तर दिल, हे सगळ याच एकमेव कारण आहे, आम्ही एकजुटीने राहिलो आमच्यात कुठलाच दुरावा आला नाही याच एकमेव कारण म्हणजे माताश्री अहिल्यामायनी आम्हाला नी समतेची शिकवण दिली त्या समतेमध्ये भेदभाव आम्हाला शिकवला नाही त्या समतेच्या शिकवणी मुळे आज देखील आम्ही सर्व धर्माचे लोक कायम सोबत राहतो. हा इतिहास आहे....

अहिल्यामाय च राज्य वेगळ का होत? कारण ज्यावेळेस स्त्रियांना कधी घराच्या पडायला मुभा नव्हती 'चूल अन् मुल' या पलीकडे स्त्री कधी जाऊ शकती नव्हती, त्या काळात अहिल्यामाय होळकरांनी पाच हजार स्त्रियांची सेना फक्त उभा केली होती अन् रणांगणामध्ये सगळ युद्धाच प्रशिक्षण दिल अन् लढण्यासाठी सज्ज करणारी देशातली एकमेव माता म्हणजेच पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर. अहिल्यामाय होळकर स्वतः लढायला जायच्या. स्वतःचमाही तर त्यांनी स्वतः महिलांच सैन्य उभ केल होत. या जगामध्ये एकही घटना नाही याअगोदरची की महिलांच सैन्य कुठे उभा राहिलंय. जगाच्या पाठीवर एकमेव घटना आहे की स्त्रियांचा सैन्य उभा करणारी कोणी प्रशासक असेल राज्यकर्ती असेल तर ती म्हणजे अहिल्यादेवी होळकर...



"पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पार्टी
महाराष्ट्र राज्य"
"पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या
जयंतीनिमित्त राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धा"

नाव :- सिध्दी शांतीलाल राऊत
म.वि.:- माणिकचंद पहाडे विधि महविद्यालय, छत्रपती
संभाजीनगर - ४३१००१
संपर्क क्र:- 9890002303 मुळ पत्ता: जालना.

विषय :- 'अहिल्याबाई होळकर : न्याय, भक्ती आणि
प्रशासन यांचा त्रिवेणी संगम.'
गट :- १७ ते २१ वर्षे (उच्च माध्यमिक व
महाविद्यालयीन गट)



'अहिल्याबाई होळकर : न्याय, भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम'

सुशासनं यत्र सदा प्रकाशं,
धर्मोऽपि तत्र नयमार्गदर्शी ।
प्रशासने येन सुखं प्रजाया:
तदेव राज्यं सत्यमेव धीमहि ॥

या संस्कृत उक्तीप्रमाणे अर्थात जिथे सुशासन प्रकाशमान असते, तिथे धर्मही न्यायाचा मार्ग दाखवतो, जिथे प्रशासन प्रजेला सुखी ठेवतं त्या राज्यात सत्याचा विजय होत असतो. मग भारतभूमी ही वीरांची जननी मानली जाते. तिने कायमच शूर-नायकांना जन्म दिला. थोर व्यक्तिमत्त्व आणि कर्तव्यप्रती भक्ती असलेल्यांसमोर जग नेहमीच झुकते असं म्हणलं जातं.

ज्या मनगटात बळ, बुध्दी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असं आपल्या कार्यातून सिद्ध करणाऱ्या म्हणजेच लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर. मुळात अहिल्याबाई होळकर यांच्याविषयी लेखन करत असताना अगदी काही मोजक्या कृतीशील कार्याबद्दल लिहिता येणार नाही. तर, सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री-पुरुष समानता, गोर-गरिबांनविषयी कळवळा, दुंडा पध्दतीच्या उच्चाटन रिती, अनिष्ट चालीरीती रुढी परंपरांचा बीमोड, मूल दत्तक वारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कार्य त्याचबरोबर न्याय, आर्थिक संबंधी, कला-साहित्य क्षेत्र, सैन्य व्यवस्था, धर्मपरायणता अशा कित्येक क्षेत्रामध्ये लोकमातेचे योगदान आपल्याला दिसून

आधुनिक भारताच्या इतिहासातले एक सोनेरी पान असलेल्या, स्वतःच्या आयुष्यात आख्यायिका बनून राहिलेल्या अहिल्याबाई होळकरांच्या जन्माचे त्रिशताब्दी आपण साजरे करतो आहोत. त्यानिमित्ताने अहिल्याबाई यांच्या कारकीर्दीचा अभ्यास करताना दाखविलेले विविधांगी कर्तृत्व आपण समजून, जाणून, आमलात आणले पाहिजे.

धर्मः सदा सत्यमयी प्रकृष्टः
प्रशासने न्यायरुचिः प्रकाशितः।
सुशासनं येन सदा विधायि,
स तु नृपः लोके प्रशंसनियः॥

म्हणजेच, धर्म सदा सत्याने भरलेला आणि श्रेष्ठ असतो, प्रशासनात न्यायाचीच आवड आणि तेज असावे. जो नेहमीच सुशासन राबवतो, तो राजा प्रजेमध्ये प्रशंसनीय ठरतो.

मग भारताच्या मध्यकालीन इतिहासात थोरले राजे छत्रपती शिवराय आणि नंतरच्या काळात मानकोजी शिंदे यांच्या कन्या, ~~माल~~ मल्हारराव होळकरांच्या सून अहिल्याबाई होळकर ही पोन राज्यकर्ती समोर येतात. तशा मुळच्या अहमदनगर (अहिल्यानगर) जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्या गावच्या, अहिल्याबाई. त्यांचे वडिल मानकोजी शिंदे यांना गावच्या पाटीलकीचा मान होता. अहिल्याला आपल्या पाच भावंडाबरोबर घरीच लिहिण्या-वाचण्यापुरते शिक्षण मिळाले. त्यासोबतच घोड्यावर बसणे, दांडपट्टा खेळणे, तीर मारणे, नेम धरणे, तलवार चालविणे हे शिक्षण मिळाले. वडिल मानकोजी शिंदे हे गावचे पाटील असल्यामुळे घरातील वातावरण हे धार्मिक समतोल, राजसत्ता विचाराचे, युद्ध वैचारिकी, न्यायनिवाडा या मुळे अहिल्या ही प्रजेच्या सुखासाठी, दिन-दुबळ्यांविषयी कळवळा आणि समजूतदार वृत्तीची होती. अहिल्येचा चांगुलपणा, चतुरपणा पेशवे होळकरांनी पाहिला आणि मल्हारराव होळकरांनी मानकोजी शिंदे जवळ पुत्र खंडेरावासाठी अहिल्येची मागणी घातली.



वर्षाच्या वयाच्या सात-आठव्या वर्षांतच अहिल्या तिच्या सासरी गेली. २० मे १७३३ रोजी खंडेराव व अहिल्येचा विवाह झाला. मग इथपासून अहिल्याच्या आयुष्याला वेगळे वळण आले. पुढे अहिलाई मानकोजी शिंदे यांचा राज्यकारभार पाहू लागली. मल्हारराव होळकर युद्धातून परत आल्यानंतर अहिल्याईना राज्यकारभार सांभाळण्याचे शिक्षण देत. देशाची स्थिती, राजनिती, व्यवहारिक शिक्षण, डावपेच युद्धनिती, युद्धक्षेत्रावर बुजावयाची कामगिरी, युद्धातील समस्या, न्यायनिवाडा, धर्मरक्षण अशा अनेक गोष्टी मल्हारराव होळकरांकडून अहिल्याई शिकत होत्या.

खरतर अहिल्याई चा इतिहास जावून घेत असता खरोखर कौतुकाचे पात्र मल्हारराव होळकर व स्वतः अहिल्याई आहे. कारण सासू-सासऱ्यांच्या, पती यांच्या तालमीत अहिल्याईला परिपूर्ण युद्धाचे, न्याय देण्याचे, महसूल वसूल करणे याचे शिक्षण मिळाले. त्या काळात राजेशाही असली तरी लोकशाहीतल्या भारतीय राज्यघटनेतील लोककल्याणकारी राज्याची [Welfare State] संकल्पना अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या प्रशासनातून प्रत्यक्षात उतरवीली. अहिल्याई या न्यायप्रिय प्रशासक असल्यामुळे त्यांच्या प्रजेला मोफत न्याय मिळत असे. न्यायात विलंब म्हणजे न्याय देण्यास नकार असे त्या समजत. निपुत्रिक विधवांच्या मिळकती जप्त न करता दत्तक विधानाच्या त्यांची वितंवार लावावी, असे निवाडे त्यांनी दिले. "न्याय हा धर्म असावा त्याच धोंगे नाही." असे त्यांचे वक्तव्य होते. कोणतीही स्त्री न्याय मागण्यासाठी त्यांच्या दरबारी सहज येऊ शकत असे.

खरंतर मी एक विधि क्षेत्राची विद्यार्थी असल्यामुळे जेव्हा अहिल्याई यांच्या न्यायीक क्षेत्राबद्दलच्या ज्ञानाचा आढावा घेतला तेव्हा खरोखर जाणवले की राज्यघटनेच्या कोणत्याही आधारत्व नसून



धर्म अत्यंत कुशलतेने बजावला. सध्याच्या परिस्थितीत बऱ्याच ठिकाणी न्यायात विलंब होतो, काहींना योग्य तो न्याय मिळत नाही. अनेक जणांकडून गरजेपेक्षा जास्त शुल्क घेतले जाते. आणि या सर्व बाबी लक्षात घेऊनच सर जॉन मालकम म्हणल्याप्रमाणे, "अहिल्याबाई सारखी न्यायधीश पुन्हा होणे नाही." हे सिद्ध होते.

मुळात अहिल्याबाई होळकर यांच्या पाऊलवाटा या विविध क्षेत्रासोबतच वेगवेगळ्या प्रदेशात त्यांचे सुशासन होते. अगोदर राज्यकारभात राजमुद्रा ही प्रशासकीय कामकाजात अत्यंत महत्त्वाची मानली जात होती. अहिल्याबाईंच्या राजमुद्रेवर "श्री शंकर आज्ञावरून ..." असे लिहिले होते. धर्म म्हणजेच निस्वार्थ सकारात्मक कार्य असं अहिल्याई म्हणत. "इदं न मम" म्हणजेच "हे माझं राज्य नसून शिवशंकराच्या आज्ञावरून चालवले आहे." त्यांची शंकरावर असलेली भक्ती सकारात्मक होती. वेदांचे ज्ञान घेऊन त्यांनी योग्य तेच अंमलात केले. इ.स. १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत पती खंडेराव यांना वीरमरण आले. आणि वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेतून सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला.

आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतू जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून अहिल्याबाईंनी धर्म, रूढी, परंपरा यापलीकडे कर्तव्य म्हणून स्वतःला कल्याणकारी राज्य दिले.

मग सद्यस्थितीत देखिल सुराज्य, प्रजाहित-रक्षक, म्हणून जनतेची देखभाल करणारे शासक, अहिल्याईसारखे मानवतावादी पाळणारे सुधारक आजच्या घडीला गरजेचे आहे. होळकरांची पेशवाई जपत अहिल्याबाईंनी मंदिरांचा जीर्णोद्धार, सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवित मंदिरे, मशिदी, दर्गे, विहार बांधली.



एक आदर्श शासनकर्ती म्हणून अहिल्याबाई ओळखल्या जाऊ लागल्या. मग मुळात अहिल्याईंचे राज्य हे धर्मनिष्ठ होते. आपली राजधानी त्यांनी नर्मदेच्या काठावरील महेश्वर येथे हलवली. राज्य चालवण्याबरोबर नर्मदा मातेची भक्ती होईल या उद्देश होता. महेश्वरला स्वावलंबन, शिक्षणाचे केंद्र बनवण्यासाठी अहिल्याईंने संस्कृत शाळा सुरू केली. सेवा, त्याग, तपश्चर्या आणि दानधर्म याचे महत्त्व वैयक्तिक जीवनात असताना त्यांनी मानवसेवा हीच खरी भक्ती मानून, वाटसरूंना विश्रांतीची ठिकाणे, अन्नछत्रे उभारली. आपले राज्य शंकरभगवानांना समर्पित करून त्यांनी बद्रीनाथ, हिमालयातील केदारनाथ, दक्षिणेला रामेश्वरम, पश्चिमेला द्वारका ते पूर्वेला जगन्नाथ पुरीपर्यंत त्यांचे सुरू असलेले सेवाकार्य आजही प्रसिद्ध आहे.

राजसत्ता, प्रशासन, न्याय, धर्मरक्षण, अशा अनेक कर्तृत्वामुळे ब्रिटिश इतिहासकार जॉन केयस यांनी त्यांना 'फिलोसॉफर' 'Great Queen' म्हणून उपाधी दिली आणि त्या भारतातील सर्वात दूरदर्शी महिला शासकांपैकी एक मानल्या जाऊ लागल्या. स्त्रीयांविषयी दुय्यमता जरी असली तरी अहिल्याबाई या वेगळ्या ठरल्या. त्यांच्या न्याय, भक्ती आणि सुशासन समाजकारण याच्या त्रिवेणी संगमामुळे अहिल्याईंना पुण्यश्लोक नावरूपास आले. जिने देव मानला पण दैववादात अडकून पडली नाही. जिने शासन केल पण जनतेच्या हितासाठी त्याच अहिल्याबाईंनी समाजकारण देखील केल. ते दुर्बल घटकांच्या विकासासाठी तर कधी स्वतःच्या सुजलाम सुफलाम राज्यासाठी आणि त्यात नांदणाऱ्या असख्य प्रजेसाठी.

अहिल्याबाई काळाचा एक टप्पा नव्हती तर ती स्वतः च एक काळ होती, तिथल्या जुल्मी राज्यव्यवस्थेच्या विरोधातला! ती पुरुष नव्हती पण पुरुषसत्ताक व्यवस्थेला छेद देऊन स्त्रीच अस्तित्व स्वीकारायला लावणारी एक शूर स्त्रीच होती.



तिने रणांगणातले काही युध्द जिंकले तर काही हरले पण स्वतःच्या मनातलं युद्ध ती नेहमीच जिंकायची. या त्यांच्या शूर, नेतृत्वगुणी पराक्रमामुळे जगभर त्या पुण्यश्लोक म्हणून ओळखल्या गेल्या. संस्कृतीच्या आधारस्तंभ म्हणून अहिल्याबाईंनी फक्त मंदिरे, घाट, विहिरी यांच्या उभारणीला आधार नाही दिला तर धर्म, न्याय, समाजकार्य, नेतृत्वाची जिवंत मूर्ती म्हणून आजच्या या पिढीला आणि येणाऱ्या पिढीला आदर्शाचे धडे दिले.

आज त्रिशताब्दी (३००) वर्षानंतर ही लोकमातेच्या कर्तृत्वाची महती इथल्या सामान्यातील सामान्य लोकांना जाणवली पाहिजे. आपण त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त त्यांनी दाखवलेल्या मार्गावर एकसंध, समृद्ध, सुसंवादी आणि शक्तीशाली भारत निर्माण करण्याचा आणि आपल्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान बाळगत जागतिक कल्याण करण्याचा संकल्प केला तर नक्कीच अहिल्याबाई होळकर यांना त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त ही खरी आदरांजली ठरेल. !!!



नाव -:- सोनार अभिषेक सुरेंद्र

शाळा -:- डी. आर. हायस्कुल. नंदुरबार.

विषय -:- अहिल्याबाई होळकर यांचे
समाजसुधारणेतील कार्य.

मो. नं. 9075863684

जन्मदिनांक ६ जानेवारी २००९.

अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य.

Page No. 1
Date 28 05 2025



मधुर होती जिची वाणी
अशी जन्मली तत्त्वज्ञानी राणी....
ज्ञानवत्या जिने दिशा दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला
अशी सीमा नाही.

भारतातील कर्तबगार स्त्रियांपैकी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या एक होत. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रात अहिल्यानगर जिल्ह्यात जामखेड तालुक्यातील चौंडी गावाच्या क्षेत्रात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. स्त्री शिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडीलांनी त्यांना लिहिण्या. वाचण्यास शिकवले होते. त्यांचा वयाच्या आठव्या वर्षी खंडेराव होळकरांशी विवाह झाला. त्या मल्हारराव होळकरांचा स्नुषा होत्या. काही वर्षानंतर अहिल्याबाई होळकरांच्या पतीचा मृत्यु झाला. त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांनी अहिल्याबाईना सती जाऊ दिले नाही. बारा वर्षानंतर मल्हारराव होळकर हे ही मृत्यु पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याचा माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. त्यां लढाईत अहिल्यादेवी स्वत: सैन्याचे नेतृत्व करित होत्या.

अहिल्याबाई होळकर यांचे नाव आजही अनेकांच्या तोंडावर आहे. अहिल्याबाईना 'पुण्यश्लोक' असेही म्हणतात. कारण त्यांनी केलेले सामाजिक कार्य आजही अनेकांसाठी आदर्शवत असेच ठरले आहे. अहिल्याबाई यांचे सामाजिक कार्य खुप मोलाचे आहे. राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही इंदूर क्षेत्राचा विकास करुन त्याचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे हे अहिल्यादेवीनी केलेले फार मोठे



कार्य होते. त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधले. अनेक उत्सव सुरु केले. माळव्यात बरीच कार्य केली. हिंदू मंदीरांमध्ये कायमस्वरूपी पूजा सुरू रहावी म्हणून अनेक दाने दिली. माळव्याबाहेरही त्यांनी मंदीरे, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या.

भारतीय संस्कृती कोशात अहिल्यादेवी होळकरांनी केलेल्या बांधकामाची यादी बरीच आहे. काशी, गया, सोमनाथ, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार, रामेश्वर व जगन्नाथपुरी वगैरे. अहिल्यादेवीस सावकार, व्यापारी, शेतकरी इत्यादी आर्थिकदृष्ट्या सदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणू दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडुन नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता.

अहिल्यादेवीनी जनतेच्या रक्षणेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्यादेवीनी राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांचा एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला. तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वत: आयोजित करून, रीतसर कपडे व बांगड्यांचा आहेर दिला. भिल्ल व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातीमधील वाद अहिल्यादेवी सोडवू शकल्या नाहीत. तरीही त्यांनी त्या लोकांना पठाणील निरुपयोगी जमीन दिली. आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर छोटा 'कर' घेण्याचा अधिकार दिला.

महेश्वर येथील अहिल्यादेवींची राजधानी ही जणू काव्य, संगीत, कला व उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंतफंदी यांना व संस्कृत विद्वान खुशालीराम यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला. कारागिरांना, मूर्तिकारांना



Date

व कलाकारांना त्यांचा राजघानीत सन्मान व वेतन मिळत असे. अहिल्यादेवीनी महेश्वर शहरात एक कपड्याची गिरणीपण सुरू केली. ज्याकाळी दळणवळणाची साधने फारच कमी होती किंवा म्हटले तर नव्हती. अशी परिस्थिती होती. अशा खडतर काळात त्यांनी आपलातील निर्धक्षेत्रांच्या ठिकाणी व राज्यात मंदीरे, धर्मशाळा, तलाव, विहीरी, घाट, पाणपोई अशी अनेक समाज उपयोगी कामे केली. आजही वास्तुशिल्पे व त्यांनी उभारलेली स्थापत्य कला मानोद्दीच्या अत्य कार्याची साक्ष देत उभी आहे. वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासन संस्कृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोर गरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दिले. त्याचा कामागिरीचा हा कुटेरी बाणा निश्चीतच अभिमानास्पद आहे.

ज्याप्रमाणे अहिल्यादेवी लोककल्याण अणि समाज सुधारणा करीत त्याचप्रमाणे लोकांमध्ये समानता अन्याय दूर करण्याचे कामे ही केलीत. महीला व पुरुष यांना समान संधी दिली. म्हणुनच अहिल्यादेवीना समान न्याय करणाऱ्या न्यायदेवता म्हणुन अहिल्यादेवीना ओळखलं जातं. लोकरी सुखी तर जग सुखी या संकल्पनेतुन त्यांनी लोकांच्या जाचक करातुन मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव, विहीरी बांधल्या. लोकांना गो. पालनाचे महत्त्व पटवून प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवून आणले.

ज्याकाळात सती जाण्याची मोठी रूढी. परंपरा होती. सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप असा समज समाजात रूढ होता. त्यावेळी अहिल्यादेवीनी रामायण महाभारत यामध्ये देखील कोणी सती गेल्याचा उल्लेख नाहीत. असे दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही. हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांच्या प्रयत्नामुळे सतीची अनिष्ठ



Date

चाल कायदयाने बंद करण्यात आली. यावरून अहिल्यादेवीची त्यांचा दूरदृष्टीची प्रचीती आपणास येते. अशाप्रकारचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य अहिल्यादेवीनी केले.

ज्याकाळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेला चोर दरोडेखोर व भिल्ल लूटमार करीन असत. अशा लुटारू लोकांना शिंगणे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशु व गायी, म्हशी अणि शेत जमीनी दिल्या. व त्यांचे मन परिवर्तन केले. व ते लोक शेती करू लागले. त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहचा प्रश्न मिटला भिल्ल लोकांना भिलकवाडी करभ घेण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रास करणाऱ्या या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा निर्माण केला. अहिल्यादेवी यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानाचा सुभेदार तुकोजी होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला. म्हणुन त्याना तुरुंगात डांबले. अहिल्या देवीच्या सर्वांना समान न्याय या विचाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुद्धा प्रभावित होते.

त्याकाळी ग्रंथ संपदा निर्मिती छापखाने नसल्याने त्याकाळी धर्माचे तत्वज्ञान जाणून घेण्याकरिता हस्तलिखिते यावरच अवलंबून रहावे लागत होते. हस्तलिखिते लिहिणारे मोठ्या प्रमाणात रकमेची मागणी करत असत. ज्याप्रमाणे हिरा व रत्ने पारखणाऱ्या जवाहिऱ्याप्रमाणे त्या विषयेची महत्व जाणत असल्याने त्याचा मागणीप्रमाणे रक्कम देऊन ग्रंथाची हस्तलिखिते तयार करून विद्यार्थ्यसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली, छापा काढून विद्याप्रसाराचे काम केले.

ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमध्ये उत्तम राजे होते. तसेच अहिल्यादेवी या स्त्रियांमधील उत्तम राजकर्ती होत्या. त्यांचा चांगल्या बुद्धीचे, चोगुलपणाचे व गुणांचे बरेच उदाहरणे आहेत. आपल्या असामान्य



Date

कर्तव्याने अहिल्यादेवींनी यशतेचे मन जिंकले. असे वरीच अहिल्यादेवीची समान सुधारणा करण्यासाठीचे कार्य आहे. महेश्वर येथे संस्कृत पाठशाळा सुरू केली. अन्नछत्रे घातली. अनेक ठिकाणी मंदिरे बांधली गुजरातमधील सोरटी सोमनाथाचा मंदिराचा जिर्णोद्धार केला. असे पुण्यसंचयनाचे कार्य अहिल्यादेवी करित होत्या. तशातच त्यांचा नातू तेराव्या वर्षी मरण पावला. काही दिवसातच जावाई लढाईत मृत्यू पावला. बराच संकटाचा त्यांनी अंत पाहीला होता. वयाचा ७० व्या वर्षी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची १३ ऑगस्ट १७९५ रोजी प्राणज्योत विसली. अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ. इंदूर येथील विश्वविद्यालयास त्यांचे नाव दिले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे विद्यापीठ सोलापूरला आहे.

अहिल्यादेवींच्या सन्मानार्थीत्यर्थ व स्मृतिप्रीत्यर्थ भारत सरकारने २५ ऑगस्ट १९९६ रोजी एक रुपाल तिकिट जारी केले. अशा शासनकर्तीस मानवंदना म्हणुन इंदूरच्या विमानतळाचे नाव "देवी अहिल्या इंटरनॅशनल एअरपोर्ट (इंदूर)" असे ठेवण्यात आले आहे. इंदूर विद्यापीठास "देवी अहिल्या विश्वविद्यालय" असे नाव देण्यात आले आहे.

अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ १३ मार्च २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारने अहमदनगरचे नामांतर 'अहिल्यानगर' असे केले. अशा प्रकारचे मोलाचे अहिल्या बाई होळकरांचे समानसुधारणेचे कार्य आहे.

"असंख्य राज्या या जगतात होऊन गेल्या
पंरतु पुण्यश्लोक अहिल्याबाई
यासारखी राणी होणे नाही
आजही गर्व जिचा आहे
मराठी माणसाला
आज अभिवादन करतो.
त्यांना त्यांच्या जयंतीला."



निबंधस्पर्धा-

नाव - चंचल सुभाष तर्ले
इयत्ता - 11 वी
वय - 15 वर्ष (माध्यमिक गट)
मो.नं - 9373521278
Email - tarlesunanda@gmail.com
पत्ता - मु.पो. मोंजे सुकेणे, ता - निफाड, जि - नाशिक



अहिल्याबाई होळकर : न्याय, भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम

भारतीय इतिहासातील एक तेजस्वी व्यक्तीमत्व म्हणजे अहिल्याबाई होळकर. त्या केवळ एक राजमाता नव्हत्या, तर एक न्यायप्रिय शासिका, भक्तीरसात न्हालेली संत आणि आदर्श प्रशासिका होत्या. त्यांच्या जीवनात न्याय, भक्ती आणि प्रशासन या तिन्ही अंगांचा अद्वितीय संगम दिसतो. त्यांच्या पतीचे निधन झाले. सासरे मल्हारराव होळकर यांनी त्यांना आधी होण्यापासून रोखले आणि राजकारणात प्रवेशही दिला. काही वर्षांनी मल्हारराव आणि पुत्र मालेराव यांचाही मृत्यू झाला. यानंतर अहिल्याबाईंच्या खांद्यावर संपूर्ण जबाबदारी आली.

न्याय : त्यांच्या कारकिर्दीचा केंद्रबिंदू :-

अहिल्याबाई न्यायप्रिय होत्या. त्यांच्याकडे न्यायासाठी येणारे कोणत्याही धर्माचे, जातीचे वा वर्गाचे असोत, सगळ्यांना एकसारखा न्याय मिळत असे. त्यांच्या न्यायप्रक्रियेत कडक चौकशी होत असे, खोटे साक्षीदार शिक्षा पावत आणि अन्याय करणाऱ्याला कोणतीही सहानुभूती मिळत नसे. त्यांच्या काळात चोर, दरोडेखोर, भ्रष्ट अधिकारी यांच्या विरोधात कठोर कारवाई केली जात असे. न्यायाच्या बाबतीत त्यांनी आपल्या परिवारातील व्यक्तींवरसुद्धा कारवाई केली होती. त्यांच्याकडे पारदर्शक न्यायप्रणाली होती. जात, धर्म, वर्ग या कोणत्याही भेदाभेदाविना त्यांनी सर्वसामान्यांवर समान न्याय लागू केला. यावरूनच त्यांच्या न्यायप्रिय वृत्तीचा प्रत्यय येतो. न्यायाचा पाया मजबूत असेल, तर राज्य टिकते हा त्यांचा ठाम विश्वास होता.



भक्ती : सेवा म्हणजे खरा धर्म :-

त्यांच्या भक्तीचा आवाका आणि त्यामागील उद्दिष्ट समाजसेवा होती. त्यांनी अनेक मंदिरांचे जीर्णोद्धार केला. त्र्यंबकेश्वर, अयोध्या, सोमनाथ यासारख्या ठिकाणी मंदिरे, धर्मशाळा आणि घाट उभारले. त्यांनी सर्व धर्मीयांसाठी कार्य केले. अनेक ठिकाणी अन्नछत्रे, पाणपोई आणि विहिरी बांधल्या. त्यांनी धर्म म्हणजे सेवा हे आपल्या जीवनातून दाखवून दिले. त्या शिव, कृष्ण, विष्णू यांच्या भक्त होत्या. काशी विश्वनाथ या प्रसिद्ध मंदिराचा जीर्णोद्धार त्यांनीच केलेला आहे. अहिल्याबाईंनी धार्मिक सहिष्णुतेचे उदाहरण दिले. त्यांनी काशीतील मशीदींचे संरक्षण केले आणि विविध धर्मांच्या स्थळांचे पुनर्निर्माण केले, ज्यामुळे त्या काळातील धार्मिक औदार्याचे प्रतीक बनल्या. अहिल्याबाईंच्या दैनंदिन जीवनात प्रार्थना, उपास्य देवतेची पूजा, ब्राह्मणांना अन्नदान आणि धार्मिक ग्रंथांचे पठण यांचा समावेश होता. त्यांचे जीवन साधे, संयमी आणि भक्तिपंथी होते.

प्रशासन : सुशासन आणि सर्वसमावेशक :-

राज्यकारभार हातात घेतल्यानंतर त्यांनी महेश्वरला आपली राजधानी बनवली. त्यांनी आधुनिक प्रशासकीय ढाचा रचला. राज्याच्या प्रत्येक भागात प्रतिनिधी नेमले. दररोज सकाळी खुला दरबार भरवला जात असे. शेतकऱ्यांसाठी सिंचन योजना, कर्जमाफीची सोय केली. व्यापारासाठी रस्त्यांची, घाटांची, बाजारपेठांची निर्मिती केली. महेश्वर केवळ राजधानी नव्हे तर एक सांस्कृतिक आणि औद्योगिक केंद्र बनवले. महेश्वरी साड्या आजही प्रसिद्ध आहेत. राजकारभारात अहिल्याबाईंनी अफाट बुद्धिमत्ता, विश्व आणि दूरदृष्टी दाखवली. त्यांनी सुव्यवस्थित प्रशासनाची पायाभरणी केली. त्यांनी महेश्वरला वस्त्रोद्योग आणि विणकरांच्या व्यवसायाला चालना दिली. त्यांनी करप्रणाली सुस्पष्ट केली आणि व्यापारास चालना दिली.

त्रिवेणी संगम :-


अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनात न्याय, भक्ती आणि प्रशासन हे तीनही प्रवाह एकत्र मिसळले. एकीकडे भक्तीची निःस्वार्थ भावना होती, तर दुसरीकडे जनतेच्या हितासाठी न्याय आणि विवेकपूर्ण प्रशासन होते. त्यांनी भारतीय इतिहासात एक नवा आदर्श घडवला. आजही त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अनेक महिला समाजात आपले स्थान निर्माण करत आहेत. त्या एक आदर्श माता, पतिव्रता स्त्री, उत्तम प्रशासक, धर्मसेविका आणि न्यायप्रिय होत्या. त्यांचे जीवन म्हणजे एक उत्तम साधिका होत्या. त्यांच्या कार्यातून बहुमोल मार्गदर्शन मिळते.

" राज्य करणं म्हणजे केवळ सत्ता नव्हे, ती सेवा आहे " ही विचारधारा आयुष्यात अहिल्याबाई होळकरांनी दिली. अहिल्याबाईंची कार्यकिर्दी पुढील ओळी कवितेतून व्यक्त होते-

अहिल्याबाई होती राणी,
प्रजेसाठी सदा होती सज्ज जाणी।
गरीब, दुखी तिचे होते आपले,
तिच्या न्यायाने सर्व जग थक्क झाले।

राज्य चालवणं तिचं काम,
विश्वास, प्रेम आणि सोबत विश्वास।
सर्वजण म्हणत- ती च खरी माई,
तिची आठवण आजही येई।

—×—×—×—×—



नाव :- पुर्वा पांडुरंग किजबिले
वय :- (17)
पत्ता :- कोलाड, रोहा, जिल्हा :- रायगड, ता :- रोहा 402304
नंबर :- 8378984219
विषय :- पुण्यश्लोक अहिल्याबाई :- आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व

31 मे रोजी, भारताने २१ व्या शतकातील मालव्याच्या दूरदर्शी राणी देवी अहिल्याबाई होळकर यांची 300 वी जयंती साजरी केली, ज्यांचे जीवनकथा आजही प्रेरणादायी आहे त्यांच्या विनम्र सुरूवातीपासून ते एक आदर्श शासक म्हणून त्यांच्या कारकिर्दीपर्यंत, अहिल्याबाईंचा प्रवास शिक्षण, प्रशासन, सामाजिक, सुधारणा, सांस्कृतिक संरक्षण आणि लष्करी नेतृत्व या त्यांच्या अढळ समर्पणाने चिन्हांकित आहे. अशा विस्तृत पोर्टफोलिओमुळे त्यांचा वारसा अपवादात्मक बनतो. त्यांच्या लोकांच्या कल्याणासाठी आणि सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी असलेल्या खोल वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करणारी, अहिल्याबाई भारतीय इतिहासातील एक कमी प्रसिद्ध व्यक्तिमत्व आहे ज्यांनी नरी शक्तीचे खरे सार स्पष्ट केले. त्यांनी हिंदवी स्वराज्याच्या मराठ्यांचे स्वप्न आणि ध्येय पुढे नेले आणि भारताच्या सभ्य संस्कृतीचा नाश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्व आक्रमकांशी लढा दिला. त्यांनी धर्माला औद्योगिकीकरणाशी जोडले. धर्म हा धर्म नाही तर सुसंस्कृत जीवनाचा एक मार्ग आहे.

असामान्य वाढ १७२४ मध्ये एका सामान्य कुटुंबात जन्मलेल्या अहिल्याबाई या मध्ययुगीन भारतातील काही मोजक्या महिला शासकांपैकी एक होत्या. त्यांचे वडील माणकोजी शिंदे यांनी त्यांच्या मुलीला शिक्षण मिळावे असा आग्रह धरून त्या काळातील रूढींना आव्हान धरून त्या कालातील रूढींना आव्हान दिले. त्या काळात मुलीसाठी ही एक दुर्मिळ घटना होती. त्यांच्या शिक्षणाने त्यांना केवळ सक्षम केले नाही तर प्रामुख्याने पितृसत्ताक समाजात स्त्री शिक्षणाचे महत्त्व सिद्ध केले. १७५४ मध्ये कुंभारच्या लढाईत त्यांचे पती खंडेराव यांच्या मृत्युनंतर अहिल्याबाईंचा सत्तेवर येण्याचा प्रवास सुरू झाला. त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांच्या भक्कम पाठिंब्याने आणि



पाठिंब्याने, अहिल्याबाईंनी नेतृत्वाची सूत्रे हाती घेतली. त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांच्या मार्गदर्शनाने आणि पाठिंब्याने, अहिल्याबाईंनी नेतृत्वाची सूत्रे हाती घेतली, प्रशासकीय आणि लष्करी रणनीतीमध्ये प्रभुत्व मिळवले. ते १७६५ पर्यंतचा त्यांचा कारकिर्दीचा काळ उल्लेखनीय स्थिरता आणि समृद्धीचा काळ म्हणून आठवला जातो. जवाहरलाल नेहरूंनीही त्यांच्या राजवटीचे कौतुक केले. आणि त्यांचे वर्णन "परिपूर्ण सुव्यवस्था आणि चांगले सरकार होते, आणि लोक समृद्ध झाले अशा काळात जवळजवळ पौराणिक काल" असे केले.

आक्रमकांकडून सतत येणाऱ्या धमक्यांना न जुमानता, अहिल्याबाईंनी आपल्या राज्याचे रक्षण करताना असाधारण धैर्य दाखवले. त्यांचे नेतृत्व केवळ बाजूला उभे राहण्यासाठी मर्यादित नव्हते, तर त्यांनी सैन्याला युद्धात नेले, जे युद्धभूमीवरील त्यांच्या धोरणात्मक अंतर्दृष्टी आणि शौर्यामुळे अधिक स्पष्ट झाले. शासक म्हणून त्यांचे प्रयत्न हिंदू शासकांमध्ये एकता वाढवण्याचा आणि संपूर्ण प्रदेशात शांतता आणि सलोखा वाढवण्याचा प्रयत्न करत होते. अहिल्याबाईंच्या लष्करी पराक्रमाने आणि दृढनिश्चयाने त्यांच्या राज्याची सुरक्षा आणि स्थैर्य सुनिश्चित केले, ज्यामुळे पुरुषप्रधान जगात त्या एक शक्तिशाली व्यक्तिमत्व बनल्या.

सामाजिक सुधारणांसह चांगले प्रशासन अहिल्याबाईंना वैशिष्ट्य म्हणजे सार्वजनिक कल्याणासाठी त्यांची खोलवरची वचनबद्धता, ज्यामध्ये राज्याच्या चिंता आणि प्राधान्यांवर लक्ष त्यांचा लढा त्यांच्या प्रशासनात त्यांचे सहानुभूतीपूर्ण प्रशासन वेगळे दिसते, ज्यामुळे अहिल्याबाईंना त्यांच्या लोकांमध्ये प्रेम मिळाले. त्यांनी धर्म आणि नीतिमत्तेच्या तत्त्वांवर त्यांचे राज्य केले, निष्पक्ष आणि जलद न्यायावर लक्ष केंद्रित केले. परिणामी, त्यांच्या प्रशासनाकडे करुणा आणि कार्यक्षमतेचे मिश्रण म्हणून पाहिले जाते, जे त्यांच्या काळात प्रशासनासाठी उच्च मानके स्थापित करते.

सासऱ्यांच्या मृत्यूनंतर होळकर कुटुंबाची उत्तराधिकारी म्हणून, तिने सामाजिक उन्नतीसाठी, विशेषतः कृषी विकास, पाणी व्यवस्थापन आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करून, असंख्य प्रकल्प हाती घेतले. मंदिरे, घाट, विहिरी आणि शैक्षणिक संस्था बांधण्यासह त्यांची असंख्य

Shot on OnePlus




धर्मादाय कामे भारतीय उपखंडात पसरली. शिवाय, रस्ते वाहतूक आणि व्यापार मार्ग सुधारणे यासारख्या पायाभूत सुविधां वरील उपक्रम हे तिच्या कारकिर्दीचे महत्त्वाचे परिणाम होते. अशा प्रयत्नांमुळे महेश्वर (१७६६ ते १७९५ पर्यंत होळकर राज्याची राजधानी) व्यापार आणि उद्योगाच्या केंद्रात रूपांतरित झाले.

सांस्कृतिक संरक्षण आणि धार्मिक योगदान

त्यांच्या आश्रयाने, महेश्वर शहर साहित्य, संगीत, कला आणि उद्योगाचे केंद्र म्हणून भरभराटीला आले. त्यांनी प्रसिद्ध माहेश्वरी साडी कापड उद्योगाची स्थापना केली, ज्यामुळे महेश्वर एका भरभराटीच्या व्यावसायिक केंद्रात रूपांतरित झाले. समकालीन भारतातील इतर राज्ये स्थिता राज्यासाठी संघर्ष करत असतानाही, कारागीर, संगीतकार आणि विद्वानांना आश्रय देण्यात आला, ज्यामुळे एक चैतन्यशील सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले. धार्मिक

सांस्कृतिक वारशातील त्यांचे योगदान तितकेच महत्त्वाचे होते. अहिल्याबाईंचे योगदान त्यांच्या राज्याबाहेर पसरले, ज्यामुळे त्यांच्या देशाच्यापी मंदिरांच्या संरक्षणाद्वारे दिसून आले, विशेषत: आक्रमणकर्त्यांनी अपवित्र केलेल्या अनेक मंदिरांचे पुनरुज्जीवन आणि नूतनीकरण करण्याबाबत. त्यांच्या प्रयत्नांनी प्राचीन तीर्थयात्रा मार्ग आणि पवित्र स्थळांना पुनरुज्जीवित केले. ज्यामुळे भारताच्या आध्यात्मिक वारशाचा आदर आणि आदर केला जाणारा दृष्टिकोन प्रतिबिंबित झाला. आक्रमणकर्त्यांनी अपवित्र केलेल्या अनेक हिंदू मंदिरांच्या जीर्णोद्धारातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उल्लेखनीय म्हणजे, मुघल सम्राट औरंगजेबाने केलेल्या भारतातील विध्वंसानंतर जवळजवळ एक शतकानंतर, १७८० मध्ये त्यांनी काशी विश्वनाथ मंदिराची पुनर्बांधणी केली. भारतातील पवित्र स्थळांचे पुनरुज्जीवन करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे त्यांना "पुण्य श्लोक" ही आदरणीय पदवी मिळाली. १७८२ मध्ये त्यांनी सोमनाथ मंदिराची पुनर्बांधणीही केली. सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा जतना आणि संवर्धन करण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब म्हणून त्यांनी मंदिरे, घाट, विहिरे आणि शैक्षणिक संस्था बांधण्यास आणि नूतनीकरण करण्यास पाठिंबा दिला.

Shot on OnePlus



तरीही, इतिहासाच्या पुस्तकांमध्ये किंवा स्त्रीवादी विद्वत्तेत त्यांचे उल्लेख कमी आहेत आणि तरीही त्यांच्या शासन आणि लष्करी कामगिरीकडे दुर्लक्ष केले जाते. शिवकामिनी कर्मयोगिनी आणि लोकमाता अहिल्याबाई होळकर यांना सर्वात विश्वासू श्रद्धांजली म्हणजे मुलींच्या शिक्षण, सांस्कृतिक पुनरुज्जीवन आणि सुशासनार्तीना त्यांचे योगदान साजरे करणे आणि प्रसारित करणे.

Shot on OnePlus



नाव :- कु. प्रेया शशिकांत जाधव
इयत्ता :- १२ वी
मु.पो :- दुधोंडी, ता :- पलूस, जि. सांगली
मोबाईल नंबर :- 8459652579
9011297571

अहिल्याबाई होळकर - भारताच्या इतिहासातील तेजस्वी अध्याय

" स्वातंत्र्य रक्षिण्या आपुले,
ही वीर रणरागिनी झाली।
ही गोरगरिबांची माय माऊली,
शोर अहिल्या जन्मा आली ..."

एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहीले गेले आहे. अहिल्याबाई होळकर यांनी अनेक युद्धांमध्ये साहसी योद्ध्यांप्रमाणे विचारपूर्वक निर्णय घेत युद्धांचे नेतृत्व केले. अहिल्याबाई अशा शासकांपैकी एक होत्या, ज्या आपल्या प्रांताच्या रक्षणार्थ आठी अन्यायाविरुद्ध आक्रमण करण्यास कधीही मागेपुढे पाहत नसत. महाराणी अहिल्याबाईंची ओळख मावळ प्रांताच्या राजमाता म्हणून होती.

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडीलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकविले होते. मल्हारराव होळकर पुण्यास



जाताना चौंडीस थांबले होते. आख्यायिकेनुसार, ८ वर्षांच्या अहिल्यादेवींना मल्हारराव होळकरांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्याने त्यांनी त्यांना स्वतःच्या मुलगा खंडेराव यांची वधू म्हणून मागणी घातली. अशा तऱ्हेने बालवयातच अहिल्याबाई मराठा साम्राज्यातील प्रसिद्ध अशा होळकर कुटुंबाच्या सुनबाई झाल्या. लग्नानंतर काही वर्षांनी म्हणजेच १७४५ साली अहिल्याबाईंना पुत्रप्राप्ती झाली आणि त्यांनी त्यांच्या पुत्राचं नाव मालेराव असं ठेवलं. पुढे तीन वर्षांनी म्हणजेच १७४८ साली अहिल्याबाईंना मुक्ताबाई नावाची सुंदर कन्या झाली. अहिल्याबाई राज्यकारभारात आपल्या पतीला मदत करत असत, शिवाय त्यांच्यातील युद्ध आणि सैन्यकौशल्य उत्कृष्ठ होण्यासाठी त्यांना सतत प्रोत्साहितदेखील करत असत.

खंडेराव स्वतः युद्धात निपुण. वडीलांच्या नेतृत्वात त्यांनी युद्धकौशल्य प्राप्त केलं होतं. मल्हाररावांसोबत खंडेरावही युद्धावर जात असत. त्यामुळे राज्याचा महसूल वसूल करण्याचं, न्याय देण्याच आणि धन, सेना, रसद, तोफा, बैल, चाराबंदी इत्यादी काम अहिल्याबाई स्वतः करत असत. एकदा पेशव्यांना काशीला जायचं होत त्यांनी अहिल्याबाईंना पत्र लिहिलं, की माहेश्वर ते काशी जाण्यापर्यंतच्या रस्त्यातील घाट, नदी आणि प्रमुख ठिकाणं यांच्याबाबत माहिती कळवा. अहिल्याबाईंनी संबंधित माहिती पत्रामार्फत पेशव्यांकडे पाठविली. पुढे काही कालानंतर अहिल्याबाईंच्या प्रांतावर शमंत पेशव्यांची फौज चालून आली. खासे राघोबादादा या फौजेमध्ये होते. त्यामुळे राजमाता अहिल्यादेवींनी शमंत पेशव्यांना पत्र लिहिलं. त्यात त्यांनी लिहिल "आम्ही आपली इमानेइतबारे सेवा केली. मल्हारराव होळकर, पती खंडेराव, मुलगा मालेराव यांनी एकनिष्ठता आपल्या पायाशी वाहिली. आज राघोबादादा फौज घेऊन तयार आहेत तेथांबवा." परंतु अहिल्याबाईंचं पत्र जाईपर्यंत पेशवे आणि राघोबादादा इंदोर राज्यात येऊन पोहोचले. अहिल्याबाईंनी तुकोजी होळकर, भोसले, शिंदे, गायकवाड यांना फौजेसह तयार राहण्याचा हुकुम दिला. इकडं राघोबादादा शिप्रा नदीकाठी येऊन थांबले होते तेव्हा अहिल्याबाईंनी पुन्हा पत्र लिहिलं "लढाई आम्हाला नवी नाही, परंतु दोन्ही बाजूंनी आपलेच सैन्य मारले जाईल. मराठी सैन्याचाच पराभव होईल. जर लढाई करायचीच असेल तर मी स्वतः लढाईत नेतृत्व



करणार आहे. मी हरले तरी मला स्त्री म्हणून कोणी हसणार नाही ; परंतु एका स्त्रीला आपण हरवलत म्हणून आपला नावलौकिक होणार नाही. जर आपण हरलात तर मात्र आपण जगात तोंड दाखवण्यालायक राहणार नाही. दोन्ही बाजूंनी तुमच्या नावाला कलंक लागेल." अहिल्याबाईंच हे पत्र वाचून राघोबादादांनी माघार घेतली.

अशा या मुत्सेद्दी अहिल्याबाईंनी माहेश्वर आणि निश्चल्या रयतेच्या सुरक्षेसाठी मुक्ताबाई या आपल्या मुलीलाही दाव्यावर लावल होत. माहेश्वरमध्ये चोर, डाकू यांच्यामुळे प्रजा हैराण झाली होती. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी राजमाता अहिल्यादेवींनी सर्वत्र दवंडी पिटविली की जो कोणी माणूस चोर, डाकूंचा बंदोबस्त करेल, त्याचा विवाह मी माझ्या मुलीशी करून देईन. राज्यात पसरलेल्या या दवंडीनंतर यशवंतराव फणसे नावाच्या तरुणान या चोरडाकूंचा बंदोबस्त केला. दिल्याशब्दानुसार राजमाता अहिल्यादेवींनी त्यांची मुलगी मुक्ताबाई हिचा विवाह यशवंत फणसे यांच्यासोबत करून दिला. अहिल्याबाई होळकर यांच्या व्यक्तिमत्वातील या एवढ्या गुणांमागे त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांचा सिंहाचा वाटा होता. वेळोवेळी मल्हाररावांनी आपल्या सूनबाईंना सैन्य, राजकारण आदि यांच शिक्षण दिल. अहिल्याबाई-मधील अद्भूत प्रतिभा पाहून मल्हारराव खूप समाधानी होत असत.

अहिल्याबाईंच आयुष्य सुखासमाधानाने व्यतीत होत असताना अचानक त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. १७५४ साली, जेव्हा अहिल्याबाई फक्त २१ वर्षांच्या होत्या, त्यावेळी त्यांच्या पतींना खंडेराव होळकरांना कुंभेर येथील युद्धात वीरमरण प्राप्त झाल. इतिहासकारांच्या मते, आपल्या पतीवर अत्यंत प्रेम करणाऱ्या अहिल्याबाईंनी पती निधनानंतर सती जाण्याचा निर्णय घेतला. परंतु त्यांचे सासरे मल्हारराव होळकरांनी त्यांना सती जाण्यापासून रोखले. कालांतराने १७६६ साली मल्हारराव होळकरांचे निधन झाले. घरातील दोन कर्त्या पुरुषांच्या निधनामुळे अहिल्याबाईंना अतिशय दुःख झाले. तरी देखील निराश न होता त्या लढल्या. पुढे मावळप्रांताची जबाबदारी अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली त्यांचे चिरंजीव मालेराव होळकर यांनी आपल्या हातात घेतली. राज्यकारभाराची सूत्र हाती घेतली. अवघ्या काही दिवसांत १७६७ साली मालेरावांचादेखील मृत्यू झाला. आपल्या पुत्राच्या मृत्यूमुळे अहिल्याबाईंवर आभाळ कोसळले. परंतू, पती, तरुण मुलगा,



वडीलांप्रमाणे अरुणाचे सासरे यांचा मृत्यू पश्चातही अहिल्याबाईंनी ज्या पद्धतीने राज्यकारभार सांभाळला ते केवळ कौतुकास्पद नव्हे तर आदर्श घेण्यासारखे आहे. आयुष्यात दुःखाचा डोंगर कोसळल्यानंतरही अहिल्याबाईंनी धीर खचू दिला नाही. वैयक्तिक दुःखाचा प्रभाव त्यांनी प्रजेवर पडू दिला नाही. पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे ढासळणाऱ्या आपल्या मावळ प्रांताला पाहून त्यांनी स्वतः उत्तराधिकारी होण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी पेशव्यांच्या पुढे जाऊन विनंती केली.

२१ डिसेंबर १७६७ रोजी त्यांनी मावळ प्रांतांची सूत्र आपल्या हाती घेतली. अहिल्याबाईंनी राज्याची सूत्रं हाती घेतल्यानंतर राज्यातील अनेक लोकांनी त्यांना विरोधदेखील केला. परंतु हळूहळू त्यांच्यातील अद्भूत शक्ती व पराक्रम पाहता प्रजा त्यांच्या कार्यावर विश्वास ठेऊ लागली. इतिहासातील सर्वात पराक्रमी आणि कुशल योद्ध्या महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी माळवा प्रांताची सूत्रं हाती घेतल्यानंतर मल्हारराव यांचे दत्तकपुत्र आणि सगळ्यात विश्वासू सुभेदार तुकोजीराव होळकर यांना सैन्याचा प्रधानसेनापती म्हणून नियुक्त करण्यात आलं. आपल्या कार्यकाळात अहिल्याबाईंनी अनेकदा प्रभावशाली रणनीती आखत सैन्याचं नेतृत्व केलं. आपल्या प्रजेच्या रक्षणार्थ अहिल्याबाई सतत तत्पर राहत असत. युद्धप्रसंगी हत्तीवर स्वार होऊन अहिल्याबाई एखाद्या पराक्रमी योद्ध्याप्रमाणे शत्रूवर बाण चालवत असत. ज्या काळात अहिल्याबाईंनी राज्याची सूत्रं आपल्या हातात घेतली, त्यावेळी राज्यात अशांततेचं वातावरण पसरलं होतं. राज्यात मोठ्या प्रमाणात चोरी, लुटमारी, हत्या या घटनांमध्ये वाढ झाली होती. मात्र आपल्या कुशल नेतृत्वामुळे या साऱ्यावर अंकुश आणण्यात अहिल्याबाई यशस्वी झाल्या. आपल्या प्रांतात शांतता व सुव्यवस्था स्थापन करण्यात त्यांना यश आलं.

इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांना भारताच्या "कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ, मार्गारेट" असे म्हणले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने असं म्हणल आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रियांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यश्लोक



अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्वप्रथम लिहिले जाईल.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभर अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढंच नव्हे तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखले. प्रसिद्ध हिंदू मंदिरांचा त्यांनी जार्णोद्धार केला; माहेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनविले. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने उध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे देऊळ बांधले. अहिल्याबाईंना प्रजेस कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती. "शेतकरी सुखी तर जग सुखी" या संकल्पनेतून शेतकऱ्यांच्या जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहिरी बांधल्या. शेतकऱ्यांना गोपालनाचे महत्व पटवून देऊन प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवून आणले.

त्या काळात सती जाण्याची मोठी रूढी व परंपरा होती. सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप असा समज समाजात रूढ होता. रामायण आणि महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाही असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांच्या प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट चाल कायद्याने बंद करण्यात आली यावरून अहिल्याबाई होळकर यांच्या दूरदृष्टतेची प्रचीती आपणास येते.

अहिल्याबाईंच्या शौर्य आणि साहसाची चर्चा अवघ्या विश्वात होऊ लागली. त्या दूरदृष्टी बाळगणाऱ्या शासक होत्या. महान शासक अहिल्याबाईंनी आपल्या राज्याच्या विस्तारासाठी अनेक चांगली कार्ये केली. राजमाता अहिल्यादेवी संपूर्ण आयुष्यात प्रजेच रक्षण आणि संगोपन एखाद्या आईप्रमाणे करत. अहिल्याबाई होळकर यांनी १८ व्या शतकात इंदोरजवळ असणाऱ्या माहेश्वर येथे नर्मदा नदीच्या किनाऱ्यावर एक भव्य अशा राजवाड्याची निर्मिती केली. त्याकाळी साहित्य, संगीत आणि कला, उद्योगक्षेत्रात माहेश्वर ओळखले जात होते.



त्यांनी शिक्षणाचा प्रचार-प्रसार केला. शिवाय कलाकौशल्य क्षेत्रात आपलं अभूतपूर्व योगदान दिलं. त्यांच्यात दया, करुणा, परोपकाराची भावना ओतप्रोत भरलेली होती. आणि म्हणूनच त्यांनी आपल्या शासनकाळात गरीबांकरिता आणि भुकेलेल्यांसाठी अनेक अन्नछत्र उघडली. पाण्याकरिता अनेक पाणपोया स्थापन केल्या. अहिल्याबाईची ओळख एक विनम्र आणि उदार शासक म्हणून सर्वदूर परिचित होती. गरजवंतांसाठी, गरिबांकरिता, असहाय्य व्यक्तींसाठी त्यांच्या हृदयात करुणेचा सागर उफाळून येई. समाजसेवेच व्रत अंगीकारलेल्या अहिल्याबाई समाजाकरिता स्वतःला समर्पित करत.

त्यावेळच्या कायद्याप्रमाणे जर एखादी महिला विधवा झाली आणि तिला मूलबाळ नसेल तर तिची सगळी संपत्ती सरकारी खजिन्यात किंवा राजकोशात जमा होत असे, परंतू अहिल्याबाईंनी या कायद्यात बदल करून महिलांना आपल्या पतीच्या संपत्तीचे वारसदार बनविले. याव्यतिरिक्त त्यांनी महिलांच्या शिक्षणावर फार भर दिला. आपल्या आयुष्यात आलेली अनेक संकट पार करत अहिल्याबाईंनी ज्या पद्धतीन ज्या दुर्दम्य आशावादानं स्त्री शक्तीचा वापर केला तो खूप प्रशंसनीय आहे. यामुळे महिलांकरिता त्या कायम एक प्रेरणास्त्रोत राहिल्या आणि राहतील.

आपल्या प्रजेच्या हितासाठी सतत कार्य करत असणाऱ्या आदर्शशासक अहिल्याबाई होळकर यांना १३ ऑगस्ट १७९५ साली प्रकृती अस्वस्थामुळे देवाज्ञा झाली. परंतु त्यांच्यातील उदारता आणि समाजाकरिता केलेल्या असंख्य कार्यामुळे त्या आजही सर्वांच्या स्मरणार्थ आहेत आणि यापुढेही राहतील. आपल्या आयुष्यात आलेल्या असंख्य अडचणी, संघर्ष याला तोंड देत त्या एकाकी झुंज देत लढत राहिल्या. कधीही परिस्थितीला शरण गेल्या नाहीत. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपल्या प्रजेचा एका आईप्रमाणे सांभाळ केला. त्यांनी जनतेसाठी केलेल्या सर्व लोकाभिमुख कार्याबद्दल बोलताना अहिल्याबाई म्हणत

" परमेश्वराने माझ्या खांद्यावर जे उत्तरदायित्व सोपविले आहे, ते मला पार पाडायचे आहे. प्रजेला सुखी ठेवणे माझे कर्तव्य आहे. मी माझ्या प्रत्येक कर्माप्रती जवाबदार आहे. सामर्थ्य आणि सत्तेच्या बळावर मी येथे जे काही करत आहे, त्याचे ईश्वराच्या दरबारी मला



उत्तर द्यावे लागणार आहे. येथे माझे काहीही नाही, ज्याचे आहे त्याच्याच जवळ पाठवते. जे काही होते आहे ते माझ्यावर कर्ज आहे. मला माहित नाही की मी याची परतफेड कशी करेन ..."

अहिल्याबाई होळकर यांनी समाजाकरिता केलेल्या महान कार्याला पाहता, त्यांच्या सन्मानार्थ भारत सरकारनं २५ ऑगस्ट १९९६ ला पोस्टाचं तिकीट प्रकाशित केल. अहिल्याबाईच्या असामान्य आणि अद्वितीय कार्यासाठी त्यांच्या नावे पुरस्कारदेखील दिला जाऊ लागला. अहिल्याबाई कायम त्यांच्यातील अदम्य इच्छाशक्ती, वीरता, पराक्रम, साहस, न्याय, राजतत्त्वाच एक अद्वितीय उदाहरण म्हणून युगानयुगे आपल्या स्मरणात राहतील.

पुरुष जातीचा बडगा छेदून
केलीत तुम्हीं समाजसेवा।
भुकेल्या पोटी घास देऊनीं
तृप्त केले तहानल्या जीवा!!
जात-धर्म विसरुन दाखवला
मानव सेवेचा मार्ग नवा।
" अहिल्यादेवी होळकर आपल्या
कार्याचा निरंतर तेवत राहील दिवा!!



नाव :- समृद्धी संतोष शाऊत

वय :- १४ वर्ष

पत्ता :- मु.पो. नागोठणे (खष्कआळी) ता. रोहा, जि - रायगड
पिन नं :- 402106

नंबर :- 8624071975

विषय :- पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर (३१ मे, १७२५ - १३ ऑगस्ट १७९५. राज्यकालावधी इ.स १७६७ - इ.स १७९५) या भारतातील, मालव्याच्या 'तत्त्वज्ञानी महाराणी' म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तीरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी स्थलविली. मल्हारराव यांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेले होते. त्या आधारने अहिल्याबाईंनी इ.स १७६६ ते इ.स १७९५ म्हणजे त्यांच्या मृत्युपर्यंत मालव्यावर राज्य केले होते. अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे इ.स १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी (मल्हारपीठ) खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले होते. मल्हारराव होळकर पुण्यास जाताना चोंडीस थांबले होते. आकस्मिकेनुसार, ८ वर्षाच्या अहिल्यादेवींना, मल्हारारावांनी एका देवलात बसितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला, स्वत:च्या मुलगा खंडेराव याची वधू म्हणून आणले.

मल्हारराव होळकरांच्या त्या सून होत. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे इ.स १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्युनंतर सासरे मल्हारावांनी अहिल्याबाईंनी सती जाऊ दिले नाही. १२ वर्षानंतर, मल्हारराव होळकर हेही मृत्यु पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. त्या लढाईत अहिल्यादेवी स्वत: सैन्याचे नेतृत्व करीत होत्या पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.



इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांना भारताच्या "कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारेट" असे म्हणले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांनी तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट. इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी एकत्रित केली. त्याने म्हणले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले. एवढंच नाही तर त्यानी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक क्षेत्रात प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला ; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने हतस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथाला जाणारे लोक या देवळा लाही भेट देतात. अहिल्याबाईना प्रजेस कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती.

अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमहील त्याचा राज्यकाळ सूमारे तीस वर्षे चालला. हा एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याने राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात अनेकची भरभराट झाली. अहिल्यादेवी होळकरांना जीवनकालात तर सन्मान मिळालाच पण मृत्युनंतरही लोकांनी त्यांना संताच्या दर्जा दिला. "ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते. तसेच अहिल्यादेवी ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. तिच्या चांगल्या बुद्धीचे, चांगुलपणाचे व गुणांचे उदाहरण देता येऊ शकते. अशी अहिल्यादेवी ही एक महान स्त्री होती.

आपल्या असामान्य कर्तृत्वाने अहिल्यादेवींनी रयतेचे मन जिंकले. नाना फडणवीसांसकट अनेक उच्च घुराण आणि माळव्यातील लोकांनुसार ती एक दिव्य अवतार होती. ती आजतागायतची सर्वात शुद्ध व उदाहरण देण्याजोगी शासक होती. अलीकडच्या काळातील चरित्रकार अहिल्यादेवींना 'तत्वज्ञानी राणी' असे संबोधतात. याचा संदर्भ बहूतेक व तत्वज्ञानी राजा' भोज याच्याशी असावा. अहिल्यादेवी होळकर ह्या एक खरोखरीच विस्तृत राजकीय दृश्यपटलाच्या एक सूक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या. सन १७८२ मध्ये पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी ब्रिटिशांबरोबर हातमिळवणी करण्याबाबत एक ताकीद दिली होती. त्यांनी कवळ्यांचे हे अस्त्रांस कवटाळण्याजोगे असल्याचे त्यांनी नोंदले आहे.



सर्व समाजाला अहिल्यादेवी आवडत असत आणि तो त्यांच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करी. त्यांच्या कन्येने तिचा पती, यशवंतराव फानसे यांच्या मृत्युनंतर सती जाणे हे अहिल्यादेवींच्या आयुष्यातले शेवटचे सर्वात मोठे दु:ख होते. वयाच्या ७० व्या वर्षी अहिल्यादेवी होळकरांची प्राणज्योत मावळली. भारत स्वतंत्र झाल्यावरही पुढील अनेक वर्षे शेजारील भोपाळ, जबलपूर किंवा ग्वाल्हेर या शहरांपेक्षा इंदूर सर्व बाबतीत प्रगतिशील राहिले. याच्या मागे अहिल्यादेवीची दूरदृष्टी होती.



नाव :- अमिता दौलत मुंजाळ
कॉलेज :- फर्ग्युसन कॉलेज पुणे
मो न :- 7066790970
ई-मेल :- amitadmunjal@gmail.com.

विषय :- पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका

वयोगट - २१ वर्षापुढील



विषय - पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर -
एक आदर्श स्त्री शासिका.

"प्रजेच्या दुःखात आपले सुख शोधणारी,
न्यायाला धर्म मानणारी,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ही
एक राणी नव्हे तर ती
आदर्श शासकतेची अजरामर मुर्ती आहे."

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी, दिव्य, आदर्श, शौर्यशाली व धर्मशील स्त्री शासिका होत्या त्यांचे संपुर्ण जीवन हे नारीशक्तीच्या प्रखर तेजाचे प्रतिक होते. त्यांच्या चरित्राकडे पाहिले असता असे स्पष्टपणे जाणवते की त्यांनी केवळ राज्यकारभार पार पाडला नाही, तर स्त्रीसत्तेला एक दिव्य उंचीवर नेऊन ठेवले. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात ३१ मे १७२५ रोजी जन्मलेल्या अहिल्यादेवींचे बालपण सर्वसामान्य पार्श्वभुमीतील होते. त्यांच्या वडिलांचे नाव मानकोजी शिंदे होते. त्यांना लहानपणापासुनच वाचन, धर्मकथा, साधुसंतांचे विचार यांची गोडी होती. सामाजिक भान, नैतिक मुल्ये व परोपकाराची बीज त्यांच्या मनात बालवयातच रोवले गेले होते.
त्याकाळी मुलींचे शिक्षण समाजात मान्य नव्हते, परंतु त्यांच्या वडिलांनी त्यांना साक्षर करून धार्मिक व चारित्र्यसंपन्न बनवले.
एकदा मल्हारराव होळकर, जे मराठा साम्राज्याचे एक प्रमुख सेनापती होते, चौंडी येथे मुक्कामी आले असता त्यांनी अहिल्याबाईचे तेजस्वी व सुसंस्कृत व्यक्तिमत्व पाहुन त्यांना आपल्या पुत्र खंडेराव होळकरांसाठी वधू म्हणून निवडले.



अहिल्यादेवी व अँडेराव यांचा विवाह झाला व त्या इंदुरच्या राणी बनल्या. राजघराण्यात प्रवेश केल्यानंतरही त्यांनी कधीही अभिमान किंवा विलासिता स्विकारली नाही. त्या सदैव नम्र, संयमी, धर्मपारायण व लोकाभिमुख राहिल्या. दुर्दैवाने अँडेराव युद्धभुमीत धारातीर्थे पडले आणि काही काळाने पुत्र मालेरावही अल्पवयातच निधन पावले. असे असतानाही अहिल्या-देवींनी दुःखाच्या शर्तेत अडकुन न रहता अपार धैर्य व विवेक दाखवत राज्याची जबाबदारी स्वेच्छेने स्वीकारली.

त्या काळी पुरूषप्रधान समाजात एका स्त्रीने राज्यसत्ता हाती घेणे हे साहसिक व अत्यंत दुर्लभ होते, पण अहिल्यादेवींनी अत्यंत यशस्वीपणे व न्यायनिष्ठ पद्धतीने राज्यकारभार केला. १७६७ ते १७९५ पर्यंत सुमारे ३० वर्षे त्यांनी होळकर राज्यांची सुत्रे सांभाळली व संपुर्ण भारतात एक आदर्श स्त्री शासक म्हणून आपली ओळख निर्माण केली.

त्यांचे राज्य म्हणजे न्याय, सुशासन, समता, सहिष्णुता, आणि धर्मनिष्ठा यांचा संगम होता. त्यांनी शेतकऱ्यांसाठी सिंचन योजनांचा अवलंब केला, विहिरी, तलाव, बंधारे बांधले, शेतीचे उत्पन्न वाढवले. व्यापार वाणिज्याला प्राधान्य देऊन अर्थव्यवस्था मजबुत केली.

करप्रणालीमध्ये पारदर्शकता आणली व शासकीय अधिकारी भ्रष्टाचार मुक्त ठेवले. त्यांच्या दरबारात न्याय मिळवण्यासाठी कुठल्याही जाती, पंथ, वर्ग, लिंगाचे भेद नव्हते.



एका स्त्रीने स्त्रियांना स्वतंत्र विचार, पुनर्विवाहाचा हक्क, सतीप्रथेपासुन मुक्ती या गोष्टी पुरवणे, हा त्या काळातील क्रांतिकारी विचार होता. अहिल्यादेवींनी स्त्रियांना शिक्षणासाठी मदत केली, विधवांना आश्रय दिला व समानसुधारणांचा आरंभ केला. धर्माच्या बाबतीत त्या अत्यंत श्रद्धाळु होत्या पण धर्मांधु नव्हत्या. त्यांनी केवळ मराठा प्रदेशातच नव्हे तर संपुर्ण भारतभर धार्मिक स्थळांचा विकास केला. त्यांनी काशिचे विश्वनाथ मंदीर, गंगेच्या घाटांचे पुनरुज्जीवन, मथुरा, द्वारका, रामेश्वर, हरिद्वार, सोमनाथ, पंढरपुर इ. अनेक तीर्थस्थळावर मंदिरे, घाट, धर्मशाळा, पाणवठे उभारले.

इतकेच नव्हे तर त्या कार्यासाठी त्यांनी स्वतःच्या दागिण्याचा वापर केला. राजकोषाचा दुरुपयोग केला नाही. त्यांच्या स्थापत्यकलेत सौंदर्य, कार्यक्षमतेचा संगम होता.

आजही त्यांच्या नावे भारतभर १०० हुन अधिक मंदिरे घाट, धर्मशाळा व इतर सामाजिक रचनांचे स्मारक स्वरूपात अस्तित्व आहे. त्यांनी सैन्यदल व्यवस्थीत ठेवले, सीमारेषा सुरक्षित ठेवल्या, परकीय आक्रमणांचा मुकाबला केला. परंतु त्यांनी कधीही अकारण युद्ध केले नाही, शांतता आणि परस्पर सहकार्य यावर भर दिला.

त्यांच्या मुत्सद्देगिरीचे कौतुक पेशव्यांपासुन निजामापर्यंत व इंग्रजांपर्यंत सर्वांनी केले. त्यांच्या दरबारात तुकोबांची गाथा, ज्ञानेश्वरीचे पठण, संतसाहित्य, भक्तगीते सतत चालु असायची.



त्या स्वतः पहाटे उठुन वंदन करत, प्रजेसाठी प्रार्थना करत आणि दररोज न्यायसभेत उपस्थित राहत. अहिल्यादेवींच्या दरबारात प्रजेचे दुःख त्यांच्या स्वतःच्या दुःखापेक्षा अधिक महत्त्वाचे होते. तर सिंहासनास प्रजासेवा या दृष्टीनेच पाहिले. त्यांच्या दरबारात कुठल्याही जातीपातीचा, लिंगभेदाचा किंवा आर्थिक स्थितीचा विचार न करता प्रत्येकास न्याय मिळे.

त्यांचा न्याय हा तात्काळ, पारदर्शक व कृतीशील असे. त्या अर्थाने प्रजाप्रिय राणी होत्या. त्यांनी स्वराज्य, स्वधर्म, स्वसंस्कृती या तीनही मुल्यांचे संरक्षण केले. त्यांनी स्त्रीला केवळ कुटुंबापरती मर्यादित न ठेवता राज्यकारभाराच्या प्रत्येक अंगात कार्यक्षमतेने सामील करुन तिच्या नेतृत्व क्षमतेला मान्यता दिली. त्यांचे संपुर्ण जीवनच एका चालतेबोलते विद्यापीठ होते. त्यांनी जे कार्य १८ व्या शतकात करुन ठेवले, त्याचा आदर्श आजच्या २१ व्या शतकानही लागु आहे. त्यांच्या कार्याची थोरवी ही केवळ इतिहासाच्या पुस्तकातच नव्हे, तर जनतेच्या मनात आजही जागृत आहे.

भारत सरकार व महाराष्ट्र सरकार शासनाने त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी विविध स्मारके, पुरस्कार, व योजनेची स्थापना केली. आजही अनेक स्त्रिया, समाजसुधारक, प्रशासक, धार्मिक नेते त्यांना आपले प्रेरणास्थान मानतात.



त्यांनी दाखवलेल्या नितीनिष्ठा, कार्यशक्ती युवतींनी अनुसरणे गरजेचे आहे. अहिल्यादेवी होळकर हे नाव म्हणजे दिव्य कर्तृत्वाचा इतिहास, नारीशक्तीचा जयघोष आणि सत्यनिष्ठा, कार्यशिलता, न्यायप्रियत्ता व जनकल्याणाचा अमर संदेश आहे.

त्यांनी निर्माण केलेली आदर्श स्त्री शासिकेची प्रतिमा ही केवळ एक ऐतीहासिक उदाहरण नसुन आजही प्रेरणादायी व अनुकरणीय आहे. त्यांनी निर्माण केलेली आदर्श स्त्री शासिकेची प्रतिमा ही केवळ निर्माण केली.

म्हणुनच पुण्यशील, धर्मनिष्ठ, द्रव्यया, कलानुरागी, समाजसेविका, धर्मसेविका, न्यायप्रेमी, सहिष्णु, त्याग-मुर्ती, करुणामयी अशा विविध विशेषणांनी युक्त असलेल्या अहिल्यादेवी होळकर यांचे संपुर्ण जीवन म्हणजे भारतीय नारितेचा सर्वोच्च आदर्श आहे आणि म्हणुनच त्या यथा अर्थाने "पुण्यश्लोक" या उपाधीला पात्र आहेत.

"जिथे न्याय, करुणा आणि कर्तव्य एकत्र येतात,
तिथे अहिल्यादेवीसारखी शासिका जन्माला येते."

राज्यकारभारात होती सजग बुद्धिची तलवार,
प्रजेसाठी उभी राहिली ती न्यायाची ढाल भार।
धर्म, दया, कर्तव्य होती तिची ओळख खरी,
अहिल्यादेवी होत्या महाराजांहुनही जास्त परी ॥.



पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर
- एक आदर्श स्त्री शासिका

इतिहासाची पाने उलटताना लक्षात येते की पारंपारिक भारतीय स्त्रीचं असं एक वेगळं विलक्षण सामर्थ्य आहे. सगळ्यांना सांभाळून घेणं, कुशाग्रपणा, मनस्वीपणा आणि अपार सोशिकता हे त्यातील सत्व. भारतीय स्त्रीला समाजामध्ये महत्त्वपूर्ण मानाचं स्थान आहे. तिला तिचं असं एक वेगळं आस्तित्त्व आहे. स्त्री आस्मितेची जाणीव जागृत करणारं असच्चं एक स्त्रीरत्न म्हणजे देशभक्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर.

"वार नाही तलवार आहे
ती समशेरीची धार आहे"

जनतेची शक्ती, स्फूर्ती योग्य त्रहेने मार्गी लावण्यात, टिकवण्यातच नेतृत्त्वाची खरी कसोटी असते. गतिशील समाजव्यवस्थेत कृतिशील स्त्रीचं महत्त्व अधोरेखित होतं ते अहिल्यादेवींच्या नेतृत्त्वाने, कर्तृत्त्वाने !

सर्वोत्तम अधिकारी, जनसेविका, सर्वश्रेष्ठ मुत्सद्दी, शेतकरी, व्यावसायिक, स्त्रीया अशा समाजातील सर्वच घटकांचं कल्याण व्हावं ही भावना असलेल्या, न्यायप्रिय, प्रजेचं सुख-हित चिंतणाऱ्या, श्रद्धावान अशा या अहिल्यादेवी. ३१ मे १७२५ साली महाराष्ट्रात अहमदनगर जिल्ह्यात जामखेड तालुक्यातील चौंडा नावाच्या एका छोट्या खेड्यात धनगर समाजातील शिंदे कुटुंबात एक कन्यारत्न जन्माला आले. नाव ठेवण्यात आले अहिल्या. वडिल माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्या काळात स्त्री शिक्षण फारसे प्रचलित नसतानाही अहिल्येला त्यांच्या वडिलांनी शिक्षण दिले. आठ वर्षाच्या अहिल्येचं लग्न बाजीराव पेशवे यांचे सरदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी म्हणजेच खंडेराव होळकरांशी झालं. आठ वर्षाच्या आपल्या सुनेला मल्हारराव होळकर यांनी युद्धनीतिचे धडे दिले. सासरे मल्हारराव होळकर यांच्या तालमीत तयार झाल्याने दूरदर्शीपणा, स्वाभिमान, संयम, शुद्ध चारित्र्य, औदार्य, न्याय निष्ठुरता, राजनीती यात अहिल्यादेवी पारंगत झाल्या. कुम्हेरच्या लढाईत अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर धारातीर्थी पडले. वयाच्या २९ व्या वर्षी वैधव्य आलेल्या आपल्या सूनेला मल्हाररावांनी सती जावू दिले नाही. पतीनिधनानंतरही डगमगून न जाता अनेक अवघड वळणांवरून, अडचणींतूनच आत्मविश्वासाने, धाडसी वृत्तीने त्या जीवनाच्या नव्या टप्प्यांत प्रवेश करत गेल्या. पण हा खडतर



PAGE NO.:
DATE : / /

म्हणजेच अहिल्यादेवींच्या सासऱ्यांचे बारा वर्षांनी निधन झाले. आता खरी कसोटी होती माळव्याचा राज्यकारभार सांभाळण्याची !

अहिल्याबाईंनी वात्सल्यपूर्ण नजरेतून आपल्या प्रजेच्या मनात विश्वासाचं नात निर्माण केलं. समाजसुधारक असलेल्या अहिल्यादेवींनी आपल्या राज्यकारभारात अनेक सुधारणा केल्या. राज्य विभागणी करताना लहान गावे, मोठी गावे, परगण्या, महाल, सुभा अशा छोट्या - छोट्या स्तरांवर विभागणी केल्याने प्रशासन चालवणं अधिक सोपं झालं. त्यांची करपद्धतीही न्यायप्रिय अशीच होती. शेतकरी सुखी तर जग सुखी या न्यायाने त्यांनी शेतकऱ्यांना जाचक करातून मुक्त केले. जास्त कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यास कडक शासन केलं जाई. अतिवृष्टी, दुष्काळ यांवेळी सारा तलकूब केला जाई.

अहिल्यादेवींकडे कमालीची दूरदृष्टी होती. वृक्षतोड म्हणजे जीवहत्याचं असं त्या मानत. प्रत्येक शेतकऱ्याने वीस झाडे लावलीच पाहिजेत असा त्यांचा दंडक होता. तोच हा 'नौ ग्यारह कानून' पर्यावरणरक्षक अशा अहिल्यादेवींचा अतिशय गाजलेला निर्णय. त्यांनी नदी, पाण्याचे व्यवस्थापनही दूरदृष्टीने केल्याने २८ वर्षांच्या त्यांच्या कारकीर्दीत कधीच दुष्काळाला सामोरे जावे लागले नाही.

अहिल्यादेवी कर्तव्यनिष्ठ प्रशासक होत्या. अधिकाऱ्यांच्या चुकीच्या वागणूकीबाबत आपल्या पत्रातून त्या कानउघाडणी करत. चांदवडचे मामलेदार हे त्याचं एक उत्तम उदाहरण. पुरवादी व्यक्ती ध्येय समोर ठेवून समाजात वावरू लागली की धाडस आणि सामर्थ्य तिच्यात आपोआप येतं. अहिल्यादेवींच्या पुत्र निधनानंतर राज्यावर आलेलं संकट परतावून लावतानाची त्यांची मुत्सद्देगिरी आजच्या समाजाला आदर्श आहे.

अहिल्यादेवी प्रजाहितदक्ष होत्या. त्यांचा लोकाभिमुख राज्यकारभार हे त्याचं प्रतिक ! माहेश्वर या ठिकाणी त्यांनी वस्त्रोद्योगास चालना दिली. हुंडाबंदी, दारूबंदी, पती संपत्तीवर विधवांचा हक्क, दत्तक हक्क, ज्या काळात दक्षणवक्षणाची साधने फारच कमी होती अशा खडतर काळातही त्यांनी अनेक मंदिरांची निर्मिती केली, विहिरी बांधल्या. घाट बांधले, धर्मशाळांची निर्मिती केली. अन्नछत्रे उभारली. असे कितीतरी निर्णय त्यांनी प्रजाहितासाठी घेतले. लोकांना रोजगार निर्माण व्हावा यासाठी औद्योगिक क्षेत्रं आखली. महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवलं, नावारुपाला आणलं. शौर्य, सेवा व श्रद्धा यांचा मिलाफ असलेल्या त्यांच्या प्रशासकीय कामात अतिशय महत्त्वपूर्ण असलेली राजमुद्रा 'इदं न मम' याचाच प्रत्यय करून देणारी आहे.

अनुभवातून माणूस घडतो. उपजत बुद्धिमत्तेबरोबरच आजूबाजूची



परिस्थिती, प्रसंग असं शिकणं माणसाला पुढे जायला उद्युक्त करतं. त्याकाळात प्रवास करणाऱ्या प्रवाशांना चोर, दरोडेखोर व भिल्ल लुटत असत अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करुन गाईम्हशी पाळीव पशु, शेतजमिनी दिल्या. भिल्ल बिमोड करताना पूर्वापार चालत असलेली कश्वसुली पद्धत बदलून शेतीव्यवसाय भिल्ल समाजाला उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन त्यांनी उदारता आणि यांगुलपणा समाजासमोर आदर्श म्हणून ठेवला. भिल्लांना सन्मार्गाने जगायला शिकवलं.

न्यायदानाच्या बाबतीत अहिल्यादेवी अत्यंत जागृत होत्या. न्यायदानात विलंब आलेला त्यांना अजिबात रुचत नसे. समाजातील कोणताही घटक न्यायवंचित राहू नये याची विशेष काळजी त्या घेत. निरीक्षण शक्ती व दुरदृष्टीतील चांगले ते घ्यावे हे संस्कार असल्यानेच इंग्रजी राजवटीप्रमाणे पाश्चात्य धर्तीवर संपूर्ण सैन्य नियंत्रण करण्यासाठी त्यांनी सैन्याच्या तुकड्या केल्या. राज्यातील स्त्रीया शस्त्रास्त्र चालवण्याचे, लढाईचे प्रशिक्षण घेऊ लागल्या. पाच हजार सैनिक स्त्रियांची युक्त फौज निर्माण झाली. संपूर्ण हिंदुस्तानात स्त्रियांची पहिली फौज निर्माण करणाऱ्या अशा या राजमाता.

धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यशास्त्राची जाण असलेल्या अशा या अहिल्यादेवींचे कलेवरही नितांत प्रेम होते. साहित्य, संगीत, चित्रकला यांचं महत्त्व जाणून चित्रकार, कवी, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य यांना राजाश्रय देऊन त्या प्रोत्साहित करत. प्रसिद्ध कवी मोरोपंत, शाहीर अनंत फंदी, संस्कृत पण्डित खुशालीराम भट्ट यांना त्यांनी राजाश्रय दिला. मूर्तिकार, गायक, चित्रकार यांना सरकारी नोकऱ्या दिल्या. महेश्वर नगरी त्याकाळी संस्कृती, विद्वान व धर्माचे माहेरघर म्हणून नावारुपाला आली ती अहिल्यादेवींमुळेच. गुणग्राहकता, दूरदृष्टी, कुशलता, कर्तबगारी यामुळे शस्त्र आणि शास्त्र यांची सांगड घालून अहिल्यादेवी सर्वोत्कृष्ट राज्यकर्त्या बनल्या. पवित्र चरित्र असलेल्या, जीवनात यश, कीर्ति आणि सुंदरता असल्याने त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी म्हणून ओळखल्या जावू लागल्या. म्हणूनच माधवराव पेशवेंनी अहिल्याबाईंना लिहिलेल्या पत्रात त्यांचा उल्लेख "गंगाजल निर्मळ मातोश्री अहिल्याबाई" असा करतात. इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकरांना भारताच्या "कॅथरिन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारिट" असं म्हटलं आहे. अर्थात रशियाची राणी कॅथरिन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ आणि डेन्मार्कची राणी मार्गारिट यांच्याशी एकत्रित तुलना केली आहे. यावरुन त्यांच्या जगभरातील सुकीर्तीची ओळख होते. समाजाच्या उत्कर्षाला व अपकर्षाला राज्यसंस्था जबाबदार असते.



"कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम्"

असं म्हटलं जातं की, राजा हा नेता असतो. प्रजा ही त्याच्या मागून चालते म्हणूनच राजाचे आचरण शुद्ध व आदर्शभूत असले पाहिजे. अहिल्यादेवींचा राज्यकारभार आदर्शभूत सर्वोत्कृष्ट होता. म्हणूनच आज तीनशे वर्ष उलटूनही देशभक्त पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी जनमनावर राज्य करत आहेत.

आज लोकशाही कार्यप्रणाली अस्तित्वात आहे. मतदार हा राजा असला तरी त्यांनी नेमून दिलेले लोकप्रतिनिधीच लोकांच्या वतीने राज्यकारभार चालवतात. त्यामुळे कर्तव्यदक्षतेने, लोकहिताचं भान ठेवून, निष्ठेने आपल्या अधिकारांचा वापर लोकप्रतिनिधींकडून केला गेला पाहिजे. सांप्रदायिक ऐक्य, समाजसहाय्य, राष्ट्ररक्षण व धर्मजागृती यासाठी प्रयत्न करणे ही प्रत्येकाची क्षात्रधर्म साधना आहे. लोकशाहीतील काही पदे अत्यंत महत्त्वाची असतात. त्या पदावर निव्वळ कामाचीच नव्हे तर संकेत व परंपरा शिकवण्याचीही जबाबदारी असते. जर त्याच पदाची अवहेलना होऊ लागली तर मात्र हे आधारस्तंभ ढासळायला वेळ लागणार नाही. यासाठी प्रत्येक प्रश्नाच्या मूळाशी जाऊन त्यावर विचार करणं, तथ्यांश शोधणं गरजेचं आहे. हा तथ्यांशच पुढच्या मार्गक्रमणासाठी उपयुक्त ठरु शकतो न राष्ट्रोद्धाराचा आधार होऊ शकतो. कारण यातूनच आपल्याला आपल्या देशाची प्रगती साधता येणं शक्य आहे.

हे घडण्यासाठी आज गरज आहे ती आदर्श शासिका, जनसेविका देशभक्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांसारख्या कुशल अशा राज्यकर्त्यांच्या आदर्शवत् वाटेने मार्गक्रमण करण्याची!

" ओळख व्हावी या रणरागिणीची
तू दिधल्या जनसेवेची
आदर्श असो जना सदैव तुझा
पुण्यश्लोक अहिल्या राजमाता "

नाव - सौ. प्रीती राजेश केळकर.
पत्ता - २७१८ 'विठ्ठल', वरची आळी,
रत्नभूमी प्रेस जवळ, रत्नागिरी.
मोबाईल नंबर - ९४२०१५६४७७



DATE : ___ / ___ / ___ TOPIC : _____ PAGE No. 1

स्पर्धकाचे नाव : सौ जयश्री स्वप्निल मोरे.

वय : ४१ वर्ष

लिंग : स्त्री.

संपर्क क्रमांक : 9763774460, 7387656999

स्पर्धेसाठी निवडलेली भाषा : मराठी.


निवडलेला विषय : राजमाता अहिल्याबाई होळकर
स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.

माहितीचा स्रोत : शाळा, कॉलेज

पत्ता : नेताजी चौक, टिचर्स कॉलनी
चाळीसगाव.









मंगळवार

DATE: २७/०५/२०२५ TOPIC: PAGE No. ②

◉ राजमाता अहिल्याबाई - स्त्री शक्तीचा ज्वलंत इतिहास ◉


एक अतिशय दानशूर, कर्तुत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांचा जन्म चौंडी हया छोट्याशा गावात जिल्हा बीड मानकोजी व सुशिलाबाई शिंदे या दांपत्याच्या पोटी झाला. घनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी, खंडेरावांशी झाले.

खंडेराव यांच्या आईचे नाव गौतमीबाई होते. खंडेराव हे व्यसनी, छंदीफंदी होते. पण अहिल्याबाईंनी खाबाबतीत तक्रार न करता सासऱ्यांनी नेमून दिलेल्या कामात लक्ष घातले. कुशाग्र बुध्दीची देणगी असलेल्या या सुनबाईवर सासऱ्यांचा विश्वास होता. आणि खूप महत्त्वाचा पत्रव्यवहार अहिल्याबाईंवर सोपवत असत. खंडेरावांपासून त्यांना दोन अपत्ये झाली. मालेराव हा मुलगा आणि मुक्ताबाई ही कन्या. अहिल्याबाईंना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले. त्या वेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या पण सासरे म्हणाले, प्रजाहितासाठी तुम्ही सती जाऊ नये. हे राज्य सांभाळायचे आहे."

आपल्या सासऱ्यांच्या इच्छेचा अहिल्याबाई होळकर यांनी मान राखला आणि सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. मल्हारराव ज्यावेळी मोहिमेवर असत तेव्हा स्वत: अहिल्याबाई राज्याचा बंदोबस्त चोख राखीत असत. मल्हाररावांच्या सल्ल्यानुसार वागत









DATE : / / TOPIC : PAGE No. 3

असत.


मल्हारराव होळकरांना पेशव्यांनी इंदूर संस्थानाची जहागिरी दिली होती. दौलतीचा कारभार मोठा होता. पण १७६६ मध्ये त्यांचे निधन झाले. आणि अहिल्या बाईवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. त्यांचा पुत्र मालेराव यांना जरी सुभेदारीची वस्त्रे मिळाली तरी ती सांभाळण्याची कुवत त्यांच्यात नव्हती. लवकरच त्यांचे देहावसान झाले. आता खऱ्या अर्थाने अहिल्याबाई राज्यकर्ती झाल्या. पुढील २८ वर्षे त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालविला. तिजोरीत भर घालीत त्यांनी प्रजाहिताकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले.

अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात अमर झाले. त्याला त्यांची धर्मपरायण आणि उदार वृत्ती कारणीभूत ठरली. बाई काय राज्यकारभार करणारी ही - दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी सपशेल खोटी ठरविली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांचा जुना दिवान गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता. राघोबादादांशी त्यांनी अहिल्याबाई विरुद्ध संधान बांधले आणि इंदुर - बळकवण्यासाठी त्यांनी प्रोत्साहित केले. अहिल्याबाईंना हे कळले तेव्हा त्या युद्धास तयार असल्याचे त्यांनी राघोबा दादास कळविले. राघोबांना हे अडचणीचे झाले. हरलो तर बाईकडुन हरलो. आणि जिंकलो तरी बाईशी युद्ध करण्यात कोणती मोठी मर्दुमकी. शेवटी त्यांना माघार घ्यावी लागली. त्यांचा उत्तम पाहुणचार अहिल्याबाईंनी इंदुरात केला. अशा रीतीने बाईंच्या लौकिकात आणखी भर पडली.

अहिल्याबाईंच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय घटना त्यांचा लौकिक वाढविणारी आहे. आपली कन्या मुक्ताबाईचे









DATE : / / TOPIC : PAGE No.: 4

स्वयंवर घोषित करताना त्यांनी जाहीर केले की जो कोणी चोर, लुटारु, दरोडेखोर यांच्या राज्यात बंदोबस्त करील त्या शूर व्यक्तिशी मुक्ताबाईचा विवाह लावला जाईल. त्यावेळी जात-पात बघितली जाणार नाही. हा विचार जाहीर करुन त्या थांबल्या नाहीत तर त्यांनी कृती ही तशीच केली. यशवंतराव फणासे या गुणी, शूर तरुणाशी त्यांनी मुलीचा विवाह करुन दिला.

अहिल्याबाई एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. पूर्वीच्या कायदयांमध्ये त्यांनी परिस्थिती नुसार काही सुधारणा केल्या. करपध्दती सौम्य केली मात्र शेतकऱ्यांकडून सारा घेणे चालू ठेवले. पाटील, कुळकरणयांच्या हक्कांचे वतन, हक्कांचे संरक्षण करुन गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. त्यावेळी डोंगर मुलखातून भिल्ल व गोंड आदिवासी प्रवाशांना उपद्रव देत आणि त्यांच्याकडून भीलकवडी नावाचा कर वसुल करीत. तेव्हा बाईनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या कर घेण्याचा हक्क मान्य केला. त्यांच्याकडून पडीत जमिनीची लागवड करुन घेतली. शिवाय त्यांना विशिष्ट हद्द नेमून दिली. जमीन करार पट्टयांनी देण्याची पध्दत सुरु केली.

राजधानी इंदूरहून नर्मदातीरी महेश्वरला हलविली (इ.स.१७६७) तिथे अनेक वास्तू बांधल्या. राजवाडयात प्रशस्त देवघर होते. नदीला घाट बांधले. मंदिराचा जीर्णोध्दार केला व पूर्वजांच्या स्मरणार्थ छत्र्या बांधल्या. महेश्वर हे विणकरांचे मध्यवर्ती केंद्र होते. बाईनी वस्त्र उद्योगास महत्व दिले, उत्तेजन दिले. कोष्टयांची वसाहत स्थापन केली. आणि उत्तम हातमागाची सणंगे तयार होतील अशी पेढी कायम केली. त्यांचा मुळ स्वभाव सौम्य असला तरी राज्यकारभारात त्यांनी मनरुपसिंगसारख्या कुविख्यात

Jupiter
Fairy Tales



DATE : ___/___/___ TOPIC : _____ PAGE No: 5

डाकुला फाशी दिली. होळकरांच्या टांकसाळीतील नाण्यांवर बिल्वपत्र व शिवलिंग यांचे छापे असत. त्यांच्या धर्म-परायणतेला प्रांत मर्यादा नव्हती. त्यामुळे त्यांचे नाव आसेतू हिमाचल घेतले जाते. त्यांनी अन्नछत्रे उघडली. राज्यातून विहिरी खोदून त्या चिरेबंद बांधून दिल्या. उन्हाळ्यात राज्यातून प्रवास करणाऱ्यांसाठी पाणपोया धर्मशाळा, पांथशाळा आश्रमशाळा बांधल्या. जनावरांसाठी डोण्या बांधून घेतल्या. पशुपक्षांसाठी रुग्णोपचारांची व्यवस्था केली. सर्पदंशावर लगोलग उपचार व्हावेत म्हणून हकीम वैद्य नेमले. स्त्रियांना सुरक्षित स्नानासाठी, कपडे बदल-ण्यासाठी बंदिस्त ओवऱ्या (स्नानगृह) यांची सोय केली. मुंग्यांना साखर आणि जलचरांना कणकेच्या गोळ्या खाऊ घालण्यापर्यंत त्यांचा दानधर्म सढळ होता. गोर-गरीबांना सणासुदीला त्या अन्नदान करीत, कपडे वाटत थंडीच्या दिवसात घोंगड्या वाटल्या जात.

बाईंनी प्रमुख तीर्थक्षेत्री विशेषत: अयोध्या, नाशिक द्वारका, पुष्कर, हृषिकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर चौंडी येथे मंदिरे बांधली.

याशिवाय सोरटी, सोमनाथ, ओंकारेश्वर, माल्लि-कार्जुन, औंढा, नागनाथ, काशी विश्वेश्वर, विष्णुपाद आदी मंदिरांचा जीर्णोद्धार केला. वाराणसी, प्रयाग पुणतांबे चौंढी, नाशिक, (जांब (इंदूर) त्र्यंबकेश्वर येथे नदीला घाट बांधले. आणि गोकर्ण महाबळेश्वर, उज्जयिनी रामेश्वर, भीमाशंकर आदी ठीकाणी अन्नछत्रे उघडली. सप्तपुरे चार धामेच्या ठिकाणी, घाट. मंदिरे कुंडे, धर्मशाळा बांधुन यात्रिकांची सोय केली. शिवाय त्यांनी जेजुरी येथे मल्हारी गौतमेश्वराची छत्री, इंदूरला मालेराव व गौतमी बाई यांच्या छत्र्या आणि महेश्वरला मुक्ताबाई यांच्या.

Jupiter
Fairy Tales



DATE : / / TOPIC : PAGE No. 6

स्मरणार्थ नाजूक कारागिरी केलेले मंदिर बांधले व कुंभेरी जवक खंडेराव यांच्या स्मरणार्थ छत्री बांधली.

अहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मिळ होता. त्यात निर्णयसिंधु, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा महात्म्य इ. ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. विद्वानांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मानसन्मान दिला जाई. मोरोपंत व शाहिर अनंत फंदी यांचा अहिल्याबाईंनी आदरसत्कार करुन अनंत फंदीस सल्लाही दिला आणि तमासगिरीपासून परावृत्त केले.

अखेरच्या दिवसात त्यांना दुख: आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांचे दोन भाऊ वारले. मुलीचा मुलगा नाथ्याबा ऐन तारुण्यात गेला. (१७६०) तुकोजी होळकरांची सून आनंदीबाई यांचे देहावसान झाले. त्यानंतर जावई यशवंतराव फणसे अचानक गेले आणि मुक्ताबाई सती गेली.

अशा बिकट परिस्थितीत शिंद्यांचा सरदार गोपाळराव याने १७६२ मध्ये होळकरांच्या फौजेवर हल्ला केला. - तेव्हा तरुणांसही लाजवेल अशा तडफदारीने त्यांनी शिंद्यांचा पराभव केला. त्यांच्या राज्यात सुबत्ता, संपन्नता व शांती होती. त्या अजातशत्रू होत्या. पण राज्यावर गुदरलेल्या संकटांना त्यांनी चोख उत्तर दिले.

मध्यम उंचीची, सावळ्या वर्णाची, डोईवर पदर घेतलेली ही स्त्री कर्तृत्व आणि विचार या दोन्ही दृष्टींनी केवढ्या उंचीची होती. हे त्यांचे आयुष्यच आपणास सांगते.

शेवटी महेश्वर येथे वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. अशाप्रकारे अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त त्यांचा जाज्वल्य इतिहास वाचला.....

Jupiter
Fairy Tales




DATE : / / TOPIC : PAGE No. 7

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त सुंदर अशी कविता....

ललकारती दाही दिशा,
करती जयघोष त्रिवा,
जुलूम जबरदस्ती आणि,
अन्यायाला फोडली तिने वाचा !!
सर्वधर्मसमभाव जिथे सुखात,
नांदत होती सारी जनता.
अशी कर्तव्यनिष्ठ कर्मयोगिनी,
अहिल्यादेवी राजमाता.
महान, तत्वज्ञानी, न्यायप्रिय आणि
शासनकर्ती भू लोकांची महाराणी
धर्मनिष्ठ कर्तुत्वाचे सम शगिनी.
उद्धार समाजाच्या करणे हाच
तिचा एक ध्यास.
जीवन वाहिले सुख आणि समृध्द
करण्यात समाजास
प्रत्येक घरात लक्ष्मी नांदत होती.
सुखी ठेवले राज्यास.
जात - पात समाज भाषा
देश विदेश जीचे गुण गाती.
दानधर्म समान न्याय
म्हणून लोके त्यांना देवी म्हणती.
आदर्श ठेवला नारी शक्तीचा
कित्येक पिढ्यांना पुढती
अशी राजमाता अहिल्यादेवी होळकर
पुन्हा न होणे धरती !!









DATE : ..... / ..... / ..... TOPIC : ..... PAGE No.: 8


पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त अहिल्योहवींचे सुंदर असे चित्र...





Jupiter





विषय - अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेचे कार्य

स्पर्धक - सौ. नर्मदा नरेश कनकी.
प्लॉट नं-128,स्वामी समर्थ पाटील
नगर, सोलापूर - 413006
मोबाईल - 9860750296



घाट, मंदिरे, विहिरी बांधून समान होते तिला रंक नि राव
समाजसेवा व लोकांच्या उत्कर्षाची तिला हाव।
म्हणून लोकांसाठी देह झिजवी ती एकमेव...
श्रेणी अहिल्याबाई होळकर तिचे नाव॥

कोवळ्या आठ वर्षाच्या वयात ही राजकुमारी होळकर घराण्यातील सून होऊन लोकांच्या उत्कर्षासाठी आपले संपूर्ण जीवन वेचले, त्या पुण्यश्लोक, राजमाता अहिल्याबाईंची त्रिशताब्दी जयंती आपण साजरी करत आहोत, स्मरण करत आहोत. अहिल्याबाईंचे जीवन हे समस्त नारीवर्गास प्रेरणादायी, ध्येयवादी, त्यागीपणाचे उदात्त दृष्टीकोन देऊन जाते. पाहूयात त्यांची माहिती.

अहिल्याबाईंचा जन्म महाराष्ट्रातील चांडी गावात आताच्या अहिल्यानगर जिल्ह्यात एका मराठी हिंदू कुटुंबात झाला. त्यांचे वडील प्रतिष्ठित धनगर कुटुंबाचे वंशज होते. त्यांचे वडील माणकोजी शिंदे गावचे पाटील म्हणून काम करत होते. अहिल्याबाईना पाच भाऊ होते आणि त्यांचे शिक्षण त्याकाळी घरीच झाले. त्यांना आई-वडिलांकडून घरातच चांगले संस्कार प्राप्त झाले. औपचारिक शिक्षण कमी प्रमाणात मिळाले तरी घरातले वातावरण ज्ञान आणि संस्कृतीचे शिक्षण देणारे होते.

<u>अहिल्याबाईंच्या जीवनाला कलाटणी देणारा मंदिरातला तो दिवस</u> - मराठा पहिले बाजीराव पेशवे यांच्या सैन्यातील सेनापती आणि माळव्याचे शासक मल्हारराव होळकर पुण्याला जाताना चांडी येथे थांबले तेथे त्यांनी ७-८ वर्षाची चिमुकली तेजस्वी अहिल्याबाईंना पाहिले. लगेच मुलाच्या धार्मिकतेने आणि चारित्र्याने प्रभावित होऊन मल्हारने स्वतःच्या मुलाला तिच्याशी लग्नाची मागणी घातली. अशाप्रकारे १७३३ मध्ये त्यांचा विवाह झाला. पुढे १७४५ मध्ये त्यांना एक मुलगा मालोजी आणि एक मुलगी मुक्ताबाई अशी अपत्ये झाली.

परंतु नियतीच्या खेळाचे डाव हे विधात्याने आधीच रचलेले असतात. अवघे विश्व हे स्वतःच्या वेळापत्रकानुसार चालते. त्याचेच एक अपघाती निधन म्हणजे तोफेच्या गोळ्याने झालेले खंडोजींचे निधन, अपघाती मृत्यूच ! युद्धभूमीच्या विविध आघाड्यांवर नशिबाने मल्हारजींना सातत्याने साथ दिली, पण या अनपेक्षित दुर्घटनेने त्यांच्याही आकांक्षा क्षणभर थांबल्या. २४ मार्च १७५४ रोजी कुंभारच्या वेढादरम्यान तोफेने खंडोजींचे निधन झाले, त्यामुळे देवी ही निराशा आणि दुःखात बुडाली, सती जाण्याच्या प्रथेचा विचार करत होती. तथापि देवासमान असलेल्या सासऱ्यांनी तिला या मार्गापासून दूर नेले, त्याऐवजी प्रशासकीय आणि लष्करी बाबींमध्ये मार्गदर्शन केले. तिच्यातील क्षमता तिला नव्याने माहित उलगडल्या, एक नवोन्मुख व्यक्तिमत्त्व उदयास आले. त्याकाळात हे सर्व... म्हणजे काळाच्या कथेला, प्रथेला नव्याने आकार देणे होय.

ऐतिहासिक परिघात एका सक्षम आर्य महिलेच्या नेतृत्वाखालील आर्य शासनाचे एक उल्लेखनीय, महत्त्वाचे संक्रमण दर्शविणारे उदाहरण म्हणजे अहिल्याबाई होय. पुरुषप्रधान समाजात नेतृत्व स्विकारत कठीण कामे पेलताना तिने १८ व्या शतकात माळवा प्रदेश आणि होळकर राज्याच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय कार्य केले... त्याची माहिती आपण सविस्तरपणे टप्प्याने पाहूया....

उरी बाळगूनी स्वप्न मराठी सत्तेचे,
बांधुनि तोरण हजारो गड, किल्ले, मंदिर
घडविले जिने नव्या हिंदुस्थानाला
एकच होती ती राणी
'अहिल्यादेवी होळकर !'



सुमारे ३०० वर्षांपूर्वी जेव्हा लोक मुलीला शिकवण्यात अर्थ नाही असे मानत, तेव्हा तिच्या वडिलांना ती मुलापेक्षा कमी नाही हे आधीच ज्ञात होते. त्यामुळे ती



शिक्षणाने केवळ हुशारच नव्हे तर सहानुभूतीशीलही बनली. खंडोजीराव गेल्यानंतर १७५४ पासून मल्हारराव यांनी अहिल्याबाईंना मुत्सद्दी वादविवाद, राज्याच्या आर्थिक बाबी, मुघल साम्राज्य आणि पेशवे यांच्या इतर समस्यांमध्ये सक्रियपणे सहभागी करून घेतले. त्यांच्या सासू गौतमाबाई होळकर यांनी अहिल्याबाईंना योग्य मूल्ये पाळण्यास शिकवले. १७५९ मध्ये देवींना खाजगी जमीन अनुदान दिले.

अहिल्याबाई होळकर एक महान व्यक्तिमत्व होत्या. त्या एक उत्कृष्ट शासक, धर्मप्रेमी आणि समाजसुधारक आपल्या प्रामाणिक विचार व त्या कार्यांनी बनत गेल्या. त्यांनी धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात वैविध्यपूर्ण काम केले. त्यांच्या विस्तृत कार्याची माहिती-

आदर्श राज्यकारभार -:

अहिल्यादेवींनी होळकर राज्याची व्यवस्था चांगल्याप्रकारे सांभाळली. राज्यविकास व लोकांचा उत्कर्ष यावर आपले लक्ष केंद्रित करून जनतेला न्याय दिला. होळकर कुटुंब त्यांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक खर्चासाठी सार्वजनिक रोखरकमेचा वापर टाळत असे. अहिल्याबाईंना त्यावेळी अंदाजे सोळा कोटी रुपये वैयक्तिक निधी वारशाने मिळाले होते. त्यांनी वैयक्तिक संसाधनांमधून धर्मादाय संस्थांना दान केले. होळकर सरकारने 'देवस्थान अधिकारी' नियुक्त केला होता, तो दूरवर प्रवास करत प्रत्येक ठिकाणची माहिती गोळा करीत असे. राज्यकारभाराच्या बऱ्याचशा जबाबदाऱ्या अहिल्याबाई आणि त्यांचे सासरे पाहत. सासऱ्यांच्या निधनानंतर राज्यात होणाऱ्या चोऱ्या, दरोडे यांना अटकाव करण्याचे काम त्यांनी जातीने लक्ष देऊन केले. आज सुस्थितीत आपण ज्या नागरी कायद्याच्या वल्गना करतो, त्यावेळी देवींनी सर्वांसाठी समान कायदा ही भूमिका त्याकाळापासूनच घेतली. यावरून त्यांची काळाच्या पुढे असलेली दूरदृष्टी दिसून येते.

पेशव्यांनी तिला होळकर घराण्याची उत्तराधिकारी म्हणून मान्यता दिली. समाजाच्या कल्याणासाठी अनेक प्रकल्प हाती घेऊन समाजातील न्याय, आपुलकी यांची पोकळी भरून काढली.



धार्मिक कार्य :-



अहिल्यादेवी या मुळात धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांनी मुघल आक्रमकांनी संहारित केलेले घाट, अनेक मंदिरे, धर्मशाळा बांधल्या. तीर्थक्षेत्रांची स्वच्छता आणि विकासासाठी विशेष प्रयत्न केले. काशी विश्वनाथ मंदिर, सोमेश्वर मंदिर, रामेश्वर, अयोध्या, बद्रीनाथ, द्वारका इ. ठिकाणी मंदिरे व घाट पुर्ननिर्मित केले. महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. अकोले, वीरगाव, अमरकंटक, उज्जैन, ओझर, इंदूर, ओंकारेश्वर येथील मंदिरे व लोकांसाठी धर्मशाळा बांधल्या.

मंदिरे, तीर्थक्षेत्रे, घाट, देणगया आणि वार्षिक पूजेसाठी गंगेच्या पाण्याचा पुरवठा करण्याचे श्रेय तिला जाते. धर्म आपल्यासाठी साक्षात्कार आहे, म्हणून तो 'तर्कसंगत' आणि 'राष्ट्रीय' देखील असला पाहिजे. मशिदी आणि मौलानांना दिलेल्या कार्यक्षम देणग्यांचे कोटेकोर पालन, संत-फकीरांना दिलेले दान यातून धर्माची 'निरपेक्षता' कायमची दिसून येते.

सामाजिक कार्य :-

लोकउत्कर्ष, समाजविकास ज्यांच्या ध्यानी-मनी।
सामाजिक कार्याचा वसा घेतला ज्यांनी॥
समाजव्रतीचा ठसा उमटविला लोकजनी।
होणार नाही अशी सेवाव्रती....
कोणी अहिल्यावानी॥

अहिल्यादेवी एक महान समाजसुधारक, उत्कृष्ट शासक, धर्मप्रेमी होत्या. त्यांनी राज्यकारभार उत्तमपणे सांभाळत धार्मिक तसेच सामाजिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण कार्य केले. याची सुरूवातच त्यांनी आपल्याला मिळालेल्या वारसा मालमत्तेतून केली. समाजातील गरीब व दुर्बलांना मदत करत त्यांनी शिक्षण आणि आरोग्य-सुविधांवर

लक्ष केंद्रित केले. महिलांच्या शिक्षणाचा उपयोग स्वानुभवावरूनच त्यांना आला. मुली, महिला शिक्षित झाल्या पाहिजेत यासाठी त्यांनी महिलांच्या शिक्षणासाठीही काम केले. समाजातील व्यापारी असो वा शेतकरी असोत त्यांनी कपड्यांचे उत्पादन केले, व्यापार वाढवला. शेतकऱ्यांनी शांततेत, दबावरहित वातावरणात शेती केली. कोणतेही न्यायदानाचे प्रकरण त्या कडकपणे हाताळत. दूरदूरपर्यंत रस्त्यांच्या कडेला, दाट वृक्ष त्यांनी लावले. वाटसरूंसाठी मधेमधे विहिरी व विश्रांती-गृहांची सोय केली. जे गरीब, बेघर, अनाथ होते, या सर्वांना त्यांच्या गरजेनुसार सर्वकाही मिळत होते.

समाजकार्याचे उत्तम उदाहरण म्हणजे भिल्ल लोकांची त्यांनी बदललेली चांगली मानसिकता. पूर्वीच्या काही काळापासून भिल्ल आदिवासी लोक पहाडांतून सामानाची ने-आण करताना लूटमार करीत असत. अहिल्यादेवींनी त्या भिल्ल लोकांना प्रामाणिक पणे शेती करण्याची संधी दिली, त्या लूटमारीतून त्यांना मुक्त केले. त्यांना जीवनाचा आशावादी दृष्टीकोन दिला. याहून थोर काय ते....



प्रगतशील समाजाचे, शहराचे दुसरे उदाहरण म्हणजे आताचे 'इंदौर' इंदूर शहर असेही नाव असलेले हे शहर. तेथे त्यांनी उद्योग आणि विद्यापीठे उभारली. म्हणून विद्यापीठ आणि विमानतळाला त्यांचे नाव देण्यात आले. केवळ स्वतःच्या राज्याचा उद्धार नव्हे तर वाराणसी, चोळ, बनारस इ. शहरातील मंदिरांची दुरुस्ती उपक्रमांचे श्रेय त्यांना जाते.

कला, साहित्य आणि स्थापत्य-शास्त्राच्या त्यांच्या पाठिंब्याने सांस्कृतिक भूमी समृद्ध झाली. महेश्वर (गाव) व्यापार आणि उद्योगाच्या दृष्टीने भरभराटीचे आले. महेश्वरी साड्यांची परंपरा यांमुळे उदयास आली. या सर्व सुधारणांसह हातमाग उद्योग, कलाकृती यांमुळे व्यावसायिक नवी क्रांती उदयास आली.



'स्त्री ही स्त्रीची शत्रू असते...' ही सैद्धांतिक म्हण खोडून काढण्यासाठी महिलांच्या हक्कापायी त्या प्रगतशील होत्या. महिलांना शिक्षणापायी बंदी घालणारे नियम प्रचलित असूनही १८ व्या शतकातील समाजात स्त्री. शिक्षणाची सुरुवात करणे... म्हणजेच किती ती निष्ठा, ती प्रेरणा, सकारात्मक जिद्द, तळमळ .... महानता ही कार्याची. यावरूनच आपणास समजते की, त्यांची ही कारकीर्द पूर्णत: व्यवहारिक, दूरदृष्टीकोन समर्पक, प्रजेचा जीवनमान उंचावणारी होती.

राज्यास कधीतरी आक्रमणकर्त्यांनी वेढा घातला तरी, अहिल्यादेवींनी आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी उल्लेखनीय धैर्य दाखवले. युद्धात आपल्या सैनिकांचे नेतृत्व करून, तिने शत्रूला मागे टाकले स्वत:चे प्राण धोक्यात घालून समाजाचे, राज्याचे चांगले करणारी ही वीरांगना...! जशी कोमल तशी कठोरही....! एकीकडे रणांगणातील ही वीरांगना जशी कठोर तशी विधवांच्या बाबतीत ही कोमल माता, कारण तिने विधवांना त्यांच्या पतीची संपत्ती टिकवून ठेवण्यास मदत केली. त्यांनाही मूल दत्तक घेणे याचा अधिकार दिला. स्वत:च्या मुलालाही प्रायोजित करून योग्य तेव्हा त्यालाही कपडे व दागिने दिले.


महान कार्यानेच घडविले हे थोर व्यक्तिमत्त्व अहिल्याचे.....

थोर व्यक्तिमत्त्व होते म्हणून समाजोपयोगी महान कार्ये अहिल्यादेवींनी केली किंवा या महान कार्यानेच त्या थोर विभूती बनल्या. एकूणत: मनात शुद्धी, प्रामाणिक विचार असतील तर ती व्यक्ती थोर, महानच असते. याचा प्रत्यय अहिल्याबाईंच्या जीवन-पटलावरून दिसते. म्हणूनच मध्य भारताच्या एक कवी आहेत ते म्हणतात... "तिने तिचे शरीर, वाणी आणि मन शुद्ध केले आहे. तिचा मुख्य आनंद 'ऐकणे आणि जाणून घेणे' असाच होता. 'सर्वांना आनंद' ही तिची इच्छा होती आणि ती प्रार्थना करत होती. तिची बुद्धी, नियम या गोष्टी स्वत:च्या शिस्तीने, नियंत्रित कृतीत मग्न राहत त्या नकळतच स्वत:ला सक्षम बनवत होत्या.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

अहिल्याबाई होळकर ज्यांना अनेकदा तत्वज्ञानी राणी म्हणून संबोधले जात असे त्यांची तुलना डेन्मार्क, इंग्लड, रशिया या विदेशातील ऐतिहासिक दिग्गजांशी वारंवार केली जात असे त्यांच्या शौर्याची, महानतेची दखल घेत भारतीय प्रजासत्ताकाने २५ ऑगस्ट १९९६ रोजी एक स्मारक टपाल तिकिट जारी केले. इंदूर सरकारने वार्षिक पुरस्कार सुरु केले असे एक नाही तर अनेक ठिकाणांना त्यांच्या विविध नावांनी संबोधिले जाऊ लागले. माळवा आणि महाराष्ट्रात एक संत व्यक्तिमत्व म्हणून त्यांची चिरस्थायी प्रतिष्ठा, योद्धा राणी म्हणून एक कर्मयोगी, राजयोगी असे आदरणीय स्थान दिले जात असे त्यांची लोकांप्रती असलेली निस्सीम श्रद्धा, काळजी, प्रशासकीय बुद्धिमत्ता आणि देशभरात त्यांनी उभारलेले स्मारक येणाऱ्या पिढया कृतज्ञतेने लक्षात ठेवतील का ?

भविष्यातील राज्यकर्त्यांवर ,प्रशासनावर तिने सोडलेली छाप आपण, आपल्या राज्यातल्या तरुण युवा वर्गाने डोक्यात, मनात ठासून घ्यायला पाहिजे त्यांनी दिलेला हा वारसा फक्त जयंत्या, पुण्यतिथींच्या मिरवणुकीपुरते मर्यादित न राहता त्यांच्या आदर्शांची फुले वेचून त्यांचा सुगंध सर्वांच्या भल्याकरिता चौफेर पसरवून द्यावे असे वाटते. तिच्या शब्दांचा आदर सर्वानाच होता, म्हणूनच संपूर्ण भारत त्यांच्या आश्रयाखाली शांती आणि प्रेमात राहत होता. तिचे प्रादेशिक राज्य मर्यादित असले तरीही लोकांच्या हृदयावर तिचे आध्यात्मिक राज्य अमर्यादित होते. अशा या महान स्त्री-विभूतीने १७९५ च्या श्रावणाच्या अंधारात समाधानाने देह सोडले. वैयक्तिक आनंदमार्गात कितीही वेदना आल्या तरी दुसऱ्यांच्या जीवनात तिने आनंद आणला. अशी ही .....



होळकरांची सून होती बहुगुणी।
शिक्षणाची ओढ होती लहानपणी।
गरज ओळखूनी सुखावले सर्व जनी
अशी जाहली दूरदृष्टीची ही मर्दानी..
धन्य धन्य ती अहिल्यादेवी राणी.

धन्यवाद!

P.T.O.



आकाश दिलीप गोवरे
मु.पो. साखरपा गोवरेवाडी
तालुका - संगमेश्वर
जिल्हा - रत्नागिरी
पिन कोड - ४७५८०२
मो.नं - ७८८०८०९४३ / ७०३८७९८७८१



अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य.

'रणशिंगी तू पुण्यश्लोकी, जपलास वारसा शिवशाहीचा!
उतरून रणांगणी दाखवलीस, शत्रूस ताकत तुझ्या निश्चयाचा!!'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. जो समाज स्वतःचा इतिहास विसरतो, तो समाज इतिहास निर्माण करू शकत नाही. तर तो समाज इतिहास जमा होतो. अहिल्यादेवींचा लोककल्याणकारी इतिहास इथे जमा करण्याचा इतिहास ही यांच मातीमध्ये घडत आला. एका हातामध्ये शस्त्र व दुसऱ्या हातामध्ये शास्त्र असणाऱ्या अहिल्यादेवींच्या हातामध्ये केवळ पिंड देवून त्यांना फक्त धार्मिकतेच्या चौकटीमध्ये बंदिस्त करून टाकल. हिमालयापेक्षा ही जास्त उंचीच शौर्य आणि पराक्रम होता. हळूहळू त्याला सह्याद्री पवढा करत करत आता पखाड्या डेकडी पवढा करून सारा इतिहास गायब झाला.

त्यागालाही लाज वाटावी इतक महान त्याग,
तुझ्या त्यागाने जागा झाला, आम्हा लेकरांचा स्वाभिमान!

पुराणातल्या अहिल्यादेवींना ऋषीने शाप दिला. तिचा दगड झाला व प्रभू श्रीरामचंद्रांच्या पायांच्या स्पर्शाने तिचा उद्धार झाला की नाही मला माहित नाही पण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या कार्याच्या पदस्पर्शाने शंभासहित सगळ्या देवांचा उद्धार झाला हे मात्र आम्हाला विसरून चालणार नाही. ज्या प्रमाणे 'छत्रपती शिवाजी महाराज' हे पुरुषांमधले सर्वोत्तम राजे होते त्याच प्रमाणे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' स्त्रियांमधल्या सर्वोत्कृष्ट राज्यकर्त्या होत्या. ही गोष्ट आम्हाला पहिल्यांदा लक्षात घ्यावी लागेल. मग कशी होती. अहिल्यादेवींची परिस्थिती कशा घडल्या अहिल्यादेवी.



ज्यावेळी या सृष्टीमध्ये अन्याय अत्याचाराने अर्धीमाचा जन्म होईल त्या त्यावेळी या सगळ्यांना संपवणारी एक व्यक्ती या मातीमध्ये जन्माला येईल. आणि तेच घडल ३१ मे १७२५ साली अहमदनगर जिल्हा मधल्या चौंडी या गावी मराठी वतनदार माणकोजी शिंदे व सुशीलाबाई यांच्या छोटी धनगर कुटूंबात एक 'कन्या रत्न' जन्माला आली. ज्या कन्येच्या तेज्यान साक्षात सुर्य ही लाजला. या कन्येच नाव 'अहिल्या' अस ठेवण्यात आलं. हि तिच अहिल्या जिने सत्याचा मंत्र वापरून विकासाचा मंत्र या हिंदूस्तांच्या मातीमध्ये शाबवला. हि तिच अहिल्या जिने 'चुल' व 'मुल' या समाजव्यवस्थेच्या चौकटीला झुकारून देवून एका हातामध्ये शस्त्र व दुसऱ्या हातामध्ये शास्त्र घेवून तब्बल एकोणतीस वर्ष आदर्श राज्यकारभार केला.

अहिल्यादेवी होळकर यांचे वडील माणकोजी शिंदे पराक्रमी लढाऊ होतेच पण सोबत राजकारणी देखील होते. आणि म्हणूनच लहानपणापासून कुटूंबातूनच अहिल्यादेवींना तलवार चालवणे, घोडा चालवणे, पोहणे, भाला फेक यांसारख्या सगळ्या कलांच शिक्षण व प्रशिक्षण दिल जात होत. हिच सुरवात होती, अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्वाच्या विकासाची. १७३३ साली वयाच्या आठव्या वर्षी महापराक्रमी सरकार सुभेदार मल्हारराव होळकर यांचे सुपुत्र खंडेराव होळकर यांच्या सोबत अहिल्यादेवींचा विवाह संपन्न झाला व मल्हारराव होळकर यांच्या आशिर्वादाने व मार्गदर्शनाने अहिल्यादेवी होळकरांची वाटचाल सुस्त सुरु झाली. खर तर अहिल्यादेवी होळकरांच्या इतिहासामध्ये सर्वात महत्वाच योगदान जर कोणाच असेल तर ते मल्हारराव होळकरांच आहे. कारण मल्हारराव होळकर म्हणजे 'पराक्रम', मल्हारराव होळकर म्हणजे 'सामर्थ्य', मल्हारराव होळकर म्हणजे 'विश्वास', मल्हारराव होळकर म्हणजे अहिल्यादेवींच्या पाठिवर आयुष्यभर पडत राहीलेली कौतुकाची थाप.



मल्हारराव होळकर यांनी आपल्या आठ वर्षाच्या सुनेला सांगितल युध्द कस लढाव, तलवार कशी चालवावी. तोफा. बारदाना. भाला. समशेर हे सगळ कस चालवाव. युध्द रणांगणावर जेव्हा सुरु होते. तोफांचे भयानक आवाज होतात तेव्हा निधड्या छातीने त्याला कस सामोरे जावं हे मल्हारराव होळकरांनी अहिल्यादेवी यांना शिकवल. अहिल्यादेवी यांचे पती मल्हारराव होळकरांन प्रमाणेच पराक्रमी होते. स्वत:ची पत्नी अहिल्या धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र यात आपल्यापेक्षा हुशार आहे. याचा खंडेरावांना विलक्षण अभिमान होता. मी युद्धामध्ये तरबेज आहे. पण धर्मशास्त्र मला कळत नाही. अस अभिमानाने ते अहिल्यादेवींच कौतुक करायचे. १७५४ साली. कुंभेरच्या लढाईमध्ये पराक्रम गाजवत असताना खंडेरावाला वीरमरण आले. नवरा मेल्यानंतर स्त्री ने सती जाव अशी अमानुस प्रथा त्यावेळी समाजात अस्थित्वात होती. पण मल्हारराव होळकरांच्या सांगण्यावरुन अहिल्यादेवी त्यावेळी सती गेल्या नाहीत. व स्त्रियांवर अन्याय करणारी माणूस सतीप्रथा लयाडण्यात आली. याच काम देखील अहिल्यादेवी होळकरांनी केल होत.

कश्मीरच्या नंदनवनापासून ते मलयगीरीच्या चंदनवनापर्यंत आणि काटेवाडयापासून कलकत्तेपर्यंत अखंड भारतामध्ये अहिल्यादेवी होळकरांनी 'पाचहजारांपेक्षा 'जास्त मंदिरे बांधली. मंदिराच्या जिर्णोध्दार केला. घाट बांधले, धर्मशाळा बांधल्या कित्येक अन्नछत्र उभी केली. अहिल्यादेवींच्या हयातीतच नवरा खंडेराव यांच निधन झाल. त्यांच्या सोबतच सासरे, मुलगा व जावई यांच देखील निधन झाले होते. राज्य करणारा असा कर्ता पुरुष घरामध्ये उरला नाही. अशावेळी एकट्या अहिल्यादेवी खंबीरपणे राज्य करण्याचा निर्णय केला. पण त्याच संधीचा फायदा घेवून गंगोबा चंद्रचुड नावाच्या दिमानाने



राघोबा पेशव्यांना पत्र लिहिल. त्या पत्रात त्यांनी अस लिहील गेलेल की होळकरांच्या राज्याचा कोणी वारस जीवंत राहिला नाही. बाई अबला आहे, एकटी आहे. आक्रमण करून तुझे प्रचंड वैभव असणारे राज्य बळकावून घे. आणि आल्या संधीचा फायदा घेण्यासाठी तात्काळ तीस हजारांची फौज घेवून राघोबा पेशवा होळकरांच्या राज्यांवर चालुन आला.

अहिल्यादेवींची दुरदृष्टी पहा. त्यांनी अगोदरच आपल्या राज्यातल्या स्त्रियांना शस्त्र, अस्त्र चालवायला शिकवलीत. लढाईच प्रशिक्षण दिल आणि पाच हजार सैनिक स्त्रियांची एक नवीन फौज तयार करून ठेवली होती. अखंड हिंदुस्तानमध्ये स्त्रियांची स्वतंत्र फौज तयार करणारी पहिली महाराणी म्हणजेच "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर." होळकरांच्या राज्यावर चालुन आलेल्या राघोबा पेशव्याला अहिल्यादेवींनी पत्र लिहिल की "मी एक अबला बाई आहे. अस समजु नको खांद्यावर भाला टाकुन अजी राहिल. त्यावेळी प्रचंड जोड जाईल, माझे राज्य हिरावून घेण्यासाठी आपण सैन्य घेवून आलात, पण तुमची ही इच्छा मी कधीच पूर्ण होवू देणार नाही. लवकरच आपली भेट रणांगणात होईल. माझ्या आदिपत्याखाली तयार स्त्रियांची फौज तुमच्याशी युध्द करेल जर मी हारले, तर कोणीही नाव ठेवणार नाही. पण जर तुम्ही हरलात तर एका महिलेकडुन हरलात म्हणुन तुम्हाला जगात तोंड दाखवायलाही जागा राहणार नाही." या गोष्टीचा विचार करून मगच लढायला या हे पत्र ज्यावेळी राघोबा पेशव्यांनी वाचल अहिल्यादेवींचे आक्रमक शब्द पेकुन राघोबा निम्मा गार पडला त्याने लढायचा विचार सोडुन दिला व अहिल्यादेवी होळकरांना शरण आला. आपली तीस हजारांची फौज घेवून तसाच माघारी निघुन गेला.



शत्रुला रणात पराभूत करण्यापेक्षाही
पहिल्यांदा मनात पराभूत करायच असत कारण मनात
पराभूत झालेला शत्रू रणात उभाच राहू शकत नाही.
हे मानशास्त्र अहिल्यादेवींना अगवत होते. अहिल्यादेवी
होळकरांच्या सामाजिक कार्याची दखल देखील संपूर्ण
भारतामध्ये घेतली जाते.

न्यायदानाची पुरस्कर्ती तू, राग तुला अन्यायाचा!
अहिल्यादेवी तू, अभिमान आम्हाला तुझ्या शौर्याचा.



राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धा

"घोडगंगेचे निर्मळ पाणी,
गाती पाखरे गोजीरवाणी,
माझ्या निबंधाची सुरुवात,
करते मी याच क्षणी....."

"धर्म, करुणा आणि कर्तृत्वाचे प्रतीक म्हणजे राजमाता, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर!"

३०० व्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य निबंध स्पर्धेत माझा निबंधाचा विषय आहे, पुण्यश्लोक अहिल्याबाई: आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.

असं म्हणतात, "दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती" कारण, अहिल्याबाई म्हणजे दिव्यतेची आणि नेतृत्वाची जिवंत मूर्ती! राजमाता, शाक्तमाता, आदर्श कार्यकर्त्या, एक स्त्रीशक्ती अशी कितीतरी विशेषणे लावावीत असे एक धाडसी, करारी व्यक्तीमत्व म्हणजे अहिल्यादेवी. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी चौंडी, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथे झाला.

"मधुर होती जिची वाणी,
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी,
गाजवल्या जिने दाही दिशा,
तिच्या उत्तुंग कार्याला,
खरंच सीमा नाही....."

ज्या काळात महिलांना घराबाहेर पडण्याची देखील परवानगी नव्हती, त्या काळात वडील माणकोजी शिंदे व आई सुशीला बाई शिंदे यांनी अहिल्याबाईना शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली. आणि म्हणूनच त्या एक कर्तुत्ववान, बुद्धिमान व नेतृत्ववान राज्यकर्त्या होऊ शकल्या.

कारण, लहानपणापासून तलवार चालविणे, युद्ध लढणे, भाला फेकणे, घोडेस्वारी या गोष्टींचे शिक्षण व प्रशिक्षण दिले जात होते.



तिने सत्तेचा मंत्र व विकासाचं तंत्र या हिंदुस्थानच्या मातीत रुजविलं. तसेच चुल आणि मूल या समाजव्यवस्थेला झुगारून एका हातात शस्त्र व दुसऱ्या हातात शास्त्र घेऊन आदर्श राज्यकारभार केला.

वयाच्या आठव्या वर्षी शूर, पराक्रमी सरदार मल्हारराव होळकरांचे पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी विवाह झाला. सासरी देखील सासरे मल्हारराव होळकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे व्यक्तीमत्व घडत होते. कारण मल्हाररावांनी आपल्या आठ वर्षाच्या सुनेला युद्ध कसं लढायचं, युद्ध रणांगणात शत्रूला सामोरे कसं जायचं हे शिकवलं. आणि त्याच मार्गदर्शनातून तयार होवून अहिल्याबाईंनी तब्बल अठ्ठावीस वर्षे राज्यकारभार केला. अनेक चांगले निर्णय घेवून राज्याची भरभराट केली. बाई काय राज्य चालवणार ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी अगदी खोडूनच काढली. कारण, सतराव्या शतकात स्त्रीयांची स्थिती पाहता, त्या काळातील एक आदिशक्ती म्हणजे अहिल्याबाई होळकर.

'राज्या असंख्य झाल्या
या जगात,
पण, पुण्यश्लोक कोणीही नाही.
गर्व जिचा आहे या मराठी हृदयाला
एकच ती महाराणी,
अहिल्यादेवी होळकर झाली.....'

आज २१ व्या शतकात वावरताना विज्ञान व तंत्रज्ञानाने प्रत्येक क्षेत्रांत गरुडझेप घेतलेली दिसून येते. जग अतिशय जवळ आले आहे. सर्वत्र इंटरनेटचे जाळे पसरले आहे. परंतु आजही शूर वीरांचा, शूर महिलांचा इतिहास अभ्यासताना छाती गर्वाने फुलते, अंगावर शहारे येतात. व त्यांचे विचार, अनुभव, कार्य आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी ठरतात.



आधुनिक युगात प्रगतीच्या अनेक वाटा उपलब्ध झाल्या, सुख-सोई, सुविधा मिळाल्या परंतु त्यामुळे आधुनिक युगातील मानव मात्र निष्क्रिय झाला असे वाटते. आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांबरोबर, खांद्याला खांदा लावून काम करताना दिसते. समाजात आपल्याला स्त्रीया प्रत्येक क्षेत्रात नावलौकीक मिळविताना दिसतात. पण ते करत असताना कुठेतरी नीति, मूल्ये, संस्कार, यांचा अभाव दिसतो. शूर महिलांचा इतिहास अभ्यासताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे 'त्याग'. कारण म्हणावेसे वाटते,

"त्यागाला लाज वाटावी,
इतका महान त्याग तुझा,
तुझ्या त्यागाने जागा झाला,
आम्हां लेकरांचा स्वाभिमान....."

परंतु आज या गोष्टीबाबत कमतरता दिसून येते. कारण आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात त्याग, सहनशीलता लोप पावत असल्याचे दिसून येते. प्रत्येकात अहंकार, गर्व, मी-पणा गच्च भरल्याचे दिसते.

भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुषांना समान हक्क व अधिकार दिले आहेत. त्या जोरावर आज प्रत्येक क्षेत्रात महिला अगदी सक्षमपणे स्वतःची जबाबदारी पेलताना दिसते. हुशारी, बुद्धिमत्ता, धाडस, नेतृत्व या गुणांनी समृद्ध असलेली महिला समाजात आपले स्थान नक्कीच टिकवून आहे. परंतु, हे सर्व करताना महिलांना कमीपणा, अपमान या गोष्टी पचविण्यास अवघड जातात हे दिसते. कारण काय तर? सहनशीलतेचा अभाव. प्रत्येक जण आज मी खूप सर्वगुणसंपन्न आहे असे स्वतःला मानतो. त्यामुळे स्वतःमधील दोष कोणालाच दिसत नाही. मी दुसऱ्यापेक्षा



नक्कीच सर्वश्रेष्ठ आहे, असे वाटते. उपलब्ध सुविधा, वाढता इंटरनेटचा वापर, प्रगत तंत्रज्ञान यामुळे सर्व काही सहज उपलब्ध होते. पालकांची बदललेली मानसिकता, जन्मदरात घट यांमुळे सर्वच सुख मुलांच्या पायाशी लोळताना दिसतात.

परंतु, जर आपण स्वतंत्र भारताचा इतिहास अभ्यासला तर असे दिसते की, त्या सर्व शहिद शूर वीर पुरुषांनी व महिलांनी अतिशय कठोर परिश्रम घेवून, प्राणांची बाजी लावून, कुटुंबाची पर्वा न करता स्वतंत्र भारताची स्थापना केली व ते हुतात्मा झाले. त्यांनी पुढील जबाबदारी भारतातील नवतरुणांवर टाकली. व त्यांनी केलेल्या कार्याचा वेल गगनाला कसा जाईल अशी आशा बाळगली असेल. पुढील जबाबदारी पार पाडताना कदाचित अशाप्रकारे पुढील वाटचाल होईल असे त्यांना वाटले देखील नसेल. आज समाजात घडत असणाऱ्या घडामोडी, अन्याय, अत्याचार, छळ, दहशतवादी कारवाया, बालगुन्हेगारी, दंगल, मारामारी हे पाहताना मन अगदी सुन्न होते, अंगावर काटे येतात आणि डोळ्यासमोर उभा राहतो तो आपला इतिहास. इतिहासातील ते विविध प्रसंग, त्यातून काढलेले मार्ग, त्यांचा त्याग, बलिदान, सहनशीलता, श्रद्धा, विश्वास या सर्व गोष्टी. आणि मग मनात विचारांचे काहूर माजते. वाटते नक्कीच गरज आहे या शूर वीरांची, महाराण्यांच्या विचारांची या आधुनिक भारताला. गरज आहे त्यांच्या विचारांची, गुणांची या आधुनिक भारताच्या नेतृत्वाला.

अहिल्यादेवींनी स्वतःच्या मुलाला मृत्यूदंडाची शिक्षा दिली होती. चुकीला चूक म्हणणारा आपला सर्वोत्तम असा इतिहास आहे. आणि आज स्वतःची चूक मान्य करायला कोणी तयार नाही. उलट



आपले चूक हे बरोबर कसे आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न सर्वत्र होताना दिसतो. त्यासाठी मग अनेकवेळा आत्महत्या, खून, निर्घृण हत्या या गोष्टींचा उपयोग केलेला दिसून येतो. आणि मग वाटते, कसा दिशाहीन होत आहे हा समाज. कसे सुजाण, आदर्श नागरिक तयार होणार या समाजातून. काय देणार आहोत आपण पुढील पिढीला. आपल्या इतिहासाने आपल्याला दिले ते चांगले विचार, आचार, त्याग, प्रेरणादायी मार्गदर्शन आणि समाज पुढे येणाऱ्या पिढीसाठी काय पेरतं आहे. कारण जे पेराल तेच उगवेल.

शेवटी जाता जाता, एवढेच लिहावेसे वाटते की,

"स्वातंत्र्य रक्षिण्या अपुले,
ही वीर रणरागिनी झाली।
ही गोरगरिबांची मायमाऊली,
थोर अहिल्या जन्मा आली....."

"इतिहासातील पहिली महिला राज्यकर्ती
पुण्यश्लोक, राजमाता होवून गेली,
तुझ्या सानाने व त्यागाने अहिल्या,
तू इतिहासाच्या पानी झळकत राहिली.
आजच्या या शुभ जन्मदिनी या
स्त्रीशक्तीला त्रिवार मानाचा मुजरा !!!

नाव - श्रीम. भारती एकनाथ आल्हाट
(प्राथमिक उपशिक्षिका)
पत्ता - मु. वारुळवाडी, पो. नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे
मो. नं. - ९५५२४१४०४८

धन्यवाद

Page No.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर



* निबंध स्पर्धकाचे नाव- श्री. योगेश नथु शेवाळे (उपशिक्षक)
* पत्ता :- A wing, साईराज अपार्टमेंट, चांदवड
तळवाडे रोड, ता. चांदवड
जि. नाशिक
स्पर्धेचा गट - गट क्र. ४
२१ वर्षपुढील
(खुला गट)

मो. क्र. :- 8605536433
ई. मेल :- yogeshshewale8485@gmail.com



Date

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय भव्य 'निबंध स्पर्धा'

* निबंधाचा विषय *

अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य

"अहिल्याबाई : त्याग, समर्पण आणि कार्याचा आदर्श!"

काय सांगावे, काय बोलावे आणि काय लिहावे. जेथे लेखणीची शाई कमी पडेल आणि विचारशक्ती अपूरी पडेल, गरजल्या ज्या वाघीणीसारख्या, गोर-गरिबांची माय माऊली अशी आमच्या अहिल्याबाईंची दुरवर ख्याती. अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. अहिल्याबाईनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढंच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औदयोगिक धोरण आखले. एक कुशल राज्यकर्त्या म्हणून त्यांनी आपल्या कार्य व कर्तृत्वाच्या बळावर आपली राज्यव्यवस्था आदर्श बनवली व नावारूपाला आणली.

अहिल्याबाईनी केलेल्या आदर्श राज्यकारभाराची आधुनिक राजकीय नेते व सामान्य जनता यांना सातत्याने आठवण झाल्याशिवाय राहत नाही. अहिल्या-बाईंनी संस्थानाचा राज्यकारभार करत असतांना आपले कर्तव्य बजावून जनतेप्रती उत्तरदायीत्वाची भावना बाळगली. विशेषत: अहिल्याबाईंनी एका राज्याच्या प्रमुख राज्यकर्त्या म्हणून जी कार्ये केली, ती आजच्या लोकशाहीतील शासनासाठीही मार्गदर्शक ठरतील. अहिल्याबाईंनी राज्यकारभार करत असतांना रयतेप्रती आत्मियतेची भावना, जबाबदार राज्यकारभार कायद्याचे राज्य, निष्पक्ष न्यायव्यवस्था, उत्कृष्ट प्रशासन, धाडसी निर्णयक्षमता, सामान्य व दुर्बलांना न्याय अशा स्वरूपाची कल्याणकारी कार्ये केली. कतृत्वाचा, चारित्र्याचा आणि नेतृत्वाचा आदर्श ज्या श्रेष्ठ महिलेकडून घ्यावा ती श्रेष्ठ महिला म्हणजे अर्थात अहिल्याबाई होळकर होय.



Page No.
Date

महाराष्ट्रात ठिकठिकाणी अहिल्याबाईंच्या खुणा आहेत. अहिल्याबाईंचे कार्य वेगवेगळ्या रूपात उभे आहे. औदार्याचे बीज पेरण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केले. महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय जीवनावर अहिल्याबाईंचा फार मोठा ठसा उमटलेला दिसतो. आज २८० वर्षानंतरही अहिल्याबाईंचे नाव गर्वाने घेतले जाते हेच त्यांच्या कर्तृत्वाचे फार मोठे गमक आहे. अहिल्याबाई होळकर यांना लोकमाता, पुण्यश्लोक, देवी, गंगाजळ, निर्मळ या सगळ्या पदव्या लोकांनी अर्पण केल्या होत्या आणि आजही या पदव्या लोकांच्या अंतर्मनात टिकून आहेत. मातीवर, देशावर निष्ठा, बाणेदार वृत्ती, साधी राहणी, उच्च चारित्र्य हे त्यांचे विशेष गुण होते.

अहिल्याबाई कर्मयोग्याप्रमाणे जीवन जगल्या. भल्याभल्यांना लाभली नाही अशी दूरदृष्टी त्यांना लाभली. अहिल्याबाईंचे विचार आजही समाजाला मार्गदर्शक ठरतील असेच आहेत. अहिल्याबाई आपल्या अनेक सद्गुणांनी अखिल मानवजातीस भूषणावह आहे. अहिल्याबाईंची धर्मशीलता इतकी उदात्त होती की, धर्माच्या आणि नीतिच्या प्रत्येक बाबतीत त्यांनी आपले नाव अजरामर करून ठेवले. इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर यांना भारताच्या "कॅथरीन द ग्रेट" असे म्हटले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने म्हटले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल. अहिल्यादेवी होळकर हया एक खरोखरच विस्तृत राजकीय दृश्यपटलावरील एक सुक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या. सन १७७२ मध्ये पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी ब्रिटिशांबरोबर हातमिळवणी करण्याबाबत एक ताकीद दिली होती. अहिल्यादेवी पत्रात म्हणतात की ब्रिटिशांना कवटाळणे हे अस्वलास कवटाळण्याजोगे आहे." वाघासारखे इतर प्राणि हे शक्ति वा



Page No.
Date

युक्तिने मारले जाऊ शकतात, परंतू अस्वल मारणे हे फारच कठीण असते." अस्वलाच्या चेहऱ्यावर वार केल्यासच ते मरते. एकदा अस्वलाच्या मजबूत पकडीत सापडल्यावर ते त्याच्या शिकारीस गुदगुल्या करून ठार मारते. असाच इंग्रजांचा मार्ग आहे हे बघता, त्यांच्यावर मात करणे कठीण आहे. आपल्या असामान्य कर्तृत्वाने अहिल्यादेवी आजतागायतच्या सर्वात कुशल व पुढील पिढीस उदाहरण देण्यायोग्य शासक होत्या. अहिल्यादेवींनी जनतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. अहिल्यादेवींनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. राज्यकारभारातील बारकावे व तत्व व्यावहारिक नीती नियम व सूत्रे, भौगोलिक स्थिती अहिल्याबाईंनी समजून घेतले.

:- अहिल्यादेवींचे सामाजिक कार्य:-

• शेती व शेतकरी उद्धाराची कार्य •

त्याकाळचा शेतकरी हा दुष्काळ व रोगराई या समस्यांनी पुरता मोडकळीस आलेला होता. त्यास नवसंजी-
-वनी देणे गरजेचे होते हे अहिल्यादेवींनी अचूक हेरले. शेतकरी म्हणजेच अन्नदाता सुखी तर आपली गोरगरीब जनताही सुखी हे अहिल्यादेवींना चांगल्या प्रकारे ठाऊक होते. सर्वप्रथम अहिल्यादेवींनी शेतकऱ्यांना इंग्रजांच्या जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी शेतीच्या व शेतकऱ्यांच्या संवर्धना-
-साठी तलाव व विहिरी बांधल्या. पशुसंवर्धनाचे महत्व शेतकऱ्यांना पटवून दिले व शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर पशुपालन करण्यास प्रवृत्त केले.

• शैक्षणिक कार्य •

अहिल्यादेवींची लोककल्याण कार्याची ख्याती त्या काळात दूरवर पसरलेली होती. ज्याप्रमाणे हिरा व रत्नाची पारख एखाद्या जवाहिऱ्यास असते तसे त्या काळी विद्येचे महत्व अहिल्याबाईंना ज्ञात होते. अहिल्यादेवींनी विद्वान विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण व जतन केली. अहिल्यादेवींनी विद्येचे महत्व समाजाला पटवून दिले.



Page No.
Date

• अंधश्रद्धा निर्मुलन •

त्या काळात सतीप्रथा हि समाजाला लागलेली एक किड होती. अहिल्यादेवींनी सती गेल्याने पाप किंवा पुण्य होते असा पुरातन ग्रंथांचा आधार व अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे समाजातील लोकांना पटवून दिले. अहिल्यादेवींच्या दूरदृष्टीमुळे व राजाराम मोहन रॉय यांच्या अथक प्रयत्नातून सतीची अनिष्ठ चाल सन १८२९ साली कायदयाने बंद करण्यात आली

"ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले निष्ठावान राजे होते, तसेच अहिल्यादेवी या स्त्रियांमधील कर्तृत्ववान राज्यकर्त्या होत्या. त्यांच्या निष्णात बुद्धीचे व गुणांचे अनेक उदाहरणे आजच्या पिढीला देता येऊ शकतात. अशा पुण्यश्लोक अहिल्यादेवी हया एक महान शासक होत्या."

"समाजकल्याणकारी, मातोश्री पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना आमचा मानाचा त्रिवार मुजरा."



पुण्यश्लोक अहिल्याबाई :-
आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.

मधुर होती जिची वाणी,
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी
गाजवल्या जिने दिशा-दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला खरच सीमा नाही.
सुखात नांदली आपली जनता,
कारण उत्तम शासन, तत्वज्ञानी राणी
होती अहिल्या राजमाता...

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर हे नाव ऐकताच आपल्या मनात एक उदात्त, दयाळू, न्यायप्रिय आणि दूरदर्शी नेतृत्वाची प्रतिमा उभी राहते. १८ व्या शतकातील या महान स्त्री शासिकेने आपल्या कार्यकुशलतेने, धार्मिकतेने आणि समाजसुधारणांच्या योगदानाने संपूर्ण भारतभर आपली छाप उमटवली. जेव्हा जेव्हा समाजामध्ये अन्याय, अत्याचार, अधर्म वाढतो तेव्हा त्याला संपवणारी शक्ती या जगात जन्म घेते आणि तेच घडलं ३१ मे १७२५ रोजी माणकोजी शिंदे आणि सुशीलाबाई यांच्या पोटी एक कन्या जन्माला आली. या कन्येच्या तेजाने साक्षात सुर्यही लाजला. याचं कन्येच नाव होतं अहिल्या.

ही तीच महिला जिने सत्तेचा मंत्र वापरून विकासाच तंत्र या हिंदुस्थानच्या मातीत राबविलं, ही तीच अहिल्या जिने 'चुल आणि मुल' समाजव्यवस्थेला बळी न पडता, एका हातामध्ये शस्त्र आणि दुसऱ्या हातामध्ये शास्त्र घेऊन तब्बल २९ वर्षे आदर्श राज्यकारभार केला. अहिल्याबाईंना लहानपणापासुनच तलवार चालविणे, भाला फेकणे, युद्ध लढणे या गोष्टींचे शिक्षण भेटले. हीच होती त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाची सुरुवात. वयाच्या आठव्या वर्षी शुर, पराक्रमी खंडेराव होळकरांशी त्यांचा विवाह झाला. त्यांचे सासरे म्हणजे मल्हारराव यांच्या आशिर्वादाने आणि मार्गदर्शनाने अहिल्याबाईंची वाटचाल सुरू झाली. १७५४ मध्ये कुंभेराच्या लढाईत त्यांच्या पतीला वीरमरण आले. त्याकाळात सती जाण्याची जी प्रथा होती, तिला बळी न पडता पुढे राज्यकारभार



चालवला. त्यानंतर त्यांच्या सासऱ्याचे, मुलाचे निधन, इतके आघात मनावर पचवून देखील तलवारीच्या पातीवर आणि मनगटाच्या जोरावर होळकरांच्या वंशजांचे हे राज्य उभे केले. रणांगणात ठामपणे युद्ध केले. शत्रू समोर उभ्या राहिल्या, अशा या राज्यकारभार सांभाळणाऱ्या तत्वज्ञानी, न्यायप्रिय, कुशल प्रशासक, महाराणी राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा इतिहास देशातल्या प्रत्येक स्त्रीला, मुलीला आणि प्रत्येक माणसाला प्रेरणा देणारा आहे.

"सत्ता नसूनही सत्ता गाजवली
नारीत्वाची नवी व्याख्या लिहिली,
घाट, तलाव, रस्ते बांधले, प्रजेचा केला विचार
त्याग, सेवा, शिस्त, न्याय, ठेवला सर्वांवर भार,
धर्म न फक्त कर्मात होता
बांधले देवालय, मनात दीप होता,
नारी झाली होती दीपज्योती
अहिल्याबाई होत्या त्या क्रांतीची पूर्ती

यावरून लक्षात येते की, अहिल्याबाई होळकर यांचे शासन हे न्याय, दया व प्रगतीचे होते. त्यांनी नुसता राज्यकारभार सांभाळला नाही, तर प्रत्येकाला अधिक योग्य दिशा दिली. त्यांच्या निर्णयप्रक्रियेत प्रजा व गरिबांचा नेहमीच विचार होत असे. त्यांनी स्त्रियांना धार्मिक विधींचा अधिकार दिला, स्त्रीयांवर होणारे गुलाम, अत्याचार मोडून काढले, विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले आणि स्त्रीशिक्षणावर भर दिला. त्यांनी संपूर्ण भारतभर मंदिरांचे जीर्णोद्धार केले. खरचं आधुनिक भारतासाठी अहिल्याबाईंचे नेतृत्व प्रेरणादायी आहे. अहिल्याबाईंचे प्रशासन हे आजही अभ्यासाचे व अनुकरणाचे उदाहरण आहे. पण का? आजचा भारत वेगळ्याच मार्गावर चाललाय. स्वतःच्या स्वार्थासाठी तो कुणाच्याही जीवावर उठू शकतो. नुसता पैशाच्या मागे धावणारा भारत बनलाय. ज्या भारताला ना



स्त्रियांची किंमत ना त्यांच्या सुरक्षेची. तरुणांना नाही, कामधंदा सग व्यसनात बुडालेले तरुण वाईट मार्गावर चाललेत. मुलींवर अन्याय, अत्याचार होतात, पण शेवटपर्यंत न्याय मेटत नाही. हा आजचा आधुनिक भारत. याचा अन् अहिल्याबाईंच्या काळातील भारत याची तुलनाच होवु शकत नाही. कारण त्या एक स्त्री असुनही त्यांचा भारत सुरक्षीत होता. कारण त्यांची धोरणे सहानुभुतीवर आधारित होती. त्यांनी आपल्या लोकांच्या तात्काळ गरजा भोळ्खुन रस्ते, विहिरी, मंदिरे आणि विश्रामगृहे बांधली. पुण्यश्लोक अहिल्याबाईंनी नेता हा जनतेचा रक्षक असतो या विश्वासाने राज्य केले. त्यांच्या कारकिर्दीत कर्तव्याची खोल भावना, न्यायाप्रती अढळ वचनबद्धता आणि परिवर्तनकारी शासन होते. म्हणुन त्यांचे नाव आज अजरामर आहे. आज प्रत्येकाने त्यांचे मुल्य विचारात घेवून जगले, वागले पाहिजे.

आजच्या राज्यकर्त्यांनी राज्यांवर राज्य चालवावं तर ते अहिल्यादेवींच्या विचारांनीच !! कारण या जगाच्या पाठीवर अहिल्यादेवी होळकर अशी ही एकमेव रणरागिनी आहे की जिने पाच हजार स्त्रीयांच्या हातामध्ये तलवार देऊन त्यांच्या मदतीने युद्ध केले. त्या सत्ताधारी होत्या पण त्यांना सत्तेची चढाओढ नव्हती, त्यापण राजकारणी होत्या पण त्यांचे राजकारण सिंहसनासाठी नव्हते. त्या त्यांच्या कामाशी निष्ठावंत होत्या पण त्या कोणासमोर नतमस्तक झाल्या नाही. त्यांनी अन्न, कर्म, धर्म आणि शिस्तिची मंगलध्वनी दाहीदिशात पसरवली. अशा राज्यकर्त्या, प्रामाणिक नेता होत्या अहिल्याबाई. खरचं या प्रेरणादायी नेतृत्व असणाऱ्या अहिल्याबाईंच्या विचारांची जर राज्यकारभार चालवला, तर भारत समृद्ध होईल. खरच शासन कस असावं हे अहिल्यादेवी होळकरांकडुन शिकावं.



"त्रिदशके सुशासन करुनी,
आदर्श दुनियेत ठेविसी
शांतीने राज्य चालवूनी,
रयतेस सुखी केलेसी
स्व-सुख सर्व त्यागुनी,
परोपकारा जीवन अर्पिसी
स्त्री-शक्तीचा थोर महिमा,
अवघ्या जगास दाविसी."

एक अभिमानी हिंदू म्हणुन, भारताचा समृद्ध आणि गौरवशाली वारसा प्रथम मुघलाच्या दडपशाहीखाली आणि नंतर उदासीन सरकारांनी नष्ट केला आहे हे पाहुन मला राग येतो. आणि वाटत की, आजच्या या भारताला प्रेरणादायी विचारांची गरज आहे. अहिल्याबाईचे अतुलनीय योगदान आहे, त्यांनी मंदिरांचे पुनरुज्जीवन केले. हे केवळ भक्तीचे कार्य नव्हते; ते नेतृत्वाचे धाडसी उद्घोषणा होते. त्यांनी नुसती पुनर्बांधणी केली नाही; त्यांनी एका संस्कृतीची ओळख पुन्हा निर्माण केली. या आधुनिक भारतासाठी या मूल्यांमध्ये रुजलेले नेतृत्व दडपशाहीला आव्हान देऊ शकते, कथांना आकार देऊ शकते आणि पिढ्यांना इतिहासात त्यांचे योग्य स्थान परत मिळवण्यासाठी प्रेरित करू शकते. म्हणुन पुण्यश्लोक अहिल्याबाई हे उद्देशपूर्ण आणि प्रामाणिक नेतृत्वाचे दीपस्तंभ आहे.

अहिल्याबाई होळकर यांची धोरणे सहानुभूतीवर आधारित होती. म्हणुन त्यांच नेतृत्व प्रभावशाली होत. या आधारांवर जर एखादा माणुस चालला तर तो समाजावर दीर्घकालीन प्रभाव निर्माण करू शकतो. त्याचा आधुनिक भारताला नक्कीच उपयोग होईन. आधुनिक भारताला अहिल्यादेवींप्रमाणे धर्माचे पालन आणि संस्कृतीचे जतन करुन मिळणारी भक्तीची शक्ती राष्ट्रकार्यासाठी वापरता येईल.



पुण्यश्लोक अहिल्याबाई केवळ अल्पकालीन उपायांवर लक्ष केंद्रित करत नव्हत्या ; त्यांच्या निर्णयांमधून एक दूरदर्शी दृष्टिकोन दिसून आला. हाच दूरदर्शी दृष्टिकोनाचा प्रेरणादायी विचार वापरून आधुनिक भारताने 'ऑपरेशन सिंदूर' नुकतेच पार पाडले. अहिल्याबाईंचा सत्तेपर्यंतचा प्रवास वैयक्तिक नुकसान आणि सामाजिक विरोधाने भरलेला होता. या आव्हानांना न जुमानता, त्यांनी अनुकंपा आणि शिस्तीचे संतुलन साधत प्रभावीपणे राज्य केले. अहिल्याबाईंनी त्यांच्या मंत्र्यांवर, सैनिकांवर आणि नागरिकांवर विश्वास ठेवला, सामायिक जबाबदारीची संस्कृती जोपासली. पारंपारिकपणे पुरुषांचे वर्चस्व असलेल्या भूमिकांमध्ये महिलांना पाऊल ठेवण्यासही त्यांनी प्रोत्साहित केले. आजच्या जगात इतरांना सक्षम बनवणे हे प्रेरणादायी नेतृत्वाचे एक वैशिष्ट्य आहे.

पुण्यश्लोक अहिल्याबाईंचे नेतृत्व खरचं आजही तितकेच प्रासंगिक आहे जितके ते शतकांपूर्वी होते. प्रामाणिकपणा आणि सामाजिक प्रभावावर वाढत्या प्रमाणात लक्ष केंद्रित करणाऱ्या जगात, त्यांची तत्त्वे विविध क्षेत्रातील व्यक्तींसाठी अमूल्य अंतर्दृष्टी देतात. म्हणुनच मी म्हणेन "ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते, तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी ही सर्व स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती." ज्यांच्या चांगल्या बुद्धीचे, चातुर्यपणाचे व गुणांचे उदाहरण आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी आहे. म्हणुनच अहिल्यादेवी होळकरांना जीवनकाळात तर सन्मान मिळालाच पण मृत्यूनंतरही लोकांच्या मनात अजरामर आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे, आधुनिक भारताला एक सक्षम आणि आदर्श नेतृत्व प्राप्त झाले आहे.

"शहाणपणाच्या सावलीत, राज्यकारभार केला
प्रजेच्या हितासाठी, साऱ्या आयुष्याचा वेल फुलवला."
"नारी असून दिला धीर, रणभूमीत न घाबरल्या



"काशी, गया, रामेश्वर, उभारले देवालय,
सेवा, भक्ती, दानाने, गाजवली ती आयुष्यदाय."
"तलाव, घाट, विहिरी - बांधल्या साऱ्या ठिकाणी,
प्रजेसाठी झिजल्या, पण स्वार्थाची छाया कुठेही नाही."
"नेतृत्व जे घडवते, शांततेत मार्ग दाखवते,
अहिल्याबाईंच्या पावलांवर चालणारे, तेजस्वी भारत घडवते."
"प्रेरणा घ्यावी जीवनातून, इतिहास गातो गौरवगाथा,
अहिल्याबाईंचे कर्तृत्व, अनमोल भारतमाता."
"नेतृत्व म्हणजे सेवा, त्यांच्याकडून शिका,
अहिल्याबाईंची गाथा, काव्यजात लाव्वगा."

अहिल्याबाई यांचे जीवन सहानुभूती, लवचिकता आणि एक चांगले जग निर्माण करण्याच्या दृष्टिकोनाने परिभाषित केलेल्या काव्यातील नेतृत्वाचा पुरावा आहे. त्यांचा वारसा आजच्या भारताला प्रेरणा देणारे, सक्षम करणारे आणि टिकून राहणारे ब्रँड तयार करण्यासाठी एक ब्लूप्रिंट देतो. त्यांचे जीवन म्हणजे एक प्रकाशस्तंभ आहे जो आधुनिक भारतातील नेतृत्वाला दिशा दाखवतो. त्यांचे कार्य, मूल्ये तरुण पिढीने आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आजच्या भारताला एक न्यायसंगत सहिष्णु आणि प्रगत राष्ट्र बनवू शकतो आणि आपण त्यांचा आदर्श आपण सर्वांनी आपल्या जीवनात उतरवावा, हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. शेवटी मी एवढेच म्हणेन -

असंख्य राज्ञ्या या जगतात होऊन गेल्या परंतु पुण्यश्लोक अहिल्याबाई यासारखी राणी होणे नाही. आजही गर्व निचा आहे मराठी माणसाला, आज अभिवादन करते त्यांना त्यांच्या पुण्यतिथीला....

जय हिंद, जय महाराष्ट्र !!



नाव - शिंदे रोशनी सुनिल
मो. नं :- ८०९०२६४३६६
वर्ग :- S.Y.BSC
निबंध विषय :- पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका



पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर- एक आदर्श स्त्री शासिका.

मधुर होती जिची वानी,
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी.....
गाजवल्या जिने दिशा दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला
खरच सीमा नाही.

अहिल्याबाई होळकर एक अतिशय दानशूर, कर्तत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती होत्या. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ मध्ये महाराष्ट्रातील चौंडी या गावी झाला. त्यांच्या वडीलांचे नाव माणकोजी शिंदे तर आईचे नाव सुशिलाबाई होते. त्या काळात महिलांना घराबाहेर पडण्याची देखील परवानगी नव्हती. त्या काळात अहिलाबाईंच्या वडिलांनी त्यांना शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली.

अहिल्याबाई एक उत्तम शासक तर होत्याच सोबतच त्या धार्मिक वृत्तीच्या देखील होत्या. त्या समान न्यायदान वर विश्वास ठेवायच्या. अहिल्याबाई एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राजकर्त्या होत्या. त्यांचे साहस आणि व्यक्तिमत्व पाहून मोठेमोठे राजे सुद्धा आश्चर्यचकित होत असत. त्यांनी आपल्या शासन काळात आपल्या साम्राज्याचा विस्तार केला लोककल्याणाची कामे केली. अहिल्याबाई महिलांच्या सशक्तीकरणासाठी नेहमी प्रयत्नशील असत. त्यांनी अनेक महिलांविरोधी प्रथांचा विरोध केला. स्त्रियांच्या हक्कासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांच्या मनात दया, करूणा, प्रेम व गरजूंना मदत करण्याची भावना होती. त्यांनी शेती व शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी अनेक कार्य केले. त्यांच्या मनात दया, करूणा प्रेम व गरजूंना मदत करण्याची भावना होती. त्यांना शेती व शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी अनेक कार्ये केले. त्यांनी अने



किल्ले व धर्मशाळा बांधल्या. अत्यंत न्यायप्रिय व कर्तृत्वान स्त्री त्या घडून गेल्या.

त्यांचे वडिल माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यापासून वाचण्यापर्यंत शिकविले. मल्हारराव होळकर पुण्यास जाताना चौंडीस थांबले होते. ८ वर्षांच्या अहिल्यादेवींना, मल्हाररावांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला, स्वतःचा मुलगा खंडेराव याची वधू म्हणून आणले.

महाराष्ट्रातील अनेक कर्तृत्ववान स्त्रियांमधली अहिल्याबाई ह्या होत. अहिल्याबाई होळकर ह्या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढचं नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक क्षेत्रा आखल प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

अहिल्याबाई होळकर एक आदर्श स्त्री होत्या, ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने आणि नेतृत्वाने इतिहासात एक अमिट स्थान मिळवले आहे. त्या एक कुशल प्रशासक आणि राज्यकर्त्या होत्या ज्यांनी आपल्या राजकारभारात न्याय आणि समानता प्रस्थापित केली. त्या महिला शिक्षण आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रातही खूप प्रभावी ठरल्या. त्यांच्या कार्यामुळे त्या आजच्या महिलांसाठी एक आदर्श बनल्या आहेत.

अहिल्याबाई होळकर या आपल्या राज्यकारभारात न्याय आणि समानता प्रस्थापित करण्यासाठी ओळखल्या जात. त्यांनी आपल्या राज्यकारभारात कोणत्याही व्यक्तीसोबत अन्याय होऊ दिला नाही. त्यांनी लोकांना न्याय दिला, आणि गरीब व गरजू लोकांच्या मदतीसाठी नेहमीच तत्पर राहिल्या.



अहिल्याबाई होळकर या शिक्षण आणि ज्ञानाच्या महत्
ओळखून होत्या. त्यांनी आपल्या राज्यात शिक्षण प्रस्थापित
करण्यासाठी खूप प्रयत्न केले. त्यांनी आपल्या राज्यात महिल
शिक्षणाचे महत्व ओळखून महिलांना शिक्षण मिळविण्यास
प्रोत्साहन दिले. त्या सामाजिक कार्यामध्ये खूप सक्रिय होत्या
शिवाजी महाराजांनी स्थापन केलेला मराठा साम्राज्या मध्ये
नर लोकहितवादी आणि समाजाला सुधारणार काम केल असे
ल तर अहिल्याबाईंनी केले आहे. त्या विधवा असून त्यांनी
ने काम केले आहे त्याची आज पण वाहवा होते. माळव्यात
अहिल्याबाई होळकर आज खूप सन्मान आहे.

अत्यंत न्यायप्रिय असलेल्या अहिल्याबाईंच्या प्राणांची
ज्योत वयाच्या ७० व्या वर्षी मावळली. अशा या शासनकर्ती
स मानवंदना म्हणून इंदूरच्या विमानतळाचे नाव "अहिल्याबाई
" देवी अहिल्याबाई " विमानतळ असे ठेवण्यात आले.

उरी बाळगूनी स्वप्न मराठी सत्तेचे,
बांधूनी तोरण हजारो गड किल्ले, मंदिरांचे,
घडविले जिने नव्या हिंदोस्तानाला,
एकच होती ती राणी अहिल्यादेवी होळकर...

——xxx——



Topic : Date : Page No. :

* नाव - श्री हेमंत मोतीराम पाटकर.
* पत्ता - मु·पो·ता - कणकवली (कांबळेगल्ली)
  जि - सिंधुदुर्ग
  पिन - 416602
* मो·नं - 9890267138/9156497138
* विषय - अहिल्याबाई होळकर एक आदर्श स्त्री-शासिका.
* गट - गट क्र-०१ (वय २१ वर्षापुढील)
* जन्मतारिख - 22/02/१९८६


CAMPUS PROJECT PAPER


SAMRAT

vivo Y28

May 29, 2025, 11:01

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर




Topic :
Date :
Page No. :
अहिल्याबाई होळकर
एक आदर्श स्त्री शासिका
CAMPUS PROJECT PAPER
SAMRAT
vivo Y28
May 29, 2025, 10:59



Topic : Date : Page No. : 1

"राज्य म्हणजे केवळ सिंहासनावर बसून केलेली हुकूमशाही नसून, जनतेच्या सुखदुःखाचा स्वीकार करणारी एक पवित्र जबाबदारी आहे." या विचारांचे मूर्त स्वरूप म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर.

मुलायम शालुत्यात लपलेली शक्तिशाली तलवार, मृदु हास्यामध्ये दडलेली गंभीरता आणि वैराग्याच्या वस्त्राखाली लपलेली प्रबुद्ध राज्यकरण - हे सारे गुण एका व्यक्तीमध्ये सामावले तर त्या व्यक्तीचं नाव फक्त 'अहिल्यादेवी' च असू शकतं. होळकर घराण्याच्या या तेजःपुंज तारका केवळ एका मर्यादित भूमिकेत न अडकता, संपूर्ण भारतभूमीच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक पुनरुत्थानाची वाहिका ठरली.

"सा राजा या प्रजां हिते स्थितः ॥"

(जो राजा प्रजेच्या हितासाठी कार्य करतो, तोच खरा राजा असतो)

१७२५ साली महाराष्ट्रातील चौंडी (ता-जामखेड, जि-अहमदनगर) या लहानशा गावात जन्मलेल्या अहिल्याबाईचं बालपण अत्यंत साधेपणात गेलं. त्यांच्या वडिलांचं नाव मानकोजी शिंदे. एका सरळ, शीलवान आणि धार्मिक कुटुंबात त्या वाढल्या. लहान वयातच त्यांचं विवाह होळकर घराण्यातील खंडेराव होळकर यांच्याशी झालं. राजघराण्याची रीत आणि वैभव यामध्येही त्या केवळ पत्नी आणि सून म्हणून नव्हे, तर एक उदात्त विचारवंत, सजग निरीक्षक आणि भावी शासिका म्हणून फुलत गेल्या.

१७५४ मध्ये पती खंडेराव यांचा मृत्यू झाला. पुढे १७६६ मध्ये सासरे मल्हारराव होळकर यांचे निधन झाले. दुःखाच्या या पर्वतमध्येही अहिल्यादेवी खचल्या नाहीत. अश्रूंना सामर्थ्याचं रूप देत त्यांनी होळकर साम्राज्याचा भार आपल्या खांद्यावर घेतला.

"When the going gets tough, the tough get going".

त्या काळी स्त्रियांना राजकारणातील सक्रिय होण्याची मुभा नव्हती. पण अहिल्याबाईच्या शौर्य, कर्तृत्व आणि प्रजाजनांच्या प्रेमामुळे त्यांनी राज्यकारभार स्वीकारला. १७६७ मध्ये त्या मालवाच्या सिंहासनावर विराजमान झाल्या आणि पुढची तीन दशके त्यांनी एक

CAMPUS PROJECT PAPER
SAMRAT
vivo Y28
May 29, 2025, 10:59



Topic :

Date :

Page No. : 2

आदर्श, न्यायप्रिय, धर्मनिष्ठ आणि लोकाभिमुख राज्यकारभार केला.

अहिल्यादेवींचा राज्यकारभार म्हणजे धर्मसिंचित प्रशासनाचं उत्तम उदाहरण. त्यांनी प्रजेच्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. कृषी, जलसंधारण, व्यापार, शिक्षण आणि धार्मिक स्थळांचं संवर्धन या सर्वच क्षेत्रांत त्यांनी अनन्यसाधारण कार्य केलं.

"न प्रजा भर्तृहतोः स्यात् स्वार्थं पश्येत् कदाचन।
प्रजानां तु हितं यः स्यात् स राजा इति कथ्यते।"

(जो राजा प्रजेच्या हितासाठी कार्य करतो आणि स्वतःच्या स्वार्थाचा त्याग करतो, तोच खरा राजा होय.)

त्यांनी न्यायव्यवस्था पारदर्शक बनवली. कुणालाही अन्याय सोसायास त्यांनी स्वतः न्यायसनावर बसून निर्णय दिले. त्यांचे दरबार हे सत्य धर्म आणि करुणेचे केंद्र होते. ॥ ५ ॥

अहिल्यादेवी म्हणजे जनसेवेची चालतीबोलती मूर्ती. त्यांनी आपली वैयक्तिक संपत्ती वापरून गोरगरीबांची मदत केली, अन्नछत्रे उघडली, धर्मशाळा बांधल्या. त्यांनी सुमारे २०००हून अधिक मंदिरे आणि घाट बांधले, ज्यात काशीचा विश्वेश्वर मंदिर, गंगाघाट रामेश्वरम, सोमनाथ आणि प्रयागराज यांचा समावेश होतो.

"अदम्य सेवा आणि समर्पण हेच जीवनाचे खरे सौंदर्य आहे."

त्यांनी स्त्रियांच्यासाठीही अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. विधवा स्त्रियांच्या पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिलं, त्यांच्या शिक्षणासाठी व्यवस्था

अहिल्यादेवींचं राजकारण हे धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक होतं. त्यांनी केवळ हिंदू धर्मस्थळांचा नव्हे, तर सर्व धर्मस्थळांच्या श्रद्धास्थानांचं पुनरुज्जीवन केलं. त्यांच्या कार्यातून भारतीय एकात्मतेचं सुंदर दर्शन घडतं.

"धर्मो रक्षति रक्षितः।"

(धर्माचं रक्षण करणारा, स्वतः धर्मद्वारे रक्षित होतो.)

त्यांच्या कारकिर्दीत साहित्य, कला, संगीत आणि तत्त्वज्ञान यांना उत्तेजन देण्यात आलं. त्यामुळे माळवा प्रदेश केवळ प्रशासनाचं नव्हे तर सांस्कृतिक वैभवाचंही केंद्र बनलं ॥ २०६ ॥

CAMPUS PROJECT PAPER

SAMRAT

vivo Y28

May 29, 2025, 10:59



Topic :

Date :

Page No. : ३

अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू म्हणजे :

१) करुणामयी माता : त्यांनी प्रजेच्या सुख-दुःखात आपल्याला समरस केले.

२) कर्तव्यनिष्ठ शासिका : रात्रंदिवस प्रजेच्या कल्याणासाठी झटणाऱ्या.

"स्त्रीणां शीलो गुणानां च सन्धानं राजसूत्रवत्।"

(स्त्रियांचं शील आणि गुण हे राज्यरचनेच्या सूत्रांसारखं असतं)

त्यांची कारभार पद्धती ही पंचायत पद्धतीवर आधारित होती. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार दिले. त्यांचे निर्णय हे लोकाभिमुख आणि नैतिकतेच्या चौकटीत होते.

" Leadership is not about power, it's about responsibility"

त्यांचा दरबार म्हणजे धर्मसंवादाचे केंद्र. ब्राह्मण, संत, न्यायमूर्ती आणि सामान्य नागरिक हे सर्वच त्यांच्या निर्णयप्रक्रियेत सहभागी असत. सर्व जनता त्यांना माँ साहेब म्हणून ओळखत असे. त्यांनी आपली ओळख केवळ एक राणी म्हणून नव्हे, तर मातृत्वाच्या नात निर्माण केली. त्यांचा सहवास म्हणजे शांती, शिस्त आणि श्रद्धेचे प्रतिक होता.

अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे केवळ ऐतिहासिक आदर्श नव्हे, तर आजच्या काळातील नेतृत्वला दिशा दाखवणारा दीपस्तंभ आहे. त्यांच्या विचारांची, कर्माची आणि राज्यशैलीची कालातीतता हीच त्यांच्या कार्याची थोरता दर्शविते.

आजच्या काळ हे तंत्रज्ञान स्पर्धा आणि वेगाच्या झगमगाटात हरवलेलं मानवी मूल्यांचं युग आहे. राजकारण, समाजकारण आणि व्यवस्थापन क्षेत्रात अनेकदा नैतिकतेपेक्षा अधिकाराची हाव, लोकप्रियतेचा हव्यास आणि व्यक्तिगत लाभांचे समीकरण दिसून येते. अशा वेळी अहिल्यादेवींचं नेतृत्व कर्तव्यशीलतेचा, करुणेचा, आणि निर्भयतेचा आदर्श बनून उभं राहतं.


"A true ruler the be heart before the land."

त्यांच्या प्रत्येक निर्णयात 'जनकल्याण' हा मुख्य उद्देश होता. आजही जर नेत्यांनी अहिल्यादेवींप्रमाणे स्वतःला सेवक समजून जनतेसाठी

CAMPUS PROJECT PAPER

SAMRAT

vivo Y28 5G
May 29, 2025, 11:00



Topic : Date : Page No. : ४

सत्त्याचा दृष्टिकोन स्वीकारला, तर भ्रष्टाचार, अन्याय आणि प्रशासनातील निष्क्रियता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.

अहिल्यादेवींनी आपल्या प्रशासनात पंचायत पद्धतीचा अंगीकार केला होता. त्यांनी लोकसहभाग वाढवला. आजही भारतात स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, महानगरपालिका या संस्थांमार्फत लोकशाही कार्यरत आहे; पण ती अहिल्यादेवींप्रमाणे सशक्त, लोकाभिमुख आणि पारदर्शक व्हावी लागेल. सध्या अनेक ठिकाणी प्रशासन आणि जनता यांच्यात अंतर वाढत आहे. हे अंतर अहिल्यादेवींसारख्या समर्पित नेतृत्वानेच कमी करता येईल.

आज महिला सक्षमीकरणाच्या चर्चा देशभर होतात. पण अहिल्यादेवींनी १८ व्या शतकात स्वतःच्या आचरणातून दाखवून दिलं की, सामर्थ्य, बुद्धिमत्ता आणि संवेदना यांचे एकत्रित रूप स्त्री असते. विधवांना समाजात मान मिळावा, महिलांनी शिक्षण घ्यावं, त्यांना अर्थव्यवस्थेत योगदान द्यावं - हे त्यांनी फार आधी ओळखलं होतं.

"स्त्रीणां यत्र पूज्यंते, रमंते तत्र देवता:"
(जिथे स्त्रियांचा सन्मान होतो, तिथेच देवता वास करतात.)

आज जर आपण मुलींना दर्जेदार शिक्षण, सुरक्षितता आणि नेतृत्वाची संधी दिली, तर प्रत्येक गावातून एक 'अहिल्याबाई' जन्म घेईल. त्यांनी दाखवलेली दिशा ही आजच्या महिला नेतृत्वाला बल आणि अभय देईल.

आजच्या भारताला अहिल्यादेवी होळकर यांच्यासारख्या नेतृत्वाची नितांत आवश्यकता आहे. त्यांच्या कार्याचं अध्ययन म्हणजे राजधर्म, समाजधर्म आणि स्त्रीधर्म यांचा परिपूर्ण पाठ. त्यांनी स्वतःला केवळ एका सिंहासनापुरतं मर्यादित ठेवलं नाही, तर जनतेच्या अंतःकरणात स्थान मिळवलं.

"She ruled not just the land, but the soul of her people."

त्यांच्या नेतृत्वात 'मालवा' फक्त वैभवशाली झाला नाही, तर न्यायप्रिय, सुसंस्कृत आणि स्नेहशील समाजव्यवस्था उभी राहिली.

CAMPUS PROJECT PAPER

SAMRAT

vivo Y28 5G
May 29, 2025, 11:00

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

"राजा धर्मे स्थितो नित्यं, धर्मेणैव प्रजां क्षेत्।
धर्मं संश्रित्य तिष्ठन्ति, प्रजा धर्मेण पालयेत्॥"

-महाभारत

इतिहासात अनेक शासक होऊन गेले, परंतु काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, जी केवळ राज्यकर्ती नसून मूल्यांची दीपशिखा बनून अंधारातही प्रकाश देतात. तशीच एक तेजस्वी विभूती म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर. एका साध्या गावात जन्म घेऊन, वैधव्याच्या वेदना सहन करत, त्यांनी प्रजेचा सांभाळ न्यायाचा अंमल आणि धर्मकार्यांची गंगोत्री सुरु ठेवली.

१७२५ साली महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या लहानशा गावात अहिल्याबाईंचा जन्म झाला. त्या काळी स्त्रियांना शिक्षण दिले जात नव्हते, पण माणकोजी शिंदे या त्यांच्या वडिलांनी परंपरेच्या विरोधात जाऊन आपल्या कन्येला शिक्षण दिले.

"शिका, कारण शिक्षण हेच एक शस्त्र आहे जे अन्यायविरुद्ध वापरता येते." .... डॉ. बाबासाहेब आंबेडकर

"विद्या विवादाय धनं मदाय, शक्तिः परेषां परिपीडनाय।
खलस्य साधोर्विपरीतमेतज्ज्ञानाय, दानाय च रक्षणाय॥"

हा श्लोक अहिल्याबाईंच्या शिक्षण आणि ज्ञानप्राप्तीच्या प्रवासाचे सविस्तर वर्णन करतो. त्यांचे बालपण जरी ग्रामीण वातावरणात गेले, तरी त्यांची बुद्धिमत्ता, समजूतदारपणा आणि प्रगल्भतेची झलक बालवयातच दिसून येत होती.

त्यानंतर १७६७ मध्ये त्यांनी प्रशासनाची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्या काळी एका स्त्रीने राज्यकारभार हाती घेणे हे समाजात क्रांतिकारक मानले जात होते.

"न्याय बिना राज्य शोभा न करे।
अन्याय सहन म्हणजे अन्याय करणं होय।"

-संत तुकाराम

अहिल्याबाईंनी दररोज सभा भरवून प्रजेच्या तक्रारी ऐकल्या. त्यांनी कठोरपणे लाचखोरी, भ्रष्टाचार आणि अन्यायाविरुद्ध पावले उचलली.

"Justice delayed is justice denied"

CAMPUS PROJECT PAPER

SAMRAT

vivo Y28
May 29, 2025, 11:00

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

Topic : Date : Page No. : 2

"न्याय एव धर्मः। धर्म एव राष्ट्रस्य मेरुदंड :।"
एका प्रसंगी त्यांच्या नातवाने शत्रूकच्याच्या बैलाला मारले, तेव्हा अहिल्याबाईंनी स्वतःच्या घरातील सदस्यावर दंड ठोठावला. त्यांचा न्याय असा होता की सामान्य प्रजेच्या हक्कांचं रक्षण करत त्यांनी घरच्यांनाही माफ केलं नाही.

अहिल्याबाईंनी विधवांसाठी आश्रयगृहे, अनाथांसाठी शाळा, आणि महिलांसाठी कौशल्यविकास केंद्रे सुरू केली. त्या काळात स्त्रियांना मंदिरे, धर्मस्थळे यांत प्रवेश नव्हता; पण अहिल्याबाईंनी मंदिराचे दरवाजे सर्वांसाठी खुले केले.

"Where women are respected divinity blossoms there".

"यत्र नारी पूज्यते, तत्र रमन्ते देवताः।"
"स्त्रिया पुरुषांच्या सावलीत नसून, त्यांच्याबरोबरीने चालणाऱ्या असाव्यात"! -सावित्रीबाई फुले
त्यांच्या कार्यामुळे मालवा प्रदेश हा केवळ आर्थिक समृद्धीचा नव्हे तर सामाजिक जागृतीचाही केंद्रबिंदू ठरला.

काशीचे विश्वनाथ मंदिर, सोमनाथ, रामेश्वर, द्वारका, गयामध्ये अहिल्याबाईंनी मंदिरे, घाट, धर्मशाळा बांधल्या. त्या फक्त स्थापत्याची कामगिरी नव्हती, तर श्रद्धेचा पुनर्जन्म होता.
अनेक संतांनी त्यांना धर्मरक्षणी राणी असे गौरवले. संत ज्ञानेश्वर तुकाराम, नामदेव यांच्या अभंगांचे पारायण त्या स्वतः करत.

"अभंग वाचावा, मन शांत व्हावं,
अहिल्याबाईंचं कार्य पाहावं, मन भरावून जावं"

अहिल्याबाईंनी प्रजेवर जास्त भार न लादता, उत्पादन, सिंचन जलसंधारण यांवर भर दिला. त्यांनी बाजारपेठांमध्ये भावनियंत्रण, धान्याचे साठवणूक व्यवस्थापन केले.

"अन्न हे पूर्णब्रह्म आहे, त्याचे रक्षण हे राज्यकर्त्यांचे कर्तव्य आहे".
त्यांनी पर्जन्यवृष्टीच्या आधारे कर आकारणी केली, जे आधुनिक अर्थव्यवस्थेचे आदर्श मानले जाते.
अहिल्याबाईंनी संगीत, काव्य, नाट्यकला यांना राजाश्रय दिला. त्या

CAMPUS PROJECT PAPER
SAMRAT
vivo Y28 5G
May 29, 2025, 11:00



Topic :

Date :

Page No. : २७

जे त्या काळात दुर्मिळ होतं.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या केवळ शासिका नव्हत्या, त्या एक माता, एक धर्मसेविका, एका समाजसुधारक आणि एक द्रष्ट्या नेत्या होत्या. आजच्या युगात महिला सक्षमीकरण, न्याय, शासन, आणि लोकसेवा या क्षेत्रात जे मूल्यप्रणाली आपण पाहतो. त्याचा आदर्श त्यांनी १८व्या शतकातच घालून दिला.

"अहिल्याबाई म्हणजे प्रजेच्या कल्याणासाठी झिजणारा दीप;
अहिल्याबाई म्हणजे स्त्री सामर्थ्याचं सर्वोच्च रूप!"

CAMPUS PROJECT PAPER

SAMRAT

vivo Y28 5G
May 29, 2025, 11:01



" दिनदुबळ्यांची बनुनी आई
ऊर्जा त्यांची जागृत ठेवी ।
ती जननेची माता अहिल्यादेवी ॥
लोकहिताचे शासन चालविले ।
जनउध्दाराचे कार्य केले ॥
करूनी जिर्णोद्धार मंदिर बांधली नवी ।
लोकहिताचे शासन चालविले,
जनउद्धाराचे कार्य केले ॥"

अहिल्याबाईची धर्मपरायणता, त्यांनी केलेले देवळाचे जीर्णोद्धार, बांधलेले घाट याची थोडी तरी दखल इतिहासाने घेतली; पण त्यांचे प्रशासनिक कौशल्य, न्याय-प्रियता, सक्षम राजकीय नेतृत्व, आर्थिक विचार आणी भारतीय नकणीसाठी 'रोलमॉडेल' ठरावे असे तडफदार व्यक्तिमत्व, सजग व लढाऊ स्त्री नेतृत्व असे पैलू अभ्यासण्याजोगे आहेत. अहिल्याबाई होळकरांच्या जन्माचे त्रिशताब्दी वर्ष साजरे होताना त्यांच्या दुर्लक्षीत राहिलेला " अर्थ विचार, शासनव्यवस्था " विषयीचे मत मांडण्यासाठी मी माझा निबंधाचा विषय मांडत आहे.

" अहिल्याबाई होळकर - एक आदर्श शासिका आणी
जनतेची माय. "

मधुर होती जिची वाणी,
अशी जन्मली तत्वज्ञानी राणी,
गाजवल्या जिने दाही दिशा,
तिच्या उत्तुंग कार्याला खरच सीमा नाही.

अहिल्याबाई होळकर एक प्रसिध्द मराठा शासिका होत्या. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी झाला. त्या मल्हारराव होळकर यांच्या पत्नी होत्या आणी खंडेराव होळकर यांच्या मातोश्री होत्या. अहिल्याबाई यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक महत्वपूर्ण बदल घडवले. त्यांनी न्याय, प्रशासन, सामाजिक सुधारणा आणी धार्मिक कार्यावर लक्ष केंद्रित केले.



अहिल्याबाई होळकर यांनी न्याय आणि प्रशासना च्या क्षेत्रात महत्वपूर्ण बदल केले. त्यांनी न्याय व्यवस्थेचा विकास केला, लोकांना न्याय मिळवून दिला, आणि प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ केली. सामाजिक सुधारणा, धार्मिक कार्ये, राजकीय कार्ये, अशा अनेक क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमठवला. त्यांनी आपल्या राज्याची सुरक्षीतता आणि समृध्दी सुनिश्चित केली. त्यांनी आपल्या राज्यकर्त्यांना योग्य मार्गदर्शन केले. आणि त्यांच्या राज्याला सुरक्षीत केले. आणि त्यांच्या कार्यमुळे त्यांना 'मराठा साम्राज्याची राणी' म्हणून ओळख मिळाली आहे.

" राण्या असंख्य झाल्या या जगात,
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्व जिचा आहे या मराठी हृदयाला,
एकच ती महाराणी
अहिल्यादेवी होळकर ।"

इ.स.१७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याचा शुरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामीत्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असुनही सती जाणे तहकूब करण्यात अहिल्याबाईनी जी मनोधैर्य दाखवले हे अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून अहिल्याबाईने प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला. व धर्म, रूढी, परंपरा यापलीकडे कर्तव्य महत्वाचे मानून रयतेला कल्याणकारी राज्य दिले.

" भारतभर पसरली कीर्ती जिची,
तीर्थक्षेत्री बांधल्या धर्म शाळा....
उदार कारूण्यमूर्ती अहिल्यामाता
रयतेस लाभला तिने लळा....

मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर २९ वर्षे अत्यंत यशस्वीपणे खऱ्या कल्याणकारी योजना काय असू शकतात



आणी त्या कशा राबवल्या जाव्यात हे त्यांनी दाखवून दिले. सासरा मल्हारराव यांचा मृत्यू २० मे १७६६, मुलगा मालेराव यांचा मृत्यू २७ मार्च १७६७ मध्ये झाला. अशी एकामागून एक दुःखे येत असतानाही त्या अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी, समाधानी आणी संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्वाप्रमाणे राज्य केले.

अहिल्याबाई होळकर यांनी घाट बांधताना खुप तपाशीलासह घाट बांधुन घेतले. घाट बांधताना केवळ नद्यांची मन विचारात न घेता प्रत्यक्ष भागातील स्त्रीयांना बोलून घाटाच्या पायऱ्या कशा हव्यात, कपडे धुताना बाळ कुठे ठेवायला सोईस्कर पडेल, कपडे बदलताना खोल्या कुठे असाव्यात ? इतके बारीक विचार करून केले गेले. मुंग्याना साखर माश्यांना कणकेचा गोळा, उन्हाळ्यात वाटसरूंना पिण्यासाठी पाणपोया, हिवाळ्यात गरजूंना गरम कपडे यांची सोय केली. आपल्या राज्यात सुक्ष्म जीवही उपाशी राहू नयेत यासाठी दक्षता घेतली.

" होता तिचा दरारा
साम्राज्याचा ही पसारा
गरिबांची होती ती आय
जशी दुधावरची साय ... "

इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर यांना भारताच्या "कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गरिट" असे म्हणले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशीयाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गरिट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने म्हणले आहे की ज्यावेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहला जाईल त्यावेळेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्वप्रथम लिहले जाईल.

" आहेस तू आमची
पुण्यश्लोक राजमाता
इतिहासातील पहिली महिला राज्यकर्ता।



इ.स. १७६५ मध्ये सत्तेसाठी झालेल्या एका लढाई दरम्यान लिहिलेल्या एका पत्रावरून मल्हारराव यांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वावर किती विश्वास होता हे दिसून येते.

"चंबळ पार करून ग्वाल्हेर येथे जावा. तेथे तुम्ही ४-५ दिवस मुक्काम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य ठेवू शकता व त्यांचे शस्त्रांसाठी योग्य तजवीज करा.... कूच करतांना, मागवर तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा."

पूर्वीचे शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्यूनंतर, अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांनी विनंती केली. त्यांनी शासन करण्यास माळव्यात अनेकांचा विरोध होता, पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. अहिल्यादेवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्यात कोपऱ्यात चार धनुष्य आणी बाणांचे भाते ठेवत असत, असे म्हणतात.

भारतीय संस्कृती कोशात अहिल्यादेवी होळकरांनी केलेल्या बांधकामांची यादी आहे. - काशी, गया, सोमनाथ, अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, व्यापारी, बद्रीकेदार, रामेश्वर, जगन्नाथपुरी वगैरे. अहिल्यादेवीस, सावकार, व्यापारी, शेतकरी इ. आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतू त्यांनी त्यांच्यावर आपला अधिकार असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता, असे दिसते. म्हणून असे लिहावेसे वाटते की,

उदार समाजाच्या करणे हाच
तिचा एक ध्यास.
जीवन वाहिले सुखी आणी समृद्ध
करण्यात समाजास.
प्रत्येक घरात लक्ष्मी नांदली होती
सुखी ठेवले राज्यास.



जात पात समाज भाषा
देश विदेश तिचे गुण गाती.
दान धर्म सामान न्याय
म्हणून त्यांनी लोक देवी म्हणती.

एक महिला राज्यकर्ता व राज्यशासक या नात्याने त्यांनी आपल्या राज्यातील सर्व महिलांसाठी विशेषतः विधवा महिलासाठी नवीन कायदे व नियम बनविले. विधवा महिलांना संपत्तीचा आधिकार दिला, सती प्रथा बंद केली. महिलांना किमान शिक्षण मिळावे यासाठी विद्यालयांची व्यवस्था केली. महिलासाठी महिला सेना निर्माण केली. समकालीन भारतातच नव्हे तर जगामध्ये अशा प्रकारचे एकमेव उदाहरण असावे.

अहिल्यादेवी होळकर यांना युद्ध रणनीतीची चांगली जाण होती. अनेक युद्धात त्या स्वतः रणांगणात उतरल्या होत्या. पतीच्या निधनानंतर राज्यकारभार अहिल्यादेवी पाहू लागल्या. राज्याची राजधानी इंदोरहून महेश्वर येथे स्थलांतरित केली. राज्यामध्ये डाकू व लुटारूंचा उपद्रव वाढलेला होता. त्यावेळी अहिल्यादेवीनी एक धाडसी निर्णय जाहीर केला कि, जो कोणी डाकू व लुटारूंचा उपद्रव नाहिसा करेल त्याच्या बरोबर कन्या मुक्ता हिचा विवाह केला जाईल. यशवंतराव नावाच्या एका सामान्य कुटुंबातील तरुणाने त्या डाकूचा बंदोबस्त केला. त्यावेळी अहिल्यादेवी यांनी आपल्या कन्या मुक्ताबाई हिचा विवाह यशवंतरावशी लावून दिला.

नाव ज्यांचे अहिल्या,
इतिहासात त्या गाजल्या,
शूर अशी होती ती राणी
न्यायासाठी लढली ती मर्दानी.

त्यांच्या तीस वर्षाच्या शासनकाळात अहिल्या बाईंनी सतत आर्थिक कार्य व राज्याच्या जनतेच्या आर्थिक उन्नतीचा सतत प्रयास केला. त्यात सातत्य राहिले याचा व वहनीयतेचा विचारही केला. हे प्रयत्न सर्वांना बरोबर घेऊन जाणारे, सर्वसमावेशी आणि



आणि सर्वधर्मसमभावाचा विचार करणारे होते हे अजून एक वैशिष्ट्ये. त्यांनी अमलात आणलेला 'अर्थविचार' त्यांच्या आदर्श व प्रजाहितैषी दृष्टीकोन द्योतक आहे, म्हणून महत्वपूर्ण आहे व वैशिष्ट्यपूर्ण आहे.

या 'अर्थ' विचाराचे तीन पैलु आहेत - अर्थाचे निर्माण, अर्थाचे व्यवस्थापन, अर्थाचा विनियोग

अर्थाचे निर्माण या पैलुमध्ये त्यांचे मत असे होते की, राज्याची अर्थास्थिती चांगली नसेल, तर ते राज्य नेहमी दुबळे, परजीवी, दुसऱ्यांच्या साहाय्यावर अवलंबून असते. त्याकरीत उद्योग, शेती, व्यापार व उत्पादन हे धन कमावण्याचे मार्ग होते पण अहिल्यादेवीनी धन कमावण्याचे धन मिळविण्याचे नवे मार्ग शोधले होते. त्याचा उपयोग केला होता.

अहिल्यादेवीनी व्यापार वृद्धीत वाढ होण्या साठी अनेक योजना राबविल्या. त्यांच्या मते कोण त्याही व्यवसायाचे चार आधारस्तंभ असतात. कौशल्य, भांडपल, जमीन, कच्चा माल. महेश्वरला राजधानी वसवताना त्यांनी याचा विचार केला होता असे जाणवले. राज्याकडची अतिरिक्त जमीन व्यापाऱ्यांना उपलब्ध करून दिली. नव्या वस्त्या वसवल्या गेल्या. त्यांना कौशल्य शिकवले. कच्चा माल उपलब्ध करून दिला. स्वतःच्या खाजगी कोषातून अल्प व्याजदर आकारून कर्जे दिली. याचा परिणाम करून निजीकोष वाढवला व व्यापार वृद्धी केली.

"निर्माण केला होता
तिने सातबारा
माफ केला सांऱ्या
शेतकऱ्यांचा शेतसारा."

आधुनिक भारताच्या इतिहासा तले एक सोनेरी पान असलेल्या, स्वतःच्या आयुष्यातच आख्यायिका बनून राहीलेल्या अहिल्या बाई होळकरां च्या जीवनाचा कारकिर्दीचा अभ्यास करताना



हा निबंध लिहताना त्यांनी दाखविलेले विविधांगी कर्तृत्व, स्तीमित करणारे आहे. तेज, तप आणि त्याग या गुणत्रयीने पूर्ण असे त्यांचे व्यक्तीमत्व म्हणजे मूर्तिमंत भारतीय स्त्रीत्वाचे प्रतीक! करारी, पण मयदिशील, प्रशासक म्हणून कठोर, पण जनतेच्या लोकमाता, न्यायाप्रिय तरीही माणुसकी हा मुख्य धर्म मानणाऱ्या वृत्ती धार्मिक; पण, कर्मकांडांचे अवडंबर नाही. म्हणून असे लिहावेसे वाटते की,

"दिन दुबळ्यांची बनुनी आई ऊर्जा
त्यांची जागृत ठेवी।
ती जनतेची माता अहिल्यादेवी
लोकहिताचे शासन चालविले।
जनउद्धाराचे कार्य केले
रणासारखी चालविली तलवार।
प्रजेसाठी लढली ती फार
त्यागालाही वाढावी लाज
असा अहिल्यामाई तुमचा त्याग॥"

शेवटी शेवट करताना असे वाटत आहे कि, अहिल्यामाईच्या शासन व प्रजेबद्दल केलेले कार्य इतक्या शब्दात लिहता येत नाही. लोकमाता, राजमाता विरांगणा, पुण्यश्लोक, देवी, गंगाजल, निर्मळ, मातोश्री या सगळ्या पदव्या आज दोनशे वर्षे टिकून आहे. टिकणार आहेत. अत्यंत प्रेमाने त्यांनी सामान्य माणसाचे हित बाधितले. प्रजेतील गरिबांना जास्तीत जास्त सुखाने जगता यावे, या कडे लक्ष दिले. त्या धार्मिक होत्या हे तर सर्वांना माहित आहे. परंतु एक राज्यशासक म्हणून त्यांचे कर्तव्य फार महत्वाचे आहे. खंबीर मन आणि चातुर्य यामुळे, अनेक संकटे त्यांनी पार केली.



अहिल्याबाई होळकर यांचे निधन १३ ऑगस्ट १७९५ रोजी झाले, जेव्हा त्या ७० वर्षाच्या होत्या. शेवटी इनके लिहते की,

दानशुर , कर्तृत्वान , नारीशक्ती
अहिल्या.....
मराठा , साम्राज्याची कार्यक्षम राज्यशक्ती
अहिल्या.....
कुशाग्र , तेज ; पुंज करारी बुध्दीमत्ता
अहिल्या.....
आदर्श ठेवला नारीशक्तीचा
कित्येक पिढ्यांना पुढती
अशी राजमाता अहिल्यादेवी होळकर
पुन्हा न होणे धरती !!

धन्यवाद.



पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पार्टी
महाराष्ट्र राज्य
पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर
यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त
राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धा —

स्पर्धकांचे नांव –
श्रीमती वर्षा आबासाहेब अहिरराव
- उपशिक्षिका -

निबंधाचे नांव –
"अहिल्याबाई होळकर यांचे
समाजसुधारणेतील कार्य"

शाळेचे नांव –
जय भवानी शिक्षण मंडळ संचालित,
यादव देवचंद पाटील माध्यमिक विद्यालय,
मेहरुण, जळगांव.

मो. नं. ९९२२१२९४९९,



अहिल्याबाई होळकर यांचे, समाज सुधारणेतील कार्य...

राजराणी असूनही,
राजयोगिनी झाली।
'पुण्यश्लोक' म्हणूनी,
जनमानसी अमर जाहली।

भारत देशात अनेक राजे, संस्थानिक, सरदार होऊन गेले की त्यांनी आपल्या कार्य व कर्तृत्वाच्या बळावर आपली राज्यव्यवस्था आदर्श बनवली व नावारूपाला आणली. या आदर्श राज्यकर्त्यांमध्ये केवळ पुरुष राज्यकर्तेच होते असे नाही, तर काही महिला राज्यकर्त्या देखील होत्या की ज्यांनी आपल्या राज्याची किंवा संस्थानाचा राज्यकारभार करीत असताना खूप मोठे कर्तव्य बजावून जनतेप्रती उत्तरदायित्वाची भावना बाळगून सातत्याने लोककल्याणकारी कार्य केली आहेत. अश्या लोकमाता अहिल्याबाई होळकर.

भारताच्या इतिहासात १७६८ ते १७९५ या २९ वर्षाच्या काळात लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या नेतृत्वाखाली एक समृद्ध, गौरवशाली, कल्याणकारी, ज्याला शिवशाहीनंतरच्या सुवर्णकाळ म्हणता येईल, असे एक लोकराज्य होते. लोकमाता अहिल्याबाई होळकर या मराठा इतिहासातील कर्तृत्ववान राज्यकर्त्या होत्या.

महाराष्ट्रातील चौंडी, तालुका जामखेड जिल्हा नगर हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान. याच गावात ३१ मे १७२५ या दिवशी अहिल्यादेवी यांचा जन्म झाला. पुढे सुभेदार मल्हारराव होळकर यांचे पुत्र खंडेराव यांच्याशी वयाच्या ८ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला. अहिल्याबाई बालपणापासूनच चाणाक्ष, तल्लख आणि कुशाग्र बुद्धीच्या



होत्या. खंडेराव राज्यकारभाराकडे आजिबात लक्ष देत नव्हते. पण अहिल्याबाईंनी कधीही गाऱ्हाणे न करता सासरे मल्हारराव यांनी नेमून दिलेल्या कामात लक्ष घातले. कुशाग्र बुद्धीची देणगी लाभलेल्या सूनबाई — अहिल्याबाई यांच्यावर सासरे मल्हारराव होळकर यांचा मोठा विश्वास होता. पुष्कळ महत्त्वाचा पत्रव्यवहार ते अहिल्याबाई यांच्याकडून सोपवत असत. अहिल्याबाईंना वयाच्या २८ व्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. कुंभेरीच्या लढाईत पती खंडेराव मरण पावले. त्यावेळी सासरे मल्हारराव अहिल्याबाईंना म्हणाले, "माझा खंडूजी गेला, म्हणून काय झाले? तुझ्या रूपाने माझा खंडूजी आज जिवंत आहे, तू सती जाऊ नकोस." अहिल्याबाईंनी ते ऐकले आणि मल्हाररावांनी अहिल्याबाईंच्या हाती सत्तेची सूत्रे दिली.

"मधुर होती जिची वाणी,
अशी जन्मली तत्त्वज्ञानी,
गाजवल्या जिने दिशा दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला खरंच
सीमा नाही."

अहिल्याबाई होळकर यांचा शासनकाळ हा मराठा साम्राज्यातला सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो. मल्हाररावांनी सूनेला मुलगा मानून त्यांच्या नेतृत्वगुणांना वाव दिला. मल्हारराव होळकर त्यांचे राजकीय गुरु झाले. त्यांच्या सासूबाई गौतमाबाई यांनी त्यांना गृहशिक्षण — व्यवहारचतुर प्रशासन, राजकारणाचे प्राथमिक शिक्षण दिले. गौतमाबाईंच्या काळात पतीच्या कमाईतला एक अष्टमांश भाग स्त्रियांकडे देत असत. गौतमाबाईंकडून हा प्रवाह अहिल्याबाईंकडे आला.

अहिल्याबाई उत्कृष्ट राज्यशासक होत्या. त्या न्यायदान अचूक करीत. त्यामुळे



भांडणाऱ्या दोन्ही बाजू त्यांना दुवा देत. प्रजेला न्याय मिळावा म्हणून त्यांनी राज्यात अनेक ठिकाणी, विविध ठिकाणी न्यायालये स्थापन करून त्यावर योग्य न्यायमूर्तींच्या नेमणूका केल्या होत्या. गावोगावी पंचायती स्थापून करून त्यांना न्याय दानाचे विस्तृत अधिकार बहाल केले. अहिल्याबाईंच्या कडक नियंत्रणाखाली ही न्यायालये व पंचायती न्यायदानाचे काम उत्तम रीतिने करत होती.

"लोककल्याणकारी राणी अहिल्या,
राज्यकारभारात तरबेज होत्या.
दीनदुबळ्यांसाठी आई समान,
तत्वज्ञानी अन् कुशल संघटक
होत्या."

एका नजरेत हिशोब करण्यात त्या तरबेज होत्या. ज्याप्रमाणे आपल्या प्रजेवर त्या अन्याय होऊ देत नसत. त्याचप्रमाणे सरदारांना त्या आपल्या राज्याचे महत्वपूर्ण घटक मानत. युद्धाच्या वेळी स्वतः त्या रणांगणावर उतरत. तोफा ओतणे, जम्बुरीच्या गोळ्या तयार करणे, तीर-बाजी यांचे शास्त्र त्यांना माहीत होते. घोड्यावर स्वार होण्याचे कौशल्यही त्यांनी प्राप्त केले होते. त्यांनी स्त्रियांचे स्वतंत्र सैन्यदल उभारले होते.

"मनगटात ताकद तयांच्या तलवारीत आग होती.
इंग्रजांनाही दाद न देण्याची,
जिद्द त्यांची न्यारी होती,
राणी असून ही वेगळी जिची
छाप होती,
अशी राणी अहिल्याबाई होती."

अहिल्याबाईंनी शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले. महापूर, दुष्काळ, टोळधाड इ. कारणांमुळे पिकांची हानी झाल्यास त्या आपल्या प्रजेला शेतसाऱ्यात सूट



देत असत. ज्यांच्याकडे सुपीक किंवा नापीक जमीन असेल त्यांच्याकरिता वेगवेगळ्या योजना राबवल्या. शेतकऱ्यांच्या नावे करून दिल्या. त्यांनी आपल्या राज्यात बराई महसूलाची तरतूद केली असली तरी वानवीपेक्षा जास्त महसूल कधी घेतला नाही. कमी कर योजनेमुळे प्रजा व शेतकरी सुखी होते. त्यांच्या ३० वर्षाच्या कारकिर्दीमध्ये कधीच दुष्काळ पडला नाही. वृक्षारोपण करताना ऋतूच्या कडेला, शेताच्या बांधावर कोणते वृक्ष असावेत आणि शेतात कोणते वृक्ष लावावेत याबद्दलही त्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत.

त्या काळात भिल्ल लोक त्यांच्या डोंगरवस्तीतून जाणाऱ्या वाटसरूंना, व्यापाऱ्यांना, लुटायचे काम करीत असत. ही गोष्ट जेव्हा अहिल्याबाईंच्या लक्षात आली, त्यावेळी त्या गुन्हेगारांना (भिल्लांना) शासन न करता व्यापाऱ्यांकडून कर वसूल करण्यास त्यांनी परवानगी दिली. त्यामुळे त्या भिल्लांनाही उत्पन्नाचे साधन मिळाले आणि अशा प्रकारे त्यांना राज्याचे रक्षक बनवले. गुन्हेगारी कमी झाली आणि व्यापाऱ्यांनाही संरक्षण मिळाले. या कराला 'भिलकवडी' कर असे म्हणत.

अहिल्याबाईंनी उद्योगांना प्रतिष्ठा दिली. हस्तोद्योग, गृहउद्योग यामध्ये तेव्हापासून काही घराणी त्या कामात आहेत. त्यावेळेस स्त्रियाही त्या उद्योगात होत्या. महेश्वरला साड्या निर्मिती सुरू केली व तेथे त्यांनी बाजारपेठ भरवली होती. आजही 'महेश्वरी साड्या' प्रसिद्ध आहेत.

लोकमाता, राजमाता, पुण्यश्लोक, मातोश्री अशा अनेक पदव्या अहिल्या-देवींना लोकांनी मनापासून दिल्या होत्या.



आज २०० वर्षे झाली तरी त्या पदव्या टिकून आहेत, आणि टिकणार आहेत, कारण त्यांचे कार्यच इतके महान होते त्या धार्मिक तर होत्याच, परंतु प्रजाहितदक्ष ही होत्या.

अहिल्याबाई होळकर यांना भारताती-ल सर्वात दूरदृष्टी महिला राणी पैकी एक मानले जाते हिंदू धर्माचा प्रसार आणि प्रचार दूरपर्यंत पोहचविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

"घाट, मंदिरे, विहिरी बांधल्या,
समान तिला रंक नि राव,
लोकांसाठी देह झिजविला,
अहिल्याबाई होळकर तिचे नांव"

अहिल्याबाई होळकर यांची महान धार्म-प्रवर्तक आणि हिंदू मंदिराच्या निर्मात्या म्हणून प्रसिद्ध आहेत त्यांनी संपूर्ण भारता-मध्ये मंदिरे, नद्यांचे घाट, आणि धर्मशाळा चांगल्या पद्धतीच्या बांधल्या ज्या गावांचा पाण्याचा प्रश्न होता, तिथे त्यांनी विहिरी, बारवा यांची निर्मिती करून पाण्याचा प्रश्न संपवला मुघल सम्राट औरंगजेब यांनी अपवित्र केलेले, उध्वस्त केलेले आणि पडलेल्या हिंदूंच्या पवित्र मंदिरांचे त्यांनी नूतनीकरण करून त्यांचा उद्धार केला. १७८० मध्ये प्रसिद्ध काशी विश्वनाथ-मंदिराचे नूतनीकरण आणि दुरुस्ती यामध्ये त्यांचे विशेष योगदान आहे त्यांनी नेहमीच आपले राज्य मुस्लिम आक्रमकांपासून वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला युद्धाच्या वेळी त्या स्वतः सैन्यात सामील होऊन लढत असे त्यांनी तुकोजीराव होळकरांना आपल्या सैन्याचा सेनापती म्हणून नेमले. राणी अहिल्याबाईंनीही तिच्या साम्राज्यात महेश्वर आणि इंदूरमध्ये अनेक मंदिरे बांधली होती.

"भुकेल्या पोटी घास देऊनी तृप्त



केले तहानलेल्या जीवा,
जात, धर्म विसरून दाखवला मानव-
-सेवेचा मार्ग नवा,
अहिल्यादेवी होळकर आपल्या कार्याचा
निरंतर तेवत शहील दिवा."

श्री क्षेत्र जेजुरी गडाच्या विकास कामात अनेक राजघराण्यांचे खूप मोलाचे सहकार्य होते. यामध्ये फक्त इंदूरच्या श्रीमंत-होळकर घराण्याचा सिंहाचा वाटा आहे. जेजुरीचा खंडेराय हे होळकर घराण्याचे कुलदैवत आहे. असे काही ठिकाणी नोंद आहे. सुभेदार मल्हारराव होळकर यांनी गडावरील दगडी कमानीचे आणि नंतर नगारखान्याचे काम पूर्ण केले. अशया आशयाचे होळकर कालीन २ शीलालेख गडावर आला आहेत. अशी बरीच समाज-उपयोगी कामे त्यांनी जेजुरी गडावर केली आहेत.

स्त्रियांसाठी त्यांनी ओवऱ्या बांधल्या. त्यांनी सुरु केलेले अन्नछत्र आणि पाण-पोया आजही सुरु राहिल्या आहेत. अनेक बारव लोकांची पशुपक्ष्यांची आणि शेतीची, पाण्याची, गरज भागवत आहे. गायी गुरांसाठी त्यांनी कुरणे राखून ठेवली होती. गोसेवा केल्या खेरीज त्या अन्न ग्रहण करीत नसत. केदारनाथ ते रामेश्वर आणि सोमनाथ पासून पुरीपर्यंत त्यांनी रस्त्यांचे काम केले. संपूर्ण भारत जोडण्याचे काम त्यांनी या काळात केले. अत्यंत अचूक पद्धतीने उद्याची बेगमी करायची असेल तर राष्ट्रजोडणी आवश्यक आहे, हा अहिल्याबाईंचा विचार खरोखरच स्तुत्य आहे.

"कल्याणकारी कामे करुनी,
ख्यात ती कुशल प्रशासिका,
मान उंचावली स्त्रियांची,
खऱ्या अर्थाने ती लोकनायिका."

चांदवड, इंदोर, महेश्वर इ० ठिकाणी त्यांनी टांकसाळ सुरु केली. त्यांच्या काळात प्रामुख्याने तांब्याची व चांदीची नाणी पाडली. त्यावर चंद्र सूर्याचा मुखवटा, गव्हाची ओंबी, शिवलिंग, बेलपत्र अशी चित्रे असत. लोककल्याणाच्या दौलतीचे व खाजगी जहागिरीचे अधिकारी निरनिराळ्या प्रांतात कार्यरत होते. त्यांना वेळेवर आदेश पोहचावेत तसेच आपल्या प्रजेची सुखदुःख कळणे, इतर राज्यकर्त्यांशी संपर्क साधणे या अनेक कारणांसाठी अहिल्याबाईंनी डाक व्यवस्थेत नव्याने रचना केली. पुणे ते महेश्वर नित्यस्वरुपाची डाक व्यवस्था असून इतर डाक व्यवस्था नैमित्तिक स्वरुपाची होती. त्यावेळी हरकरा, सवार यांना पाठवून आपल्या आज्ञा किंवा पत्रे त्या पाठवत. त्यांची प्रशासन व्यवस्था चोख होती. झालेल्या दिवशीचा प्रत्येक पत्रव्यवहार त्यांना जागून पूर्ण करीत.

"उरी बाळगूनी स्वप्न मराठी सत्तेचे
बांधुनी तोरण हजारो गडकिल्ले, मंदिरांचे,
घडविले जिने नव्या हिंदोस्तानाला,
एकच होती ती राणी अहिल्यादेवी होळकर"

त्यांनी हुंडाबळीचा कायदा केला. तसेच विधवांसाठी वारसा हक्क व दत्तक घेण्याचा अधिकार कायद्याद्वारे मिळवून दिला. अहिल्याबाईंची ग्रंथसंपदा मोठी होती. त्यांनी 'अहिल्या कामधेनु' ग्रंथाची निर्मिती केली. विद्या, कला, त्यांचे प्रणेते यांचा कोश त्यांनी बनवला. महेश्वर येथे संस्कृत पाठशाळा सुरु केली.

इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर यांना भारताच्या 'कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारेट' असे म्हटले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी, 'कथरीन द ग्रेट' इंग्लंडची राणी एलिझाबेथ, तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी एकत्रित केली आहे.



त्यांनी म्हटलं आहे; की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल, त्यावेळेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नांव सर्वप्रथम लिहिले जाईल.

"गोरगरीब जनतेस देऊन न्याय,
न्यायाची देवता झालीस तू,
स्त्री उद्धाराचा घेऊन ध्यास,
स्त्री शक्ती झालीस तू"

अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इतिहासामधील त्यांचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला. हा एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते. आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. अहिल्यादेवी होळकरांना जीवनकाळात खूप सन्मान मिळालेत. ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते. त्याप्रमाणे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या स्त्रीयांमधील उत्तम राणी होत्या. त्यांनी हुंडाबंदीचा कायदा केला तसेच विधवांसाठी वारसा हक्क व दत्तक घेण्याचा अधिकार कायद्याद्वारे मिळवून दिला. अहिल्याबाईंची ग्रंथसंपदा मोठी होती त्यांनी 'अहिल्याकामधेनू' ग्रंथाची निर्मिती केली. विद्या, कला, त्यांचे प्रणेते यांचा कोश त्यांनी बनवला.

"इंग्रजांनाही दाद न देण्याची,
जिद्दच त्यांची न्यारी होती,
राणी असूनही,
वेगळी जिची छाप होती"
अशी राणी अहिल्याबाई होती!!!

महेश्वर येथे संस्कृत पाठशाला सुरु केली. अहिल्याबाईंकडे अनेक विद्वान मंडळी, वैद्य, कीर्तनकार, कवी येत-असत. अशा विद्वानांना त्या आपल्या



दरबारात राजाश्रय देत असत. मोरोपंत, कवी आर्यकार अनंत फंदी यांना त्यांनी आपल्या दरबारात राजाश्रय दिला होता.

"सुखात नांदली आमची जनता,
कारण उत्तम शासक, तत्वज्ञानी,
कर्तव्याची जननी,
राणी होती अहिल्या माता,

अहिल्याबाईंकडे १६ कोटी रुपये खासगी जहागीरीचे उत्पन्न होते. तर १५ लाख रुपये उत्पन्नाच्या खाजगी जहागीरीच्या प्रदेशावर त्यांची संपूर्ण मालकी होती. खाजगी जहागिरीच्या हिशोब सरकारी हिशोबापेक्षा वेगळा ठेवला जात असे. त्यांनी जी लोककल्याणकारी कामे केली, जो दानधर्म केला, संपूर्ण भारतभर जी मंदिरे बांधली, तो सर्व खर्च त्यांनी खाजगी उत्पन्नातून केला.

"असामान्य कर्तृत्व, आणि
धर्मपारायण नेतृत्व,
यांनी घडवली प्रसिद्ध,
स्त्री राज्यकर्तीची कारकिर्द"

त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात धनसंपत्ती असूनही त्या कधीही विलासी जीवनात रमल्या नाहीत. 'साधी रहाणी' हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विशेष गुण होता. अहिल्याबाईंच्या आयुष्यात अनेक दुःखाचे डोंगर कोसळले होते. १८ सतीच्या किंकाळ्या आणि सर्व जिवलगांच्या मृत्यूचे दुःख सोसून ही बाणेदार स्त्री कर्तव्यकठोर असा कर्मयोग आचरत राहिली. आणि प्रजेचे सुख बघत राहिली. अश्या कर्तव्यनिष्ठ मातेस कोटी कोटी प्रणाम!!!

"घडविले जे जे आपण
करावे त्याचे रक्षण,
बाणेदारपणे उत्तर देणाऱ्या,



माता अहिल्याबाईंना,
त्रिवार वंदन !!!



अहिल्याबाईंच्या कार्यातून घडलेली स्त्रीशक्तीची प्रेरणा

'मांगल्याची ज्योत तू, सौख्याचे रूप तू
गर्भाची पिशवी तू, विश्वाची निर्मिती तू
आदिशक्ती आदिमाया तू, शारदेचे रूप तू
स्वाभिमानाचा प्रारंभ तू, नव्या युगाची दिशा तू'...

भारतीय संस्कृतीत कुटुंबव्यवस्थेला फार फार महत्त्व आहे. कुटुंबाच्या विकासाने समाजाचा विकास होतो. पर्यायाने देशाचा विकासही! हा विकास होण्यास स्त्रीच कारणीभूत असते. स्त्रीजीवन जगासाठी खरी प्रेरणा असते. स्त्री जीवन हे संघर्षाने भरलेले आहे. पण या संघर्षाला प्रत्येक स्त्री शारीरिक, मानसिक तसेच भावनिक ताकदीने सामना करीन असते. तिच्यातील जिद्द, चिकाटी यांमुळे एकविसाव्या शतकातील स्त्री ही पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून विविध क्षेत्रे पादांक्रात करीत आहे. परंतु, आपली कार्यतत्परता सिद्ध करीत असताना 'स्त्री जीवना तुझी कहाणी, हृदयी अमृत नयनी पाणी' या म्हणीसारखी आहे.

प्रत्येक स्त्री ची वेगळी कहाणी आहे आणि वेगळा प्रवास आहे. या प्रवासात वेगवेगळी वळणे आहेत, सुखदुःखे आहेत, यशापयश आहेत, आशा-निराशा आहेत अन् अधांतरीचा प्रवास आहे असा आभास आहे. अशावेळी विचारांचे परिवर्तन करण्याची कालाची गरज आणि स्वतःवरील विश्वास वाढविण्याची ताकद निर्माण करताना समस्त स्त्री जातीला स्त्रीशक्तीचे विराट रूप दिसलेच पाहिजे. ज्या-ज्यावेळी स्त्री अबला म्हणून स्वतः



करावे. इतिहासातील अजरामर विरांगणा, त्यांचा पराक्रम स्मरावा. इतिहासातील प्रत्येक पान आजही त्यांच्या शौर्याची गीते गातो अशा विरांगणा स्मरताना सर्वप्रथम राजमाता जिजाबाईनंतर स्मरावे ते पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर!

'जिजामातेला मानाचा मुजरा करोनि
सलाम करितो न्यायनिष्ठ अहिल्येला
ती विद्युलता असे पराक्रमी घोर
पानापानात इतिहास वर्णितो आज
चावुनि विशारे हत्तीवरती अन्
साधे तिरंदाजी सलज्च मग....
न डोक्यावरती साज न अंगावरती साज
रणरागिणी ती एक, धर्मरक्षिणी ती एक!'

प्रामाणिकपणा, आदर, कठोरता या साधनात्मक मुल्यांचा त्रिवेणी अविष्कार म्हणजे राजमाता अहिल्याबाईंची विचारसरणी! स्वधर्मासाठी, देशासाठी, गोरगरिबांसाठी कायम प्रामाणिक असणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई वडिलधाऱ्यांप्रती आदर बाळगणाऱ्या होत्या. तसेच महान शासका व समाजसुधारका म्हणून भूमिका पार पाडताना कठोरता मुल्यही अंगिकारताना अहिल्याबाई दिसतात. १७ व्या शतकातील नवप्रवर्तक नर होत्याच पण; त्यांच्या कार्यातून "परब्रह्मरूपिणी"चे दर्शन झाल्याशिवाय राहत नाही.

स्वतःच्या मुलाला मृत्युदंडाची शिक्षा देणारी ती न्यायनिष्ठ माता न्यायनिवाडा करताना कोणताही पक्षपात होणार नाही याकडे विशेष लक्ष देणाऱ्या न्यायदेवता होत्या. त्या समानता या अद्दिष्टाकडे विशेष लक्ष देणाऱ्या होत्या. त्यामुळेच समाजातील सर्व स्तरांवर शिक्षण व आरोग्यांच्या सुविधांवर भर



देताना, महिलांच्या हक्कांसाठी आवाज उठवितांना, गरीब गरजूना मदत करुन समाजात समानतेचे तत्व रुजविन होत्या. समानता निर्माण करताना अहिल्याबाई केवळ एक व्यक्ती नसून स्त्रीशक्तीचा, नवचैतन्याचा स्त्रोत असल्याचे कायम जाणवते.

संकटे, दुःखे येण्याचे कोणाला चुकले आहे. कदाचित मानवी भावभावना सुखदुःखाच्या खेळातच लपलेल्या असतात. इ.स. १७५४ मध्ये खंडेराव कुम्भेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्युनंतर सासरे मल्हारराजांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. त्यानंतर १२ वर्षांनी स्वतः मल्हारराव होळकर स्वर्गवासी झाले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या मालवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. एकामागून एक आलेल्या दुःखातून जन्म झाला तो एका रणरागिणीचा! सर्व दुःखातून सावरुन राष्ट्ररक्षणासाठी, धर्मरक्षणासाठी, गोरगरीबांचे आसवे पुसण्यासाठी तत्पर झालेल्या शूरसेनानी अहिल्याबाईंचा पुर्नजन्म झाला असावा असे वाटते. राजनीती, युद्धनीती, सैन्यव्यवस्था, न्यायदानव्यवस्था उत्तमरीत्या सांभाळताना महानशासक म्हणून आजही अहिल्यादेवी ओळखल्या जातात. 'मनगटात बळ, चातुर्य, बुद्धी असणाऱ्या अशा स्त्री शक्तींचा जन्म होता जो स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवणारा होता.' असे मला वाटते.



'धर्मो रक्षति रक्षित!'

जो धर्माचे पालन करतो त्याचे धर्म रक्षण करतो. यानुसार आपल्या धर्माचे रक्षण करण्यासाठी, धर्मनिष्ठा जोपासण्यासाठी, धर्मशक्ती वाढविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. आणि आजही ती काळाची गरज आहे. अशी एक निष्ठावान राज्यकर्ती जी हिंदू धर्म रक्षणासाठी तसेच तो वाढविण्यासाठी कायम प्रयत्नशील असल्याचे सोदाहरण इतिहास आपल्याला देतो ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या रूपाने!

"यदा यदा ही धर्मस्य
ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य, तदात्मानं
सृजाम्यहम्॥"

जेव्हा धर्माचा ऱ्हास होतो आणि अधर्माची वाढ होते तेव्हा तेव्हास्वतः देव प्रकट होऊन धर्माचे रक्षण करतात. त्याप्रमाणे मोगल आक्रमणांमुळे धर्म संकटात आला तेव्हा अहिल्याबाईंसारखी रणरागिणी आदिशक्तीच्या रूपाने अवतरली. मोगलांनी उद्ध्वस्त केलेल्या हून अधिक मंदिरांचा जिर्णोद्धार या पुण्यश्लोक अहिल्येने केला. गोरगरीब जनतेसाठी धर्मशाळा उभारल्या. नदीघाट, गंगाघाट, सुरत, द्वारका, काशी, वाराणसी, उज्जैन येथे विष्णुमंदिरे बांधली. आजची या मंदिरांची बांधकामे पुण्यश्लोक अहिल्याबाईंची धर्मनिष्ठेची साक्ष देतात. चारधाम ठिकाणी धर्मशाळा उभारून, अन्नछत्रांची सोय करून लोकांच्या आस्थेला आणि धार्मिक वृत्तींना पाठिंबा दिला.



'प्राचीन अन् समृद्ध एक धर्म
पंथ, संप्रदाय अन् उपासना जिथे
ब्रह्मा, विष्णू, महेश तिथे
शाश्वत सुरेख मिलाफ दिसे
मोक्ष, कर्म, आत्मा वसे
अशी महती सर्व जगती
तो एकचि 'हिंदू धर्म' असती...'

रस्ते, देवालये, नदीवर वाहतुकीसाठी नावांची सोय करून शक्ती आणि आस्था यांचा दुहेरी संगम साधणारी धर्मनिष्ठ लोकमाता अहिल्याबाई! समाजाच्या आणि संस्कृतीच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील असणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाईंची स्त्रीशक्ती रूपाने प्रचिती येते. असं म्हणतात, 'आवाज असणारी स्त्री ही निश्चितच एक मजबूत स्त्री असते' आणि मला असं वाटतं अशी स्त्री शक्ती अहिल्याबाईंच्या रूपाने जन्माला येते.

पती निधनानंतर काही काळाने मराठ्यांचे पराक्रमी सेनानी मल्हारराव यांचेही निधन झाले त्यावेळी अहिल्याबाईंनी राज्यकारभार सांभाळला. पण त्याकाळात ते मनाविरुद्ध होते. अशावेळी स्त्री' म्हणून अहिल्याबाईंना विरोध झाला. माळवा प्रांतावर आक्रमणे करण्यासाठी पेशवे सरदार चालून आले. तेव्हा राणी अहिल्याबाईंनी पेशव्यांना पत्र लिहून 'आम्ही युद्धाला तयार आहोत. माझ्याबरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल. मी हरले तर कीर्ती करून जाईल पण आपण हारलात तर तोंड दाखवायला जागा राहणार नाही!' अशी धमकीवजा सूचना देणारी मुत्सद्दी स्त्री जी शौर्य आणि धैर्य यांच्या रथावर आरूढ झालेली महान शासक होती



त्याकाळात महिलांची फौज निर्माण करणारी ही भक्कम स्त्री आणि तिचा करारीबाणा अनुभवताना नुसत्या कल्पनेने अंगावर शहारा आणतो. याच इतिहासाची पुनरावृत्ती 'ऑपरेशन सिंदुर' या सैन्यदलाच्या कारवाईत दिसून येते. आजही अहिल्याबाईंच्या विचारसरणीचे नेतृत्व कर्नल सोफिया कुरेशी व विंग कमांडर व्योमिका सिंग करताना दिसतात.

स्त्री शक्ती हा समाजनिर्मितीचा मुख्य घटक आहे. स्त्री म्हणजे विश्वनिर्मितीचे साधन आहे. आस्तित्वाची ज्योत आहे. अशी ज्योत जी तिमिरातून प्रकाशाकडे नेते. ही ज्योत अहिल्याबाईंच्या रूपातून जन्मली आणि आपल्या विचारसरणीने इतिहासाची पाने सुवर्ण अक्षराने भरली. इतिहासातील अशी व्यक्ती की नव्या समाजाला दिशा देणारी तत्वे जिच्याकडे होती. त्यांनी दिलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक घटकांतील विचारप्रवाह म्हणजे नव्या युगाची सुरुवात होय. त्यांच्या विचारसरणीचा अभ्यास करताना व्यक्तीला योग्य दिशेची निवड करता येते. उदाहरण द्यायचे म्हटले तर, एका गायीच्या वासराला भरधाव रथाने ठार केल्याचे पाहताक्षणी रथारूढ असणारा आपलाच मुलगा असूनही मृत्युदंडाची शिक्षा देणाऱ्या त्या मातेने मुक्या मातेला दिलेला न्याय होता. समानतेचे तत्व निर्माण करताना नकळत भूतदया श्रेष्ठ असते हे समजते.

कुटुंबव्यवस्था प्रेम, निष्ठा आणि आदर यावर आधारित असते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे लोकमाता अहिल्याबाई! ज्या खंडेरावांच्या पत्नी, मल्हाररावांच्या सूनबाई, माणकोजी शिंदेंच्या सुकन्या तर संपूर्ण मालवा प्रांताच्या राजमात अन् संबंध भारतभूमीच्या लोकमाता होत्या, राजगादीवरे बसल्या.



पासून न्यायनिवाडा करताना पक्षपात होणार नाही याची डोळ्यात तेल घालून काळजी घेणाऱ्या न्यायप्रिय अहिल्याबाईंकडून न्यायनिष्ठता समजते. लढाई न करता केवळ शब्दबाणाने युद्ध जिंकता येते ते रघुनाथराव पेशव्यांना पाठविलेल्या पत्रातून लक्षात येते. मालवा प्रांताला अधिकाधिक समृद्ध करण्यासाठी, जनतेकडून कर गोळा करण्याआधी रोजगार मिळवून देण्यासाठी विविध उपाययोजना करणारी, पाणी अडवा पाणी जिरवा ही योजना राबविणारी, तलावांची बांधणी करून जलव्यवस्थापनाकडे लक्ष देणारी ही लोकमाता शेतकरी आणि सामान्य जनतेच्या सेवेस कायम तत्पर राहिली.

महानशासक अहिल्याबाईंचे कार्य म्हणजे स्त्रीशक्तीचा अखंड प्रेरणास्त्रोत होय. लोकांच्या आस्थेला जपणाऱ्या, धर्माचे रक्षण आणि विस्तार करण्यास कायम कटिबद्ध असणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाईंविषयी इंग्रजी लेखक, 'मॉरेन्स' लिहितो की, "जगातील सर्वांत महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्यविळेस पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नाव सर्वप्रथम घेतले जाईल."

राजमाता अहिल्याबाई होळकर एक आदर्श स्त्री शासक, महापराक्रमी, त्यागमूर्ती, समाजसुधारक, सर्वसामान्य जनतेची हक्काची माय होत्या. धर्म, दया आणि कर्तव्य यांचा मिलाफ होता. स्त्रीशक्तीच्या नाजवल्य इतिहासाची साक्ष आहेत. अशा न्यायनिष्ठ प्रशासक असणाऱ्या माझ्या महाराष्ट्र कन्येचा इतिहास पराक्रमाची गाथा सांगतो तर आजच्या मध्यप्रदेशात स्फूर्तीची गीते गातो. अन् अखंड भारतभूमीत त्यांच्या विचारसरणीचा प्रभाव आजही दिसून येतो.



'माणकोजी शिंदेची सुता असे निष्ठावान
पराक्रमी मल्हारराव यांची सून कर्तृत्ववान
जनहित जपणारी महान राज्यकर्ती ती
राष्ट्र, संस्कृती विकास साधणारी तत्त्वज्ञानी ती
धर्मरक्षिणी ही आरूढ शौर्याच्या रथावरती,
ही लोकमाता वंदनीय तिन्ही जगती...'

माया, ममता, शौर्य, त्याग, कर्तव्य, धर्मनिष्ठ, न्यायनिष्ठ, मर्दानी अशा विराट रूपांचे दर्शन पुण्यश्लोक अहिल्याबाई यांच्या कार्यातून घडते. ही रणरागिणी हातात दोन माले घेऊन रणांगणावर शत्रूचा सामना करते. शत्रूला गिलंकृत करते तेव्हा स्त्री शक्तीचे विराट रूप डोळ्यांसमोर उभे राहते. लोकमाता अहिल्याबाईंच्या रूपाने स्त्री शक्तीच्या ज्वलंत इतिहास आजही साक्ष देतो तेथे या वर्तमानात वैष्णवी हगवणे हुंडाबळी ठरलेली आणि तिच्यासारख्या कैकजणी, गोहत्येचा वाढता काल, धर्म विचारून पहलगाम येथे केलेल्या हत्या, दोनकरी आत्महत्या, स्त्री अबला समजून कितीतरी निर्भया जन्माला येऊन मरत आहेत. अशा कितीतरी घटनांनी मन अस्वस्थ होते. अहिल्येची शिक्षा होऊन जगावे का? असा प्रश्न पडतो. अशावेळी इतिहासात मन रमते. रमलेल्या मनाला आपल्या इतिहासातून स्फूर्ती मिळते. नकळत इतिहासाला अचूक न्यायनिवाडा करणारी, गोरगरिबांचे अश्रू पुसणारी धर्मनिष्ठ पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांसारखी स्त्रीशक्ती पुन्हा मागावी असा मोह होतो. कारण; पुण्यश्लोक अहिल्यामाता स्त्रीत्वाचा अखंड उगमस्त्रोत असणारी हू आमची प्रेरणा आहे. आजवर विविध नकारात्मक घटनांनी, समाजहिताला



मनाला आलेली मलम क्षणार्धात तुझ्यावर केलेल्या लेखनातून खाडून टाकली. खऱ्या अर्थाने राजमाता अहिल्याबाईंच्या कार्यातून घडलेली स्त्रीशक्तीची प्रेरणा आज एका स्त्री'ला मिळाली. अशा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना माझा मानाचा मुजरा!

जय हिंद! जय भारत!

स्पर्धक गट- ४.

स्पर्धकाचे नाव - श्रीमती गोगावले प्रिया जनार्दन
जिल्हा - पुणे.
मोबाईल नं. - ९८९०७९८१७३
९९२१६७६३०७.

वयोगट 21 onwards

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर
यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त
राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धा

नाव :- सौ. राखी योगेश तोडणकर.

पत्ता :- मु. पो. दाभोळ (मंडारवाडा)
तालुका - दापोली
जिल्हा - रत्नागिरी.
पिन - ४१५ ७०६

मोबाईल :- ९७६६२२१४५४ / ८८०५५४५८८५

निबंधाचा विषय :- राजमाता अहिल्याबाई -
स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.

वयोगट ४ :- 21 वर्षापुढील



3. राजमाता अहिल्याबाई - स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास.

राज्या असंख्य झाल्या या जगात,
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्व जिचा आहे या हृदयाला,
फक्त ती महाराणी,
अहिल्यादेवी होळकरच्यं झाली.

शनिवार दि. 31 मे 2025 रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची 300 वी जयंती आहे. अहिल्याबाई होळकर यांनी भारतीय इतिहासाच्या कालपटावर स्त्री-व्यक्तिमत्वाचा ठसा उमटवला. अहिल्यादेवी होळकर या अशा पहिल्या महिला होत्या ज्यांनी स्त्रियांची स्वतंत्र सेना बनवून नारी शक्तीचा परिचय जगाला करून दिला. एक अतिशय योग्य शासक व संघटक न्यायप्रियता, पराक्रमी योद्धा आणि सर्व-श्रुत धनुर्धर या सर्व गोष्टींमध्ये पारंगत असणाऱ्या तसेच होळकर घराण्याच्या 'तत्वज्ञानी राणी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशा या महाराणी राजमाता अहिल्याबाई होळकर....!!!

त्यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !!

नारीशक्तीचे प्रेरणास्थान असणाऱ्या अहिल्यादेवींचे समग्र आयुष्य व्रतस्थ आणि लोककल्याणाला समर्पित होते. वैयक्तिक आयुष्यात कोसळणाऱ्या संकटांच्या सरी स्वतः झेलून त्यांनी सामान्यजनांच्या डोक्यावर मायेचे छत्र धरलेले होते. शिवभक्तीतून मिळणारे मनोबल ही त्यांची जीवनप्रेरणा होती. त्यांचे समग्र जीवन आज भारतीय जनतेची प्रेरणा झाली आहे. आधुनिक काळात आपण जिच्याकडून चिरंतन प्रेरणा घेऊ शकतो अशी ही विरक्त, शिवभक्त आणि कर्तव्यदक्ष देवी अहिल्या आहे. चौंडीसारख्या गावात पेशवे-होळकरांची अनुभवी नजर तिला अचूक हेरते काय आणि ती मालव्याची राणी बनते काय? नशिबाने पदरात टाकलेले दान तिच्या अंगभूत गुणांनी ती लोककल्याणासाठी वापरते काय? सगळेच अद्भुत....!

Scanned with OKEN Scanner



एकमेवाद्वितीय....!

वैयक्तिक जीवनात कितीही दुःखे कोसळली तरीही त्यांना खंबीरपणे सामोरे जात कुशल नेतृत्व करणारी ही व्रतस्थ राणी. कुटुंबातील सुमारे तेवीस जणांचे मृत्यू तिने पाहिले. स्वतः कर्तव्यदक्ष असणाऱ्या अहिल्येला मुलाचा बेजबाबदारपणा, बदफैलीपणा पहावा लागला. स्वतः सती जाण्यापासून तिला तिच्या सासऱ्यांनी रोखले पण ती तिच्या मुलीला सती जाण्यापासून थांबवू शकली नाही. आधुनिक काळात लहानसहान गोष्टींमुळे नैराश्येच्या खाईत जाणारे, व्यसनांचा घातक मार्ग स्वीकारून सरळ शरणागती पत्करणारे अनेक जण दिसून येतात, त्यांनी अहिल्यादेवींकडे पहावे....! फिनिक्स पक्षी राखेतून जन्म घेऊन आभाळ गाठतो, अशी आख्यायिका आहे, पण आपल्याच मातीत जन्मलेली ही अजरामर यशोगाथा आपल्या पिढीला कधी प्रेरणा देणार? घरसंसार आणि राजगादी एकाचवेळी सांभाळणारी ही खरी स्त्रीशक्ती आहे. वर्क-लाइफ बॅलन्स - कुटुंब आणि करीयर यांच्यात संतुलन साधणे हे भारतीय स्त्रीच्या रक्तातच आहे. ते शिकवायला कुण्या बाहेरच्या उदाहरणांची गरज आहेच कुठे? भारतीय मातीत रुजलेल्या मुल्यांचा अंगीकार करून आपल्याच इतिहासात डोकावण्याची म्हणूनच गरज आहे. देवी अहिल्या म्हणूनच आजही प्रेरक आहे.

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चौंडी या गावी झाला. अहिल्याबाई बालपणी अतिशय चौकस आणि हुशार होत्या. बालपणी वयाच्या ८ व्या वर्षी त्यांचा विवाह खंडेराव होळकरांशी झाला. चौंडी गावातील शिंद्यांची ही छोटीशी कन्या घरातले रांगडे संस्कार बरोबर घेऊन मुकदम एका विशाल राज्यात, अर्थात श्रीमंत मल्हारराव होळकरांच्या घरात, पराक्रमाने स्थापित झालेल्या मालव प्रांतामध्ये सून म्हणून आली. मालव प्रांतातील राजदरबार, तेथील सर्व कामांची पद्धत तिने बघून-शिकून शिकत अत्यंत उत्तमरित्या आत्मसात केली. यामुळेच तिने आपल्या राज्याची धुरा इतक्या उत्तम रीतीने सांभाळली की, आज त्यांची जी ओळख आहे त्यात ती एक 'विशाल मातृत्वभावाची धनी' अशी एक संवेदनशील स्त्री म्हणून समोर येते. त्यांचे जीवन आणि राज्यकारभार हे एक प्रेरणास्थान आहे. त्या १७६७ ते १७९५ पर्यंत



माळवा प्रदेशाच्या शासक होत्या.

* राजकीय कारकीर्द :-

- अहिल्याबाई यांनी आपल्या राज्यकारभारात अनेक महत्वपूर्ण बदल केले. त्यांनी लोकांना न्याय दिला, शिक्षणाला प्रोत्साहन दिले आणि सामाजिक सुधारणाही केल्या.
- त्यांनी महिलांच्या हक्कांसाठी आवाज उठविला आणि विधवांना मालमत्तेवर अधिकार मिळवून दिला.
- त्यांनी डाकव्यवस्था सुरू केली आणि लोकांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न केले.
- अहिल्याबाई यांनी महेश्वर येथे आपली राजधानी स्थापन केली आणि तेथील मंदिरांची आणि सार्वजनिक कामांची देखरेख केली.

* सामाजिक कार्य :-

- अहिल्याबाई यांनी लोकांना शिक्षण आणि ज्ञान मिळविण्यास प्रोत्साहन दिले.
- त्यांनी सामाजिक सुधारणांसाठी काम केले, ज्यात बालविवाह आणि सतीप्रथा यांसारख्या वाईट रूढींविरुद्ध लढणे समाविष्ट होते.
- त्यांनी लोकांना पाणी आणि स्वच्छतेची सुविधा उपलब्ध करून दिली.
- अहिल्याबाईंनी अनेक जलव्यवस्था आणि मंदिरे बांधली, ज्यामुळे लोकांना मदत झाली.

अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या राज्यकारभारातून एक अद्वितीय आणि जाज्वल्य इतिहास निर्माण केला आहे. महेश्वर येथील अहिल्यादेवींची राजधानी ही जणू काव्य, संगीत, कला व उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहीर अनंत फंदी यांना व संस्कृत विद्वान खुशालीराम यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला. कारागिरांना, मूर्तिकारांना व कलाकारांना त्यांच्या राजधानीत सन्मान व वेतन मिळत असे. त्यांनी महेश्वर शहरात एक कपड्याची गिरणीपण सुरू केली. मल्हारराव यांच्या गैरहजेरीत सर्व कारभार करण्यात त्या पारंगत झाल्या. ज्याकाळी दळणवळणाची साधने फारच कमी होती किंवा म्हटले तर नव्हती अशी परिस्थिती होती अशा खडतर काळात त्यांनी भारतातील



तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी व राज्यात मंदिरे, धर्मशाळा, तलाव, विहीरी, पाणपोई, घाट अशी अनेक समाज उपयोगी कामे केली. आज ही वास्तुशिल्पे व त्यांनी उभारलेली स्थापत्य कला मातोश्रींच्या भव्य कार्याची साक्ष देत उभी आहेत. वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संस्कृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोरगरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दिले.

* सेना तुकडी:-
ज्याप्रमाणे अहिल्यादेवींनी लोककल्याण आणि समाजसुधारणा केल्या त्याचप्रमाणे लोकांमध्ये समानता आणण्याचे कार्य देखील केले. आपल्या सैन्यामध्ये पुरूषांच्या बरोबरीने महिलांनाही सामावून घेतले. महिलांची एक मोठी तुकडी तयार केली. म्हणूनच त्यांना समान न्याय करणाऱ्या न्यायदेवता म्हणूनही ओळखले जाते. स्त्रियांची फौज निर्माण करणारी ती चतुर सेनापती होती. अहिल्यादेवी एक आदर्श परराष्ट्रमंत्री, धार्मिक व्यक्ती, दानशूर लोकोपयोगी कार्य करणारी महामाता होती. इंग्रजांच्या संकटाविषयी सदैव अत्यंत जागरूक असणारी एकमेव राज्यकर्ती, आदर्श न्यायाधीश होती.

* शेती व शेतकरी उद्धाराची कार्य:-
शेतकरी सुखी तर जगु सुखी या संकल्पनेतून शेतकऱ्यांना जाचक करातून मुक्त केले. शेतकरी हा ~~जगाचा~~ जगाचा अन्नदाता असतो, हे ध्यानात घेऊन त्यांनी आपल्या राज्यात शेतकरी आणि शेती यांच्या हिताचा विचार केला. शेतकऱ्यांना विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. होतकरू शेतकऱ्यांना जमिनी दिल्या आणि फळझाडांची लागवड करण्यास प्राधान्य दिले. शेतीवरील कर उत्पन्नाप्रमाणे आकारण्यास सुरूवात केली. त्यांच्या राज्यात शांतता, आणि सुव्यवस्था असल्यामुळे शेती, उद्योग आणि व्यापाराचाही उत्कर्ष झाला. परिणामी त्यांच्या कारकिर्दीत राज्याचे उत्पन्न वाढले.

* चोर व दरोडेखोर यांचे मत परिवर्तन:-
त्या काळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेची चोर दरोडेखोर व भिल्ल लूटमार करीत असत. अशा लूटारू लोकांना



ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून घेतले व पशुधन गायी, म्हशी आणि शेतजमिनी दिल्या व त्यांचे मतपरिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले. त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. भिल्ल लोकांना मिलकवडी कर घेण्याची परवानगी दिली. राज्यातील गोंड, भिल्ल आदी जमातींना त्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले.

* न्यायप्रियता, कर्तव्यकठोरता आणि एकत्वाचा धागा :-

अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्वदूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजी होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले. न्यायदानाबाबत अहिल्यादेवी कर्तव्यकठोर होत्या. कर्तव्यापुढे त्या नातेगोतेही पाहत नसत. अहिल्यादेवी म्हणजे सात्विकता आणि कर्तव्यकठोरता यांचे अजब रसायन होते. वाटसरूंना सुविधा पुरविणे, वाटेवर झाडे लावणे, वाग पोथा, अन्नछत्रे या सुविधा देत तो संस्कार समाजमनात रुजवला. त्यांची धर्मनिष्ठा आंधळी नव्हती. विधवा स्त्रियांना त्यांचे अधिकार मिळवून देणे, त्यांना दत्तक घेण्याचा हक्क देणे, याबाबत त्या नेहमीच दक्ष राहिल्या. हुंडा या विषयात त्यांचे एक वाक्य प्रसिद्ध आहे, "अहो वधूला देवी म्हणावे, लक्ष्मी म्हणावे आणि तिच्या प्रवेशाचे, आदिमायेच्या स्वागताचे पैसे घ्यावे, हे कसे? स्त्रीच्या कौतुकाची नुसती सोंगे, नुसता खोटा देखावा." विविधता असलेल्या आपल्या देशात एकात्मता रुजविण्याचे काम अहिल्यादेवींनी केले. त्यांच्या धार्मिक कार्यामध्ये एक व्यापक दृष्टी होती ती म्हणजे या देशातील विविध भागात राहणाऱ्या लोकांना एका सांस्कृतिक साखळीने जोडून त्यांच्या मनात देशाबद्दल आपलेपणा निर्माण करणे. त्यांच्या या कार्यामुळेच उत्तरेतील केदार, काशी विश्वनाथपासून दक्षिणेतील रामेश्वरपर्यंत महाराष्ट्रातील जेजुरी आणि पश्चिमेकडील द्वारके-पासून पूर्वेकडील जगन्नाथपुरीपर्यंतचा प्रदेश, भाषा, विविध जाती जमातीतील समाज एका सांस्कृतिक बंधनाने एकत्र येण्यास कळत नकळत मदत झाली. द्वारका ते गया आणि गंगोत्री ते रामेश्वर, जवळपास सर्व नद्यांच्या बाजूने घाट बांधणे आणि तीर्थयात्रेच्या सोयीसाठी धर्मादाय उपक्रम सुरू करणे, हे सर्वकाही अहिल्याबाईंच्या दृढ निश्चयाचे फलित आहे. गुजरातमधील काठियावाडमधील सोमनाथ ज्योतिर्लिंग आणि वाराणसीमधील काशी विश्वनाथ -



ज्योर्तिलिंगाची पुर्नबांधणी, हे केवळ अहिल्याबाईच्या समर्पणाचे प्रतिबिंब आहे.

* लोककल्याणकारी अहिल्यादेवी :-

भगवंताचं अधिष्ठान असलेल्या राज्यात राज्यकर्ता हा नेमका कसा असतो, याचं सर्वोत्तम उदाहरण म्हणजे अहिल्यादेवी. आजही मल्हारच्या वाड्यावर अहिल्यादेवींनी राज्यकारभार करताना घेतलेली प्रतिज्ञा लिहीलेली आहे. या प्रतिज्ञेत त्या म्हणतात- 'माझे कार्य प्रजेला सुखी करणे आहे. माझ्या प्रत्येक कृतीला मी स्वतः जबाबदार आहे. सूत्तेच्या अधिकारामुळे मी येथे जे जे काही करतू आहे त्या प्रत्येक कृत्याचा जाब मला परमेश्वराकडे देणे आहे. परमेश्वराने ज्या जबाबदाऱ्या माझ्यावर सोपवल्या आहेत, त्या मला पार पाडावयाच्या आहेत. त्यांच्या राज्यकारभाराचे अधिष्ठान म्हणजे ही प्रतिज्ञा. 'एक भारत- श्रेष्ठ भारत, एक हिंदू- श्रेष्ठ हिंदू' या उक्तीची बीजे पेरणाऱ्या जनहितरक्षक अहिल्यादेवी! खंडेरावांच्या वीर मरणानंतर अहिल्यादेवींनी राजवस्त्रांबरोबरच साऱ्या अलंकारांचा, रंगांचा, उपभोगांचा त्याग केला. आजन्म पांढरीशुभ्र वस्त्रे वापरली. 'तुझा जन्म या प्रजेसाठी आहे. तू या प्रजेची माता हो. या रयतेचे, गोरगरीबांचे प्रपंच सुखाचे कर.' ही पितृतुल्य सासऱ्यांची आज्ञा अहिल्यादेवींनी आजन्म पाळली. माणसाच्या जाती-धर्मापेक्षा त्याच्यातील कर्तृत्वाला, निष्ठेला, पराक्रमाला अहिल्यादेवींनी महत्वाचे स्थान दिले. स्त्रिया सक्षम व्हाव्यात आणि त्यातून सक्षम कुटुंब व्यवस्था उभी राहावी व त्याद्वारा सामाजिक समरसतेचा परिप्रेक्ष्य व्यापक व्हावा यासाठी त्यांनी तीनशे वर्षापूर्वीच सुरू केलेल्या मुलींच्या पाठशाळा, शास्त्रशिक्षण देणाऱ्या सैनिकी शाळा, खेड्यापर्यंत न्याय मिळावा याची केलेली व्यवस्था, कुटिरोद्योगास दिलेले प्रोत्साहन, हुंडाबंदी, दारूबंदी, जंगलतोडीस विरोध करत स्त्रियांना दिलेली मानसिक सुरक्षा... हे सारेच आश्चर्यचकीत करणारे आहे. साहजिकच राजमाता अहिल्यादेवी होळकरांना रयतेने माताश्री, आईसाहेब या संबोधनाने सन्मानित केले. असे अतुलनीय कार्य करूनही आपला नामोल्लेख होणार नाही याची त्या काळजी घेत. पूर्णत्वास गेलेल्या प्रत्येक वास्तूवर कामावर 'मी शंकर आज्ञेवरून' अशी मोहोर उमटविण्यात येत असे.



* कुशल प्रशासक :-

सासरे मल्हारराव्याच्या निधनानंतर देवाब्राम्हणांसमक्ष लोक-कल्याणासाठी वैयक्तिक १५ कोटीच्या संपत्तीवर तुळशीपत्र ठेवले. एक विधवेचे विरक्ती जीवन जगत असतांना राज्याच्या कवडी कवडीस्तव, होळकरशाहीच्या कितिस्तव, पेशव्यांच्या उग्रती-स्तव, मराठी राज्याच्या रक्षणास्तव अहिल्याबाईंनी जीवाचे रान केले. गळ्यात सोन्याचा मणी देखील न घालणारी अहिल्याबाई मुत्सदी पणात सर्वात सरस होती. एकीकडे व्यक्तिगत वैराग्य तर दुसरीकडे राज्याच्या रक्षणास्तव खबरदारी! हे पाहिल्यावर त्यांच्या विषयीचा आदर दुप्पट वाढतो. राज्याचा खजिनाच काय सारे राज्यच प्रजेचे. आपण त्याचे केवळ विश्वस्त, तेही अतिप्रामाणिक, अतिविश्वासू हीच त्यांची भावना होती.

अशी विलक्षण बुद्धीमत्ता, सावध परंतु लोककल्याणकारी राजधुरंधरत्व, शौर्य, शुद्ध धवल चारित्र्य, एकनिष्ठ शिवभक्ती, शासक असूनही रयतेबद्दल कळवळा, रंजल्या-गांजल्यांविषयी जिव्हाळा, आणि त्यांच्या विकासासाठी राबवलेल्या विविध लोक-कल्याणकारी योजना, तसेच अफाट धनसंपत्तीची मालकिण असूनही विलसित करणारी अनासक्त वृत्ती, साधी राहणी.... यांमुळे 'राजमाता' ते 'लोकमातु' झालेल्या अहिल्यादेवींनी जातीपाती संप्रदाय यांच्या पलीकडे जाऊन व्यापक हिंदुत्व जागरासाठी खाजगीतून दानधर्म करीत अनेक हिंदु तीर्थक्षे-त्रांचा, मंदिरांचा जीर्णोद्धार करीत 'महायोगिनी, राजमाता, पुण्यश्लोक' या पदव्यांना सार्थकता प्राप्त करून दिली. गंगेचे पावित्र्य आणि सुवर्णाचा अस्सलपणा ज्यांच्या व्यक्ति-मत्वाचा मुलामा आहे त्या अहिल्यादेवी म्हणजे सामाजिक समरसतेचे अत्युच्च शिखर कांचनगंगा आहेत. अशा या दातृत्वातील मेरुमणी असणाऱ्या राजमाता- अहिल्याबाई होळकर यांना त्यांच्या जन्म त्रिशताब्दी निमित्त विनम्र अभिवादन! अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण कारकीर्द असणाऱ्या या समर्पित लोकमातेचं गुणगान पिढ्यानपिढ्या भारतात गायलं जाईल! त्यांना त्रिवार मानवंदना!

धन्यवाद!

जय हिंद!

जय भारत!



राजमाता अहिल्याबाई : स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास
(३१ मे. १७२५ - १३ ऑगस्ट, १७९५.)
(राज्यकालावधी इ.स. १७६७ - इ.स. १७९५)

या भारतातील मालव्याच्या, तत्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जातात नर्मदा तीरी, इंदोरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली मल्हाररावांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेले होते. त्या आधाराने अहिल्याबाईंनी इ.स १७६६ ते इ.स. १७९५ म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत मालव्यावर राज्य केले होते. अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे इ.स. १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी (मल्हारपीठ) खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले होते. मल्हारराव होळकर पुण्यास जाताना चौंडीस थांबले होते. आख्यायिकेनुसार, ८ वर्षाच्या अहिल्यादेवीना, मल्हाररावांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला स्वतःचा मुलगा खंडेराव याची वधू म्हणून आणले. मल्हारराव होळकरांच्या त्या सून होत. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे इ.स. १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर सासरे मल्हाररावांनी अहिल्याबाईना सती जाऊ दिली नाही. १२ वर्षांनंतर मल्हार होळकर हे ही मृत्यू पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या त्या लढाईत अहिल्यादेवी स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांनी सेनापती म्हणून नेमणूक केली.



अहिल्याबाई होळकर उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी आयुष्यभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले. एवढंच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक शहरं आखली. प्रसिद्ध हिंदू मंदिरांचा त्यांनी जीर्णोद्धार केला. महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेस कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती. अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही, इंदूर या खेड्याचा विकास करून त्याचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे, हे अहिल्यादेवींनी केलेले फार मोठे काम होते. त्यांनी मालव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले. हिंदू मंदिरांमध्ये कायमस्वरूपी पुजा केली व अनेक दाने दिली. मालव्याबाहेरही त्यांनी मंदिरे, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या. ज्या काळी दळणवळणाची साधने फारच कमी होती किंवा म्हटले तरी नव्हती अशी परिस्थिती होती. अशा खडतर काळात त्यांनी भारतातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी प राज्यात



ठिकाणी व राज्यात मंदिरे धर्मशाळा, तलाव, विहिरी, पाणपोई घाट अशी अनेक समाज उपयोगी कामे केली. आज ही वास्तुशिल्पे व त्यांनी उभारलेली स्थापत्य कला मातोश्रीच्या भव्य कार्याची साक्ष देत आहे. वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संस्कृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोरगरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दिले. त्यांच्या कामगिरीचा हा दुहेरी बाणा निश्चितीच अभिमानास्पद आहे.

शेतकरी सुखी जग या संकल्पनेनंतर शेतकऱ्यांच्या जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहिरी बांधल्या. शेतकऱ्यांना गोपालनाचे महत्त्व पटवून प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवून आणले. या काळात सती जाण्याची मोठी रुढी व परंपरा होती. सती गेल्याने पुण्य न गेल्याने पाप असा समाज समाजात रुढ होता. रामायण आणि महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाहीत असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालातराने १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांचा प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट चाल कायद्याने बंद करण्यात आली यावरुन अहिल्याबाई होळकर यांच्या दूरदृष्टतेची प्रचीती आपणास येते.

महेश्वर येथे संस्कृत पाठशाला सुरु केली अन्नछत्र घातली. अनेक ठिकाणी मंदिरे बांधली. गुजरातेतील सोरटी सोमनाथच्या मंदिराचा जिर्णोद्धार केला. असे पुण्यसंचयाचे काम अहिल्यादेवी करीत होत्या. तशातच त्यांचा नातू तेराव्या वर्षी मरण पावला.



काही दिवसातच जावई लढाईस कामी आला आणि मुलगीही सती गेली. आयुष्यभर कोळसलेल्या संकटांनी त्यांचा अंत पहिला होता. त्यांची प्रकृती बिघडत गेली आणि अखेर १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांनी शांतपणे मृत्यूला जवळ केले.

अहिल्यादेवींच्या सम्मानप्रीत्यर्थ भारत सरकारने २५ ऑगस्ट रोजी एक टपाल तिकिट जारी केले. या अशा शासनकर्तीस मानवंदना म्हणून इंदूरच्या विमानतळाचे नाव "देवी अहिल्या इंटरनॅशनल एअरपोर्ट (इंदूर)" असे ठेवण्यात आले आहे. आणि इंदूर विद्यापीठास 'देवी अहिल्या विश्वविद्यालय" असे नाव देण्यात आले.

महाराष्ट्रात सोलापूर विद्यापीठाचे नवीन नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ठेवण्यात आले आहे.

अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ १३ मार्च २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारने अहमदनगरचे नामांतर अहिल्यानगर असे केले.

Name- Ram Sudhakar Madavi
Mobile No. 8655485323
EI - rammadavi466@gmail.com.
Group - 4



पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर - एक आदर्श स्त्री शासिका

अहिल्याबाई होळकर हे नाव घेताच आपल्यासमोर येतात शुभ्रवस्त्रा, हाती शंकराची पिंडी घेतलेली सात्विक स्त्री... !! पण तिने २८ वर्षांत ज्या पद्धतीने राज्यकारभार केला, त्यामुळेच त्यांना लोकमाता, पुण्यश्लोक, देवी, गंगाजळ निर्मळ, धर्मपरायण, कुशल प्रशासक अशा अनेक पदव्या लोकांनी मनापासून अर्पण केल्या होत्या. !!

धार्मिक वृत्तीच्या अहिल्याबाईंनी केलेले सुराज्य, सुशासन खरोखर उत्कृष्ट दर्जाचे होते, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. अहिल्यादेवींचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी फक्त राज्य केले नाही तर त्याला पूरक अशी राजकीय संस्कृती घडवण्याचे कार्य केले. सुशासन, विकास, प्रशासन या लोकप्रशासनातील संकल्पांची मूल्ये त्यांच्या राज्य प्रशासनात दिसून येतात. अहिल्यादेवींचे प्रशासन विकास कार्याला प्राधान्य देणारे, मानवी संबंधाना प्राधान्य देणारे होते. अत्यंत प्रेमाने त्यांनी सामान्य माणसाचे हित बाघितले. प्रजेतील गरिबांना जास्तीत जास्त सुखाने जगता यावं इकडे लक्ष दिले. अहिल्याबाईंचा काळ पुरुषप्रधान असून सुद्धा, पती - मुलगा - मुलगी - जावई गमावल्यानंतरही त्यांनी न डगमगता, काळावर मात करत आपली 'आदर्श स्त्री शासिका' म्हणून मुद्रा उमटवली.

अहिल्यादेवींचा कालखंड हा परराष्ट्र संबंधाचा नसला तरी शेजारी राज्यांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याचा होता. रघुनाथ पेशवे जेव्हा इंदूरवर चाल करण्याची शक्यता निर्माण झाली तेव्हा ज्या कुशलतेने त्यांनी रघुनाथरावांना त्यापासून परावृत्त केले, त्यातून त्यांची कुशलता दिसून येते. आधुनिक स्वरूपाची लेखित राज्यघटना नसली तरी प्रजाहिताचा विचार करणाऱ्या, नियमांच्या आधारे चालणारी राजसत्ता स्वतः तर राबवलीच पण आपल्या सहकाऱ्यांनाही नियमांच्या चौकटीतच अधिकार राबविण्यासाठी प्रोत्साहन दिले. पुरुषप्रधान संस्कृतीत राहूनही अहिल्यादेवी इतरांच्या कलेने वागणाऱ्या नव्हत्या, तर प्रसंगी राजघराण्यातील पुरुष अधिकाऱ्यांना न्यायाने वागण्याची ताकीद देण्याची क्षमता त्यांच्यात होती. तुकोजी होळकर यांना लिहिलेल्या पत्रातून त्यांच्या संदर्भातील न्यायनिर्णयातून हे दिसून येते. कारण अहिल्याबाईंचे नेतृत्व केवळ राजकारणापुरते



राज्याचा एक प्रकार रक्षक राज्य असा आहे. अहिल्या-देवींची राजवट ही केवळ रक्षक राज्य प्रकारातील नव्हती. 'दुर्बलांचे सबलापासून रक्षण करणे' हे राज्याचे कर्तव्य असते आणि अहिल्यादेवींचे राज्य दुर्बलांचे रक्षण करणारे, जीवन सुरक्षितपणे जगता येईल अशी व्यवस्था करणारे, नैतिक मूल्यांची जोपासना करणारे राज्य होते. राजपद सांभाळताना ऋषितुल्यतेकडे वाटचाल करणाऱ्या अहिल्याबाईंचे सर्व जीवन जितेंद्रिय आणि विवेकशीलतेचे प्रतीक होते.

अत्यंत चोख कारभार, उत्तम न्यायनिवाडा, रयतेची काळजी, विचारपूर्वक घेतलेले निर्णय, सुलभ मार्गावर प्रशासन चालवण्यासाठी केलेले प्रयत्न, त्याचसोबत स्वतः अतिशय साधेपणाने राहतानाच तयार असणारी ४० हजारांपेक्षा जास्त लढवय्या सैनिकांची फौज यामुळे संपूर्ण भारतभर अहिल्याबाईंचा असणारा दरारा त्यांच्या सुशासनात आढळतो. २००० स्त्रियांची लढाऊ पलटण तयार करून आवश्यकता पडल्यास त्या लढू शकतील हा आत्मविश्वास त्यांनी दिला. तसेच दरोडेखोरांना शिक्षा न देता त्यांच्या हातांना काम देणारी पहिली राज्यकर्ती म्हणजे अहिल्यादेवी...!!

राजकारणाचे सूक्ष्म अवलोकन हा त्यांचा गुण वाखाणण्यासारखा धार्मिक असूनही धर्मांध नसलेल्या, ज्या कालखंडात जात-धर्म यांचा प्रचंड पगडा समाजावर होता, त्याच कालखंडात जात-धर्म पदप्रतिष्ठा न पाहता केवळ कर्तृत्व पाहणाऱ्या पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई म्हणजे मुत्सद्दी राजकारणी; सारा वसुलीची सालबारा पद्धत सुरू करणारी कुशल प्रशासक, समतोल न्याय देणारी न्यायदेवी, मंदिरे-घाट यांची देखभाल करणारी, वाटसरूंसाठी धर्मशाळा-पाणपोयी: विहिरी उभारणारी साध्वी या आणि अशा सर्व बिरुदांच्या ओझ्याखाली अपवादभूत व लोकोत्तर अशा सामाजिक क्रांतीचा संदेश देणारी क्रांतिकारक समाजसुधारकच म्हणावी लागेल.

ज्याप्रमाणे अहिल्यादेवी लोककल्याण आणि समाज सुधारणा केल्या, त्याच प्रेमाने त्यांनी लोकांमध्ये समानता आणण्याचे कामसुद्धा केले. अहिल्यादेवींच्या प्रशासनाचे वैशिष्ट्य त्यांच्या लोककल्याणासाठी असलेल्या सखोल बांधिलकीमुळे होते; ज्याने सामाजिक सुधारणांसह सुशासनाची जोड दिली होती. भूमिहीन शेतकरी, आदिवासी समुदाय, विधवांसह समाजातील उपेक्षित घटकांचे उत्थान करण्याच्या उद्देशाने त्यांची धोरणे सर्व-समावेशक होती, त्यांचे सामाजिक न्याय आणि कल्याणकारी



प्रयत्न सर्वांसाठी सुसंवाद, न्याय आणि समृध्दी ज्यांना चालना देणारे होते.

सती प्रथेविरूध्दची त्यांची लढाई यापैकी एक लक्षणीय उदाहरण म्हणावे लागेल. रामायण महाभारतात अनेक युध्दे होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाही असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने १८२९ साली सतीची चाल कायद्याने बंद केली त्यावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. त्यांनी आपल्या स्वतःच्या उदाहरणातून देखील 'सती' न जाता स्त्री कर्तृत्वाची झलक दाखवली होतीच...!!

'शेतकरी सुखी तर जग सुखी' या संकल्पनेतून शेतकऱ्यांना जाचक करातून मुक्तता, शेतकऱ्यांना गोपालनाचे महत्व पटवून प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन, पक्ष्यांच्या चारापाण्याची व्यवस्था म्हणून काही शेते राखीव ठेवणे, तसेच जलचरांसाठी कणकेचे गोळे पाण्यात सोडण्याची त्यांनी घालून दिलेली प्रथा, वनीकरण, जलसंवर्धन खाते यातून 'पर्यावरण' या विषयाबाबत अहिल्याबाईंचा व्यापक दृष्टीकोन दिसतो. पाण्याच्या उत्तम नियोजनामुळे त्यांच्या २८ वर्षाच्या कारकीर्दित कधीही दुष्काळ पडला नाही. 'प्रकृतीकडून जे मिळाले आहे त्याचे संरक्षण करणे' हे आपले दायित्व आहे' हा भाव, स्त्री म्हणून त्यांच्यातले 'सृष्टीपालकत्व' अधोरेखित करतो.

अहिल्याबाईंची लोककल्याणाची कीर्ती ऐकून अनेक विद्वान लोक त्यांची भेट घेण्यास येत आणि नंतर त्या ठिकाणीच रहात असत. अनेक विषयांचे विद्वान यांनाही त्या मुद्दाम बोलावून घेऊन त्यांना राजाश्रय देत असत. अनेक विषयांचे विद्वान असल्याने त्याकाळी महेश्वर 'नागरी संस्कृती, विद्वान व धर्माचे माहेरघर' म्हणून नावारूपाला आले होते. अहिल्यादेवी विद्येचे महत्व जाणत असल्याने त्यांनी ग्रंथांची हस्तलिखिते तयार करून विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली.

अहिल्याबाईंनी त्यांच्या अखत्यारित असलेल्या सर्वांस चांगले काम करण्यास प्रोत्साहन दिले. व्यापाऱ्यांनी चांगल्या कपड्यांचे उत्पादन केले. महेश्वर साडी आजही तितकीच लोकप्रिय आहे जिची सुरवात अहिल्याबाईंच्या काळात झालेली आहे. सहानुभूती देणारे शासन, निःपक्षपाती आणि जलद न्यायावर लक्ष, धर्म आणि धार्मिकतेच्या तत्वांवर राज्य चालवण्याचा पायंडा,



'सर्वधर्मसमभाव' हा शब्द ही जेव्हा वापरात नव्हता, त्यावेळी अहिल्याबाईंची सर्वांशी असणारी सर्वधर्मसमभावाची वागणूक त्यांच्या सक्षम व्यक्तिमत्वाचे दर्शन घडवते. शेतकरी हे शांततेत व दबावरहित होते. कोणतेही प्रकरण राणीच्या निदर्शनास आले तर ते कडकपणे हाताळले जाई.

अखंड हिंदुस्थानच्या दुभंगत जाणाऱ्या विध्वंसक काळाची सुरुवात होत असतानाच अहिल्याबाईंनी काही गोष्टी जाणीवपूर्वक करायला सुरुवात केली. अनादी अनंत काळापासून भारत ही 'धर्मभूमी' म्हणूनच ओळखली जात आहे. 'धर्म' हे भारतीयांच्या जीवनाचे शतकानुशतके असणारे जीवनसत्व होते. जेव्हा विज्ञान, राजकारण नव्हते तेव्हा धर्म हा होताच. याच सनातन धर्माच्या आधारावर अहिल्यादेवींनी लोककल्याणकारी कामे करताना, भावनिक एकात्मता, बंधुत्व भावना अखंड हिंदुस्थानच्या अंगी निर्माण केली. मंदिरे, धर्मशाळा, अन्नछत्र, बारव, वाडे, घाट, रस्ते, तलाव किल्ले दुरुस्ती, पूल बांधकाम इत्यादी विकास कामे सुरू करत तब्बल तीन लाख बेरोजगारांना रोजगार दिल्याचा परिणाम समाजावर सकारात्मक होऊन हिंदू धर्मीयांच्या आस्थेला भौतिक मिळाली. खंडित झालेल्या परंपरा नव्याने सुरू केल्यामुळे, एकात्मता वाढून नवचैतन्य निर्माण झाले. हे सर्व करताना त्या स्वतः मात्र अतिशय साध्या पद्धतीने राहात होत्या. इंदूर मध्ये त्यांच्या वाड्याकडे पाहिल्यास हे लक्षात येते.

अशा ह्या राजमातेने स्वतःच्या कर्तृत्वाच्या, दातृत्वाच्या जोरावर राज्याच्या लोकहितासाठी काम केले. रयतेला जोपर्यंत जाग आणि जाण येत नाही तोपर्यंत त्यांचे कल्याण होणार नाही, हे ओळखून त्यांनी हिंदुस्थानातील माणूस जागवला आणि जागवला. जनतेचा स्वाभिमान जागृत केला. परकीय आक्रमणांच्या काळात खऱ्या अर्थाने सुशासन निर्माण केले. नष्ट होत चाललेला धर्म आणि संस्कृती नव्याने उभारण्यात आपले संपूर्ण जीवन व्यतीत करणाऱ्या राजमाता अहिल्यादेवी म्हणूनच अनेक अर्थांनी 'आदर्श शासनकर्ती' होत्या ह्यात शंका नाहीच.

अशा या थोर कर्तव्यपरायण राष्ट्रमातेला शतशः प्रणाम...!!

नाव- डॉ. केतकी विश्वजीत भालखंडे
पत्ता- 101, लॅबर्नम सोसायटी,
plot F/51, संजीवन हॉस्पिटलजवळ,
शिवाजी चौक, खारघर, नवी मुंबई 410210



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त

राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धा

विषय : पुण्यश्लोक अहिल्याबाई :
आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व

स्पर्धकाचे नाव : कु. रेश्मा मधुकर गिरीगोसावी
वयोगट ४ : २१ वर्षापुढील
पत्ता : मोशीकाळभोर, पुणे.
दुरध्वनी क्र : ९६०४४४८०६३ / ९७६२१७२९१७



पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व

प्रस्तावना :

भारताचे हजारो वर्षांच्या इतिहासात शेकडो नेतृत्वकर्ते होऊन गेले. काहींनी सैनिकी ताकदीने आपली छाप उमटवली, काहींनी आध्यात्मिकतेने समाज घडवला, तर काहींनी लोककल्याणकारी राज्यकारभाराने नाव कमावले. परंतु, काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात जी केवळ त्यांच्या कार्यामुळे नव्हे, तर त्यांच्या मूल्यांमुळे इतिहासाच्या पलीकडे जाऊन भविष्यासाठी दीपस्तंभ ठरतात. अशा दैदिप्यमान व्यक्तिमत्त्वांमध्ये "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर" यांचे नाव अग्रस्थानी आहे. स्त्री म्हणून समाजात दुय्यम स्थान असलेल्या काळात, अहिल्याबाईंनी सत्तेची धुरा सांभाळून केवळ एक कुशल प्रशासक म्हणूनच नव्हे, तर एक न्यायप्रिय, धर्मनिरपेक्ष आणि लोकाभिमुख नेत्या म्हणून आपली ओळख निर्माण केली. त्यांच्या नेतृत्वगुणांची आणि कार्यशैलीची चिकित्सा केली, तर आपल्याला जाणवते की आधुनिक भारताच्या नेतृत्वासाठी त्यांचे आयुष्य आणि कार्य हे एक प्रेरणास्रोत आहे.

अहिल्याबाईंचे जीवन व नेतृत्वातील वाटचाल - एक थोडक्यात ओळख :

महिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला. एका साध्या कुटुंबात जन्मलेल्या अहिल्याबाईंना शिक्षणाची फारशी संधी नव्हती. परंतु, त्यांची बुद्धिमत्ता, करुणाशीलता आणि नेतृत्वगुण लहानपणापासूनच दिसून येत होता. होळकर घराण्याचे संस्थापक मल्हारराव होळकर यांनी त्यांची क्षमता ओळखली आणि त्यांचा विवाह आपल्या पुत्राशी खंडेराव होळकर यांच्याशी करून दिला.



पती व सासऱ्याच्या निधनानंतर त्यांनी राज्यकारभाराची जबाबदारी घेतली. १७६७ पासून ते १७९५ पर्यंत माळवा प्रांताचे कुशलपणे नेतृत्व केले. त्या काळात अनेक संकटे, सामाजिक आव्हाने आणि राजकीय गोंधळ असूनही त्यांनी आपल्या नेतृत्वातून एक आदर्श राज्य उभे केले.

अहिल्याबाईंच्या कार्याची मूल्यमापन व विश्लेषण

१. न्यायप्रिय आणि लोकाभिमुख प्रशासन

अहिल्याबाई दररोज प्रजेच्या तक्रारी ऐकत असत आणि न्यायनिवाडा करत असत. त्यांनी न्यायप्रक्रियेत कोणतीही पक्षपात न करता 'सत्य आणि न्याय' यांना प्राधान्य दिले. 'न्याय हेच राज्याचे खरे बळ' या तत्त्वाचा पुरस्कार करत त्यांनी एक आदर्श न्यायव्यवस्था उभारली.

आधुनिक संदर्भ: आजच्या लोकशाही भारतात न्यायात्मयीन प्रक्रिया खुप वेळखाऊ व गुंतागुंतीची झाली आहे. न्याय मिळेपर्यंत सामान्य माणसाची दमछाक होते. अशा वेळी अहिल्याबाईंचा "दैनंदिन जनसंपर्क आणि त्वरित न्याय" यांचा आदर्श अभ्यासण्याजोगा ठरतो.

भ्रष्टाचाराला पूर्णपणे आळा घालण्यात त्यांनी यश मिळवलं. त्यांचं प्रशासन हे सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी होतं, जे आजच्या 'गुड गव्हर्नन्स' संकल्पनेशी सुसंगत आहे.

आज जेव्हा 'ई-गव्हर्नन्स,' डिजिटल इंडिया' सारख्या योजना आणल्या जातात, त्यांचा उद्देशही लोकांपर्यंत थेट पोहोचणं हा आहे - अहिल्याबाईंनी हे तत्व दीडशे वर्षांपूर्वी प्रत्यक्षात आणलं होतं.

२. धार्मिक सहिष्णुता आणि समभाव

अहिल्याबाई धर्मनिष्ठ होत्या. परंतु त्यांनी कधीही धार्मिक विद्वेषाला थारा दिला नाही. त्यांनी हिंदू मंदिरांच्या बरोबरीने मुस्लिमांच्या मशिदीही बांधून दिल्या. त्यांनी काशी विश्वनाथ



मंदीरांचा जीर्णोद्धार केला, सोमनाथ, रामेश्वर, गंगोत्री, बद्रीनाथ इत्यादी धार्मिक स्थळांवर घाट व पूजास्थाने उभारली.

आजच्या काळातील उदाहरण : आज भारतात धार्मिक ध्रुवीकरण वाढताना दिसते. अशावेळी अहिल्याबाईंच्या सर्वधर्मसमभावाच्या दृष्टिकोन आजच्या राजकारणी व सामाजिक नेत्यांनी आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. आज जेव्हा धार्मिक असहिष्णुतेचे प्रसंग घडतात, तेव्हा अहिल्याबाईंचे कार्य धर्मनिरपेक्ष नेतृत्वाचे एक आदर्श उदाहरण बनते.

३. स्त्री सक्षमीकरणाचे अग्रदूत :

अहिल्याबाईंनी स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी अनेक पावले उचलली. त्यांनी स्त्रियांच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले, विधवांच्या पुनर्विवाहासाठी समाजाला तयार केले. स्वतः एक महिला असूनही त्यांनी प्रभावीपणे शासन चालवले व पुरुषप्रधान व्यवस्थेत आपले स्थान निर्माण केले.

आधुनिक संदर्भ : २१ व्या शतकात महिलांना आरक्षण, संधी आणि समानता यासाठी अजूनही संघर्ष करावा लागतो. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सारख्या उपक्रमांची गरज आहे. परंतु १८ व्या शतकातच अहिल्याबाईंनी ही मूल्ये कृतीत आणली होती. आज जेव्हा भारतात महिलांच्या राजकीय सहभागाबाबत चर्चा होते, तेव्हा अहिल्याबाईंचे उदाहरण अत्यंत प्रेरणादायी ठरते.

४. आर्थिक विकास आणि ग्रामीण उत्थान :

अहिल्याबाईंनी आपल्या कारकिर्दीत शेतकऱ्यांसाठी सिंचन व्यवस्था, जलसंधारण, बाजारपेठांचे व्यवस्थापन, मालवाहतुक सुलभ करणे, शेतीसाठी कर्ज यासारख्या उपाययोजना केल्या. त्यांनी वस्त्रोद्योगाला चालना दिली. महेश्वर साड्यांचा उद्योग आजही त्यांचे योगदान जपतो. या पद्धतीने त्यांनी 'मेक-इन इंडिया'चा मूळ विचार अठराव्या शतकातच रुजवला होता. महेश्वर नगरी आजही सांस्कृतिक नगरी म्हणून प्रसिद्ध आहे आणि याचे श्रेय अहिल्याबाईंना आहे.



माझा दृष्टिकोन: आज देशात ग्रामीण विकास, शेतीमालाला हमीभाव, अन्न सुरक्षा या विषयांवर चर्चा होत असली तरी व्यवहार्य उपाययोजना अपुऱ्या पडतात. अशावेळी अहिल्याबाईंच्या 'सौम्य व समतोल' आर्थिक धोरणाचा अभ्यास केला पाहिजे.

५. लोककल्याण आणि समाजसेवा:

अहिल्याबाईंनी अनेक धर्मशाळा, अन्नछत्र, शिक्षणसंस्था, विहिरी, तलाव, घाट, रस्ते आणि पूल बांधले. त्यांचे काम संपूर्ण भारतभर पिस्तारले होते. त्यांना 'प्रजेची माता' म्हणून ओळखले जाते. ग्रामीण भागात पाणीपुरवठा आणि सिंचनाची कामे केली. आजच्या 'जल जीवन मिशन, स्वच्छ भारत' योजनेसारख्या उपक्रमांचे मूळ त्यांच्याकडून शिकता येईल.

समकालीन उदाहरण: CSR (Corporate Social Responsibility) आणि सरकारी कल्याण योजनांचे उद्दिष्टही हेच आहे. पण अहिल्याबाईंनी यासाठी कोणतेही कायदेशीर बंधन न ठेवता स्वेच्छेने आणि समाजसेवाभावनेने हे कार्य केले.

अहिल्याबाईंच्या कार्याचे आधुनिक संदर्भातील स्थान

आज जगात नेतृत्वाची व्याख्या बदलत चालली आहे. केवळ सत्तेवर राहणे म्हणजे नेतृत्व नव्हे, तर समाजहितासाठी धाडसी निर्णय घेणे, लोकांच्या कल्याणासाठी झटणे हेच खरे नेतृत्व आहे, अहिल्याबाईंच्या नेतृत्वात निर्णयक्षमतेचा आत्मविश्वास, प्रजेच्या दुःखाशी तादात्म्य आणि काळाच्या पुढचा विचार होता. आजच्या महिला नेत्यांनी किंवा किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षमतेचा, कार्यपद्धतीचा अभ्यास करून 'जनहित' हे केंद्रस्थानी ठेवले पाहिजे.

त्यांचे कार्य म्हणजे "विकास आणि परंपरेचा समतोल" याचे उत्तम उदाहरण आहे. आज जेव्हा 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट', गुड गव्हर्नन्स', 'इनक्लुसिव्ह ग्रोथ' यावर चर्चा होते, तेव्हा त्यांचा आदर्श वास्तवात पाहायचा असेल, तर अहिल्याबाईंचे



कार्य अभ्यासायला हवे.

माझा दृष्टिकोन : अहिल्याबाईंचे कार्य का आहे 'आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी ?

१. नेतृत्व म्हणजे केवळ सत्ता नाही, तर सेवा आहे.
त्यांनी सत्ता कधीच 'अधिकार' म्हणून पाहिली नाही, तर 'कर्तव्य' म्हणून स्वीकारली.

२. नैतिकता आणि पारदर्शकता हाच खरा विकासाचा पाया आहे.
भ्रष्टाचार आणि सत्तेचा गैरवापर टाळून त्यांनी आदर्श प्रशासन राबवले. आजच्या काळात राजकारणात जेव्हा नैतिकतेचा अभाव दिसतो, तेव्हा त्यांच्या कार्यशैलीचे महत्त्व अधोरेखित होते.

३. जनसामान्यांचा विकास हीच खरी राष्ट्रसेवा.
त्यांनी राजकारण केलं नाही, पण प्रशासनाच्या प्रत्येक पातळीवर 'जनकल्याण' हे केंद्रबिंदू मानले.

४. सांस्कृतिक जतन हे राष्ट्रीय अस्मितेचे प्रतिक.
त्यांनी धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करून एकतेचा धागा मजबूत केला.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे जीवन म्हणजे नेतृत्व, सेवेची भावना आणि मानवतेचा सर्वोच्च आदर्श. त्यांनी आपल्या कार्यातून जो आदर्श ठेवला तो काळाच्या कसोटीत टिकणारा आहे. आजच्या भारताला जर खऱ्या अर्थाने "नवभारत" घडवायचा असेल, तर अहिल्याबाईंच्या कार्यातील मूल्ये, विचार आणि दृष्टीकोन अंगीकारणे आवश्यक आहे.
त्यांचे जीवन हे प्रत्येक भारतीयासाठी विशेषत: तरुण आणि महिला नेतृत्वासाठी एक दीपस्तंभ आहे. म्हणूनच अहिल्याबाईंचे नाव घेणे ही केवळ श्रद्धा नसून, ती एक प्रेरणा आहे - जो आधुनिक भारताच्या उभारणीसाठी अत्यंत उपयुक्त आहे.



Page No.
Date :

नाव -: निखिल अरुण पाटील
पत्ता -: कृषी नगर, पाचोरा
ता. पाचोरा जि. जळगांव
Mo. -: 9766944678, 9545788709
E-mail -: nikhil888patil@gmail.com

सहभागी वयोगट -: 21 वर्षापुढील

'पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पार्टी'
- महाराष्ट्र राज्य -

'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर'
यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त...
:- राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धा -:

• निबंधाचा विषय -: राजमाता अहिल्याबाई - स्त्री शक्तीचा जाज्वल्य इतिहास...

colors



Page No. 1
Date :

मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी राज्यकर्ती, भारतीय इतिहासातील एक कुशल महिला प्रशासक, सेवाभावी, अविचल, अटल, मातृभूमीच्या खऱ्या सेविका, ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे तोच स्वकर्तृत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा महान शासक, कर्मयोगिनी वीरांगना, कर्तव्यपरायण राजमाता म्हणजेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर.

सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, गोरगरिबांच्या विषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ठ चाली-रीती रूढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कित्येक समाजसुधारणा करणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला. माणकोजी शिंदे गावचे पाटील होते. ज्या काळात महिलांना घराचा उंबरठादेखील ओलांडण्याचा अधिकार नव्हता, 'चूल आणि मूल' इतकीच त्यांची परिसीमा, त्याकाळी माणकोजींनी अहिल्यादेवींना शिक्षणाचे धडे दिले. अहिल्यादेवी या विलक्षण प्रतिभेच्या धनी होत्या. बालवयात धैर्य, साहस, प्रेम, करुणा या गुणांनी परिपूर्ण असलेल्या अहिल्यादेवींना पाहून माळवा प्रांताचे शासक मल्हारराव होळकर प्रभावित झाले आणि त्यांनी त्वरित माणकोजींकडे आपल्या पुत्रासाठी अहिल्यादेवींची मागणी घातली. माणकोजींच्या होकारानंतर वयाच्या आठव्या वर्षी बालवयातच अहिल्यादेवींचा खंडेराव होळकरांसोबत विवाह झाला आणि त्या होळकर कुटुंबाच्या सुनबाई बनल्या.

विवाहानंतर अहिल्यादेवींच्या संपूर्ण जडणघडणीचे श्रेय जाते ते सुभेदार मल्हारराव होळकरांना. त्यांना आपल्या सुनेच्या कर्तृत्वावर आणि योग्यतेवर पूर्ण विश्वास होता. म्हणून ते अहिल्यादेवींना राज्यकारभारासोबतच महत्वाच्या पत्रव्यवहारांची, प्रजा-पालनाची आणि न्यायदानाची शिकवण देत असत. परिणामी अहिल्यादेवींची सामाजिक व राजकीय बुद्धी परिपक्व झाली.



Page No. 2
Date :

राज्यकारभाराचे, प्रशासनाचे घडे गिरवीत, संसाराचा गाडा ओढत इ.स. १७४५ साली त्यांना मालेराव हा मुलगा व इ.स. १७४८ साली मुक्ताई ही कन्या झाली. सुखाचा संसार सुरू असतानाच त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. इ.स. १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्यादेवींचे शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असूनही सती जाणे तहकूब करण्यात अहिल्याबाईंनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे, परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून अहिल्याबाईंनी प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला. धर्म, रूढी, परंपरा यापलीकडे कर्तव्य महत्वाचे मानून रयतेला कल्याणकरी राज्य दिल्याचा मान त्यांना जातो.

दौलतीचा कारभार मोठा असलेल्या इंदौर संस्थानाची जहागिरी पेशव्यांनी मल्हाररावांकडे सोपवली होती. पण दुर्दैवाने इ.स. १७६६ साली मल्हाररावांचे निधन झाले. त्यामुळे माळवा प्रांताची जबाबदारी अहिल्यादेवींचे चिरंजीव मालेराव होळकर यांच्याकडे सोपविण्यात आली. पण इ.स. १७६७ साली मालेरावांचा देखील मृत्यू झाला आणि अहिल्यादेवींवर आभाळ कोसळले. अखेर माळवा प्रांताची सूत्रे अहिल्यादेवींनी आपल्या हाती घेतली. एकामागून एक दुःख येत असतानाही अत्यंत धीरोदत्तवृत्तीने आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनविण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईंनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्वाप्रमाणे राज्य केले.

अहिल्यादेवींच्या मुत्सद्देगिरीचा व धाडसीपणाचा उल्लेख एका उदा-हरणातून आवर्जून सांगावासा वाटतो. पेशवा रघुनाथराव याला होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा लोभ सुटला. त्याने पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेऊन इंदौर वर चढाई केली. हे वृत्त तेजस्विनी अहिल्याबाईंना कळताच खचून न जाता त्यांनी रघुनाथरावांना खलिता पाठवला. त्या म्हणतात, "आपण माझे



Page No. ७
Date :

राज्य हिरावून घेण्याचे कपट रचून आलात. मला दुबळी समजलात की खुळी ? दुःखात बुडालेल्यास अधिक बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतू ? आता आपली गाठ रणांगणात पडेल. माझ्याबरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल, मी हरले तर कीर्ती करून जाईल. पण आपण हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. मी अबला आहे असे समजू नका. मी खांद्यावर भाले घेऊन समोर उभे राहिले तर पेशव्यांना भारी पडेल. वेळ पडली तर हत्तीच्या पायी साखळीशी बांधून तुमचे स्वागत न केले तर होळकरांच्या सुनेचे नाव लावणार नाही." घाडसी अहिल्या म्हणजे तळपती समशेर आणि लख-लखती वीज होती. नुसते लिहिणे-वाचणे नव्हे तर अहिल्यादेवी भालाफेकीत इतक्या तरबेज होत्या कि खुद्द टिपू सुलतानानेही त्याबाबत गौरवोद्गार काढले. 'तत्वज्ञ महा-राणी' हा किताब त्याने अहिल्यादेवींना बहाल केला होता.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्वातंत्र्याच्या भारतातील आद्य उद्गात्या होत्या. ज्या काळात महिलांना समाजाने जाचक बंधनांच्या साखळ-दंडात घट्ट बांधलेले होते, त्यावेळेस अहिल्यादेवींनी महिलांना लष्करी प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र काढले. महिलांच्या लष्करी प्रशिक्षणासाठी जगात निघालेले हे पहिले विद्यालय. त्या काळात देशभर संतती नसलेल्या विधवांची मालमत्ता सरकार दरबारी जमा करायचा कायदा होता. अहिल्यादेवींनी तो कायदा रद्द तर केलाच पण विधवांना दत्तक घेण्याचीही कायदेशीर तरतूद केली. महेश्वरला वस्त्रोद्योगात आघाडीवर आणत असतांनाच महिला विणकरांनाही प्रोत्साहन दिले. त्या काळात बालविवाहाची प्रथा होती. ती मोडून काढण्यासाठी त्यांनी स्वतःच्या मुलीचा प्रौढ विवाह करून स्वतः आदर्श घालून दिला. आपली कन्या मुक्ताबाई हिचे स्वयंवर घोषित करताना त्यांनी जाहिर केले की, जो कोणी चोर, लुटारू, दरोडेखोर यांचा राज्यात बंदोबस्त करील त्या शूर व्यक्तीशी मुक्ताबाईचा विवाह लावला जाईल. त्याकेली जातपात बघितली जाणार नाही. हा अलौकिक विचार जाहीर करून त्या थांबल्या नाहीत, तर त्यांनी कृतीही तशीच केली. यशवंतराव फणसे या गुणी, शूर तरुणाशी त्यांनी मुलीचा विवाह करून दिला. हे काळाच्या फार पुढचे पाऊल होते, हे आपण कधीच लक्षात घेतले नाही. काही दिवसांपूर्वीच



Page No. 4
Date :

घडलेले पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरण. हुंड्यासाठी होत असलेल्या जाचक त्रासाला कंटाळून या निष्पाप लेकीने आत्महत्या केली. खर तर, हुंडा प्रथेसारख्या दुष्ट रूढीला आळा बसावा आणि निरपराध विवाहीत स्त्रियांचा छळ व हुंडाबळी यांबावे, यासाठीचा कायदा ३ जुलै १९८३ रोजी लागू झाला. हे जरी वास्तव असले तरी इतिहास सांगतो की २५० वर्षांपूर्वी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी हुंडाबंदीचा कायदा केला होता. त्यांनी हुंडा देणाऱ्याला आणि घेणाऱ्याला शिक्षा ठोठावल्याची नोंद इतिहासात आहे. आज अहिल्यादेवी असत्या तर कित्येक निष्पाप वैष्णवींचे प्राण वाचले असते. १८२९ ला सती प्रथा कायद्याने बंद झाली. राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नातून हे सर्व जरी झालं असलं तरी त्या आधीच्या काळात सती प्रथेला विरोध दर्शविणाऱ्या अहिल्यादेवींची याबाबत असणारी दूरदृष्टी लक्षात येते. महिला सबलीकरण म्हणजे काय हे त्यांनी अठराव्या शतकात कृतीतून दाखवले. आजच्या समाजाने त्यांची तत्वे आचरणात आणून त्यापासून शिकायला हवे.

तत्कालीन भारतीय सत्तांना नैतिक अधिष्ठाण देणारे केंद्र म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर. त्यांच्या धार्मिक कार्याबाबत भरपूर बोलले जाते. पण सोमनाथ, अयोध्या, श्रीरंगपट्टनम अशा अनेक ठिकाणी त्या काळात मुस्लिम सत्ताधाऱ्यांचे राज्य होते. सोमनाथ हा भारताचा मानबिंदू. त्याचे अनेकदा उध्वस्तीकरण झाले. पण त्याशेजारीच नवे मंदिर बांधण्यासाठी मुस्लिम सत्ताधाऱ्यांकडून परवानगी मिळवणे सोपे नव्हते. काशी-विश्वेश्वर व अयोध्येत त्यांनी बांधलेल्या राममंदिराचीही तीच बाब आहे. द्वारका, रामेश्वरम, बद्रिनाथ, जगन्नाथपुरी, गया, हरिद्वार येथील मंदीरांचा जीर्णोद्धार त्यांनी केला. त्यांनी अत्यंत कौशल्याने आणि कुशाग्रतेने अनेक किल्ले, विश्रामगृह, विहिरी आणि रस्त्यांची निर्मिती केली. अहिल्याबाई होळकर या दानशूर आणि उदार शासक होत्या. त्यांच्यात दया, करुणा, परोपकाराची भावना ओतप्रोत भरलेली होती आणि म्हणूनच आपल्या शासनकाळात गरिबांसाठी व भुकेले-ल्यांसाठी त्यांनी अनेक अन्नछत्र उघडलीत. पाण्याकरता अनेक पाणपोया स्थापन केल्या. त्यांनी स्वतःचे आयुष्य लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न घालता संपूर्ण भारतात कार्य केलेले आहे. जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत



सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते ते काम लोकमाता अहिल्याबाईंनी केले. उद्योगधंद्यांना व त्याच्या विकासाला प्राधान्य दिले.

मुंग्यांना साखर, माश्यांना कणकेचा गोळा, गरजुंना कपडे याची सोय केली. आपल्या राज्यात सूक्ष्म जीवही उपाशी राहू नयेत यासाठी दक्षता घेतली. दिव्यांग, अनाथ व असहाय्य लोकांचे पुनर्वसन केले. गोरगरिबांसाठी अन्नछत्रे व सदावर्ते चालविली. सर्व जगाचा पोशिंदा असणारा बळीराजा नेहमी आनंदी रहावा म्हणून त्यांच्या मनात शेतकरी वर्गाबद्दल अत्यंत जिव्हाळा होता. आपला भारत देश कृषिप्रधान असून इथला शेतकरी सुखी तर सर्वजण सुखी, त्यामुळे त्यांना अनेक जाचक करातून मुक्त केले. शेतकऱ्यांना गाई देखील दान केल्या. करपद्धती सौम्य केली. पाटील, कुलकर्ण्यांच्या वतन हक्कांचे संरक्षण करून गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. अहिल्यादेवींनी आपल्या राज्यातील सावकार, व्यापारी आणि कारागीर यांना आर्थिक क्षेत्रात प्रोत्साहन देऊन राज्याची आर्थिक स्थिती सुधारली. गाय संस्कृती आणि फळबागांना प्रोत्साहन मिळाल्याने त्यांच्या राज्यात दूध, दही, तूप, फुले, फळे यांची कधीच कमतरता नव्हती. त्यांनी अनाथाश्रम, वाचनालय, शाळा, दवाखाने स्थापन केली. त्याने अनेक प्रकारच्या दुष्कृत्यांचा आणि कुप्रथांचा अंत केला. कोणाच्या हातून काही काढून घेतले तर त्याला पर्यायही दिला पाहिजे हे सूत्र अहिल्यादेवींनी घालून दिले. भिल्ल समाज त्याकाळी यात्रेकरूंना लुटून उपजीविका चालवत. अहिल्यादेवींनी त्यांचे मन वळवून त्यांच्यावरच यात्रेकरूंच्या रक्षणाची जबाबदारी सोपवत यात्रेकरूंकडून भिलकवडी नावाचा कर घ्यायची परवानगी दिली. एवढेच नव्हे तर त्यांना कसायला जमीनीही दिल्या. आजही कित्येक समस्यांना या गोष्टी समर्पकपणे लागू होतात आणि त्या लागू करण्यासाठी आपण आदर्श घेतला पाहिजे तो म्हणजे, अहिल्यादेवी होळकरांचा.

युरोपात एकोणिसाव्या शतकापर्यंत स्त्रीया दास्यातच होत्या. काही लेखिका स्त्री स्वातंत्र्याबद्दल दबकत बोलत असल्या तरी त्यांचे सामाजिक स्थान दुय्यमच होते. १८२७-१८३० या कालखंडात मुंबईचा गव्हर्नर असलेल्या जॉन माल्कममुळे युरोपला अहिल्यादेवी माहित झाल्या. युरोपातील महिलांसाठी हे नुसते आश्चर्य नव्हते तर त्यांनी अहिल्यादेवींत आपले आदर्श पाहिले. इतके कि जोआना बेली या इंग्रज कवयित्रीने



अहिल्यादेवींवर खंडकाव्य लिहिले. विदेशी साहित्यिकाने कोणाही भारतीयावर लिहिलेले हे पहिले खंडकाव्य. जोआना वेली लिहितात;

For thirty years her reign of peace,
The land in blessings did increase !
And she was blessed by every thongue ...
By stern and gentle, old and young !

अहिल्यादेवी होळकर यांची जयंती ३१ मे या दिवशी सर्वत्र साजरी केली जाते. त्यांच्या समान न्यायदानाबद्दल राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देखील प्रभावित होते. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल त्यांना तत्कालीन सरकारतर्फे वेळोवेळी सन्मानितही करण्यात आले. इंदौर विद्यापिठाचे नाव 'देवी अहिल्यादेवी विश्वविद्यालय', सोलापूर विद्यापिठाचे नाव 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापिठ', अहमदनगरचे नाव 'अहिल्यानगर' करण्यात आले. त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त महायुती सरकारने त्यांच्यावर बायोपिकची घोषणा केली आहे. तसेच महिला सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती अभियान' सुरु केले आहे. या सर्व गोष्टींमुळे अहिल्यादेवींची मूल्ये समाजात रुजवण्यास नक्की मदत होईल.

अखंड भारताची स्वप्ने पाहत त्यांनी काश्मिर ते कन्याकुमारी व सोमनाथ ते कामाख्यादेवींपर्यंत नुसती मंदिरे उभारत देश जोडला नाही तर रस्तेही बांधले, घाटबारवांची निर्मिती करत <u>खऱ्या अर्थाने राष्ट्र उभारणीचा पाया घातला</u>. आपल्या राज्याच्या अथवा संस्थानाच्या बाहेर कोणी पहात नव्हते तो हा काळ होता आणि <u>त्या काळात त्यांनी केलेले कार्य हे केवळ धर्म कार्य नव्हते तर राष्ट्रकार्य होते</u> हे समजावून घ्यायला हवे. उभ्या आयुष्याच्या कारकिर्दीत त्यांनी किती समाजसेवा केली हे जर त्यांच्याबद्दल सांगायच झालं तर शब्द कमी पडतील एवढी त्यांची कामागिरी व कर्तृत्व मोठे आहे. होळकर घराण्याची ओळख म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जातं. वयाच्या आठव्या वर्षापासून त्यांच्या आयुष्यात त्यांना खूप संघर्ष करावा लागला. परंतू आयुष्यात आलेली अनेक संकटं पार करत त्यांनी ज्या दुर्दम्य आशावादाने स्त्री-शक्तीचा वापर केला आणि स्वतःला समाजा-



Page No. 7
Date :

-साठी वाहून घेतलं, हे खूप प्रशंसनीय आहे. त्यांनी समाजातील रूढी परंपरांचा आंधळेपणाने कधीच स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला तो म्हणजे, मानवताधर्म. आपल्या प्रजेच्या हितासाठी कायम तत्पर असणाऱ्या या रणरागिणीची १३ ऑगस्ट १७९५ रोजी प्राणज्योत मालवली. परंतु देशासाठी केलेल्या असंख्य कार्या-मुळे त्या युगानुयुगे आपल्या स्मरणात राहतील.

सहिष्णुता, प्रामाणिकपणा, नम्रता या गुणांबरोबरच कठोर विवेक आणि नैतिक अधिष्ठान याचे असाधारण उदाहरण असलेल्या तसेच अदम्य नारीशक्ती, वीरता, पराक्रम, न्याय आणि राजतंत्राचा एक अद्वितीय मेळ साधलेल्या बाणेदार, स्वाभि-मानी आणि उत्तम राज्यकर्ती असलेल्या लोकमाता अहिल्यादेवींचे विचार, कार्य आणि त्यांच्या पराक्रमाची गाथा नक्कीच भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्यासाठी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरेल. छत्रपती शिवरायांनी निर्माण केलेल्या लोककल्याणकारी हिंदवी स्वराज्याची ज्योत तेवत ठेवणाऱ्या अशा या अद्भुत साहसाच्या व अदम्य प्रतिभेच्या धनी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवींना त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन....!

'ललकारीती दाही दिशा करती जयघोष जिचा
जुल्मु जबरदस्ती अन अन्यायाला फोडली तिने वाचा
सर्व धर्म समभाव जिथे, सुखात नांदली सारी जनता
अशी कर्तव्यनिष्ठ, कर्मयोगिनी अहिल्यादेवी राजमाता'

[शब्दसंख्या = 1550]

colors



Page No. 8
Date :

●लिखाणासाठी वापरलेले संदर्भसाहित्य :-

१) कर्मयोगिनी वीरांगना : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
(विजया रहाटकर - राष्ट्रीय महिला आयोग अध्यक्ष)

२) अहिल्याबाई होळकर : जीवन चरित्र
(गोविंदराम केशवराम जोशी)

colors

वयोगट 21 onwards

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर





अहिल्याबाईंचं जीवनचरित्र: त्याग, पराक्रम आणि लोककल्याण

"राण्या असंख्य झाल्या या जगात
पण पुण्यश्लोक कोणीही नाही,
गर्वजिचा आहे या मराठी हृदयाला...
एकच ती महाराणी अहिल्याबाई होळकर झाली."

जेव्हा जेव्हा समाजामध्ये अन्याय, अत्याचार, अधर्म वाढतो तेव्हा त्याला संपवणारी शक्ती या जगात जन्म घेते आणि तेच घडलं... ३१ मे १७३५ रोजी माणकोजी शिंदे आणि सुशीलाबाई यांच्यापोटी धनगर कुटुंबात एक तेजस्वी कन्यारत्न जन्मास आले. या कन्येच्या तेजाने साक्षात सूर्यही लाजला... या कन्येचं नाव 'अहिल्या'...

ही तीच महिला जिने सत्तेचा मंत्र वापरून विकासाचा तंत्र हिंदुस्तानच्या मातीत रुजवले. ही तीच 'अहिल्या' जिने 'चूल आणि मूल' समाजव्यवस्था झुगारून देऊन एका हातात शस्त्र आणि दुसऱ्या हातात शास्त्र घेऊन तब्बल २९ वर्षे आदर्श राज्यकारभार केला.

"मधुर होती तिची वाणी,
अशी जन्मली तत्त्वज्ञानी राणी.
गाजवल्या जिने दिशा दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला खरंच सीमा नाही."

अहिल्याबाईंना लहानपणापासूनच तलवार चालवणे, भाला फेकणे, युद्ध लढणे या गोष्टींचे शिक्षण आणि प्रशिक्षण दिले जात होते. हीच होती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी सुरुवात... वयाच्या ८ व्या वर्षी शूर, पराक्रमी सरदार मल्हारराव होळकरांचे सुपुत्र खंडेरावांशी त्यांचा विवाह झाला. मल्हाररावांच्या आशीर्वादाने आणि मार्गदर्शनाने अहिल्याबाईंची वाटचाल सुरू झाली. कर्तबगार सासरे आणि धार्मिक कराडी सासू गौतमाबाई यांच्या सहवासात अहिल्याबाईंचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. तल्लख बुद्धी असलेल्या सुनेवर सासऱ्यांचा प्रचंड विश्वास होता.



Page No.
Date

अहिल्याबाईंच्या जीवनात जर सर्वात जास्त योगदान कोणाचे असेल तर त्यांचे सासरे मल्हारराव... कारण मल्हारराव म्हणजे सामर्थ्य... मल्हारराव म्हणजे विश्वास... मल्हारराव म्हणजे अहिल्याबाई यांच्या पाठीवर आयुष्यभर पडत असलेली थाप... मल्हाररावांनी आपल्या आठ वर्षाच्या सुनेला शिकवलं की युद्ध कसं लढायचं... युद्ध रणांगणावर सुरू असताना तोफांचे भयानक आवाज होतात, तेव्हा निधड्या छातीने कसे सामोरे जावे... महत्वाचे पत्रव्यवहारसुद्धा मल्हारराव अहिल्याबाईंवरच सोपवत असे.

अहिल्याबाईंना दोन अपत्ये मालेराव आणि मुक्ताबाई अहिल्याबाईंचे पती खंडेराव हे देखील एक पराक्रमी योद्धे होते. पण त्याकाळच्या स्त्रियांना नियती वैधव्यमाथी लिहून जन्माला घालत असावी की काय! असे वाटून जाते... कारण वयाच्या २८ व्या वर्षी म्हणजेच १७५४ साली पती खंडेराय कुंभेरीच्या लढाईत कामी आले आणि अहिल्याबाईंना वैधव्य देऊन गेले. त्यावेळेच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या पण सासरे म्हणाले, "प्रजाहितासाठी तरी तुम्ही सती जाऊ नये. तू आम्हांस सोडून जाऊ नकोस पोरी. नाहीतर मी अनाथ होईन. जीव दयायचाच असेल तर प्रजेसाठी दे. प्रजेची आई हो." तेव्हा अहिल्यादेवींनी शपथ घेतली – "माझ्या निष्ठेची शपथ आजपासून सारे अलंकार, रंग मी या चितेत टाकते. फक्त पांढरे शुभ्र वस्त्र नेसेन आणि प्रजेसाठीच जगेन."

पानिपतनंतर मराठेशाहीची बिघडलेली घडी पुन्हा बसवण्याकरता मल्हारराव सतत मोहिमा आखत होते. मल्हाररावांच्या अनुपस्थितीत संपूर्ण राज्यकारभार हा अहिल्याबाई पाहत होत्या. अशाच एका मोहिमेवर असताना २० मे १७६६ मध्ये मल्हाररावांना मृत्यूने गाठले. मल्हाररावांनी पेशव्यांच्या चार कारकीर्दी पाहिल्या होत्या.



Page No.
Date

एकूणच पेशव्यांच्या घरात त्यांना वडीलकीचा मान होता.
अशा या मल्हाररावांच्या मृत्यू पेशवे आणि अहिल्याबाई या दोघांकरता एक मोठा धक्का होता. ओघानेच अहिल्याबाईंवर मोठी जबाबदारी येऊन पडली. त्यांचे पुत्र मालेराव यांना सुभेदारीची वस्त्रे मिळाली पण दुर्दैवाने २७ मार्च १७६७ ला त्यांचाही मृत्यू झाला. एक वर्षाच्या आत दोन मोठे धक्के अहिल्याबाईंना पचवणे फार अवघड गेले.

होळकरांनी हे राज्य कुणाची गुलामगिरी करून मिळवले नाही, तर तलवारीच्या पाठीवर आणि मनगटात असलेल्या जोरावर. होळकरांच्या वंशजांनी हे राज्य उभे केले. आतापर्यंत सर्वात जास्त संकटे कोणत्या राज्यकर्त्यावर आले असतील तर ते 'अहिल्याबाई होळकरांवर' अहिल्यादेवींच्या हयातीत नवरा, सासरा, मुलगा, जावई यांचं निधन झालं. राज्यकारभार पाहण्यासाठी कुणी पुरुषच उरला नाही. अशावेळी एकट्या अहिल्यादेवींनी राज्य करण्याचा निर्णय घेतला. याचसंधीचा फायदा घेत राघोबा पेशवा आपली ५०,००० ची फौज घेऊन अहिल्यादेवींच्या राज्यावर चालून आला पण अहिल्यादेवींची दूरदृष्टी पहा... त्यांनी आपल्या राज्यातील महिलांना तलवारबाजी व इतर युद्धकला शिकवल्या आणि संपूर्ण भारतात महिलांची पहिली फौज तयार करणाऱ्या अहिल्याबाई होळकरच होत्या.

परंतु फक्त तलवार हातात घेऊन चालत नाही तर सोबत बुद्धीकौशल्यही लागत म्हणूनच त्यांनी राघोबा पेशव्यांना पत्र लिहिले - "मी एकटी आहे, अबला आहे असे समजू नकोस. जेव्हा तलवार जड जाईल तुम्हाला तेव्हा कळेल... आपली भेट लवकरच रणांगणात होईल, पण मी हरले तर कुणी मला नाव ठेवणार नाही परंतु तुम्ही हरलात तर जग तुम्हाला नाव ठेवेल की तुम्ही एका महिलेकडून हरलात."



शत्रुला रणांगणात पराभुत करायच्या आधी मनात कसं पराभुत करायचं हे मानसशास्त्र अहिल्यादेवींना ज्ञात होतं कारण मनात पराभुत झालेला शत्रू रणांगणात उभा राहू च शकत नाही. ते पत्र वाचुन राघोबांनीमात्र माघार घेतली.

"कर्तव्यनिष्ठ कठोर स्वभाव तेवढाच जनतेसाठी हळवा,
अहिल्यादेवींनी आदर्शपणे चालवला प्रांत माळवा."

अहिल्यादेवींच्या न्यायपणाबद्दल सर्वत्र ख्याती आहे. त्यांना अन्यायाचा तिटकारा होता. त्यांनी राज्यात अनेक ठिकाणी न्यायालये स्थापन करुन त्यावर योग्य न्यायमुर्तींच्या नेमणूका केल्या. ज्या लोकांचे या न्यायालयामुळे समाधान होत नसे ते लोक अहिल्यादेवीकडे येत. न्यायासनावर बसुन त्या सर्व प्रकरणे स्वत: ऐकत व न्यायनिवाडा देत असे.

शिंदे आणि होळकर यांच्यात एका जमिनीच्या तुकड्यावरुन वाद होता. या वादाचा निर्णय लावण्यात यावा म्हणुन शिंदे यांनी पंच म्हणुन अहिल्यादेवींची नेमणूक केली. वास्तविक पाहता यांची एका पक्षाची फिर्याद ही खुद्द अहिल्यादेवी होत्या. अहिल्यादेवींनी या भूभागाचा निर्णय लावला की हा प्रदेश 'गोचर भूमी' म्हणुन देण्यात यावा. आणि ही व्यवस्था दोन्ही पक्षांनी मान्य केली

सिरोंजमध्ये खेमदास नावाचा श्रीमंत व्यापारी राहत होता. तो निपुत्रिक वारला. संपत्तीचा वारस नव्हता. तिथल्या अधिकाऱ्याने व्यापाऱ्याच्या विधवा पत्नीला धमक्या दिल्या. नंतर एका वृद्धाने त्या विधवा महिलेला अहिल्यादेवींना जाऊन सांग असे सांगितले. हे ऐकताच अहिल्यादेवींच्या संतापाला पारावार उरला नाही. त्यांनी त्या अधिकाऱ्याला पदच्युत केले. आणि विधवेला दत्तक



Page No.
Date

घेण्याची संमती दिली. अशी होती पुण्यश्लोक अहिल्यादेवींची न्यायव्यवस्था...

"इतिहासाच्या पानोपानी...
नित्य गायिली गाथा,
होळकरांची तेजस्वी...
ती पुण्यश्लोक अहिल्यामाता."

आपल्या कारकीर्दीत त्यांनी अनेक गोष्टी केल्या. राजधानी इंदुरहून-नर्मदातीरी महेश्वरला हलवली. तिथे अनेक वास्तू बांधल्या. राजवाड्यात असलेले प्रशस्त देवघर आजही बघण्यासारखे आहे.. नदीला घाट बांधले, अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. पूर्वजांच्या स्मरणार्थ छत्र्या बांधल्या. कारागीर, मजूर विणकर, कलावंत साहित्यिक अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, पैसा घर इ. सोयी उपलब्ध करून दिल्या. आजही महेश्वरी साड्या, पैठणी, घोनर प्रसिद्ध आहेत. राज्यात पशुपक्षी यांना चरण्यासाठी कुरणे राखली. मुंग्यांना साखर, माशांना कणकेचा गोळा, उन्हाळ्यात वाटसरूंना पिण्यासाठी पाणपोया, हिवाळ्यात गरजूंना गरम कपडे यांची सोय केली. आपल्या राज्यात सूक्ष्म जीवही उपाशी राहू नयेत यासाठी दक्षता घेतली. दिव्यांग, अनाथ व असहाय्य लोकांचे पुनर्वसन केले.

"भुकेल्यापोटी घास देऊनी तृप्त केले.
तहानलेल्या जीवा,
जातधर्म विसरून दाखवला
मानवसेवेचा मार्ग नवा,
अहिल्याबाई होळकर
आपल्या कार्याचा,
निरंतर तेवत राहील दिवा."



गोरगरिबांसाठी अन्नछत्रे व सदावर्ते चालवली. वस्त्रांचे वाटप केले. प्रवाशांसाठी मार्गावर अरण्यमय प्रदेशातही आंबराई, बगीचे, वृक्षारोपण विश्रांतीसाठी ओटे व धर्मशाळा बांधल्या. घाट बांधतांना केवळ नद्यांची मन विचारात न घेता प्रत्यक्ष त्या भागातील स्त्रियांशी बोलून घाटाच्या पायऱ्या कशा हव्यात, कपडे धुताना वाळ कुठे ठेवायला सोयीस्कर पडेल, कपडे बदलताना ओल्या कुठे असाव्यात? इनका बारीक तपशिलासह घाट बांधून घेतले.

"भारतभर पसरली कीर्ती निची,
तीर्थक्षेत्री बांधल्या धर्मशाळा.
उदार कारुण्यमूर्ती अहिल्यामाता
श्रुतेस लावला तिने लळा."

सर्वधर्म समभावाच्या आदर्श मिश्रीत मंदिरे, मशिदी, दर्गे व विहार बांधली तर काही मंदीरांच्या जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले व सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांची बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुरासोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. त्या समाजसुधारक होत्या. त्यांनी धर्मातील रुढी आणि परंपरांच्या आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवतावर्म. प्रजेवर जास्त करांचा बोजा न लादता राज्यात असलेला राज्यकोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादीत करुन खाजगी उत्पादनाचा उपयोग सुद्धा लोककल्याणासाठी केला.

त्यांचा मूळ स्वभाव सौम्य असला तरी वेळ आली की त्या कठोर निर्णय घेत. त्या अतिशय धर्मपरायण होत्या. होळकरांच्या टाकसाळीतील नाण्यांवर बिल्वपत्र व शिवलिंग



यांचे छाप असत. एक उत्तम राज्यकर्ता कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे अहिल्याबाई होळकर होत.

त्यावेळचे कॉइसराँय लॉर्ड एलनबरो यांनी एका पत्रात म्हटले आहे की – "अहिल्यादेवी एक उत्कृष्ट, आदर्श प्रशासक होत्या. अहिल्यादेवी एक सर्वश्रेष्ठ आणि आदर्श राज्यकर्त्या सुद्धा आहेत." एवढेच नव्हे तर सेन्ट्रल इंडिया-चा गव्हर्नर सर जॉन मालकम याने –

"A memoir of Central india including malva" हा ग्रंथ लिहिला. त्यात ते म्हणतात –

"A life of Ahilyabai forms too proud of echo in the history of house of holkar's to be Slightly passed over."

म्हणनेच होळकरांच्या घराण्याचा इतिहासातील प्रतिध्वनी म्हणून अहिल्याबाईंचे जीवन अतिशय अभिमानास्पद आहे.

के. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी अहिल्यादेवींच्या चरित्रात लिहिले आहे – "त्यांच्या चरित्रात परस्परविरोधी म्हणून म्हणता येतील असे सर्व गुण होते. एक स्त्री असून छानछोकीने राहणे त्यांनी पसंत केले नाही. त्यांनी कधी कुणाचा अनादर, राग केला नाही. इतकेच तर त्यांच्यावर कृपा केली. भर तारुण्यात वैधव्य आले असतानाही त्यांनी पतिव्रत्याचे पुर्णपणे पालन केले."

के. विनोबा भावे म्हणतात...

"आम्ही जिथे जिथे गेलो तिथे अन्य प्रांतियाकडून अहिल्यादेवींची स्तुतीच ऐकली. शस्त्रबलाने दुनिया जिंकणारे अनेक लोक आहेत परंतु प्रेमाने, धर्मशक्तीने भारतातील सर्व प्रांतांना जिंकणारी अहिल्यादेवी ही एकमेव होय."



इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर यांना भारताच्या 'कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारेट' असे म्हटले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी एकत्रित केली आहे. ते असे म्हणतात की... ज्यावेळेस जगातील सर्वात महान स्त्रियांचा इतिहास लिहिला जाईल. त्यावेळेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्वप्रथम लिहिले जाईल.

धर्म, करुणा आणि कर्तव्याचे प्रतिक म्हणजे राजमाता अहिल्याबाई होळकर. केवळ एक राजमाताच नव्हे तर समाजहितासाठी झटणारी एक जागृत सेविका होत्या. त्यांच्या कार्याचा विस्तार हा केवळ राज्यकारभारापुरता मर्यादीत नव्हता तर त्यात धर्म, न्याय आणि मानवसेवेचे मूल्य होते. आयुष्यात दुःखाबरोबर त्यांना अनेक संघर्षांना देखील तोंड द्यावे लागले.

त्यांना ७५ वर्षांचे आयुष्य लाभले. पण आयुष्यात एकावर एक दुःख त्या पचवत होत्या. त्यात राज्यकर्त्यांची परिस्थिती मोठी विचित्र. प्रजेचे हीत, प्रजेचा विचार करुन पोटातले दुःख ओळखून किंवा ओठावर आणायची त्यांना परवानगी नसते.

त्यांची अतिशय साधी राहणी, कायम पांढरेशुभ्र वस्त्र परिधान केलेले. स्वभावाने कडक, करारी पण प्रेमळ होत्या. अहिल्याबाई या आचरणाने अत्यंत पवित्र दक्ष व दानी होत्या. त्या योग्य न्याय ज्ञानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी आपल्या राजकौशल्याने प्रजेतील नागरिकांची मने जिंकली. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठीच समर्पित केले होते. समाजातील विधवा महिलांच्या दर्जा, महिलांच्या शिक्षणासाठी त्यांनी भरीव योगदान दिले. आयुष्यात अनेक संकटांना तोंड देऊनही अहिल्याबाईंनी ज्या पद्धतीने आपल्या स्त्रीशक्तीचा वापर केला ते कौतुकास्पद आहे. अशा शिवउपासक असलेल्या महान स्त्रीचा



Date

१३ ऑगस्ट १७९५ ला महेश्वर येथे वृद्धापकाळाने निधन झाले. आजही आणि नेहमीच अहिल्याबाई सर्व महिलांसाठी प्रेरणास्त्रोत राहतील यात तीळभर शंका नाही. या आदर्श शक्तीला आपण मानाचा मुजरा करतो कारण अहिल्याबाई म्हणजे साक्षात दिव्यतेची आणि नेतृत्वाची निर्वंतमूर्ती.

"दिव्यत्वाची जेथे प्रचिती। तेथे कर माझे जुळती।"

शेवटी जाता जाता एवढेच म्हणावेसे वाटते –

"रणरागिणी तू पुण्यश्लोकी,
जपलास वारसा शिवरायांचा,
उतरूनी रणांगणी दाखवलीस
शत्रूस ताकद तुझ्या निश्चयाचा.
न्यायदानाची पुरस्कर्ती तू,
राग तुला अन्यायाचा
अहिल्यादेवी तू...
अभिमान आम्हांला तुझ्या शौर्याचा."

जयहिंद !

जयमहाराष्ट्र !!

जयभारत !!!




" प्री "

पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पार्टी

महाराष्ट्र राज्य

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

निबंध स्पर्धा



विषय :- पुण्यश्लोक अहिल्याबाई आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व

निबंध लेखन :- सौ. सीमा राजेश बिज्जरगी

सहशिक्षिका - नू.म.वि. मराठी शाळा, सोलापूर

मो.नं. - 8275459722

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

अहिल्याबाई होळकर



अ - अखंड तेज तिच्या वाणी, न्यायाचा दिप उजळतो.

हि - हिरव्या तास्हणात अमृत तिचे, ओठी गोडवा असतो.

ल्या - लक्ष निर्धार अचल, स्वराज्याचा दीप पेटतो.

बा - बालकांसाठी ज्ञानाचा उभारला शाळेचा दीपस्तंभ.

ई - ईश्वराचा आशीर्वाद लाभलेला, जनतेची सेवा तिचे व्रत.

हो - होळकर घराण्याचा वारसा तिने चालविला.

ळ - ळळाळते तेज तिच्या विचारात, इतिहासात अनमोल स्थान

क - कर्तत्वाने गाजवले युग

र - राणी नव्हे देवी ती, जनकल्याणासाठी झुकले.....



प्रस्तावना

प्रथम पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर
यांना ३०० व्या जयंतीनिमित्त त्रिवार वंदन!!



आपल्या देशात अनेक थोर नेते झाले पण अठराव्या शतकात एक स्त्री अशी झाली जिने आपल्या कतृत्वाने, बुद्धीने आणि दयाळूपणाने राज्य चालवलं त्या म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर.

त्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर जाण्याचीही परवानगी नव्हती पण अहिल्याबाईंनी पूर्ण माळवा प्रांताचं नेतृत्व केल. आजही त्यांच्या कार्याने आपल्याला खूप शिकायला मिळते.

अहिल्याबाई होळकर यांचे नाव येताच भारतीय इतिहासातील एक महान दयाळू आणि दूरदृष्टी असलेल्या नेत्या समोर येतात. त्यांच्या अद्वितीय नेतृत्वगुणांमुळे त्या केवळ माळवा राज्याच्या आदर्श शासक ठरल्या नाहीत तर त्यांचे जीवन आणि कार्य आजच्या आधुनिक भारतासाठी एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व बनल्या.



त्यांनी प्रशासन, न्याय, धार्मिक, समाजसुधारणा आणि स्त्री सशक्तीकरणाच्या क्षेत्रात महत्वपुर्ण योगदान दिले. जे आजही आदर्श मानले जाते.

अहिल्याबाई होळकर यांचे जीवन व कारकिर्द

अहिल्याबाई यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात माणकोजी व सुशिलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला. त्यांचा होळकर घराण्याचे संस्थापक मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव होळकर यांच्याशी झाला.

मल्हारराव यांनी पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला मोडी, मराठी लिहिणे, वाचणे, गणित इ. गोष्टी तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, न्यायनिवाडा करणे इ. प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्याबाईंची सामाजिक व राजकीय बुद्धी परिपक्व झाली. दुर्दैवाने खंडेराव यांचे अकाली निधन झाल्यानंतर मल्हारराव होळकर यांनी अहिल्याबाईंना राज्यकारभारात सामील करुन घेतले.




१७६७ मध्ये मल्हारराव यांच्या अकाली निधनानंतर अहिल्याबाईंनी मालवा साम्राज्याची सुत्रे हाती घेतली आणि आपल्या उत्तम प्रशासनाने मालवा प्रांताची प्रगती साधून सुशासनाचा आदर्श निर्माण केला.



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर :- आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व

अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यामुळे समाजात अनेक सकारात्मक बदल घडले, जे आजही प्रेरणादायी आहेत. त्यांच्या न्यायप्रिय प्रशासन, सामाजिक सुधारणा आणि स्त्री शक्तीकरणाच्या विचारांनी आधुनिक भारताच्या समाजव्यवस्थेवर महत्वपुर्ण प्रभाव टाकला आहे. त्यांच्या कार्याचा विस्तार हा केवळ राज्य-कारभारापुरता मर्यादित नव्हता तर त्यात धर्म, न्याय आणि मानवसेवेचे मुल्य होते.



अहिल्याबाईंचे कार्य आजच्या काळातही प्रेरणादायी आहे आणि अनेक क्षेत्रात लागू होते. त्यांचे समाजसुधारक विचार आणि प्रशासनिय धोरणे आजच्या भारताच्या विकासासाठी महत्वाचे ठरु शकतात. जे आजच्या लोकशाही व्यवस्थेत अत्यंत आवश्यक आहे. आणि न्याय, सुशासन आणि सशक्त समाजाच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक ठरतात.

अहिल्याबाई म्हणजे दिव्यतेची आणि नेतृत्वाची जिवंत मुर्ती.

"धर्म आणि न्याय यांचा पाया
घातला होता राजमाता होळकरांनी ।
ज्यांच्या छायेत फुलली संस्कृती,
त्या पुण्यश्लोकेस नमन करु या वाणी" ।।

न्यायप्रिय प्रशासन आणि नेतृत्व

अहिल्याबाईंनी न्यायप्रिय आणि पारदर्शक प्रशासन निर्माण केले. त्यांच्या दरबारात जनसुनावणी होत असे. तिथे प्रत्येक नागरिकाला आपली समस्या मांडण्याची संधी मिळत असे. त्या रोज दरबारी बसून लोकांच्या तक्रारी ऐकायच्या.



आजच्या काळात त्यांचं महत्व :-

आज आपण लोकशाहीत जगतो पण खरं लोकशाही नेतृत्व काय असतं हे अहिल्याबाईंच्या जीवनातून शिकायला हवं. त्यांनी दाखवून दिले की, सत्तेचा उपयोग लोकांची सेवा करण्यासाठी करावा. त्यांच्यासारखी सेवा, नीतिमत्ता आणि धैर्य आपल्यात आलं तर आपणही समाजासाठी खूप करू शकतो. त्यांच्या न्यायप्रिय शासनपद्धतीत 'जनसुनावणी आणि त्वरित न्याय' यावर भर होता. जे आजच्या 'ई-गव्हर्नन्स आणि डिजिटल न्याय प्रणाली' सुसंगत आहे.

"संतांशी स्नेह, शेतकऱ्यांशी नाते,
प्रजेच्या मनात माया जपली....
मातृत्वाने राज्य केले तिने,
इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरली...."

एकदा त्यांच्या दरबारात एक शेतकरी तक्रार घेऊन आला. की राजाच्या घोडदलाने त्याचे



पीक उध्वस्त केले आहे. ही तक्रार सामान्य होती पण अमंल दारांनी शेतकऱ्याच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले.



अहिल्याबाईंना हे कळताच त्यांनी पूर्ण चौकशी करून त्याला नुकसान भरपाई दिली. एवढंच नाही तर संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करून राजसत्ता प्रजेची सेविका आहे, स्वामी नव्हे हे दाखवून दिले.

धार्मिक आणि सामाजिक काम

"गंगेच्या तीरावर मंदिरे घडविली
काशी विश्वेश्वर जागविला.....
धर्मसेवा हीच पूजा मानली,
यांच्याच पुण्याईने काळही गाजविला..."

अहिल्याबाईंनी संपूर्ण भारतभर मंदिरे, धर्मशाळा घाट, विहिरी बांधल्या. त्यांच्या धर्मकार्यात कधीही कट्टरता नव्हती त्या सर्व धर्माचा आदर करत. आणि सन्मानही. त्यामुळे धार्मिक सहिष्णूतेचा विचार अधिक दृढ झाला.





इ.स. १७८० मध्ये अहिल्यादेवींनी वाराणसीतील काशी विश्वनाथ मंदिराचा जिर्णोद्धार केला. औरंगजेबाने पाडलेल्या मूळ मंदिराच्या जागी नवीन मंदिर उभारले. त्यासाठी त्या स्वतः वाराणसीला गेल्या, स्थानिक लोकांशी चर्चा केली आणि परंपरा जपून मंदिर बांधले. ही केवळ धार्मिक गोष्ट नव्हती तर भारतीय संस्कृती आणि आत्मसन्मान टिकवण्याचा प्रयत्न होता. त्यांच्या समाजसेवेच्या कार्यामुळे त्यांना लोकमाता म्हणत. त्यांच्या सार्वजनिक बांधकाम योजनामुळे आजच्या विकास प्रकल्पांना चालना मिळाली आहे.

स्त्री शिक्षण आणि सशक्तीकरण



"ज्ञानाने पेटवली दिव्यांची वात,
अहिल्याबाईंनी दिला स्त्रियांना आत्मसन्मान....
न्याय, शिक्षण सामर्थ्याचं बळ,
संपूर्ण विश्वात ककया त्यांचा सन्मान....."



अहिल्याबाईंनी स्त्री शिक्षणाला मोठा पाठिंबा दिला. आपल्या राजवाड्यात स्त्रियांसाठी शिक्षणाची सोय केली. त्यांच्या काळात शिक्षणप्रणाली सुधारण्यासाठी प्रयत्न केले.

शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रिया सक्षम होतील आणि समाजाच्या विकासात योगदान देतील असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या दरबारात महिला अधिकारी होत्या. विधवा महिलांना आश्रय दिला. पुनर्विवाहसाठी मदत केली.

अहिल्याबाईंनी शिक्षणाबरोबर त्यांचे आर्थिक शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबनावर भर दिला. त्यांनी महिलांना विविध कौशल्ये शिकवून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या या प्रयत्नांमुळे स्त्री शिक्षणाला नवी दिशा मिळाली आणि पुढील पिढ्यांसाठी मार्ग मोकळा झाला.

हळूहळू त्यांच्या प्रयत्नांनी अनेक स्त्रियांनी शिक्षण घेऊन नवे आयुष्य घडविले. त्यांच्या कार्यामुळे स्त्री शिक्षणाला दिशा दिली.

आजच्या काळात 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' यासारख्या अभियानांमध्ये त्यांचे विचार प्रतिबिंबित होतात. त्यांच्या काळातील शिक्षणाच्या संकल्पना आजच्या 'समावेशक शिक्षण धोरणांशी' जोडला गेला आहे.

सती प्रथेचा विरोध :- त्या काळात सती प्रथा प्रचलित होती. खंडेराव होळकर यांच्या निधनानंतर अहिल्याबाईंनी स्वतः सती जाण्यास नकार दिला. सती प्रथेचा विरोध करून स्त्रियांना स्वतंत्र जीवन जगण्याचा अधिकार दिला.

त्यांच्या कार्यामुळे आणि स्त्रीविषयक धोरण आपल्याला शिकवते की योग्य संधी मिळाल्यास स्त्रिया समाजाची मोठी ताकद बनू शकते हे अहिल्याबाईंनी दाखवून दिले.

अर्थिक आणि औद्योगिक विकास, पायाभूत सुविधा



"गडकोट बांधले, मंदिरे घडविली,
प्रेमाने राज्य फुलविले.....
ज्यांनी जीवनात धर्म पेरला,
त्या मातेस नमन कर चला....."

अहिल्याबाईंनी महेश्वरच्या वस्त्रोद्योगाला चालना दिली. ज्यामुळे स्थानिक उद्योग आणि स्वावलंबन यांना प्रोत्साहन मिळाले. आजच्या मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत यासारख्या उपक्रमांमध्ये त्यांचे धोरण लागू होते.

त्यांनी तलाव आणि विहिरींची निर्मिती केली, जे आजच्या स्मार्ट सिटी आणि जलसंधारण प्रकल्पांशी जोडले जाऊ शकतात. त्यांच्या स्थायी विकासाच्या संकल्पना आजच्या पर्यावरणपूरक धोरणांमध्ये महत्वाचे आहेत.

जातीय समता आणि सामाजिक न्याय

अहिल्याबाईंनी जातीय भेदभाव दूर करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. त्यांच्या दरबारात सर्व जाती धर्माच्या लोकांना समान न्याय मिळत असत. अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी सर्वांना प्रवेश खुला केला. सिंचन व्यवस्था सुधारली ज्यामुळे शेती उत्पादन वाढले.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

अहिल्याबाईनी जातीय भेदभाव अस्पृश्यता आणि रुंढा प्रथा याविरोधात आवाज उठवला. आजच्या समानता आणि सामाजिक न्याय घोरणांमध्ये त्यांचे विचार महत्वाचे ठरतात. त्यांच्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्वांमुळे आजच्या सर्वसमावेशक समाजाच्या निर्मितीस प्रेरणा मिळते.

मृत्यू व अखेरचे शब्द

अहिल्याबाईचा मृत्यू इ.स. १७९५ मध्ये झाला. मृत्यूपूर्वी त्यांनी आपल्या नातवाला राज्याची सुत्रे दिली व सांगितलं, "राजा असणं म्हणजे राजसिंहासनावर बसणं नव्हे, तर प्रजेच्या मनात बसणं."

त्यांचे हे शब्द आजच्या राजकारणांनाही मार्गदर्शक ठरावेत.

अहिल्याबाईचा विचारांचा आणि कार्याचा प्रभाव आजही समाजावर दिसून येतो. आजच्या काळातही शासन समाजाच्या दिशेने मार्गदर्शक ठरु शकतात. त्यांच्या कार्याची आधुनिक काळातील उपयुक्तता पाहून त्यांचे योगदान अधिक प्रेरणादायी वाटते.



"अहिल्याबाईचा तेजोमय झरता प्रवाह,
न्याय, शिक्षण, ककणा यांचा सुकाळ
समाजहितासाठी केला त्याग महान,
अहिल्याबाईचा उजळला इतिहास गगनसम"

त्यांच्या जयंतीनिमित्त शतशः वंदन आणि अभिवादन! धन्यवाद!!!



राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धा - २०२५

नाव - सौ. जोशी सुमांगी सारंग.

निबंध विषय - लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचे कार्य, विचार.

शाळेचा पत्ता - माऊसाहेब फिरोदिया हायस्कूल
विश्राम बाग, जुनी महानगरपालिकेजवळ
अहिल्यानगर.

संपर्क क्रमांक - 9604357072
8788302717



लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचे जीवन, कार्य, विचार

॥न राष्ट्रं न वनं पुण्यं न नगो न सरित् सरः ।
।म देवमंदिरं यत्र सा देवी न प्रशंसिता ॥

अर्थात ज्या ठिकाणी अहिल्येचे कीर्तिगान गायले जात नाही असे एकही राज्य, लघोवन, पर्वत, नदी, तीर्थस्थळ वा देवालय भारतवर्षात आढळून येणार नाही.

संस्कृतीतूनच तत्कालीन समाजाचे नानाविध अंतरंग अविष्कृत होत असल्याने त्यांच्या संवर्धनासाठी ज्या महनीय व्यक्तींनी विशेष प्रयत्न केलेत, अशा व्यक्तिमत्वांमध्ये अहिल्यादेवी लोकमातांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

अखंड हिंदुस्तान पादाक्रांत करीत परकीय आक्रमकांनी नष्ट केलेल्या आपल्या आस्मिता व श्रध्दास्थाने यांच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाची मुहूर्तमेढ छत्रपती शिवरायांनी रोवल्यानंतर अशा असंख्य सांस्कृतिक पाऊलखुणा संस्कृतीसंवर्धक अहिल्यादेवी यांनी पुनर्जीवित केल्या. त्यांनी आपल्या सनातन संस्कृतीच्या प्रतिकांचे पुनर्निर्माण करून भारताच्या संस्कृतीचा पुण्यप्रवाह पुनर्जीवित केला. परकीय आक्रमणांच्या नंतर एकामागोमाग एक हिंदू राज्ये विलयास गेली, आणि देवस्थाने उध्वस्त झाली. या सांस्कृतिक आक्रमणांमुळे हिंदू धर्म आणि संस्कृतीचा प्रवाह कुंठित झाला होता. तो प्रवाह अहिल्यादेवींनी केवळ अठ्ठावीस वर्षात पुन्हा प्रवाहित केला जो आजतागायत निरंतर वाहतोच आहे. त्यांच्या ह्या व्यापक कार्यामुळे अजून एक प्रवाह सतत वाहता राहिला तो म्हणजे रोजगाराचा! सुकाळ असो वा दुष्काळ, सतत काही ना काही काम सुरु राहिले पाहिजे हा त्यांचा कटाक्ष होता. त्यामुळे त्यांच्या राज्यातील कारागिरांना, मजुरांना भरपूर रोजगार मिळाला. शिवाय शिल्पकला, वास्तुकला या कलाही भरभराटीस आल्या.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE



अहिल्यादेवींनी प्राचीन सप्तपुरी, बारा ज्योतिर्लिंग व इतर अनेक प्राचीन मंदिरांच्या पुनर्निर्माणासाठी अभिनव उपक्रम हाती घेतले. त्यांनी केवळ आपल्या राज्याचाच विचार न करता अखंड भारताच्या आध्यात्मिक एकात्मतेला बळकटी दिली. परिणामी आज तीनशे वर्षांनंतरही त्यांच्या या पाऊलखुणा भारतीय एकात्मतेच्या योगदानाची साक्ष देतात.

आपल्या राज्यातील सांस्कृतिक आणि सामाजिक अभिसरणासाठी त्या विद्वान, पंडित, शास्त्री यांचा यथोचित मानसन्मान करीत असत. महेश्वर व अन्यही तीर्थक्षेत्री त्यांनी शास्त्री, पंडित यांना आणून वसवले व त्यांच्या चरितार्थाची जी योजना केली त्यातून अशा धार्मिक स्थळी ज्ञानार्जन, ज्ञान संरक्षण, ज्ञान संवर्धन व ज्ञान दान यांच्या परंपरा सुरु झाल्या. अनेक संस्कृत विद्वानांना त्यांनी राजाश्रय दिला. मल्हारभट मुळे, रामचंद्र कानडे, गणेश भट, निहाल भट्ट, भैय्या शास्त्री त्रिवेदी, खुशालीराम असे अनेक विद्वान तेलंगना, गुजरात, संगमनेर, रत्नागिरी, केशवपाटण अशा अनेक ठिकाणांहून बोलवले होते हे विशेष. पंडित खुशालीराम भट्ट यांच्याकडून अनेक विद्वानांच्या सहाय्याने अहिल्यादेवींनी 'अहल्या कामधेनू' नावाचा ग्रंथ लिहून घेतला. या ग्रंथांमध्ये अहिल्यादेवींच्या धार्मिक आणि आध्यात्मिक प्रेमाचे मनोहर दर्शन घडते. 'होळकर राजतरंगिणी' हे अहिल्यादेवींच्या गौरवार्थ रचलेले एक काव्य आहे. रामस्वामी राजू यांनी विसाव्या शतकाच्या आरंभी केलेली ही रचना आहे. यात कवी म्हणतो, 'यत्र धर्मप्रवादो वा सत्कथा वाऽन्यरूपिणी। तत्राहल्या महादेवी स्वयमेव प्रशंसिता'॥ म्हणजे धर्म व संत सज्जन यांची जिथे जिथे चर्चा होत असे त्या त्या ठिकाणी अहिल्यादेवींची प्रशंसा होत असे. त्यांच्या हया अभूतपूर्व योगदानामुन भारताच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाची प्राचीन परंपरा अधोरेखित होते.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE



यावद् भागीरथी गंगा यावद् देवो महेश्वरः।
यावद् वेदाः प्रवर्तन्तेह तावत्त्वं विजयी भव॥

अर्थात, जोपर्यंत भागीरथी गंगा अस्तित्वात आहे, जोपर्यंत शिव आहे, जोपर्यंत या जगात वेदांचे मंत्र गायले जात आहेत, तोपर्यंत सर्वत्र तुमचा विजय होत राहील.

जलसंधारण हा अहिल्यादेवींसाठी अत्यंत आस्थेचा विषय होता. जलसंधारणाच्या चळवळीचा पाया खऱ्या अर्थाने त्यांनीच रोवला, या चळवळीत लोक सहभाग घेऊन रचनात्मक लोक चळवळीची मुहूर्तमेढ केली. प्राचीन भारतातील जलसंधारणाच्या परंपरेला अनुसरून कुंड, तलाव, विहिरी, बारवा यांची निर्मिती त्यांनी सर्वत्र केली. केदारनाथ येथील कुंड जमिनीपासून तीनशे फूट उंच आहे. वृंदावन येथील बारव लाल दगडाची बनविलेली आहे. तिला पुष्ठ पायऱ्या आहेत.

महाराष्ट्रात त्यांनी वेरुळ येथे शिवतीर्थ या नावाने प्रसिद्ध असलेल्या बारवेचा जीर्णोद्धार केला. हे तीर्थ म्हणजे घृष्णेश्वर मंदिरापासून अर्ध्या कि.मी. वर असलेला जलाशय आहे. यांच्या जीर्णोद्धार इ.स १७६९ मध्ये केला गेला. या ठिकाणी संरक्षक भिंतीस पूर्वेच्या बाजूने अहिल्यादेवींचा शिलालेखही आहे.

अहिल्यादेवींचे पाण्याबाबतचे धोरण अतिशय मेमके आणि अभ्यासपूर्ण होते. पाण्याचे योग्य नियोजन करणे हा त्यांच्या प्रशासनव्यवस्थेतील एक महत्त्वाचा घटक होता. नदी नसलेल्या परिसरात विहिरी, बारवा निर्माण करून त्यांनी पाण्याची मूलभूत गरज भागविण्याचे धोरण अवलंबिले. त्यांच्या विचारांचा पाया मानवतावादी आणि व्यापक होता, त्यांची दूरदृष्टी भविष्य काळाचा वेध घेणारी होती, यास्तव त्यांनी बारवांची निर्मिती जशी आपल्या राज्यात केली तशीच भारताच्या इतर भागातही केली. अहिल्यादेवींच्या जलनियोजनाच्या बाबतीतले हे योगदान ऐतिहासिक दृष्ट्या अतिशय महत्त्वाचे आहे.

Sundaram
FOR EDUCATIONAL USE



अहिल्यादेवींनी भारतीय संस्कृतीचे पुनरुत्थान केले. ते केवळ ठिकठिकाणच्या इमारतींच्या निर्माणातून नव्हे. त्यांचे सारे जगणे म्हणजे शिवशंकराच्या जटेमधून वाहणाऱ्या जीवनदायी गंगेसारखे कल्याणकारी होते. त्यांच्या चरित्राचे पवित्र गंगाजल तीर्थ म्हणून प्राशन केले तर या देशातला पुरुषार्थ, धर्म आणि संस्कृतीचा खरा अर्थ त्याच्या रक्षणार्थ आणि आचरणार्थ उभा राहील...

राजा भगीरथाच्या तपश्चर्येमुळे लोककल्याणासाठी पृथ्वीवर गंगा प्रकट झाली, तर याच भूमिकेतून अहिल्यादेवी यांनी भागीरथीच्या जलसंधारणाची भूमिका लोक चळवळ अवघ्या भारत वर्षात उभी केली...

अशा अनेक प्रकारे अहिल्यादेवींनी आपल्या कारकिर्दीत खूप उल्लेखनीय कार्य केले आहेत कि, जे खरोखरच शब्दांत मांडणे अशक्य, त्यांनी केलेल्या कार्याची अनुभूती आजही आपण बघत आहोत. म्हणूनच म्हणावेसे वाटते जोपर्यंत भागीरथी गंगा अस्तित्वात आहे, जोपर्यंत शिव आहे, जोपर्यंत या जगात वेदांचे मंत्र गायले जात आहेत, तोपर्यंत लोकमातेचा विजय होत राहणार. लोकमाता अहिल्यामाई होळकर आपण आम्हांस नेहमीच प्रेरणास्थानी राहणार, आपल्या कार्यकर्तृत्वास् आमचा मानाचा मुजरा.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE


पुण्यश्लोक
अहिल्याबाई होळकर



"पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य..."

इतिहासाने पानोपानी....
लिखी गाईली गाथा !
होळकरांची तेजस्वी ती....
पुण्यश्लोक अहिल्यामाता !!

जन्म हा आपल्या हाती नसतो. परंतु मिळालेल्या आयुष्याचं अहिल्यादेवी सारखं सार्थक करायचं की बाकींच्या सारखं उधळून द्यायचं हे आपल्या हाती असतं. अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव सुशिलाबाई तर वडिलांचे नाव माणकोजी असे होते.

अहिल्याबाईंचा विवाह वयाच्या आठव्या वर्षी माळवा प्रांताचे सुभेदार मल्हारराव होळकरांचे सुपुत्र खंडेराव यांच्याशी झाला. अहिल्याबाई व खंडेराव यांच्या संसारवेलीवर मालेराव व मुक्ताबाई या गोड कळ्या उमलल्या. पुढे अहिल्याबाईंचे पती खंडेराव होळकर यांना कुंभेरीच्या लढाईत वीरमरण आले. त्यानंतर त्यांचे सासरे मल्हारराव होळकर यांचेसुद्धा १२ वर्षांनी निधन झाले. त्यानंतर अहिल्याबाईंनी माळवा प्रांताचा कारभार आपल्या हाती घेऊन तब्बल २८ वर्षे प्रजाहितदक्ष राज्यकारभार केला.

अहिल्याबाईंनी आपल्या आयुष्याचा क्षण आणि क्षण आपल्या प्रजेसाठी, त्यांच्या सुखासाठी वेचला. त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. अन्नछत्रे घातली. पाणपोया घातल्या. सदावर्ते उघडली. लोकांसाठी घाट बांधले. जीर्णोद्धार केले. आयुष्य सार्थक केल. औदार्यात त्यांनी खरं म्हणजे कर्णालाही मागे टाकले आहे. असं औदार्य आजपर्यंत झालं नाही. तुम्ही भारतात अष्टदिशांना जा, अहिल्याबाईंनी केलेल कार्य; कोणत्याही रुपात तुम्हाला दिसेलच ! आणि हे सार त्यांनी केलं, अनेक आपत्ती सोसून, संकटे झेलून, न डगमगता खंबीरपणे !

तो काळ अडीचशे वर्षांपूर्वीचा, स्त्रीवर अनेक बंधने होती. तिला शिक्षण तर नव्हतंच, पण मोकळेपणाने वावरणं, हसणं



बोलणं पण तिच्या दैवात नसायचं. अनेक रूढी, अनेक परंपरांनी तिला जखडून टाकलं होतं. सतीची दुष्ट आणि अन्याय्य रूढी पतिव्रत्याचा पुरावा मानली जात असे. पतीच्या मृत्यूबरोबरच ती आयुष्य संपवेल, तीच सती असा दंडक झाला होता. पत्नी गेली तर पुरुष लगेच दुसरा विवाह करू शकत असे, परंतु पतीचा मृत्यू पत्नीचही आयुष्य संपवून जाई. त्यामुळे सौभाग्यव्रते करून पतीला आयुष्य मागणे हा इतकाच इलाज बाईच्या हाती होता.

खंडेरावांचा मृत्यू झाला तेव्हा, अहिल्यादेवी २९ वर्षांच्या, मालेराव नऊ वर्षांचा आणि मुक्ताबाई सहा वर्षांची होती. हे सारे पाश तोडून अहिल्यादेवीसुद्धा सती जाण्यास निघाल्या होत्या. त्या धीरोदात्त स्त्रीस ते कठीणही नव्हतं. परंतु मल्हाररावांनी आकांत मांडला, पदर पसरला, पायाशी डोई घासली, "बाई ग प्रजेसाठी फक्त तूच आहेस जीव द्यायचा तर प्रजेसाठी दे.... प्रजेची आई हो!" आणि मग त्या सती गेल्या नाहीत. उर्वरित आयुष्यात त्यांनी महान कर्तृत्व केल आणि सतीची चाल किती घातक आहे याचा पुरावा दिला. अहिल्यादेवी धार्मिक होत्या पण रूढी परंपरा पारखून, बुद्धीवर घासून, विचार करून स्वीकारण्याचा त्यांचा प्रघात होता. म्हणूनच त्यांनी बऱ्याचवेळा रूढीविरुद्ध मनास पटेल तेच केले. खऱ्या अर्थाने त्याकाळात स्त्री स्वालंबनाचा पाया पुण्यश्लोक अहिल्यादेवीनेच घातला. म्हणून म्हणतात की,

"भुकेल्या पोटी घास देऊनी तृप्त
केले तहानलेल्या जीवा, जात धर्म विसरून, रूढी
परंपरा पोखरून दाखवला मानवसेवेचा मार्ग नवा,
अहिल्यादेवींच्या स्त्री कार्याचा
निरंतर तेवत राहील दिवा....!!"

अहिल्याबाई म्हणत, "ज्या रूढी अंधाराकडून उजेडाकडे नेतात त्या रूढी आम्हाला मान्य आहेत. उजेडाकडून अंधाराकडे नेणाऱ्या रूढींना आम्ही भंग्यसुद्धा म्हणतो. अशा रूढी पाळताना प्रत्येकाने विचार करावा." त्यांच्या मुलीचं मुक्ताचं लग्न रूढी मोडून ठरवलं आणि रूढी मोडूनच्या केल. याच पद्धतीने अहिल्यादेवींना मुलगा पद्धतीचा संताप होता. त्या म्हणत स्त्रीच्या कोतुकाची



नुसती दोंगे. तिला देवी म्हणावं, देवता म्हणावं, आदिशक्ती म्हणावं. आणि तिच्या गृहप्रवेशाचे पैशे द्यावे, सोनेवस्तू द्यावा. मानपान करून द्यावा, पैसा ओरपावा हे कसले खेळ ? म्हणूनच त्यांनी राज्यात बुंडाबंदी जारी केली. बुंडा देणारा, घेणारा आणि मध्यस्थ या सर्वांना दंड ठोठावण्याची तरतूद या कायद्यात होती. प्रजेला सुख लागावे म्हणून ही स्त्री दक्ष राहिली. अशा स्वार्थी रूढी तोडणे फार कठीण असते. पण ते काम अहिल्यादेवींनी केले.

"ऐसी कळवळ्याची जाती।
लाभावीण करी प्रीती॥"

लाभावाचून प्रेम करणाऱ्या अहिल्यादेवी एका राज्याच्या सत्ताधीश होत्या. आपल्या सत्तेचा उपयोग त्यांनी प्रजेसाठीच केला हा त्यांच्या चरित्राचा विशेष आहे. आपले वैयक्तिक दुःखाचे गाठोडे बाजूला ठेवून त्या प्रजेसाठीच राबल्या.

सतीच्या रूढीची चीड, बुंड्याचा संताप आणि मुक्ताच्या लग्नाचा पण लावण्याचं धारिष्ट्य अहिल्यादेवीमध्ये होते. त्यांचा पुत्र मालेराव हा दुर्गुणी होता. त्याची अहिल्याबाईंनाच खात्री नव्हती. अशावेळी मुक्ताबाईंचे कन्यादान स्वतः त्यांनीच केले. यासाठी धैर्य आणि लागणारे धाडस दोन्हीही राज्ञमातेकडे होते.

भाद्रपद मरिन्यानंतर्‍या पितृपक्षात अहिल्यादेवीकडे पूर्वजांची श्राद्धे होत. स्वतः अहिल्यादेवी श्राद्धाचे पाणी सोडत. अंबादास गुरुजींना त्या म्हणत, "मजला स्त्री ही ईश्वरनेच केले, मला विधवाही त्यांनेच केले. मी जशी आहे तशी करतेय....!" लोकनिंदा सहन करणे फार कठीण आहे. पण ती सहन करूनही अहिल्यादेवींनी आंधळ्या रूढीवर प्रहार केले.

श्रावणात आणि इतर वेळेही मुस्लीम फकीर आले तर अहिल्याबाई त्यांनाही त्यादरीसाठी खैराती देत असत. म्हणायच्या "आम्ही सगळ्यांना एक समजतो." सर्वधर्म समभाव हा शब्दही जेव्हा वापरात नव्हता त्यावेळी त्यांची अहिल्यादेवींची सर्वांशी वर्तणूक सर्वधर्मसमभावाची होती. त्यांनी तो कृतीत आणला होता.

अहिल्यादेवींची निष्ठा जाज्वल्य होती. त्यांना पैशाचा मोह कधीच नव्हता. पेशवे कर्जबाजारी झाले आहेत



हे जेव्हा अहिल्यादेवींना कळाले तेव्हा या निर्भय सुनेने सासरे मल्हारावांवर जे ताशेरे सोडले आहेत, त्याचा विचार आज प्रत्येक नागरिकाने, प्रत्येक सत्ताधाऱ्याने, प्रत्येक राजकारण्याने करायला हवा. त्यांची ही कथा मालव्यात प्रसिद्ध आहे. त्या म्हणाल्या "मांमजी, श्रीमंत पेशव्यांना कर्ज होते आणि त्यांचे सरदार कर्जोउपरी होतात हे घडतेच कसे? घ्यायास पदर पसरावा लागत असेल तर रुपयांची नदी सरदारांच्या तिजोरीत जिरते हे स्पष्ट आहे. मांमजी आपण पेशव्यांचे सुभेदार, चेंदारी नव्हेत. मांमजी अपकीर्तिपरीस मरण पत्करावे, फुकट्ची लनसउी नको हे आपणच शिकवले. आज आपण पेशव्यांची हिस्सेवारी लुउवत आहोत. राज्याच्या श्रीमंतांच्या राज्यापेक्षा व्यक्तिगत स्वार्थ अधिक आहे काय, असा आमचा स्पष्ट सवाल आहे! पुणे येथे जाऊन कर्जाची पै पै पावती करून यावी. जय वा पराजय यावर आम्ही यश मोजत नाही. आमचे खरे माप राज्यासाठी निष्ठा आणि सत्य शुद्ध हिशोब!" या तडफदार सुनेचा सल्ला मानून मल्हारराव पुणे मुक्कामी जाऊन पेशव्यांचा कर्जाचा काही भाग फेडून आले. हे सगळ घडवणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवीच होत्या. एक जागृत राज्यशासक, निष्ठावान राज्यकर्त्या!

सत्यासाठी त्या कोणालाही भीत नसत. त्यांनी नाना फडणवीसांना महेश्वर येथील वकीलाकडून जे पत्र टाकले होते, त्यात स्पष्ट लिहायला सांगितले होते की दारुगोळ्याचा वापर धर्मकार्यात करणे योग्य नव्हे. धर्मकार्यात विघ्ने येऊन माणसे जाया करणे ही कुठली रीत? यात चूक ज्यांनी बुद्धिहिनांच्या हाती दारूबारूद दिली त्यांची! आपणास माझा क्रोध येईल. कदाचित शासनही करील. पण सत्यासाठी आम्ही मृत्यूसही घाबरत नाही."

अशा या पुण्यश्लोक राजमातेच्या कार्याचे चिंतन आजच्या युगातील प्रत्येक स्त्रीने केले पाहिजे. समाजाचा रोष स्वीकारून समाजसुधारणा करणे. सतीच्या चालीला विरोध, बुरुखाबंदी, अंधश्रद्धा निर्मूलन, सर्वधर्मसमभाव या सगळ्यांचा पाया अहिल्यादेवींनी रचला.

आज आधुनिक जगात वावरत असताना प्रत्येक महिला भगिनींनी अहिल्यादेवींचा आदर्श घेऊन



अन्यायाविरुद्ध आवाज उठवला पाहिजे. मुलता शासकीय योजनेचा लाभ घेऊन "लाडकी बहिण" बनण्यापेक्षा पुण्यश्लोक राजमातेसारखे "रणरागिनी" बनण्याची गरज आज आहे आणि केवळ अशानेच स्त्री अत्याचाराला आळा बसू शकतो.

अशा या थोर राजमातेच्या आयुष्याची प्राणज्योत १३ ऑगस्ट १७९५ रोजी मावळली पण त्यांच्या कार्याची प्रेरणा आजही तुमच्या आमच्या हृदयात तशीच जीवंत आणि ज्वलंत आहे. शेवटी फक्त नमूद करावेसे वाटते की,

"कल्याणकारी कामे करुनी, ख्यात ती
कुशल प्रशासिका, मान उंचावली
स्त्रियांची, खऱ्या अर्थाने ती
लोकनायिका, पुण्यश्लोक राजमाता....!"

— समाप्त —

नाव - तुषार तुकाराम भातमारे
मोबाईल नं. - 7875820141 (७८७५८२०१४१)
ई-मेल - bhatmaretushar96@gmail.com
पत्ता - मु. पो. कोंगनोळी, तालुका - कवठे महांकाळ,
जिल्हा - सांगली, ४१६ ४१८





नाव- पारखे विक्रम केरू
मु.पो- वांगदरी. ता-श्रीगोंदा
जिल्हा- अहिल्यानगर
वय- ३८
मो- ९७६६५९८४१६

अहिल्याबाई होळकर यांचे कार्य

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. राणी अहिल्यादेवी यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले किंवा त्यांचा जीर्णोद्धार केला. महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकरांचे देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालही भेट देतात.

अहिल्याबाईंना प्रजेस कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती १७६५ मध्ये जसेसाठी झालेल्या एक लढाई दरम्यान लिहिलेल्या पत्रावरून मल्हारराव्यांचा अहिल्याबाईंच्या कर्तृत्वार एक विश्वास होता. हे दिसून येते. चंबाळ पार करून नवलेहेर येथे जावा. तेथे ४-५ दिवस मुकाम करू शकता. तुम्ही मोठे सैन्य देऊ शकता व त्यांचे शस्त्रांसाठी योग्य सजवीज करा. कूच करतांना मागर्वार तुम्ही सुरक्षेसाठी चौक्या लावा. पूर्वीच शत्रूक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्युनंतर, अहिल्यादेवींनी स्वतःलाच राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली. त्यांनी शासन करण्यास मालव्यात अनेकांचा विरोध होता पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास उत्सुक होते. अहिल्यादेवी सैनिकी कवायतीत हत्तीच्या हौद्याच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत, असे म्हणतात.

पेशव्यांनी परवानगी दिल्यावर, ज्या माणसाने लिला विरोध केला होती त्यास चाकरीत घेऊन, तुकोजीराव होळकर



(मल्हारराव यांचा एकुलता एक पुत्र) यास सैन्याचा मुख्य करून, अहिल्यादेवी होळकरांनी पुर्ण दिमाखात मालव्यास प्रयाण केले. अहिल्यादेवी होळकरांनी पडदा पुथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदा तीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही इंदुर या खेड्याचा विकास करुन त्यांचे सुंदर मोठ्या शहरात रुपांतर करणे, हे अहिल्यादेवींनी केलेले फार मोठे काम होते. त्यांनी मालव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले, हिंदू मंदिरांमध्ये कायमस्वरुपी पूजा सुरू रहावी म्हणुन अनेक दाने दिली. मालव्या बाहेरही त्यांनी मंदीरे, घाट, विहरी तलाव व धर्मशाळा बांधल्या. भारतीय संस्कृती कोशात अहिल्यादेवी होळकरांनी केलेल्या बांधकामांची यादी आहे- काशी, गया, सोमनाथ, अयोध्या, मथुरा, हरिद्वार कांची, अवंती, द्वारका, बद्रीकेदार, रामेश्वर व जगन्नाथपुरी वैगरे. अहिल्यादेवींस, सावकार, व्यापारी, शेतकरी इत्यादी आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले बघून आनंद होत असे. परंतु त्यांनी सर्व राज्यकारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता, असे दिसते. अहिल्यादेवींनी रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यानी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली अहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेउ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने कोणा घेतल्याशिवाय दत्तक घेउ शकत असे. एकदा त्यांच्या मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तकविधानाचा कार्यक्रम स्वतः प्रायोजित करून, रीतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. अहिल्यादेवी होळकरांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून १९९६ मध्ये, इंदुरातील नागरिकांनी त्यांच्या नावाने एक पुरस्कार सुरु केला. तो दरवर्षी जनसेवेचे विशेष काम करणाऱ्यास दिला जातो. भारताच्या पंतप्रधानांनी पहिल्या वर्षी तो पुरस्कार नानाजी देशमुखांना दिला. अहिल्याबाई होळकर यांच्या स्मरणार्थ, इंदूर येथील विश्वविद्यालयास त्यांचे नाव दिले आहे.

तसेच त्यांचे नावाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठ हे एक विद्यापीठ सोलापूरला आहे. मिल्क व गोंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमधील



M T W T F S S
Page No.:
Date:
YOUVA

वाद अहिल्यादेवी सोडवू शकल्या नाहीत. तरीही त्यांनी त्या लोकांना पहाडातील निरुपयोगी जमीन दिली आणि त्यांनी त्या लोकांन त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर' घेण्याचा अधिकार दिला. याही बाबतीत अरंवल लेखक 'माल्कम' यांच्यानुसार अहिल्यादेवींची त्यांच्या सर्वांवर लक्षे ठेवले. महेश्वर येथील अहिल्यादेवींनी राजधानी ही जणू काव्य, संगीत, कला व उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शहीर अनंतफंदी यांनी व संस्कृत विद्वान खुशालीराम यांनी अहिल्याबाईंनी आश्रय दिला. कलाकारांना मूर्तिकारांना व कलाकारांना त्यांच्या राजधानीत सन्मान व वेतन मिळत असे. त्यांनी महेश्वर शहरात एक कपडाची गिरणीपण सुरू केली. एकोणीसाव्या व तिसाव्या शतकातील भारतीय, इंग्रजी व अमेरिकन इतिहासकार हे मान्य करतात की अहिल्यादेवी होळकरांस माळवा व महाराष्ट्रात, त्या काळी व आताही संताचा सन्मान दिला जातो इतिहासाच्या कोणाही अभ्याकास ने मत खोडुन काढण्याजोगे आजवर काहीही सापडलेले नाही. राजकारणातील बारकावे व तत्व व्यावहारीक नीती नियम व सूत्रे आपल्या देशाची राजकीय सामजीक, भौगोलिक स्थिती रणांगणावरील आखाडे व अडचणी आणि बारकावे समजुन घेतले.

महाराणी अहिल्याबाईंनी माळव्यावर न्याय, शहाणे आणि ज्ञानी रीतीने राज्य केले.



पदवीधर प्रकोष्ठ
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र राज्य
पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या
३०० व्या जयंती निमित्त

राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धा

विषय
अहिल्याबाई होळकर : न्याय, भक्ती आणि प्रशासन यांचा
त्रिवेणी संगम

गट
वयोगट ४ : २१ वर्षापुढील
एकूण शब्द : १३१६

निबंध लेखन

श्री. बाळासाहेब रघुनाथ चव्हाण. (एम्.ए., बी.एड्.)
सहा. शिक्षक
के.एल. पोंदा हायस्कूल, डहाणू, ता-डहाणू जि-पालघर
संपर्क क्रमांक : ७३८७३०७६०९
८२०८००९३४२
ई-मेल - brchavhan4@gmail.com



अहिल्याबाई होळकर: न्याय, भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम

श्री शंकर आज्ञेवरून.....

भारतीय सौर १० ज्येष्ठ शके १९४७ अर्थातच त्रिशताब्दी जयंती वर्षातील दिनांक ३१ मे, २०२५ रोजी उषःकाल झालेल्या शनिवारी अस्मादिकांचे प्रेरणास्थान लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधत त्यांच्या स्मृत्यर्थ पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र राज्य यांनी अहिल्याबाईंच्या युगानुकूल परिवर्तनातून साधलेल्या दिव्यत्वाला नमन करण्याच्या प्रांजळ उद्देशाने सर्वांसाठी राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धा आयोजित केली. आणि मला "अहिल्याबाई होळकर: न्याय भक्ती आणि प्रशासन यांचा त्रिवेणी संगम" या औत्सुक्यपूर्ण विषयावर विचार व्यक्त करण्याची सुवर्ण संधी उपलब्ध करून दिली, त्याबद्दल आपले मनापासून आभार मानून, अतिशयोक्तीचे कुठेही गालबोट लागणार नाही, याची जाणीवपूर्वक दक्षता घेऊन, सभोवतालच्या विद्यमान वास्तवाचे भान ठेवत, माझ्या देवणीतले अल्पस्वल्प शेलके शब्द यतमति संकलित करून आमचा ऐवढे असामान्य कार्यकर्तृत्व अन् धर्मपरायण नेतृत्व असणाऱ्या कर्मयोगिनी अहिल्याबाई होळकर यांच्या स्थल, काल सापेक्ष अस्पर्शीत पैलू उलघडून दाखविणारा अल्पसा निबंध प्रपंच सविनय सादर करीत आहे.

आदम्य आशावाद उराशी बाळगलेल्या स्थितप्रज्ञ राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे अवघे जीवन हे समान न्याय, निस्सिम भक्ती आणि कुशल प्रशासन या तीन घटकांनी समृद्ध होते. तोच त्यांच्या जीवनाचा पाया होता. तीच त्यांची निजखूण होती. हे असामान्य करणे केवळ अशक्यच. खरतर अशी माणसं अपवादानेच जन्माला येतात आणि सगळे अपवाद मोडून लोकापवादाच्या पलीकडे जातात. त्यांच्या व्यक्तित्वात संतत्व, शौर्य, आशा आणि दूरदृष्टी यांचा सुरेख संगम होता. ही बाब ही विशेष दखलपात्र अशीच आहे. त्यांनी शासन, धर्म आणि समाजसेवा याचा अचूक समन्वय साधून राज्यकारभार करत भारतीय इतिहासाच्या पानापानांवर आणि प्रत्येकाच्या मनामनावर आपली नाममुद्रा सुवर्ण अक्षरांनी कायमची कोरली आहे. अष्टसात्विक निगर्वी

शब्द - २३९

स्वभावाची सुरेख किनार लाभलेल्या लोभस आणि न्यायनिष्ठ अहिल्याबाईंच्या न्यायप्रियतेमुळे त्यांच्यावर संपूर्ण राज्याचा अपार विश्वास होता.

न्यायव्यवस्थेतील पारदर्शकतेची अनिवार ओढ आणि व्रतस्थता हाच ध्यास आणि श्वास असणाऱ्या न्यायप्रिय अहिल्याबाईंच्या न्याय मंदिरात सकळांना समान न्याय होता. सर्वांना समान न्याय हा त्यांच्या न्याय व्यवस्थेचा केंद्रबिंदू होता. हे दृष्टीहीनांच्या नजरेस ही जाणवेल इतके ढळढळीत सत्य होते. त्यांनी मनुष्य सुलभ स्वतंत्र न्यायव्यवस्था उभी केली होती. वर्तमानकाळातही त्यांची न्याय व्यवस्था अनुकरणीय अशीच आहे. कोणत्याही जाती-धर्माचा, गरीब-श्रीमंत आणि स्त्री-पुरुष अशा कोणत्याही भेदभावाशिवाय प्रत्येकाला त्यांनी योग्य न्याय दिला. न्यायपरायण अहिल्याबाईंनी कधीही जात, धर्म, लिंग यावर आधारित भेदभाव केला नाही. सर्वांना समान आणि योग्य न्याय मिळावा, यासाठी त्यांनी कठोर नियम आणि तितकीच सहानुभूती दाखवली. त्यांची ही सकारात्मकता खचितच स्पृहणीय आहे. त्यांच्या न्यायालयात कोणावरही कधीही तसूभरही अन्याय होत नव्हता. सर्वांना योग्य न्याय हा त्यांचा दंडक होता. विशेष म्हणजे त्यांच्या न्यायालयात प्रजेला विना अडथळा मुक्त प्रवेश होता. कोणताही नागरिक आपल्या अडचणी थेट त्यांच्या न्यायालयात दस्तुर खुद्द अहिल्याबाईंच्या समोर न घाबरता मांडू शकत होता. कोणत्याही दडपणाशिवाय मनमोकळेपणाने आपल्या समस्या मांडण्याची मुभा होती. सर्वांचे म्हणणे त्या शांतपणे ऐकून घेत. त्या जितक्या मृदू आणि मायाळू होत्या, तितक्याच कर्तव्य कठोर, कडक शिस्तीच्या होत्या. त्यांच्या बोलण्यात आपुलकी व गोडवा तितकाच करारीपणा होता. त्यांचा रोखठोक आणि आरपार स्वभावधर्म होता. निरलसपणे स्पष्ट, परखड, निर्भीड आणि थेट इत्यंभूत बोलण्याचे धारिष्ट हे त्यांचे महत्त्वाचे बलस्थान होते. हे त्यांच्या स्वभावाचे व्यवच्छेदक लक्षण होते.

न्यायस्नेही अहिल्याबाई होळकर यांनी महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी विशेषत्वाने अहर्निश प्रयत्न केले. त्यांच्या काळात स्त्रियांना विशेष सन्मान आणि सुरक्षितता मिळाली होती. त्यांनी विधवांसाठी न्याय आणि पुनर्वसनाची दारे खुली केली. स्थितप्रज्ञ



Page

साक्षीभाव जपणाऱ्या सुलक्षणी लोकमाता अहिल्याबाईंनी नेहमी राज्यकारभारात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले, याची आवर्जून नोंद ह्यायला हवी. त्यांनी महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी सर्व सामान्यांच्या विचारशक्ती पलीकडच्या गोष्टी आणि उपाययोजना केल्या आहेत. विधवा पुनर्विवाहासह महिला शिक्षणाला प्रोत्साहन देऊन परिष्कृत केले. अक्षय अनुपम अव्दयानंद खास करून महिलांना लाभावा यासाठी सातत्याने प्रयत्नाधिन होत्या. खरोखरच त्यांच्या या कार्यास तोड नाही. वाईट प्रवृत्तीची मानसिकता असलेल्या आजच्या भययुक्त समाजात महिलांचा सन्मान आणि सुरक्षितता टिकवायची असेल तर अहिल्याबाईंचा आदर्श घेणे अगत्याचे आहे.

अविरत सातत्यपूर्ण सर्वंकष पारदर्शी सूक्ष्मावलोकन करून अहिल्याबाईंनी भ्रष्टाचाराला आळा घातला आणि कारभाऱ्यांमध्ये प्रामाणिकपणा वाढवला. त्यांच्या साम्राज्यात भ्रष्टाचाराला अजिबात थारा नव्हता. त्यांच्या कारभारात पक्षपात अपवादानेही खपवून घेतला जात नव्हता. म्हणूनच तर राज्यकारभारात पारदर्शकता राखण्याचं व्रत त्यांनी तहहयात जपलं. त्यांना व्यक्तींची पारख होती. त्यांनी कारभारात योग्य व्यक्तींना त्यांच्या वकुबानुसार योग्य जबाबदारी सोपवित होत्या. चांगल्या कामगिरीसाठी पुरस्कार देऊन प्रोत्साहन देत असत. पण चूक झाली तर शिक्षा ही ठरलेली असायची. चुकीला माफी नव्हती. परंतू चूक सुधारण्याची संधी जाणिवपूर्वक देत असत. राज्यकारभार हा केवळ ताकदीने नव्हे तर न्यायाच्या बळावर चालविला पाहिजे असा त्यांचा पायंडा होता. खरच ही बाब कमी नवलाईची नव्हती. त्यांचे संपूर्ण जीवन न्यायासाठी समर्पित होते. त्यांनी राजसत्ता ही केवळ अधिकाराची नव्हे तर जबाबदारीची आहे हे दाखवून दिलं. अग्नीला दोरीने बांधणं जितकं कठीण आहे, तितकंच हे कठीण काम त्यांनी केलं. आजही त्यांच्या न्यायप्रियतेचा आदर्श ठेवला जातो.

विश्वातील सर्वश्रेष्ठ असणाऱ्या आपल्या भारतीय संस्कृतीत आध्यात्म आणि भक्तीला विशेष महत्त्व आहे. राज्यकारभारात सारस्वत अहिल्याबाईंनी रक्तासमान अंगी मुरलेल्या न्याय, सत्ता,



समर्पण आणि साधना यांचा अचूक मेळ साधून त्या केवळ एक यशस्वी राज्यकर्ती नव्हत्या तर ईश्वर भक्तीच्या मार्गावर चालणाऱ्या संतव्रती महिला ठरल्या. त्यांचं संपूर्ण जीवन भक्तिमार्गावर चाललेलं होतं. लहानपणापासूनच त्या भगवान शिवाच्या अनन्य अनुयायी होत्या. राज्यकारभार सांभाळतानाही त्यांची दिनचर्या नित्यनेमाने सकाळच्या पूजा-अर्चनेच सुरू होत असे. त्यांनी साधेपणा आणि धार्मिक आचरण यांना आपलं जीवनधर्म मानलं. त्यांची भक्ती ही केवळ वैयक्तिक नव्हती तर ती संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी होती. असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

रूजलेल्या तथाकथित संकल्पना मोडीत काढून अहिल्याबाईंनी काश्मिर ते कन्याकुमारी पर्यंत म्हणजेच संपूर्ण भारतभर अनेक नविन मंदिरे बांधली तर परकीय आक्रमणामुळे उध्वस्त झालेल्या शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला. काशी विश्वेश्वर, सोमनाथ रामेश्वरम, गया, बद्रिनाथ, जगन्नाथ अशा अनेक तीर्थस्थळांच्या पुनर्रचनेमागे त्यांचा पुढाकार होता. त्यांनी केवळ हिंदू मंदिरेच नव्हे तर जैन, शीख आणि मुस्लिम धर्मांच्या पवित्र स्थळांना देखील मदत केली असल्याची नोंद आढळते. धार्मिक यात्रेकरूंसाठी त्यांनी यात्रा मार्गावर धर्मशाळा सुरू केल्या. तर ठीक ठिकाणी अन्नछत्रांची उभारणी केली. देशभर नद्यांना घाट बांधले. अनेक ठिकाणी विहीरी खोदल्या, तलाव निर्माण केली, नविन पक्के रस्ते तयार केले. यातून स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. विविध कलाकारांना आणि कुशल कारागीरांना राजाश्रय दिला. त्यांनी केलेल्या तत्कालीन सर्वांगस्पर्शी सुधारणा आजही आपल्याला थक्क करणाऱ्या आहेत. खरंच सात्विक विचारशैली आणि निस्वार्थी कार्यशैली असणाऱ्या सत्त्वशील राजमाता अहिल्याबाईंच्या लोककल्याणकारी विचारसरणी असलेल्या शैलीचे अनुसरण करणे आज गरजेचे आहे.

राज्यकारभारात येणाऱ्या प्रत्येक आव्हानाला धीरोदात्तपणे सामोरे जाण्याचं धाडस अलौकिक होतं. इ.स. १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढ्यात पती खंडेरावांना वीरमरण आले. पतीच्या निधनानंतर त्यांनी साऱ्या अलंकाराचा त्याग करून फक्त शुभ्र

शब्द - ७१२ + २३२ = ९४४



कपडे परिधान करून उर्वरित आयुष्य लोककल्याणासाठी समर्पित करण्याची शपथ घेतली आणि त्याप्रमाणे उर्वरित आयुष्य प्रजेसाठी समर्पित केलं. खरंतर तत्कालीन पुरुषप्रधान समाजात एका महिलेने सत्ता चालवणं, राज्यकारभार सांभाळणं हे सूर्याला प्रतिसूर्य निर्माण करण्याएवढं मोठं आव्हान होतं. परंतु मिळालेले दायित्व गांभीर्याने स्विकारून जबाबदारीचे भान ठेवत धाडस, सामर्थ्य, चिकाटी, बुद्धिमत्ता आणि इच्छाशक्ती पणाला लावून अखंड निष्ठेने राज्यकारभार सांभाळला.

डोक्यावर बर्फ आणि जिभेवर साखर ठेवून व्यवहार्य प्रतिसाद आणि प्रतिक्रिया देणाऱ्या निर्विवादपणे दुर्मिळ लोकमाता अहिल्याबाई होत्या. त्या स्वभावाने शांत असल्या तरी करारीपणा ही त्यांची निजखून होती. म्हणूनच त्या यच्चयावत जनतेच्या आश्वासक राजकर्त्या बनल्या. त्यांच्या स्वभावाला प्रांतमर्यादा नव्हती त्यामुळेच त्र आसेतूहिमाचल लोकमाता म्हणून सर्वश्रुत आहेत. त्यांना लोकमाता ही बिरुदावली सार्थपणे शोभून दिसते. ती त्यांच्या अफाट कार्यकर्तृत्वामुळेच!

वाचनप्रिय अहिल्यादेवींचा ग्रंथसंग्रह अफाट आणि दुर्मिळ होता. त्यात निर्णयसिंधु, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा महात्म्य मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पदम् पुराण, श्रावणमास माहात्म्य इ. ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. त्यांनी संत तुकाराम, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर यांच्या विचारांचा स्विकार केला होता. त्या संत साहित्याचे मनःपूर्वक वाचन करत.

स्वकष्टार्जित प्रज्ञेच्या आणि प्रतिभेच्या सार्थ मानकरी अहिल्याबाई एक दूरदृष्टीच्या प्रशासक होत्या. त्यांनी आस्थापूर्वक परिश्रमातून शेतीस प्रोत्साहन दिले. कालागणिक प्रसंग परत्वे स्वस्तचित्त राहून आपल्या दिप्तीसंपन्न प्रतिभेला साद घालत करप्रणाली सुसूत्र केली, व्यापाऱ्यांना सवलती दिल्या आणि जनतेच्या गरजा ओळखून त्यानुसार नविन धोरणं आखली. जनतेसाठी पाणी आणि दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यांचे हे सर्व कार्य ३०० वर्षानंतर ही सर्वांना दिशादर्शक आणि मार्गदर्शन करणारे असेच आहे.

(५) शब्द - ९४४ + २१८ = ११६२



प्रजाहितदक्ष अहिल्याबाई होळकर यांचे स्वार्थ गंधरहित भक्तीमय जीवन म्हणजे समर्पण, सेवा आणि श्रद्धेचं प्रतीक होतं. त्यांनी राजसत्तेचा वापर केवळ धर्म वाढविण्यासाठी फक्त न करता समाजाच्या आध्यात्मिक उत्थानासाठी केला. भक्ती हीच खरी शक्ती यावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांनी आपली संस्कृती आणि धर्म रक्षणाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. म्हणूनच तर त्यांच्या भक्तीचा आदर्श मार्ग आजच्या AI, Chat GPT आणि deepsick च्या कोलाहलात आपल्याला दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरत आहे.

सर्वसुलभ जीवन संक्रमणात कालागणिक, २१ व्या शतकातील डिजिटल आणि उपग्रहांकित युगात, आज जेव्हा समाजात अन्याय, भ्रष्टाचार आणि नैतिक अधःपतन दिसते, तेव्हा वैभवशाली होळकर साम्राज्याच्या स्वामिनी अहिल्याबाईंच्या आदर्शांची आठवण न झाल्यास नवल! त्यांचं अवघं जीवन म्हणजे प्रत्येकासाठी अखंड सकारात्मक ऊर्जेचा प्रचंड प्रेरणास्त्रोत आहे. त्यांच्या न्याय, भक्ती आणि प्रशासन या त्रिवेणी संगमासम जीवनातून आपणही लौकिकार्थाने आणि रूढार्थाने न्याय, भक्ती आणि कर्तव्य या मूल्यांचा समाजाप्रतीच्या कर्तव्यभावनेतून गरिमा सांभाळणे आद्य कर्तव्य आहे. ही आजच्या काळाची गरज आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना ३०० व्या जयंती निमित्त तब्बल २१ लोकांची सलामी आणि मानाचा मुजरा!

श्री शंकर.....

शब्द - १९६२ + १५४ = १३१६



एक आदर्श शासिका !

इतिहासाची सोनेरी पानं चाळतांना अनेक स्त्री-रत्ने आपल्याला आढळुन येतात. त्यांच्या कर्तृत्वाने, शौर्याने मन थक्क होतं. अशाच महान स्त्री-रत्नांपैकी एक स्त्री-रत्न, ज्यांचं आयुष्य शील, बल आणि कर्तृत्व यांनी ओतप्रोत आहे. "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर". धनगर समाजातील एक चुणचुणीत मुलगी, स्वकर्तृत्वाने अवघा मालवा प्रांत गाजवते हे विलक्षणच. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ (भाद्रपद कृष्ण चतुर्दशी) महाराष्ट्रातल्या अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या खेड्यात. माणकोजी व सुशीलाबाई शिंदे या दांपत्याच्या पोटी झाला.


इ.स. १७२९ दुपारची वेळ होती. अहिल्या व तिच्या मैत्रिणी नदीकाठी वाळूचं शिवलींग बनवत होत्या. हा त्यांचा दिनक्रमच असायचा. छोटी अहिल्या, शिवलींग बनवण्यात त्यग्र असतांनाच घोड्यांच्या टापांचा आवाज आला, जशी-जशी आवाजाची तीव्रता वाढायला लागली शिवलींग बनवत असणाऱ्या मुली घाबरल्या आणि जवळच असलेल्या शिवमंदिराच्या आडोशाला जाऊन उभ्या राहिल्या. पण अहिल्या मात्र शिवलिंगापासुन क्षणभरसुद्धा बाजुला झाली नाही. तिने शिवलींगाला काही होऊ नये म्हणुन घट्ट मिठी मारली. घोडेस्वार जसे जसे जवळ आले अहिल्येने मिठी अधिकच घट्ट केली आणि डोळे मिटून घेतले. घोडेस्वार अहिल्येजवळ येऊन थांबले. त्यांना त्या पाच वर्षांच्या परकल-पोनक धातलेल्या लहान मुलीचं खुप कौतुक वाटलं. ती घोडेस्वारांकडे राग़ाने बघत होती. तिची निष्ठा, भक्ती आणि धैर्य बघुन सगळेच थक्क झाले. ते घोडेस्वार, दुसरे कोणी नसुन, थोर बाजीराव पेशवे आणि मालवा प्रांताचे सुभेदार मल्हारराव होळकर होते.



त्या तेजपुंज लहान मुलीचं त्यांना खुप कौतुक वाटलं मल्हाररावांनी. ही मुलगी कोण आहे म्हणुन चौकशी केली, कारण त्यांना त्या पाच वर्षाच्या मुली मध्ये संपुर्ण माळवा प्रांताच भविष्य दिसलं होतं. बाजीरावांनी मल्हाररावांची इच्छा जाणली आणि त्यांनी देखील पाठिंबा दिला.

इ.स. १७३३ साली नऊ वर्षाच्या अहिल्येने माहेरची चौंडीची वेस ओलांडली व इंदोरच्या होळकरांची सुन व खंडेरावांची धर्मपत्नी म्हणुन माळव्यात आली. अहिल्येची संसाराची पालवी फुटत असतांनाच इ.स. १७५४ साली कुंभेरी इथे झालेल्या लढाईत खंडेराव यांचा मृत्यु झाला. मल्हाररावांचा प्रकुलता-एक मुलगा स्वर्गवासी झाला. सारे हळहळले, २५-३० वर्षाच्या अहिल्याबाई सती जायला निघाल्या. त्या काळी पतीच्या मृत्युनंतर स्त्रीने सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप, असा समज समाजात होता. परंतु मल्हाररावांनी अहिल्याबाईंना थांबवले. आता अहील्या हीच त्यांच्यासाठी खंडेराव होती. अहिल्याबाई सती गेल्या असत्या तर त्यांचे कर्तृत्व, बाणेदारपणा आणि प्रजाहितदक्षपणा कुणाला कळलाच नसता.

खंडेराव गेल्यानंतर मल्हाररावांनी अहिल्याबाईंना राजकारणाचे धडे दिले. तल्लख बुद्धिमत्ता असणाऱ्या अहिल्याबाई नम्रपणे सगळे शिकत होत्या. बारा वर्षानंतर मल्हारराव होळकर देखील मृत्यु पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघु लागल्या. अठराव्या शतकात तरुण वयात वैधव्य प्राप्त झालेल्या एका स्त्रीने राज्य सांभाळणं, हि खुप विलक्षण गोष्ट होती.



एकदा राघोबा पेशवे, होळकरांचे वतन परत घेण्यासाठी म्हणुन युद्धाच्या तयारीनिशी आले. तेव्हा अहिल्यादेवींनी आपल्या मुत्सद्दीपणाचा परिचय देणारे एक पत्र त्यांना पाठवले. अहिल्यादेवी त्यांना म्हणतात "युद्धात माझा पराभव झाला तर समाज म्हणेल कि एका विधवा स्त्रीचा पराभव करुन आपला भ्याड पुरुषार्थ दाखवला, आणि मी जर आपला पराभव केला तर एका स्त्री कडुन हरलात असा अपप्रचार होईल." असा निरोप पाठवल्या नंतर राघोबादादांनी आपला युद्धाचा विचार मागे घेतला. अहिल्यादेवी होळकर या मुत्सद्दी राजकारणी तर होत्याच परंतु त्याच बरोबर त्या समाजहितदक्ष समाजकर्त्या आणि धर्मपरायण राज्यकर्त्यादेखील होत्या. सती न जाता समाजासाठी काम करुन एक आदर्श अहिल्याबाईंनी निर्माण केला. त्यांच्या धर्मपरायणतेला प्रांत मर्यादा नव्हती. त्यामुळे त्यांचे नाव आसेतु हिमाचल घेतले जाते. त्यांनी अन्नछत्रे उघडली, राज्यातुन विहिरी खोदुन त्या चिरेबंद बांधुन दिल्या. उन्हाळ्यात राज्यातुन प्रवास करणाऱ्यांसाठी पाणपोया, धर्मशाळा, पांथशाळा, आश्रयशाळा बांधल्या. अनेक मंदिरे बांधली व त्यांचा जीर्णोद्धार केला.



अहिल्यादेवी अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, त्र्यंबकेश्वर, परळी वैजनाथ यांचा समावेश होतो. वेरावळ येथील सोमनाथाचे मंदिर गजनीच्या महंमदाने ध्वस्त केले होते, ते बघुन अहिल्यादेवी अस्वस्थ झाल्या आणि त्यांनी जवळ एक शंकराचे मंदिर बांधले, सोमनाथाला जाणारे लोक आजही या देवळाला भेट देतात. अहिल्यादेवींनी कायद्यामध्ये अनेक सुधारणा करून करपद्धती सौम्य केली. शेतकऱ्यांच्या हिताची जोपासना करून उत्पादन वाढवण्यावर भर दिला. त्यांच्या कार्यकाळात राज्याचे उत्पन्न १ कोटी रुपयांपर्यंत वाढले. अहिल्यादेवींनी समाजासाठी जी कामे केली, ती स्व-खर्चातुन केली, हे महत्त्वाचे आहे.

भारताच्या इतिहासात काही मोजक्या महिला राज्यकर्त्या होऊन गेल्या, ज्यांनी अतिशय कुशलतेने व कर्तबगारीचेने राज्य सांभाळले. एवढेच नव्हे, तर ते अधिक समृद्ध बनविले. आज एकविसाव्या शतकात, राजकारणात ३०% पेक्षा कमी महिलांचा सहभाग असतांना, सतराव्या-अठराव्या शतकात एक स्त्री स्वकर्तृत्वाने राज्य करते, हे विलक्षणच! अशा राज्यकर्त्यांमध्ये देवी अहिल्याबाई होळकर यांचे नाव इतिहासात अग्रस्थानी राहिले आहे.

सर जॉन मालकम हा तत्कालीन मध्य प्रांताचा गव्हर्नर आपल्या "मेमरी ऑफ सेंट्रल इंडिया इन्क्युडिंग मालवा" या ग्रंथात लिहितो की, "अहिल्याबाई या मालव्यात उत्तम प्रशासनाचे प्रतीक बनल्या होत्या आणि त्याबाबत सर्वांचेच एकमत होते. त्यांचे नाव हे सर्वोत्तम अधिकारी म्हणुन घेतले जात असे. अहिल्याबाईंचे प्रशासन एक उत्तम उदाहरण म्हणुन घेतले जाते."



नसेच तत्कालीन ब्रिटिश व्हॉईसरॉय लॉर्ड अलेंबरो निहिनो की," अहिल्याबाई सर्वोत्तम राज्यकर्ती व सर्वश्रेष्ठ मुत्सद्दी आहेत." अर्थातच, उत्तम प्रशासक या गुणांची तुलना होतांना लोकहिताचा विचार, प्रजेचे सुख-समाधान, शेतकरी, व्यावसायिक, नागरिक यांच्या कल्याणाचा विचार, समभाव, समतोल करप्रणाली, न्यायप्रियता, स्त्री सन्मान, योग्य परराष्ट्र धोरण अशा सर्व अंगांचा विचार केला गेला आहे. या दृष्टीने अहिल्याबाई या एक उत्तम प्रशासक असल्याचे निदर्शनास येते." राज्याची विभागणी ही लहान गावे, मोठी गावे, परगणा, महाल, सुभा ह अशी अहिल्याबाईंनी केली. प्रत्येक गावात कर्तव्यतत्पर अधिकारी नेमला. प्रत्येक गावाहुन बारीकसारिक माहिती लेखी व नोंदी स्वरूपात सुभ्यास पोहोचवण्याची व्यवस्था केली होती. नियमांपेक्षा अधिक कर अधिकारी वसुल करीत नसत. जर कोणीही जाणुनबुजून अशी कृती केली, तर न्यास शिक्षा होत असे. ही सारावसुली उत्पन्नाच्या प्रमाणात असे. अतिवृष्टी किंवा दुष्काळ पडल्यास, सारा नहकुब होत असे. रस्त्याच्या दुतर्फा ओसाड पडीक जमिनीवर निंब, आंबा, चिंच, वड, पिंपळ अशी झाडे अहिल्याबाईंच्या आदेशाने बहरली. प्रत्येक शेतकऱ्याने किमान 20" झाडे लावलीच पाहिजेत, असा त्यांचा दंडक होता. यातील ।। झाडे सरकारी मालकीची, तर नऊ झाडे शेतकरी यांच्या मालकीची असा आदर्श नियम त्यांनी तयार करविला होता. त्यांनी नदीतील पाण्याचा एक प्रवाह बाजुला करून नो कपडे धुणे, जनावरांना पाणी व शेती आदींसाठी राखीव ठेवला होता.



पाण्याच्या उत्तम नियोजनामुळे त्यांच्या 28 वर्षाच्या कारकिर्दीत कधीही दुष्काळ पडला नाही. वनीकरण, जलसंवर्धन यांचे राज्यात निर्माण केले होते.

अहिल्यादेवी स्त्रीस्वातंत्र्याच्या पुरस्कार करणाऱ्या होत्या. डोक्यावर पदर आणि हातात शिवलिंग घेऊन सनाशीलतेचा पुरस्कार आणि भक्तीचा गौरव केला. आपल्या आयुष्यात आलेल्या अनेक संकटांवर मात करून ज्या पद्धतीने दुर्दम्य आशावादाने स्त्रीशक्तीचा वापर केला तो सन्माननीय आहे. फक्त महिलांकरीताच नव्हे तर सकल समाजासाठी अहिल्यादेवी वीरता, पराक्रम, न्याय आणि अद्वितीय चातुर्य यासाठी प्रेरणा आहे. स्वाभिमानी आणि उत्तम राजकर्त्या असलेल्या अहिल्यादेवींचे विचार, कार्य आणि त्यांच्या पराक्रमाची गाथा हि आजही मार्गदर्शक आणि प्रेरणादायी आहे.

जिने संतनी मानले स्वप्रजेला।
जिने सुखसोयी दिल्या भारताला॥
जरी दुःखिना, तृप्ती देई दुजाला।
नमस्कार माझा अहिल्या सतीला॥

—

कु. मधुरा योगेश देवकुटे
[MA History]
9850251608
Madhurayd@gmail.com.



पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर
एक आदर्श स्त्री शासिका

अहिल्याबाई होळकर एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्त्या होत्या. त्यांचे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्याच्या जामखेड तालुक्यातील चौंडी या गावात झाला. त्यांचे वडिल माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्याच्या आईचे नाव सुशिलाबाई शिंदे असे होते. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे लग्न वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी, खंडेरावांशी झाले. त्याकाळी स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही अहिल्याबाईंचे वडिल माणकोजी शिंदे यांनी त्यांना लिहण्यावाचण्यास शिकवले होते.

अहिल्याबाईंच्या सासूचे नाव गौतमीबाई होते. खंडेराव हे व्यसनी, छंदीफंदी होते. पण अहिल्याबाईंनी याबाबतीत तक्रार न करता सासऱ्यांनी (मल्हाररावांनी) नेमून दिलेल्या कामात लक्ष घातले. कुशाग्र बुद्धीची देणगी लाभलेल्या अहिल्याबाईंवर मल्हाररावांचा मोठा विश्वास होता. राजकारभारातील महत्त्वाचा पत्रव्यवहार ही त्यांनी अहिल्याबाईंवरच सोपवला होता. खंडेरावांपासून त्यांना दोन अपत्ये झाली. मालेराव हा मुलगा तर मुक्ताबाई ही कन्या. अहिल्याबाईंना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. पती खंडेराव कुंभेरी येथे झालेल्या लढाईत मरण पावले. त्या वेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या पण मल्हाररावांनी त्यांना प्रजाहितासाठी तुम्ही सती जाऊ नये हे राज्य तुम्हाला सांभाळायचे आहे. अशी आण व कसम दिली. त्यांच्या इच्छेचा अहिल्याबाई यांनी मान राखला आणि सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. मल्हारराव ज्या वेळी मोहिमेवर असत तेव्हा स्वत: अहिल्याबाई राज्याचा बंदोबस्त चोख राखीत असत. त्या सासरे मल्हाररावांच्या सल्ल्यानुसार वागत असत.

मल्हारराव होळकरांना पेशव्यांनी इंदूर संस्थानाची



महागिरी दिली होती. दौलतीचा कारभार मोठा होता. पण १७६६ मध्ये त्यांचे निधन झाले आणि अहिल्याबाईंवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली त्यांचा पुत्र मालेराव यांना नरी सुभेदारीची वस्त्रे मिळाली होती तरी ती सांभाळण्याची त्यांच्यात कुवत नव्हती. नवऱ्याच त्यांचे देहावसान झाले व खच्चा अर्थाने अहिल्याबाई शून्यकर्त्या झाल्या. पुढील ३८ वर्षे त्यांनी राज्य कारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशल पणे चालविला. तिजोरीत भर घालीन त्यांनी प्रजाहिताकडे जागीवपूर्वक लक्ष दिले.

अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात अमर झाले. त्याला त्यांची धर्मपरायण आणि उदार वृत्ती कारणीभूत ठरली. बाई काय राज्यकारभार करणार ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी सपशेल खोटी ठरवली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांचा मुना दिवान गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता. राघोबादादांशी त्यांनी अहिल्याबाई विरुद्ध संधान बांधले आणि इंदुर बळकवण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले. अहिल्याबाईंना हे कळले तेव्हा त्या युद्धास तयार असल्याचे त्यांनी राघोबादादास कळविले. राघोबांना हे भडचणीचे झाले हरभा तर बाईकडुन हरलो आणि जिंकलो तरी बाईशी युद्ध करण्यात कोणती मोठी मर्दुमकी. शेवटी त्यांना माघार घ्यावी लागली. त्यांचा उत्तम पाहुणचार अहिल्याबाईंनी इंदुरात केला. अशा रितीने अहिल्याबाईंच्या लौकिकात आणखी भर पडली.

अहिल्याबाईंच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय घटना त्यांचा लौकिक वाढवणारी आहे. आपली कन्या मुक्ताबाईचे स्वयंवर घोषित करताना त्यांनी जाहिर केले की जो कोणी राज्यात चोर, भुटारू, दरोडेखोर यांचा बंदोबस्त करील त्या शूर व्यक्तीशी मुक्ताबाईचा विवाह करुन दिला जाईल. त्यावेळी जात-पात बाधितली जाणार नाही. हे जाहिर करुन त्या थांबल्या नाहीत



त्यांनी हा विचार कृतीत ही उतरवला यशवंतराव फणसे या गुणी, शूर तरुणाशी त्यांनी मुलीचा विवाह करून दिला. अहिल्याबाई एक चांगल्या आणि सुधारणावादी राजकर्त्या होत्या. पूर्वीच्या कायदयांमध्ये त्यांनी परिस्थिती नुसार काही सुधारणा केल्या. त्यांनी करपद्धती सौम्य केली मात्र शेतकऱ्यांकडून साश धेतो चालू ठेवले. पाटील, कुळकरण्याच्या हक्कांचे वतन हक्कांचे संरक्षण करून गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले.

अहिल्याबाईनी राजधानी इंदुरहून नर्मदातीरी महेश्वरला हलविली. तिथे त्यांनी अनेक वास्तू बांधल्या. राजवाड्यात प्रशस्त देवघर करून घेतले. नदीला घाट बांधले. मंदिरांचा जीर्णोद्धार केला व पूर्वजांच्या स्मरणार्थ छत्र्या बांधल्या. महेश्वर हे विणकरांचे मध्यवर्ती केंद्र होते. बाईंनी वस्त्र उद्योगास उत्तेजन दिले. कोष्टयांची वसाहत स्थापन केली. उत्तम हातमागाची सणांगे तयार होतील अशी बाजार पेठ कायम केली. त्यांचा मुळ स्वभाव सौम्य असला तरी राज्यकारभारात त्यांनी मल्हारराव सारख्या कुविख्यात डाकुला फाशीची शिक्षा दिली. त्यांनी अन्नछत्रे उघडली. राज्यात विहिरी खोदून त्या चिरेबंद बांधून दिल्या.

अहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मिळ होता. त्यात निर्णयसिंधु, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मीकि रामायण, पद्मपुराण श्रावण-मास माहात्म्य इत्यादी ग्रंथाच्या हस्तलिखित प्रती होत्या. विद्वानांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मानसन्मान दिला जाई.

अशेरच्या दिवसात त्यांना दुःख आणि संघर्षाला तोंड दयावे लागले. त्यांचे दोन भाऊ मृत्यू पावले. मुलीचा मुलगा नाथ्याबा वेन ताब्यात गेला. तुकोजी होळकरांची सून आनंदीबाई यांचे देहावसान झाले. त्यानंतर जावई यशवंतराव फणसे अचानक गेले आणि मुक्ताबाई सती गेली अशा बिकट परिस्थितीत शिंदयाचा सरदार गोपाळराव याने १७९२ मध्ये होळकरांच्या फौजेवर हल्ला केला. तेव्हा तरुणांस-

Scanned with OKEN Scanner



ही जाणवेल अशा तडफदारीने त्यांनी शिंदेयांचा पराभव केला. त्यांच्या राज्यात सुबत्ता, संपन्नता व शांती होती. त्या अजातशत्रू होत्या पण राज्यावर गुदरलेल्या संकटांना त्यांनी चोख उत्तरे दिली.

मध्यम उंचीची, सावळ्या वर्णाची, डोईवर पदर घेतलेली ही स्त्री कर्तृत्व आणि विचार या दोन्ही दृष्टींनी किती उंचीची होती हे त्यांच्या आयुष्याकडे पाहून कळते. महेश्वर येथे वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांचे जिवनकार्य पाहून म्हणावेसे वाटते

मधुर होती तिची वाणी
अशी जन्मली तत्त्वज्ञानी राणी....
जाणवल्या जिने दिशा दाही,
तिच्या उत्तुंग कार्याला
खरच्च सीमा नाही.

मराठे परी किती रुपे उशाचे अशीच काही अहिल्या बाईची जिवनगाथा आहे. रयतेसाठी अखंड झटणारी, प्रजेच्या सुखासाठी अहोरात्र कार्य करणारी राणी, म्हणजे अहिल्यादेवी.

"राज्या अनेक झाल्या या जगात, पण
पुण्यश्लोक कोणीही नाही,
सर्व जिचा आहे मराठी हृदयात,
एकच ती महाराणी अहिल्यादेवी हो
झाली....!"

शेवटी म्हणावेसे वाटते- प्रजेचे कायम रक्षण केले ना स्वतःच्या मुलाला भाजलेले, दिले महत्व न्यायाला नव्हता थारा तिच्या राज्यकारभारात अन्यायाला.

अहिल्याबाई एक उत्तम शासक तर होत्याच सोबतच त्या धार्मिक वृत्तीच्या देखील होत्या. त्या प्रमाण न्यायदानावर विश्वास ठेवणाऱ्या होत्या. त्यांचे साहस आणि व्यक्तीमहत्व पाहून मोठे-मोठे राजे सुद्धा आवाक होत असत. त्यांनी आपल्या शासनकाळात आपल्या साम्राज्याचा विस्तार केला, लोककल्याणाची



कामे केली. अहिल्याबाई महिलांच्या सशक्तीकरणासाठी नेहमीच प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. त्यांनी अनेक महिलांविशेषही प्रथांचा विशेष केला. स्त्रियांच्या हक्कासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. त्यांच्या मनात दया, करुणा, प्रेम व गरजूंना मदत करण्याची भावना होती. त्यांनी शेती व शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी ही मोलाचे कार्य केले आहे. त्यांनी अनेक किल्ले, मंदीरे तसेच धर्मशाळा बांधल्या.

अत्यंत न्यायप्रिय असलेल्या अहिल्याबाईंच्या प्राणांची ज्योत वयाच्या ७० व्या वर्षी मावळली. अशा या शूर शासनकर्तीस मानवंदना म्हणून इंदूरच्या विमानतळाचे नाव "देवी अहिल्याबाई" असे विमानतळ असे ठेवण्यात आले.

आजही अहिल्याबाईंचे विचार, कार्य सर्व समाजाला प्रेरणा देणारे आहे. प्रत्येक क्षेत्रात केलेले कार्य आजही तितक्याच महत्वाचे आहे. यावरुन त्यांची कामातील दूरदृष्टी दिसून येते. महिलांना घराबाहेर पडण्याची परवानगी नव्हती त्या काळात त्यांनी राणी म्हणून उत्तम प्रकारे राज्य चालवून दाखवले. त्यांच्या कार्यामुळेच स्त्रीया राज्यकारभारात ही कोठे कमी पडणार नाहीत हा विश्वास निर्माण झाला व महिलांना प्रगतीची अनेक दारे हळूहळू उघडली गेली.

झळकाशती दाही दिशा,
करती जयघोष जिचा.
जुल्मी अबरदस्ती आणि,
अन्यायाला फोडली तिने वाचा !!
सर्वधर्मसमभाव जिथे सुखात,
नांदत होती साऱ्या जनता.
अशी कर्तव्यनिष्ठ कर्मयोगिनी,
अहिल्यादेवी राजमाता.
महान, तत्वज्ञानी, न्यायप्रिय आणि
शासनकर्ती भू लोकांची महाराणी.
धर्मनिष्ठ कर्तृत्वाचे संम् राज्ञिनी.
उदार समाजाचा करुणा हाच



तिचा एक ध्यास.
जीवन वाहिले सुखी आणि समृध्द
करण्यात समाजास.
प्रत्येक घरात लक्ष्मी नांदनी होती
सुखी ठेवले राज्यास
मान-पान समान भाषा
देश विदेश नीचे गुण गाती.
दानधर्म समान न्याय
म्हणून ~~स्व~~ रथन त्यांना देवी म्हणत.
आदर्श ठेवला नारी शक्तीचा
कित्येक पिढ्यांना पुढती
अशी राजमाता अहिल्यादेवी होळकर
पुन्हा न होणे धरती !!

वरिल कवितेवरुन आम अहिल्याबाईंच्या कार्याचे महत्व स्पष्ट होते. अहिल्याबाईंनी जे कार्य समाजासाठी केले ते खूपच मोलाचे होते. त्याकाळात स्त्रीला शिक्षणासाठी ही घराबाहेर पडता येते. त्या काळात स्त्री सती जाण्याची रूढी होती. त्या काळात राणी बनून स्वराज्याची सर्व शासनव्यवस्था सांभाळणे सोपी गोष्ट नाही.

शासन केले तिने प्रजाहितासाठी
न्याय दयायची ति सर्वांना समान
म्हणूनच मानही माझे उरली आहे
त्यांच्या कार्याची कमान
सर्वधर्म समभावला दिले त्यांनी महत्व
प्रजाहितासाठी होती ती खूप दक्ष
शासन करत होती ती ध्यानून सर्वांस
म्हणूनच झाली ती अहिल्याची अहिल्या
देवी.

सौ. नीता जितेंद्र बाजोरे
नाशिक.



नाव - राम दिलिप डांगे
वय - २३ year
मो.नं - 9822489595
Email - rampdange@gmail.com
पत्ता - पुणे

अहिल्याबाई होळकर यांचे समाजसुधारणेतील कार्य

अहिल्याबाई होळकर या १८ व्या शतकातील एक महान महिला शासिका होत्या. मल्हारराव होळकर यांच्या सुनेने पतीच्या मृत्यूनंतर राज्यकारभार सांभाळला आणि प्रजेच्या कल्याणासाठी विविध सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवले. त्यांच्या याच कार्यामुळे त्या 'पुण्यश्लोक' म्हणून ओळखल्या जातात. लहानपणापासूनच अहिल्याबाईंची बुद्धिमत्ता, मनमिळावूपणा, धार्मिक श्रद्धा आणि सेवाभाव ओळखून अशणाश होता. त्या लहानशा वयातच गरीबांची सेवा, गोरगरिबांना अन्नवस्त्र आणि मंदिरात श्रमदान करीत असत त्या चारित्र्यसंपन्न होत्या. त्यांनी सगळ्यांसाठीच बहुमोल असे कार्य केले होते, म्हणूनच त्यांना "राजमाता" ही पदवी मिळाली. त्यांनी सामान्य जनतेच्या छोट्या मोठ्या सगळ्याच समस्या सोडवत्या होत्या.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

अहिल्याबाई होळकर यांनी हिंदू धर्माच्या पुनर्निर्माणासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. काशी विश्वनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाचे श्रेय त्यांना जाते. त्यांनी काशीतील ज्ञानवापी मशीदीच्या शेजारी नवीन भव्य मंदिर उभारले. याशिवाय सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढा नागनाथ, काशी विश्वेश्वर, विष्णुपद, महाकालेश्वर आदि मंदिरे आणि घाटांचे जीर्णोद्धार केले. त्यांनी वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चौंडी, नाशिक, जांब, त्र्यंबकेश्वर, उज्जैन, रामेश्वर, त्रिमलयांकर आदि ठिकाणी अन्नछत्रे उघडली. चारधामांच्या ठिकाणी घाट, बाग, मंदिरे, कुंडे, धर्मशाळा बांधून यात्रेकरूंची सोय केली.

अहिल्याबाई होळकर यांनी राज्यातील कायद्यांमध्ये सुधारणा केली. करपद्धती सौम्य केली. मात्र चोरट्यांकडून जास्त (कर) घेणे चालू ठेवले. गावोगावी न्याय देणारे पंच अधिकारी नेमले. त्यांनी भिल्ल मुलखातून भिल्ल आणि गोंड आदिवासी यांच्याशी संवाद साधून त्यांचा कर घेण्याचा अधिकार मान्य केला. त्यांच्याकडून पडिक भूमीची लागवड करून घेतली, तसेच त्यांना विशीष्ट सीमा नेमून दिली आणी भूमी कशाप्रकारे पट्ट्याने देण्याची पद्धत चालू केली. अहिल्याबाई होळकर यांनी शैक्षणिक आणी सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी महेश्वर येथे एक भव्य ग्रंथालय उभारले, ज्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, ऋग्वेदाला, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. त्यांनी विद्वानांना त्यांच्या योग्यतेनुसार मानसन्मान दिला. महाराष्ट्र, माळवा, तेलंगणा, गुजरात येथील विद्वान पंडीत, ज्योतिषी, वैद्य, कीर्तनकार, प्रवचनकार यांची दरबारात रेलचेल असे.

महेश्वर हे विणकरांचे मध्यवर्ती केंद्र होते. अहिल्याबाई होळकर यांनी आपली राजधानी महेश्वरला हलविल्यानंतर महेश्वरी साड्यांच्या विणकरांना प्रोत्साहन दिले, त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली. त्यांनी कोष्ट्यांची वसाहत स्थापन केली आणि उत्तम तानमागाची सुमारे तयार होतील अशी पेठ कायम केली. आज महेश्वरी साड्यांना व कापडांना मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ निर्माण झाली आहे त्यामागे अहिल्यादेवींचे लक्षणीय योगदान आहे. अहिल्याबाई होळकर यांनी महिलांना सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवले. त्यांनी महिलांना सैन्यात तुकडी म्हणून तैनात केले. त्यांनी स्वतः लष्करी शिक्षण घेतले होते आणी महिलांना सैन्यात विशेष तुकडी तैनात केली होती. त्यांनी अनेक बाबींनी त्यांच्या राज्यात विकास आणी सुधारणा केल्या. त्यांच्या या अनमोल कार्यामुळे अनेकांकडे सुधारणा झाल्या व स्त्री ही उत्तम पद्धतीने राज्यकारभार सांभाळू शकते असे बहुमोल उदाहरण जगाच्यासमोर उभे केले. त्यांचा तो आदर्श आजही जगाच्या स्त्रीयांना प्रेरणा देतो.



त्यांचे समाजसुधारणेतील कार्य हे त्यांच्या दूरदृष्टी, धार्मिक सहिष्णुता आणि लोककल्याणाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांनी रस्ते, तलाव, विहीरी, घाट आणि धर्मशाळा बांधून प्रवाशांसाठी आणि जनतेसाठी सोयी उपलब्ध करून दिल्या. संकटग्रस्त लोकांना अन्न, निवारा आणि संरक्षण दिलं. त्या न्यायप्रिय होत्या. त्यांनी जनतेशी प्रत्यक्ष संवाद ठेवून त्यांच्या अडचणी सोडवायचा प्रयत्न केला. त्यांनी चांगले मंत्रिमंडळ व्यवस्थापन आणि शेतीसाठी अनुकूल धोरणं बनवली. त्यांनी शिक्षणास प्रोत्साहन दिले. विद्वान, कवी, पंडित यांना आश्रय दिला. अहिल्याबाईंनी सती प्रथेला विरोध केला आणि अन्य स्त्रियांनाही सती होण्यापासून रोखले. त्यांनी स्त्रियांना शिक्षण, संपत्ती आणि प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात त्यांना मोठ्या प्रमाणात यशही प्राप्त झाले.

अहिल्याबाईंनी प्रशासनात पारदर्शकता आणि लोकसहभाग वाढवला. त्यांनी धर्म, तत्त्वज्ञान, न्यायशास्त्र यांसारख्या विषयांच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिलं. अहिल्याबाई होळकर यांचे कार्य हे केवळ एक आदर्श शासिकेपुरते मर्यादित नव्हते, तर त्या एक दूरदृष्टी असलेल्या समाजसुधारक होत्या. त्यांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी आवाज उठवला, धार्मिक सहिष्णुतेला प्रोत्साहन दिलं. गरीब व गरजूंसाठी कार्य केलं आणि एक न्यायप्रिय, कल्याणकारी शासन दिलं. आजही त्यांचे जीवन आणि कार्य समाजसुधारणेसाठी एक दीपस्तंभ आहे.

अहिल्याबाई होळकर यांचे कार्य हे केवळ शासकीय नव्हते, तर सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी आपल्या राज्यात प्रजाहितासाठी विविध उपक्रम राबवले आणि समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत न्याय आणि समता पोहोचवली. त्यांचे कार्य आजही प्रेरणादायक आहे. त्यांनी पुढील शिकवण आपल्याला दिली -

"राज्य करणं म्हणजे केवळ सत्ता नव्हे,
ती सेवा आहे."

—— x —— x —— x ——



सौ. रेश्मा कृष्णाथ नेवसे - मुजवळ.
शिवउन्नती रेसिडेन्सी 'B' बिल्डिंग
फ्लॅट नंबर - 202,
कोळपडळ, हडपसर.
पुणे - 28.
मो-नं. ७४४१४५७५०५

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर -
एक आदर्श स्त्री शासिका

कर्तुत्व गाजवायला कुणायं बाई असणं आड येत नाही, इतिहास जेव्हा जगातल्या श्रेष्ठ स्त्रीयांची नावं लिहील तेव्हा त्याला पुण्यश्लोक अहिल्याबाईंच्या नावापासूनच सुरवात करायला लागेल.

" नाव ज्यांचे अहिल्या
इतिहासात ज्या गाजल्या
शुर अशी होती ती राणी
न्यायासाठी लढली ती मर्दानी
माझी होती राजमाता
सर्वश्रेष्ठ अशी न्यायदाता
पुढे केले होळकरांचे साम्राज्य
एकट्या मर्दानिने सांभाळले राज्य
प्रजेचे कायम रक्षण केले
ना स्वतःच्या मुलाला भावले
दिले महत्व न्यायाला
दुर लोटले अन्यायाला
आहेस तू आमची
पुण्यश्लोक राजमाता
इतिहासातील पहिली
महिला राज्यकर्ती.."

वरील ओवी या इंदूरच्या माळवा प्रांतीय जहागीरदार असलेल्या होळकर घराण्यातील 'तत्वज्ञानी राणी' असा ज्यांचा उल्लेख भारतातच नव्हे तर जगभर ओळखल्या जाणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना समर्पित आहेत. करण ज्या मनगटात बळ, बुद्धी,



आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनु शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर होय.

सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता उच्चाटन, सामाजिक एकात्मता, स्त्री-पुरुष समानता गोरगरिबांनविषयी कळवळा, रुढी पध्दतीचे उच्चाटन, अनिष्ठ चालीरीती, रूढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क, प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाज-सुधारकांचे कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव सुशीलाबाई तर वडिलांचे नाव माणकोजी शिंदे असे होते. माणकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थीतीतील असून देखील ते विद्वान व दूरदर्शी गृहस्थ होते. कारण अठराव्या शतकामध्ये आजच्या सारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना देखील त्यांनी अहिल्येला शिक्षणाची घरीच व्यवस्था केली. अहिल्या मातेचे जीवन घडविण्यात त्यांचा फार मोलाचा वाटा होता. अवघ्या आठ वर्षांची असतानाच होळकर घराण्याचे सुभेदार मल्हारराव होळकरांचा बारा वर्षांचा एकुलता एक शुरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहिल्यांचा विवाह २० मे १७३३ रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला. लग्नानंतर लगेचच आपल्या चतुर, क्षमाशील व शांत स्वभावाने अहिल्याबाईंनी कुटुंबातील सर्वांची मने जिंकुन घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबारची मोडी मराठी लिहीणे, वाचणे, गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या. तसेच घोड्यावर बसणे, दांडपट्टा फिरवणे, युध्दाचे व राजकारणाचे डावपेच आखणे, लढाया करणे, पत्रव्यवहार करणे, न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्येची सामाजिक व राजकीय बुध्दी परीपक्व झाली.

इ.स १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याबाईंचे पती शुरवीर खंडेराव यांना वीरमरण आले वयाच्या ~~२५~~ २९व्या वर्षी वैधव्य आले. त्यांचे सासरे मल्हाररावांनी त्यांना सती जाण्यास

मो.न. 9881879704 नवसे.



नकार दिला. मल्हारराव म्हणाले "तू आम्हाला सोडून जाऊ नकोस पोरी, जीव दयायचाच असेल तर प्रजेसाठी दे प्रजेची माई होय." तेव्हा अहिल्यादेवींनी शपथ घेतली. "माझ्या निष्ठेची शपथ आज पासून सारे अलंकार, रंग मी या चितेत टाकते. फक्त पांढरे शुभ्र वस्त्र नेसेन आणि फक्त प्रजेसाठी जगेन. जुन्या रूढी, परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परीचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असूनही सती जाणे तहकूब करण्यात अहिल्याबाईंनी जे मनोधैर्य दाखविले ते अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून त्यांनी प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म, रूढी, परंपरा अशा जाचक प्रथांना झुगारून कर्तव्य महत्वाचे मानून स्वतःला कल्याणकारी राज्य देण्यासाठी आयुष्य वेचले.

बारा वर्षानंतर त्यांचे सासरे मल्हाररावांचा मृत्यू झाला त्यानंतर त्यांचा मुलगा मालेरावांचा देखील मृत्यू झाला. अशी एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने - आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईंनी - धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्वाप्रमाणे राज्य केले. पुर्वीच शासक म्हणून तरबेज झाल्यामुळे, मल्हारराव व मुलाच्या मृत्युनंतर अहिल्यादेवींनी स्वतःचे राज्यकारभार पाहू देण्याची अनुज्ञा द्यावी अशी पेशव्यांना विनंती केली त्यांनी शासन करण्यास मार्कण्यात अनेक अनेकांचा विरोध होता पण होळकरांचे सैन्य अहिल्याबाईंच्या नेतृत्वाखाली काम करण्यास इच्छुक होते. अहिल्यादेवी सोनिकी कवायतीत हत्तीच्या होदयाच्या कोपऱ्यात चार धनुष्य आणि बाणांचे भाते ठेवत असत. पेशवा पेशवा रघुनाथराव यालाही होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा लोभ सुटला. त्याने पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेऊन इंदौर वर चढाई केली. हे वृत्त तेजस्विनी अहिल्याबाईना कळताच खचून न जाता त्यांनी रघुनाथरावांना खलिता



मिळेला कि आपण जर माझ्याकडून हरलात तर एका स्त्री कडून हरलात अशी बदनामी होईल म्हणून विचार करा मोठ्या रणांगणात असे म्हटले. तेव्हा सर्वांनी माघार घेतली. शत्रुला रणांगणात पराभूत करायचा आधी मनात पराभूत करायचं हे मानसशास्त्र अहिल्यादेवींना ज्ञात होत.

पेशव्यांनी परवानगी दिल्यानंतर अहिल्यादेवींना विरोध करणाऱ्या मल्हाररावांचा दत्तक पुत्र तुकोजीराव होळकर यांस चाकरीत घेऊन सैन्याचा मुख्य करून अहिल्यादेवी होळकरांनी पूर्ण दिमाखात माळव्यास प्रयाण केले. मल्हाररावांच्या मृत्युनंतर इंदोर वरून संस्थानाची राजधानी महेश्वर या ठिकाणी हलवली. अहिल्यादेवींनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही त्या रोज जनतेच्या दरबार भरवीत असत. व लोकांची गाऱ्हाणी एकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती तरीही इंदूर या खेड्याचा विकास करून त्याचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे हे अहिल्यादेवींनी केलेले फार मोठे काम होते. त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधले, अनेक उत्सव भरवले, हिंदू मंदिरांमध्ये कायमस्वरूपी पूजा सुरू रहावी म्हणून अनेक दिली. माळव्याबाहेरही त्यांनी मंदिरे, घाट, विहीरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या.

ज्याप्रमाणे अहिल्यादेवी लोककल्याण आणि समाज सुधारणा करीत त्याचप्रमाणे लोकांमध्ये समानता स्थापित करण्याचे करीत अहिल्यादेवींनी आपल्या सैन्यामध्ये पुरुषांप्रमाणेच महिलांना देखील संधी दिली. आपल्या सैन्या सैन्यामध्ये महिलांची ही एक मोठी तुकडी खास सामावून घेतली आणि म्हणून त्यांना समान न्याय करण्याचा असे म्हटले जाते. अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजी होळकर याच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले तर स्वतःच्या मुलाकडून नकळत झालेल्या अपराधाबद्दल कोणताही विचार न करता शिक्षा सुनावली. प्रजेवरील अन्याय दूर करण्यात त्या नेहमी समान न्यायाचा विचार करीत. त्यांच्या या विचाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकर देखील प्रभावित होते. अहिल्यादेवींना अन्यायाचा तिरस्कार होता. त्यांनी राज्यात अनेक ठिकाणी न्यायलये



DATE

स्थापन करून त्यावर योग्य न्यायमूर्तींच्या नेमणूका केल्या. ज्या लोकांचे या न्यायालयामूळे समाधान होत नसे ते लोक अहिल्यादेवींकडे येत. न्यायासनावर बसून त्या सर्व प्रकरणे स्वत: एकत आणि निवाडा देत असत. निस्वार्थीपणे हे कार्य त्या करत होत्या. अशा प्रकारे अहिल्यादेवींनी सत्याचा मंत्र वापरून, विकासाचं तंत्र हिंदुस्थानच्या मातीत रुजवलं होत.

"त्यागाला हि लाज वाटावी,
इतका महान त्याग,
तुझ्या त्यागाने जागा झाला
आम्हा लेकरांचा स्वाभिमान"

अहिल्यादेवींनी जनतेच्या / रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. त्यावेळी राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याचा मंजुरीस नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तक विधानाचा कार्यक्रम स्वत: प्रायोजित करून, रितसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. अहिल्यादेवींनी शेती व शेतकरी कुटुंबाची अनेक कार्य केली. शेतकरी सुखी तर जग सुखी या संकल्पनेतून शेतकऱ्यांच्या जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहिरी बांधल्या. शेतकऱ्यांना गोपालनाचे महत्व पटवून प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन वाढवून आणले. त्यांची लोककल्याणाची किर्ती ख्याती ऐकून अनेक विद्वान लोक त्यांची भेट घेण्यास येत असत. आणि नंतर त्या ठिकाणीच राहत असत. अनेक विषयांचे विद्वान, शास्त्री, पंडीत, व्याकरणकार, किर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम यांनाही त्या मुद्दाम बोलावून घेऊन त्यांना त्या राजाश्रय देत असत. महेश्वर नगरीत वास्तव करीत होते. म्हणूनच महेश्वर नगरी त्याकाळी संस्कृती विद्वान व धर्माचे माहेरघर म्हणून नावारूपाला आली होती.

सर्वधर्मसमभावाचा आदर्श ठेवून मंदिरे, मशिदी, दर्गे व विहीर बांधली. तर काही मंदीरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. व सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्याचे यशवंत फाससे

मो नं. 9881879704



DATE

या बहादुरासोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाई या समाजसुधारक होत्या त्यांनी अनिष्ठ रूढी, परंपरांच्या आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही त्यांनी एकच धर्म पाळला तो म्हणजे मानवताधर्म होय. प्रेम, दया, करुणा यांचा त्रिवेणी संगम म्हणजे स्त्री होय. त्याग, सहनशीलता यांचे प्रतिक म्हणजे स्त्री. स्त्रीची अनेक रूपे आपल्याला परीचित आहेत. स्त्री एक अशी शक्ती आहे की जिच्यात अशक्य गोष्ट शक्य करण्याचे सामर्थ्य दडलेले आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत स्त्रीला अनन्यसाधारण महत्व हे पूर्वीपासून देण्यात आले होते. गार्गी, मैत्री, मैथिली यांच्या काळात स्त्रीला पुरुषापेक्षा उच्च स्थान होते त्यावेळेचे युग स्त्री-प्रधान संस्कृतीचे युग होते. या काळात सर्व महत्वाचे निर्णय स्त्रिया घेत होत्या एवढे मोठे सामर्थ्य स्त्रियांमध्ये म होते. त्याचप्रमाणे सीता, सावित्री, द्रौपदी, कौशल्या अशा अनेक स्त्रियांच्या पराक्रमाप्रमाणे, कर्तृत्वाच्या, चारित्र्याच्या आणि नेतृत्वाचा आदर्श ज्या श्रेष्ठ स्त्री-कडून घ्यावा ती श्रेष्ठ म्हणजे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर होय." राज्ये असंख्य झाली या जगात, पण पुण्यश्लोक कोणीही नाही, गर्व जिचा आहे या मराठी हृदयाला एकच ती महाराणी अहिल्याबाई यांनी राज्यकारभारात महत्वपूर्ण बदल केले. त्यांनी जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी अनेक उपाय केले. त्यांनी शिक्षण, आरोग्य, आणि सामाजिक विकास यांवर भर दिला.

एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील भारतीय, इंग्रजी व अमेरीकन इतिहासकार हे मान्य करतात की अहिल्यादेवी होळकरांस माळवा व महाराष्ट्रात त्याकाळी व आताही संतांचा सन्मान दिला जातो. इतिहासाच्या कोणाही अभ्यासकास ते मत खोडून काढण्याजोगे आजवर काहीही सापडलेले नाही. राजकारणातील बारकावे व तत्व, व्यावहारीक नीती नियम व सुत्रे आपल्या देशाची राजकीय, सामाजिक, भौगोलिक स्थिती, रणांगणावरील आखाडे व अड्ड्यांची आणि बारकावे समजून घेतले. इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर यांना भारताच्या 'कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारेट" असे म्हणले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची

मो.नं. 9881879704



राणी मार्गारेट यांच्याशी एकत्रित केली होती. ज्या काळी दळणवळणाची साधने फारच कमी होती किंवा म्हटले तर नव्हती अशा खडतर काळात त्यांनी भारतातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी व राज्यात मंदिरे धर्मशाळा तलाव बिहीरी, पाणपोई घाट अशी अनेक समाजउपयोगी कामे केली. आज ही वास्तुशिल्पे व त्यांनी उभारलेली स्थापत्य कला मातोश्रीच्या भव्य कार्याची साक्ष देत उभी आहेत. वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संस्कृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोरगरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दिले. त्यांच्या कामगिरीचा हा दुहेरी बाणा निश्चितच अभिमानास्पद आहे.

आजमितीला जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते ते काम लोकमाता अहिल्याबाईंनी त्याकाळी केले होते. मुत्सुदी अहिल्या म्हणजे तळपती शमशेर आणि लखलखती वीज होती. त्यांनी सारले आयुष्य लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न घालता संपुर्ण भारतात कार्य केलेले आहे. संपूर्ण भारतात अनेक बिहीरी, तलाव, कुंड, घाट बांधले आहेत. रस्ते, पुल, निर्माण केले आहेत. जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत पर पडेल ते त्यांनी त्याकाळीच केले होते. मल्हाररावांच्या मृत्युनंतर इंदोर वरून सैन्याची राजधानी महेश्वर या ठिकाणी आणून कारागीर, मनूर, विणकर, कारागीर कलावंत, साहित्यिक अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, पैसा, घर इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या आजही महेश्वरी साड्या पैठणी इतक्या प्रसिद्ध आहेत. राज्यात पशुपक्षी यांना चरण्यासाठी त्यांनी कुरणे राखली. मुंग्यांना साखर, माश्यांना कणकेचा गोळा, उन्हाळ्यात वाटसरूंना पिण्यासाठी पाणपोया हिवाळ्यात गरजूंना गरम कपडे यांची सोय केली. आपल्या राज्यात सुक्ष्म जीवांची उपासी राहू नयेत यासाठी दक्षता घेतली. दिव्यांग, अनाथ व असहाय्य लोकांचे पुनर्वसन केले. गोरगरीबांसाठी अन्नछत्रे व सदावर्ते चालविली वस्त्रांचे वाटप केली, प्रवासासाठी



मार्गावर अरण्यमय प्रदेशातही मोबदाई वगीचे वृक्षारोपण विश्रांतीसाठी ओटे व धर्मशाळा बांधल्या. घाट बांधताना केवळ केवळ तज्ज्ञांची मते विचारात न घेता प्रत्यक्ष त्या भागातील स्त्रियांना बोलवून घाटाच्या पायऱ्या कशा हव्यात? कपडे धुताना बाळ कुठे ठेवायला सोयीस्कर होईल. कपडे बदलताना खोल्या कुठे असाव्यात? इतक्या बारीक तपशिलासह घाट बांधून घेतले. भारतीय संस्कृती कोशात अहिल्यादेवींनी केलेल्या बांधकामांची यादी आहे. काशी, गया, सोमनाथ, अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, अवंती, द्वारका, बद्रिकेश्वर रामेश्वर व जगन्नाथपुरी वगैरे. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले एवढेच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक क्षेत्रात आपले प्रसिद्ध हिंदू मंदिरांचा त्यांनी जीर्णोद्धार केला. महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यात द्वारका, काशी, उज्जैन नाशिक व परळी वैजनाथ यांचाही समावेश होतो. वेरावळ येथील सोमनाथाचे मंदिर गझनीच्या महंमदाने उध्वस्त केलेले पाहून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जागृत लोक या देवळालाही भेट देतात. धर्मक्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले त्यांना धर्मरक्षक असेही म्हटले जाते.

"भारतभर पसरली कीर्ती जिची,
तिर्थक्षेत्री बांधल्या धर्मशाळा.
उदार कर्तव्यमुर्ती अहिल्यामाता
रयतेस लाविला तिने लळा.

अशाप्रकारे अहिल्याबाईंनी माळवा प्रांताचा कारभार आपल्या हाती घेऊन तब्बल २८ वर्षे प्रजाहितदक्ष राज्यकारभार केला. परकीय आक्रमणात उध्वस्त झालेल्या शेकडो मंदिरांचा जीर्णोद्धार, पहिली स्त्री सैनिक तुकडी, आंतरजातीय विवाह, सती प्रथा मान्य न करणे, डोंगर प्रदेशात लुटारूंचे बंदोबस्त करून त्यांचे पुनर्वसन केले. "प्रजा हित आपली संपत्ती आहे" असे मानून त्यांनी संपूर्ण राज्याचे पालकत्व घेतले त्यांना

(सौ. आर. के. नेवसे 9881879784)



रामराज्य निर्माण करायचे होते. त्यासाठी त्यांनी आपली सगळी दुःखे बाजूला ठेवून रयतेच्या सुखासाठी आयुष्यभर झटल्या.

अहिल्याबाईंचा राज्यकारभारही अतिशय पारदर्शक होता. अहिल्याबाई या स्वतः खंबीर, स्वाभिमानी व तेजस्वी व्यक्तिमत्वाच्या होत्या. त्या प्रजाहितकारणी, अष्टावधानी, न्यायदेवता, पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होत्या. अशाप्रकारे पुण्यसंचयाचे कार्य अहिल्यादेवी करीत होत्या. तशातच त्यांचा नातू, तेराव्या वर्षी मरण पावला. काही दिवसातच जावई लढाईत कामी आले आणि मुलगीही सती गेली. आयुष्यभर कोसळलेल्या संकटांनी त्यांचा अंत पाहिला. अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या अक्षरशः अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या. आजच्या काळात विचार केल्यास त्यांचे आयुष्य हे एका सूर्याप्रमाणे प्रकाश देणारे ठरले त्यामुळेच त्यांनी भारतातील जम्मू काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतच्या अनेक तीर्थक्षेत्रांचा जीर्णोद्धार केला, जनसेवा केली हे आत्ताच्या सरकारला आदर्श ठेवण्यासारखे आहे.

अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याच्या सन्मानार्थ इंदूरच्या विमानतळाचे "देवी अहिल्याबाई विमानतळ" असे नामकरण केले आहे. त्याच प्रमाणे इंदूरच्या विद्यापीठास "देवी अहिल्या विश्वविद्यालय" तर सोलापूरच्या विद्यापीठाचे "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर सिटी विद्यापीठ" असे नामकरण करण्यात आले आहे.

अहिल्याबाई होळकरांचे कार्य, चरित्र पाहता त्या उत्तम आदर्श प्रशासक असल्याचे दिसून येते.

॥ इतिहासाने पानोपानी
जिची गाईली गाथा।
होळकरांची तेजस्वी,
ती तेजस्वी पुण्यश्लोक अहिल्यामाता॥"

अहिल्यामातेने प्रजेवर जास्त करांचा बोजा न लादता आपल्या राज्याचा कोष समृद्ध व्हावा यासाठी स्वतःचा खर्च हा मर्यादित करून खाजगी उत्पन्नाचा उपयोग सुद्धा त्यांनी लोककल्याणासाठी केला. अशा कल्याणकारी योजना काय

सौ. रेश्मा कृष्णाय नवले - 9881879164



काय असू शकतात हे त्यांनी दाखवून दिले. अशा या अतिशय प्रजाहितदक्ष, सुशासक, न्यायदायिनी पुण्यश्लोक, राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा मृत्यु 13 ऑगस्ट 1795 रोजी झाला. शेवटी मी एवढेच म्हणेन,

"जात धर्म विसरून दाखवला
मानव सेवेचा मार्ग नवा
अहिल्यामाई होळकर आपल्या कार्याचा
निरंतर तेवत राहिल दिवा.."

त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला व विचारांना विनम्र अभिवादन! त्रिवार अभिवादन!

लेखिका.
सौ. रश्मा कृष्णाथ नेवसे
मोबं. 9881879704
हडपसर पुणे -28.

PAGE 010



पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त
राज्यस्तरीय भव्य निबंधस्पर्धा

सहभागी : सौ. सुरेखा अशोक बोराडे
शो.हा.नं.१, डाभव टाऊन,
गंगापूर रोड
नाशिक - ४२२०१३
मो.नं. ९१५८७७२४४

निबंधाचा विषय :
"अहिल्याबाईंचं जीवन चरित्र : त्याग, पराक्रम आणि लोककल्याण"
निबंधातील शब्द : १६०० शब्द
वर्ग - खुला गट.



अहिल्याबाईंचं डोंबिवली चरित्रत्याग, पराक्रम आणि लोककल्याण.....!

भारत वर्षातील स्त्रीरत्नांपैकी पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा कर्मयोग जाडवल होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी म्हणजे साक्षात कर्मयोगिनी.....!

अहिल्यादेवींनी असेतू हिमालयापर्यंत निर्मिलेल्या धर्मशाळा, विहीरी, देवालय, औषधालये हे काही पारलौकिक सौख्यासाठी, स्वर्गप्राप्तीसाठी केलेला दानधर्म नव्हता तर त्यात मानवजातीच्या चिरंतन संस्कृतीसाठी, मानवतेच्या सुखासाठी, विकासासाठी केलेला सामाजिक दृष्टीकोनचा आदर्श आहे.

"श्रीहरिभक्ता तू देवि अहल्ये, वरा धरा भूषा।
पुण्य तुज साधु म्हणे ख्याता तुजसम न जाणतभूषा॥
देवी अहिल्याबाई झालिस, जगतयात तू धन्या।
न न्याय धर्मनिरता अन्या कलिमाजी ऐकिली कन्या॥"

अशा कर्मयोगिनीची कथा अद्वितीय....!

अहिल्यादेवींचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर (अहिल्यानगर) जिल्ह्यातील चौंडी गावी झाला. त्यांचे वडिल माणकोजीराव शिंदे हे होते, जे गावचे पाटील होते.

"जे प्रयत्न घडवावे ते आणप्राण रक्षण करावे. ऐसे शोर जन सांगतात. आम्ही तेच केले. जिवेभावे या पिंडाचे रक्षण।" असे चौंडी गावातील छोट्या अहिल्याचे शिवलिंग रक्षणासाठीचे घोटाईचे बोल ऐकून मल्हारराव होळकरांना प्रभावित करून गेले. त्यांनी तिला आपली सून करून घेतले. परकराला कच्चा मारून ठिकरी - ठिकरी खेळणारी अहिल्या एकदम राजवाड्यात येऊन पडली.

मल्हारराव होळकरांचा पुत्र खंडेराव यांच्यासोबत वयाच्या आठव्या वर्षी अहिल्यादेवींचा विवाह झाला. मल्हाररावांनी खंडेरावांबरोबर शिक्षण सुरु केले. खंडेरावाला शिक्षणात रस नव्हता की युद्धावर जाण्याची फारशी आवड नव्हती. अहिल्येस ते पुत्रवत मानत. अहिल्यादेवींची बालवयातील तीव्र बुद्धी, ज्ञानलालसा, हिशोबातील गती आणि गृहकृत्यदक्षतेचे मल्हाररावांबरोबर सर्वांना कौतुक वाटे.

मल्हारराव होळकरांनी तलवार गाजवून माळवा जिंकला. उत्तरेकडे त्यांनी शौर्याची शर्थ करून मराठ्यांचे राज्य वाढविले.



अहिल्याबाईंच्या शुभ गायगुण म्हणूनच की काय युद्धात त्यांनी विजयश्रीने माळ घातली आणि पेशव्यांनी मालव्याची सुभेदारी बहाल केली. पेशव्यांकडून सुभेदारीचे कागद-शिक्का मल्हाररावांनी सून अहिल्येला सोबत घेऊन स्वीकारले. लहान वयापासूनच सुभेदारीचे हिशोब लिहायचे, डमाखर्च दुतर्फेने पहाणे, खाजगी आणि सरकारी बाजू नेमक्या मांडणे, एकूण वसुलीची व्यवस्था याबरोबरच शस्त्रास्त्रांचा साठा, विविध कारखाने यावरही अहिल्यादेवी बारीक नजर ठेवून काम करत. पहाटेपासून तर रात्रीच्या प्रहरापर्यंत अहिल्यादेवी शिक्षण घेत असत व कारभारात जातीने लक्ष घालत असत. अशी तैलबुद्धीची सून लाभल्यामुळे मल्हाररावांची कुकपुत्र खंडेरावाच्या नाकर्तेपणाची बोच थोडी कमी झाली होती. खंडेरावाने सुभेदारीच्या कामात किंवा वडिलांबरोबर युद्धातही कधी चांगली साथ दिली नाही.

अहिल्यादेवींना मालोजी व मुक्ता ही दोन अपत्य झाली. त्या पतिव्रता आणि धर्माने वागणाऱ्या होत्या. परंतु पती खंडेराव आणि मुलगा मालोजी यांची संसारात चांगली साथ न मिळाल्याने त्यांना अनेक दुःखांना सामोरे जावे लागले. कौटुंबिक दुःख अंतोनात असूनही त्यांनी कधीही राज्यकारभाराकडे आणि प्रजाहिताकडे दुर्लक्ष केले नाही.

सासरे मल्हारराव होळकर उत्तरेकडे मोहिमेवर असतांना सुभेदारीचा कारभार अहिल्यादेवी समर्थपणे पाहत होत्या. त्या जेवढ्या मर्यादशील होत्या, तेवढ्याच कर्तव्य कठोर होत्या. फडणीशीतले अधिकारी व इतर जेष्ठांना आज्ञा देतांना अवघड वाटे म्हणून त्या "श्री शंकर आज्ञेवरून" असे लिहित असत.

अहिल्यादेवींचे विचार प्रगल्भ, पुरोगामी, लोकहिताचे होते. त्यांच्या शब्दाला तेज होते. त्यांच्या न्यायदानावर सर्वांचा विश्वास होता. एक विधवा नातेवाईक तिची संपत्ती हडप करण्यासाठी आणि हवा तो दत्तक घेऊ देत नव्हते, म्हणून न्याय मागण्यासाठी त्यांच्याकडे रडत आली तेंव्हा अहिल्यादेवींनी तिला सांगितले, "हे रडणे यांबव बाई. कच्चेपणा सोडा, कडकपणे परिस्थितीला तोंड द्यायला शिका."

अहिल्यादेवींनी रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्यांच्यापाशीच ठेवण्यात मदत केली. अहिल्यादेवींच्या राज्यात कोणीही विधवा, मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस



नकार दिला, तेव्हा अहिल्यादेवींनी दत्तक विधानाचा कार्यक्रम स्वतः प्रायोजित करून, शीतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. महिलांना आधार देत त्यांनी निर्भयपणे राहायला हवे असा त्यांनी उपदेश केला.

अहिल्यादेवींचे पती खंडेराव कुंभेरीच्या लढाईत मारले गेले. सासऱ्यांनी दौलतीसाठी, प्रजेसाठी अहिल्यादेवींना सती जाऊ दिले नाही. रयतेसाठी त्या दुःख बाजूला ठेवून उभ्या राहिल्या. आपली मुलगी मुक्ताईबाई हिचा विवाह जो भिल्लांचा उपद्रव शौर्याने मोडून काढेल त्याच्याशी करून द्यायचा असा पण त्यांनी ठेवला. त्यानुसार मुक्ताचा विवाह शूरवीर यशवंत फणसे यांच्याशी करून देण्यात आला. त्यांच्या मते लग्न घराण्याशी पाहिजे असे नव्हे तर ते शौर्याशी व्हावे, कारण जशी सुर्य-चंद्राला जात नसते तशी सदगुणाला जात नसते.

पानिपतच्या युद्धात मराठ्यांना मोठी नामुष्की पत्करावी लागली. अब्दालीने जनतेस वेठीस धरले, त्रस्त केले. उत्तर भारतात खूप अत्याचार, अन्याय सामान्य जनतेला भोगायला लागले. यामुळे अहिल्यादेवी दुःखी झाल्या. रयतेसाठी काही भक्कम व्यवस्था नाही म्हणून रयत अशी उघड्यावर पडली. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी कारभाऱ्यांना आज्ञा देऊन असेतूहिमाचल पर्यंत ठीक-ठिकाणी स्वखर्चाने भक्कम मंदिरे बांधली, मंदिरांना भक्कम दरवाजे बांधून घेतले. धर्मशाळा उभारल्या जेणेकरून संकट समयी रयतेला त्या आश्रयास उपयोगी होतील. पक्क्या सडका, विहिरी, तलाव बांधून घेतले. ठिक-ठिकाणी अन्नछत्र उघडले.

तलवारबाजी करणाऱ्या आपल्या शत्रुंचा, होळकरांचा जयजयकार व्हावा यासाठी त्या कायम प्रयत्नशील राहिल्या. मल्हारराव्यांच्या कारकिर्दीत राज्याचा बंदोबस्त चांगला होता. त्याचे पुष्कळसे श्रेय अहिल्यादेवीकडे जाते. पेशवे व मल्हारराव यांच्यातील वैमनस्य मिटवण्याचे कामही अहिल्यादेवींनी केले. मल्हाररावांच्या निधनानंतर त्यांच्या कुळातील तुकाराम होळकर यांना सोबत घेऊन अहिल्यादेवींनी होळकरांची गादी न्यायाने, धर्माने चालवली. इंदौरच्या सत्तेसाठी प्रसंगी कारस्थान करणाऱ्या गंगाधर चंद्रचुड, चिटो विठ्ठल यांना आणि अगदी रघुनाथराव पेशव्यांना कणखर शब्दांत त्यांनी वठणीवर आणले. त्या कणखर स्वभावाच्या होत्या.

इंदौरवरून नंतर त्यांनी माहेश्वरी येथे राजधानी हलवली. ब्रम्हपुरीची स्थापना, वस्त्रोद्योग, ग्रामपंचायतीची योजना असे अजोड कार्य त्यांनी केले. त्यांनी आपल्या राज्यामध्ये शिक्षण आणि कला यावर भर दिला. अनेक कलाकारांना राजाश्रय देऊन, त्यांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला. महेश्वर येथील अहिल्यादेवींची राजधानी ही जणू काव्य, संगीत, कला व उद्योग यांची संस्थाच होती. महाराष्ट्रातील प्रसिद्ध मराठी कवी मोरोपंत व शाहिर अनंतफंदी यांना व संस्कृत विद्वान खुशालीराम यांना अहिल्याबाईंनी आश्रय दिला. कामगारांना, मूर्तिकारांना व कलाकारांना त्यांच्या राजधानीत सन्मान व वेतन मिळत असे. त्यांनी महेश्वर शहरात एक कपड्याची गिरणीपण सुरु केली. त्यांच्या कारकिर्दीत वस्त्रोद्योग भरभराटीला आला. अनेक लोकांच्या हाताला काम मिळाले. प्रजेचे कल्याण आणि संरक्षण यासाठी त्या सतत कार्यशील राहिल्या. राज्यातील भिल्ल, गौंड, रामोशी यांचा बंदोबस्त करून प्रजेला अभय दिले. आपल्या प्रजेवर त्यांनी अपत्यवत प्रेम केले.

भिल्ल व गौंड या राज्याच्या सीमेवर असलेल्या जमातींमध्ये वाद होता तरीही अहिल्यादेवी यांनी त्या लोकांना समाजात आणण्यासाठी पहाडातील निरुपयोगी जमीनी दिल्या आणि त्यांना, त्या क्षेत्रातून जाणाऱ्या सामानावर थोडा 'कर' घेण्याचा अधिकार दिला. यासाठी रायगंण सुभ्यावर नवापुर या ठिकाणी ठिंगळे भिल्ल सरदार यांना अधिकार दिले. त्यामुळे भिल्ल जमाती होळकरांच्या सैन्यात आल्या व त्यांनी सुरतेवर वचक बसवला. एवढे करूनही अहिल्यादेवींनी त्यांच्या सर्वतोपरी बारीक लक्ष ठेवले.

अहिल्यादेवी सावळ्या रंगाच्या, मध्यम बांध्याच्या होत्या. त्यांचे डोळे तेजस्वी होते. त्या महादेवाच्या भक्त होत्या. धार्मिक आणि सात्विक वृत्तीचे तेज त्यांच्या चेहऱ्यावर झळकत असे. त्या कायम पांढरा शुभ्र पोशाख परिधान करत आणि पांढऱ्या शुभ्र आसनावर बसत. महादेवाची पिंड हातात घेऊन बसलेली त्यांची प्रतिमा सात्विक सुंदर भासे. त्यांच्या वाणीला धार होती. त्यांच्या न्यायदानाने दोन्ही पक्षाचे समाधान होत असे. त्या उपासतापास करत दानधर्म सढळ हाताने करत.



पेशवा रघुनाथराव याला होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा लोभ सुटला. त्याने पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेऊन इंदोरवर चढाई केली. हे वृत्त तेजस्विनी अहिल्याबाईंना कळताच खचून न जाता त्यांनी रघुनाथरावांना अलिता पाठविला त्या म्हणतात, "आपण माझे राज्य हिरावून घेण्याचे कपट रचून आलात आमच्याकडील फितूरास गाठले. मला दुबळी समजलात की खुळी? दुःखात बुडालेल्यास अधिक बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतू? आता आपली गाठ रणांगणात पडेल. माझ्याबरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल मी हरले तर कीर्ती करून जाईल. आपण हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न ~~पडता~~ पडाल तर बरे. मी अबला आहे असे समजू नका. मी खांद्यावर भाला घेऊन समोर उभे राहिले तर पेशव्यांना भारी पडेल. वेळ पडली तर हातीच्या पायी साखळीशी बांधून तुमचे स्वागत न केले तर होळकरांच्या सुनेचे नाव लावणार नाही."

"मुत्सद्दी अहिल्या म्हणजे तळपती समशेर आणि लखलखती वीज होती. त्यांनी आपले आयुष्य लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असतांना प्रदेशाची मर्यादा न घालता संपूर्ण भारतात कार्य केलेले आहे. संपूर्ण भारतात अनेक विहिरी, तलाव, कुंड, घाट बांधले आहेत. रस्ते, पूल निर्माण केले आहेत. जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते ते काम लोकमाता अहिल्यादेवींनी केले. उद्योगधंद्यांना व त्यांच्या विकासाला प्राधान्य दिले. त्यांनी संपूर्ण भारतात अनेक हिंदु मंदिरे व नदीघाट बांधले, एवढेच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक क्षेत्रात प्रसिद्ध हिंदु मंदिरांचा जीर्णोद्धार केला. महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. सोमनाथ मंदिर गझनीच्या महंमदने उध्वस्त केले. ते देऊळ बांधून अहिल्यादेवींनी शेजारीच शंकराचे एक सुंदर आणि भव्य देऊळ बांधले.

सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे, मशिदी, दर्गे व



विहीर बांधली. तर कही मंदिरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले. मजुरांना काम मिळाले व सर्व धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुरासोबत एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्यादेवी ह्या समाजसुधारक होत्या. त्यांनी धर्मातील रुढी आणि परंपरचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवताधर्म. प्रजेवर जास्त करांचा बोजा न लादता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतःचा खर्च मर्यादित करुन खाजगी उत्पादनाचा उपयोग सुद्धा लोककल्याणासाठी केला. अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या.

इंग्रजी लेखक लॅरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांचा उल्लेख भारताच्या "कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गारेट" असा केला आहे. ते म्हणाले की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रियांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल. पेशवे माधवराव नारायण यांनी अखेरच्या दिवसात अहिल्यादेवींचे क्षेमकुशल विचारत पुढील गौरवोद्गार काढले, "आमच्या राज्याचे पुण्यातील महाद्वार म्हणजे माहेश्वरी आहे. मल्हारींचा घोटनाद अखंड घुमावा असा आशीर्वाद माता अहिल्यादेवी आपण द्यावा."

आपली प्रजा सुखी, समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्यादेवी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्वाप्रमाणे राज्य केले. जनकल्याणासाठी त्यांनी देह कारणी लावला. अहिल्यादेवींचे मध्यप्रदेश मधील इंदौर येथे वयाच्या ७०व्या वर्षी १३ ऑगस्ट १७९५ मध्ये निधन झाले.
अहिल्यादेवींचे महान कर्तुत्व हे हिंदुस्थानातील इतिहासातील एक सोनेरी पान आहे!

लेखन: सौ. सुरेखा अशोक बोऱ्हाडे (नाशिक)
मोबाईल नं. - ९१५८७७४२४४.



Page

पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पार्टी
महाराष्ट्र राज्य

पुण्यश्लोक
अहिल्याबाई होळकर

नाव - गौरव राजेंद्र लष्करे

पत्ता - मु/पोस्ट बाबुर्डी रोड, सावतानगर, श्रीगोंदा. जिल्हा- अहिल्यानगर

मोबाईल नंबर - 7820878252 / 8698959718

वय - 24

ई.मेल - gauravlashkare17@gmail.com.

विषय - पुण्यश्लोक अहिल्याबाई : आधुनिक भारतासाठी प्रेरणादायी नेतृत्व.



भारतीय इतिहास हा अनेक थोर व्यक्तिमत्त्वांनी घडलेला आहे. या इतिहासात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर याचं स्थान अनन्यसाधारण आहे. अठराव्या शतकात जेव्हा समाज पुरुषप्रधान होता, तेव्हा एका विधवा स्त्रीने राजकारभार सांभाळून नवा आदर्श निर्माण केला. ह्या केवळ एका राज्याच्या राणी नव्हत्या, तर दूरदृष्टीच्या न्यायप्रिय आणि लोकाभिमुख नेत्या होत्या. आजच्या काळात आपण पारदर्शक प्रशासन, स्त्रीसक्षमीकरण, सामाजिक समता आणि धर्मनिरपेक्षतेच्या गोष्टी बोलतो, पण अहिल्याबाई होळकरांनी ह्या सगळ्या गोष्टी आपल्या कारभारातून जगून दाखवल्या.

अहिल्याबाई होळकरांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी गावात झाला. ह्या एका सामान्य कुटुंबातून होत्या. ह्यांच्या साध्यापणात आणि सुसंस्कृत वागणुकीत असलेली तेजस्विता मल्हारराव होळकरांनी ओळखली आणि ह्यांना आपल्या सुनेपणासाठी निवडलं. पुढे ह्यांचे पती खंडेराव युद्धात मरण पावले. आणि काही वर्षांनी मल्हाररावांचंही निधन झालं. या परिस्थितीत अहिल्याबाईंवर राज्याची जबाबदारी येऊन पडली. अनेकांनी ह्यांचं नेतृत्व नाकारण्याचा प्रयत्न केला, पण ह्यांनी जबर आत्मविश्वासाने आणि धैर्याने ती जबाबदारी स्वीकारली. पुढे जवळपास तीन दशके ह्यांनी अत्यंत कार्यक्षमतेने होळकरांचं राज्य चालवलं ह्यांचा कारभार हा सर्वसामान्य लोकांच्या हिताचा होता. ह्यांनी दररोज जनतेशी संवाद साधला. कोणताही पक्षपात न करता न्याय दिला. ह्यांच्या दरबारात कोणतीही शक्ती – गरीब असो की श्रीमंत – थेट प्रवेश करून आपली अडचण मांडू शकत असे. ह्यांनी कारागिरांनाही पाठिंबा दिला. शेतकऱ्यांवर ताण येऊ नये म्हणून ह्यांनी संकट काळात कर माफ केले. आज ह्या गोष्टींना आपण लोकाभिमुख प्रशासन म्हणतो, ह्या सगळ्या गोष्टी ह्या काळात ह्यांनी प्रत्यक्षात आणल्या होत्या. स्त्री म्हणून ह्यांनी जे कार्य केलं, ते आजच्यानिच आगळ्या होत्या. एका विधवा स्त्रीने संपूर्ण राज्य यशस्वीपणे चालवणं ही ह्या काळात अभूतपूर्व गोष्ट होती. ह्यांनी विधवांसाठी निवासगृहं, आश्रयस्थळ आणि शिक्षणाची सोय केली. स्त्रियांचं स्थान समाजात मजबूत व्हावं म्हणून ह्यांनी प्रयत्न केले. ह्यांच्या कृतीतून स्त्रीशक्तिचा खरा आदर दिसून येतो. आज आपण जेव्हा स्त्रीसक्षमीकरणाच्या गोष्टी



राबवतो, तेव्हा लक्षात येतं की अहिल्याबाईंनी दोनशे वर्षांपूर्वीच हे काम सुरू केलं होतं.

धर्मनिरपेक्षतेच्या दृष्टिकोनातूनही त्यांचं कार्य महत्त्वाचं आहे. त्यांनी अनेक हिंदू धर्मस्थळांची जीर्णोद्धार केला. काशी, अयोध्या, मथुरा, द्वारका, रामेश्वरम् या ठिकाणी धर्मशाळा, घाट, पागवठे बांधले. पण हे सगळं केवळ धार्मिकतेसाठी नव्हे, तर यात्रेकरू आणि स्थानिक जनतेच्या सुविधेसाठी होतं. त्यांनी मुस्लिम बांधवांनाही मदतीचा हात दिला. धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव याचं मूर्त उदाहरण त्यांनी घडवलं. त्यांनी उभारलेली काम फक्त त्यांच्या राज्यापुरती मर्यादित नव्हती. त्यांनी संपूर्ण देशभर रस्ते, घाट, विहिरी, धर्मशाळा, तळी, शाळा, कुंभारवाडे, पाण्याची ठिकाणं उभारून एक समावेशक विकास घडवला. तो विकास शहरी भागापुरता नव्हता, तर ग्रामीण भागातही पोहोचलेला होता. आज ह्या गोष्टींना आपण 'समावेशक विकास' किंवा ग्रासरूट लेव्हल डेव्हलपमेंट' म्हणतो, ते त्यांनी प्रत्यक्षात आणलं होतं. अहिल्याबाईंचं नेतृत्व मूल्याधिष्ठित होतं. त्यांनी कधीही सत्तेचा गर्व केला नाही, उलट सत्तेचा उपयोग जनतेच्या हितासाठी केला. त्यांच्या मुलाने भ्रष्टाचार केल्याचं लक्षात आलं तेव्हा त्यांनी भावनेपेक्षा कर्तव्याला प्राधान्य देऊन त्याला शिक्षा केली. हे दाखवून देतं की त्या नैतिकतेच्या आणि कर्तव्याच्या मार्गावर ठाम होत्या. आजच्या राजकीय वातावरणात जिथे भ्रष्टाचार, कौटुंबिक वंशवाद आणि नैतिक अधःपतन दिसून येतो, तिथे त्यांच्या कारभारातून भारतीय राज्यघटनेतील मूल्य- न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुता, या सगळ्यांचा मूर्त आविष्कार केला. त्यांनी कधीही जातीपातीचा भेद केला नाही. त्यांच्या दृष्टीने सगळे नागरीक समान होते. म्हणूनच त्या आधुनिक भारताच्या वैचारिक मूलगामी नेतृत्वात बसणाऱ्या बसणाऱ्या नेत्या ठरतात.

"अहिल्याबाईंचं नेतृत्व, आदर्श ठरलं आहे,
धैर्य आणि न्यायाने, राज्य त्यांचं वय आहे।
विधवेसाठी त्यांनी दिलं, नवा जीवनाचा
प्रकाश,
पुण्यश्लोक अहिल्याबाई, भारताचं महान"



आजही देशभर त्यांच्या कार्याची उदाहरणं आपल्याला पाहायला मिळतात. काशी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार, नर्मदा घाटांची निर्मिती, विविध ठिकाणी उभारलेली धर्मशाळा, विहिरी, रस्ते, हे सगळं त्याचं कार्य आहे. अनेक विचारवंत, लेखक आणि समाजसुधारकांनी त्यांच्या कार्याचं कौतुक केलं आहे. त्यांनी जे उभं केलं ते केवळ वास्तू नव्हते, तर त्या मूल्यांचं प्रतिबिंब होतं- सेवा, समता, न्याय आणि सामाजिक बंधुता. आज आपण महापुरुषांच्या स्मृतिदिनांवर पूजन करत असतो. पण त्याच खरं पूजन म्हणजे त्यांच्या विचारांचा, कार्यपद्धतीचा आणि मूल्यांचा स्वीकार करणं होय. अहिल्याबाईंच्या नावाने रस्ते, पुरस्कार, संस्था उभारल्या आहेत, पण त्यांच्या विचारांना आचरणात आणणं ही खरी गरज आहे.

भारताला जर खरं नेतृत्व मिळवायचं असेल, तर ते अशा नेत्याचं असावं- ज्याने सत्ता ही सेवा समजून चालवली, ज्याने समाजात भेदभाव न करता प्रत्येक घटकाला न्याय दिला, आणि ज्याने स्वतःच्या उदाहरणातून लोकांना मूल्यांची शिकवण दिली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचं नेतृत्व आजही आपल्याला मार्ग दाखवतं, प्रेरणा देतं आणि आधुनिक भारताचं आदर्श रूप साकारायला शिकवतं. त्यांच्या विचारांची ही शिदोरी आपल्याला आता आणि पुढेही मार्गदर्शन करत राहील.

धैर्याची मूर्ती, करुणेची सावली,
जनतेसाठी जिजवली दीपमाळ होती.

स्त्रीशक्तीचं जिवंत रूप ती,
न्याय व समतेची चालती बोलती गाथा,

पुण्यश्लोक अहिल्याबाई- भारताची अभिमानपात्र माता।



Date
Page

विश्लेषण व आधुनिक संदर्भातील प्रेरणा :-

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या नेतृत्वावर विचार करताना माझ्या मनात एक प्रश्न वारंवार येतो. आजच्या काळात आपल्याला अशाच नेतृत्वाची गरज नाही का? आपल्याकडे नेतृत्व आहे, पण त्यात नैतिक अधिष्ठान, प्रामाणिकपणा आणि लोककल्याणाचा दृष्टिकोन फारसा जाणवत नाही. अहिल्याबाईंचं कार्य पाहीलं की लक्षात येत की ते नेतृत्व केवळ सत्तेसाठी नव्हतं, तर सेवा आणि मूल्यांसाठी होतं.

उदाहरणार्थ,

आज शासकीय पातळीवर 'बेटी बचाओ, बेटी पढाओ', 'स्वच्छ भारत', 'हर घर जल' अशा योजना राबवल्या जातात. या सगळ्या योजना पाहिल्या तर त्यांचा मूळ गाभा म्हणजे सामाजिक न्याय, समता आणि समावेश अहिल्याबाईंनी दोनशे वर्षांपूर्वी हेच मूल्य प्रत्यक्षात उतरवले. त्यांनी विधवांसाठी आश्रय, स्त्रियांसाठी शिक्षण, जनतेसाठी पाणी प्रश्न, अन्न आणि न्याय हे सगळं उपलब्ध करुन दिलं. त्यामुळे त्यांच्या कारभाराची तुलना आपण आजच्या सामाजिक विकासाच्या योजनांशी करु शकतो. तसेच, पारदर्शक आणि जनतेशी थेट संवाद करणाऱ्या नेतृत्वाची आपण आज गरज जाणतो. अहिल्याबाई दररोज जनतेशी संवाद साधत. आज अशाच प्रकारे काही राज्यकर्ते लोकांसोबत सोशल मिडियाच्या माध्यमातून थेट संवाद साधतात, पण खऱ्या अर्थाने लोकशाही संवाद किती होत आहे हे तपासायला हवं. अहिल्याबाईंनी पक्षपात न करता न्याय दिला. आज न्याय व्यवस्थेत पारदर्शकता टिकवण्यासाठी आपण प्रयत्न करतो, पण अनेकदा ते पुरेसे होत नाही. अशावेळी अहिल्याबाईंचा आदर्श आपल्या संस्थांना बळ देऊ शकतो. मी एक लेखक म्हणून सामाजिक प्रश्नांवर अभ्यास करताना सतत विचार करतो कि, - खरं नेतृत्व म्हणजे काय? अहिल्याबाईंच्या उदाहरणावरुन मला वाटतं की खरं नेतृत्व हे लोकांशी जोडलेलं असतं, त्यांचं दुःख समजून घेणारं असतं आणि त्यावर कृती करणाऱ्याचं असतं. त्यांनी राज्यकारभार केला खरा, पण तो केवळ शासकीय कर्तव्यापुरता नव्हता - तो माणुसकीचा, सहवेदनेचा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा होता.



आजचा तरुण वर्ग शिक्षण, करिअर आणि यशाच्या मागे धावत असताना अनेकदा मूल्यं हरवत जातो. अशावेळी अहिल्याबाईंचं जीवन म्हणजे मूल्यांचा दीपस्तंभ आहे. यांनी आयुष्यात अनेक दुःख सेलली.- पतीचं निधन, सासऱ्यांचं निधन, समाजाचा विरोध- पण या खचल्या नाहीत. या उश्या राहील्या, समाजासाठी. यामध्ये आपल्याला 'resilience'- म्हणजे संकटात न खचता पुढे जाण्याची प्रेरणा मिळते. उदाहरण द्यायचं झालं तर, आज कोविड-१९ च्या काळात अनेक डॉक्टर, आरोग्यसेवक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता लोकांची सेवा केली. यामध्ये अहिल्याबाईंच्या विचारांची छाया मला दिसते- सेवा हीच खरी सत्ता हे यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिलं. याशिवाय, आपण हल्ली जी क्लायमेट चेंज, महिला सुरक्षेसाठी झटणारे कार्यकर्ते, शिक्षणातून परिवर्तन घडवणारे शिक्षक पाहतो, ते देखील अहिल्याबाईंच्या वारशाला पुढे नेतात. स्त्रीसक्षमीकरणाच्या आधुनिक संस्थांमध्ये- जसं की 'सेल्फ हेल्प ग्रुप्स', 'महिला बँक', 'सखी केंद्र' - यांच्या आदर्श अंतर्भूत आहे. गावपातळीवर पाणी, आरोग्य, शिक्षण यासाठी काम करणाऱ्या महिला आजही यांच्या पावलावर पाऊल ठेवत कार्य करत आहेत. माझ्यासारखा तरुण, जो ग्रामीण भागातून येतो, आणि समाजपरिवर्तनाची आकांक्षा बाळगतो, त्याला अहिल्याबाईंनी दाखवलेला मार्ग अत्यंत प्रेरणादायक वाटतो. यांनी दाखवलं की सामान्य घरातून आलेली स्त्रीसुद्धा असामान्य नेतृत्व करू शकते, फक्त यात चिकाटी, मूल्यांवर निष्ठा आणि लोकहिताची भावना हवी. यांच्या जीवनाकडे पाहताना असं वाटतं की, नेतृत्व पदावर असणं महत्वाचं नाही, तर ते कसं वापरलं जातं, याला खरी किंमत आहे. यांनी दाखवलं की शक्तीचा उपयोग सत्तेसाठी नव्हे, तर समाजासाठी केला तरच ती पूजनीय होते.

आजच्या तरुणांसाठी बोध –

आजचा तरुण वर्ग शिक्षण, करिअर आणि यशाच्या मागे धावत असताना अनेकदा मूल्यं हरवत जातो. अशावेळी अहिल्याबाईंचं जीवन मूल्यांचा दीपस्तंभ आहे. यांनी आयुष्यात अनेक दुःख



झेलली. पतीचं निधन, सासऱ्यांचं निधन, समाजाचा विरोध - पण ह्या थांबल्या नाहीत. ह्या उभ्या राहील्या, समाजासाठी. यामध्ये आपल्याला 'resilience' - म्हणजे संकटात न थांबता पुढे जाण्याची प्रेरणा मिळते.

निष्कर्ष :-

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचं जीवन म्हणजे आधुनिक भारतासाठी एक आरसा आहे. ह्यात नेतृत्व, नैतिकता, सामाजिक समता, स्त्रीसक्षमीकरण आणि धर्मनिरपेक्षतेचे प्रतिबिंब दिसते. आपण जर खरोखर आधुनिक भारत घडवू इच्छितो, तर ह्यांच्या विचारांचा स्वीकार आणि आचरणच आपल्याला या दिशेने घेऊन जाईल. माझ्यासारख्या तरुणाला, समाजाशी जोडलेला लेखक होण्याची प्रेरणा ह्यांच्या जीवनातून मिळते. ह्यांच्या कार्याने मला शिकवलंय - नेतृत्व हे अधिकारात नव्हे, तर जबाबदारीत असणं हे महत्वाचं असतं. आणि ही शिकवणच मला माझ्या कार्यात आणि विचारात पुढे नेत राहील.


पश्चिमोत्तर प्रकोष्ठ, महाराष्ट्र
शिक्षण • संघी • सेवा
पुण्यश्लोक
अहिल्याबाई होळकर



आभार

धन्य ती माती, जिथे अहिल्येसारख्या तेजस्विनीचा जन्म होतो, आणि धन्य ती भावना, जी तिच्या विचारांना पुढे नेण्यासाठी प्रेरणा देते. या त्रिशताब्दी जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे यश हे केवळ सहभागी विद्यार्थ्यांचे नव्हे, तर दृढ इच्छाशक्तीने, निःस्वार्थ भावनेने आणि एकात्मतेने कार्य करणाऱ्या आयोजकांच्या अथक परिश्रमांचे फलित आहे. त्या सर्वांच्या कार्यास हा संकलन विशेषांक एक छोटासा साहित्यिक नमस्कार आहे.

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र राज्य या ज्ञानाभिमुख व राष्ट्राभिमुख मंचाने या उपक्रमाची संकल्पना मांडली, तिचे मूर्तरूप घडवले आणि एका नव्या विचारप्रवाहाला दिशा दिली. प्राचीनतेतून प्रेरणा घेऊन आधुनिकतेचा सेतू घालणाऱ्या भारतीय जनता पार्टीने राजमाता अहिल्याबाई होळकरांच्या कार्यमूल्यांना नव्या पिढीच्या मनामनात जागवले, हे विशेष उल्लेखनीय आहे.

या उपक्रमामागे अनेक ज्ञात-अज्ञात हातांची उष्ण ऊब आहे. स्पर्धेचे आयोजन, नियोजन, प्रचार-प्रसार, मूल्यांकन, संकलन व संपादनाचे कार्य अत्यंत भक्कमपणे उभे राहिले, कारण प्रत्येक व्यक्तीने या उपक्रमाला आपले समर्पण मानले. त्यामध्ये राज्यभरातील संघटक, विभाग संयोजक, जिल्हा प्रतिनिधी, महाविद्यालयीन समन्वयक, तसेच संपादक मंडळ, तांत्रिक सहाय्यक, आणि मूल्यांकन समितीतील अभ्यासू परीक्षकगण यांचे विशेष योगदान आहे.

स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धकांचे मनःपूर्वक आभार. त्यांनी ज्या संवेदनशीलतेने, सखोल अभ्यासाने आणि विचारपूर्व लेखनातून अहिल्याबाईंचे चरित्र सर्वांपर्यंत पोहचवले,ते वाखाणण्याजोगे आहे. हे संकलन त्यांच्या प्रतिभेला एक ओळख देणारे व्यासपीठ ठरेल, हीच अपेक्षा.

आमच्या या प्रवासात प्रत्येक सहभागी महाविद्यालय, प्राचार्य, प्राध्यापक, संयोजक आणि प्रेरक मंडळींनी दिलेले सहकार्य हे अमूल्य आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना विचारप्रवृत्त केले, मार्गदर्शन दिले आणि ऐतिहासिक जाणिवेच्या एका सुंदर प्रवासासाठी पोषक वातावरण निर्माण केले.

या विशेषांकाच्या माध्यमातून आम्ही जेव्हा हे साहित्य समाजासमोर सादर करतो, तेव्हा आमच्या मनात एकच भावना ठसठसते कृतज्ञतेची. ती कृतज्ञता त्या राजमातेला, जिने न्याय, सेवा आणि धर्मशीलतेचा मंत्र दिला; आणि त्या सर्व आयोजकांना, ज्यांनी हे कार्य त्या राजमातेस अर्पण करण्यासाठी साकारले.

शेवटी, या संपूर्ण उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्यांनी सामूहिकपणे खारीचा वाटा उचलला, अशा सर्व ज्ञात व अज्ञात सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानूनच आम्ही या संकलनाचे पान अलगद मिटत आहोत पुढील प्रेरणादायी प्रवासासाठी हीच प्रारंभरेषा ठरावी, ही नम्र अपेक्षा.

धन्यवाद!

सहकार्य



आर्थिक सहाय्य

- श्री.सचिन मोरे प्रदेश संयोजक ,पदवीधर प्रकोष्ठ ,भाजपा ,म.रा
- श्री.क्षितीज कुलकर्णी, सोशल मिडिया प्रमुख , पदवीधर प्रकोष्ठ ,भाजपा ,म.रा
- श्री.सुरज रोंगे ,प्रदेश संयोजक ,पदवीधर प्रकोष्ठ ,भाजपा ,म.रा
- श्री. अजय दळवी, प्रदेश संयोजक ,पदवीधर प्रकोष्ठ ,भाजपा ,म.रा

परीक्षकांची यादी

- डॉ.सीमा कांबळे
- प्रा.अनिल गुरव
- प्रा.निलेश अडसुळे
- प्रा.राजू गायकवाड
- श्री.अतुल पालेकर
- प्रा.निर्मला पाटील
- प्रा.नीता निंबाळकर
- श्रीम.जया सिन्स
- श्रीम.निशिगंधा बनकर
- श्रीम.नमिता रवारीया

तांत्रिक सहाय्य

- श्री. आयुफ अकुला
- डॉ.विनायक लोहार
- श्रीम. शिवांजली पांढरपट्टे
- श्री.सिध्येश गावकर
- श्री.प्रताप माने

पद्मतीर्थ प्रकोष्ठ, महाराष्ट्र
शिक्षण • संधी • सेवा

पुण्यश्लोक
अहिल्याबाई होळकर

